म. ग्रं. सं. ठाणें
य
नं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय)


मुमुक्षु

सं. प्रा. नं.
ता.

ता.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९ | पौष १८४७ | नवें वर्ष ६ वें |
| मास ५ | जानेवारी १९२६ | अंक १ ला. |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु. ३-३

मुद्रक:- लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

वर्ष ६ वें ] विषयानुक्रमणिका [ अंक १ ला


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... ... | १--२ |
| २ पारिजातकाचीं ताजीं फुलें ... ... ... ... | ३--४ |
| ३ थोरांचा समागम ... ... ... ... ... | ५-७ |
| ४ कलहयुगाचा युगधर्म ... ... ... ... | ७--१५ |
| ५ अर्थसादृश्य ... ... ... ... ... | १६-१९ |
| ६ ब्राह्मणदेहाचें कार्य ... ... ... ... | १९--२३ |
| ७ एका कवयित्रीचीं कवनें ... ... ... ... | २४--२६ |
| ८ श्री नारायणमहाराज जालवणकर- यांचें पत्र-- ... ... | २७--२८ |
| ९ अभिप्राय व पोंच ... ... ... ... ... | २८--२९ |
| १० ताजे मननामोद ... ... ... ... ... | २९--३१ |
| ११ बंधांचे स्थानांतर व कवि आणि काल ... ... ... | ३१--३३ |
| १२ तीर्थयात्रा ... ... ... ... ... | ३४--३६ |
| १३ आस्तिक्यविचार ... ... ... ... ... | ३६--३८ |
| १४ काळे ढग ... ... ... ... ... | ३८--४० |


## सूचना.

फेब्रुवारीच्या अंकाचें काम सुरू असून अंक फेब्रुवारीचे पहिले आठवड्यांत प्रसिद्ध होईल. जानेवारीपासून ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यांचेपैकीं ज्यांचेकडून चालू वर्षाची वर्गणी रु. ३ म. ऑ नें ह्या महिना अखेर आमचे हातीं येणार नाहीं त्यांचेकडे व फेब्रुवारी-पासून ज्यांचें वर्ष सुरु होतें त्यांचेंकडे फेब्रुवारीचा अंक रु. ३८३ च्या व्ही. पी. नें पाठविला जाईल. त्यांनीं व्ही. पी. चा स्वीकार करावा.



## अभंग.

१

अनुसरलों जीवेंभावें । नेणों आपुलें परावें ॥ १ ॥
तुम्हांवीण पंढरिनाथा । नाठवे कांहींच सर्वथा ॥ २ ॥
चित्तें मनें काया वाचा । जिहीं संकल्प हा तुमचा ॥ ३ ॥
निळा म्हणे दिवसराती । नाहीं विसराची भ्रांती ॥ ४ ॥

२

ध्यानीं रंगलें मानस । जिव्हे नामाचा उल्हास ।
कीतन आवडे श्रवणास । नेत्र रूपासी माळले ॥ १ ॥
वाचा लांचावली गुणा । तुमच्या नामसंकीर्तना ।
देह घाली लोटांगणा । मस्तक चरणा सोकावला ॥ २ ॥
ऐसीं अवघीं अवघ्याठायीं । पडलीं तुमचिये प्रवाहीं ।
तुह्मांवीण दुजें कांहीं । कोणा नाठवे सर्वथा ॥ ३ ॥
देखिलें तें विटेवरी । राहिलें डोळियाभीतरीं ।
तें अवघिया एकचि सरी । वेधूनियां ठेविलें ॥ ४ ॥
निळा म्हणे नव्हे आतां । पालट केलियाही सर्वथा ।
नामें रूपें पंढरिनाथा । लाविलें पंथा आपुलिया ॥ ५ ॥

३

सांपडला ठेवा । आतां पात्र झालों देवा ॥ १ ॥
माझ्या वडिलांची हे जोडी । होती पुरातन चोखडी ॥ २ ॥
गाइन यावरी चोखडे । तुमचे कीर्तीचे पवाडे ॥ ३ ॥
निळा म्हणे ध्यानीं चित्तीं । धरूनि राहे तुमची मूर्ति ॥ ४ ॥

४

अमृताहूनि गोड हरी । नाम उच्चारितां वैखरी ॥ १ ॥
घेतां न विटेचि हे रसना । अधिक अधिक आवडी मना ॥२॥
चित्तासी विश्रांती । इंद्रियें सुखावली ठाती ॥ ३ ॥
निळा म्हणे गोडागोड । सेवितां सरे अवघी चाड ॥ ४ ॥

५

जाणूं जातां तुम्हां जाणीवचि विरे ।
तुमच्या निजध्यासें मनचि मुरे ॥
तुमचिये भेटी अंगाचि नुरे ।
वाचाही वोसरे स्तवितां तुम्हां ॥ १ ॥
ध्यानें तुमचिया जीवचि हारपे ।
तुम्हांसी जाणतां बुद्धीचि करपे ॥
तुमचिया चिंतनें चित्तही विसर्पे ।
मिसळे चिद्रूपें चैतन्येसी ॥ २ ॥
तुमचिया आठवें निळाचि नाहीं ।
तुम्हीचि अवघे अंतर्बाही ॥
तुम्हांवीण दुसरें नुरेचि कांहीं ।
नामरूप तेंही अवघें तुम्ही ॥ ३ ॥

६

जीवाचाही जीव तूंचि प्राणाचा प्राण ।
नयनाचेंही नयन तूंचि घ्राणाचें घ्राण ॥ १ ॥
सर्वही इंद्रियभाव तूंचि माझे श्रीहरी ।
तुजविण न दिसे पाहतां मज मी माझारी ॥२॥
चित्ताचेंही चित्त तूंचि मनाचें मन ।
श्रवणाचेंही श्रवण तूंचि रसनेची रसना ॥३॥
निळा म्हणे तूंचि माझा सर्वांहि व्यापक ।
देहादेहीं शोधुनि पाहतां न दिसे आणिक ॥ ४ ॥

# पारिजातकाचीं ताजीं फुलें.

१

निर्भयता हें ज्ञानाचें पहिलें लक्षण गीतेंत सांगितलें आहे. जनकाला याज्ञवल्क्यांनीं ब्रह्मविद्या ऐकविल्यावर त्याची पूर्ण तयारी पाहून ' अभयं वै प्राप्तोऽसि जनक ' असें शिफारस पत्र दिलें आहे. परमात्मरूपता पावणें हें अभयाचें बीज आहे. द्वैतभावामुळें भय उत्पन्न होतें. ' द्वितीयाद्वै भयं भवति ' अशी श्रुति आहे.

परमात्मेसीं जो विभक्त । तो पुरुष बोलिजे अयुक्त ।
त्यासी नानात्वें भेद भासत । निजीं निजत्व विसरोनी ॥
—एकनाथी भागवत अ० ७–५७.

ऐक्यभावाचेनि पैसें । दुजें मानूनि आत्मा ऐसें ।
भयवार्ता देशें । दवडणें जें ॥ ७१ ॥
पाणी बुडऊं ये मिठातें । तंव मीठचि पाणी आतें ।
तेवीं आपण जालेनि अद्वैतें । नाशे भय ॥ ७२ ॥
—ज्ञानेश्वरी अ० १६

२

परमात्म्याहून आपण वेगळे आहोंत असें जो पुरुष भावतो तो अयुक्त, तो आपलें व्यापक निजरूप विसरून नानात्वीं भेदच पाहत असतो. उलटपक्षीं परमात्म्याशीं आपण एकरूप आहोंत अशा भावनेनें जो आपली अखंड एकाकारता अनुभवतो तोच युक्त, योगी, ज्ञानी, भक्त. 'भक्त म्हणजे विभक्त नव्हे । विभक्त म्हणिजे भक्त नव्हे ' ( दासबोध ). जो देवाशीं विभक्त नाहीं तोच भक्त. जो वेगळा पडतो तो त्याच द्वैतामुळें नानात्व पाहतो व दुःखांत पडतो, म्हणून अद्वैतरूपता हें अभयाचें बीज आहे ( एकनाथ ).

३

दुजें म्ह० जग हें आत्मस्वरूप आहे असें मानून म्हणजेच आत्मभावाचा विकास किंवा विस्तार करून भयाला हद्दपार करणें याचें नांव अभय. आपणच आत्मस्वरूपानें सर्वत्र भरलों आहोंत असें निरंतर जाणणें हें अभयत्व होय. समुद्राच्या पाण्याची लहर मिठाला बुडवायला येते तों मीठच पाणी होऊन दुजेपणा मोडतो त्याप्रमाणें आत्मभावाच्या विकासांत सारें दृश्य जगत् आत्मरूप होऊन जातें तेव्हांच अभयत्व प्राप्त होतें ( ज्ञानेश्वर ).

४

भेद आहे तोंवर भीति आहे, अभेदांत भीति कुठली ?

५

आत्मा जसजसा वाढवावा, आत्म्याचा विकास करावा तसतसे द्वैताचे पडदे विरल होत जाऊन अद्वयानंदाची खाण उघडी होते व भयवार्ताही उरत नाहीं.

६

भयाचें भूत—आहे म्हटलें कीं पाठी लागतें, नाहीं म्हटलें कीं समोर उभें राहत नाहीं. भयाच्या चिंतनानें भय शतपट वाढतें. प्रत्यक्ष आपत्तीचा वाघोबा समोर उभा राहिला तर मनुष्य गांगरत नाहीं, इतका त्याच्या आगाऊ कल्पनेनें घाबरट बनतो! म्हणून निर्भयतेचा स्वभाव हें 'देणें ईश्वराचें' आहे.

७

कृपण आणि उदार यांच्यांत थोडा फरक आहे. जग माझ्यासाठीं उत्पन्न झालें आहे असें कृपण समजतो व जगाच्या सेवेसाठीं देवानें मला उभें केलें आहे असें उदार समजतो! कृपणाला जगाची भीति असते व उदार पुरुष निर्भय असतो. कोंबडीसारखें छोटें अंतःकरण जगापासून भय पावतें, पण उदार चरिताला त्याच्या विशाल अंतःकरणामुळें कोठेंच भय नसतें.

८

भक्त देवाच्या आधारावर निर्भय असतात. देवाला सर्वस्व निवेदून ते देवाचेच होऊन राहतात म्हणून त्यांना अभय असतें.

भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥
नारायणाऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥ ध्रु० ॥
चित्त वित्त हेवा । समर्पूनि रहा देवा ॥ २ ॥
तुका म्हणे मन । असो द्यावें समाधान ॥ ३ ॥

९

भय नाहीं हरिच्या दासा । शुभकाळ दाही दिशा ॥ १ ॥

हरिदासांना हरीच्या बळावर निर्भयत्व मिळतें. जें जें होत आहे हें सर्व हरीच्या सत्तेनेंच होत आहे असा भक्तांचा निश्चय असल्यामुळें त्यांना सर्व मंगलच आहे. मंगलांचें मंगल असा नारायण अखंड चित्तांत भरला असल्यामुळें त्यांचें अमंगल कोण करूं शकेल? आणि हरि करितो तेंच मंगल असा त्यांचा विश्वास त्यांच्या समोर अमंगल किंवा अशुभ उभेंच करीत नाहीं. हरिप्रकाशांत भय कोठें राहील?

१०

माझेंचि मज नवल वाटे । मीचि भेटें मजलागीं ॥ १ ॥
निजात्मबोधें उदो केला । प्रकाश दाटला कोंदोनी ॥ २ ॥
कोठें कांहींचि न दिसे दुजें । निजात्मतेचें जग भासे ॥ ३ ॥
निळा म्हणे अवघे ठायीं । मीचि नाहीं दुजी परी ॥ ४ ॥

# थोरांचा समागम.

१

दोघांचा वाद सुरू असतां त्यांपैकीं एक जरा क्रोधवश होऊं लागतांच जो दुसरा वाद सोडून माघार घेईल तो सुज्ञ समजावा.

—प्लूटार्क.

२

यदृच्छालाभसंतोष हा ज्ञान्याच्या अंगाचा अत्यंत श्रेष्ठ असा सद्गुण आहे. पुष्कळ द्रव्य जवळ असण्यांत सुख नाहीं, तर जें मिळालें असेल त्यांतच समाधान मानून असण्यांत सुख आहे. ज्याच्या गरजा कमी किंवा हांव कमी तोच खरा श्रीमंत होय.

—झिमरमन.

३

कोणत्याही मनुष्याचा किंवा वस्तूचा तिरस्कार करूं नकोस, कां कीं कोणत्या मनुष्याचें भाग्य केव्हां कसें उदयास येईल याचा नेम नसतो व कोणत्या वस्तूची केव्हां गरज लागेल हेंही सांगतां येणार नाहीं.

—रबी बेन.

४

गरुड पक्षी एकेकटाच उड्डाण करितो; कळप गरुडांचे होत नाहींत; कळप शेळयामेंढयांचे होतात !

—फ्रँकलिन.

५

कीर्ति ही छायेसारखी आहे. ती कधीं मनुष्याच्या पुढें जाते, कधीं मागें जाते, कधीं त्याच्या देहाकृतीपेक्षां फार मोठी पडते, कधीं निष्कारण आंखूड पडते.

—फ्रेंच म्हण.

६

देणें गोड; मागणें कडु ! देण्याचा प्रसंग भाग्याशिवाय येत नाहीं, याचना हें करंटेपण मूर्त होय.

—गिरार्डिनबाई.

७

प्रत्येकाला आपल्या कृत्यांचा झाडा परमेश्वरापाशीं द्यावा लागणार आहे.

—बायबल.

८

आपल्याविषयीं अमुक मनुष्यानें अमुक वाईट शब्द उच्चारले किंवा अमुक प्रकारें निंदा केली असें जर कोणी सांगूं लागला तर त्याला शांतपणें उत्तर द्यावें कीं 'त्याला माझ्या अंगांतले आणखी दुर्गुण ठाऊक नाहींत; एरवीं त्यानें एवढ्याच दोषांचा उच्चार केला नसता!'

—एपिक्टेटस्

९

माणसें जीं दुःखें भोगतात त्यांपैकीं बहुतेक दुःखांचें बीज त्यांच्या स्वभावांतच असतें.

—लॉवेल.

१०

खिशांत नेहमीं एक कागदपेन्सिल ठेवावी व सहज सुचणारे विचार त्या कागदावर टिपून ठेवावेत. डोकें खाजवून केलेल्या विचारांपेक्षा त्यांची योग्यता ज्यास्त आहे कां कीं ते हुकमी येत नसतात.

—बेकन.

११

राजा तोच कीं जो कधीं अन्याय करीत नाहीं व ज्याला न्यायाचीच चाड आहे, आपल्या हातून अन्याय घडूं नये यालाच तो भितो व कोणाही माणसाचें भय बाळगीत नाहीं, हांजीखोर लबाडांच्या स्तुतिवचनांनीं ज्याचा विवेक ढळत नाहीं व खवळलेल्या लोकक्षोभालाही भीक घालीत नाहीं.

—मारस्टन.

१२

ज्ञानार्जनाच्या प्रयत्नांतही मोठा आनंद आहे. ह्या आनंदानें शरीरांतल्या रक्तवाहिन्या जोरानें वाहून अंगांत बळाचा संचय होतो. सहज प्राप्त होणाऱ्या ज्ञानविचारांपेक्षां श्रमसाहस करून पराक्रमानें मिळविलेल्या ज्ञानसंपत्तीचा उपभोग अधिक रसिकपणानें भोगतां येतो. कोणी आयतें फूल आणून दिलें असतां त्याचा वास घेऊन तें आपण फेंकून देतों पण स्वतः कष्ट करून लावलेल्या वृक्षवल्लींना येणाऱ्या फुलाफळांचा आस्वाद अधिक काळ अधिक प्रेमानें आपणांस घेतां येतो. ( कष्टानें मिळविलेल्या भाकरीची गोडी आयत्या वाढून आलेल्या पंचपक्वान्नांपेक्षां खात्रीनें अधिक आहे ). एकादा कूटश्लोक किंवा गणिताचें उदाहरण किंवा तत्त्वज्ञानांतला मोठा सिद्धांत आपल्या बुद्धीनें आपण

श्रमपूर्वक उलगडल्यावर जो आपणांस आनंद होतो तो दुसऱ्याचें भरवसें उत्तर मिळाल्यानें केव्हांही होत नाहीं.

—फ्लेमिंग.

१३

उच्च हेतु मनांत असल्याशिवाय कोणतेंही उच्च कार्य होत नाहीं, आणि परमेश्वराच्या निःस्सीम भक्तीइतका दुसरा कोणताही उच्च हेतु असूं शकत नाहीं.

---

# कलहयुगाचा युगधर्म.

फिरे दास ऊदास लोकांस पाहे ।
मनमाजि थक्कीत होऊन राहे ! ॥ १ ॥

—रामदास.

१ श्रीरामदासस्वामींचा हिंदुस्थानभर संचार होता. त्यांत खेडींपाडीं, तीर्थक्षेत्रें, नगरें, गिरिकपाटें सारीं त्यांनीं धुंडून पाहिलीं. लोकसमुदाय जितके पाहिले त्यांत बहुतेक ठिकाणीं नानाप्रकार उद्भवून लोक कलहांत निमग्न झाले होते. 'मतांमतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला' असा अनायक कारभार चालला होता.

कळहो लागला पंडितापंडिताला । कळहो लागला ज्ञानिया ज्ञानियाला ॥
बहू जाणते बोलती शास्त्रमत्तें । जनीं दाविती आपुले व्युत्पतीतें ॥

हा कलहाचा प्रकार त्यांनीं चांगला वर्णिला आहे. पण हें जुन्यापुराण्या काळचें वर्णन वाचण्यापेक्षां 'नाताळांतलीं लाथाळीं' पाहिलीं म्हणजे कलहाचें युग हिंदुस्थानांत किंबहुना साऱ्या जगांत सुरू आहेसें पाहून उदासपणें तटस्थ राहून अवलोकन करणारा मनुष्यही मनांत आश्चर्यचकित होऊन राहील यांत नवल नाहीं.

२ युरोपखंडांत 'मोसल' प्रांतांतल्या तेलाच्या खाणींबद्दल इंग्लंड व टर्की यांच्यांत चुरस माजून राहिली असून पुन्हां इंग्लंड, फ्रान्स, टर्की, रशिया इ०

राष्ट्रांत 'दुसरें महायुद्ध' सुरू होण्यापूर्वीची परिस्थिति उत्पन्न झाली असून हा महा-युद्धाचा वणवा पेटल्यास त्यांत युरोप, आशिया व आफ्रिका हीं तीनही खंडें पुन्हां भाजून निघतील कीं काय अशीं स्वप्नें राजकीय वातावरणांत वावरणाऱ्या मुत्सद्यांस पडूं लागलीं आहेत. हा दूरचा प्रश्न सोडला तरी हिंदुस्थानांत 'एकी'ची भाषा आणि 'बेकी'चे प्रयत्न करण्यांत लोक कसे दंग होऊन राहिले आहेत ! नाताळांत यंदा कांग्रेस भरून तिथें दुसऱ्या सुमारें ४० कान्फरन्सेस भरल्या होत्या ! 'राष्ट्रीय सभे' पासून तों 'संगीत कान्फरन्स' व 'न्हावी परिषदे'पर्यंत अनेक कान्फरन्सेस भरून ठराव पास होत होते, जळजळित भाषणें चाललीं होतीं, पोटांत बेकी व ओठांत एकी असे देखावे सर्वत्र दिसत होते ! अलीगड, कलकत्ता, उमरावती, मद्रास इकडेही नाना परिषदा व सभा भरून ठराव पास होत होते. वाईची ब्राह्मग परिषद् आणि उमरावतीची ब्राह्मणेतर परिषद् ह्या दोन टोकांमध्यें उभी राहून हिंदूपुरती एकी करण्यास हिंदुमहासभा कानपुरास धडपड करीतच होती ! सभांचा असा महापूर सर्व देशभर आला असून सारा देश एकीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत असलेल्या पहात होता. एक वेळ असेंही मनांत आलें कीं यक्षिणीच्या कांडीनें साऱ्या सभा व वर्तमानपत्रें—भाषणें व लेख एकदम् बंद करण्यांत आलें तर त्यानें हिंदुस्थानचें जितकें कल्याण होईल तितकें ह्या परिषदा व व्याख्यानें यांपासून होण्याचा संभव नाहीं ! राष्ट्राची एकी न होण्यांत ज्यांना स्वार्थ वाटत आहे त्यांच्या या परिषदा मोठ्या पथ्यावर पडत असल्या पाहिजेत !

३ आम्ही असें म्हणतों याचें कोणास नवल वाटेल, पण या परिषदांचें कार्य कसें झालें हें पक्षरहित बुद्धीनें पाहिल्यास दिसून येणार आहे. वाईची ब्राह्मणपरिषद्च घ्या. ब्राह्मणपरिषदेची आधीं अवश्यकताच काय आहे हें आम्हांस कळत नाहीं. प्रत्येक जात आपापली वेगळी परिषद भरवीत असते त्यांतच ही एक परिषद भरली इतकेंच. ब्राह्मणांनीं ब्रह्मविद्येच्या प्रसारार्थ परिषद भरविली तर गोष्ट वेगळी. आधीं 'ब्राह्मण्यपरिषद्' हें तिचें नांव होतें—त्या नावांत कांहीं तरी उच्च ध्येय होतें, पण पुणेकरांनीं वाईस धांगडधिंगा घालून तिचें नांव—'ब्राह्मण परिषद्' असें ठेवून तिला जाति परिषदेचें रूप आणलें ही पिछेहाट आहे. बरें, ब्राम्हणपरिषदेनें तरी ब्राह्मणांनीं आपली आजची अवनति ज्या दोषांमुळें झाली आहे ते दोष टाकून आपलें आचरण सुधारून नाममात्र ब्राह्मणांनीं खरेखुरे ब्राह्मण होण्यास काय उपाय योजावेत याचा कांहीं विचार करावयाचा होता, पण तोही प्रकार नाहीं. नंतर ह्या परिषदेंत दुफळी होऊन वाईच्या व पंढरपूरच्या ब्राह्मणांनीं स्वतंत्र सभा भरवून तिचा निषेध केला ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. ब्राह्मण परिषदेला

"केसरीनें' उचलून धरावें व ब्राह्मण्य परिषदेला 'स्वराज्यानें' उचलून धरावें असा प्रकार होऊन 'टग आफ वार' सुरू झाली व ब्राह्मणांनीं काय करावयाचें हा मुख्य विचार उधळूनच गेला! ब्राह्मणांना ज्या गुणांमुळें एका काळीं पूज्यत्व आलें ते गुण पुन्हां अंगांत आणल्याखेरीज ती पूज्यता येणार नाहीं आणि असे गुण व्यक्तिमात्रानें आपलें आचरण सुधारल्याखेरीज अंगीं येणार नाहींत. या गोष्टीला परिषदेची गरजच काय? ब्राह्मण, सारस्वत, कायस्थ, सोनार, परीट, न्हावी, मातंग इ. सर्व जाती आपापल्या वेगवेगळ्या परिषदा भरवून काय समाजहित साधणार आहेत कोण जाणे! प्रयत्न एकीचे नसून बेकीचे आहेत. आपापल्या जातीपुरतें पाहायचें, आपल्या जातींतल्या बुद्धिमंत विद्यार्थ्यांना स्कालरशिपा देऊन त्यांचा जयजयकार करायचा ही संकुचित बुद्धि अलीकडची असून त्यामुळें समाज अधिक फुटत जाऊन एकीची बेकी मात्र होत आहे. 'गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः' हें भवभूतीचें सूत्र किंवा 'नास्ति तेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादिभेदः' हें परमार्थमार्गांतलें नारदांचें सूत्र आम्हांस मान्य आहे. गुण जेथें दिसतील तेथें प्रेमादर सहजच उत्पन्न होतो. जात्यभिमान हा देहाश्रित व सहज आहे. त्याला पायातळीं दडपायचे प्रयत्न हवेत. देहाभिमान व जात्यभिमान वाढविण्यासाठीं सभा व परिषदा नकोत. त्यानें राष्ट्रांतली एकी मोडते व देहाभिमान वाढीस लागून परमार्थतः प्राणिमात्राची हानी होते. आत्मभावाचा विकास हें जीवमात्राचें परमध्येय हवें. त्याला आड येणारे देहाश्रित सर्व अभिमान मोडायचे प्रयत्न हवेत वाढवायचे प्रयत्न नकोत. ब्राह्मण सभा भरवून शुद्ध ब्राह्मण्याचें स्मरण व्हावयाच्या आधीं आपण ब्राह्मण सर्व श्रेष्ठ, 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' हा नसता अभिमान जागृत होऊन एखादा ब्राह्मण जात्याभिमानानें फुगून गेला तर तें जितकें घातक, तितकेंच ब्राह्मणांना सरसहा गालिप्रदान करणारे नामदार जाधवासारख्यांचें प्रयत्नही घातकच होत. म्हणून ब्राह्मण परिषदा व ब्राह्मणेतर परिषदा ह्या आम्हांला दोन्ही सारख्याच निरुपयोगी व घातकही वाटतात. आतां कोणी म्हणेल कीं ह्या काळांत प्रत्येक जातीनें आपली उन्नति करून घेण्यास काय हरकत आहे? तर खरोखर कांहींच हरकत नाहीं. वर सांगितलेला विचार सर्व श्रेष्ठ, जातिविचाररहित गुणविचार उत्तम. पण जात्याभिमानानें जातिपरिषदा भरवायचेंच ठरलें तर अन्यजातीचा निंदाद्वेष न करितां आपल्या जातींत गुणवृद्धि करण्याचें उपाय योजण्यानें कांहीं बिघडतें असें नाहीं. कोणत्याही जातींत गुणवृद्धि झाली तर गुणांच्या योगानें त्या जातीचेंच नव्हे तर अन्यसंसर्गी सर्व जातींचें कल्याणच होईल. रामदासस्वामींसारखे ब्राह्मण, शिवाजीमहाराज किंवा अहल्याबाई यांसारखे ब्राह्मणेतर हे

सर्व जातींच्या व राष्ट्रांच्या अभ्युदयार्थच झटत असतात. त्यांच्याकडे जातीच्या बुद्धीनें पाहण्याची बुद्धिच नष्ट होते इतके ते जातिभेदपैलपार असतात. 'अवगुणीं द्वेषगुणीं पूजा' हें तुकाराममहाराजांचें सूत्र सर्वोत्कृष्ट आहे. अवगुणांचा द्वेष व गुणांची पूजा हेंच सूत्र वागण्यांत सर्वांनीं ठेवल्यास सर्वांचेंच कल्याण आहे. अवगुण स्वतःमध्यें स्वकुटुंबामध्यें, स्वजातीमध्यें असले तरी त्या अवगुणांचा द्वेष करून ते अवगुण काढून टाकण्याचे प्रयत्न करावेत व गुण परक्यांत, परजातीय स्त्रीपुरुषांत दिसले तरी त्यांचें निर्मत्सर सप्रेमबुद्धीनें कौतुक करायची उत्साहबुद्धि असावी. अवगुणांचा त्याग व गुणांचा आदर ही विमल बुद्धि मनांत ठेवल्यानें परमार्थाचा लाभ होईल; सामाजिक, राजकीय ज्या ज्या सुधारणा करायची इच्छा असेल त्या त्या सुधारणा बिनबोभाट होऊन देशोद्धार होईल देहाच्या, जातीच्या, प्रांताच्या सर्व क्षुद्र अभिमानांपासून दूर झटकल्यानें व विशुद्ध गुणांविषयीं सप्रेम आदर बाळगिल्यानें इहपरलोकीं कल्याणच होईल. ब्राह्मण ब्राह्मणेतर, हिंदुमुसलमान हे सर्व वाद यानें मिटतील, खरें चित्तांतलें ऐक्य होऊन देशाचा भाग्योदय होईल. साधुसंतांनीं हाच मार्ग पूर्वीं घालून दिला होता. भागवतधर्माचें हेंच सारसर्वस्व आहे. भागवतधर्मानें आमच्या आजच्या सर्व अडचणी दूर होणार आहेत. चालू युगाचा हाच युगधर्म आहे. सत्य, प्रेम, दयालुता, श्रद्धा, या गुणांचा विकास झाला पाहिजे.

४ ब्राह्मण—ब्राह्मणेतर वादानें केवढीं रणें आजकाल माजलीं आहेत! ब्राह्मणांचा अतिरिक्त द्वेष हें एक टोंक व ब्राह्मणजन्माचा पोकळ अभिमान हें दुसरें टोंक. ह्या दोन टोकांना दोन पक्ष ओढीत आहेत. सांप्रत पहिल्या टोंकाला खेंचून ओढारणें बळ अधिक झालें आहे. सरकार उघड उघड ब्राह्मणांच्या विरुद्ध आहे व ब्राम्हणेतरांतले जहाल जे सत्यशोधक ते शक्य तितकें गरळ ओतीत आहेत. उमरावतीच्या ब्राह्मणेतर परिषदेनें तर ब्राह्मणांना लाथाडण्यासाठीं मुसलमानानाही जवळ केलें आहे! सांप्रत कलहांना पूर आल्यामुळें कांहीं अतिप्रसंग होत आहेत, पण हा फेसही कालानें ओसरेल. ब्राह्मणेतरांतही अनेक समंजस, जाणते व धर्मनिष्ठ लोक आहेत. त्यांना सत्यशोधकांचे अत्याचार आवडत नाहींत. उलटपक्षीं ब्राह्मणांनींहीं आपल्या समाजांत शिरलेले दोष काढून टाकून खऱ्या धर्मबुद्धीनें व उदारपणानें ब्राह्मणेतरांच्या उन्नत्यर्थ कायवाचामनोभावानें झटलें पाहिजे. दोघांनींहीं चार चार पावलें एकमेकांजवळ आलें पाहिजे. ब्राह्मणांतही अनाचार काय थोडे घुसले आहेत? शहरांतल्या राहणीला चटावलेले भ्रष्ट ब्राह्मण व तीर्थक्षेत्रांतून कूपमंडुकवृत्तीनें चरितार्थ मात्र चालविणारे अज्ञ ब्राह्मण यांच्याविषयीं कोणाला पूज्यता

बुद्धि वाटेल ? ब्राह्मण आज कोणतें हीन कर्म करीत नाहींत ? ब्राह्मणांची पूज्यता ज्या एकनाथरामदासादि ब्राह्मणश्रेष्ठांच्या आचरणानें सहज उत्पन्न झाली तसले ब्राह्मण दिसल्यावर कोण त्यांच्या पायाला लागणार नाहीं ? सदाचाराशिवाय पूज्यता वाटत नाहीं मग तो सदाचार कोणत्याही जातींतल्या मनुष्यांत दिसो. सदाचार व हरिभक्ति यांनीं संपन्न असा अंत्यजही दुराचारी व पाखांडी ब्राह्मणापेक्षां श्रेष्ठ होय अशी भागवतधर्माची शिकवण आहे. ब्राह्मणांनीं अनाचार व दुराचार सोडावेत व सत्यशोधकांनीं अत्याचार टाकावेत व दोघांनींही सख्यत्वाच्या नात्यानें सदाचारानें वागावें यांत दोघांचेंही हित आहे. एकाचें दुसऱ्यावांचून धकत नाहीं. दोघांनांही एकत्र एका देशांत, एका भाषेंत, एका धर्मात सारे व्यवहार करायचे आहेत. मग व्यर्थ कलह कशाला पाहिजेत ? ब्राह्मण स्वस्थानापासून घसरले आहेत हें नाहीं कोण ह्मणतो ? पण सांप्रत सर्वच वर्ण व जाती स्थानभ्रष्ट झाल्या नाहींत काय ? ब्राह्मणांत रामदास विरळ तसे क्षत्रियांत शिवरायही विरळच आहेत. वसिष्ठवामदेवांचीं गोत्रें लावून ब्राम्हण वंद्य म्हणवितात तसे सूर्यचंद्रांशीं आपला वंशवेल जुळवून किंवा रामकृष्णांचे आपण वंशज आहोंत अशा विश्वासाला ठेवून क्षत्रियही राज्य भोगतात. हें कसेंही असलें तरी ‘ घोडा आपल्या गुणानें दाणा खातो ’ या न्यायानें जो तो आपल्या गुणांनीं पूज्य होतो. अहल्याबाई होळकरीण धनगर कुळांत जन्मून विश्ववंद्य झालीच कीं नाहीं ? चोखा मेळा महार, रोहिदास चांभार, सजनकसाई हे भगवद्भक्तीस्तव ब्राम्हणादि साऱ्या जातींस पूज्य वाटत नाहींत काय ? तात्पर्य जात्यभिमानाच्या बाजूस झुकण्यापेक्षां गुणोत्कर्षाच्या बाजूचें प्रेम वाढविण्याकडे झुकल्यानें साऱ्या राष्ट्राचें कल्याण होणार आहे. कोणी कोणाला हीन म्हणूं नये, व कोणी कोणाचा द्वेष करूं नये. का रे कुणबटा ’ यास ‘ कां रे भटुरग्या ’ हें उत्तर आल्यास नवल काय ? ‘ पाटीलबाबा म्हटल्यानें दुसऱ्यासही ‘ ब्राम्हणबाबा ’ म्हणावेंसें सहज वाटेल. अरे तर कारे, अहो तर कां हो—हा न्यायच आहे.

> हें अवघें आपणापाशीं । येथें बोल नाहीं जनांसी ।
> शिकवावें आपुल्या मनासी । क्षणक्षणा ॥

हें समर्थांचें वचन सर्वांनीं ध्यानांत धरावें. हिंदु, मुसलमान, जैन, लिंगाईत, ब्राम्हण, मराठे, शूद्र, अतिशूद्र या सर्वांची हिंदुस्थान हीच जननी आहे. आपलीं सर्व लेंकरें परस्परांशीं प्रेमानें वागत आहेत हें पाहून आर्यभूला आनंदच वाटेल.

५ राष्ट्रीय सभा ही सर्व चळवळींची जननी आहे. साऱ्या राष्ट्रांतली मोठयांतली मोठी, व्यापक व राजकीय अशी चळवळ म्हणजे राष्ट्रीय सभाच होय. १८८५

सालीं पहिली राष्ट्रीय सभा मुंबईस उमेशचंद्र बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. त्यावेळीं सारे ८० सभासद हजर होते. न्या० रानडे हे तिच्या उत्पादकांपैकीं एक प्रमुख होते. ते सरकारी नौकर होते तरी आंतून तिचीं सूत्रें तेंच हालवीत. सुरेंद्रनाथ बानर्जी, मदनमोहन मालवीय, सर फेरोजशहा मेथा, नामदार गोखले, यांच्या अमदानींत तिचें रूप एकाच प्रकारचें होतें. आपलीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं सरकारकडे अर्ज करणें, सभा भरवणें, ठराव पास करणें इ० तिचीं कामें होतीं. सरकारची, त्यांच्या राज्यपद्धतीची ओळख राष्ट्रीय सभेनें करून दिली. आपल्या राजकीय हक्कांची जाणीव तिच्यामुळें उत्पन्न झाली. इ. स. १९०६ पर्यंत सरळ क्रम चालला होता, पण लोकमताचा दाब सरकारावर बसावा यासाठीं लोकांना पुरें जागें केलें पाहिजे अशा बुद्धीनें लो. टिळक यांनीं लोकांकडे तिचें तोंड वळविलें; तथापि अर्ज करणें, लोकांत चळवळ करून लोकमताच्या बळावर सरकारशीं वीरश्रीनें झगडणें हेंच त्यांच्याही चळवळीचें स्वरूप राहिलें. पूर्वीचे पुढारी हे सुशिक्षितांचे पुढारी होते, लोकांचा पुढारी ही पदवी प्रथम आपल्या अतुल धैर्यानें, कारागृहवासानें, धडाडीनें टिळकांनींच मिळविली. १९०७ सालीं सुरतेची दंगल झाली. तेव्हां जुने पुढारी 'मवाळ' ठरून वेगळे पडले व टिळक व तत्पक्षीय धडाडीचे लोक हे 'जहाल' ह्मटले गेले. टिळक सहा वर्षें कारागृहांत होते तोंवर त्यांच्या पक्षाचे पुढारी थंडे पडले होते. १९१३ सालीं ते सुटून आल्यावर पुन्हां त्यांच्या चळवळीला जोर चढला व ४।५ वर्षें बरेच सलोख्यानें पण धडाडीनें त्यांनीं काम केलें. १९२० सालीं ते मृत्युमुखीं पडले व राष्ट्राचें व राष्ट्रीय सभेचें पुढारीपणा महात्मा गांधींकडे आलें. त्यांनीं १९२१।२२ सालीं न भूतो न भविष्यति अशी दंगल उडवून दिली व लोकजागृति अद्भुत करून आसेतुहिमाचल सारा देश गदगद हलवून सोडला. बारडोलीला लोकसमाज पुढें पाऊल टाकण्यास तयार नाहीं हें पाहून त्यांनीं माघार घेतली, तथापि त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचें धैर्य, त्यांचें अत्यंत शुद्ध साधुतुल्य आचरण या गुणांची छाप लोकांवर जी एकदा बसली ती अढळ आहे. दास व नेहरू यांना राजकीय आखाडयांत इतक्या धडाडीनें उडी घालण्याची धमक गांधींच्या उदाहरणानेंच आली तथापि महात्माजी तुरुंगांत गेल्यावर विरुद्ध पक्षाला बळ चढून राष्ट्रीय सभेंत फूट पडली व दास आणि नेहरु यांनीं नवा स्वराज्यपक्ष उभा केला. गांधींचा असहकारिपक्ष व दासांचा स्वराज्य पक्ष असे दोन पक्ष होऊन २।३ वर्षें झालीं. महात्माजींनीं युक्तीनें कांग्रेस स्वराज्यपक्षाच्या हातीं देऊन पण न फुटतां आपली खादीची चळवळ स्वतंत्रपणें चालविली

आहे. दास व नेहरू हे दोघेही गांधींपासून फुटले पण गांधी हे आपले पुढारी आहेत व त्यांच्या नेतृत्वाखालींच स्वराज्य आम्ही मिळवणार अशी त्यांची निष्ठा होती व नेहरूंची आजही महात्माजींवर तशीच निष्ठा आहे. टिळकांचेंच कार्य गांधींनीं अधिक व्यापकपणानें चालविलें आहे. दोघेही पुरुष थोरच. अनुयायांत वृथाभिमान पेटलेला आहे. टिळकाभिमान्यांनीं प्रसंगोपात्त त्यांच्या तोंडून निघालेली 'प्रतियोगी सहकारितेची ' ढाल हातीं घेऊन नेहरूंशीं विरोध करायचा चंग-बांधला व गेल्या राष्ट्रीय सभेंत त्यांनीं आपली शिकस्त केली तरी पराभूत होऊन ते तूर्त स्वराज्य पक्षांतून बाहेर पडले आहेत! 'पुढील प्रकार देव जाणे!' महाराष्ट्र पुढाऱ्यांपैकीं केळकर, जयकर, अणे, मुंजे, खापर्डे हे प्रतियोगीसहकारितेच्या पक्षाचे आहेत व गंगाधरराव देशपांडे, खाडिलकर, शिवरामपंत परांजपे हे गांधीपक्षाचे आहेत! असा हा महाराष्ट्रांत राजकीय चळवळींत पक्षोपपक्षांचा इतिहास आहे. हे राजकीय पक्ष, त्यांतच ब्राह्मणेतरांच्या चळवळी व हिंदु मुसलमानांचे तंटे यांची भर पडून लोकमान्यांनीं वाढीस लावलेली व महात्माजींनी जोमांत आणलेली स्वराज्याची चळवळ आज अन्योन्य कलहांनीं पुरी छिन्नभिन्न झालेली दिसत आहे! आमच्या आमच्यांतले हे कलह सरकारी पक्षाला अत्यंत अनुकूल असून आम्ही आपापसांत निरंतर भांडत बसावें यांतच नोकरशाहीची चैन आहे. महात्मा गांधींची कोणी कितीही हेटाळणी केली तरी त्यांच्या योग्यतेचा दुसरा कोणीही पुढारी आज हयात नसल्यामुळें वर्ष दोन वर्षांत त्यांचेच पाय पुढाऱ्यांना धरावे लागतील व त्यांच्या नेतृत्वाशिवाय राष्ट्राचा गाडा पुढें चालणार नाहीं असा बहुतांचा विश्वास आहे. आमच्या सर्व चळवळींच्या पांचवीला कलह पुजले आहेत असें दिसतें. हिंदुस्थानांत बुद्धिमत्ता आहे, कर्तृत्व आहे, स्वार्थत्याग आहे सर्व कांहीं सद्गुण आहेत पण अन्तःकलहाचा शाप आहे कीं काय कोण जाणें, त्यामुळेंच राष्ट्राचें डोकें वर निघत नाहीं. शिवाजीची जन्मतीथ कोण याबद्दल रणें, पंचागाबद्दल रणें, अधिक मास चैत्र का ज्येष्ठ याबद्दल मारणें, फर्ग्युसन कॉलेजच्या माजी प्रिन्सिपाल व चालू प्रिन्सिपाल यांच्यात रणें, फ० कॉलेजचे अधिकारी व विद्यार्थी यांत कलह, एक नाटक कंपनी जरा नीट चालली कीं तिच्यांतून तीन कंपन्या नव्या निघाल्याच. शारदोपासकांत पक्ष, साहित्यपरीषदेच्या चालकांत मतभेद, अध्यक्षाबद्दल कलह चोहोंकडे पाहिलें कीं 'कलहाचें युग' ओढवलें आहे कीं काय असें वाटतें. म्युनिसिपालटया, लोकल बोर्डें, कायदे कौन्सिलें पाहाल तिकडे मतभेद, पक्षभेद कलह! एका गांवांत दोन वर्तमानपत्रें झालीं कीं दोन पक्ष होऊन त्यांनीं एकमेकांचें चावे घेतलेच पाहिजेत. हे कलह मिटविण्यासारखी परीस्थिति केव्हां येणार व कोण आणणार हें या वेळेस तरी सांगतां येणें अशक्य दिसतें.

अर्धवट शिक्षणाचे हे परीमाण म्हणावेत कां धर्मशून्यतेचे म्हणावेत व कां सर्वांचे मिळून म्हणावेत! अशा परीस्थितींत लोककल्याण करण्याची बुद्धि आवरून धरून स्वस्थ बसून देवाची लीला दुरून पहाण्याची इच्छाही कांहीं कार्यकर्यांत उत्पन्न झाल्यास नवल नाहीं. मोठे राजकीय प्रश्न एका बाजूस राहून किरकोळ विषयांवरच कलह होऊं लागले तर राष्ट्रांत ऐक्य नांदावें कसें व स्वराज्याचा अत्यंत निकडीचा प्रश्न सुटावा कसा ? परमेश्वराच्या आज्ञेनें त्याचे निरोप महान् तपस्वी पुण्यपुंज असे अवतारी पुरुष आल्याशिवाय देशाची दैन्य दुःख दुर्दशा दूर होणार नाहीं; तोंवर सदचारानें वागून हरिभक्ति करीत समाजशुद्धीचें कार्य होईल तितकें प्रत्येकानें करीत राहावें हेंच योग्य दिसतें.

६ कोणी म्हणेल कीं कलहांचें तुम्ही एवढें वर्णन केलें आहे पण असे कलह समाजांत नव्हते कधीं व कोणत्या समाजांत नाहींत ? तर पाश्चात्य देशांत कलहांचें रान माजलें आहे हें आम्हांस माहीत आहे व कलहांचे परिणाम ते भोगीत असून त्यांस आणखी भोगावे लागणार आहेत. गेल्या महायुद्धांत इंग्लंड एवढें विजयी झालें ना ? पण इंग्लंडची हलाखी देखील लहान नाहीं. इंग्लंच्या डोक्यावर अमेरिकेचें पंचवीस हजार कोटीचें कर्ज बसलें असून इंग्लंडला दरसाल ५०० कोट व्याजाप्रीत्यर्थ अमेरिकेला द्यावे लागत आहे. इंग्लंडच्या मानगुटीवर बसलेला हा सावकार यापुढें व्यापारांच्या मिषानें आपल्या ऋणकोचें वाभाडे कसे काढील हें भविष्यकाळ दाखविणार आहे ! फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया इ० देशांची गोष्ट यापेक्षां वाईट आहे. हा कलहाचाच परिणाम ना. पण असो. आपणांस परदेशांशीं कर्तव्य नाहीं. कलह हें देशाच्या जिवंतपणाचें चिन्ह आहे अशीही एक भाषा निघाली आहे ! कलह-अनादि आहेत हें खोटें नाहीं. पण राष्ट्राच्या अपकर्षाचें तें चिन्ह असून कलह मिटवून परस्परसख्य वाढविणें व दुसऱ्याच्या गुणांचें सप्रेम कौतुक करून प्रेमवृद्धि करणें हें राष्ट्राच्या भाग्योदयाचें लक्षण आहे. अपकर्ष पाहिजे असेल, पुढील पिढ्यांचा नाश हवा असेल तर खुशाल भांडा, पण उत्कर्ष होऊन आपलीं मुलें व नातुपणतु भाग्यसुखांत नांदावेत असें वाटत असेल तर कलह मिटते घेऊन, वादाचे प्रश्न सलोख्यानें सोडवून, देवाण घेवाण करून, किल्बिष काढून टाकावें, प्रेमामृताची संजीवनी मात्रा देऊन ऐक्यतच भाग्यसुख भोगा ! 'मराठा तेवढा मेळवावा' हा मंत्र महाराष्ट्राला देणारे श्रीसमर्थ काय म्हणतात तें पहाः—

कळहो अनादि हा असे । विवंचितांचे नीरसे ।
अहंमती विरोचिना । तरी कळहो सरेचिना ॥

कलह हे विवेकानें वागलें असतां मिटतात, अहंकारानें वागतां तोंवर ते

मिटावयाचे नाहींत. आम्ही ब्राह्मण, आम्ही पुणेकर, आम्ही पूर्वी राज्य केलेले, ह्या गुजराथ्यांना व बंगाल्यांना राजकारण कसचें कळतें हा अहंकार आधी टाकून द्या. परमेश्वराच्या मनांत ज्या प्रांताचें व जातीचें ऐश्वर्य सर्वाधिक वाढवयाचें असेल त्या प्रांतांत व जातींत तो आपले लाडके दूत पाठवील. सर्व प्रकारचे अभिमान ऐक्याचा नाश करणारे आहेत व्यक्तीच्या व राष्ट्राच्या दृष्टीनें पाहिल्यास हाच सिद्धांत खरा आहे. परमार्थांत तसाच राजकारणांतही अहंकार हा मारक आहे, स्वपरांचा घातक आहे. फक्त सत्य शाश्वत आहे म्हणून सत्याचा अभिमान तो निरभिमान होय. समर्थ सांगतात कीं पक्षाभिमानानें उपाय कराल तेच अपाय होतील म्हणून अनन्यभक्तीचा ठसा उमटवा म्ह० सर्वभूतीं नांदणाऱ्या हरीला प्रसन्न ठेवा, लोक राजी राखायेचें वर्म आचरणांत आणाः—

अभेदभक्तिचा ठसा। अनन्यभाव तो कसा।
निवेदनेंचि वोळखा! अहंपणें झकों नका॥
धरून पक्ष काय रे। उपाय तो अपाय रे।
तुम्ही तुम्हांस वीवरा। स्वहित तें मनीं धरा॥

अंतःपरीक्षा करा, आपल्यांतलें दोष काढून टाका, इतरांकडे सहानुभूतीनें प्रेमानें पहा. दिसत आहे काय?

जनीं उदंड पाहिले। कळ्हो करीत राहिले।
अनन्यदेव भेटला। कळ्हो तयासि तूटला॥
कळ्हो करील शब्द रे। अनंत तो निशब्द रे।
तुम्ही अनंत कां न व्हां। विवादितां अव्हासव्हा!॥
वितंडवाद घालणें। वितंड शब्द बोलणें।
वितंडबंडही नुरे। उरेल तेंचि तें नुरे॥
उगाचि पक्ष घेतला। बळेंचि वाद घातला।
यथार्थ व्यर्थ अर्थ रे। अनर्थ रे अनर्थ रे॥
विचार सार वीवरी। जनांसि तो सुखी करी।
परांतरास नेणवे। तयास काय जाणवे?॥

समर्थांचा हा बिनमोल उपदेश कलहांत पडलेले सर्व पक्षाचे व मताचे लोक ऐकून चित्तांत ठेवतील तर देशाचें केवढें बरें कल्याण होणार आहे!

# अर्थसादृश्य.

## ( १ ) शर्लें आणि रामदास.

१ शर्लें इ० स० १५९६–१६६६

२ रामदास इ० स० १६०८–१६९१

The glories of our birth and state,
Are shadows, not substantial things;
There is no armour against fate:
Death lays his icy hand on Kings.
Sceptre and Crown
Must tumble down
And in the dust be equal made
With the poor crooked scythe and spade.

\+ + + +

Some men with swords may reap the field,
And plant with laurels where they Small;
But must give up their murmuring breath.
When they, pale captives! creep to death.

\+ + + +

The garlands wither on your brow,
Then boast no more your mighty deeds.
Upon death's purple altar, now
See where the victor victim bleeds!
All heads must come
To the cold tomb,
Only the actions of the just
Smell sweet and blossom in the dust.

---

संसार म्हणिजे सर्वांचि स्वार । नाहीं मरणासी उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥
नित्य काळाचीं संगती । न कळे होणाराची गती ।
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देशीं विदेशीं ॥ २ ॥

सरतां संचिताचे शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष । जाणें लागे ॥ ३ ॥
होतां मृत्यूची आटाटी । कोणी घालूं न शकती पाठीं ।
सर्वत्रास कुटाकुटी । मागें पुढें होतसे ॥ ४ ॥
मृत्युकाळ काठी निकी । बैसे बळियाचे मस्तकीं ।
महाराजे बाळिये लोकीं । राहों न सकती ॥ ५ ॥
मृत्यु न म्हणे हा क्रूर । मृत्यु न म्हणे हा झुंजार ।
मृत्यु न म्हणे हा संग्रामशूर । समरंगणीं ॥ ६ ॥
मृत्यु न म्हणे हा बलाढ्य । मृत्यु न म्हणे हा धनाढ्य ।
मृत्यु न म्हणे हा आढ्य । सर्वगुणें ॥ ७ ॥

* * * * *

चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यायशी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्यु पावती ॥ ८ ॥
मृत्युभेणें पळों जातां । तरी मृत्यु सोडीना सर्वथा ।
मृत्यूस न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ९ ॥
मृत्यु न म्हणे थोर थोर । मृत्यु न म्हणे हरिहर ।
मत्यु न म्हणे अवतार । भगवंताचे ॥ १० ॥
ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें ।
जनीं मरोनि उरवावें । कीर्तिरूपें ॥ ११ ॥
गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्यु पंथें ॥ १२ ॥
गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे ।
गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ॥ १३ ॥
गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी ।
गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ १४ ॥
गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी ।
गेले बहुत वेवादी । बहुतां परीचे ॥ १५ ॥

* * * * *

असो ऐसे सकळही गेले । परंतु येकाचि उरले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ १६ ॥

---

राजापासून रंकापर्यंत सर्वांवर मृत्यूची उडी पडतच आहे ह्मणून ' मरावें परि कीर्तिरूपें उरावें ' येथपर्यंत शलें व रामदास या उभयतांनीं मृत्युवर्णन सारखेंच केलें आहे. समर्थांचें वर्णन पूर्ण आहे, व्यापकपणानें केलें आहे;

तथापि मृत्यूचें रडगाणें गाण्यापलीकडे शर्लेला जातां आलें नाहीं, किंबहुना पाश्चात्य कवींना–ग्रंथकारांना जातांच आलें नाहीं. शर्लेची कविता वाचून वाचकहा त्याच्या रडगाण्याचा (Pessimism)चा सूर ओढीत बसतो. आमच्याकडे काव्याच्या पाठीमागें तत्वज्ञानाचा व आत्मज्ञानाचा जोर जबरदस्त असल्यामुळें 'मृत्यूला मारून उरण्याचा' पराक्रमही आमच्या संत कवींना गाजवितां आला आहे. धर्माचें, अध्यात्मज्ञानाचें ऐश्वर्य कांहीं और आहे. मृत्यूला तरून जाण्याचा उपाय श्रुतीनें सांगितलाच आहे. 'मरणाही आधीं राहिलों मरोनी' 'आपलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो जाहला सोहळा अनुपम्य' 'कळिकाळाच्या माथां सोटा मारूं! इ. प्रकारें साधुसंतांनीं मृत्यूवर विजय मिळविल्याचें स्पष्ट आहे. स्वरूपाकार झालेले आत्मज्ञानी संत हे मरणाचें कांहीं लागत नाहींत हें शर्ले वगैरेंत सांपडायचें नाहीं! शर्लेच्या कवितेंत सारी Pessimism भरलेली आहे. आमच्या संतकवींनीं Pessimism ढगासारखी दूर उडवून देऊन आत्मसूर्याचा प्रकाश पाडला आहे! मृत्यूच्या वर्णनानंतर (दासबोध द० ३ स० ९) समर्थांनीं नवविधा भक्तीची अमृतवृष्टि केली आहे (द०३ स० १० व सबंध ४ था दशक) व ब्रह्मानंद उसळविला आहे तो कांहीं और आहे. संतकवींची बरोबरी नुस्ते कवि करूंच शकत नाहींत. कवि फार तर शब्दकुसरी दाखवील, शब्दसौंदर्यानें मन मोहील; पण शब्दगर्भांत उडी घालून मनाचें मनपण हिरावून बुद्धीच्याही पलीकडचा आनंद देणारे संतकविच होत. पाश्चात्य कवि मनाचे गुलाम आहेत; आमचे संतकवि मनाचे मालक आहेत!

---

## २ शेक्स्पीअर आणि व्यास.

Will Fortune never come with both hands full,
But write her fair words still in foulest letters?
She either gives a stomach and no food–
Such are the poor, in health; or else a feast
And takes away the stomach–such are the rich–
That have abundance and enjoy it not.

--Shakespeare.

प्रायेण श्रीमतां लोके भोक्तुं शक्तिर्न विद्यते।
काष्ठान्यपि हि जीर्यन्ति दरिद्राणां च सर्वशः॥

—महाभारत (शांतिपर्व)

शेक्स्पीअर (इ. स. १५६४–१६१६) च्या पूर्वीं दोन अडीच हजार वर्षांमागें भगवान् व्यासांनीं जो उद्गार काढला त्याचें जणुं भाषांतरच शेक्स्पीअरनें केलें

आहे ! देशकाल भाषाभेद असले तरी मन एकच आहे ! श्रीमंतांच्या घरीं समृद्धि असली तरी त्यांची भोगशक्ति क्षीण असते व गरीब शुष्ककाष्ठेंही पच-वितील पण त्यांना मिळतच नाहीं हा दैवदुर्विलास होय. असेंच एक सुभाषित आहे:—

> भोज्यं भोजनशक्तिश्च रतिशक्तिर्वरांगना ।
> विभवे दानशक्तिश्च नाल्पस्य तपसः फलम् ॥ १ ॥

---

# ब्राम्हण–देहाचें कार्य.

## ( एका सन्मान्य मित्राकडून )

> ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते ।
> कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानंतसुखाय च ॥
>
> श्रीमद्भागवत ११–१७–४२

वाईच्या ब्राह्मण्यसंरक्षक परिषदेचे अध्यक्ष श्रीकुकुरमुंडेकर महाराज यांचें भाषण मागील अंकांत दिलेंच आहे. त्याच विषयास अनुलक्षून वरील श्लोक आहे. हा ब्राह्मणाचा देह आध्यात्मिक दृष्टीनें अत्यंत क्षुद्र अशा विषयभोगां-करितां उत्पन्न केलेला नाहीं. अत्यंत कठिण असें व्रताचरण व तपाचरण करावें व मृत्यूनंतर अनंतकाल टिकणारें मुक्तिसुख भोगावें याकरितां या देहाची परमेश्वरी योजना आहे. असा या भगवान् श्रीकृष्ण परमात्म्यांच्या उक्तीचा अर्थ आहे. एकादशस्कंधांत सर्व वर्णांचीं व आश्रमांचीं कर्तव्यें सांगतांना भग-वंतांनीं हा ब्राह्मणदेहाचा विनियोग सांगितला आहे. हजारांतील एक तरी ब्राह्मण या अत्युच्च ध्येयाला खुषीनें आपल्यास वाहून घेईल कीं नाहीं याची वानवा आहे. जो इहलोक आपल्यास प्रत्यक्ष दिसतो आहे, अनुभवास येत आहे, तेथील सर्व सुखांचा त्याग करावयाचा. सर्व जन्म क्लेशकारक व्रताचर-णांत व तपाचरणांत घालवावयाचा, व आज अज्ञात अशा परलोकच्या आत्यं-तिक सुखाची तजवीज करावयाची व तीही कृष्णपरमात्म्याच्या वचनांच्या निवळ विश्वासावर—ही गोष्ट फार कठिण आहे. ही वृत्ति फार दुर्मिळ आहे. अत्युच्च ध्येयें हीं केव्हांही अशींच दुष्प्राप्य असतात; परंतु त्यांच्याकडे

लांबून दृष्टि ठेवून त्या ध्रुवताऱ्याकडे आपल्यास जावयाचें आहे ही भावना मनांत बाळगून आपलें आचरण ठेवल्यास त्या योगानें महत्कार्यें होत असतात. आपली आधुनिक दृष्टि या भगवत्प्रणीत ध्येयापासून विन्मुख होऊन भलतीकडे वहावत आहे याची जाणीव लोकांत उत्पन्न झाल्याशिवाय हल्लींची ब्राह्मणाविषयींची इतर समाजांची वृत्ति सुधारणार नाहीं. कांहीं स्वार्थानें प्रेरित अशा लोकांकडून ब्राह्मणसमाजावर व लोकमान्यांसारख्या अलौकिक विभूतींवर दुरुक्तींचा सतत वर्षाव चालला आहे. ब्राम्हण समाजाचा नायनाट केल्याशिवाय देशाचा तरणोपाय नाहीं, ब्राम्हणांच्या बायका मराठ्यांनीं आपल्याशा करण्यांत देशाचें हितच आहे, ब्राह्मणांनीं घालून दिलेल्या वर्णाश्रम व्यवस्थेमुळें देशाची अवनति झाली म्हणून ती गळ्यांतील तळी फेकून दिल्याशिवाय तरणोपाय नाहीं, देवाधर्माचें व मूर्तिपूजेचें वेड जितकें लवकर जाईल तितकी पोटाची सोय चांगली होईल, अशा प्रकारच्या तत्त्वांचा पुरस्कार एका पंथाच्या वर्तमानपत्रांकडून व वक्त्यांकडून उघडपणें अहर्निश होत आहे. व स्वभावतः सहिष्णु व परिस्थितीमुळें दुर्बळ असा ब्राह्मण समाज निमुटपणें हे सर्व अपमान सोसून घेत आहे. ब्राह्मणांनीं वर्णाश्रमव्यवस्था घालून दिली व त्या व्यवस्थेमध्यें स्वतःस अग्रभागीं स्थापन करून आपली योगक्षेमाची तजवीज केली व बाकीच्या वर्णांस अज्ञानांत व दारिद्र्यांत ठेवलें हा मुख्य आरोप ब्राह्मणांवर आहे. पण अज्ञान व दारिद्र्य ब्राम्हणांत नाहीं असें गृहीत धरून चालण्यामध्येंच सर्व चूक आहे. या दोनही गोष्टी सर्व वर्गांमधें कमजास्त प्रमाणामध्यें अनादिकालापासून चालत आल्या आहेत. जेथें वर्णव्यवस्था अमलांत नाहीं अशा देशांतही अज्ञान व दारिद्र्य भरपूर भरलेलें आहे. वर्णव्यवस्थेमुळेंच अनेक भयंकर आघातांतून भारतदेश अद्याप टिकला आहे. इराण, अशीरिया, मिसर, ग्रीस, रोम, स्पेन वगैरे राष्ट्रें नष्ट होऊन पुनः पुनः संपत्तिविपत्तीचे हेलकावे खात आहेत. पण आर्यावर्त अद्याप ५००० वर्षांपूर्वीप्रमाणें थोडयाफार फरकानें जिवंत टिकलें आहे, याचें श्रेय वर्णव्यवस्थेसच आहे.

आतां या वर्णव्यवस्थेंत जी अव्यवस्था शिरली आहे, तिचें उच्चाटण ज्या त्या वर्णांनीं करणें मात्र अत्यंत जरूर आहे. जगांतील दुसऱ्या कोणत्याही देशामध्यें गुणधर्मांवरून निश्चित झालेली वर्णव्यवस्था चालू नसल्यामुळें सर्व बाजूंनीं या संस्थेवर हल्ले होत असतात. व त्यामुळें आमचेच लोक या संस्थेकडे कधीं साशंक दृष्टीनें,कधीं तिरस्कारानें व कधीं द्वेषानेंही पहात असतात.परंतु वर्णव्यवस्थेमध्यें सर्व राष्ट्र सजीव,समर्थ व उत्कर्षयुक्त करण्याची अपूर्व शक्ति आहे ही गोष्ट दृष्टीआड करण्यांत येते. आधुनिक पाश्चात्य समाजांत सुद्धां श्रमविभागाचें तत्त्व सर्वमान्य आहे. तेंच तत्त्व वर्ण व्यवस्थेंत आहे. विद्यार्जनादि बुद्धीचीं

कामें, युद्धकलेचीं व राजकारणाचीं शरीरबलाचीं कामें, शेतकी व व्यापार आणि इतर शरीरकष्ट हे जगाच्या व्यवहाराचे ४ भाग करून या चार व्यवसायांचा परिपोष व उत्कर्ष करण्याचे कामावर एक एक समाजाची नेमणूक करण्यांत आली. बापाचा विशिष्ट धंदा मुलास जितक्या सुलभतेनें येतो तितक्या सुलभतेनें इतरांस येत नाहीं या आनुवंशिक संस्काराच्या तत्त्वाचा पूर्ण फायदा मिळावा, व त्यामुळें प्रत्येक व्यवसायाचा उत्कर्ष व्हावा असा वर्णसंस्थेचा उद्देश आहे. या चारही वर्णांमध्यें जीं माणसें विशेष कर्तृत्ववान असतात त्यांस ज्ञान आणि धन यांची भरपूर प्राप्ति होते हें आपण पहातच असतों. व्यक्तीपेक्षां समुच्चयाचें– सर्व समाजाचें–चिरकालिक हित साधण्याचा उद्देश वर्णसंस्थेंत आहे. या चौखांबी देवालयाच्या एका ब्राह्मणरूपी खांबास आघात करून जर तो नाहींसा करण्यांत आला तर सर्वच इमारत ढासळेल ही भावना पक्की ठेवून इतर समाज वागतील तर त्यांत त्यांचें व सर्व समाजांचें हित आहे. ब्राह्मणांनीं व कांहीं क्षत्रियांनीं मिळून जी धार्मिक व आध्यात्मिक रचना केली आहे तिला जगांत दुसरीकडे जोड नाहींच नाहीं. सर्व जगांतील विद्वान व विचारी लोक बौद्धिक व धार्मिक समाधानाकरितां भारतवर्षाचा आश्रय करितात. व येथें त्यांस समाधान मिळतें. आमचीं आध्यात्मिक संपत्ति जगास पाहिजे आहे. भौत्तिक सुखाच्या धडपडीमध्यें पाश्चात्यांच्या आत्मिक सुखाची माती झाली व भारतांतील अध्यात्मच जगाला शांतिजीवन पाजून तृप्त करील ही गोष्ट पुष्कळ पाश्चात्य विद्वान कृतज्ञपणें कबूल करितात. ब्राह्मणांनीं आपल्या धार्मिक आचाररूपी खडतर तपश्चर्येनें अध्यात्माची हजारों वर्षे जोपासना केली व पुढेंही करतील. व त्यामुळें भारतवर्ष जगास वंद्य होईल. अर्थात् कोणच्याही समाजामध्यें सर्वच व्यक्ति परिणतप्रज्ञ असणें संभवत नाहीं. पण युनिव्हर्सिटीमध्यें जेव्हां हजारो पदवीधर तयार करावेत तेव्हांच त्यामध्यें एखादा रानडे, किंवा टिळक निर्माण होतो. याच न्यायानें धार्मिक व आध्यात्मिक उन्नतीस मुख्यत्वेंकरून वाहिलेला असा सबंध समाज जेव्हां कायम ठेवावा तेव्हां त्यांतून कांहीं शंकराचार्य, ज्ञानेश्वर, रामदास उत्पन्न होतील आणि धर्मध्वजा फडकावीत भारवर्षाची कीर्ति जगभर पसरवितील.

पण ब्राह्मणसमाज अशा रीतीनें धर्माचें व आत्मज्ञानाचें संरक्षण करण्यास समर्थ होण्यास या समाजाची वृत्ति हा हेतु साध्य करण्यास अनुकूल अशीच राहिली पाहिजे. सर्व जगाचा ओढा निवळ विषयोपभोगाकडे झपाट्यानें वाढत आहे, रशियासारख्या अफाट देशांत धर्मगुरूंचा सबंध वर्ग नाहींसा करण्यांत येत आहे, उदरपूर्ति व कामशांति करण्याचीं साधनें रोजच्या रोज नवीं नवीं शोधून काढण्यामध्यें पाश्चात्य जग सतत गुंतलें आहे, व अशा स्थितीमध्यें नित्य संसर्गानें व पाश्चात्य वाङ्मयाच्या अभ्यासानें ब्राह्मण समाजही या घातकी

वृत्तीमधें गुरफटला गेला आहे. मुंबई शहरांतून सर्वत्र फैलावणाऱ्या वाङ्मयामध्यें नीतिभ्रष्टतेचें विष किती भरलें आहे हें सर्व लोक पहात आहेत. परंतु ब्राह्मण समाजास जर आपलें अस्तित्व कायम ठेवणें असेल तर त्यांनीं या विषमय सुधारणांपासून अगदीं अलिप्त राहणें अत्यंत अवश्य आहे. ग्रीस, रोम, स्पेन वगैरे देशांत जेव्हां जेव्हां संपत्तीमुळें विलासीपणास ऊत आला तेव्हां तेव्हां त्या देशांची तात्काळ सर्व बाजूंनीं अधोगति झाली. आमचे देशांतही मोगल वंशाच्या चालत्या काळांत विलासीपणास जेव्हां भरती आली तेव्हां तत्काळ त्यांना त्याचें फळ भोगावें लागलें. ज्या समाजाची प्रतिष्ठा, स्थिरता, किंबहुना प्रत्यक्ष अस्तित्वच शुद्धपणा, ज्ञान, धर्मपरायणता वगैरे गुणांवर अवलंबून आहे अशा ब्राह्मणसमाजानें जर तपादि साधनांचा व शुद्ध शील आणि वैराग्य इत्यादि गुणांचा त्याग केला व विषयभोगांतच जर सर्वस्वीं तो चूर झाला तर त्या समाजाचें नष्टचर्य ओढवलें असें म्हणणें प्राप्त होतें. ब्राह्मण समाज स्वतःस श्रेष्ठ मानतो व म्हणवितो हें आधुनिक काळांत पुष्कळ मत्सरी लोकांस सहन होत नाहीं. व त्यामुळें ब्राह्मण समाजावर निंदेचा वर्षाव होत असतो. या निंदेचे हेतु काय आहेत हें बहुतेकांस माहित आहेच. पण ही निंदा कांहीं अंशीं योग्यही आहे असें म्हणणें अवश्य दिसतें. एकनाथ महाराजांनीं म्हटलें आहे कीं:—

ब्राह्मणाचे देहीं जाण ॥ करावें स्वधर्में अनुष्ठान ॥
माझेनि उद्देशें संपूर्ण ॥ तपसाधन कृच्छ्रादिकें ॥

भागवत १७।४२१

तपःसाधन, कृच्छ्रादिक व्रतें व स्वधर्माचें आचरण हें ब्राह्मणांचें कर्तव्य अशी आपली प्राचीन परंपरागत कल्पना आहे. या कल्पनेस सद्यःकालीं व्यवहाराची जोड देणें जरूर आहे. पण आपलें तप व स्वधर्माचरण हें मूळ भांडवल फेकून देऊन निवळ व्यवहाराच्या पाठीस लागूं तर आपली धडगत लागणार नाहीं हें सर्व ब्राह्मणांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. तपःसाधनास संसारत्याग करून रानींवनीं वास करणें अवश्य नाहीं. तपाचें मुख्य अंग म्हणजे आत्मनिग्रह. हा मनोनिग्रह संसारांतील कर्तव्यें करीत असतां निरंतर सावधान राहून करितां येतो व तसाच मनोनिग्रह करणें जास्त फलदायी आहे. तप आणि व्रतें यांत मानसिक उन्नति व शरीरशुद्धता साध्य करण्याची शक्ति आहे. व या दोनही गोष्टी आधुनिक चढाओढींत अत्यंत जरूर आहेत. आपल्या सर्व व्यवहारांमधें आपला देह क्षुद्र अशा विषयभोगांकरितां नसून तो मनोनिग्रह, आत्मसाधन, वैराग्य इत्यादि कार्यार्थ निर्माण केला आहे ही भावना सतत जागृत ठेवून जर प्रत्येक ब्राह्मण वागेल, तर सर्व जग जरी स्वार्थांधतेनें ब्राह्मणांवर आघात करूं लागलें तरी श्रीकृष्णभगवान् त्यांचें संरक्षण करील.

मी हृदयीं धरूनीं अनंत । जो पूर्ण वैराग्ययुक्त ॥
तपादि साधनीं संतत । सदा शिणत ब्राह्मण जे ॥
त्यासी देहपाताच्या अंतीं । माझ्या अनंत सुखाची प्राप्ती ।
तेथ स्वर्ग सुखादि संपत्ती । मावळती तत्काळ ॥

ए. भागवत १७।४२२–२३.

अलीकडील नाटकें, सिनेमा, बहुतांशीं सर्व वाङ्मय हीं शुद्धतेस, तपःसाधनास, आत्मोन्नतीस अत्यंत विघातक आहेत. आधुनिक भौतिक ज्ञान संपादन केल्याशिवाय मनुष्यास इतर देशांच्या चढाओढीपुढें टिकून राहणें अशक्य आहे. पण त्या भौतिक ज्ञानाला बिलगून राहणारी विषयलोलुपता पूर्णांशानें झिडकारून ब्राह्मणांचे आचारविचार जर प्रेमानें व आदरानें कालानुरूप फेरफार करून पाळण्यांत येतील तर त्यांत ब्राह्मण समाजाचा व सर्व हिंदु समाजाचा आत्यंतिक फायदा आहे, हें स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ वगैरेनीं अधिकारयुक्त वाणीनें यापूर्वी सांगितलें आहे, त्याचाच पुनरुच्चार वेळोवेळीं करणें अवश्य आहे. गडकरी, केशवसुत वगैरे कवींच्या पुराणमतविरोधी तुताऱ्यांनीं डोकीं भडकून भलतीकडे वहावत जाणारा उच्छृंखल समाज जर जुन्या विनमोल ठेव्याकडे प्रेमानें परतून पाहणार नाहीं तर त्याचें दुर्दैव त्यास कोणच्या गर्तेत नेईल तें सांगतां येत नाहीं. तेव्हां “ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ” व त्याचबरोबर “ ब्राह्मण स्वधर्ममार्गें चालो ” अशी श्रीकृष्णपदीं प्रार्थना करून पुरें करितों.

शिवराम.

---

१

स्वामी आणि सेवक यांमध्यें जेव्हां दुजा भाव नसतो तेव्हां स्वामी सेवकाला सेवक लेखीत नाहीं, उलट सेवक आपली पायरी ओळखून धन्याला आपल्या विनयादि गुणांनीं मोहून टाकतो. सेवकाला स्वामीच्या प्रसन्नतेपेक्षां अधिक प्रियतम कांहींच नसतें. आजच्या यंत्रयुगांत मालकाचें तोंडही मजूराला दिसत नाहीं. यामुळेंच त्याला धन्याची प्रसन्नता संपादन करण्यांत गौरव आणि धन्यता वाटेनाशी झाली आहे. व्यवहारांतही सगुणाची काय योग्यता आहे हें पुष्कळ व्यवहार करणाऱ्यांच्या लक्षांत येत नाहीं.

२

दारावर धान्य विकावयास आणलें कीं तें विकणाराला घरवाल्याचें माप पत्करावें लागतें. त्याप्रमाणें फिरस्त्या गुरुजींना चेल्याच्या मनोगताप्रमाणें आपलें प्रमेय मांडावें लागतें.

# एका कवयित्रीचीं कवनें.

## तिळगूळ.

( चाल—कुणी तरी दावागे बाई )

जनहो त्यजुनी असत्याला ।
तिळमिश्रित गूळ सेवुनी तुम्ही सत्य प्रिय बोला ॥ ध्रु० ॥
सत्य हेचि शाश्वत ठेवुनी साधा कार्याला ।
होय सुलभ हा मार्गचि तुम्हां नेइल मोक्षाला ॥ १ ॥
सत्यासाठीं बलि राजानें स्वदेह अर्पियला ।
जगन्निवासी द्वारिं तयाच्या द्वारपाल झाला ॥ २ ॥
सत्यानें हा विजय जाहला पांडुपुत्रांचा ।
सत्य तिळगुळ हाची घेतां शेवटीं जय आपुला ॥ ३ ॥

---

## २ मुक्ताबाई.

( चाल— हा बाळ टिळक माझा नवा नवतीचा )

चित्कला आद्यशक्ति । प्रणवरूपीणी ॥ ध्रु० ॥
मग्न स्वरूपीं मुक्ताबाई । ज्ञानदेवभगिनी ॥ १ ॥
कीर्तनरंगीं रंगुनि गेली । पावलि निरंजनीं ॥ २ ॥
घणघण घंटानाद आकाशीं । प्रगटलें तेज भुवनीं ॥ ३ ॥
तेजामाजीं तेज मिळालें । फांकली प्रभा गगनीं ॥ ४ ॥
जय जय करिती ऋषिगण सारे । वंदन तवचरणीं ॥ ५ ॥

---

## ३ चरका.

**( चाल—कुणी तरी दावागे )**

निजकरिं घेऊनी चरक्याला । जय जय रामराम बोला ॥ ध्रु० ॥
भक्त कबीरें रामनाम हा तंतू काढियला ।
दृढनिश्चय हे स्तंभ उभारी भक्तिमार्गाला ॥ १ ॥
निःसंग होऊनी रामस्वरूपीं रंगुनियां गेला ।
कृपानिधी तो विणूं लागला चहू भुजीं शेला ॥ २ ॥
ब्रह्मानंदीं शेला विणुनी निश्चल तो जाहला ।
राघव करुनी साह्य मिळविलें आत्मस्वराज्याला ॥ ३ ॥
स्वराज्य हेंची ध्येय गाठण्या फिरवा चरक्याला ।
कबीरासमही साह्य करीलची ईश्वर तुम्हांला ॥ ४ ॥

---

## ४ चोखा मेळा.

**( चालः—असा धरिं छंद )**

चोखा मेळा । ध्यातसे नित्य गोपाळा ॥ ध्रु० ॥
शुद्ध पाहुनी भावार्थाला । राउळिं श्रीहरि नेइ तयाला ।
देवभक्त हा एकचि झाला । रंगुनी गेला ॥ १ ॥
मीतूंपण हा सकल त्यजिला । अंत्यज हाचि भाव न उरला ।
एकपणीं हरिनामीं रतला । पंढरीशाला ॥ २ ॥
द्वैतवादि जन छळणा करिती । परी सहाय्य असे विश्वपती ।
ईशतत्त्व हें पूर्ण जाणिती । भेद न त्याला ॥ ३ ॥
देवभक्त हे एका आसनीं । चकीत झाले विप्र बघूनी ।
चोख्याचे मग पद वंदूनी । करिति खेदाला ॥ ४ ॥
ध्यान सांवळें उभें करकटीं । दावी ते पद मज जगजेठीं ।
नाना चरितें भक्तासाठीं । करिसि दयाळा ॥ ५ ॥

---

# ५ ज्ञानदेव.

( चालः—चंद्रकांत राजाची कन्या० )

ब्रह्मा विष्णु हर अवतरले निज मायेसहित ।
महिषमुखानें वेद वदविला महिमा अद्‌भूत ॥ ध्रु० ॥
पिता जयाचा स्वामी विठ्ठल रुक्मिणी उदरीं ।
जन्म घेतला शुद्ध भूमिका अलंकापूरीं ।
जडमूढांना मार्ग दावण्या आले भूवरीं ।
शोडष वर्षीं ग्रंथ रचियला श्रीज्ञानेश्वरी ॥
चालः—ज्ञानेशाची अघटित करणी ।
जठराग्नी तो प्रदीप्त करुनी ।
मांडे भाजी मुक्ता भगिनी ।
देखूनी नयनीं खेचर मग तो झाला लज्जित ।
गमे तयाला जगन्निवासी अवतरला खचित ॥ १ ॥
ज्ञानेश्वर ते निवृत्ति बंधू तिसरे सोपान ।
भगिनी त्यांची मुक्ताबाई चिच्छक्ती जाण ।
अवतरुनीयां संत विश्व हें करिती पावन ।
प्रेमें त्यांचें चरित्र गाया वांछितसें मन ।
चालः—चांगदेव बहू गर्वानीं ।
व्याघ्रवाहनावरी बैसुनी ।
जिता सर्प तो हातीं धरुनी ।
ज्ञानेशानें गर्व हरिला चालविली भिंत ।
लीन होउनी चांगदेव हा शरण पदीं येत ॥२॥
होय सद्‌गुरू निवृत्तीचे श्रीगहिनीनाथ ।
गुरुनिवृत्तीपद ज्ञानेश्वर नित्य मनीं ध्यात ।
नाम तयाचें प्रेमें स्मरतां होय बंधमुक्त ।
आपणां ध्यांता आपणचि होई सहज ब्रह्मभूत ।
चाल—ज्ञानेश्वरी ही माय जगाची ।
चिंता वाहे निज भक्तांची ।
ल‍री केवळ कृपासिंधुची ।
सरस्वती बालिका प्रार्थिते जोडुनियां हात ।
जाणुनिया तूं दीन दयाळा पुरवी मम हेत ॥३॥

श्री. गोदुताई दामले, पुणें.

---

# श्रीनारायण महाराज जालवणकर यांचें पत्र.

स्वस्तिमत् सहस्त्रायु रघुनाथभाऊ याशि क्षेमानंद वर्धनानंत आशीर्वाद सदानंद असो विशेष केशवपंत याजबराबर पत्र पाठविलें तें पूरण सप्तमीस रवाना होणार तो पूर्व दिवशीं षष्टीस केशवपंत घेऊन धूमेस आले. पत्रीं सर्व पारमार्थिक हृदय निवेदन लिहिलें तें वांचोन पाहिलें उचित लिहिलें तुम्हास श्रीसद्गुरूपूर्ण वरद प्रसन्न आहे मुक्तीवरील भक्ती जो पाचवा पुरुषार्थ परम दुर्लभ नारदादि मुनिमान्य तो स्वामींनी निजअंगे तुम्हास पूर्ण दिला आहे तोच दयाळु गुरु आमचे लिहिल्या वगैरेचा अहंकार संबंधीं वाराही लागो देणार नाहीं. कामादि विक्षेप वृत्तिस होतात एतदर्थ करुणास्तवने प्रसन्न गुरु-देव बोलिले ते ऐशेकीं ॥ मायामेघो जगन्नीरं वर्षत्वेष यथातथा । चिदाकाशस्य नोहानिर्नवालाभ इति स्थितिः ॥ १ ॥ आपलीच नर्तकी माया ती मनोभूमीवर गुणधर्मी हावभाव धण्यास दाखविते तथापि जाणता धीर तेणे सखेद वा विस्मित होत नाहीं. अति वृष्टी विजा कडकडल्या तरी आकाश निष्कंप माया अविद्यमान मेघें काम संकल्प विकल्प विक्षेपनीर अतिवृष्टि केली तरी या मृगजळें चिदाकाश आपली हाणी किंचितही नाहीं. आपण अकंप आहे दृढता परिपाक व्हावा वगैरे यासही उत्तर स्वामी बोलिले तें लिहिलें ऐशे कीं एखादा खाम रोवणे जालें वा खुंटी त्याचीच पक्या इत दृढता संभवते मेरू पर्वत तो ठायींचा अचल त्याची पक्या ईत कोणे करावी " नित्यः सर्वगतः स्थाणु-रचलोयं सनातनः " ॥ एवं अनादिस्त्वं सुखी भव सगुणानुराग मुनिमान्य तेणे अति प्रसन्न गुरु बोलिले दर्शनाविषयीं करुणा. प्रार्थनेस उत्तर ऐशे की, भावज्ञाचे दर्शनाविषयीं दासे चिंता न करावी तुम्हास प्रसन्नपूर्ण दर्शनही होईल अवधी तोच जाणे बोलिले तितके लिहिले ( भ्रातर्यदीदं परिदृश्यते जगन्मा-यैवसर्वं परिहृत्यचेतसा ॥ मद्भावनाभावित शुद्ध मानसः सुखी भवानंद–मयो-निरामयः ॥ १ ॥ अयमाशीर्वादः ॥ अपरं सौ. लक्ष्मीबाईनी ६ सहा रुपये व काजू वेलची जायपळे ५ पाठविले ते सर्व पावले. व सौ. राजसबाईनी १ पुतळी, ताट एक व बेदाणा पिस्ते तिरवटी सुपारी पाठविली ती पावली. व सौ. पार्वतीबाईनी रुपये चार व सौ. राधाबाइनीं ४ रुपये पा. (पाठविलें) पावले. सौ. वाकणकर अवडीबाईचा रुपाया १ एक पावला. जें जें पा. ( पाठविले ) ते तें सर्व पावले ॥ अथ अपरं चिरंजीव गोपाळराव याचा नमस्कार सानुराग निःसंशय आला परंतु चिरंजीव रा. जीवनरावाचा उलेखच नाहीं. कोठें आहे लिहावें. सर्वाचे नमस्कार व भेट वगैरे स्वामीस निवेदन

केल्या ॥ अथ अपरं आम्ही पूर्णे ब्राह्मणाबरोबर मुद्दाम पत्र आशीर्वाद वर्तमान लिहिलें हें केवळ भाविकाचे समाधानार्थ कल्याणार्थ लिहिलें आहे. वरकड कांहीं दुसरा हेतु दुराशा धरून लिहिलें नाहीं. कोणीही दुस्तर्के भेट वगैरे रुपाया सुवर्णादि न पाठवावे. श्रीगुरु तूमचें सर्वांचें भक्तिभावेंच ऋणी प्रसन्न वरद आहे. अम्हासही त्याचेच चरणावाचोन दुसरीं इच्छा नाहीं. यास्तव कोणाचेही भेट वगैरे नमस्कारादिकाची इच्छा नाहीं. यास श्रीगुरुचरणच साक्ष. घरोब्याचा स्नेह धर्म रक्षण करिता मात्र लिहावे लागते अलं. गंगा भा० नानीबाईनी रुपये ५ पाठविले ते पावले.

पौ० मी० चैत्र वद्य ८ गुरुवारी सन १२६१ फसली संवत १९११ शके १७७६. (संग्राहक—माधव गोविंद भिडे).

---

## अभिप्राय व पोंच.

**साहित्यसंग्रह भाग १।२** माजी काळकर्ते व प्रस्तुत स्वराज्य-कर्ते प्रो. शिवराम महादेव परांजपे एम्. ए. यांच्या लेखनकौशल्याची, रसिकतेची, सूक्ष्म व शोधक बुद्धीची तारीफ करण्याची जरूर आहे असें नाहीं. परांजपे यांच्या भाषणांत तशीच लेखांत त्यांच्या विद्वत्तेबरोबर त्यांच्या काव्य-शक्तीचीही मौज पाहण्यास सांपडते. चित्रमयजगतांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले त्यांचें वाङ्मयात्मक वगैरे अनेक लेख प्रस्तुत दोन्ही भागांत एकत्र छापलेले आहेत. ‘ विष्णुसहस्रनाम ’ ‘ वेदांतविषयक गोष्ट ’ भासाची भवितव्यता ’ ‘ मेघदूतावरून कालिदासाविषयीं ’ ‘ चारुदत्त आणि मृच्छकटिक ’ इ. लेख वाचण्यासारखे आहेत, व परांजपे यांच्या कल्पकतेचा व विद्वत्तेची कल्पना पुढील पिढ्यांस या संग्रहावरून येणार आहे. प्रत्येक भागाची किं. रु.१०८ ‘ स्वराज्य ऑफीस ’ पुणें येथें मिळतात.

**दुमालदारः**—हें मासिक पुणें येथें गेल्या कार्तिकापासून डेक्कन दुमालदार सभेमार्फत श्री सरदार आबासाहेब मुजूमदार एम्. एल्. सी. यांच्या नेतृत्वाखालीं सुरू झालें असून महाराष्ट्रांतील इनामदारवतनदारांच्या हित-रक्षणार्थ व शिक्षणार्थ त्याचा उत्कृष्ट उपयोग होईल यांत शंका नाहीं. बहुतेक सुशिक्षित व माहितगार इनामदारांचें त्यास साह्य होत असून आबासाहेबांची

काम करण्याची शैली व माहिती शोधपूर्वक काढून मांडण्याची हातोटी इतकी शिस्तीची आहे कीं हें मासिक उत्कृष्ट रीतीनें चालेल व वतनदार, इनामदार व जहागिरदार यांच्या उपयोगाचें होईल याविषयीं आम्हांस शंका नाहीं. वा. व. रु. ३

**ज्ञानेश्वरीचें काव्यांगः**—हा काव्य विवेचनात्मक छोटासा निबंध रा. य. र. आगाशे एम्. ए. एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई यांनीं लिहिला आहे. इंग्रजी कवि चॉसर, स्पेन्सर, मिल्टन यांच्या काव्यामृताचे घुटके घेत असतांना मराठी संतकवींच्या ग्रंथांकडे पाहणाऱ्या रसिक तरुणांनाही मराठी कविता कशी मोहून टाकते हें या निबंधावरून दिसतें. ज्ञानेश्वरींतलीं सुंदर स्थळें दाखवून रा. आगाशे यांनीं विवेचनही बरें केलें आहे. किं.॥ ६

वैश्यविद्याश्रम, सासवनें, तिसऱ्या व चौथ्या वर्षाचा अहवाल, यशवंत पथकांतील कवींची फूलवेल—कालिका पाहिली, पुरुषोत्तमयोग—बा. धों. दिवेकर, इ.

---

# ताजे मननामोद.

**( माधव गोविंद भिडे ).**

दोन्ही डोळ्यांनीं एकच चंद्र दिसणार. येथें तर अनुभविता द्रष्टा एक आहेना ? परंतु मौज पहा कशी आहे ती ! एका डोळ्यास तो द्वित्त पावलेला दिसतो तर एकाला जसाचातसाच. दृष्टिकेंद्र भिन्न असलेल्या दुर्दैवी मंददृष्टीच्या लोकांनीं ही अनुभवाची दैवप्राप्त संधि घालवूं नये. इंद्रियगोलकांत शक्तिवैषम्य उत्पन्न झालें तर अनुभवांत एकसमयावच्छेदेंकरून भेद प्रत्ययास येतो. प्रत्यक्ष प्रमाणास डोक्यावर घेऊन नाचणाऱ्यास हें शेलापागोटें आनंदानें समर्पित असो !

२

वैद्याला कामिनीचा उपद्रव झाला असतां त्याचे त्यास निदान होऊं शकतें. चुना, चंद्र वगैरे नित्यपरिचियाचे पदार्थ त्याला पिवळे दिसूं लागले म्हणजे आपणास कावीळ झाली आहे असें त्याच्या सहज लक्षांत येतें. मग अशावेळीं तो प्रत्यक्षप्रमाणमोहाविष्ट न होतां शास्त्रोक्त औषधाचा आश्रय करून रोगविमुक्त होतो.

३

तापकरी वैद्यास तापकरी रोग्याची स्पर्शपरीक्षा करतां यावयाची नाहीं. अर्थात् विवेकी वैद्य परीक्षा करण्याचा हट्ट घेणार नाहीं. प्रत्यक्ष प्रमाणास प्रमाणक निर्दोष असावा लागतो.

४

कांहीं बाळरोगांवर गाढवीचें दूध मोठें गुणकारी होतें. म्हणून लागलीच जो उठला तो गाढवी पाळीत सुटत नाहीं. त्याचप्रमाणें विषयाच्या दृढसेवनानें कांहीं जीवांस विरक्ति विवेकाचा लाभ झाला एवढयासाठीं प्रत्येकानें कामपिशाचिकेच्या उपासनेस लागावयाचें कारण नाहीं.

५

काल पोटीं आज ओटीं आणि उद्यां खोटीं अशी उतावळ्यांची निष्ठा असते. एवढयाकरीतां विवेकी गुरूनें असल्या तीव्र ग्राहकास अनुग्रह देण्याची घाई न करावी हेंच बरें.

६

कसाबाच खाय वायां जाय. परंतु हें मूढ शेळ्यामेंढयांना न कळल्यामुळें बिचाऱ्या जोगाऊन पुष्ट होत असतात. आम्ही प्राकृत लोक सुद्धा कालाच्या दाढेसाठीं स्वशरीरपुष्टी साधण्यांत दंग झालेले आहोंतच कीं !

७

धोतर हरवलें नागवें मिरवलें. व्यसनी मनुष्य आपल्या लोभादिदुर्गुणांचा ओखटपणा लपविण्याची रुठाठेव न करितां मोकळ्या वृत्तीचा आव आणून भोळ्याभाळ्यांत अवधूत दीक्षेचा टेंभा मिरवीत असतो.

८

धाडशाचे धड भित्र्याला गोड. विश्वामित्र, दुर्वासादि महर्षींच्या गर्व हरणाच्या गोष्टी सांगून हशा पिकविणारे हरदास भित्र्याभागूबाईंना तपोविमुख राहाण्यास याच नीतितत्त्वाचा अवलंब करून प्रोत्साहन देत असतात.

९

व्यसनाकुल जीवानें अपयशाचें खापर व्यसनाच्या माथ्यावर फोडून मोकळें होऊं नये. व्यसनाविषयीं किळस आली कीं व्यसन सोडविण्यास आयास पडत नाहींत. व्यसनाचा वैरी तो विवेकाचा कैवारी.

१०

मोत्याची शिंपली स्वकीय तेजोहानि होईल या भीतीनें मोत्यें पोटांत सांठवून ठेवीत नाहीं. ज्याचें भाग्य त्याचें बरोबर.

११

पाणीच व्यवहार—विषय झालें कीं त्याला पाण्यावरून सेतु बांधून त्यावरून जावें लागतें. विवेकी मनाला स्वतःच्या पूर्व रूपावरून असाच दृढनिष्ठेचा पूल बांधून जावें लागतें.

१२

शाईटाकांवर निबंध शाईटाकांनींच ल्याहावा लागतो. त्याप्रमाणें ब्रह्माविषयीं बोलतांना ब्रह्मरूप होऊनच वक्ता प्रपंच करितो.

१३

काशी आणि रामेश्वर यांत यात्रेकरूला स्थानांतराची जाणीव जोंपर्यंत स्पष्ट प्रतीत होत आहे तावत्कालपर्यंतच त्याला यात्रा करण्यांत मौज वाटेल. एकदां कां त्याला एकत्वाची प्रतीति आली कीं त्याचा यात्राप्रसंग संपलाच !

१४

पारवा कबूतरांत मिसळला कीं त्याला विहिरी आवडेनाशा होतात. साधक बहुजनसमाजांत रमला कीं त्याचा साधनयोग संपलाच.

---

# बंधाचें स्थानांतर.

(लेखकः—माधव गोविंद भिडे.)

जे धूमकेतुपरि येत कधींमधींच ।
आश्चर्य मात्र उपजे सहजीं उगीच ॥
विश्वांत बंधनविहीन असेल जो तो ।
कामा न ये. फलद बंधनभाव होतो ॥ १ ॥
ऐशान्य वाहति अतां अति गार वारे ।
नैर्ऋत्य शांत गगनांतिल मेघ सारे ॥
दिग्भेद वायु करितो ऋतुच्या प्रसंगें ।
तो बंधनांतर वरी विभु काल संगें ॥ २ ॥
शैथिल्य एकपण आणित बंधनांत !
नानात्व यास्तव सदा दिसतें जनांत ॥
स्थानांतरें सुदृढ बंधन होत पाहे ।
स्वच्छंद वात नभिं एक दिसे न राहे ॥ ३ ॥
एका कुशीवरि न झोंप निवांत येई ।
कुश्यंतरेंच बघ नीजहि बद्ध होई ॥

तो काल सूत्रमय होय ढिला सुकालें ।
त्याचा पहा डुगडुगा मग जीर्ण हाले ॥ ४ ॥
एकास मुक्ति, दुसऱ्याप्रति भुक्ति अन्या ।
दास्य क्रमें वितरि सृष्टि पहा वदान्या ॥
येणें गुणें सकल विश्व सुबद्ध राहे ।
स्थानांतरांतच नियंत्रणबीज आहे ॥ ५ ॥
स्वस्थानबंध न रुचे जरि या मनाला ।
स्थानांतरीं भय गमे बहुधा जनाला ॥
तत्रापि बंधन सुटे तंव भीतिभीत ।
हा लोक नूतन वरी मग हृष्ट होत ॥ ६ ॥
जो हर्षशोक विवरून बघे मनाचे ।
त्याच्या पुढें मधुर चिन्मय बोध नाचे ॥
विश्वांत मोक्ष गवसे मग बंधनांत ।
एकांत होत रमणीय जनावनांत ॥ ७ ॥

---

## कवि आणि काल.

हा पैल जो बहरला रमणीय वृक्ष
त्याचीच देत बघ हें अजि सत्य साक्ष
भृंगावलि स्तबकसी करि मञ्जु गान ।
काव्यांत ठेवि कवि तें जपुनी लिहून ॥ १ ॥
पर्णाळि ही तर इथें निपुणा विलोकीं
संमिश्रवर्ण ठिपके वरि टीप झोंकी
मागील पाय सुटले सहसा कसे रे
काव्यांत वर्णन हुबेहुब वाच सारे ! ॥ २ ॥
त्या कीटकास बघ लक्षुनी नीलपक्षी
टोंकावरीच इतर द्विजही निरीक्षी
आला तशांतच अहा विहगा वधाया
हा पक्षिपारधि नसे हृदयांत माया ॥ ३ ॥
ऐसा प्रसंग करुणोत्कट वाच कैसा
रेखीव काव्यिं लिहिला घडतांच तैसा
डोळ्यापुढील तव वाचुनि वर्तमान
पूर्वील काव्य म्हणण्या तुजला त्रपा न ॥ ४ ॥

# कवि आणि काल.

दोघेच मित्र बघ लक्ष्मण आणि राम
मी आणि तूंच फिरण्यास्तव येथ ठाम
दोघेच मित्र कवि वर्णितसे पहा हे
श्लोकीं इथें नवल का तुज वाटताहे ॥ ५ ॥

वक्तृत्वपूर्ण मग यापरि भाषणास
द्यायास उत्तर दुजा तव बांधि कास
छेडून याउपरि तूं छळणें अयोग्य
काव्यें अशींच जगतीं नित होति भोग्य ॥ ६ ॥

काव्याङ्गना कवि मनोग्रहण प्रसक्ता
काळास पाठवि जयार्थ दृढानुरक्ता
उत्प्रेक्षुनी कवि तया सहसैव जाळीं
घे हात मारून तदा कविताहि भाळीं ॥ ७ ॥

ती तेधवा करुन धीर तशीच नीट
जावोनियां कविपुढें वदलीहि धीट
कांता ! प्रिया ! वश न होसि मुळींच काळा
मी चंचला मम चुके म्हणुनीच ताळा ॥ ८ ॥

काळाविणें भ्रमण सृष्टि करील कैशी
संक्रातिवीण मग राहिन मी उपाशी
या आज कालदहनें मम हानि झाली
उत्साहदीप्त कलिका बघ हे विझाली ! ॥ ९ ॥

माझ्याचसाठिं बघ कष्टत काळ होता
त्यातें तुवां करुनियां बलि होसि होता
त्याच्याविणें तुजसवें रमलें जरी मी
लोकांत नीच गणतील मला हरामी ॥ १० ॥

तो पार्वतीस्तव जसा उठवीत कामा
काळास तूंहि उठवीं मम सौख्यधामा
पायींच लागुनि वदे कविता—प्रिया ती
तेव्हां कवि द्रवुनि थांबत काळघातीं ॥ ११ ॥

उज्जीवनीं मन जरी मम अल्प नाहीं
बोले कवि प्रिय तुझें करणें सदाही
सृष्टिप्रभुप्रथित काळ तथापि त्याला
मी येथ त्यास तव सेवनिं सिद्ध केला ॥ १२ ॥

तूं सांगशील ऋतु तोच असेल तेव्हां
आज्ञा विलंघन न काळ करील केव्हां
माझें तुझें वय कुणा कथणार नाहीं
एका अटीवर अशा जगवीन पाही ॥ १३ ॥

नाथा! तुझें करिल दास्य असेंहि काळ
दे जीवदान पुरवीं मम हीच आळ
शब्दास्त्र सज्ज करि अंकित पूर्ण काळा
ती मोदमत्त करि नृत्यहि काव्यबाळा ॥ १४ ॥

तो कालजित् कवि पुराण नवा नवीन
आधीं नवा मग जुना तरि तो कवी न
काळा अजिंक्य जरि कोणि असेल एक
तो या जगांत कवि तूं सखया विलोक ॥ १५ ॥

# तीर्थ यात्रा.

मुमुक्षूंमध्यें मधून मधून अनेक तिर्थांचीं वर्णनें येत असतात. त्यांतील तपशीलवार माहिती कित्येक वाचकांस कंटाळवाणी वाटत असेल. परंतु या बारीक सारीक गोष्टींमधेंही पुष्कळ अर्थ भरलेला असतो. प्राचीन काळापासून तीर्थयात्रा ही अत्यंत मान्य अशी संस्था मानण्यांत आली आहे. कांहीं आधुनिक साधुसंतांनीं प्रासंगिक मनःस्थितीमध्यें धोंडे-पाण्याची पूजा कुचकामाची आहे, भावभक्तीनेंच मुक्ति मिळते अशी टीकाही केली आहे. परंतु त्याच संतांनीं आपल्या ग्रंथांत इतर स्थळीं तीर्थांची अत्यंत महती गायिली आहे. भक्तीशिवाय मोठालीं देवस्थानें व पुण्यदायिनी नदी यांच्या सेवनापासूनही तादृश आध्यात्मिक लाभ नाहीं हें या संतांच्या तीर्थनिंदेचें रहस्य आहे. प्राचीन ऋषि घ्या, अर्वाचीन संत घ्या, फार काय प्रत्यक्ष देवावतार रामकृष्णादि घ्या या सर्वांनीं आपल्या पूर्ववयांत देशभर तीर्थाटन केल्याचीं वर्णनें त्यांच्या चरित्रांत प्रामुख्यानें दिलीं आहेत. ज्ञानेश्वरांचें तीर्थाटन नामदेवरायांनीं आपल्या अनुपम गोड वाणीनें वर्णन केलें आहे. एकनाथांचें रामदासांचें तीर्थाटन बारा बारा वर्षांचें-व तेंही पूर्ववयांत झालेलें-प्रसिद्धच आहे. सत्पुरुषांच्या नित्य सहवासानें तीर्थांतील प्रत्येक दगड प्रत्येक जलाशय धार्मिक जादूनें भारलेला असतो. दुष्ट भावनेनें येणाऱ्या कांहीं पापी माणसांच्या साहचर्यानें ही तीर्थांची पुण्यसंपत्ति मुळींच कमी होत नाहीं.

अलीकडे सर्व संसार उरकल्यावर मग जन्माच्या अखेरीं अखेरीस लुल्या पांगळ्या देहानें तीर्थयात्रा करण्याचा प्रघात पुष्कळ पडला आहे. पूर्ववयांत नोकरीमुळें किंवा इतर व्यवसायामुळें देह गुलामगिरींत बांधलेला असल्यामुळें तीर्थयात्रांचें कार्य मुलांच्या लग्नकार्यानंतरच उरकावें लागतें. पण हा मार्ग अगदीं कनिष्ठ होय. पूर्ववयांत सृष्टिशोभेनें किंवा देवालयांच्या दर्शनानें तल्लीन होऊन आनंदांत व भक्तिसुखांत दंग होण्याची जी देहांत व मनांत शक्ति असते ती उत्तरवयांत फार कमी होते. तीर्थयात्रांतील देवदर्शन, स्नान, सत्पुरुषदर्शन वगैरेंच्या योगानें देहमनावर जो सुपरिणाम होतो, त्याचा फायदा जन्मभर होण्यास तीर्थयात्रा पूर्ववयामध्येंच झाल्या पाहिजेत. तीर्थयात्रांमध्यें जे अनेक मनोहर प्रदेश व सृष्टिभाग पाहण्यास सांपडतात त्यांची आठवण भाषण प्रसंगीं होऊन पूर्ववयांत प्रत्यक्ष अनुभवलेल्या आनंदाचा मानसिक अनुभव माणसास पुनः पुनः घेण्यास सांपडतो, व त्यामुळें अनायासें आपल्या सुखांत भर पडते. मी मागें एकदां अनेक दिवस टिकलेल्या भयंकर तापानें आजारी असतांना तापाच्या गुंगीमध्यें माझें मन अनेक वर्षांपूर्वीं पाहिलेल्या गंगा व कृष्णा या नद्यांच्या तटावरील सायंकाळच्या निरतिशय मनोहर सृष्टिशोभेमध्यें आपोआप भ्रमण करूं लागे व पूर्वीं अनुभविलेल्या शीतल वायुलहरींच्या स्मरणानें सुद्धां प्रत्यक्ष होत असलेला शारीरिक ताप त्यावेळीं सुसह होत असे. याचा अनुभव माझ्याप्रमाणें पुष्कळ वाचकांस असेल. तर हें आनंदाचें निधान शक्य असेल तितकें पूर्ववयांतच आपलेंसें करून घ्यावें असें माझें मत आहे. भक्ति व ईश्वरसेवा हीं वार्धक्याचींच कामें आहेत असें ठरवून पुष्कळ जीव जसे तारुण्यांतच इहलोक सोडून जातात किंवा संसारतापांनीं किंवा शरीरव्याधींनीं ग्रस्त होऊन देहास कटाळून आपल्या दुःखाबद्दल देवास दोष देत वृद्धावस्थेंत प्राण सोडतात, तसेंच पुष्कळ माणसें तीर्थयात्रा म्हातारपणीं करण्याचा बेत करूनच अकस्मात समाप्त होतात किंवा क्लेश सोसेनासे झाल्यामुळें बेत रहित करावे लागतात. पाश्चात्य देशांत युनिव्हर्सिटीमधील शिक्षण संपत आलें म्हणजे युरोपखंडांतील प्रसिद्ध ठिकाणें थोडयाफार प्रमाणांत पाहिल्याशिवाय विद्यार्थ्यांवर खऱ्या सुशिक्षितत्वाचा शिक्का बसूं शकत नाहीं. पाश्चात्य देशांचा ओढा भौतिक सुखाकडेच असल्यानें तेथील तरुण लोक ख्रिस्ताची जन्मभूमि पाहण्यास फार क्वचित् जातात पण प्रसिद्ध राजधान्या, ऐतिहासिक युद्धक्षेत्रें, सृष्टिशोभेचीं व आरोग्यास अनुकूल अशीं ठिकाणें हीं मात्र फिरून येतात. आपले देशांतील तरुणांनीं शक्य तितकें द्रव्य खर्चून पूर्ववयामध्यें आपलीं तीर्थक्षेत्रें भक्तिभावानें व नम्रतेनें यथासांग धार्मिक विधि करून हिंडून यावींत अशी माझी आग्रहाची विनंति आहे. आपला देश दरिद्री आहे. द्रव्यबळ कमी. अनिवार्य कारणाकरितांच खर्च

करण्यास पैसे नसतात. मग संसारांत शिरण्यापूर्वीच तीर्थयात्रेस पैसे कसे मिळणार ? हा प्रश्न अनाठायीं नाहीं. शंका खरी आहे. पण शिक्षणाकरितां जे लोक शक्तिबाहेर खर्च करतात, किंवा ज्या भाग्यवान लोकांस देवानें संपत्ति दिली आहे अशा माणसांनीं तरी थोडा बहूत पैसा तरुणांच्या तीर्थयात्रेस अवश्य खर्च करावा. ज्यांना द्रव्यसामर्थ्य नसेल त्यांनीं पायानेंच जावें. तीर्थस्नान व देवदर्शन यांशिवाय कांहीं करूं नये. पण शरीर आणि मन ताजेंतवानें व ग्रहणसमर्थ आहे तोंपर्यंतच तीं तीर्थदर्शनांनीं पावन करून अध्यात्मशक्तीच्या विकासाचा पाया घालावा हें लाभदायक होईल.

तीर्थांतील उपाध्यायांच्या लोभीपणामुळें व दुराचरणामुळें पुष्कळ लोक तीर्थविन्मुख होतात. लोभ व अनीति हीं सार्वत्रिक आहेत. तीर्थोपाध्यायांमध्येंच हे दोष नसतील असें संभवत नाहीं. ते नसते तर फार बरें झालें असतें. पण मग जगही सर्व नीतिमान व निर्लोभ झालें असतें. उपाध्यायांच्या दुर्वर्तनामुळें देवांची व तीर्थांची उपेक्षा करणें म्हणजे आपलेंच ऐहिक व पारमार्थिक नुकसान करून घेणें आहे. तीर्थाचे जागीं जे विधि सांगितलेले असतात ते यथाशक्ति द्रव्य खर्चून करावे. आगगाडीला व इतर वाहनांस आपण यात्रेच्या प्रसंगीं पुष्कळ खर्च करतों. आगगाडीचे व इतर वाहनांचे मालक व चालक निर्लोभ व नीतिमान आहेत कीं नाहींत याची चिकित्सा आपण करीत नाहीं व करून चालत नाहीं. तसेंच तीर्थोपाध्याय धर्माचरणी नसले तर जितक्यास तितका संबंध ठेवून आपलें प्रेम व भक्ति तीर्थदेवतेस अर्पण करून स्वस्थ असावें.

—शिवराम

---

# आस्तिक्यविचार.

(लेखक—माधव गोविंद भिडे.)

१. ज्यांच्यामुळेंच शुद्ध बुद्धीलाच गम्य, अत एव परमदुर्लभ असें ब्रह्मज्ञान प्रकट होतें, त्या सज्जनांच्या सुमनसुकुमार वैखरींतून नास्तिकाविषयीं अत्यंत कठोर उद्गार वाचून कोणाही सहृदयाच्या मनाला खेद वाटल्याशिवाय रहात नाहीं. विश्वाचें अधिष्ठान जर इंद्रियगोचर नाहीं, तर इंद्रियांच्या साह्यानेंच ज्यांचे सर्व व्यवहार चालतात अशा प्राकृत लोकांस ईश्वराचें अस्तित्व प्रतीत झालें नाहीं तर त्याचा दोष कोणाकडे ? वास्तविक पाहूं गेलें तर कोणीही मनुष्य ईश्वरभावाची प्रतीति आल्यावर त्याच्या अस्तित्वाविषयीं शंका घेणार नाहीं. जी गोष्ट आपल्याला स्वानुभवानें माहीत नाहीं त्याविषयीं ग्वाही देणें योग्य नाहीं. साक्षी शब्द हें स्पष्टपणें दर्शवितो. कोणत्या तरी ज्ञानेंद्रियानें

जें अनुभविलें नाहीं तें दुसऱ्याच्या सांगीवरून सांगणें यास साक्षी देणें म्हणत नाहींत. न्यायसभेंत असल्या पुराव्याला दमडीइतकीही कोणी किंमत देत नाहीं. तर मग नास्तिकास संतसज्जन दोष देतात हें योग्य नाहीं असें म्हणावयास नको काय ?

२. खरोखर सज्जनांना या आपल्या कटु भाषणाचा कांहीं उपयोग नाहीं हें पुरतेपणीं माहीत असत. लोखंडाचें परीस सोनें करूं शकेल परंतु तोच खापरीशीं कितीही झटापटी करूं लागला तरी त्याचे ते सर्व यत्न फोलच ठरणार, त्याचप्रमाणें देवाविषयीं आस्तिक्य उत्पन्न करण्यापासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें नाहीं अशी निराशेच्या भरांत कबुली संतांच्या मुखांतून अनेकवार बाहेर पडते. चतुष्कोणाचें वर्तुल बनविण्याचा कोण अट्टहास करील ? माकडाला सुंदर बनविण्याच्या कोण भरीं भरेल ? नाहींतर पिनस झालेल्या दुर्भगास सुगंधाचा आहेर कोण करील ? संत असला वेडेपणा कधींही करणार नाहींत.

३ तेव्हां या कोडयाचा उलगडा कसा ? याचा उलगडा फारसा कठिण नाहीं. संतसाधु कीं ज्यांना परमेश्वराचा सदा समागम आहे त्यांच्या पुढें जर कोणी परमेश्वर मुदलींच नाहीं असें बोलूं लागला तर त्यांना तें बोलणें कसें रुचावें ? जी गोष्ट आपल्या डोळ्यांना स्वच्छ स्पष्ट दिसते ती एखाद्याला जर मुळींच दिसत नसली तर त्यानें आपल्याला भिऊन किंवा मुरवतीखातर दिसते म्हणून म्हणावी ? खरोखर असें त्यानें असत्य भाषण करावें असा संतांचा अभिप्राय नसतो. तर त्यांना नास्तिक्य शक्यच वाटत नाहीं ! ईश्वराच्या भावाची प्रतीति जशी नास्तिकाला नसते तशीच ईश्वराच्या अभावाची प्रतीति संतांना नसते. दीपाची भाषा अंधाराला समजत नाहीं, अंधाराचा भाव दीपाला आकळत नाहीं. डोंगराकडे पाठ करून बसलेल्याला डोंगरासमोर उभा राहिलेल्याचें भाषण सत्य कसें वाटणार ?

४. घाण्याला अंधारी घालून जुंपलेल्या बैलाला डावी उजवीकडे कां पहात नाहींस असा प्रश्न करण्याप्रमाणें दैवी मायेचीं आणि अविद्येचीं ढापणें घालून आंधळा केलेल्या हतभागी जीवाला सभोंवार घनदाट परब्रह्माचें अवलोकन करण्यास सांगण्यासारखें आहे. ममत्वापासून सर्वथा अलिप्त राहणाऱ्या भगवंताला सुद्धां " दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया " अशा कोणालाही दाद न देणाऱ्या मायेचा अंगीकार करावा लागला आहे ! अर्थात् ईश्वराचें अस्तित्व नाकबूल करणाऱ्या अभक्ताची बुद्धि ही भरतमातेप्रमाणें मूळची भाविक परतु अविद्यामंथरेच्या कानमंत्रानें मोहाविष्ट झालेली असते. ही गुह्य गोष्ट सत्पुरुषांच्या लक्षांत आल्यावांचून रहाण्यासारखी नाहीं.

५ अंततः निष्कर्षादाखल असेंच म्हटलें पाहिजे कीं ईश्वरानें सत्पुरुषांच्या

अंतःकरणाला आपली अभावना भावत नाहीं हे लक्षांत आणून संतांच्या सहवासाला येणाऱ्या यच्चयावत् प्राणिमात्रांच्या डोळ्यावरची झांपड काढून घ्यावी एतदर्थच संत अशी कठोर भाषा नास्तिकांना उद्देशून योजीत असले पाहिजेत.

६ ईश्वरानुग्रहावांचून आस्तिक्य संभवत नाहीं हें अर्धवट भावड्यांनीं लक्षांत ठेवून नास्तिकांना हंसू नये हा परमबोध.

# काळे ढग

( लेखक-मुकुंद गोविंद भिडे, बी. ए).

Ah, my deare angrie Lord,
Since Thou dost love, yet strike;
Cast down, yet help afford;
Sure I will do the like.
+ + + +
I will complain, yet praise,
I will bewail, approve;
And all my sowre-sweet days
I will lament, and love.
—Bitter-Sweet, George Herbert.

सुख तर गोडच खरें पण तें जितकें स्वतः गोड असतें तितकेंच तें तदितरांस गोड करितें; सुखी मनुष्यास स्वतः सुखी वाटतें इतकेंच नाहीं तर हें सर्व दिसणारें बोलणारें खेळणारें आणि खेळविणारें विश्वही सुखीच आहे असेंही भासत असतें. आपण आपल्याच मापानें जगास मोजतों.

पण जर आपल्या काटयानें मनुष्यास मोजूं लागलें तर तें त्यास कधीं पटत नाहीं व तसें करण्यास त्याची कबूली क्वचितच मिळेल. असा उलट प्रसंग आल्यास वाटेंत मोठा घाट लागल्याप्रमाणें मनुष्याची साहजिक दृष्टी आलेल्या वाटेकडे परत फिरते व आपण आलों तो मार्ग बरोबर होता किंवा भलताच होता, आपला मार्गदर्शक खरा होता किंवा लबाड होता, आपण खोटें कांहीं तरी नादांत ऐकलें किंवा खरें ऐकूनही दुराग्रहानें अशा मार्गांत येऊन पडलों वगैरे बहुविध भयखेदकारी कष्टप्रद प्रश्न राक्षसीमुद्रेनें त्याच्याकडे पाहून त्या बिचाऱ्यावर कठिण प्रसंग येतो. साहजिक आहे.

असेच प्रसङ्ग विवेकाचे झरे व क्वचित्प्रसंगीं परमानंदाचे महासागर असतात असें दिसतें. पण बहुधा चुकलेल्या अशा या हतबळ जीवास निराश व उद्वेग हेंच यांचें फळ प्राप्त होतें. व याचा परिणाम मार्गदर्शकावर दोषा

रोप करणें हा होय. आपण असें हीनदीन स्थितींत येऊन पडलेलों असतां- नाच इतर किती तरी आपल्यासारखे दुसरे लोक आनंदांत दंग झालेले डो- ळ्यांपुढें दिसूं लागतात व हें असें कां ? असा विवादास्पद प्रश्न पुढें उभा राहून अनेक कल्पना तो मनांत आणूं लागतो.

कांहीं तेवढे सुखी व कांहीं दुःखी, कांहीं श्रीमंत तर कांहीं भिकारी, कांहीं विद्वान् तर कांहीं अक्षरानभिज्ञ, कांहीं तत्त्ववेत्ते तर कांहीं भ्रांत असें बहुविध वैषम्य होण्याचें कारण काय व त्यांत आमचे काय विशेष होतें किंवा आहे, हाच एक विचार पुनः पुनः अशा मनुष्याच्या पुढें येतो. जगांतील सर्व- सामान्य ध्वनिप्रतिध्वनि न्यायानें ही स्थिति पूर्वींच्या कोठल्या तरी ध्वनीचें उत्तर आहे असें वाटतें. पण अशा प्रकारचा प्रतिध्वनी निघेल असें करण्यास पूर्वी कारण काय वगैरे प्रश्न उद्भवतात.

हा प्रश्न शास्त्रकारांकडे नेतांना, सृष्टिकर्त्या ईश्वराकडे संगतप्रवाहमूलन्यायानें दोष दाखवूं लागल्यास, ते स्पष्ट असें उत्तर देतात कीं, 'वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्ष- त्वात्तथाहि दर्शयति'—( ब्रह्मसूत्र २. १. ३४ ) पण पुनः त्यांस आदिकर्मप्रवृ- त्तिकारण विचारल्यास 'अनादित्वात् ।' असें उत्तर देऊन मोकळे होतात. अडल्याचें समाधान दूरच राहातें व त्यास असें वाटूं लागतें कीं ज्या ईश्वराची आपण स्तुती करतों, ज्याला कृपासागर ह्मणतों आणि ज्याच्या कृपेची अहर्निश वाट पहात असतों, तो जर असा ऐनवेळीं हात झाडून मला तें कांहीं माहीत नाहीं, मी फक्त न्याय जाणतों असें ह्मणून, मोकळा होऊं लागला तर जें झालें तें बरोबर कां चूक; आपली वाट दाखविणारा ईश्वर कां आपलें प्राचीन कर्म, एकदां जर कर्माची गाडी सुरू होऊन गेलीच तर आतां काय उपयोग, करावें काय व बोलावें काय असें होऊन जातें.

मागील मार्ग व गती ताब्याच्या बाहेर गेलेली; पुढील मार्ग व गती माग- च्यावर अवलंबून. आतां सुधारणा व सुख होणार कसें ? ईश्वर कृपासागर आहे या ह्मणण्यांत अर्थ तरी काय ? फार झालें तर इतकें ह्मणा व कदाचित् तें तो कबूलही करील कीं जो कोणी सृष्टीचा कर्ता ईश्वर तो तटस्थ आहे. या- पलीकडे एक अक्षर काढणें योग्य होणार नाहीं. कारण त्याला असें स्पष्ट दिसूं लागतें कीं सुधारणा करण्याची इच्छा व निश्चय असूनही सुटलेल्या बाणा- प्रमाणें आतां सर्व निष्फळ. बरें मागील चुकीचा मार्ग स्वकर्मप्रवाहानें आणिला असें मानिलें तरी पुढील मार्ग कसा भिन्न होणार ?

येथेंच ईश्वराची कृपा ह्मणजे काय असा प्रश्न त्याच्या पुढें येतो. तात्का- लिक व क्षणभंगुर सुखावा ह्मणजे कांहीं कृमी नव्हे किंवा तत्कारण ह्मणजे- ही कांहीं कृपा नव्हे. ईश्वर हा विषय अदृष्टप्राय असल्याकारणानें आणि अनिर्वाच्यही असल्याकारणानें तद्विषयक व तत्संबंधीं प्रमाण एकच केवळ उरतें

व तें ह्मणजे आप्तवाक्य. तें पाहूं गेल्यास ईश्वराजवळ कृपा असून ती कांहीं खरोखर असणारी चीज आहे असें मानावें लागतें. ह्मणूनही या विषयाला कांहीं तरी बळकटी येऊन तो तिची मीमांसा करण्यास प्रवृत्त होतो.

आजपर्यंतच्या इतिहासांकडे पाहिलें तर असें वाटूं लागतें कीं कोणाचा इतक्या सुलभ रीतीनें व सत्वर चुकलेला ओघ वळणावर आलेला आहे ! कित्येक वर्षं किंवा कित्येक जन्मसुद्धां अशा घोटाळ्यांत गेले असतील. तें कांहीं असो, असा मार्गभेद खराच झाला असेल का ? अशी साशंकवृत्तीची लाट पुनः त्याच्यावर येऊन त्याला विंह्वळ करते. व विंह्वळतविंह्वळतच तो ह्मणूं लागतो कीं जी कांहीं शक्ती आजपर्यंतचा रेखाटलेला कागद फाडून टाकून स्वतंत्रविशुद्ध व केवलपरमात्मतंत्र असा कागद देऊन रविकिरणाप्रमाणें प्रतिक्षण भेद व अभेद असा घडवून आणू शकेल ती कृपा. ही कृपा होणार कशी व केव्हां ? आधीं शक्य आहे का ? असल्यास ईश्वराच्या न्यायासनापुढें काय युक्ती योजून त्याच्याकडून आपल्यासारखा निकाल मिळविला पाहिजे. असाही पण एक विचार डोकवूं लागतो. कदाचित् असें म्हणतां येईल कीं जर तूंच हें कर्म व फल निर्माण केलें असशील तर तें सुधारून सुखप्रद करणें हें तुझेंच कर्तव्य आहे व जर तूंच हें कर्म व फल निर्माणच केलें नसशील तर तें सुधारून सुखप्रद करणें तुझ्याच हातचें आहे म्हणून तें सुधारून सुखप्रद करणें हें तुझेंच कर्तव्य किंवा तुझ्याच हातचें आहे तरी तें तसें कर. याच्याहीपेक्षां दुसरा बळकट हेतू पुढें आणण्याजोगा दिसतो. तो हा कीं, 'ईश्वरानुग्रहादेव नृणामद्वैतवासना' व ईश्वरानुग्रहामुळेंच वासनेची सिद्धि हें जर खरें तर बीजवृक्षन्यायानेंही पण ईश्वरावरच येऊन बाजू पडेल.

राजाची बाजू लंगडी जरी असली तरी ती जरा बरी नाहीं इतकेंच म्हणून थांबावें लागतें कारण स्थितिभेद. हें जर आपण व्यवहारांत पाहतों तर जगन्नायकाशीं बोलावयाचें झाल्यास सौम्य शब्दांची योजना करावी हें बरें. अर्थ तोच.

एवंच कसापेक्षच ही ईश्वराची कृपा नांवाची शक्ति आहे हें उलगडणें कठीण आहे व म्हणूनच असा अडलेला जीव द्विधा विचार व प्रार्थना करीत असतो. यांत काय नवल आहे ? अंधळ्याप्रमाणें विरुद्ध गती झाली असेल तर नेणत्याला म्हणून सांवर व डोळस असूनही खड्यांत पडला असेल तर द्वाड समजून बाहेर काढ असेंच असा जीव म्हणत राहील व झुकत्या नौकेप्रमाणें एकदां असें तर एकदां तसें असें करील व बोलेल. अशा झुकत्या नावेला जर कोणी सुखरूप परतीराला नेत असेल तर तोच ईश्वर व ज्यामुळें तसें तो करतो तीच त्याची कृपा असें वाटतें. खरें काय असेल तें असो.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए. संपादक 'मुमुक्षु' पुणें.

# यांचीं पुस्तकें.

पृ. सं. १३६.] **१ भक्तिमार्गप्रदीप.** [किं. ८८.

(आवृत्ति बारावी.)

मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांच्या घरोघर हें पुस्तक धर्मग्रंथ म्हणून मान्य झालें आहे. 'नवे जुने, सुशिक्षितअक्षित, वृद्धतरुण, स्त्रीपुरुष या सर्वांना अत्यंत प्रिय झालेलें असें कोणतें पुस्तक आहे ?' म्हणून विचारल्यास "**भक्तिमार्गप्रदीप**" हाच उद्गार सर्वांच्या तोंडून निघेल यांत शंका नाहीं ! ! यांत साधुसंतांच्या प्रसिद्ध भूपाळ्या, आरत्या, अभंग, पदें, श्लोक वगैरे यथाक्रम दिले आहेत.

**विविधज्ञानविस्तार**—" पूर्वींची पिढी जात चालल्यामुळें तिजबरोबरच नष्ट होऊं पाहणारी जुनी भजनांची परंपरा ही रा. पांगारकरांचा प्रदीप प्रकाशित झाल्यापासून कोठें कोठें दृग्गोचर होऊं लागली आहे हें त्याचें महद्भाग्य होय. या पुस्तकामुळें धर्मशिक्षणाच्या कामगिरीला मोठीच मदत झाली आहे. मराठी भाषा जाणणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाजवळ प्रदीपाची एकेक प्रत अवश्य असली पाहिजे."

---

## २ सार्थ व सटीक नारदभक्तिसूत्रें. किं. ८८.

(आवृत्ति तिसरी.)

हीं नारदाचीं भक्तिसूत्रें मूळ संस्कृतांत असून ८४ आहेत सूत्रें अत्यंत सुबोध व गोड आहेत. यांत भक्तिशास्त्राचा सर्वांगसुंदर विचार केला आहे. ह्या ग्रंथांत सूत्रांचें वर्गीकरण मोठ्या टाईपांत सूत्रें, सरळ अर्थ व भक्तिग्रंथाधारें विस्तृत विवेचन केलें असून ग्रंथ अतिमधुर झाला आहे.

**श्रीगुलाबरावमहाराज**—" आपलीं सार्थ व सटीक सूत्रें मीं समग्र वाचलीं. सूत्रांचें विवरण फार चांगलें झालें आहे. स्पष्टीकरणार्थ श्रीसंतवचनांचा जो संग्रह केला आहे तो सोन्यावर जडावाप्रमाणें सुस्थळीं व समयोचित आहे."

**धर्मजागृतिः**—" नारदसूत्रांचें मराठींत विवरण करण्यास रा. रा. पांगारकरांसारखा सहृदय व्याख्यानकार लाभल्याबद्दल महाराष्ट्रीयांचें अभिनंदन करणें जरूर आहे."

**विविधज्ञानविस्तार**—" लक्ष्मणरावांची भाषा महाराष्ट्रसंतांच्या अमृतवाणीच्या ओलाव्यांत कशी थबथबलेली असते हें या विषद स्पष्टीकरणावरून ध्यानीं येईल."

---

## ३ मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोडया आहेत. पृ. सं. ६२५. किं. रु. २.

---

## ४ श्रीज्ञानेश्वरमहाराज-चरित्र व ग्रंथविवेचन.

( आवृत्ति दुसरी. )

१ श्रीज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र. २ कुलवृत्तांत व जन्म. ३ गुरुसंप्रदाय. ४ मुंज व वेदशास्त्रमर्यादा. ५ पैठणचे चमत्कार. ६ तीर्थयात्रा-प्रकरण. ७ चांगदेव आणि ज्ञानदेव. ८ समाधिप्रकरण. ९ उपासना आणि गुरुभक्ति. १० ग्रंथविवेचन आणि वेंचे. ११ स्तुतिसुमनांजलि. याप्रमाणें अकरा प्रकरणें सदर ग्रंथांत दिलीं आहेत. पृ. सं.२८८.किं.रु.१॥

१ **केसरी**--" रा. रा. पांगारकर यांच्या या ग्रंथाची भाषा भक्तिरसानें ओथंबलेली व वक्तृत्वपूर्ण आहे. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांचें विवेचन रसभरित आहे. "

२ **ज्ञानप्रकाश**—" चरित्रास उपयुक्त अशी बहुतेक सर्व उपलब्ध सामुग्री या ग्रंथांत पांगारकरांनीं संकलित केली आहे. "

३ **इंदुप्रकाश**—" श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें उदात्त व गंभीर चरित्र रा. पांगारकरांसारख्या श्रद्धावान् भागवताकडून लिहिलें जावें हा योग अपूर्व आहे. "

४ **केरळकोकिळ**--" पांगारकरांची भाषा नेहमींच गोड व प्रेमळ असते, पण साधूंचीं चरित्रें गातांना ती अगदीं तल्लीन होऊन केवळ बागडत आहेसें वाटतें. "

५ **चित्रमयजगत्**—" श्रीज्ञानेश्वरांचें उदात्त चरित्र पांगारकरांनीं मोहक व ओजस्वी भाषेंत वर्णिलें आहे. ही त्यांची कृति सर्वांगसुंदर उतरली आहे. "

६ **विविधज्ञानविस्तार**--"रा. पांगारकर हे रसज्ञ आहेत, मार्मिक आहेत, विद्वान् आहेत, भाविक आहेत व माहिती मिळविण्यास लागणारे श्रम सहन करण्याची त्यांस हौस आहे. त्यांची काव्यप्रतिभा उज्ज्वल आहे, त्यांची कसलेली भाषा अभियुक्त असून मोहक आहे. महाराष्ट्र सारस्वतांत रा. पांगारकरांचीं संतचरित्रें आपल्या भाषावैभवानें अखंड चमकत राहतील यांत बिलकुल शंका नाहीं. "

७ वे. शा. सं. **विष्णुशास्त्री बापट**--" रा. पांगारकर हे महाराष्ट्र संतांच्या वाङ्मयांत मुरलेले विद्वान् असल्यामुळें त्यांच्या इतर कृतींप्रमाणें हा ग्रंथ फार सुंदर झाला आहे. त्यांची भाषा सोपी व प्रेमळ आहे. चरित्र तन्मय होऊन लिहिलें आहे. माहितीही काळजीपूर्वक व शोधक बुद्धीनें दिली आहे. "

ग्रंथ संग्रहालय

## ५ श्रीएकनाथ चरित्र. ( आवृत्ति तिसरी. )

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान. ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर इतक्या प्रकरणांत नाथांचें पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८. किं ७१२.

**केसरी**--" महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचें व ग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेंत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदयतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. "

---

## ६ कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन. )

या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरीभारतांतील विशेष गुण:--सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ०कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचरित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. ' मुक्तेश्वरनीतिरत्नमाला ' ही शेवटीं जोडली आहे. पृ. सं. १४४. किं. रु. १

---

## ७ आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्रमहोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. ' उपकृतिस्मरण ' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ७१२.

## ८ श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र.

**पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु. ३।७**

सतत आठ वर्षे हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या श्रीक्षेत्र देहू येथील जुनी दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्यांचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ कालनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवित्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि ( उपदेशसार ) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत ( यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें पूर्ण विवरणही दिलें आहे. )

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबांचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान.

**विविधज्ञानविस्तार:**—' रा. पांगारकरांची वाणी प्रसंगानुसार प्रेमळ पण सणसणित, भाविक पण चिकित्सक, सरळ पण भेदक, व साधी पण वेधक अशी आहे. ग्रंथ फार सुरस हृदयंगम झाला आहे. हा वारकरी संप्रदायाचा रहस्यग्रंथच आहे. यांत वारकरी पंथाचीं प्रमेयें व विधिनियम, ज्ञाननिष्ठ सगुणोपासनेचें तत्व, चित्तशुद्धीचे उपाय, नामसंकीर्तनाचें महत्त्व, भक्तिरसाचा आनंद इ० गोष्टींचा सांगोपांग विचार तुकोबांच्या अभंगाधारें केला आहे. पांगारकरांच्या वाणीचा ओघ अस्खलित असून तींत श्रद्धेची मोहनी आहे. "

**का. कृ. लेले, धार:**—' समकालीन नसतांही आपण तुकोबारायांकडून आत्मचरित वदविलें आहे ही आपली कामगिरी अपूर्व आहे. "

**केसरी:**—" तुकोबांचें ग्रंथाध्ययन हें प्रकरण फारच मार्मिक आहे व तुकोबांना संस्कृत येत नसावें या महाराष्ट्रीय विद्वानांच्या मताचा पांगारकरांच्या अभिनव, अपूर्व व विश्वसनीय विवेचनामुळें आतां पूर्ण निरास झाला आहे. सर्व प्रकरणांतून त्यांच्या व्यापक व विस्तृत व्यासंगाचा परिपाक अनुभवायला मिळतो. "

---

## ९ पारिजातकाचीं फुलें.

या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति खपत आली आहे. आकारानें लहान पण अर्थगांभीर्यानें मोठीं अशीं हीं दिव्य सुमनें परमार्थविचारांना स्फूर्ति देणारीं आहेत. अनेक वर्षांचा अभ्यास, अनुभव व अवलोकन यांचा मोहक संगम अशा स्फुट विचारांत झालेला असतो. पृ स. ८०. कि. ०।८.

---

## सुधारून वाढविलेली ) १० मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितेतून वेगवेगळ्या विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केले आहेत. १ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर. ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ चर्करामायण व ७ विविधविषयपर-अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेतील बहुतेक उत्कृष्ट भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा, व कथासंदर्भ दिले असून पंतांच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाही दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कर्वीचे उत्तम गुण, काव्याची महती व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें यांचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे व **ह्या दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे.**

**केसरी**--" पंतांचा उदार, भाविक व प्रेमळ स्वभाव, त्यांची प्रतिभा व रसिकपणा यांचें या वेंच्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलें आहे. मराठींत या दिशेचा नांवाजण्यासारखा पहिला प्रयत्न म्ह० हाच होय. महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी धर्मनीतिव्यवहारज्ञ व बहुश्रुत अशा लहानथोर वाचकांनीं रा. पांगारकरांचे हे वेंचे संग्रह करण्यासारखे आहेत." **इंदुप्रकाश**--" वेंच्यांची निवड कौशल्यानें केली असून वैचित्र्य चांगलें साधलें आहे. रसिक, विद्वान् व विद्याखातें यांजकडून या ग्रंथाला अवश्य आश्रय मिळाला पाहिजे." ३ **ज्ञानप्रकाश**--" ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे."

---

## ११ सार्थ श्रीदासबोध

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधू शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु.

## १२ कविरामायण.

केसरी म्हणतोः—"हें पुस्तक मुमुक्षुकर्ते रा. रा. पांगारकर यांनीं तयार केलें आहे. यांत वाल्मिकि व तुळशीदास यांचीं संस्कृत व हिंदी रामायणें व प्रख्यात कवींचीं शेकडों रामायणें यांतील उत्कृष्ट वेंचे दिले आहेत. हे उतारे अशा रीतीनें निवडले आहेत व त्यांचा क्रम असा धरिला आहे कीं सर्व कवींचें एक 'कविरामायण' निर्माण झालें आहे! अशा दृष्टीनें उताऱ्यांची निवड करण्याचें काम जितक्या मार्मिकतेचें तितकेंच अवघडही आहे; परंतु तें रा. पांगारकर यांनीं उत्तम केलें आहे. मनोहर रामकथा व प्रमुख कवींचे उतारे यांचे लाभ एकदम घेऊं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांनीं संग्रह करण्यासारखें व वाचण्यासारखें हें पुस्तक तयार झालें आहे यांत शंका नाहीं."

प्रस्तावनेंत विषयवारीनें श्रीरामचरित्रांतील सर्व महत्वाचे विषय क्रमानें दिले आहेत. किंमत चार आणे. व्ही. पी. नें ॥७.

---

## १३ सार्थ मनोबोध

श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांची सर्वमान्यता प्रसिद्धच आहे. रा. पांगारकरांनीं यांत मनाचे श्लोक सार्थ दिलेच आहेत, पण प्रारंभीं मनालाच बोध कां यांत मनाचें स्वरूप दर्शविलें आहे. सर्व श्लोकांची संगति लावून त्यांचें वर्गीकरण केलें असून श्लोकांचा अर्थ समर्थांच्या एकंदर ग्रंथांच्या दृष्टीनें चोख लावला आहे. किं. ॥१२.

---

## १४ सन्तचरित्रमाला

मुमुक्षुंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें या ग्रंथासाठींच लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं असून ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त त्रिरुपन्नाल्वर, सूरदास, सोहिरोबा आंबिये इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवळकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीतारामहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज, भोरचे दत्तंभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु, इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा ( भाकेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले, धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( वि. कृ. कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ), बलभीमबोवा साडेकर ( श्री. खासगीवाले ), शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर. ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. २५६. पांच फोटो. किं. रु. १॥८.

---

## १५ भक्तिमणिमाला

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत-मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५०, किं. रु. १॥

## १६ श्रीसमर्थसंजीविनी उर्फ रामदासी वेंचें.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य भरून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रियांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. ( १ ) प्रपंच ( २ ) राजकारण ( ३ ) परमार्थ व ( ४ ) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकारणांचा '**सारांश**' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्याचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सिम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे. पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बायडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन.

## १७ निबंधमाला-तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें 'सरस्वतीमंदिर' मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें ज्यास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ८१० आणे,

## १८ मारुतिउपासना

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी. किं. ।४.

## १९ मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०-१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षू' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. प्रत्येक भाग किं. रु. १।८.

### विषयानुक्रमणिका.

**भाग पहिला**--१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद-लेखांक १।२।३।४. मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्ताचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावतारांची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनातून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**--१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकन्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नी संबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचे प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गतिरहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

**२० नवविधाभक्ति** ।४.

**२१ सार्थ परिपाठ व चांगदेव पासष्टी** ।५.

**२२ श्रीतुकारामचरितामृत**:--अभंगांत गाइलेलें तुकोबांचें चरित्र, नित्यपाठास उत्तम. ।५.

**२३ निरंजनमाधवांची कविता** ( भाग १ ) रु. १.

**पत्ता:--व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.**

'हनुमान प्रेस,' ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर,

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीप**:- ( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

२. **संतचरित्रमाला**:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्र**:—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायण**:—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरी**:- ( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे किं ०८. व्ही. पी. नें ०११.

७. **नवविधाभक्ति**:—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४.

८. **निरंजनमाधवांची कविता**:—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र**:—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु १०८.

१०. **भक्तिमणिमाला**:—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु REG, No, B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११ **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३ **मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८.

१४ **मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

१५ **पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

१६ **श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे श्रीविठ्ठलाचा, पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

१७ **श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८ **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९ **मुक्तेश्वर**--( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२० **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): - किं. ०४.

२१ **सार्थ श्रीदासबोध**—किं. रु. ४. व्ही. पी. नें, ४०१०.

२२ **सार्थ मनोबोध**:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२३ **समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे**:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४ **मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन )**:--किं. रु. २.

२५ **श्री एकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें आवृत्ति तिसरी )--किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९ | माघ १८४७ | नवें वर्ष ६ वें |
| मास ६ | फेब्रुवारी १९२६ | अंक २ रा. |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.


**वार्षिक वर्गणी रु. ३ व व्हीपीनें रु ३=३**


मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें पेठ सदाशिव घ. नं. २००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.




| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... ... | १ |
| २ श्रुतिमाउली व अन्नसंतर्पण ... ... ... ... | २ |
| ३ सूक्तिरत्नावली ... ... ... ... ... | ३--१० |
| ४ पंचम पुरुषार्थ ... ... ... ... ... | १०--१९ |
| ५ महाराष्ट्रास समर्थांचा उपदेश ... ... ... ... | १९--२० |
| ६ ज्ञानेश्वरीटीका ... ... ... ... ... | २०--२४ |
| ७ श्रीकृष्णदयार्णव ... ... ... ... ... | २४--३० |
| ८ शिवदिनकेसरी ... ... ... ... ... | ३०--३७ |
| ९ वर्णभेदासंबंधीं महात्माजींचे मननीय विचार ... ... | ३७--३८ |
| १० श्री गोंदवलेकर महाराजांचे अभंग ... ... ... | ३८--४० |



## मोरोपंत–चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य झाला आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोड्या आहेत. पृ. सं. ६२५. किं. रु. २.

पत्ताः—व्यवस्थापक ‘ मुमुक्षु ’ पुणें.



## अभंग.

१

आडलिया जना होसी साहकारी । आंधळिया करीं काठी तूंचि ॥१॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥२॥
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्ही आपंगिला नानापरी ॥ ३ ॥
आपुलेंचि अंग तुह्मी वोढविलें । त्याचें निवारिलें महादुःख ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननिये ॥ ५ ॥

२

कळेल हें तस गाईन मी तुज । जनासवें काय काज माझें ॥ १ ॥
करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥२॥
होईन निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करोनीया ॥ ३ ॥
काय करूं कळा युक्ति या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिकां ॥४॥
तुका म्हणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥ ५ ॥

३

तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥
आजुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहतोसी ॥ २ ॥
आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तानभूक ॥ ३ ॥
प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवे वो विठाई वोरसोनी ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें कोण हरी दुःख । तुजवीण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

४

गरुडाचे पायीं । ठेवी वेळोवेळां डोई ॥ १ ॥
वेगें आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरी ॥ २ ॥
पाय लक्षुमीया हातीं । तिसीं यावें काकुळती ॥ ३ ॥
तुका म्हणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ ४ ॥

# श्रुतिमाउली व अन्नसंतर्पण.

हिंदुधर्माच्या आचारधर्मांपैकीं अन्नसंतर्पण हें एक प्रधान अंग आहे. एक-नाथ महाराजांसारखे महात्मे व अहल्याबाईसारखे धर्मशील राज्यकर्ते यांच्या चारित्र्याला त्यामुळें शोभा आली आहे. याला श्रुतीचा आधार आहे.

**१ अन्नं ब्रह्मेति व्यजानात्। अन्नाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। अन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति ॥**

तो भृगु अन्नच ब्रह्म आहे असा निश्चय करिता झाला. अन्नापासून हीं भूतें उत्पन्न होतात, अन्नाच्या योगें जीवंत राहतात व लीन होतांना अन्नांतच सर्वथा प्रविष्ट होतात.

**२ अन्नं न निंद्यात्।** अन्नाची निंदा करूं नये, हें उपासकानें व्रत पाळलें पाहिजे.

**३ अन्नं न परिचक्षीत।** कोणी कोणाला अन्न देत असला तर त्याचें निवारण करूं नये, किंवा पानांत वाढलेलें अन्न टाकून उठूं नये.

**४ अन्नं बहु कुर्वीत।** अतिथींना देण्यासाठीं पुष्कळ अन्न संपादन करावें.

**५ न कंचन वसतौ प्रत्याचक्षीत।** रात्रीच्या विसाव्याला कोणी अतिथि किंवा पांथस्थ आल्यास त्याला नाहीं ह्मणून लावून देऊं नये.

तैत्तिरीयोपनिषदाचा तिसरा अध्याय ' भृगुवल्ली ' नामक प्रसिद्ध आहे. त्यांतून अन्नदानापुरती पंचसूत्री काढून वर दिली आहे. ही श्रुतीची आज्ञा आहे. वस्त्रपात्र विचार करून द्यावें पण अन्नदान सर्वांसच द्यावें. अन्नदानानें जीवाचा संतोष होतो.

**अन्नं दानात्परं दानं—विद्यादानमतः परम्।**
**अन्नेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं च विद्यया ॥**

अन्नदानाहून विद्यादानाची महती ह्या सुभाषितांत अधिक सांगितली असली तरी अन्नदान थोरच आहे. जीवांस अत्यवश्य, सद्यःसंतोषदायी व उभयतांना कल्याणप्रद असें अन्नदान आहे. अन्नार्थी कोणताही जीव विन्मुख जाऊं नये, गेल्यास घराण्याचा पुण्यक्षय होतो. अन्न संतोषपूर्वक, प्रसन्नतेनें, मृदुभाषण करून याचक ही नारायणाची मूर्ति आहे अशा सद्भावानें कोणा-सही द्यावें.

# सूक्तिरत्नावलि.

( सूक्तिसुधातरंगिणी ह्या रा. ओक यांच्या ग्रंथाची ओळख मागील अंकीं वाचकांस करून दिली आहेच; आज त्यांतील आणखी कांहीं उत्कृष्ट वेंचे आमच्या वाचकांस अर्पण करीत आहोंत. मात्र अवश्य तेथें त्यांचें मराठी भाषांतर आम्हीं दिलें आहे.)

१

He lives who dies to win a lasting name (Drumond).

अधिगन्तुमनश्वरं यशो म्रियते यो मनुजः स जीवति ।

शाश्वत यश ( नांव ) मिळविण्यासाठीं जो मरतो तो मृत नसून जिवंतच आहे !

२

असंगाशीं संग प्राणाशीं गांठ.

असंगार्हैः संगो नियतमसुभंगाय भवति ।

३

Devotion in distress is born, but vanishes in happiness. (Dryden).

आपद्युत्पद्यते भक्तिस्तिरोभवति संपदि ।

आपत्तींत भक्तीचा प्रादुर्भाव होतो व संपत्तींत तिरोभाव होतो.

४

Men are born with two eyes but with one tongue, in order that they should see twice as much as they say (Colton).

ईक्षणं द्विगुणं भूयाद्भाषणस्येति वेधसा ।
द्वे चक्षुषी मनुष्याणां जिव्हा त्वेकैव निर्मिता ॥

देवानें मनुष्याला दोन डोळे दिले असून जिव्हा मात्र एकच दिली आहे यांत त्याचा हेतु असा दिसतो कीं त्यानें जितकें बोलावें त्याच्या दुप्पट ( तरी ) पहावें म्ह० अवलोकन करावें !

५

One murder made a villain, millions a hiro

( St. Portesus ).

एकं निघ्नन् विन्दते घातकाख्यां
कोटीर्निघ्नन् वीरतां याति लोके ।

जो एखाद्या मनुष्याचा खून करितो त्याला खुनी म्ह० घातक म्हणतात, पण तेच जर कां त्याचे हातून लाखों लोक मारले गेले कीं लगेच तो 'वीर' म्हणून गाजतो व त्याचीं पुराणें होतात!

६

Not easily do those attain to distinction whose abilities are cramped by domestic poverty. (Juvenal).

कुटुंबचिंताकुलमानसानां
प्रायः प्रतिष्ठा सुलभा न पुंसाम्।

७

क्रोध मारामारींत परिणाम पावतो; विनोद हास्यांत; शोक अश्रुपातांत व प्रेम चुंबनांत परिणत होतें!

Anger manifests itself in blows, amusement in smiles, sorrow in tears and love in kisses. (C.F. Goss).

कोपःपरुषया वाचा शोको नयनवारिणा!
स्मितैः प्रकटतां याति केलिः प्रीतिश्च चुंबनैः॥

८

विद्वान् लोक प्रायः दरिद्री असतात व पोट बांधून दारिद्र्यांत त्यांना जन्म काढावा लागतो.

Poverty and hunger have many barned disciples.
( German Proverb )

क्षुधे देवि नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दरिद्रते।
उभयोरपि वां शिष्या विद्वांसो बहवो भुवि॥

९

श्रद्धारूप महासागराच्या तळाशीं असलेलें ज्ञानरूप रत्न एकाद्याच धन्य पुरुषाच्या हातीं लागतें.

At the bottom of the faith-sea lies the pearl of knowledge; happy the diver that finds it. (Bodenstedt).

गुरुभक्तिपयोनिधेरगाधे
तल आस्ते खलु मौक्तिकं निगूढम्।
उपलिप्सुरिदं च संविदाख्यं
विरलो मज्जति कोऽपि तत्र धन्यः॥

१०

सुधारक जनरूढीला राक्षसी म्हणतात, पण रूढी उगाच पडत नसतात. त्यांच्या मूळाशीं खोल विचार असतो.

A deep meaning often lies in old customs. (Schiller).

गूढार्थाः प्रायशः सन्ति पुराणा जनरूढयः ।

११

विचार पुष्कळ करावा, त्यापेक्षां कमी बोलावें व त्याहीपेक्षां कमी लिहावें.

Think much, speak little and write less.

( French Proverb ).

चिंतय चित्तेऽनल्पं वद वाचाल्पं लिखाल्पतरमेव ।

१२

It is a great mistake for people to think themselves more than they are, and value themselves less than they are worth. ( Goethe ).

नात्मानं बहु मन्येत नावमन्येत वा तथा ।

आपली योग्यता आहे त्यापेक्षा ज्यास्ती समजूं नये किंवा कमीही समजूं नये—आहे ती ओळखून असावें.

१३

जें कानावर पडेल तें ऐकत जा पण तें सर्व खरेंच आहे असें समजून चालूं नकोस.

Let the ear despise nothing, nor yet be too ready to belive. ( Phaed ).

नानाकर्ण्यं कर्णयुग्मेन किंचित्—
न श्रद्धेयं सर्वमाकर्णितं तु ।

१४

देव आपल्या शुद्धीसाठीं संकटें आणीत असतो.

God brings men into deep waters not to drown them, but to cleanse them. ( Aughry ).

निपातयति देवोऽस्मानगाधे त्रिपदंबुधौ ।
न निमज्जयितुं मन्ये प्रमार्जयितुमेव तु ॥

१५

Difficulties are meant to rouse, not to discourage ( Channing ).

प्रोत्साहनाय धीराणां धैर्यध्वंसाय नो विपद् ।

१६

फळांनीं डवरलेल्या वृक्षांवरच लोक दगड फेकतात !

People throw stones only at trees which have fruits on them. ( English Proverb ).

फलभृत्स्वेव वृक्षेषु क्षिप्यन्त उत्पला जनैः ।

१७

Oh God ! teach me to feel another's woe, to hide the fault I see. ( Pope ).

भवतु स्वसुखानपेक्षया
परदुःखव्यथितं मनो मम ।
भवतु स्वगुणाप्रकाशने
परदोषावरणेच पाटवम् ॥

पर दुःखानें म्यां दुःखित व्हावें, ( स्वगुण लपवून ) परदोषावर आवरण घालण्याचें सौजन्य द्यावें अशी देवाची प्रार्थना आहे.

१८

As a field, however fertile, can field no fruit without culture, so neither can the mind of man without education. ( Seneca ).

भूरुर्वरापि फलदा न भवत्यकृष्टा
धीश्चापि नो फलवती यदि नो विनीता ।

जमीन सुपीक असली तरी तिची मशागत केल्यांविचून फलद होत नाहीं त्याप्रमाणें बुद्धि चांगली असली तरी शिक्षणसंस्कारावांचून ज्ञानसंपन्नता येत नाहीं—असें सेनेका म्हणतो. श्री समर्थ रामदासस्वामींनीं (दासबोध द.५स.३) हा दृष्टांत पूर्ण करून फारच खुलविला आहे. सद्गुरु, सच्छिष्य, अध्यात्मश्रवण व साधनाभ्यास या चौघांची ज्ञानसिद्धयर्थ गरज आहे, कशी ? तर उत्तम कण,उत्तम भूमि, पर्जन्यवृष्टि व मशागत या चौकडीची पिकास गरज आहे तशी !

सुभूमी आणि उत्तम कण । उगवेना पर्जन्येंवीण ।
तसें अध्यात्मनिरूपण । नस्तां होय ॥ ८ ॥
सेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेवीण गेलें ।
साधनेवीण तैसें जालें । साधकासी ॥ ९ ॥

१९

मधमाशा मोठया श्रमानें मध गोळा करितात, मोहळ तयार करितात. माशा नाहींत तर मध नाहीं, कष्ट नाहींत तर धनलाभही नाहीं !

No bees, no honey
No work, no money !

ही इंग्रजी भाषेंत एक सुंदर म्हण आहे.

मधुपाभावे नहि मधु लभ्यं । उद्यमविरहे द्युम्नमलभ्यम् । (द्युम्न म्ह० सुवर्ण, धन.) समर्थांची वाणी प्रसिद्धच आहे.

कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं ।
केल्यावीण होत नाहीं । साध्य काहीं ।
जेंहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून गेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ ( दास० १८–७)

२०

Where God helps, nought harms.

मारकं किंभवेत्तस्य तारके परमेश्वरे ? ।
देव तारी तया कोण मारी ?

२१

आपण कोणी मोठे आहोंत अशा डौलानें मनुष्य वागूं लागला कीं आंत पोंचट आहे म्हणून समजावें.

Airs of importance are the credentials of impotence (Lavater).

मुद्रा गौरवपिशुना लाघवमन्तर्गतं प्रकाशयति.

२२

We always take credit for the good and attribute the bad to fortune. (La. Fountain.)

शुभागमे स्वं नर उद्यमं स्तुते
विधिं विनिन्दत्यशुभे ह्युपस्थिते ।

' चांगलें झालें तर माझ्या अकलेमुळें व अशुभ झालें तर दैव प्रतिकूळ !' मनुष्यस्वभावच असा आहे !!

२३

नारीआको निंदो नये नारी नरका खान ।
जिस खानमे पैदा हुवे भीष्म राम हनुमान् ॥
रामभीष्मादयो यस्यामुत्पन्ना लोकपावनाः ।
नररत्नखनिं नारीजातिं तां मैव निंदत ॥

श्रीसमर्थांनीं नारीजातीची निंदा म्हणजे मातेची निंदा करणाऱ्यांचे चांगलेच कान उपटले आहेत:—

मुढा वोंगळा वोंगळीं जन्मलासी
तुझी जनन्नी ते तुझे कष्ट सोसी ।

जनीं पाळिती सर्व नारी नरांला
तया निंदिती शुद्धि नाहीं खरांला ! ॥ १ ॥
मळीं लोळतां घोळतां कष्टलासी
किती हागसी मूतसी वोकिलासी ।
खतें खांडकें दुःख ऊदंड जालें
बहुतां प्रकारें तुला वाढवीलें ॥ २ ॥
बहु जन्मनीनें तुझे कष्ट केले
बरें वोखटें सर्व साहोनि नेलें ।
मनामाजि मागील कां आठवेना
देहे पुष्ट हा व्यर्थ तूझा झिजेना ॥ ३ ॥

२४

प्रेम विकतां देतां येत नाहीं व विकत घेतांही येत नाहीं, प्रेम दिल्यानेंच प्रेम मिळतें.

Love can neither be bought nor sold, its only price is love. (Proverb).

रागस्य मूल्यं किल राग एव
धनेन नायं क्रयविक्रयार्हः ।

तुकोबारायांनीं सांगितलें आहेः—

प्रेम नये देतां बोलतां दावितां
अनुभव चित्ता चित्त जाणे ॥

२५

श्रद्धाविहीन विद्वान् व श्रद्धावंत मूढ या दोघांचाही मला कंटाळा आहे असें महम्मद म्हणत असे !

Two things I abhor: the learned in his infidelities and the fool in his devotions.

विद्वान् श्रद्धाविहीनो वा श्रद्धावान् मूर्ख एव वा ।
द्वावपीमौ गर्हणीयाविति माहम्मदोऽब्रवीत् ॥

२६

The religion of Christ is peace and good-will; the religion of Christendon is war and ill-will. (Landor).

शांति व सद्भाव हा ख्रिस्ताचा धर्म खरा, पण युद्ध आणि वैर हा ख्रिस्तधर्मानुयांनीं धर्म बनविला आहे !

शांति सद्भावनाचेति क्रिस्तोक्तो धर्म उत्तमः ।
युद्धे वैरेच निरताः क्रिस्तधर्मानुयायिनः ॥

२७

शूर पुरुषच क्षमाशील असतात.

The brave only know how to forgive. ( Sterne ).

क्षमासारा हि साधवः ( श्रीभागवत ).

२८

ईश्वराचा संकल्प सगुणसाकारपणास आला—तें हें विश्व !

The universe is the realised thought of God. ( Carlyle ).

संकल्पो व्यक्तिमापन्नो विधातुर्विश्वमुच्यते ।

२९

दुर्गुणांचा द्वेष करावा पण दुर्गुणी किंवा व्यसनी मनुष्यांसी शांतिधर्मानेंच वागावें.

Maintain peace with men, war with their vices. ( English Proverb ).

संधेया मानवाः सर्वे द्वेष्यास्तेषां तु दुर्गुणाः ।

३०

सामर्थ्यासमवेतच स्वातंत्र्य राहत असतें.

Freedom exists only with power. ( Schiller ).

सामर्थ्येनैव संवासः स्वातंत्र्यस्य विराजते ।

३१

Trust him little who praises all, him less who censures all, and him least who is indifferent to all. ( Lavater ).

सर्वानपि स्तुवन्नल्पं निंदन्नल्पतरं ततः ।
उदासीनस्त्वल्पतमं नरो विश्वासमर्हति ॥

३२

Man is the sum-total of all animals. ( Oken ).

सर्वेषामपि सत्त्वानां सारभूतो हि मानवः ।

३३

स्त्रियांमधील स्त्रीत्व हीच त्यांची मुख्य शोभा आहे असें उदार मुत्सद्दी ग्लॅडस्टन याचें म्हणणें आहे.

**To be womanly is the greatest charm of woman.**
( Gladstone. ).

स्त्रीत्वे स्त्रीणां कापि शोभा चकास्ति ।

३४

स्वातंत्र्य हें राष्ट्राचें शाश्वत यौवन आहे.

**Freedom is the eternal youth of nations.**
( Gen. Foy ).

स्वातंत्र्यं नाम राष्ट्राणां शाश्वतं यौवनं स्मृतम् ।

३५

स्वातंत्र्य वेगळें आणि स्वेच्छाचार किंवा अनर्गळता वेगळी ।
Liberty without wisdom is license.
स्वातंत्र्यं प्रज्ञयाहीनं केवलं स्वैरचारिता ।

---

# पंचम पुरुषार्थ.

**( धुंडिराज रामचंद्र महाराज, मु० पंढरपूर [1].**

चहूं पुरुषार्थांते त्यागिती। चारी मुक्ती उपेक्षिती। पंचम पुरुषार्थाची भाक्ति। भजपढियन्ती उद्धवा ॥ १ ॥ ( एकनाथ ).

चहूं पुरुषार्थां शिरीं । भाक्ति जैसी ॥ १ ॥ ( ज्ञानेश्वरी १८ ).

" भक्तीच्या पोटांतून निघालेलें ज्ञान हेंही अखेर भक्तींतच विलीन झाल्यास तीही एक आनंदाची अवस्था आहे, हें सूक्ष्म विचारांतीं तुमचेही लक्षांत येईल "—लो० टिळक ( आठवणी खं० २ पृ. ४३३).

१ अद्वैतवेदांतप्रक्रियेमध्यें धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चारच पुरुषार्थ मानले आहेत. त्यांतही मोक्ष हाच सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण, " न स पुनरावर्तते " इ० इ० श्रुतींवरून त्यासच नित्यता येते, व इतरांना " तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते" " एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते " इ० प्रमाणांवरून व अनुभवावरून साहाजिकच अनित्यता आहे. मानवी जीवांचें ध्येय किंवा साध्यसर्वस्वही हेंच आहे. मानवांच्या शरीरांत परमेश्वरानें जी एक

विशिष्ट पद्धतीची रचना केली आहे, तीही एतन्मूलकच आहे. श्रीमद्भागवतामध्येः--

॥ बुद्धींद्रियमनःप्राणान्जनानामसृजत्प्रभुः । मात्रार्थं च भवार्थं च आत्मनेऽकल्पनाय च ॥ १ ॥ असेंच सांगितलें आहे. श्रीएकनाथ महाराजही हेंच तत्व विशद करून सांगतातः-- दिलीं इंद्रियें हातपाय कान । डोळे मुख बोलाया वचन । जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥ मनुष्यदेहींचेनिज्ञानें । सच्चिदानंदपदवी घेणें । एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दिधला ॥ (एकनाथ).

२ जीव सदैव निरतिशय आनंदाची इच्छा करीत असतो, कारण तो मूळचा आनंदरूप आहे; परंतु भ्रांतीनें सत्यसुखाच्या राजमार्गास विसरून नाशिवंत वैषयिक आनंदाकरितां शुभाशुभकर्मे करीत जन्ममरणाच्या भोंवऱ्यामध्यें सुखदुःख, शीत उष्ण, इ. द्वंद्वांच्या लाटेंत सांपडून दुःख भोगीत असतो. अशा या दुःखी जीवाच्या पूर्वजन्मींच्या पुण्यकर्मानें कदाचित् एखाद्या अधिकारसंपन्न महात्म्याची गांठ पडली म्हणजे ते त्यास "तत्वमसि" इ. महावाक्यांचा बोध कारितात, व तो कृतार्थ होतो, निरतिशय सुखप्राप्ती त्यास होते, इतकेंच नव्हे तर तो सुखस्वरूपच होऊन जातो. व त्यास हें नश्वर जग सुद्धां "होइल अंगे देव झाला जो आपण । तयासी हे जन ब्रह्मरूप" किंवा "आदौब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात्" या न्यायानें आनंदमय भासूं लागतें. पुन्हां त्यास कर्मोपासना इत्यादि साधनांची मुळींच अवश्यकता राहत नाहीं असा वेदांतसिद्धांत आहे.

"नैवतस्यकृतेनार्थोनाकृतेनेहकश्चन" "आत्मन्येवच संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते" "तृप्ती झालिया जैसी । साधनें सरती औपसी । देखे आत्मतुष्टी तैसी । कर्मेंनाहीं ॥" (ज्ञाने०).

"कर्तव्यं मे न विद्यते किंचित्" "काम नाहीं काम नाहीं । झालों प हीरिकामा ॥ १ ॥" (रामदास).

"म्हणूनि ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरले देखा" ॥ इ. इ. शेंकडों वचनें त्याच्या नैष्कर्म्यतेचीच बोधक आहेत. कारण, नदीच्या पैलतीराला पोहोंचल्यानंतर नावेची अवश्यकता नसते, किंवा पोट भरल्यानंतर पुन्हां भोजनाची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणें ज्ञानप्राप्तीनंतर कर्मोपासनादि साधनांची गरज रहात नाहीं. कारणः--

जंववरी अर्जुना । तो बोध भेटेना मना । तंवाचि या साधना । भजावें लागे ॥ (ज्ञानेश्वरी).

सारांश जीवाचें ज्ञानानें जीवत्व नाहींसें होऊन तो पूर्णावस्थेस पोहोंचल्यानंतर त्यास पुन्हां भक्ति करण्याची अवश्यकता नाहीं, कारण ती साधनस्वरूप आहे.

" तथा भक्तिं विना ज्ञानं नास्त्युपायशतैरपि. " " जरी मिया चाडतरी भक्ति । न विसंबेगा ॥ (ज्ञा० ).

यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवे तथागुरौ । तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥ ( उपनिषद्. )

। तरी मी एकेचिपरी । आंतुडे गा अवधारी । जै भक्ति येऊनि वरी । चित्तातें बा ॥ ( ज्ञा. ११ ).

३ परंतु भागवतधर्मीयांची पारमार्थिक प्रक्रिया याहून किंचित भिन्न दिसते व ती सत्यही आहे. तो फरक जीवेशएकता किंवा अन्य कोणत्याही बाबतींत नसून फक्त ज्ञानोत्तरभक्ति याच एका विषयांत आहे. त्यांच्या मतें ज्ञानोत्तरकालींही अशा ज्ञानीपुरुषांकडून प्रेमलक्षणाभक्ति संभवते, व अशा अनन्यभक्तीसच ते ' मुक्तीवरील भक्ति ' किंवा ' पंचम पुरुषार्थ ' म्हणतात. आतां ज्ञान झाल्यानंतर भक्ति कशी संभवते व ज्ञानी पुरुषासही भक्ति करणें कसें अवश्यक आहे, ह्याच विषयाचा विचार प्रस्तुत लेखांत करावयाचा आहे. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर व्यास, वासिष्ठ, वाल्मीकि, शुक इ० सुप्रसिद्ध तत्वज्ञानीसुद्धां भगवद्गुणवर्णनाविषयीं अनुरक्त असत हें त्यांच्या वाङ्मयावरून स्पष्ट दिसतें मुक्तमंडळीमूर्धन्य शुकयोगींद्राचें भगवद्गुणसंकीर्तनाकरितां राजा परीक्षितीजवळ गमन हें प्रसिद्धच आहे. नारदांची प्रेमलक्षणाभक्ति ( नामसंकीर्तनाविषयीं उत्कट प्रीति ) जगजाहीर आहे. शांडिल्यांच्या भक्तिसूत्रांवरून त्यांच्या अद्वैत भक्तीची साक्ष पटते. त्यांची भक्ति ही किंमूलक असते [ कारण त्यांच्या अंतःकरणांत कोणतीही वासना नसते ] ह्याचा विचार श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या नृसिंहतापिनी उपनिषद्भाष्यांतील " यं सर्वे देवा नमन्ति मुमुक्षो ब्रह्मवादिनश्च " या मंत्रावरील आपल्या भाष्यांत केला आहे. या मंत्रातील ' ब्रह्मवादिनः ' या पदावर त्यांनीं " मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजन्ते " असें भाष्य लिहिलें आहे.

मुक्ताः म्ह० जीवन्मुक्त सुद्धा लीलेनें ( बद्ध जीवांप्रमाणें नव्हे ) विग्रह म्ह० भगवंताची चतुर्भुज पीतांबरधारी शामसुंदर मूर्ती ती मनोमयी किंवा शिला धात्वादिमयी करून ते भजन करितात. ह्या त्यांच्या साकारोपासनेंत किंचितही न्यूनता किंवा परिच्छिन्नता नसते. कारण " अवघे परब्रह्म रूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ? ॥ " किंवा " विग्रहंकृत्वा " म्ह० स्वतःच सालोक्यादि मुक्तींचा अनादर करून " घेईन जन्मांतरे । हेंचि करा-

वया खरें" अशी प्रतिज्ञा करून पुनः पुनः जन्म घेऊन भक्ति करितात. महाभक्त श्रीधर म्हणतात "त्वत्कथामृत पाथोधौ विहरन्तो महामुदा । कुर्वन्ति कृतिनः केचिच्चतुर्वर्गं तृणोपमम् ॥ १ ॥

४ आतां " नैवतस्यकृतेनार्थः " किंवा " तस्यकार्यं न विद्यते " इ० इ० निषेधपर वाक्यांनीं जो कर्माचा निषेध सांगितला आहे, त्याचा विचार करूं. कर्म हे तीन प्रकारचे ( १ ) दृष्टार्थक [ २ ] अदृष्टार्थक ( ३ ) दृष्टादृष्टार्थक. दृष्टार्थ म्ह० ज्या कर्माचें फल फक्त इहलोकांतच उपभोगण्यास मिळतें तें, व अदृष्टार्थक म्ह० ज्या कर्माचें फल परलोकीं गेल्यानंतरच मिळतें तें, व उभयलोकींही उपयोगीं पडणारे तें दृष्टादृष्टार्थक. अदृष्टार्थक कर्माविषयीं ज्ञानी पुरुषाची प्रवृत्ति नसते. " नैव तस्यकृतेनार्थः " इ० वाक्यें अदृष्टार्थक कर्म निषेधबोधक आहेत. दृष्टार्थक कर्माविषयीं त्यांचा निषेध नाहीं, कारण भोजन, उदक प्राशन, निद्रा इ० इ० अदृष्टार्थक कर्माविषयीं ज्ञानी पुरुषही प्रवृत्त असतोच. कीर्तन भजनादिक करणाऱ्या महात्म्यांना अष्टसात्विकभाव म्ह०

स्तंभःस्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौसात्विका मताः ॥ इ० उत्पन्न होऊन ब्रह्मानंदसुखापेक्षांही अधिक आनंद वाटतो. कारण जी ज्याची सहज वृत्ति असते, त्यांत त्यास विशेष आनंद वाटत नसतो. तेव्हां ज्ञानी पुरुषांची अपरोक्षज्ञान ही सहजस्थिति असते. त्यांना आम्ही बद्ध होतो म्हणून दुःखी होतो, व ही नवीन मुक्ती आम्हांस मिळाली व त्यामुळें आम्ही आनंदी झालों असें वाटत नसते. त्यांत त्यांना वैशिष्ट्य वाटत नाहीं म्हणूनच अवीट अशा भक्तीचा ते स्वीकार करितात. व त्यांची ही भक्ती शुद्ध व निर्हेतुक अशी असते. ॥ आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे । कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥ १ ॥ असें श्रीमद्भागवतामध्यें स्पष्ट सांगितलें आहे, " निवृत्ततर्षैरुपगीयमानात् "

। सालोक्य सार्ष्टिसामीप्यसारूप्यैकत्वमप्युत । दीयमानं न गृण्हन्ति विना मत्सेवनं जनाः ॥ १ ॥ कारण मोक्षाचें त्यांना अवघड वाटत नाहीं. श्रीतुकाराममहाराज म्हणतात कीं:—

मोक्षाचे तो आम्हां नाहीं अवघड । तो असे उघड गाठोडीस ॥ १ ॥
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू आइते न केले हो ॥ १ ॥

" आम्ही वैकुंठवासी " मागलिया जन्मा मुक्त झालों "" तुका आकाशाएवढा " अशी त्यांची प्रतिज्ञा असते. त्यांना आपल्या सहज स्थितीपेक्षां भक्तिप्रेमसुखांतच मौज वाटते, म्हणून ते श्रीभगवंताच्या गुणवर्णनाविषयीं अतिशय अनुरक्त असतात.

५ श्रीमद्भगवद्गीतेमध्यें सातव्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास चतुर्विध भक्तांचीं लक्षणें सांगितलीं, त्यांत त्यांनीं ज्ञानी भक्ताचाही अंतर्भाव करून

तोच मला अत्यंत प्रिय आहे, असें सांगितलें आहे. " प्रियोहि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः " यावर श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात—

जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळें नुरें । तैंवि भक्त पैज नसरे । जरी ऐक्या आला ।। म्हणोनि भक्तांमाजि रावो । ज्ञानिया तोचि ।।

उपासना ही उपास्यज्ञानाधीन असते. उपास्यदेवतेचें यथार्थ ज्ञान ज्ञानी भक्तांशिवाय इतरांना होणें शक्य नाहीं, म्हणून खरी भक्ती त्याजकडूनच होते.

६ आणखीहि एका कारणानें शास्त्रकारांनीं ज्ञानी पुरुषास भक्तीची कशी आवश्यकता आहे हें सांगितलें आहे.

यावज्जीवं त्रयोवंद्याः वेदांतो गुरुरीश्वरः ।
आदौ ज्ञानाप्तये पश्चात्कृतघ्नत्व निवृत्तये ।।

व्यवहारांत सुद्धां असा नियम आहे कीं एखाद्या गरीब मनुष्यांवर जर कोणी श्रीमंत मनुष्य कांहीं उपकार करून त्यास उन्नत अवस्थेस आणील तर त्या गरीबानें जन्मभर त्याचे उपकार मानून त्याच्या सेवेंत रहाणें योग्य आहे, नाहीं तर तो कृतघ्न ठरून लोकनिंदेस पात्र होईल. तसेंच ज्या देवभक्तांच्या कृपेनें साधकास निरतिशय सुखाची अखंड प्राप्ती होते, त्या देव भक्तांची जर तो सेवा करणार नाहीं, तर संतवृंदांत तो कृतघ्न ठरून तिरस्कारास पात्र होईल ! " यावज्जीवं त्रयो वंद्याः " याप्रमाणाचें हेंच तात्पर्य आहे कीं आरंभीं ज्ञानप्राप्त्यर्थ व नंतर कृतघ्नतानिवृत्तीकरितां शरीर असेपर्यंत भक्तीची अवश्यकता आहे. भावना ही अद्वैतमयच असून क्रिया ही द्वैतरूप असावी लागते, असें श्रीमच्छंकराचार्यंही आपल्या तत्वोपदेश नामक ग्रंथांत म्हणतात.

भावाद्वैतं सदा कुर्यात्क्रियाद्वैतं न कर्हिचित् ।
अद्वैतं त्रिषु लोकेषु नाद्वैतं गुरुणासह ।। ८७ ।।

७ श्रीतुकाराम महाराजांचा अनुभव जरी " तुजमज नाहीं भेद " " देव आणि भक्त दुजा नाहीं विचार " असा होता तरी पण याच एका कारणास्तव त्यांस "तूं स्वामी मी सेवक" असे उद्गार काढावे लागले. श्रीमद्भागवतामध्यें ब्रह्मदेव भगवंताची स्तुती करीत असतां म्हणतो कीं ' महाराज ! जे तुमच्या भक्तीचा अनादर करून आम्ही मुक्त आहों असें मानितात, त्यांना कष्टानें जरी परम पदाची प्राप्ति झाली तरी त्यांचा तेथून अधःपात होतो; आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः पतन्त्यधोऽनादतयुष्मदंघ्रयः ।।

श्रीमधुसूदन सरस्वतींनीं या विषयाचा योग्य रीतीनें विचार आपल्या गीतेच्या टीकेंत आरंभींच केला आहे. त्यांनीं आरंभीं परमार्थ मार्गांतील १९ भूमिका सांगून प्रत्येक भूमिकेवर आरूढ होण्याकरितां भक्तीची अवश्यकता आहेच असें सांगितलें आहे.

पूर्वभूमौ कृता भक्तिरुत्तरां भूमिमानयेत ।
अन्यथा विघ्नबाहुल्यात्फलसिद्धिः सुदुर्लभा ॥ १ ॥
एवं प्राग्भूमिसिद्धावप्युत्तरोत्तरभूमये ।
विधेया भगवद्भक्तिस्तां विना सा न सिद्ध्यति ॥ २ ॥

साधक हा एका भूमिकेवर आरूढ झाला म्हणजे पुढील भूमिकारोहणार्थ त्यास भक्तिमातेलाच शरण जावें लागतें. नाहीं तर त्या मार्गांत त्यास अनेक विघ्नें उपस्थित होतात, व फलप्राप्तीही दुर्लभ होते. श्रीतुकाराम महाराजही सांगतातः—

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति । प्रगटे हृदयींची मूर्ती । भावशुद्धी जाणोनिया ॥ अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ १ ॥

८ आतां अद्वेष्टृत्व, मित्रत्व, करुणा, सत्य, अहिंसा इ० साधकावस्थेमध्यें महत्प्रयासानें प्राप्त करून घेतलेले हे गुण जीवन्मुक्त अवस्थेमध्येंही जसे लक्षणरूपानें त्या ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं असतात;

उत्पन्नात्मावबोधस्य ह्यद्वेष्टृत्वादयो गुणाः । अयत्नतो भवन्त्यस्य न तु साधनरूपिणः ॥ १ ॥

त्याचप्रमाणें भक्तीही लक्षणरूपानें त्याचे ठिकाणीं असते. " अद्वेष्टा सर्वभूतानां " " संतुष्टः सततं " " अनपेक्षः शुचिर्दक्ष " " समः शत्रौ च मित्रे च" इ० गुण जसे ह्या स्वाभाविक रीतीनेंच त्याच्या हृदयामध्यें वास्तव्य करीत असतात तशीच " श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं" इ० नवविधा भक्तीही स्वाभाविकच असते.

जीवन्मुक्तिदशायां तु न भक्तेः फलकल्पना । अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ॥

९ आणखीही एका दृष्टीनें या विषयाचा विचार होणें अवश्य आहे. तो असा कीं, लोक ( जन ) हा गतानुगतिक म्ह० श्रेष्ठ जसें आचरण करितील तसें आचरणारा आहे असें श्रीकृष्ण भगवान्ही सांगतातः—

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

जगांत सार्वभौम राजापेक्षांही तत्वज्ञानी हे श्रेष्ठ कोटींत गणले जातात. कारण मोठमोठे राजे सुद्धां अशा महात्म्यांना मान देत असत हें इतिहासप्रसिद्ध आहे. करितां असे महात्मे हे जर वाममार्गानें वागूं लागले तर अज्ञजीवांची प्रवृत्ती साहजिक त्याच मार्गाकडे वळणें शक्य आहे. म्हणून बहुजनसमाजाकरितां तरी तत्वज्ञानी पुरुषानें आपलें आचरण कर्मोपासनादिकांनीं युक्त असेंच ठेवणें अवश्य आहे. त्यानें लोकसंग्रहाकरितां तरी चांगलें कर्म केलेंच पाहिजे, असा श्रीकृष्ण भगवंताचा साग्रह सिद्धांत आहे.

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकिर्षुर्लोकसंग्रहम् ॥ १ ॥
मार्गाधारे वर्तावें । विश्व हें मोहरे लावावें ।
अलौकिक नोहावें । लोकांप्रती ॥ १ ॥

१० निषिद्ध आचरण करणाऱ्या तत्वज्ञान्याचा खरपूस समाचार श्रीमद्विद्यारण्यांनीं आपल्या पंचदशी नामक ग्रंथांत एके ठिकाणीं घेतला आहेः—

तत्वं बुध्वापि कामादीन्निःशेषं न जहासि चेत् ।
यथेष्टाचरणं ते स्यात्कर्मशास्त्रातिलंघिनः ॥ १ ॥

भावार्थ—तत्वज्ञान झाल्यानंतरही कामादि विकारांचा निःशेष त्याग करणार नाहींस तर विधिनिषेधरूप शास्त्राचें उल्लंघन करणाऱ्या तुझें मनसोक्त आचरण होऊं लागेल. आतां शास्त्राचें उल्लंघन व जननिंदा हे दोष लागेनांत त्यामुळें माझ्या ज्ञानाची कोणती हानि होणार, असें म्हणशील ( त्याचें उत्तर श्रीसुरेश्वराचार्यांनीं नैष्कर्म्यसिद्धींत दिलें आहे त्याचाच अनुवाद करितात.) तर ऐक.

बुध्वाद्वैतस्वतत्वस्य यथेष्टाचरणं यदि ।
शुनांतत्वदशांचैव को भेदोऽशुचिभक्षणे ॥ १ ॥

अद्वैत आत्मस्वरूपाचा ज्याला साक्षात्कार झाला आहे त्याचें जर यथेच्छ ( मनसोक्त) आचरण होऊं लागेल तर कुत्रीं व तत्वज्ञानी यांमध्यें अमंगल पदार्थ भक्षण करण्यांत भेद कोठून राहाणार ! एकूण, तत्वज्ञान्यानें सुद्धां ज्या आपल्या आचरणानें बहुजन समाजाचें कल्याण होईल असेंच वर्तन [ म्ह०कर्मभक्ति इ० ] ठेवणें अवश्य आहे. व्यास, वाल्मीकि, वसिष्ठ, जनक, हे सर्व लोकसंग्रहार्थच कर्म करीत होते, हें इतिहासप्रसिद्धच आहे. शिवाय इंद्रियांना यथेच्छ विषयाचरणांत चरूं दिल्यास मोठेमोठ्यांचा देखील अधःपात झाला आहे, हें ऋष्यशृंग, विश्वामित्र इत्यादिकांच्या उदाहरणांवरून स्पष्ट दिसतें.

जीवन्मुक्तज्ञानी जरि झाले पावन । त्यजावा दुर्जनसंग तींहीं ॥ असें श्रीतुकाराम महाराज म्हणतात. श्रीज्ञानेश्वर महाराजहीः—

म्हणोनि इंद्रियें एके । जाणतेनि पुरुखें ।
लाळावीना कौतुकें । आदिकरुनि ॥ १ ॥ ज्ञा. ३

११ शुद्ध स्वरूपाचें यथार्थज्ञन जरी झालें तरी तें जर भगवद्भक्तिविहीन असेल तर शोभत नाहीं असें श्रीमद्भागवतांत एके ठिकाणीं सांगितलें आहे.

नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ॥( स्कंध १२ )

यावर कोणी अशी शंका घेतील कीं भगवद्भक्तीकरितां त्रिपुटी (देव, भक्त व भक्ति ) ची अवश्यकता आहे, व ज्ञान झाल्यानंतर त्रिपुटीचा नाश होतो हें कसें ? तर या प्रश्नाचें उत्तर श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वाणीनेंच देणें आम्हांस इष्ट वाटतें. महाराज अमृतानुभवांत नवव्या प्रकरणांत म्हणतातः—

झाला देवोचि भक्तू । ठावोचि झाला पंथू
होऊनि ठेला एकांतू । विश्वचि हें ॥ ३५ ॥
ऐसियाही स्वामिभृत्यसंबंधा–। लागीं उठली श्रद्धा
तै देवोचि नुसधा । कामविजे ॥ ३६ ॥
देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनि डोंगरू ।
तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ॥ ३७ ॥

* * * * *

भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोन्हीं भागीं ।
वांटूनियां आंगीं । सेवकैंबाणे ॥ १ ॥ ( ज्ञानेश्वरी )

हा भेद वास्तविक सत्य नसून फक्त भक्तिप्रेमरसाचा मधुर आस्वाद घेण्याकरितांच संतांनीं अंगिकारिलेला असतो. या द्वैतानें फक्त भक्ति संभवते, व यामुळें त्यांच्या अद्वैत स्थितीमध्यें किंचिदपि न्यूनता उत्पन्न होणें शक्य नाहीं. श्रीतुकाराममहाज म्हणतात—

अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ १ ॥

आणखीही असे उद्गार काढतात—

कोण जाणे कोणा घडे उपासना । कोण या वचना प्रति पावे ॥ १ ॥
आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी हे सेवा तुझीच म्यां ॥ २ ॥
कुशळ चतुर येथें न पवती । करितील रिती तर्क मतें ॥ ३ ॥
तुका म्हणे केणे जाले एके घरीं । मज आणि हरी तुम्हां गांठी ॥ ४ ॥

श्रीकृष्ण भगवंतासही अशी ( ज्ञानोत्तर ) भक्तीच आवडते याविषयीं नामदेवरायांची गोष्ट जगप्रसिद्धच आहे. नामदेवराय जरी सगुणसाक्षात्कारी होते तरी श्रीपांडुरंगरायांना त्यांची ही द्वैतभक्ती आवडली नाहीं ह्मणून त्यांस विसोबा खेचरांकडे पाठवून अपरोक्ष साक्षात्कार करविला, व नंतरच त्यांचें समाधान झालें. " योमामेवमसंमूढो " ( गी० १५–१९ ) या श्लोकावरील आपल्या भाष्यांत श्रीज्ञानेश्वर महाराज भगवंताचा अनुवाद करून सांगतातः—

मग म्हणें सर्वत्र सच्चिदानंद । मीचि एक स्वतःसिद्ध ।
जो आपणेनसी भेद । नेणोनि जाणे ॥ ६३ ॥
तेणोंचि सर्व जाणितलें । हेंही म्हणणें थेंकुलें ।
जें तया सर्वत्र उरलें । द्वैत नाहीं ॥ ६४ ॥
ह्मणोनि माझिया भजना । उचित तोचि अर्जुना ।
गगन जैसे आलिंगना । गगनाचिया ॥ ६५ ॥
तेविं मी झालिया संभवे । भक्ति माझी ॥

इतकेंच नव्हे, पण जर ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं अद्वेष्टत्व, सत्य, दया, मैत्री, अहिंसा, इ० सात्विक गुणांचा अभाव असेल, तर त्याच्या यथार्थ ज्ञानाविषयीं संशय उत्पन्न होणें साहजिक आहे; तसेंच अवश्यमेव आचरणीय अशा भगवद्भक्तीचा जर तत्वज्ञान्याच्या अंतःकरणांत अभाव असेल, तर त्यास ज्ञानी न ह्मटलें तरी चालेल असें भागवतधर्मीयांचें मत आहे.

१२ याबद्दल सूतसंहितेंमध्येंही कांहीं प्रमाणें आढळतातः—

विशुद्धज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मनः ।
शिवरुद्रमहादवब्रह्मेशानादिनामसु ॥
शिवस्य लिंगपूजायां शिवस्थानेषुसुव्रताः ।
प्रियबुद्धिःप्रजायेत स्वभावादेव सर्वदा ॥
यस्यविज्ञानिनस्तेषु प्रद्वेषोवाऽपि जायते ।
उपेक्षावानसज्ज्ञानी पशुर्विज्ञानवंचकः ॥

पवित्र ज्ञानाचा ज्याच्या अंतःकरणांत उदय झाला आहे, त्यास श्रीशंकराच्या [ विष्णु, कृष्ण, राम, गोविंद ] नामाविषयीं किंवा पूजाअर्चेविषयीं प्रियबुद्धि स्वभावतःच उत्पन्न होते. ज्या ज्ञानी पुरुषाच्या अंतःकरणांत वरील विषयासंबंधीं द्वेष उत्पन्न होईल त्यास कांहींही उपेक्षा न करितां पशु किंवा ज्ञानवंचक ह्मणण्यास कांहींही हरकत नाहीं असें सूतांचें आग्रहाचें सांगणें आहे.

१३ शेवटीं या विषयासंबंधीं आधारभूत अशी श्रीज्ञानेश्वर महाराजांचीं कांहीं वचनें लिहून हा विषय पुरा करूं.

मग वाढतेनि प्रेमें । मातें भजती जे महात्मे ।
परी दुर्जेपण मनोधर्में । शिवतलें नाहीं ॥ १ ॥
ऐंसे मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा ।
परी नवलाव तो सांगावा । असें आईक ॥ २ ॥
ऐसा बोधचि केवळ । जो होऊनि असे निष्कळ ।
त्याहीवरी भजनशीळ । माझ्याठायीं ॥ ३ ॥
हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण झाला ॥ ४ ॥
इतुक्याही वरी पार्था । माझिया भजनीं आस्था ।
तयातें मी माथां । मुगुट करी ॥ ५ ॥
आंत बाहेरी योग । निर्वाळलेयाही चांग ।
तरी माझा अनुराग । सप्रेम जया ॥ ६ ॥
अर्जुना तो भक्त । तोचि योगी तोचि मुक्त ।
तो वल्लभा मी कांत । ऐसा पढिये ॥ ७ ॥

ऐसा द्वंद्व निर्मुक्त । भयोद्वेगरहित ।
याहीवरी भक्त । माझ्याठायीं ॥ ८ ॥

बाराव्या अध्यायांत भगवंतांनीं जीं भक्तांचीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व ज्ञानोत्तर भक्तीचीच आहेत असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. सारांश, पूर्ण अवस्था प्राप्त झाल्यानंतरही भगवंताची सगुणोपासना ह्म० भगवंताच्या नामस्मरण गुणवर्णन इत्यादिकांविषयीं पूर्ण अनुरक्त असणें म्हणजेच मुक्तीवरील भक्ति किंवा पंचम पुरुषार्थ होय.

मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥ १ ॥

शिवाय हा विषय शुष्क चिकित्सेचा नसून अनुभवाचाच आहे असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें मत आहे.

तैसी क्रियाकीर न साहे । तर्‍हीं अद्वैती भक्ति आहे ॥
हें अनुभवाचि जोगें नव्हे । बोला ऐसें ॥ [ ज्ञानेश्वरी १८ ]

इति शम्

---

# महाराष्ट्रास समर्थांचा उपदेश.

१

( महाराष्ट्रीय राजकारणपटूंनीं समर्थांच्या पुढील उपदेशाचें मनन करावें-आपलाच हेका न चालवितां लोकशाहीच्या काळांत बहुत जाणत्यांच्या मतानें चालण्यांतच कार्यभाग होतो ).

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ? ।
चातुर्येवीण उंच पदवी । कदापी नाहीं ॥ १ ॥
अंतर्कळा शृंगारावी । नानापरी उमजवावी ।
संपदा मेळवून भोगावी । सावकाश ॥ २ ॥
प्रेत्न करीना शिकेना । शरीर तेंही कष्टवीना ।
उत्तम गुण घेईना । सदा कोपी ॥ ३ ॥
आपण दुसर्‍यास करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें ।
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ ४ ॥
जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें ।
येर तें व्यर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ ५ ॥

लोक आपणास वोळावे । किंवा अवघेचि कोसळावे ? ।।
आपणास समाधान फावे । ऐसें करावें ।। ६ ।।
समाधानें समाधान वाढे । मैत्रीनें मैत्री जोडे ।
मोडितां क्षणमात्र मोडे । बरेंपण ।। ७ ।।
तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोनि घ्यावें ।
उगेच कल्पितां शिणावें । लागेल पुढें ।। ८ ।।
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहजचि वोढे । कामासाठीं ।। ९ ।।
म्हणोनि दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें ।
दुसऱ्यांसी कष्टवितां कष्टावें । लागेल पुढें ।। १० ।।
समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले ।
या वेगळे उरले । ते करंटे पुरुष ।। ११ ।।
जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ।
समजले पाहिजे उपाव । सहजचि आहे ।। १२ ।।
मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य ।
बोलिलें हें सत्य कीं असत्य । वोळखावें ।। १३ ।।
आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला ।
बहुतांमध्यें येकल्याला । यश कैचें ? ।। १४ ।।
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ।
उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रांसी ।। १५ ।।

—दासबोध द० १४ स० ६

---

## ज्ञानेश्वरी टीका.

१ मिरज संस्थानचे कारभारी रा. रा. गणेश कृष्ण आगाशे, बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं ज्ञानेश्वरीचे मूळ चार अध्याय विस्तृत टीकेसह छापून प्रसिद्ध केले आहेत व ह्या टीकेची एक प्रत त्यांनीं आह्मांकडे अभिप्रायार्थ पाठविली आहे. ग्रंथाला दिलेली प्रस्तावना व टीका आह्मीं काळजीपूर्वक पाहिली. ज्ञानेश्वरीचें परंपरेचें श्रवण ज्याला घडणें दुर्घट आहे पण ज्याला त्या ग्रंथाचें अध्ययन पद्धतशीर व्हावें असें वाटतें आहे त्याला सदर टीकाग्रंथाचा कांहीं उपयोग होईल यांत शंका नाहीं. रा. रा. आगाशे यांनीं आपल्यावरील जबाब-

दारीचें काम संभाळून दृढ व्यासंग ठेवला व स्वबुद्धीनें एवढा ग्रंथ लावून दाखवायची उमेद धरिली ही गोष्ट खचित भूषणावह आहे. श्रीज्ञानेश्वरी ग्रंथाबद्दल येथें कांहीं लिहावयाचें नाहीं. ती आम्हां भाविकांची 'आई' आहे. आज फक्त रा. आगाशे यांच्या या टीकाग्रंथाचा परामर्श घ्यावयाचा आहे. "संप्रदायास सोडून असा अर्थ आह्मी कित्येक ठिकाणी केला आहे व त्यांचे नेहमीचे पाठही आह्मी कांहीं प्रसंगीं बाजूस सारले आहेत......संप्रदाय, संप्रदाय म्हणजे तरी काय चीज आहे?...राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेली मुकुंदराजप्रत—तींत ओव्या अवध्या ८८९२ व निळोबा प्रतींत पाहावें तों ओव्यांची संख्या १०००० ! आतां ह्या ११०० ओव्या ज्ञानेश्वरांच्या कां दुसऱ्या कोणाच्या? पाठासंबंधानें भवति न भवति करण्याचें काम एका व्यक्तीवर न सोपवितां एक विद्वान् मंडळ नेमावें व त्यानें बसून वादविवाद करून उत्तम पाठ कोणता हें ठरवावें असें कोणी म्हणतात पण हें म्हणणें आम्हांस ग्राह्य वाटत नाहीं. आम्हांस एकच तोड दिसते व ती ही कीं ग्रंथकार ज्या काळांत झाला त्यानंतर अगदीं थोडया कालांत जी प्रत तयार झाली असेल त्या प्रतींत तेच पाठ ग्रंथकारानें योजलेले असतील असें मानणें हेंच अधिक संभवनीय व युक्तीस धरून आहे. स्वतः ग्रंथकाराची प्रत मिळाली तर फारच उत्तम पण तशा प्रतीच्या अभावीं उपलब्ध प्रतींपैकीं जी सर्वांत जुनी प्रत असेल तीच प्रत ग्राह्य समजावी...कारण मखलाशी करणारांस प्रक्षिप्त भाग मध्येंच ढकलून देण्यास तितका काल कमी सांपडतो...अशा दृष्टीनें विचार करितां राजवाडे यांनीं शके १८३० मध्यें धुळ्याच्या आत्माराम छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलेली मुकुंदराजाची प्रत आजवर उपलब्ध झालेल्या प्रतींत सर्वांत प्राचीन ठरते आणि म्हणूनच महाराजांचें लिखाण जर खरें कोठें सांपडेल तर तें त्याच प्रतींत सांपडेल असें खात्रीनें म्हणतां येतें......राजवाडे यांनीं तपशीलवार हकीकत दिली आहे तीवरून पाहतां नांवें ठेवण्यासारखें या प्रतींत कांहींच नाहीं......ज्ञानेश्वरी शके १२१२ सालीं लिहिली गेली, त्यानंतर सुमारें ३० वर्षांच्या आंतच शके १२४० च्याही अगोदरच ही प्रत महत्प्रयासानें आस्थापूर्वक मुकुंदराजांकरितां तयार केली असली पाहिजे असें बिनचुक म्हणतां येतें. मुकुंदराज हा होसळवंशीय जयंतपाळ राजाचा गुरु होता, व त्याची हयात शके ११५८ पासून १२५४ पर्यंत होती. राजाचा गुरु असल्यानें मुबलक पैसा खर्च करून अशी प्रत तयार करणें मुकुंदराजास शक्य होतें. ज्ञानेश्वरीचा मूळ लेखक सच्चिदानंदबाबा १२४० सालीं मरण पावला. त्याच्या मरणाच्या अगोदरच ही प्रत तयार झाली असावी............राजवाडेप्रतींतील ज्ञानेश्वरीची भाषा—म्हणजे ज्ञानेश्वरांनीं लिहिली तशी अस्सलबरहुकूम 'नागर मराठी' भाषा होय व तीच आज आपणापुढें आहे...नाथांनीं जुन्या शब्दांस

नवे पेहराव दिल्यानें भाषेचें ऐतिहासिक दृष्टया नाथांच्या या कृतीनें थोडेंसें नुकसानच झालें आहे. नाथांचा हा संस्कार १५०६ मध्यें झाला." येथवर रा. आगाशे यांच्याच शब्दांत त्यांच्या प्रस्तावनेंतलें त्यांचें हृद्गत आम्हीं दाखविलें आहे. उघडच आहे कीं या विचारसरणीमुळें त्यांनीं राजवाडीप्रतच मूळास धरुन आपली टीका लिहिली आहे. ही टीका आहे अर्थात् हा ग्रंथ सार्थ नाहीं. टीकेंत साखरे–कुंटे–भावेप्रभृति सांप्रदायिक लोकांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतील पाठभेदांचा समाचार घेण्यापुरता पाठभेदाविचार केला असून शब्दांच्या अर्थाचा व्युत्पत्तिदृष्टया ऊहापोह केला आहे. कांहीं ठिकाणीं शोधकपणा व मार्मिकता दृष्टीस पडतात पण राजवाडेप्रतीचा पुरस्कार करण्याच्या निश्चयानें बहुतेक ठिकाणीं स्वतंत्र विचार मावळलेला आहे. साखरेबुवा, कुंटे यांनीं परंपरेला धरून अर्थ केला म्हणून त्यांजवर घसरतांना टीकाकार स्वतः राजवाडे–परंपरेला वश झालेले दिसतात. परंपरेचें एवढें प्राबल्य मनुष्याच्या मनावर आहे कीं जुनी परंपरा त्याज्य ठरवितांना विवेकीही कोणत्या तरी नव्या परंपरेचा गुलाम बनून जातो! जी परंपरा सोडावी तिच्यांतले गुणही त्याला दोषरूप दिसतात व जी स्वीकारावी तिच्यांतल्या दोषांचेंही तो समर्थन करीत सुटतो! या न्यायाला रा. आगाशे अपवाद नाहींत!

२ राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरीप्रतीसंबंधानें मागें पुष्कळच वाद झालेला आहे. तो सर्व उकरून काढण्याचें आज कारण नाहीं व आम्हांस तितकी सवड अगर इच्छाही नाहीं.

राजवाडे यांची प्रत वारकऱ्यांनीं मान्य केलेली नसून तिचा प्रसार परंपरेच्या लोकांत झाला नाहीं; तीच गत प्रस्तुत टीकेचीही होईल अशी आम्हांस कल्पना येते. आगाशे यांचे श्रम व्यर्थ जाऊं नयेत व वाचकांनीं त्यांच्या टीकेकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहावें असें आम्हांस वाटत असले तरी राजवाडे प्रतीचा पुरस्कार करण्यांत व परंपरेच्या अर्थाकडे दोषदृष्टीनेंच पाहण्यांत त्यांनीं चूक केली आहे असें आह्मांस वाटतें. राजवाडे प्रत 'श्रीसद्गुरु मुकुंदेन विद्याधराय शिष्यास दत्ता' असें तिच्या शेवटीं लिहिलेल्या श्लोकावरून स्पष्ट आहे, पण "हे सद्गुरु म्हणजे प्रसिद्ध मुकुंदराजच होत, त्यांनीं ही प्रत कोणा शिष्याकडून लिहविली, मुकुंदराज होसळवंशीय जयंतपाळाचा गुरु होता व ही शके १२१२ पासून १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिली आहे" हें राजवाडे यांचें मत जशेंच्या तसेंच आगाशे यांनीं पत्करिलें आहे हें नवल आहे. राजवाड्यांप्रमाणें आगाशे यांचें मत क्षणभरही विचाराच्या व शोधाच्या कसाला बिलकूल टिकणारें नाहीं. नुस्तें मुकुंदाचें नांव आलें एवढ्यावरून हा मुकुंद प्रसिद्ध मुकुंदराजच होत याला कांहींच प्रमाण नाहीं. मुकुंद नांवाचे आणखी दुसरे कोणी पुरुष पुढें झालेच नाहींत व त्यांपैकीं कोणी ही

मुकुंद ' सद्गुरुपदला ' ( शिष्याच्या दृष्टीनें ) पोंचला नाहीं हें खरें कशावरून ? विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज हे जयंतपाळाचे गुरु होते पण तो जयंतपाळ कोणता, कधीं कोठें होता हें अद्याप निश्चित झालें नाहीं. महाराष्ट्र सारस्वतकार रा. विनायकराव भावे लिहितात ( भाग १ पृ० ३३ ):–" नृसिंहाचा बल्लाळ तयाचा कुमर जयंतपाळ ' असें मुकुंदराजानें ह्मटलें आहे पण ही त्रयी देवगिरीकर जाधवांत नाहीं व एक विद्वान् संशोधक ( अर्थात् राजवाडे ) ही त्रयी म्हैसुरकडील होयसाळ वंशातल्या राजपुरुषांची असून त्यांचे गुरु मुकुंदराज होते असें सांगतात पण हाही समज चुकीचा आहे. होयसाळांची राजधानी हळेबाड व बेलूर या ठिकाणीं जाऊन मीं याचा शोध केला तेव्हां या वंशांत ही त्रयी नाहीं व याचा आणि मुकुंदराजाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं असें मला दिसून आलें. होयसाळ हे मूळ जैन होते, पुढें रामानुजाचार्यांच्या उपदेशामुळें ते वैष्णव झाले. शिवाय होयसाळांच्या राज्यांत तेव्हां कानडी भाषा सर्वभर प्रचारांत होती, मराठीचा तेथें गंधही नव्हता ! " शिवाय रा. भावे यांना विवेकसिंधूची जुनी प्रत मिळाली आहे तिच्यांतून त्यांनीं पुढील ओव्या ( अ. ११ ) दिल्या आहेतः—

शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
राजा शारङ्गधरू । राज्य करी ॥
ऐसा समयो सर्वोत्तमू । तेथ मुकुंद द्विजोत्तमू ।
विवेकसिंधु मनोरमू । निर्मिता झाला ॥

यावरून विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज मुळीं शके १११० च्या सुमारास झाले व ज्ञानेश्वरीचा रचनाकाल शके १२१२ हा प्रसिद्ध आहे, तेव्हां ज्ञानेश्वरीच्या पूर्वीं १०० वर्षें होऊन गेलेल्या मुकुंदराजानें शके १२१२ ते १२४० च्या दरम्यान ज्ञानेश्वरीची प्रत आपल्या शिष्यास देणें अशक्य आहे हें सांगावयास नको ! तात्पर्य मुकुंदराजाची ही प्रत होय ही कल्पित गोष्ट राजवाड्यांनीं रचिली व भोळे बिचारे आगाशे ती खरी मानीत आहेत. कोणा तरी मुकुंदानें ही प्रत केव्हां तरी आपल्या कोणा तरी विद्याधरनामक शिष्यास दिली एवढीच बाकी राहिली. मुकुंदराजाचें नांव व त्यावरून शके १२२२ ते १२४० पर्यंत मागें नेलेलें प्रतीचें प्राचीनत्व या गोष्टी पूर्णपणें अविश्वसनीय आहेत. हें एकदां पत्करलें ह्मणजे " ही प्रत सर्वांत प्राचीन, ज्ञानेश्वरांनीं लिहिली तशी अस्सल बरहुकूम नागर मराठी भाषा या प्रतीतंच सांपडते, या प्रतींतले पाठ तेच खरे, या प्रतींत नसलेल्या ओव्या सर्व प्रक्षिप्त होत " हें आगाशे यांचें म्हणणें सर्वच पालथें पडतें. ही प्रत फार प्राचीन असें क्षणभर कबूल केलें तरी ही प्रत लिहिणारा कोण, तो काय लायखीचा किंवा विद्वत्तेचा होता, त्यानेंच कांहीं ओव्या प्रत करितांना गाळल्या नसतील हें कशावरून इ० प्रश्न राहतात. या

प्रश्नांचें उत्तर राजवाडे अगर आगाशे काय देऊं शकतील? ज्या ओव्या राजवाडेप्रतींत नाहींत त्या सर्व प्रक्षिप्त असेंहि मानतां येत नाहीं कांकीं त्या ओव्या फार सुंदर म्हणजे ज्ञानेश्वरीच्या घडणाच्याच असून अर्थसंदर्भालाही अत्यवश्य असें सहज दाखवितां येण्यासारखें आहे. आगाशे यांनीं स्वतः प्रस्तावनेच्या १३ व्या पानावर त्यांच्या मतें प्रक्षिप्त (कांकी त्या राजवाडेप्रतींत नाहींत) अशा ज्या ओव्या दिल्या आहेत त्यांबद्दल या ओव्याही मागील पुढील संदर्भ सुलभरीतीनें समजण्यास अधिक उपयोगी आहेत अशी कबूली दिली आहे.

तात्पर्य, रा. राजवाडे यांच्या प्रतीवर अंधश्रद्धा ठेवून त्यांचा संप्रदाय पत्करल्यानें आगाशे यांच्या प्रतीबद्दलही परंपरेचे लोक सांशक राहतील यांत नवल नाहीं.

'नाथांनीं जुन्या शब्दांस नवे पेहराव दिले' हा आगाशे यांचा नाथांवरील आक्षेपही अयथार्थ आहे. पाठांतरीं शुद्ध अबद्धभाग तेवढा त्यांनीं शुद्धप्रती मिळवून शुद्ध केला पण यावरून त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या भाषेचें अर्वाचीकरण केलें असें म्हणतां येत नाहीं.

---

# श्रीकृष्णदयार्णव.

(शके १५९६–१६६२)

येणें भवरोगनिवृत्ति । श्रवणें कीर्तनें विघ्नोपशांति ।
अर्थावबोधें अमृतावाप्ति । श्रोत्यां वक्त्यां प्राश्निकां ॥ १ ॥

१ ह्या पुरुषाचें चरित्र सर्वांनीं वाचून मनन करण्यासारखें आहे. परम आपत्तींतून भगवद्भक्तीच्या बळावर कसें तरून जातां येतें व उतारवयांत साधनांवांचूनही महत्कार्य कसें करितां येतें हें यावरून समजणार आहे. कृष्णदयार्णव यांनीं आपल्या उदार चरित्रानें पैठणची पवित्र भूमि अधिकच पवित्र केली आहे.

२ हा थोर पुरुष मोरोपंतांचा समकालीन होता. पंतांचें वय यांच्या मृत्युसमयीं सारें अकरा वर्षांचें होतें, तथापि कृष्णदयार्णवांचा मुख्य ग्रंथ म्हणजे भागवताच्या दशमस्कंधावरील 'हरिवरदा' नामक टीकाग्रंथ हा होय, व ह्या ग्रंथाचा रचनाकाल (शके १६४९–१६६५) पंताच्या आयुर्मर्यादेंत पडत असल्यामुळे पंतकालीन संतमंडळांत यांची गणना करणें अवश्य आहे. दुसरें

असें कीं ह्या ग्रंथाचा आदर आमचे लोकांनीं त्याच्या योग्यतेप्रमाणें केलेला दिसत नाहीं. महिपतींच्या संतचरित्रांत कृष्णदयार्णवाचें नांव सुद्धां आढळत नाहीं. कृष्णदयार्णवांनीं कांहीं विशेष चमत्कार केले नाहींत हें खरें, पण मानवी आणि दैवी आपत्तींनीं जर्जर करून सोडलेले, कुष्टरोगाच्या भयंकर व्याधीनें घेरलेले, कोरान्नभिक्षा मागून रहावयाचा प्रसंग आलेला:—अशा अवस्थेंत— पन्नाशी उलटून गेल्यावर त्यांनीं ग्रंथरचनेस हात घातला आणि अर्ध्या लाख ग्रंथाची उठावणी केली, हा चमत्कार कांहीं सामान्य नाहीं! कृष्णदयार्णवांनीं आपल्या ग्रंथांत आपलें साग्र चरित्र दिलें आहे हा त्यांनीं आपल्यावर मोठाच अनुग्रह केला आहे, त्याच्याच आधारानें व त्यांच्याच शब्दांत पुढील हकीकत देत आहे.

२ कऱ्हाडाजवळ कोपारूढ नामक गांव आहे, तेथील राहणारे व माध्यंदिनशाखेचे हे यजुर्वेदी ब्राह्मण होत. यांचें घराणें विद्वत्तेविषयीं प्रसिद्ध होतें. यांच्या बापाचें नांव नारायण, व आईचें नांव बहिणाबाई. यांचा बाप चार शास्त्रांत पारंगत असून वेदार्थवेत्ता व मोठा आत्मज्ञानी पुरुष होता. यांचा जन्म शके १५९६ च्या अक्षय्यतृतियेस झाला. हा मुलगा एक वर्षाचा होतांच याची आई व नऊ वर्षांचा होतांच याचा बाप वारला. याच्या बाळपणीं महाराष्ट्रभर बंडाळी चालली होती. संभाजी व राजारामाच्या धामधूमींचा तो काळ होता:—

शिव भूपती पावला मुक्ती। दक्षिणे येशोनि ताम्रपती॥
केली विजयपुरां समाप्ति। थोर विपत्ती राष्ट्रातें॥ १॥

राष्ट्रीय व कौटुंबिक विपत्तींच्या ज्वाळांनीं कृष्णदयार्णवाला पुष्कळ होरपळून टाकलें. कृष्णदयार्णवांनीं सपरिवार देशांतर केलें, व ते जोगाईच्या आंब्यास जाऊन राहिले. तेथें असतांना २१ व्या वर्षीं त्यांवर गुरुकृपा झाली. एकनाथ स्वामींचे शिष्य चिदानद व त्यांचे शिष्य स्वानंद. या स्वानंदाला

" तयां आपुलिया कल्याणकामें। शिवभूपतिनें प्रार्थूनि प्रेमें॥
रायदुर्गीं स्थापिलें नेमें। सेवानुक्रमें तोषविलें॥ १॥ "

साधुसमागमप्रिय अशा शिवरायाचे गोविंदराव नामक एक कारभारी होते. त्यांचें दैव उदयास आल्यामुळें त्यांनीं " टाकिली संपत्ति नाशगामी। आत्मारामीं सुरवाडला." जायसद् गुरुसेवा करून गोविंदराव कृतार्थ झाले—आत्मरूपावले! स्वानंदाचे शिष्य गोविंद व गोविंदाचे शिष्य कृष्णदयार्णव हे होत. 'कालचक्र आचारहीन। जठरचिंतनें अभ्यासविहीन।' अशी कृष्णदयार्णवाची स्थिति असूनही त्याच्या पोटीं खरें भजनप्रेम पाहून गुरूनें त्यास कृष्णोपासना करायला सांगितली. कोरान्नभिक्षा मागून व गीतापाठ आणि ज्ञानेश्वरीपारायण करीत ते काळ क्रमू लागले. कोरान्नकाळची यांची 'कृष्णदयार्णव, कृष्णदयार्णव' अशी दीर्घ वाणी

ऐकून लोक त्यांस कृष्णदयार्णव म्हणूं लागले, व त्यांचें मूळचें नरहरि हें नांव लोपलें. कृष्णदयार्णवांनीं आठदहा वर्षें सद्गुरुसंगतीनें दक्षिणोत्तरयात्रा करण्यांत घालविली; दीड वर्षें लिंबाचा पाला भक्षून गायत्रीपुरश्चरण केलें; गयेस असतांना सद्गुरुसन्निध भागवतावर व्याख्यान केलें; व परत आल्यावर ते पाहतात तों मराठ्यांच्या फौजेनें जोगाईच्या आंब्याचा नाश केलेला त्यांस दिसला. मग ते नगरजिल्ह्यांत पिंपळनेर गांवीं कांहीं वर्षें राहिले. पहिल्या बायकोनें कन्या व पुत्र हीं मागें ठेवून 'राम' म्हटला. कृष्णदयार्णवांनीं यानंतर गुर्वाज्ञेनें द्वितीय विवाह करून अग्निहोत्र चालू केलें. दुसऱ्या भार्येबरोबर सात वर्षें काढल्यावर त्यांस रक्तपित्ततुल्य प्रसुप्तवाताचा रोग जडला! पुढें कृष्णदयार्णव पैठणास गेले, व तेथें त्यांनीं श्रीएकनाथमहाराजांची सेवा चालविली. कांहीं काळानंतर नाथांनीं प्रसन्न होऊन त्यास दृष्टांत दिला व दशमस्कंधावर मराठी व्याख्यान करण्यास आज्ञा केली! पैठणास एकनाथांच्या वृंदावनासमोर बसून कृष्णदयार्णवांनीं दशमस्कंधटीकेस श. १६४९ सालीं प्रारंभ केला. "रोगें शरीर झालें क्षीण। त्यासी औषध भगवद्गुण" हें संतवचन त्यांनीं हृदयीं धरिलें.

४ एकनाथांच्या समाधीसन्निध नेहमीं कोणी तरी संत, योगी, महानुभाव असतातच. कृष्णदयार्णवांच्या वेळीं तर पैठणास मोठमोठे विद्वान् लोक पुष्कळच होते व कित्येक परमार्थी लोक बाहेरून येऊन तेथें राहिले होते. कृष्णदयार्णव नाथाज्ञेनें दशमावर व्याख्यान करितात हें ऐकून शेंकडों लोक नित्य पुराणश्रवणास जमूं लागले. श्रीकृष्णाच्या परम पवित्र चरित्राचें निरूपण गोदातीरीं नाथांच्या पवित्र व रमणीय समाधीपुढें नाथाज्ञेनें कृष्णदयार्णवासारखा मोठा तपश्चर्यावान् अधिकारी पुरुष करणार हें ऐकून पुष्कळ भाविक मुमुक्षु पैठणास जमले. कृष्णदयार्णवांचे शिष्य उत्तमश्लोक—कीं ज्यांनीं सर्व व्याख्यान स्वहस्तें लिहून काढलें व दुसरे शिष्य सदानंदबोवा,—कीं ज्यावर दयार्णवांनीं प्रसन्न होऊन आपल्या ग्रंथांचे अवशिष्ट तीन अध्याय ज्याच्या कडून आपल्या पश्चात् करविले हे व अशाच प्रकारचे कित्येक लोक त्यांच्या पुराणश्रवणास जमत असत. हा संतमेळा पाहून कृष्णदयार्णवांस मोठेंच स्फुरण चढलें. दोन वर्षांनीं सद्गुरु गोविंद निजधामास गेले कृष्णदयार्णवांचा दरसाल पंढरीस जाण्याचा नेम असे, त्याप्रमाणें ते तिकडे गेले असतां मागें त्यांचे गुरु हिंवतापाची मोठी सांथ चहूंकडे पसरली होती तिनें वारले. तेव्हां या सच्छिष्यास परम दुःख झालें.

'गोविंदाचें सगुणध्यान। आतां कोठूनि पाहती नयन?।
झालों पोरटा हीन दीन। न वचे शीण हृदयींचा'

याप्रमाणें त्यांनीं फार शोक केला; पण 'अभिन्न सद्गुरुसंतमूर्ति' हें ध्यानांत धरून त्यांनीं व्याख्यान तसेंच पुढें चालविलें. तथापि सद्गुरु गोविंद सन्निध असतां दोन वर्षांत जसें झपाटयानें काम झालें तसें पुढें चाललें नाहीं. पुढच्या २४ ते ४९ अध्यायांना ७ वर्षें लागलीं. पूर्वार्ध संपतांच कृष्णदयार्णवांची व्याधीपासून मुक्तता झाली ही एक उत्तम गोष्ट झाली. त्यांनीं ग्रंथारंभ ५३ व्या वर्षीं केला व पूर्वार्ध झाला तेव्हां त्यांची साठी उलटून गेली होती, जराजर्जरित तनु झाली होती, पूर्वींचे अधिकारी व बरोबरीचे संत निर्वाण पावले होते, यामुळें त्यांस ग्रंथ समाप्तीस जाईल असा भरंवसा वाटेना. म्हणून त्यांनीं येथेंच उपसंहार केल्यासारखा केला आहे. पण त्यांचें गोड पुराण ऐकायची संवय झालेले संत यांना कसचे उगे राहूं देतात? गोविंदात्मज शिवदीक्षित, वेदार्थवेत्ते चौधरी, साक्षात्कारी शिवराम मुनी,वगैरे श्रोत्यांनीं त्यांस पुन्हां प्रोत्साहन देऊन उत्तरार्धास प्रारंभ करविला. 'स्वसत्ता पूर्णकर्ता हरी। आपण आज्ञा-नियोगकारी' हें संतवचन ऐकून त्यांनीं प्रारंभ केला. संतनमन करितांना पुढील ओंव्या आहेतः—

मुकुंदराजज्ञानेश्वर—। प्रमुख देशभाषाकार ॥
सिद्धांतवक्ते ज्ञानभास्कर। स्मरोनि सादर वंदिले ॥ १ ॥
सूर्य सूर्यांचि प्रकाशे। कीं अमृतीं अमृताचि समरसे ॥
हरिगुणश्रवणीं श्रोते तैसे। साक्षात् हरिरूप हरिवेत्ते ॥ २ ॥

५ सद्गुरु गोविंदाविषयीं जसा कृष्णदयार्णवांचा पूज्यभाव होता, तसाच तो एकनाथांविषयींही होता. प्रत्येक अध्यायाच्या आरंभीं गोविंदास व अंतीं एकनाथास त्यांनीं नमन केलें आहे. रुक्मिणीस्वयंवरवर्णनप्रसंगीं तर कृष्णदयार्णवांचा नाथांविषयींचा पूज्यभाव विशेषच प्रकट झाला. त्या प्रसंगाच्या ओंव्याः—

दशम स्कंध वाखणितां। प्रसंगें रुक्मिणीस्वयंवरकथा।
उपायिली ते वर्णूं जातां। धिवसा चित्ता नुपलभे ॥ १ ॥
म्हणाल येथ कोण विचारू। तरी श्रीएकनाथ परमेष्ठि गुरु।
भानुकुळीं अपरभास्करु। अज्ञानतिमिरपरिहर्ता ॥ २ ॥
सकळ सद्गुणीं परिपूर्ण। प्रतिष्ठानीं अवतरून।
कलिमलमग्ना ब्रह्मज्ञान। प्रबोधून उद्धर्ता ॥ ३ ॥
अभेद गुरुभजनाची मार्गा। प्रकट आचरोनि दाविली जगीं।
गुरुदास्याच्या ऐश्वर्ययोगीं। समता आंगीं शोभविली ॥ ४ ॥
यशोदानंदात्मज आवडी। धर्मालयीं उच्छिष्टें काढी।
अर्जुनाची धुतली घोडी। येथ कावडी जळ वाहे ! ॥ ५ ॥

ऐसा महिमा अगाध ज्याचा । तिहीं रुक्मिणीस्वयंवर वाचा ।
वाखाणिले त्या ग्रंथाचा । विचित्र महिमा जग जाणे ॥ ६ ॥
तया प्रभूनें एकनाथा । वदनीं प्रकटूनि वदविली कथा ।
यावरी श्लोकार्थ वाखाणितां । होय तो वृथा वाग्जल्प ॥ ७ ॥

कृष्णदयार्णवांनीं नाथांचें रुक्मिणीस्वयंवर जसेंच्या तसेंच मध्यें सांगून. स्वतः कांहीं या प्रसंगाचें वर्णन न करितां, दशमाचें व्याख्यान पुढें चालविलें, अ. ५० पासून ८६ पर्यंत सात वर्षांत संपलें. ८७ व्या अध्यायाच्या २३ श्लोकांची व्याख्या झाली तों त्यांचें देहप्रारब्ध संपलें. ' काळवंचना ' न करितां त्यांनीं शके १६६२ मार्गशीर्ष शु. ५ गुरुवारीं देह ठेवला. पुढील ग्रंथ त्यांच्या अनुज्ञेनें उत्तमश्लोकानें संपविला. याप्रमाणें शके १६४९ मध्यें सुरू झालेलें हें महासत्र शके १६६५ च्या मार्गशीर्ष शु. ५ ला संपलें.

६ कृष्णदयार्णव व उत्तमश्लोक या उभयतांच्या समाधी पैठणास गोदातीरीं आहेत. कृष्णदयार्णवांच्या समाधीवर पुढील श्लोक कोरलेला मीं पाहिला आहे:—

रौद्री द्विषन्षड्शशिशाक्यवर्षी सत्पंचमी शुक्ल सुमार्गशीर्षी ।
नैर्गुण्य श्रीकृष्णदयार्णवासी तत्पादुका पूज्य सुखैकराशी ॥ १ ॥

कृष्णदयार्णवांचा पुत्र अनधिकारी होता ह्मणून त्यांनीं विशेष कृपा ' उत्तमश्लोका ' वरच केली. हेच त्यांचे कल्याण होत. दयार्णवांचा नातु काशिनाथ हा उत्तमश्लोकांचा शिष्य झाला. दयार्णवांचा वंश अद्याप पैठणास आहे. कृष्णदयार्णवांचें उपास्य—श्रीगोवर्धनधारी कृष्णाची मूर्ति—अद्याप पैठणास आहे. ती कृष्णवर्णाची आहे, सव्वा हात उंचीची असून अत्यंत मोहक व दर्शनीय आहे.

७ हरिवरदा ग्रंथाचें वर्णन वाचेनें काय करावें ? तो ग्रंथ इतका प्रौढ, रसाळ आणि अत्यंत प्रासादिक झाला आहे कीं प्रत्येक मुमुक्षूनें तो एकवार अवश्य वाचावा. दयार्णव न्यायवेदांतमीमांसादि शास्त्रांत निष्णात होते हें त्यांच्या ग्रंथावरून उघड दिसते. ज्या महात्म्यानें १५ वर्षें हालअपेष्टेंत काढून वार्धक्यांत केवळ लोकहितार्थ एवढ्या अवाढव्य पण परमसुंदर ग्रंथाची उभारणी केली, त्याच्या योग्यतेप्रमाणेंच ह्या ग्रंथाची योग्यताही अत्यद्भुत आहे. कृष्णदयार्णव २ ऱ्या अध्यायांत ह्मणतातः—

नसतां व्युत्पत्तीचें बळ । नसतां शरीर अविकळ ।
अनुकूळ नसतां देशकाळ । नसतां निश्चळ सुखवस्ती ॥ १ ॥
फिरत फिरतां रानीं वनीं । गोविंद भरला ध्यानीं मनीं ॥
तेणें स्वतंत्र करूनि वाणी । बळेंचि स्वगुणीं योजिली ॥ २ ॥

ज्याच्या ध्यानीं मनीं गोविंद भरला, त्याच्या वाणींत दिव्यप्रतिभा असलीच पाहिजे आणि ती आहेही. वर्णन साधें, सरळ, पण प्रौढ व गंभीर भाषेंत करून तें सारें अध्यात्मतंतूनें ओंवणें हें काम किती कठीण आहे, हें हा ग्रंथ वाचणाऱ्यांसच कळणार आहे. ज्या एकनाथमहाराजांनीं एकादशावर स्वतः उत्कृष्ट टीका केली, आणि आत्मतेज कृष्णदयार्णवांत ओतून त्यांजकडून दशमावर तशीच सरस टीका करविली, त्या उभयतां दिव्य महात्म्यांस एकात्मतेच्या भावानें मी अनंत प्रणाम करतों.

८ मोरोपंतांनीं 'कृष्णदयार्णव कृष्णाचि' असें म्हणून त्यांचें स्तोत्र थोडक्यांत केलें आहे. ज्याचें मन कृष्णरूप झालें, निरंतर कृष्णरूपाचें व कृष्णकथांचें श्रवण, मनन, व निदिध्यास हेंच ज्यानें केलें, तो भक्तहि कृष्णरूपच झाला यांत कांहीं शंका नाहीं. नामदेवकृत तीर्थावळीच्या अभंगांत श्रीपांडुरंगांचीच उक्ति आहेः—

आपुलियाचि किरणें विराजे गभस्ती । परी किरण न होतीं आन जेंवी ॥ १ ॥
तैसे माझे दास मजमाजी उदास । असती समरस दुजेनवीण ॥ २ ॥
मीं तों भक्तरूप भक्त माझें स्वरूप । प्रभा आणि दीप जयापरी ॥ ३ ॥

तेव्हां कृष्णदयार्णवाला कृष्ण म्हणण्यांत पंत संतसंमत असेंच तत्व बोलले आहेत. सन्मणिमालेंत पंतांनीं पुढील आर्या केली आहेः—

कृष्णदयार्णव कृष्णाचि करिन तयां कां न दास मीं नमनें ? ।
संतांसि मुमुक्षुमनें । न विसंबावें नदास मीनमनें ॥ ? ॥

संतांस नदाची व मुमुक्षूस मीनाची उपमा देण्यांत पंतांनीं किती समर्पकता दाखविली आहे ! संत हे खरोखर मुमुक्षूंचें जीवन आहेत. संतसंगांतून मुमुक्षूला बाहेर काढलें, कीं मत्स्यासारखे ते तळमळून प्राण सोडतील ! मत्स्यांला आंत, बाहेर, खालीं, वर, सर्वत्र पाणी असलें कीं ते आपल्या सहज सुखांत असतात, तसेंच मुमुक्षूंच्या नेत्राला दर्शन संतांचें, श्रवणाला श्रवण संतांचें, मनाला, बुद्धीला, अंतरात्म्याला, व्यापून राहणारें संतांचें संत—(शाश्वत)—रूप असलें कीं तेही सहज समाधिसुखांत—स्वस्वरूपानुभवाच्या परमानंदांत—निमग्न असतात. संताकार ज्या मुमुक्षूची चित्तवृत्ति झाली तो अपापच संत होतो. मत्स्य तरी जळापासून भिन्न राहतो, पण मुमुक्षु संताध्यासी झाला कीं, संत म्हणजे शाश्वत परमात्मस्वरूपच होतो. मुमुक्षूचें जीवन संत हेच होत. संतांची महती पंतांना बरोबर कळली होती, कारण त्यांची स्वतःची वृत्ति संत झाली होती.

९ माझे परम भाविक मित्र रा. रा. रामचंद्र हिराजी दांडेकर यांच्या सत्सहवासांत मला कृष्णदयार्णवांच्या चरित्राची व ग्रंथाची गोडी सात वर्षांपूर्वी प्रथम लागली. सदर गृहस्थ माहिम, मुंबई, येथें राहतात. हे जातीनें कोळी

आहेत, पण यांचे आचार विचार, राहणी, जबरा विद्याव्यासंग, व वेदांतविषयाची आवड, केवळ अप्रतिम आहे. हे रसिक, भाविक, व सज्जन आहेत. १०।१२ वर्षांपूर्वी हरिवरदा ग्रंथ छापून निघाल्याबरोबर तो समग्र यांनीं वाचला व मोठया मेहनतीनें काशीच्या मठांतून त्याची शुद्ध प्रत आणवून नवीन प्रतीशीं तो ताडून शुद्ध पाठांची याद तयार केली, ती याद त्यांनीं मला शोधनार्थ दिली आहे. दयार्णवांच्या चरित्राचेंही त्यांनीं टिप्पण तयार करून ठेवलें होतें.

**१० कृष्णदयार्णवांच्या स्फुट कवितेचा मासला पहाः—**

**पद.**

नारायण भज रे मानस नारायण भज रे ।। धृ० ।।
त्रिभुवनपतिपद चिंतिनि जरि तूं काय उणें तुज रे ।। १ ।। धृ० ।।
विषय उपेक्षुनि अनुभव लक्षुनि आत्मपदीं रम रे ॥ २ ॥
**कृष्णदयार्णव** कर्णपुटीं गुज हेंचि कथीं बिज रे ।। ३ ।।

**अभंग १.**

भाळ्या भोळ्या जना उपाय हा सोपा ।। मन्मथाच्या बापा शरण जावें ॥ १ ॥
सर्वस्वें आपुला भार त्याच्या माथां ॥ घालोनियां व्यथा ओसरावी ॥ २ ॥
अहंतेचा नाश सर्वस्वी करावा । कृष्ण ओळखावा सर्वांठायीं ॥ ३ ॥
जैसें जैसें घडे संतोषसाकडें । तें तें देवाकडे समर्पावें ॥ ४ ॥
असत्य दांभिक सांडावी कामना । निंदा द्वेष मना नातळावीं ॥ ५ ॥
पोटाप्रावर्णाची चिंता नाठवावी । प्रारब्धाचे गांवीं सर्व आहे ॥ ६ ॥
भोगावें सर्वही प्रारब्धाचें फळ ।। करावें अढळ अंतरासी ॥ ७ ॥
वैराग्याच्या बळें असावें उदास ॥ कोण्या वैभवास भुलूं नये ।। ८ ॥
स्वधर्मी वर्ततां लज्जा ओसरावी । अधर्मी धरावी लज्जा थोर ।। ९ ॥
सर्वांठायीं नाम गोविंदाचें ध्यावें । अंतरीं धरावें विरक्तीसी ॥ १० ॥
**दयार्णवा**माजी जातां याचि वाटे । अकस्मात भेटे स्वानंदासी ।। ११ ॥

**अभंग २.**

चाड नसे मज आणिक कोणाची । एका गोविंदाची आस पाहे ॥ १ ।।
तयावीण जिणें शून्य वाटें लोकीं । कोण माझे पोखी मनोरथ ।। २ ॥
कोण जाणे माझे जीवींचा कळवळा । कोण वेळोवेळां आळवील ॥३॥
दाही दिशा तुजवीण शून्य झाल्या ।। चित्त कांहीं केल्या स्थिर नोहे ।। ४ ॥
**दयार्णवा** तुझ्या छायेसी वाढलों । आजि वाटे झालों परदेशी ।। ५ ॥

# शिवदिनकेसरी.

( शके १६२०–१६९६ ).

प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला ।
तो नर भला भला बा भला भला ॥

१ हे साधु खुद्द पैठणास राहत असत. हे यजुर्वेदी कौशिकगोत्री ब्राह्मण. यांच्या आईचें नांव सरस्वती, व बापाचें नांव कृष्ण यादव जोशी. यांचा जन्मकाळ शके १६२० बहुधान्यनाम संवत्सरे, वैशाख कृष्ण ७ भृगुवासर, सूर्योदयात् १६।४८ हा आहे. हे नवनाथपरंपरेंतले होत. प्रसिद्ध केसरीनाथ ( शके १५८५ मार्ग. शुद्ध ५–१६४६ मार्ग. शु. २ ) हे यांचे गुरु होत. केसरीनाथांचे दुसरे शिष्य मालोनाथ यांनीं आपल्या सांप्रदायावर १५ श्लोक केलेले मिळाले आहेत, त्यावरून यांची परंपरा दिसते ती हीः—श्री आदिनाथापासून मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ, गैनीनाथ निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ ( ज्ञानेश्वरीचे प्रख्यात कर्ते ज्ञानेश्वर ), सत्यामलनाथ, गैबीनाथ, गुप्तनाथ, उद्बोधनाथ व केसरीनाथ. या परंपरेंतले हे शिवदिननाथ होत. जन्मापासूनच यांना सहजसमाधी साधली होती ! हे पांच वर्षांचे असतांना गोदावरीच्या वाळवंटांत कांहीं मुलें खेळतां खेळतां सहज शिवनाथाला बरोबर घेऊन गेलीं. त्या वयाला अनुरूप असा चंचलपणा अगर हूडपणा यांचे ठिकाणीं नसल्यामुळें मुलांनीं कांहीं विनोदानें व कांहीं रागानें याला वाळवंटांत पुरलें, व त्यावर माती टाकली ! खेळांत गुंतल्यामुळें याला पुरल्याचें ठिकाण मुलें विसरलीं ! घाबरून सर्व मुलें घरोघर गेलीं. मुलाचा बाप कृष्णजोशी यानें पुष्कळ शोध केला; पण मुलाचा पत्ता लागला नाहीं. शेवटीं त्याला मुलांच्या खेळाची गुणगुण कळली. त्यानें जागा हुडकण्याची फार खटपट केली. पण त्यालाही पुरल्याचें स्थळ सांपडलें नाहीं. तेव्हां तेथें केसरीनाथ नामक सिद्ध राहत होते त्यांजकडे जाऊन त्यानें त्यांची प्रार्थना केली कीं, ‘ महाराज, माझा मुलगा मला परत द्यावा. ’ केसरीनाथ हे कृष्णजोश्याबरोबर वाळवंटांत गेले, व त्यांनीं हाक मारितांक्षणींच मुलगा वाळवंटांतून पटकन बाहेर आला ! जोश्यांनीं तो मुलगा लागलीच केसरीनाथांच्या पायांवर घातला. केसरीनाथांनीं तो जवळ ठेवून घेतला व श. १६२८ सालीं त्याचा व्रतबंध करून त्यावर त्यांनीं पूर्ण अनुग्रह केला. शिवदिन हे वाळवंटांत पार्थिवार्चन करीत असतांना एकदां वरून गंगा गेली तरी

हे स्थानभ्रष्ट झाले नाहींत असें सांगतात! केसरीनाथांची कृपा झाल्यावर शिवदिन पूर्णतेस पोहोंचले. अमृतराय आणि हे समवयस्क व समाधिकारी होते. अमृतराय यांना फार पूज्य मानीत. वृष्णेश्वर उर्फ वेरूळ येथें जर्जरीबक्ष नामक एक मुसलमान अवलिया होता. तो यांचें तेथें कीर्तन चाललें असतां प्रेमानें बसे. कीर्तनांत हे कधीं स्वकृत पदेंही म्हणत. यांच्या कीर्तनावरून हे मोठे अधिकारी पुरुष आहेत असें त्यानें ओळखलें. त्यानें आपल्या डोक्यावरची टोपी त्यांचे डोक्यावर घातली व त्यांना 'दीन' ( धर्म, मुख्य ) ही पदवी दिली. यापूर्वीं त्यांस शिवनाथ म्हणत व यापुढें शिवदिननाथ म्हणूं लागले. यांचे समकालीन शहादावल नामक एक अवलिया पैठनास होते, त्यांचा यांचा फार स्नेह असे. त्यांच्या नेहमीं एकांतांत बैठकी होत शिवदिननाथांनीं त्यांजवर 'वाहवा शाहदावल शाहदावल। पीर जायते आवल।' हें पद केलें आहे. शिवदिननाथ हे गृहस्थाश्रमी होते. यांचा विवाह यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी झाला होता. यांच्या भार्येचें नांव उमाबाई होतें. ती मोठी साध्वी होती. शिवदिननाथ एकदां अरिष्टांत सांपडून दगावल्याची बातमी आली, तेव्हां या साध्वीनें क्षणैक ध्यानस्थ राहून सांगितलें:—'माझें मंगळसूत्र गळ्यांत आहे, तेव्हां ते सुखरूप आहेत!' शिवनाथास दोन पुत्र होते. ते त्यांचेच शिष्य झाले. त्यांचीं नांवें नरहरिनाथ व गदाधरनाथ. नरहरिनाथ व त्यांचें पुत्र लक्ष्मीनाथ हे शिवदिननाथाप्रमाणें स्वानुभवी होते. लक्ष्मीनाथांची समाध आळंदीस केसरीनाथांच्या समाधीजवळ आहे. शिवदिनकेसरी हे मोठे देखणे पुरुष होते. नरहरिनाथानें एका पदांत वर्णिल्याप्रमाणें 'दिव्यमूर्ति अतिसुंदर पाहतां थक्कित अमरादी' असें होते. शिवदिनकेसरींचे शिष्य पुष्कळ होते. उमाबाई, रमाबाई व मुकुंद यांचीं त्यांस आलेलीं कांहीं पत्रें मीं पाहिलीं आहेत, त्यांच्या हातचें एक पत्र रमाबाईस गेलेलें मला मिळालें आहे, त्यावरून त्यांच्या हस्ताक्षराचा फोटोही मीं घेतला आहे. रमाबाईनें आपलें पत्र सरळ ओवीवृत्तांत लिहिलें आहे. शिवदिननाथ हे अत्यंत निस्पृह व विरक्त होते, पण गृहस्थाश्रमी असल्यामुळें त्यांनीं दोहोंकडे खबरदारी बाळगलेली दिसते. बडोद्याचे दिवाण रावजी बापूजी यांस त्यांनीं शके १६९१ सालीं उपदेश केला. त्यांस देणग्या व उत्पन्नें बरींच मिळालीं होतीं, पण त्यांचा विनियोग त्यांनीं निराळें संस्थान करून भजनपूजनादिकांत व्हावा असा करण्याचें योजिलें. शके १६९६ माघ वद्य १० सोमवाररोजीं त्यांनीं संस्थानपत्र करून तें आपल्या वडील मुलाच्या स्वाधीन केलें. तें बरेंच मोठें असल्यामुळें सर्व येथें देतां येत नाहीं. साधू आत्मरंगांत दंग असले तरी व्यवहारांत चुकत नाहींत. या संस्थानपत्रांत खालील वाक्यें आहेत:—

"आमचे गुरु श्रीकेसरीनाथजी व आमचे गुरूचे गुरु श्रीउद्बोधनाथजी या

उभयतां नाथजीविषयीं तुम्हांस आज्ञा करितों कीं, आपण स्मरणपूर्वक मनन, पठण, निजध्यास हृदयांत धरून श्रीउद्बोधनाथजी यांचा उत्सव, महोत्सव; कथाकीर्तन; भजनपूजन चार दिवस आनंद करावा. दुसरे श्रीगुरु केसरीनाथ स्वामी आमचे गुरु यांचा उत्सव. महोत्सव; कथाकीर्तन; भजनपूजन; ध्यान–मनन; चार दिवस श्रीक्षेत्र आळंदीस जाऊन समारंभ करावा. यांत अंतर पडूं नये, हेंच माझें सांगणें आहे. आमचा उत्सव न झाल्यास आपण काळजी करूं नये, परंतु गुरु श्रीगुरुनाथजी यांचे उत्सव आपण संतोष आनंदमय करावे, यांत आम्हांस बहुत संतोष आहे...आपला संस्थानी वांटयांचा सांप्रदाय नाहीं. असें माझें सांगणें आहे कीं, दोन होऊं नये. दोन झाल्यास त्याजला यशप्राप्त होणार नाहीं. वडिलांनीं पुढें होऊन कथा–कीर्तन करावें. सर्व समान असून सर्वांनीं स्वामीचे सेवेंत वडिलांचे आज्ञेनें चालावें. अनुक्रम ऐसा चालवावा... प्रपंचास दोन रुपये कमजास्त लागल्यास भिक्षा करावी अगर कर्जवाम सावकाराचें घ्यावें..." या संस्थानपत्राच्या खालीं 'हस्ताक्षर शिवदिन कृष्ण जोशी संस्थान क्षेत्र प्रतिष्ठान' अशी सही आहे. तीनच दिवसांनीं म्हणजे माघ वद्य १३ सोमवार शके १६९६ रोजीं शिवदिनकेसरी पैठनास गंगातीरीं समाधिस्थ झाले. नरहरिनाथानें आपल्या आरतींत 'सोळाशत शहाण्णव गर्जति जयकारें' अशा वेळीं 'शिवरात्रीं शिवदिन हा करि गमन वैकुंठ' असें म्हटलें आहे. ह्याप्रमाणें गृहस्थाश्रम करून परमार्थ साधलेल्या ह्या साधूचें संक्षिप्त चरित्र आहे. 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला । तो नर भला भला' या त्यांच्याच उक्तीप्रमाणें त्यांनीं उभयत्र भलेपण मिळविलें.

२ शिवदिनकेसरींची कविता फारशी उपलब्ध नाहीं व जी थोडीबहुत मीं पाहिली व संग्राहिली आहे, ती अद्याप प्रकट व्हायची आहे. यांचीं थोडीशीं पदें प्रसिद्ध आहेत. 'भाव धरारे । आपुलासा देव करारे;' 'तोंवरि हळहळरे ।। नाहीं भक्तीबळरे;' 'माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा;' या यांच्या पदांची मराठींतल्या उत्तमोत्तम पदांत गणना आहे. मराठी कवितेंतला पदसंग्रह म्हणजे अनुभवी साधूंचे सहजोद्गार आहेत; त्यांची किंमत अमोल आहे. यांचीं अप्रसिद्ध अशीं अजून पांचशें पदें आहेत. शके १६४४ पासून १६४८ पर्यंत चार वर्षे हे भरतखंडभर तीर्थयात्रेसाठीं हिंडले. 'लक्ष्मा जगदंबा जगदंबा । मम कुलदैवत अंबा' हें गोड पद त्यांनीं आपल्या व केसरीनाथांच्या कुळस्वामिनीवर-तुळजापूरच्या देवीवर–केलें आहे, कित्येक पदें गणपति, मारुती, विठ्ठल, दत्त, सोनारीचा भैरवनाथ, इत्यादि देवांवर केलीं आहेत. एका विशिष्ट देवतेची उपासना कडकडीत असली म्हणजे अन्य देवता तद्रूप दिसतात व यामुळें 'अनेकीं सदा एक देवासि पाहे' अशी स्थिति होते. मोरोपंत काय किंवा शिवदिननाथ काय किंवा दुसरा कोणीही उपासक-संत काय, अनेक देवतांचीं स्तवनें

करितात त्याचें बीज हेंच आहे. शिवदिननाथ हे पार्थिव पूजा करणारे शिवभक्तसांप्रदायपरंपरेचे होते; पण त्यांनीं अनेक देवतांवर पदें व अमृतरायांच्या संगतीमुळें कडाका व कटाव या छंदांत कांहीं कविता केली आहे. अमृतरायांच्या धाटणीवर ' हे जगदंबे विश्वकदंबे । निरावलंबे तूं शिवसांबे । मज अविलंबे । धांव पाव निर्वाणीं' अशा प्रकारें शब्दचमत्कृतीसह कांहीं पदें यांनीं केलीं आहेत. यांचे कांहीं श्लोक, अभंग, आरत्या वगैरे आहेत. यांचे अभंग पंढरीच्या विठ्ठलावर आहेत ते फारच साधे व गोड आहेत. ' विठ्ठल गाइलाचि गाऊं । विठ्ठल पाहिलाचि पाहूं ' ' कधीं भेटसी विठ्ठला । प्राण भेटीसी फुटला ' ' आला सन्मुख धांवत । माझा सखा पंढरिनाथ ' वगैरे अभंगांत बहारीचा भक्तिरस उतरला आहे. याशिवाय शिवदिनकेसरींनीं शके १६९२ मध्यें ' **ज्ञानप्रदीप** ' नामक एक २१ अध्यायांचा ओंवीबद्ध ग्रंथ रचलेला मीं पैठणास पाहिला आहे. एकंदरीनें शिवदिननाथांची कविता थोडी आहे तरी ती फार सुबोध, सरळ, व प्रासादिक आहे. व ती उत्कट भगवद्भक्तीनें भरलेली आहे. मोरोपंत पैठणास गेले होते तेव्हां त्यांची व यांची भेट झाली असल्याचा पूर्ण संभव आहे. पंतांनीं यांस सन्मणिमालेंत गोंवलेंच आहे:—

गावें नतपद्मातें जो दे निःसीम शिव, दिनकरा या ।
पद्म हित उपासकांचें, श्रीशिवदिन तेंवि, शिवदिन कराया ॥ १ ॥

३ शिवदिनकेसरी हे मोठे गुरुभक्त व तेजस्वी पुरुष होते. वरील आर्येंत यमकासाठीं पंतांनीं ' दिनकर ' पद घातलें असावें असा माझा समज होता, पण नरहरिनाथांच्या आरतींत जेव्हां ' दिव्यमूर्ती अति सुंदर पाहतां थक्कित अमरादि ' हा चरण पाहिला तेव्हां असें वाटलें कीं दोघांनीहि त्यांच्या दिव्य तेजःपुंज मूर्तीचें सारखें वर्णन सहजगत्या केलें असून त्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. शिवदिनकेसरीस जो जो पुरुष पाही तो तो त्यांच्या ईश्वरनिष्ठाजन्य दिव्यकांतीनें थक्क होऊन जाई, व ह्मणून पंतांनीं यमकासाठीं ' दिनकर ' पद घातलें नसून त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यामुळें सूर्यासारखी त्यांची प्रभायुक्त मूर्ति त्यांच्या पुढें उभी राहिली व ह्मणून तें पद त्यांना सहजच सुचलें ! त्यांना सूर्याची उपमा देण्याची स्फूर्ति मनांत उद्भवतांच त्यांच्या भक्तांना कमलांची गोड उपमा आठवून पंतांच्या मुखांतून या कल्पनेबरोबर ' गावें नतपद्मातें जो दे निःसीम शिव, दिनकर या ' हा चरण बाहेर आला असावा ! ! नरहरिनाथांचा चरण व पंतांच्या आर्येंतलें 'दिनकर' पद हे एकसमयावच्छेदेकरून मनांत येतांच माझ्या मनांत प्रथम जी कल्पना स्फुरली ती ही कीं पंतांनीं शिवदिननाथास पाहिलें होतें खास, निःसीम शिव म्हणजे अर्थात बंधमुक्तता. उत्तरार्धांत शिवदिन हे शिवभक्त असून शिवदिनीं ( शिवरात्रीस ) समाधिस्थ

झाले ह्मणून त्याला शिवदिनाची उपमा देण्यांतही पंतांनीं खुबी केली आहे. शिवदिनकेसरीचें हें अल्पसें चरित्र त्यांना प्रणतिपूर्वक स्मरून पुरें करितों.

४ पैठणचे संतकवि श्रीशिवदिनकेसरी यांच्या सांप्रदायांतील नित्यपाठांतल्या कवितेचा संग्रह मला पैठणासच मिळाला आहे. गुप्तनाथ यांचे शिष्य उद्बोधनाथ, यांचे शिष्य केसरीनाथ, यांचें शिवदिन व शिवदिनकेसरीचे शिष्य नरहरिनाथ व मालूनाथ इतक्या संतांची अभंग, पदें व आरत्या इत्यादिरूपानें असलेली बरीच स्फुट कविता मला मिळाली आहे. त्यांतून नमुन्याकरितां कांहीं मासले पुढें दिले आहेत. मला मिळालेल्या बाडांत ज्ञानेश्वरांच्या स्तुतिपर बरीच कविता आहे. हा नाथपंथ योग्यांचा व सिद्धांचा आहे. ही कविता फार गहन आहे, तथापि त्यांतील सर्वोपयोगी व सुलभ पद्यें पुढें दिलीं आहेत. शिवदिनकेसरींचीं १०० पदें मिळालीं आहेत.

**अभंग.**

१

माता पिता त्राता अरि पुत्र भ्राता। गुरुवीण आतां नाहीं दुजा ॥१॥
पशु पक्षी याती गुरुरूप भासती। ऐसी ज्याची स्थिती तोचि जाणे ॥२॥
वृक्ष वल्ली पाहीं अणुरेणु तेही। गुरुवीण नाहीं रितें कोठें ॥ ३ ॥
ऐसा गुरुराज भज पूर्ण व्यापक। गुप्त बोले रंकराज सम ॥ ४ ॥

२

देव भक्ताचा रे पुत्र। भक्त देवाचे कुळगोत्र ॥ १ ॥
तैसा देव भक्तांवरीं। खेळे रांगे हृदयावरीं ॥ २ ॥
देव भक्तापोटीं आला। भक्त देवीं सामावला ॥ ३ ॥
हेमीं हेमरूप देव। तेथें कैचा द्वैतभाव ॥ ४ ॥
तैसा उद्बोध देवापोटीं। देव उद्बोधाचे दिठी ॥५॥

३

काय उतराई पाया। होऊं तुझ्या गुरुराया ॥ १ ॥
नित्य नूतन विठ्ठलवीर। केला डोळियां गोचर ॥ २ ॥
साध्य साधन नातुडे। तया केलें मागें पुढें ॥ ३ ॥
चौसां आठरां कानडें। तें त्वां दाविलें ऊघडें ॥ ४ ॥
म्हणे उद्बोध सर्वदां। नाहीं उत्तीर्णता कदा ॥ ५ ॥

४

स्वर्ग मृत्यु आला वाटे येतां जातां। परी नाहीं गुंता कांहीं येथें ॥१॥
जेथें तूं असती तेथें मी येईन। स्वरूप पाहीन याचि डोळां ॥ २ ॥
न करी ध्यान मी सिद्ध तूं असतां। न धरी सर्वथा दुरस्ता ते ॥३॥
दुरी मी न जाय तुज जाऊं नेदी। उद्बोध गोविंदीं लीन पायीं ॥४॥

५

दृष्टी पुंजाळली निजरूपीं बैसली । पाहतां पाहतां परतली ठायींच मुराली ॥ १ ॥
दृश्य लया गेलें देखणें पारुषलें । दर्शन ठसावलें तन्मय झालें ॥ २ ॥
जालें म्हणतां नये आटली मनाची सोये । कोण कोणासी पाहे रे सहज आहे रे॰
उद्बोधनारूपें नसतें हें हरपे । दाविलें निजप्रतापें या केसरीसी ॥ ४ ॥

६

आला सन्मुख धांवत । सखा माझा पंढरीनाथ ॥ १ ॥
भावें घाला पायीं मिठी । कडकडोनि घ्यारे भेटी ॥ २ ॥
डोळे उघडोनी पहा । तेज फांके दिशा दहा ॥ ३ ॥
काया वाचा मन । उक्ते सांडा कुरवंडून ॥ ४ ॥
गुरुकेसरीरूपें साचा । कुळस्वामी शिवदीनाचा ॥ ५ ॥

७

गुरुरायें बरवें केलें । माझें मीपण हरोनि नेलें ॥ १ ॥
काय सांगूं आतां बाई । सांगायाची सोय नाहीं ॥ २ ॥
ठेवितांचि माथां हात । षड्रिपूंचा झाला घात ॥३॥
दिठी मुरडोनी दावितां । जाली मनासी उन्मनता ॥ ४ ॥
सहज करितां अवलोकन । गेलें तुटोनि भवबंधन ॥ ५ ॥
शिवनाथें धरितां करीं । तेव्हां झाला नरहरी ॥ ६ ॥

पदें.

१

विठ्ठल गाइलाचि गाऊं । विठ्ठल पाहिलाचि पाहूं ॥ धृ० ॥
सत्रावी भिवरेच्या तीरीं । पंढरपुरासि जाऊं ॥
चंद्रभागे स्नान करूनी । मुक्तिपताका लाऊं ॥१॥
मृदंग वीणा टाळ घोळ । संतसंगतीं पाहूं ॥
प्रदक्षिणासी नाचत कीर्तनि । नेमनिष्ठ राहूं ॥ २ ॥
जीवजंतु पंढरीचे वतनी । विठ्ठलरूप भाऊं ।
स्वहितशिक्षित वचनें त्यांचीं । अनाक्रोश साहूं ॥ ३ ॥
वेणुनादीं संतत काला । केसरिगुरुचा खाऊं ।
शिवदिन गरुडपारीं प्रसाद हरिदासांचा लाहूं ॥ ४ ॥

२

भाव धरा रे । आपुलासा देव करारे ॥ धृ० ॥
कोणी कांहिं म्हणो यासाठीं । बळकट प्रेम असावें गाठीं ।
निंदास्तुतिवर लावुनि कांटी । मी तूं हरा रे ॥ १ ॥

सकाम साधन सर्वेही सांडा । निष्कामें मुळभजनीं भांडा ।
नाना कुतर्कवृत्तिसी दवडा । आलि जरा रे ॥ २ ॥
केसरिनाथगुरूचें पायीं । सृष्टी आजि बुडाली पाही ।
शिवदिनि निश्चय दुसरा नाहीं । भक्त खरा रे ! ॥ ३ ॥

३

आतां मी नाहीं मी नाहीं । नरहरिवांचुनि कांहीं ॥ ध्रु० ॥
विकल्प अवघा सरला । दोही डोळां नरहरि भरला ॥ १ ॥
अनुभव–पाउलवाटें । जिविचें जीवन नरहरि भेटे ॥ २ ॥
प्रपंच अवघा सरला । दोही डोळां नरहरि भरला ॥ ३ ॥
सच्चिद्घनरूप सारा । नरहरिविरहित काय पसारा ॥ ४ ॥
विसरुनि साधन क्षुद्रा । त्यालों सबाह्य नरहरिमुद्रा ॥ ५ ॥
शिवदिन– जिवपण गेलें । केसरिगुरुनें नरहरि केलें ॥ ६ ॥

---

# वर्णभेदा ( जन्मजाती ) संबंधीं

## महात्माजींचे मननीय विचार.

एका सद्गृहस्थानें अत्यंत नम्रपणें महात्माजींना एक प्रश्न विचारला आहे. महात्माजींनीं आपल्या 'नवजीवन' मध्यें तो प्रश्न उदधृत करून त्याला त्यांनीं उत्तर दिलें आहे. प्रश्न आणि उत्तर–दोन्ही मार्मिक असल्यामुळें तीं त्यांच्याच शब्दांत खालीं देत आहोंः—

**प्रश्नः**—वर्णभेद—जन्मजात—आपण मानित आहां परंतु कोणत्याहि माणसाला कोणतेंहि कर्म करण्याला हरकत नाहीं, आणि कोणत्याहि माणसामध्यें ब्राह्मण क्षत्रिय, वैश्यादि द्विजांचे गुण असूं शकतात असेंहि आपण मानित आहां, अशा परिस्थितीमध्यें वर्ण ह्या संज्ञेची आवश्यकता काय ? केवळ जन्मापासून वर्णभेदाचा शिक्का कां ! जन्माला इतकें महत्व कां !

**महात्माजींचें उत्तरः**—वर्णभेद मानण्यामध्यें मी सृष्टीच्या निमयांचें समर्थन करीत आहे. अनुवंशिक संस्कारानें जन्मापासून आपल्या मातापितरांचे कित्येक गुण आपणामध्यें उतरत असतात. मनुष्ययोनीमध्यें मनुष्यच निर्माण होतो हें जन्मप्रामाण्याच्या वर्णाचें सूचक आहे; आणि शिवाय आनुवंशिक संस्कारानें जन्मापासून मिळालेल्या आपल्या गुणदोषांमध्यें आपण फेरफार करूं शकतों हें पाहून कर्मालाहि स्थान आहे. पूर्व जन्मामध्यें केलेल्या कर्माचीं फळें एका जन्मामध्यें संपूर्णपणें नष्ट करणें हें जवळजवळ अशक्य आहे–ह्या अनु-

भवाच्या दृष्टीनें ब्राह्मण जातीमध्यें जन्मलेल्या ब्राह्मणाला ब्राह्मण मानणें हें प्रत्येक रीतीनें हितावह आहे. विपरीत कर्मे करून ब्राह्मण ह्या जन्मामध्यें जरी शूद्र बनला तरी जगानें त्याला ब्राह्मण मानण्यामध्यें जगाचें नुकसान नाहीं. वर्णभेदाचा हल्लीं उलटा अर्थ होत आहे हें खरें आहे. त्यामुळें वर्णभेद छिन्न-भिन्न झाला आहे हेंहि पण खरें आहे. असे असतांहि ज्या (निसर्ग) नियमाचें पदोपदीं पालन होत असलेलें मी पाहतों आहे त्या नियमाची अवगणना मीं कशी करावी! (जर) मी त्या नैसर्गिक नियमाची (क्रमाची) अवगणना करूं म्हणेन तरी मी पुष्कळ उपाधींपासून मुक्त होईल हें खरें. पण हा तर दुर्बुद्धीचा मार्ग झाला. मी तर आर्तस्वरानें सांगितलें आहे कीं वर्णाचा स्वीकार केल्यानें मी उच्चनीच भेदाचा स्वीकार करीत नाहीं. खरा ब्राह्मण हा दासांचा दास होऊन राहील. ब्राह्मणांमध्येंहि क्षत्रिय, वैश्य, शूद्र आहेतच. मात्र इतरां-पेक्षां त्यांच्यामध्यें ब्राह्मणगुणांचा प्रकर्षानें विकास झालेला दिसला पाहिजे. वर्णहि हल्लीं कुंभाराच्या चक्रावर चढलेला आहे, त्यांतून माठ तयार होईल कीं घागर तयार होईल हें कदाचित् दैवाला ठाऊक असेल किंवा ब्राह्मणाला ठाऊक असेल.

—प्रबोध.

---

श्रीरामसमर्थ.

## श्रीगोंदवलेकर महाराजांचे अभंग.

उद्धारकः—त्र्यंबक नारायण देशपांडे, पुणें.

३५

हेंचि मागणें रामा । मज देईं सर्वोत्तमा ॥ १ ॥
चुकवी अभक्तांच्या गांठी । तुझें नाम राहूं कंठीं ॥ २ ॥
किंकर संतचरणांचा । नामधारक मी तुझा ॥ ३ ॥
दास ह्मणे संकल्प विकल्प न व्हावें । हेंचि जन्मोजन्मीं द्यावें ॥ ४ ॥

३६

सकळ साधनांचें फळ । रामनामचि प्रमाण ॥ १ ॥
जपतप अनुष्ठान । अंतीं नामाचि प्रमाण ॥ २ ॥
नाना मंत्र यंत्रावळी । सोडविना अंतकाळीं ॥ ३ ॥
महा पातकी पतीत । नामें तरले अनंत ॥ ४ ॥
नाम साराचें ही सार । नाम सकलांसी आधार ॥ ५ ॥
दास म्हणे सांगूं किती । नामाविण नाहीं गती ॥ ६ ॥

३७

मना रामनाम गाई । मग तुज कमी नाहीं ॥ १ ॥
मना रामनाम गातां । हरेल सर्व चिंता ॥ २ ॥
मना एकची मानी गोष्टी । रामनाम ठेवीं कंठीं ॥ ३ ॥
दुजें न करी कांहीं । मन रामाचि होऊनि राही ॥ ४ ॥
दास म्हणे ऐसें स्पष्ट । तिनी लोकीं नाम श्रेष्ठ ॥ ५ ॥

३८

हवेली वाडा बांधिला । परिकाळ घेउनि गेला ॥ १ ॥
घरीं नाहीं राहूं दिलें । स्मशानीं नेऊनि टाकिलें ॥ २ ॥
आप्तसखे मिळाले । लांकडें गवऱ्या रचुनि आले ॥ ३ ॥
दास म्हणे सर्व खोटें । नाम राघोबाचें मोठें ॥ ४ ॥

३९

आशानदी महापूर । रामा ! येउनि तूंचि तार ॥ १ ॥
तृष्णा लाट मोठी आहे । तिनें सांडियेली सोये ॥ २ ॥
कामक्रोध सुसर फार । तिनें बुडविलें घर ॥ ३ ॥
दास म्हणे महापुरीं बुडत । रामा ! येऊनि देईं हात ॥ ४ ॥

४०

अष्टपैलू रंगमहाल । त्यांत पडदे शोभे लाल ॥ १ ॥
माझें रूप सुंदर । कांता शोभे अनिवार ॥ २ ॥
आह्मांसारखा अमर । कोण आहे महीवर ॥ ३ ॥
दास म्हणे ऐक । उद्यां होउनि जाईल राख ॥ ४ ॥

४१

चंद्रा नाहीं उष्णकाळ । सूर्या नाहीं अंधकार ॥ १ ॥
मृत्यु परत नाहीं गेला । नर कधीं नाहीं व्याला ॥ २ ॥
अजापुत्र रणीं न होये शूर । मित्र न चढे घरावर ॥ ३ ॥
दास म्हणे विषयी अविवेकी । मुक्त न होती तिन्ही लोकीं ॥४॥

४२

परस्त्रीचा नाहीं विटाळ । सत्यभाषण सर्वकाळ ॥ १ ॥
भूतदयेचा सागर । गर्व रहित नम्र फार ॥ २ ॥
परद्रव्य मना न आणी । अशाघात समजे हानी ॥ ३ ॥
दृश्य पदार्थ मिथ्या हा सार । एक जाणे सर्वेश्वर ॥ ४ ॥
वासनारहित दुःखासी मुकला । ब्रह्मानंदीं बुडुनि गेला ॥ ५ ॥
दास म्हणे ऐसे नर । त्यासी माझा नमस्कार ॥ ६ ॥

४३

चौऱ्यांशी आसन बोळवले । काय तुला प्राप्त झाले ॥ १ ॥
अष्टांग योग केला । परि काळ घेउनि गेला ॥ २ ॥
कुंडली उत्थापन केली । सहज प्राप्ती दुरावली ॥ ३ ॥
वेद पाठ केले । अर्थ वेगळे राहिले ॥ ४ ॥
शब्दज्ञान पैसावला । भक्ति ज्ञानासि मुकला ॥५॥
सिद्धीमार्गे लागला । त्यासि दिवसाचि घाला आला ॥ ६ ॥
चक्र मुद्रा भेदी । त्यासी भ्रांती पडली आधीं ॥७॥
दास म्हणे राम गातां । सर्व सहज येइल हातां ॥८॥

४४

द्रव्य माझे मजपाशीं । मी न होय द्रव्यराशी ॥ १ ॥
राजा राज्य करी । दुःख क्लेश भोगे भरीं ॥ २ ॥
स्त्रिया भुलवी पुरुषांसी । त्यांचा काम पुरुषापाशीं ॥ ३ ॥
अश्व मंडळीं धरिला । परि तें सुख बसणाराला ॥ ४ ॥
अंगावरी नग घातले । परि काय सुख झालें ॥ ५ ॥
तैसें शब्दज्ञान झालें । भक्तिज्ञान विसरले ॥ ६ ॥
दास म्हणे ब्रह्मज्ञानी म्हणवीले । ब्रह्मसुखासी मुकले ॥ ७ ॥

४५

सत्य मिथ्या कोण जाणें । ज्ञाते अभिमानें मेले ॥ १ ॥
दृश्य सर्व मिथ्या आहे । वृथा सांगुनि काय होय ॥ २ ॥
जन म्हणती माझा गांव । त्यांसी न मिळे तेथें ठाव ॥ ३ ॥
बाप कन्या व्याला । परि जांवई घेउनि गेला ॥ ४ ॥
बहुत दूध देते गाई । तीसी त्याची चवी नाहीं ॥ ५ ॥
कागदीं लिहिली साखर । गोड नव्हे तें अक्षर ॥ ६ ॥
दास म्हणे शब्दज्ञानी । चित्रलेखेची पद्मिनी ॥ ७ ॥

४६

सूर्य मंडळीं खद्योत नसे । घू घू दिवसा अंध असे ॥ १ ॥
मीन माळावरी न चले । ब्रह्म लेख कैसा फिरे ॥२॥
आकाश पाताळ एक झालें । ऐसें कोणी हो पाहिलें ॥३॥
वन्ही कापुस एका ठायीं । ऐसें कोठें झालें नाहीं ॥ ४ ॥
तेल पाणी एक झालें । परि ते वेगळेच भले ॥५॥
संत जन एकाठायीं । परि त्यांची संगत नाहीं ॥६॥
सिंधुमाजी शंख राही । परि कोर भिजली नाहीं ॥ ७ ॥
दास म्हणे विषयीं दंग । त्यासी न घडे संतसंग ॥ ८ ॥

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. भक्तिमार्गप्रदीप:—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ॥८ व्ही. पीनें ॥१२.

२. संतचरित्रमाला:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १॥८.

३. श्रीएकनाथचरित्र:—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ॥१२.

४. कविरामायण:—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४.

५. आनंदलहरी:--( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२.

६. नारदभक्तिसूत्रें:--हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यावरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८. व्ही. पी. नें ॥११.

७. नवविधाभक्ति:—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥४.

८. निरंजनमाधवांची कविता:--भाग पहिला. किं. १ रु.

९. श्रीज्ञानेश्वरचरित्र:--( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु १॥८.

१०. भक्तमणिमाला:—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह ह्रत्र आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १॥८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारव पुस्तकें.

---

**११ सार्थ हरिपाठ व चांगदे**[illegible] **[illegible]**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह, किं. ०५.

**१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८.

**१४ मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

**१५ पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

**१६ श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे श्रीविठ्ठलाचा, पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

**१७ श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

**१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:-- निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

**१९ मुक्तेश्वर** - ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२० मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): -किं. ०४.

**२१ सार्थ श्रीदासबोध**—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

**२२ सार्थ मनोबोध**.--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२

**२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:--व्रत प्रपंच, परमार्थ राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


**२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन** ):--किं. रु. २

**२५ श्री एकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी )—किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| जुनें वर्ष १९ | फाल्गुन १८४७ | नवें वर्ष ६ वें |
|---|---|---|
| मास ७ | मार्च १९२६ | अंक ३ रा. |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही पी. नें रु. ३-३

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

वर्ष ६ वें ] विषयानुक्रमणिका [ अंक ३ रा


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | ...१–२ |
| २ सगुणनिर्गुण विवेक... .... ... ... | ...३–४ |
| ३ हनुमंतगुणानुवाद ... ... ... ... | ...५–१५ |
| ४ कीटक युग्म ( कविता ) ... ... ... | .... १६ |
| ५ अमृतराय ... ... ... ... | १७–२४ |
| ६ अमृतवाणी ( कविता ) ... ... ... | ... २५ |
| ७ स्फुट विचार ... ... ... ... | २६–२९ |
| १ ठिकठिकाणची दासनवमी. २ अकोला व खामगांव. ३ महात्माजींची धर्मबुद्धि. | |
| ८ शिवदिनकेसरींची गुरुशिष्यपरंपरा ... ... | ३०–३३ |
| ~~९ श्री नारायणमहाराज आलवणकर यांचे पत्र~~ ... ... | [redacted] |
| १० गोंदवलेकर महाराजांचे अभंग ... ... ... | ३८–३९ |
| ११ मननामोद ... ... ... ... | ४० |


---


# मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन

ग्रन्थकारः—ल. रा पांगारकर, बी ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य झाला आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोडया शिल्लक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २.

पत्ताः—व्यवस्थापक, ‘ मुमुक्षु ’ पुणें.



१

मूर्ति सांवळी गोमटी ॥ अंगीं केशराची उटी ॥ १ ॥
मुगुट कुंडलें वनमाळा ॥ टिळक रेखिला पिंवळा ॥ २ ॥
कर्णीं कुंडलें मकराकार ॥ गळां शोभे वैजयंती हार ॥ ३ ॥
नेत्र अकर्ण सुकुमार ॥ एका जनार्दनीं विटेवर ॥ ४ ॥

२

विटेवरी दिसे स्वानंदाचा गाभा ॥ श्रीमुखाची शोभा काय वानूं ॥ १ ॥
कटीं पितांबर तुळशीचे हार ॥ उभा सर्वेश्वर भक्तिकाजा ॥ २ ॥
लावण्यरूपडें पाहे पुंडलीक ॥ आणीक सम्यक नये दुजा ॥ ३ ॥
पाहातां पाहातां विश्रांति पैं जाली ॥ एका जनार्दनीं माउली संताची ॥ ४ ॥

३

वेदीं सांगितलें श्रुती अनुवादलें ॥ तें ब्रह्म कोंदलें पंढरीये ॥ १ ॥
वाळुवंटीं बुंथी श्रीविठ्ठलनामें ॥ सनकादिक प्रेमें गाती जया ॥ २ ॥
एकनाथ म्हणे तो हरि देखिला ॥ हृदयीं सांठविला आनंदभरीत ॥ ३ ॥

४

साधन तें सार पंढरीची वारी ॥ आन तूं न करीं सायासाचें ॥ १ ॥
वेद तो घोकितां चढे अभिमान ॥ नाडेल तेणें जाण साधन तें ॥ २ ॥
शास्त्रमतवादकासया पसार ॥ करी सारासार वारी एक ॥ ३ ॥
पुराण सांगतां मन वेडावलें ॥ निंदूं जें लागलें आणिकासी ॥ ४ ॥

ग्रंथ पाहावें तरी आयुष्य क्षणीक ॥ व्यर्थ खटपट करुनी काई ॥५॥
एका जनार्दनीं साराचें पैं सार ॥ विठ्ठल त्रिअक्षर जप करी ॥ ६ ॥

५

गोमटीं गोजिरीं पाउलें साजिरीं ॥ धरियेलीं गोजिरीं विटेवरीं ॥१॥
वेध तो तयाचा काया मनें वाचा ॥ दुजा छंद साचा नाहीं मना॥२॥
इंद्रियें धावता आकळतीं ठाईं ॥ विठ्ठलाचे पाईं ठेवियलें ॥ ३ ॥
एका जनार्दनीं वेधलेसें मन ॥ धरूनि चरण दृढ ठेलों ॥ ४ ॥

६

जो जो धरसील भाव तें तें देईल देव ॥
ये अर्थी संदेह मानुं नको ॥ १ ॥
भावें भक्ति फळे भावें देव मिळे ॥
निजभावें सोहळें स्वानंदाचे ॥ २ ॥
एका जनार्दनीं भावाच्या आवडी ॥
मनोरथ कोडी पुरवी तेथें॥ ३ ॥

७

वाचे गाय नामावळी ॥ वासुदेवीं वाहे टाळी ॥
प्रेमाचे कल्लोळीं ॥ नित्यानंदें सर्वथा ॥ २ ॥
सोस घेई कां रे वाचे ॥ रामकृष्ण वदतां साचें ॥
धरणें उठतें यमाचें ॥ निःसंदेह ॥ ३ ॥
शरण एका जनार्दनीं ॥ करी रामनाम ध्वनी ॥
कैवल्याचा दानी ॥ रक्षी तुज निर्धारें ॥ ४ ॥

८

येणें पंथें बहुत तरले निश्चिती ॥ आवडी जे गाती विठोबासी ॥१॥
तारक हा मंत्र सोपा पैं सर्वांसीं ॥ उच्चारितां अहर्निशीं सर्व सिद्ध॥२॥
पापा प्रायश्चित्त कलियुगीं नाम ॥ आणिक सोपें वर्म संतसेवा ॥३॥
नलगे दंडन मुंडन ते आटी ॥ नाम घेतां होटीं सर्व जोडे ॥ ४ ॥
एका जनार्दनीं संतासी शरण ॥ चुके जन्ममरण नाना पीडा ॥ ५ ॥

२३ 3/9 १२13

# सगुणनिर्गुण विवेक.

१

पिंडीं तें ब्रह्मांडीं हा न्यायच आहे. पिंडांत शोधून पहावें ह्मणजे ब्रह्मांडाचा उलगडा होतो. पिंडाचा शोध झाल्यावर ब्रह्मांडांत वेगळें शोधायला कांहीं नाहींच.

२

पंचमहाभूतें पिंडांत व तींच ब्रह्मांडांत; पिंडांत जीव व ब्रह्मांडांत शिव. जीवशिव ऐक्य अनुभवून उभयातीत परब्रह्मपद पावावें व निवांत असावें. मोक्ष तो हाच.

३

The Great Truth, to be realised, has first to be specialised, particularised and locolised ! निर्गुणबोध होण्यासाठीं सगुण पाहिजे. 'सगुणाचेनि आधारें । पाविजे ब्रह्म' असें समर्थ म्हणतात तें यथार्थ आहे.

४

पितृभक्ति, बंधुप्रीति, प्रजानुरक्ति, उदारमति इ० गुणांचा विचार कोठवर करीत बसणार ? एक रामरायाच्या मूर्तीकडे पाहिलें कीं या सर्व गुणांचा स्वच्छ बोध होतो. देव प्रेमस्वरूप आहे ( God is love ) हें नुस्तें म्हणून पटत नाहीं. पटायचें तर कृष्णचरित्राकडे पहा.

चरित्र तें विचारावें । केलें देवें गोकुळीं ॥ १ ॥

— तुकोबाराय.

५

एकनाथमहाराजांनीं याचा उलगडा उत्कृष्ट केला आहेः—

निर्गुणाचा बोध कठिण । मनबुद्धिवाचे अगम्य जाण ।
शास्त्रासी न कळे उणखूण । वेदीं मौन धरियेलें ॥ १ ॥
तैसी सगुणमूर्ति नव्हे जाण । सुलभ आणि सुलक्षण ।
देखतां जाय भूकतहान । निवताहे मन सप्रेमें ॥ २ ॥

——नाथभागवत अ० ११.

६

आला नावारूपा । तुका म्हणे झाला सोपा ॥ १ ॥

७

निर्गुणनिराकार परब्रह्म आकळणें कठिण, मनवाचाबुद्धीला तें अगम्य-पण तेंच नावारूपाला येऊन सोपें झालें आहे. विकल्प सोडून, कल्पनेचें गाठ मोडून, त्यालाच सप्रेमभरित होऊन झोंबा व देवाचें प्रेम लुटा व सुखी व्हा..

८

सगुण भक्ति करून निर्गुणबोध कसा होईल ? नाथसाहेबांनीं याचा खुलासा फारच नामी केला आहे:--

दीपकळिका हातीं चढे । तैं घरभरीं प्रकाशु सांपडे ।
माझी मूर्ति जैं ध्यानीं जडे । तैं चैतन्य आंतुडे अवघेंचि ॥
जो कसु सुवर्णाचिये खोटी । तोचि वाला एका कसवटी ।
सगुण निर्गुण परि पाटी । नाहीं तुटी चित्सुखा ॥

हातीं कंदील घेतला कीं घरभर प्रकाशच प्रकाश, त्याप्रमाणें देवाची मूर्ति ध्यानीं घेतली कीं विश्व तदाकार होऊन 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा बोध न मागतां अंगीं जडतो. सोन्याच्या शंभर शेर लगडीला जो कस तोच वालभर सोन्याला ! तात्पर्य सगुण तेंच निर्गुण. चित्सुखानंद एकच आहे.

९

लक्षानियां योगी पाहती आभास । तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ॥ १ ॥
कर दोनी कटीं राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ २ ॥
अचेत चेतलें भक्तीचिया सुखें । आपुल्या कवतुकें तुका म्हणे ॥ ३ ॥

* * * * *

अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरि हा बाळक नंदाघरीं ॥ १ ॥

१०

अमृतमय वाणींतून निघालेले हे अमृतमय उद्गार भक्तभाविकांना तन्मय केल्याशिवाय राहत नाहींत. ह्या सगुणप्रेमानंदाचाच निर्गुणबोध हा पर्याय शब्द आहे. भक्ति तेंच ज्ञान. दोहोंत भेद लवमात्र नाहीं. हें जाणून जीवानें हरीला भजावें व त्या प्रेमानंदांत जीवभाव विरून जावा.

११

भक्ति, ज्ञान, योग, निष्काम कर्म, हे सारे एकरूपच आहेत व ते श्रीहरि-स्वरूपाचे वाचक आहेत. हरी एकमेव अद्वितीय आहे व अहंकाराचा पडदा फाडून टाकला कीं त्याच्या स्वरूपानंदाचा ठेवा आपलीच मिरास आहे.

———

# श्रीहनुमंत गुणानुवाद.

( लेखकः—गोविंद महादेव बापट, पंढरपूर )

मनोजवं मारुततुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

१ हिंदुस्थानांत अनेक देवता जशा आहेत तसेच अनेक संप्रदाय आहेत. प्रत्येक सांप्रदायिकाला आपापल्या देवतेचा वार्षिकोत्सव जवळ आला कीं मोठा हर्ष होत असतो. श्रीसमर्थसांप्रदायिकांना माघ व चैत्र हे दोन महिने विशेष आनंदाचे व गडबडीचे असे जातात. माघमासीं श्रीसमर्थांची पुण्यतिथी असल्यानें श्रीमद्दासबोधाचें व समर्थचरित्राचें वाचन—मनन—निदिध्यासन तर घडतेंच, पण त्या निमित्तानें इतर विद्वान् लोकांचे नवीन विचार ऐकण्यास सांपडतात. हा उत्सव होऊन महिना लोटतो न लोटतो तोंच वर्षप्रतिपदेपासून समर्थांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र यांच्या उत्सवाला सुरवात होते. रामनवमी पावेतों रामरायाच्या गुणानुवादांत नऊ दिवस केव्हां निघून जातात याचा पत्ता लागत नाहीं. या उत्सवानंतर चार दोन दिवस लोटतात तोंच रामाचे एकनिष्ठ सेवक मारुतिराय यांच्या उत्सवाची तयारी होते. श्रीरामचंद्र, मारुति व समर्थ हा त्रिवेणीसंगम असून त्यांचा अन्योन्य संबंध काय व सांप्रदायिकांना हे तीनही उत्सव किती प्रिय असतात याची कल्पना महाराष्ट्रीयांना देण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं. या तीनही उत्सवांत समर्थसांप्रदायिकच भाग घेत असतात असें नाहीं. हनुमंतजयंती हा उत्सव बालगोपाल मंडळीना जास्त प्रिय असतो. वर्षप्रतिपदेस आखाडयांतील सर्व सामानासह मारुतीची पूजा करण्याचा प्रघात असला तरी चैत्रीपौर्णिमेच्या पूजेची मातबरी कांहीं और आहे. तालिम करणाऱ्या अगर पूर्वीं केलेल्या मुलाला या दिवशीं एक प्रकारचें स्फुरण येत असतें. सर्व वर्षभर सूर्योदयापूर्वीं उठण्याचा कंटाळा येत असला तरी हनुमज्जयंतीच्या दिवशीं तो आपला कार्यक्रम बदलल्यावांचून राहात नाहीं. मारुतीच्या दर्शनाला महिनापंधरादिवसांनींही न जाणारा इसम या दिवशीं गांवांतील सर्व मारुतींचीं दर्शनें घेतल्यावांचून राहात नाहीं. ' वेळ मिळत नाहीं ' ' अभ्यास असतो ' अशा सबबीवर वर्षभर जरी तो आखा-

ड्यांत न गेला तरी या दिवशीं शुचिर्भूत होऊन आखाड्यांत पाऊल टाकल्याविना त्याला चैन पडत नाहीं. सारांश, इतर जनांपेक्षां बालगोपाल मंडळींना हा उत्सव जास्त प्रिय वाटतो. मल्लांचें मारुति हेंच दैवत असल्यानें यथामति मारुतीची सेवा या दिवशीं घडल्यावांचून राहात नाहीं.

२ मारुतिरायांच्या दोन प्रकारच्या प्रतिमा आढळून येतात. एक दासमारुति व दुसरा वीरमारुति. दासमारुतींची स्थापना मुख्यतः रामाच्या मूर्तिसमोरच असते, परंतु वीरमारुतींची स्थापना आखाड्यांत अगर स्वतंत्रपणें देऊळ बांधून केलेली दिसते.

हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपीं वेला गेली ।
श्रीरामभक्तीनें फळली । रामदास बोले ॥
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पवेची ॥
साह्य आम्हासी हनुमंत ।............

याप्रमाणें समर्थांचे उद्गार आहेत. हनुमंताशिवाय आमचा परमार्थ सिद्धीस जाणार नाहीं हे त्यांचे उद्गार. परंतु समर्थच मारुतिरायांचा अवतार होते.

स्वरूप सांप्रदाय अयोध्यामठ । जानकीदेवी श्रीरघुनाथ दैवत ॥
मारुति उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥

श्रीसमर्थांनीं मारुतीची ठिकठिकाणीं स्थापना केली. त्या सर्व मूर्ति वीरमारुतींच्याच आहेत. वीरमारुति स्थापन करण्याचा त्यांचा उद्देश असा होता कीं त्या कालच्या हतबल राष्ट्राला या वीरमूर्तींची उपासना करून थोडा तरी धीर यावा, व स्फुरण उत्पन्न व्हावें. सर्वत्र म्लेंछ साम्राज्य पसरलें होतें. हिंदूंच्या धर्मभावनांची खच्ची होऊन त्या 'आणखी भरानें' न फुटतां उलट खुरटून समूळ नाश पावण्याच्या पंथाला लागल्या होत्या. जिकडे तिकडे उदासीनता व भीषणता पसरलेली ! पुरुषार्थाचें काम आलें कीं ज्याचा त्याचा पाय मागें. कोणांत वीर्य नाहीं, व असलें तरी धैर्य नाहीं, अशा स्थितींत राष्ट्र हेलकावे खात असलेलें समर्थांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहून त्यावर उपाययोजना म्हणून ठिकठिकाणीं मारुतींची स्थापना केली, व एकाद्या 'संजीवनी' प्रमाणें वीर्याचा संचार केला व करविला. सांप्रत आपणांस देखील धैर्य—वीर्य—शौर्य या त्रिपुटीची अगदीं जरूर आहे. अशा वेळीं ठिकठिकाणीं मारुतीचे उत्सव साजरे होऊन लहान लहान बालगोपालांना मारुतिरायांचीं अजब कृत्यें, त्यांचें बुद्धिसामर्थ्य व जितेंद्रियत्व यांची ओळख करून दिल्यास बराच फायदा होणारा आहे. 'मारुति-उपासना' ह्या छोटया पुस्तकानें हें काम पूर्वींच केलें आहे.

३ " मारुतिरायाचें थोडक्यांत चरित्र लिहा " असा प्रश्न जर एकाद्या परीक्षेंत घातला ( प्रचलित अभ्याक्रमाच्या परीक्षेंत असा प्रश्न कधींच येणार नाहीं ) तर त्याचें उत्तर शिरोभागीं दिलेल्या श्लोकांत संपूर्णतेनें दिलेलें आहे. एकाद्या निबंधाचे मुद्दे ध्यानांत असले म्हणजे निबंध सहज लिहितां येतो. त्याचप्रमाणें या रामरक्षांतर्गत श्लोकांत बुधकौशिक ऋषींनीं मारुतिरायांचे चरित्राचे मुद्दे गोंविल्यानें ते संपूर्ण चरित्र लिहिण्याला फार उपयोगी पडतात. त्यांच्या आधारानें हनुमच्चरित्राचें थोडक्यांत अवलोकन करूं.

४ मारुतिरायांच्या आईचें नांव अंजना. ही महान् तपस्वी स्त्री ऋष्यमूक पर्वतावर तपश्चर्या करीत होती. दशरथराजानें पुत्रकामेष्टी यज्ञ केला त्यावेळीं यज्ञनारायणानें प्रसन्न होऊन जें पायसपात्र दिलें त्यांतला एक भाग घारीनें उडविला व तो वायुदेवानें अंजनीच्या हातीं टाकला. अंजनीनें तो खाऊन टाकल्यावर तिच्या उदरीं गर्भ राहून चैत्र शुद्ध पौर्णिमेला हें सुंदर पुत्ररत्न ती प्रसवली. अंजनीची भूमी शुद्ध व सात्विक, त्यांत अग्निनारायणाच्या तेजस्वितेचें बीज; मग असला संगम झाल्यावर हनुमंतासारखा तेजःपुंज गुंडा पुत्र निपजावा यांत आश्चर्य कसलें ? गोमटीं फळें उत्पन्न होण्याला शुद्ध बीज व सात्विक भूमिच असावी लागते हें सांप्रतच्या गृहस्थाश्रमी माणसांनीं लक्षांत ठेवून वर्तन करावें. मारुतिरायांचा जन्म झाल्याबरोबर त्यांनीं सूर्यमण्डल हें जणूं काय पक्व फल आहे असें समजून त्यावर झेंप टाकली व तीनशें योजनांचें उड्डाण केलें. बाळपणींच्या लीलांवरून मुलांच्या भावी चारित्र्याची साधारण कल्पना करतां येते. ' बापसे बेटा सवाई ' या न्यायानें आपला पिता जो वायु त्याला देखील तो आवरेनासा झाला; म्हणून इंद्रानें मारुतीच्या अंगावर वज्र सोडलें. परंतु या वज्रदेही बालकापुढें त्या वज्राची प्रतिष्ठा ती कसली ? तें नुसतें मारुतीच्या हनुवटीला लागून गेलें तर त्याचा चक्काचूर झाला, व तेव्हांपासून त्यांना हनुमंत हें नांव प्राप्त झालें. पुढें सीतादेवीचा शोध करीत रामलक्ष्मण पंपातीरावर आले त्यावेळीं आईनें सांगितलेली खूण पटतांच मारुतींनीं रामाचें दास्यत्व पत्करून सीतादेवीचा शोध लावून दिला.

५ हनुमंतचरित्राचे जर दोन भाग केले तर एका भागांत असुरांचें निर्दाळण करणारा वीर मारुति व दुसऱ्या भागांत श्रीरामचंद्राचें दास्य करणारा दासमारुति आपणाला आढळून येतो. श्रीरामचंद्रांची सेवा बिभीषण सुग्रीवादिकांनीं केली, परंतु जिला निष्काम सेवा म्हणतात ती निष्काम सेवा करणारे एकटे हनुमंतच होत. मारुतिरायांच्या चरित्रावरून पहिला गुण घ्यावयाचा तो हा कीं कोणत्याही देवतेची पूजा अर्चा करतांना स्वार्थी बुद्धि सोडून केली तरच ती पूजा आत्मोन्नतीला पोषक होते. मीं परीक्षेंत पास व्हावें, मला एकादी मोठी नोकरी

लागावी, माझा पगार वाढावा, मला मुलेंबाळें व्हावींत, असल्या प्रकारच्या नानाविध हेतूंनीं प्रेरित होऊन ईश्वराची सेवा केली तर ती निरुपयोगी होय; तो एक प्रकारचा व्यापार झाला ! वाण्याला कमरेचा पैसा काढून द्यावा तेव्हां वाणी गूळ देतो. पैसा कमरेला रहावा व वाण्याकडून गूळही मिळावा हें कसें साधेल ? या कामीभक्तीचें फल पदरांत पडलें कीं पुण्यक्षय होतो. देवाला हे व्यभिचारी भक्त प्रिय नसतात. गीतेंत त्यांनीं सांगितलें आहे कीं:—

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

या वचनानुसार मारुतिरायांची सेवा निष्काम होती. निष्काम दास्यभक्तीचे धडे देणारे मारुतिराय हे भक्तांचेही गुरु होत. हनुमंताची व प्रभुरामरायाची जी प्रथम भेट झाली त्या वेळीं मारुति हे भिक्षुवेषांत हिंडत होते. अंजनीमातेनें सांगितलेली खूण पटतांच त्यांनीं रामाचें दूतत्व पत्करिलें. ही दूतत्वाची कामगिरी त्यांनीं अगदीं सफाईनें व उत्तम रीतीनें पार पाडली ! सीतादेवीचा शोध लावून त्या रामसेवकानें रामाची खूण पटविली, पण इतकेंच काम करून ते परत फिरते तर त्यांत फारसें स्वारस्य उरलें नसतें. "दुधाकडे लक्ष दे" असें मुलाला सांगून गेलेली आई परत येऊन पाहते तों मुलगा खरोखर दूध पिणाऱ्या मांजराकडे लक्ष देत होता कारण 'दुधाकडे लक्ष दे' इतकेंच आईनें सांगितलें होतें. "मांजर आल्यास त्याला हाकून लाव" असें कुठें म्हणाली ? असल्या 'सांगकाम्या'च्या वर्गांतील मारुतिराय नव्हते, धन्यानें सांगितलें तेवढेंच काम कोणीही सेवक करील. त्यांत विशेष तें काय ? मारुतिरायांनीं असा विचार केला कीं रामचंद्रांनीं सीतादेवीचा शोध करण्यास सांगितलें खरें, पण ज्या लंकेंत सीतामाई आहेत त्या नगरीची रचना कशी आहे, रावण कसा आहे, त्याचें सैन्य किती, तोफा, पायदळ वगैरे कांहीं आहे कीं नाहीं असें जर विचारलें तर "मी कशाला बुवा या नसत्या पंचाइती करूं ?" असें रडवें उत्तर द्यावयाचें कीं काय ? तेव्हां येथपर्यंत आलोंच आहें तर सर्व नगरीचें एकदां निरीक्षण करून आपण येऊन गेल्याची कांहीं तरी खूण ठेवून गेले पाहिजे. अशा प्रकारचा सर्वांगीण विचार करून सीतामाईच्या शोधानंतर त्यांनीं प्रथम अशोकवनिकेचा विध्वंस केला. त्यानंतर राजपुत्र अक्षाला धुळिला मिळवलें. रावणाच्या दरबारचें एक वेळ अवलोकन करून बिभीषणाच्या मनोवृत्तीचा ठाव पाहिला आणि जातां जातां आपल्या पराक्रमाची थोडीशी चुणुक दाखविण्यासाठीं लंकेला आग लावून स्वारी परत आली "सीतेचा शोध" या एका कामगिरींतच दूतत्व, शौर्य, चपलता, व बुद्धिमत्ता हे गुण एकसमयावच्छेदेंकरून आढळून आले. कित्येक राजपुत्रांना, रावणाच्या आवडत्या यक्षाला, इतकेंच काय पण

चौदा चौकडयांचा राजा रावण पण त्यालासुद्धां, वक्षस्थळावर मुष्टिप्रहार करून धूळ चारिली, लक्ष्मणाला शक्ति लागली असतांना अल्पावकाशांत इकडला पर्वत तिकडे करून जरूर असलेली वनस्पति आणून त्यांनीं लक्ष्मणाचे प्राण वांचवण्याचें श्रेय संपादन केलें हे सर्व प्रकार त्यांच्या अतुल शौर्याची साक्ष पटविणारे आहेत. जन्मतः सूर्यमण्डळ कवळावयास पाहणारी विभूति पुढें किती शौर्य गाजवणार याचा पडताळा " मुलाचे पाय पाळण्यांतच दिसतात " या न्यायानें पुरा पटला.

६ दास्य व वीर्य या गुणांचें विवेचन एथपावेतों झालें. परंतु या ठिकाणीं ही गोष्ट सांगणें जरूर आहे कीं कित्येक चांगल्या गोष्टी असून त्यांचा अतिरेक झाला म्हणजे त्याच गोष्टी नाशाला कारणीभूत होत असतात. परमेश्वराचें दास्य करण्याचे धडे आमच्या तरुणांना आईबापांकडून मिळत नाहींत ते नाहींतच पण ज्या गुरूकडून त्यांना शिक्षण मिळतें त्यांचेकडूनही या दास्यभक्तीचें शिक्षण मिळत नाहीं मग दास्यभक्तीचें वर्म त्यांच्या लक्ष्यांत कसें यावें ? तथापि अखेर ते आपला जन्म कोणा तरी मानवाचें दास्य करण्यांत घालवितातच. म्हणून त्या शालागृहांना ' हमालखाने ' अशी संज्ञा सूज्ञांकडून मिळाली आहे. परमेश्वराशिवाय ज्या कोणाचें दास्य ते पत्करितात त्यांत तरी अतिरेक न होईल अशी खबरदारी ते घेतील तर बहार होईल. परिस्थित्यनुरूप एकद्याचें दास्य करूनच चरितार्थ चालवण्याची पाळी आली तर त्याबद्दल त्याला फारसा दोष देतां यावयाचा नाहीं. सर्वांनाच स्वतंत्रतेनें व्यवहार करण्यासारखी परिस्थिति अगर कुवत असणें शक्य नाहीं हें जरी खरें धरून चाललें तरी पण ती नौकरी करीत असतांना जर तो आपलें स्वत्व पार विसरून गेला असेल, व आपल्या बुद्धीची मदत न घेतां किंवा जरूर तेथें तिचा उपयोग न करितां किंबहुना राष्ट्रांतील शहाणे लोक जो सल्ला देतील तोही न पाहतां वाटेल तेव्हां व वाटेल त्यावेळीं त्या दास्यापायीं ' आपण कोण ? ' हें विसरून जाऊन आपला आपण घात करून घेऊं लागला तर त्याच्यांत व पशूंत भेद तो काय राहिला ? कोणी म्हणतील " ज्याचा पगार आम्ही खातों त्याच्या सांगण्याप्रमाणें वागूं नये कीं काय ? " अवश्य वागावें. पण ती नोकरी स्वत्व विसरून बजावूं नये. ज्या योगानें आपल्या देशबांधवांवर जुलूम होईल, ते अन्नाला मोताद होतील, त्यांच्या पोटापाण्याच्या धंद्यावर पाणी पडेल अशीं कृत्यें आपणाकडून न घडतील ही खबरदारी प्रत्येकानें घ्यावयास पाहिजे. दास्याची जशी ही गोष्ट तशीच शौर्याची ! रावण हा कांहीं कमी शूर होता अशांतला भाग मुळींच नाहीं. तो शूर खरा पण शौर्याचा अतिरेक झाला व त्यांतच तो मेला. त्यानें जर थोडी बुद्धि खर्च केली असती तर त्याला ज्या

देवतेच्या कृपेनें तें सामर्थ्य प्राप्त झालें त्याच देवांना बंदींत टाकण्याला तो प्रवृत्त झाला नसता. तेव्हां वीर्य व दास्य या गुणांबरोबरच बुद्धिमत्ता हा तिसरा गुण मारुतिरायांच्या अंगीं होता. वीर्य कोठें व कोणाला दाखवावें आणि दास्य कोणाचें करावें या उभय वृत्तींच्या निवडीला बुद्धिमत्तेची जोड असावी लागते आणि ती तशी मारुतिरायांना होती याची साक्ष देणारी एकच गोष्ट येथें नमूद करितों:—

७ मारुतींनीं सुग्रीवाशीं स्नेह जोडिला होता. रामचंद्रांची गांठ पडल्यानंतर उभयतां रामलक्ष्मणांना आपल्या खांद्यावर बसवून मारुतींनीं त्यांना सुग्रीवाकडे आणलें. रामानें पुढें वालीचा वध करून सुग्रीवाला राज्याभिषेक केला पण त्यापूर्वीं सुग्रीवानें असें कबूल केलें होतें कीं "मी सीतादेवीच्या शोधार्थ आपणांस मदत करीन." परंतु या वचनाचा त्याला लवकरच विसर पडला. सुग्रीव तारेच्या संगतींत रममाण झाला. बरेच दिवस झाले, सुग्रीवाकडून कांहीं वर्तमान नाहीं हें पाहून रामचंद्रांनीं लक्ष्मणाला त्याच्या समाचारासाठीं रवाना केलें. मारुतिरायांनीं लक्ष्मणजीला येताना पाहिलें, आणि त्यांना पुढील प्रसंगाची कल्पना झाली. लक्ष्मणाची मुद्रा अतिशय क्रुद्ध झालेली दिसत होती. अशा अवस्थेंत सुग्रीव विषयानंदांत दंग झालेला जर दृष्टीस पडेल तर त्याचीं शंभर वर्षें पूर्ण भरलींच ! अशा प्रकारें विचार करून त्यांनीं ताबडतोब सुग्रीवाला खबर दिली. " जो एकरूप सुखदु:खपणीं गडी तो " अशा प्रकारच्या सन्मित्रांत मारुतिरायांची गणना असल्यामुळें ज्याचा एकदां स्नेह संपादन केला त्याच्यावरील भावी संकटाची त्यास कल्पना करून देऊन मदत करण्यासाठीं ते म्हणाले:—

रामेण ते कृतः पूर्वमुपकारो ह्यनुत्तमः ।
कृतघ्नवत्त्वया नूनं विस्मृतः प्रतिभासि मे ॥
त्वदागमनमेकाग्र ईक्षते कार्यगौरवात् ।
त्वं तु वानरभावेन स्त्रीसक्तो नावबुध्यसे ॥

—अध्यात्मरामायण.

८ याप्रमाणें आपल्या मित्राला जागें करून पुढील भयसूचना त्यास दिली व लागलीच लक्ष्मणाचा कोप थोडा शांत करण्याकरतां त्याला सामोरे गेले. प्रथम लक्ष्मणाला तेथील महाल, वाडे वगैरे दाखवीत दाखवीत त्यांनीं सुग्रीवाच्या महालांत प्रवेश केला तेव्हां लक्ष्मण क्रोधानें बोलूं लागला, पण मारुतिरायांनीं सर्व तयारी अगाऊच केली होती. तेव्हां सुग्रीवाला बोलण्याचा त्रास न पडूं देतां मारुतिराय लक्ष्मणाला सांगतात कीं—

आगताः परितः पश्य वानराः कोटिशः प्रभो ।

मारुतिरायांचे हे शब्द ह्मणजे प्रज्वलित आग्नीवर केलेली मेघवृष्टीच होय. लक्ष्मणाच्या कोपाचें चढलेलें मान कमी झालें. लक्ष्मणानें खालीं नजर टाकली तों काय ? पलीकडे वानरदळाचें "लेफ्ट राइट् लेफ्ट... ..." चाललें आहे. लक्ष्मण जसा रामभक्त तसाच मारुति ! परंतु यावेळीं शिष्टाई करण्यास जर मारुति सरसावले नसते तर मोठा अनवस्थाप्रसंग ओढवला असता. अशा प्रकारें लक्ष्मणाचा क्रोध नाहींसा करून मारुतिरायांच्या मधुर वाणीनें तो गारच केला, आणि परत फिरला. युक्ति आणि बुद्धिमत्ता अशी जोडगोळी हनुमंताजवळ असल्यानें त्यांना "बुद्धिमतां वरिष्ठम्" असें संबोधिलें आहे तें यथार्थ आहे. अर्थात् असलाच चतुर वीर वानरसेनेचा अधिपति (वानरयूथमुख्यम्) होण्याला लायक होता हें काय सांगण्यास पाहिजे ?

९. येथपावेतों मारुतिरायांच्या दोन तीन गुणांबद्दल यथामति लिहिलें, परंतु या सद्गुणरूपी सुवर्णमुकुटांतील दोनतीन हिऱ्यांचाच आतांपावेतों प्रकाश पडला. या मुकुटाच्या ऊर्ध्वभागीं मेरुमणीप्रमाणें शोभणारा जो जितेंद्रियत्व अथवा नैष्ठिकब्रह्मचर्य त्याचें थोडें विवरण करूं. या अत्युत्कृष्ट गुणामुळेंच बाकीच्या गुणांना मोल चढलें. गाण्डीव धनुर्धारी अर्जुनाची गोष्ट पाहिली तर तोहि मारुतिरायाप्रमाणें वीर्यवान् व बुद्धिवान् असाच होता, परंतु अखेर तो विकाराला बळी पडलाच ! "चंचलं हि मनः कृष्ण" असा दुर्बल मनाचा पाढा श्रीकृष्णापुढें त्यानें वाचला ! आपले मनोविकार आपल्या ताब्यांत ठेवता येणें हें कर्म महा कठीण आहे. सर्व कांहीं ताब्यांत येऊं शकेल परंतु मनावर ताबा चालणें दुष्कर आहे. ज्याला आपलें मन ताब्यांत ठेवतां येतें किंवा तें ताब्यांत ठेवण्याचा जो सतत प्रयत्न करीत असतो तोच पुढें कांहीं कार्य करूं शकतो. "कर्तव्यहीन नर संसारीं । नव्हे पुरुष ना तो नारी" हें वचन तरुणांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. हल्लीं तरुण विद्यार्थ्यांपुढें मोह पाडणाऱ्या किती तरी वस्तु मांडून ठेवण्यांत आलेल्या आहेत आणि शेंकडों तरुण त्या मोहाला बळी पडून आपला व राष्ट्राचा घात करून घेत आहेत ! तेव्हां या घटोत्कची मायेच्या पसाऱ्यांत आपण गुंतून न पडतां अब्रूनें बाहेर पडलों म्हणजे मिळविली ! स्वैर वर्तनी लोक कसे व्यसनाधीन होतात व स्वतःबरोबरच स्वतःच्या देशाचीही परदेशांत विद्याकला शिकण्यासाठीं जाऊनही कशी नाचक्की करतात याची माहिती वर्तमानपत्रें वाचणाऱ्या आमच्या तरुण युवकांस देण्यास नको. जे तरुण आखाडयांत जाऊन शरीर कमविण्याच्या मार्गाला लागले असतील त्यांनीं

केवळ आपल्या शरीराच्याच अकडीमध्यें राहूं नये, तर शरीराबरोबर मन कमविण्याचा अभ्यास केला पाहिजे. शरीर कमावलेलें असलें म्हणजे मनावर ताबा चालवतां येतो हें कांहीं खोटें नाहीं. परंतु सर्वांनींच याबद्दल विचार केलेला आढळून येत नाहीं. त्यामुळें लहानपणीं ज्यानें शरीर कमविल्याबद्दल पदकें मिळविलीं, कुस्त्या जिंकल्या व ज्याला त्याचे मित्र डोक्यावर घेऊन नाचले तोच पुढें कमकुवत मनामुळें सर्वांच्या उपहासास कारणीभूत होतो! असले अर्धेकच्चे तरुण मायेच्या बाजारांत गिरक्या खात स्वतःचें जीवित व वित्त मातीमोल करतात, म्हणून मनोविकार ताब्यांत ठेवण्याचा प्रत्येकाचा अहर्निश प्रयत्न पाहिजे. प्रत्येक आखाड्यानें चहा, कॉफी वगैरे पेयें, पांचट गोष्टी, नाटकें, सिनेमा (मग ते कितीही धार्मिक असोत वा ऐतिहासिक असोत) यांवर सक्तीचा बहिष्कार घालून त्यांतील प्रत्येकानें हा नियम कडकरीतीनें अमलांत आणावयास पाहिजे.

१०. अलीकडील तरुणांनीं तर ब्रह्मचर्याची विटंबनाच मांडली आहे. ती पाहून कोणालाहि दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. तरुणांचें शिक्षण ज्या कॉलेजांतून व गृहांतून होतें तेथें विवाहित व अविवाहित अशा मुलांच्या गांठी भेटी नित्य पडत असल्यानें ज्या गोष्टींविषयीं पूर्वी २०।२२ वर्षांच्या वयापर्यंत माहितीही नसे त्या आतां व्रतबंध न झालेल्या बटूलांही संपूर्ण ठाऊक असतात! त्यामुळें बाष्कळपणाला अगदीं ऊत आलेला असतो. तरुणांची ही अधोगती कशामुळें होते याचा कोणी विचार केला आहे काय? माझ्या मतें विद्यार्थ्यांभोंवतीं जें मोहाचें जाळें दिवसेंदिवस अधिकाधिक पसरलें जात आहे त्याचा हा परिणाम आहे. विद्यार्थ्यांच्या ब्रह्मचर्यव्रताचा भंग करणारी, आचरटपणास व टारगटपणास प्रवृत्त करणारी व शील बिघडविणारी जर पहिली कोणची गोष्ट असेल तर ती नाटकें आणि सिनेमा व कादंबऱ्या गोष्टी वगैरे यांचें अतिरिक्त दर्शन हीच. यांत अश्लील वाङ्मयाची भर पडून त्याचेंही वाचन विद्यार्थीवर्ग मोठ्या आस्थेनें करीत आहे! उद्बोधक, ऐतिहासिक, पौराणिक, असें इतर वाङ्मय कुजत पडलें असतांना याच वाङ्मयाचा जो खप आहे त्यावरून याची कल्पना होईलच! मुलांनीं व्रतस्थ असेपावेतों नाटक–सिनेमा पाहूं नये व एकही कादंबरी वाचूं नये, अशा मताची कांहीं जुनी मण्डळी आढळतात व त्यांच्या म्हणण्यांत सत्य आहे असें वाटूं लागतें. कारण कांहीं चांगलीं नाटकें अगर कादंबऱ्या जरी मुलांनीं वाचल्या तरी त्यांतला चांगला, अनुकरणीय असा भाग नेमका वगळून त्यांतील फाजील, चावट अथवा रोमँटिक (!) कथाभाग मात्र तीं हटकून लक्षांत ठेवीत असतात; आणि यामुळेंच सर्व घात होतो. तिसरी गोष्ट विद्यालयातर्फे नाटकें करण्याचा व मुलांना स्त्रीपार्ट देऊन त्याचें नेपथ्यपाठ देण्याचा जो प्रघात

अलीकडे सर्रास पडत चालला आहे तो परिणामीं अत्यंत घातक आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. स्त्रीपार्टीकरितां जीं सुस्वरूप मुलें निवडण्यांत येतात त्यांच्या मागें पाजी मुलांचा ससेमिरा सारखा लागलेला असतो. ज्या विद्यालयांतून नीतीचे पाठ द्यावयाचे त्याच विद्यालयांतील गुरूंनीं पदर कसा सारावा, मुरका कसा व किती बेताचा मारावा असले नीतिभ्रष्टतेचे व षंढपणाचे पाठ पुरुषास देण्यास प्रवृत्त व्हावें यासारखी अनुचित तर खरीच पण लांछनास्पद गोष्ट दुसरी कोणती आहे? आमच्या सुशिक्षित शिक्षक वर्गाचें हें काम खास नव्हे. त्यांना दुसरीं किती तरी कार्यें आहेत. मुलांना कांहीं धार्मिक शिक्षणाचें, व्यायामाचें, प्रचलित चळवळीचें, आधिभौतिक शास्त्राचें व त्यांतील हल्लींच्या प्रगतीचे पाठ देण्यास मुबलक क्षेत्र आहे पण तिकडे लक्ष कोण देतो? यानंतर चौथी गोष्ट गृहशिक्षणाची. या बाबतींत तर आनंदीआनंद आहे! पालकांची वर्तणूक घरीं फारच शिस्तीची, सभ्येतची व बाळबोध वळणाची असावयास पाहिजे. ती तशी नसेल तर

यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः ॥

या न्यायानें बालकें त्यांचेंच अनुकरण करितील यांत काय आश्चर्य? मुलांच्या शीलाचीं व नीतिमत्तेचीं माती करणारीं साधनें नाहींशीं करून त्यांना तेज बळ संपादन करितां येईल व या मायदेशाचें यश उज्वल करण्यास भावी आयुष्यांत ज्यांचा टिकाव लागेल अशी कांहीं तरी व्यवस्था ठिकठिकाणीं होणें अवश्य आहे.

मारुतिरायांच्या चरित्रापासून ब्रह्मचर्याचा पाठ घेऊन तो प्रत्येकानें गिरविला पाहिजे. केवळ ब्रह्मचर्याच्या जोरावर सीतामाईचा शोध व मुक्तता त्यांच्याकरवी झाली. आज आपली स्वातंत्रदेवी अशीच हिरावून नेलेली आहे. हिंदी तरुणांचा पदोपदीं अपमान होत आहे तेव्हां अशा अवस्थेंत खडतर ब्रम्हचर्य व्रताचा अवलंब करून तेजःपुंज व सत्वस्थ अशी पिढी निर्माण होणें आवश्यक आहे. स्वातंत्र्यलक्ष्मीला सोडवून तिच्या कंठांत 'हिंदवीस्वराज्यमाला' घालू पाहणारे ब्रह्मचारी हिंददेवी हुडकीत आहे, तिची इच्छा पूर्ण करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय.

मारुतिराय, ज्ञानोबाराय, समर्थ रामदास यांच्याप्रमाणें आजन्म ब्रह्मचर्य आमच्याकडून कधीं पाळलें जाईल ते जावो!

जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें अंगें।
तेथूनि जन्म आघवे। सोवळें कीजे ॥

—ज्ञानेश्वरी.

ही ब्रम्हचर्याची व्याख्या पाहिली म्हणजे मान खालीं घालण्याचा प्रसंग येतो ! मारुति–रामदासादिकांच्या ब्रम्हचर्यापुढें आमचें सांप्रतचें ब्रम्हचर्य जर ठेविलें तर सर्वत्र अंधार दिसूं लागेल ! मारुतिराय धन्य आहे तुमची. लक्ष्मणा ! आपण सीतामाईच्या सहवासांत इतका काल घालविलांत परंतु

नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुण्डले

हे जे आपण उद्गार काढले ते साऱ्या जगाला ललामभूत असे होत. सीतादेवी अरण्यांत निद्रित असतां वल्कलें परिधान केल्यामुळें साहजिक वित्रस्त्र झालेल्या भागाकडे आपली दृष्टी देखील गेली नाहीं तेव्हां आपली धन्यता अधिक काय वर्णन करावी ? अशा प्रकारचें असिधाराव्रत आपण अंगिकारलें म्हणूनच आपणाकडून इंद्रजितासारख्या दुर्दमनीय शत्रूंचा वध झाला. आपणासारख्या तेजस्वी, शूर व जितेंद्रिय अशा तरुणांची आमच्या राष्ट्राला फार उणीव भासत आहे म्हणून भारतीय तरुणांना ब्रह्मचर्यव्रताचें परिपालन करण्याची बुद्धि मारुतिराया ! आपण द्या हेंच मागणें आहे.

११. मारुतिरायांचे उत्सव चैत्रशुद्ध पौर्णिमेला सर्वत्र साजरे होत आले आहेत व होतीलही. पण ते साजरे करीत असतांना मारुतिरायांच्या आंगचे गुण आपल्या अंगीं अंशतः तरी उतरतात कीं नाहीं याची झडती प्रत्येक हनुमानजयंतीला विद्यार्थ्यांनीं बजरंगबलीच्या सगुण साक्षात्कार मूर्तीला साक्ष ठेवून द्यावी. आपल्याकडून अनुकरण होत नसेल तर उत्सवाचा खटाटोप व्यर्थ केला असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. समर्थसांप्रदायिकांचा मारुति हा मोठा आधार आहे. श्रीसमर्थांनीं आपला अनुभव अनेक ठिकाणीं नमूद करून ठेविलेला आहे. मारुतिरायावरील स्फुट ओव्या व भीमरूपी स्तोत्रें प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं एका स्फुटांत समर्थ म्हणतात—

कष्टी जाला जीव, केली आठवण । पावलें किराण मारुतीचें ॥ १ ॥
संसारसागरीं आकांत वाटला । भुभुःकार केला मारुतीनें ॥ २ ॥
मज कोणी नाहीं मारुतीवाचूनी । चिंतिता निर्वाणीं उडी घाली ॥ ३ ॥
उडी घाली मज अनाथाकारणें । तेणें माझें केलें समाधान ॥ ४ ॥

याप्रमाणें समर्थांचा अनुभव आहे. आमच्या विद्यार्थिमण्डळीचें इकडे लक्ष आहे काय ? पण तरुणांची प्रवृति साधारणतः अशी असते कीं त्यांना फलश्रुती सांगितल्याविना तीं कार्यप्रवीण होत नाहींत. " गोदामाईचें स्नान करा " असें नुसतें सांगण्यानें त्यांना नदीवर जाण्याची प्रवृत्ति हल्लीं तर मुळींच होत नाहीं. ते ह्मणतील चावीखालीं बसून गोदामाईचें स्मरण करूं. पण त्यांना जर असें सांगितलें कीं बाबारे ! हल्लीं असा शोध लागला आहे कीं वाहत्या पाण्यांत एक प्रकारचा विद्युत्प्रवाह ( इलेक्ट्रिक करंट ) सुरू असतो व

त्यायोगानें प्रकृति साफ राहण्याला फार मदत होते. येणेंप्रमाणें अर्वाचीन दृष्टया फलश्रुति कळली कीं तो नेमानें स्नान करून येतो. याच न्यायानें मारुतिउपासनेची फलश्रुती काय हें नमूद करणें जरूर वाटतें. समर्थ सांगतात—

हा तो ईश्वरी अवतार। भीम सकळांसी आधार॥
रामध्यानीं निरंतर। भक्तराज॥
राम गेले वैकुंठासी। तैं निर्विलें हनुमंतासी।
तुवां माझिया भक्तासी। सांभाळावें।
रामदासाचा सारथी। विघ्नें चळचळां कांपती।
पावे संकटीं मारुती। भर्वशानें॥

× × × ×

रघूराज वैकुंठधामासि गेले। तधी मारुतीदास हे नीरवीले।
रघूनाथ—ऊपासकाला प्रसंगें। सख्या मारुती! पाव रे लागवेगें॥ १॥
प्रभूचें महावाक्य त्वां साच केलें। ह्मणे दास हे प्रत्यया सत्य आलें।
जनामाजि हें सांगतां पूरवेना। अवस्था मनीं लागली हे सरेना॥

समर्थांना जाऊन कांहीं फार अवधी लोटला नाहीं. श्रीसमर्थांनीं शिवछत्रपतीला आणि सामान्यपणें सर्वांना उद्देशून अशी आज्ञा केली कीं,

लघूशी परी मूर्ति हे हाटकाची। करावी तथा मारुती नाटकाची॥
असावी सदा ताइतामाजि दंडीं। समरंगणीं पाठ दीजे उदंडीं॥
ठसा हेमधातूवरी वायुसूतू। तथा ताइताचेपरी रौप्य धातू॥
तयाची पुजा मंदवारीं करावी। बरी आवडी आर्त पोटीं धरावी॥
स्वधामासि जातां प्रभू रामराजा। हनुमंत तो ठेविला याच काजा॥
सदासर्वदा रामदासासि पावे। खळीं गांजितां ध्यान सोडून धांवे॥

अशा प्रकारच्या मारुतिरायांची उपासना बालगोपालांनीं करण्याचा आळस करूं नये. मारुतीला आपण आपलें सर्वस्व अर्पण केलें कीं, 'तयाची सर्वही चिंता मारुती तुजला असे' असें दिनकर स्वामी म्हणतात. ते पुढें असें म्हणतात कीं:—

नसे हे अन्यथा वाणी। प्रत्यक्ष साक्ष बाणली॥
आणि आज्ञा समर्थांची। म्हणोनि अन्यथा नव्हे॥

असो, मारुतिरायांची महति श्रीसमर्थांच्या व दिनकर स्वामींच्या तोंडूनच सांगण्यास सांपडते. अशा प्रकारच्या या देवतेची उपासना सर्वांकडून घडून त्यांचे ठायीं आत्मप्रतीती येवो अशी प्रार्थना करून आटोपतों. बोला बजरंग बली की जय!

॥ श्री मारुतिरायार्पणमस्तु॥

# कीटक युग्म.

( लेखक—माधव गोविंद भिडे )

हा क्षुद्र जंतु शिरला सुमनीं न तोंच ।
माळी प्रफुल्ल बघुनी खुडि पुष्प तेंच ।
मोहांध कीटक रमे खुडिल्या फुलांत ।
नेणें स्वकीय विधिनिर्मित घोर घात ॥ १ ॥

माळी दुकानिं उतरी जंव फूलपाटी ।
पीडा किडा न वळखे सुख शुष्क घाटीं ।
तें म्लान होय रसहीन जरी सुपुष्प ।
हा जन्तु ढाळि नच अल्पहि नेत्रबाष्प ॥ २ ॥

कोशस्थ सर्व रस चाटुनि तुंद धुंद ।
तेथेंच देह पसरी मग लांब रुंद ।
तेव्हां सुमासह खिळीत विसूचिका त्या ।
हा हंत काय रचिलेंस अरे विधात्या ! ॥ ३ ॥

हालावया तडफडोन बघे किडा हो
नाहीं अशास उपलब्धचि मुक्ति लाहो
होता तुऱ्यांत उदरंभर बंदिवान
कारागृहासह निघे मग धिंड छान ॥ ४ ॥

नेला कुणी चढविला हरिदासमाथां
जो देतसे अलसमग्न जनांस संथा
बोला म्हणे सुजनहो अजि रामकृष्ण
पाहे स्वयें धनिक तों नयनें सतृष्ण ॥ ५ ॥

कुंथोनि सांगत कथा हलवीत डोकें
देतो तुऱ्यांतिल किडयास यथेष्ट झोंके
खालील मानव—किडा विषयांत दंग
तैसेंच वाहत किडा मलिनांतरंग ॥ ६ ॥

झाली कथा कथक जाय घरा विचारा
गेला सर्वे विसरुनी परमार्थ सारा
देवालयाप्रतहि येउनि तर्वि कोरा
गेला किडा उकिरडयाप्रति सर्व हेरा ! ॥ ७ ॥

# अमृतराय.

( शके १६२०—१६७५ )

भवभय निरसावें निरसावें । आत्मसुखांत असावें ॥ १ ॥

१ हा विख्यात व लोकप्रिय कवि मूळचा राहणारा वऱ्हाड प्रांतांतला; साकरखेरडें, तालुका चिखली, येथील कुळकर्णी. याच्या आईचें नांव उमा व बापाचें नांव शंकर. पोरपणच्या हूडपणामुळें यानें मध्वमुनीश्वर या साधूची एकदां थट्टा केली, तेव्हां तो शांतपणानें एवढेंच म्हणाला, "बाबारे ! परमेश्वरानें तुला अमृतासारखी गोड वाणी दिली आहे तिचा तूं असा अपव्यय कां करितोस ? ती त्याच्याच गुणवर्णनांत खर्च केलीस तर तो तुजवर प्रसन्न होईल व तुझ्या जन्माचें सार्थक तरी होईल ! हा बोध अमृतरायाच्या मनावर ठसला व त्याची वृत्ति पालटली. याच प्रसंगावर त्यांनीं पुढील मनोहर पद रचिलें असावें असें मला वाटतेः—

**पद.**

ब्रह्मसुखें सुखरूप असावें ॥ ध्रु० ॥ श्रीसद्गुरुवरदानकृपेचें
बळ हृदयांत अमूप ॥ १ ॥ गुणदोषांस्तव अधरकपाटीं ।
दृढतर मौन कुलूप ॥ २ ॥ हरिगुरुकथन किली गुरुआज्ञा ।
अमृत धरी अपरूप ॥ ३ ॥

२ रायजींचे गुरु कोण होते याविषयीं चांगलासा निर्णय करितां येत नाहीं. कोणी म्हणतात कीं मध्वमुनींचे गुरु अद्वैतानंद यांचाच त्यांनीं अनुग्रह घेतला. पैठणाकडे अशी समजूत आहे कीं मध्वमुनी हेच अमृतरायाचे गुरु होत, व रायजींच्या एका पदांत 'श्रीगुरुमध्वनाथपर अमृतराय बलहारी' असा एक चरण आहे त्यावरून व खुद्द पैठणास रायजींच्या कवितेचें एक जुनें बाड मला मिळालें आहे त्यांतल्या एका पदांतल्या 'मध्वमुनीश्वर सद्गुरुनाथजि आवडला मजला' या चरणावरून वरील समजुतीस बळकटी येते. रायजीला मध्वमुनींनीं प्रथम सन्मार्गाला लावलें व त्यांच्या पवित्र संगतींत त्यांचे पूर्ववय गेलें होतें या गोष्टी खऱ्या आहेत व त्यामुळें रायजींची मध्वनाथाविषयीं गुरुबुद्धि असणें स्वाभाविक आहे. रायजीनें 'अविनाश संदेहहरण' या ओवीबद्ध प्रबंधांत आपली गुरुपरंपरा दिली आहे, तींत शृंगेरीच्या शंकराचार्यांच्या परंपरेंतले अंबिकासरस्वती यांचा अनुग्रह आपणास झाला असें म्हटलें आहे; व शिवाय त्यांच्या पदांतही 'अंबाजिता अमृतपावन नाम ज्याला,' 'अमृतमनोरथ अंबा फळला' याप्रमाणें त्यांचा उल्लेख केलेला आहे ! रायजींचे शिष्य सिद्धेश्वरबाबा यांच्या गुरुपरंपरेच्या 'पूर्णानंद ज्ञानानंद

अमृतराय सिद्धराजगुरु ' या आर्यार्धावरून अमृतरायांचे गुरु ज्ञानानंद होते असें सिद्ध होते ! ! याप्रमाणें अमृतरायांचे गुरु अद्वैतानंद, मध्वमुनीश्वर, अंबिकासरस्वती व ज्ञानानंद असे चौघे ठरतात ! दुसऱ्याचा व तिसऱ्याचा उल्लेख स्वतः रायजीच करितात तेव्हां त्याविषयीं शंका घेतां येत नाहीं; सिद्धेश्वरबाबा त्यांचे साक्षात शिष्य होत तेव्हां त्यांचीही परंपरा विश्वसनियच मानली पाहिजे ! तेव्हां हें मला तर कोडें पडलें आहे व याचा उलगडा करायचा मार्ग सध्या तरी कांहीं दिसत नाहीं.

३ अमृतरायानें बरींच वर्षे औरंगाबादेस मोंगलांचे मुत्सद्दी विसामोरे यांच्या हाताखालीं नौकरी करण्यांत घालविली. सर्वच साधु मोठे निःस्पृह व निर्भीड असतात. सेवाधर्माला अवश्य लागणारा मवाळपणा त्यांचे ठायीं तिळमात्र नसतो. सेवाधर्म हा सामान्यतः सर्व पुरुषत्व, सर्व कर्तृत्व व सर्व तेज लोपविणारा आहे. रायजींना नोकरी कशी सोडून द्यावी लागली याचें वर्णन ' **भक्तमंजरीमाले** ' ( अ. ८४ ) मध्यें आहे, तें असें:—

पालखीपदस्त वडिलार्जित । पातशाहाचा कारभार करीत ।
जयाचे स्वाधीन चारशत । आज्ञांकित कारकुन पैं ॥ ३२ ॥

विसामोरू दिवाण । पातशाहाचा असे पूर्ण ।
तयाअंगीं रजतम दारुण । वर्तती गुण अतिशय ॥ ३३ ॥

रायजींची वैराग्यभक्ति व पातशाहाचा लोभ यामुळें चिडून जाऊन विसामोरो रायजींचा द्वेष व छळ करूं लागला. एके दिवशीं विसामोरोनें विनोदानें कलमदान मागण्यासाठीं रायजींकडे जासूद पाठविला. तेव्हांची दरबारी रीत अशी होती कीं एखाद्या सेवकावर स्वामीची गैरमर्जी झाली म्हणजे त्याची लेखणी मागून घ्यावयाची. वरिष्ठानें शिपायाचा पट्टा व कारकुनाची लेखणी मागून घेतल्यावर तेथें मानधन पुरुष क्षणभरही रहात नसत. रायजींकडे विसामोरोचा जासूद कलमदान मागावयास आला तेव्हां ते ध्यानस्थ होते. समाधिव्युत्थानानंतर त्यांनीं त्यास कमलदान दिलें व तें कायमचेंच दिलें ! पुन्हां ते सेवाकर्मांत शिरले नाहींत.

' निघाला कंटक पायांतील । कीं नेत्रांमाजी खुपतां हरळ '

असें त्यांस वाटलें व ते स्वसंतोषानें औरंगाबाद सोडून पैठणास नाथांच्या पायांशीं गेले. त्यांनीं ' डुलता श्रीगंगाके तटमों अमृतराय ' असें एका हिंदुस्थानी पदांत म्हटलें आहे. असो, नौकरी सोडल्यावरः—

अष्टौ भाव रायजींस । प्राप्त जाहले त्या समयास ।
वीणा घालुनि गळ्यास । बांधिले पायास घुंगुर पै ॥ ४५ ॥

चिपळ्या शोभती वामकरीं । नृत्य करिती अतिकुसरी ।
भजन जयाचें मधुरस्वरीं । नाहीं सरी दुजी तया ॥ ४६ ॥

याप्रमाणें रायजी सेवाधर्मास विटले व हरिभजनीं लागले. पैठण येथील जुन्या वाडांत पुढील अति सुंदर पद मला सांपडलें आहे त्याचा 'खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान' होण्याची हौस बाळगणारांनीं अवश्य विचार करावा! बाणेदार तरुणांनीं तर तें पद आपल्या हृत्पटलावर निरंतर कोरून ठेवावें !

**पद**

स्वाधीनत्वें हरिसि भजावें । परि पराधीन न व्हावें ॥ धृ० ॥
भीक न मिळे ब्राह्मणाघरीं । तरि हिंडावें महाराद्वारीं ॥ १ ॥
भूक लागल्या भिक्षेस जावें । किंवा बांधुनि उदर निजावें ॥ २ ॥
होतां उपवास धैर्य धरावें । पोट कांट्यानें भरावें ॥ ३ ॥
**अमृतत्वीं** चित्त असावें । दुःख येइल तें सोसावें ॥ ४ ॥

४ धुंडिराज मालुकृत 'भक्तकथामृत' ग्रंथांतही विसामोरोचें नांव आहे. नौकरी सोडण्यापूर्वींच अमृतरायांना नौकरीचा वीट आला होता व खरें वैराग्य त्यांस प्राप्त झालें होतें.

**पद**

अशाश्वत संग्रह कोण करी ॥ धृ० ॥
नित्य नवें जें देइल माधव । भक्षूं तेंचि घरीं ॥ १ ॥
नित्य मिळेल तें नित्यचि भक्षुनि । चिंतिन देव हरी ॥ २ ॥
सांडुनि सेवा कल्पतरूसम – । भिक्षा हेचि बरी ॥ ३ ॥
**अमृत** म्हणे मज भिक्षा डोहळे । उठति अशा लहरी ! ॥ ४ ॥

५ सेवाधर्म सोडून तुम्हीं घरीं बसला तर हरी तुम्हांला उपाशी राहूं देत नाहीं हें रायजींनीं 'चिंता प्राण्यांची हरिला,' 'अखंड हरि हरि वदारे बापांनो' वगैरे पदांत सांगितलें आहेच. 'संतांचा सेवक होउनि श्रीहरिलागीं भजेना' या कटावांत धनिकाच्या दारीं कुत्र्यासारखें लोळणाऱ्या मूर्खांचा रायजींनीं खूप समाचार घेतला आहे. "अधिक हांव तो मनीं धरुनियां लटंबरातें वागवुनिया विटंबनेनें कुटुंब पोशी" याप्रमाणें त्यांनीं 'जी हुजूर' करणाऱ्या सेवकाचें हुबेहुब वर्णन केलें आहे! प्राणिमात्राला प्रिय असणारें स्वातंत्र्य गमावून मनुष्य दुसऱ्याची थुंकी झेलायला कां तयार होतो याचें कारण अमृतराय सांगतात कीं हें केवळ स्वस्वरूपाच्या अज्ञानाचें फळ होय! "आपण असतां आत्माराम । केवळ औपनिषद्विश्राम । चित्तीं चिंती नाना काम!" दाराधनसुतधाम हीं सुखाचीं साधनें आहेत अशी मनुष्याची जोंपर्यंत कल्पना आहे तोंपर्यंत तो 'प्रपंचाचें लटांबर मानेवर वागवून विटंबनेनें कुटुंब पोसण्याचा' उद्योग सोडणार नाहीं! अशांची स्थिति पाहून 'अमृत म्हणे काधि छंद हा जाईल रुपये मोजायाचा!' स्वतःबद्दल विचाराल तर अमृ-

तराय एका पदांत सांगतात कीं ‘ अमृत हरीभजनास्तव धंदा सोडुनि फिरत रिकामा ! ’

६ अमृतरायांना तीव्र वैराग्य उत्पन्न व्हावयास दुसरेंही एक कारण झालें. त्यांना स्त्रीसौख्य बहुधा आंवळयाएवढें होतें ! संताला भार्या नेहमीं अनुरूप मिळतेच असें नाहीं. कबीरएकुनाथांसारखे भाग्यवंत थोडेच कीं ज्यांना बायकाही त्यांच्याच तोलाच्या मिळाल्या, निदान ज्या त्यांच्या संगतीनें त्यांच्याच तोलाच्या झाल्या ! पण असे भाग्यवंत विरळ ! जगांत बहुधा जिजाबाया–नव्हे झांटिप्याच–फार ! पुरुषाच्या आध्यात्मिक उन्नतीची यथार्थ किंमत जाणणारी भार्या मिळणें ही मोठया पुण्याईची गोष्ट आहे. स्त्रीची आध्यात्मिक योग्यता ओळखणारे पतिही फार नाहींत. अनुकूल, कुळज, कुशल, व सुशील असें जोडपें अत्यंत दुर्मिळ आहे. रायजींचे समकालीन निरंजनमाधव, मोरोपंत व शिवदिनकेसरी यांचा गृहाश्रम सुखकर झाला व रायजींच्या संसाराचे धिंडवडे निघाले ! याचें कारण पहिल्या तिघांना भार्या चांगल्या मिळाल्या व रायजींच्या कपाळीं एक त्राटिका लिहिली होती ! रायजींनीं आपल्या बायकोचें हास्यरसोत्पादक वर्णन केलें आहे तें पहाः—

**श्लोक**

मागे ती लुगडी, सकाप बुगडी, आठां दिसां बांगडी,
घालीते फुगडी, कधीं न रगडी, फाडीतसे आंगडी ।
खैराची सगडी तसी धडधडी, तोंडाळ मोठी खुडी,
सोन्याच्या लगडीस देखुनि गडी, ऐशी महा धांगडी ॥ १ ॥
दारीं देत कडी, सदा कडकडी, बोले महा वांकडी,
दाणे चोरुनि फांकडी न कळतां घेते मुळे कांकडी, ।
खाते ती जसि माकडी, वसवसी दांतीं दिसे खेचडी,
या योगें अमृतेश्वरासी रुचली गंगातिरीं झोंपडी ! ! ॥ २ ॥

हें वर्णन जर मुळाला धरून असेल तर रायजींची बायको विलक्षण कृत्या होती असेंच म्हणावें लागेल ! या श्लोकांचे भाषापद्धती व हास्योत्पादक वर्णन यावरून असें वाटतें कीं रायजींचा स्वभावही जास्त चेष्टेखोर असावा ! वरील वर्णन रायजींच्या बायकोचेंच आहे असें मानायचें कारण नाहीं, तें कदाचित् दुसऱ्या एखाद्या स्त्रीचें वर्णन असेल किंवा काल्पनिकही असेल असें कै. वामनरावजी ओकांचें मत होतें. पण त्यांचें लक्ष वरील श्लोकांच्या शेवटल्या चरणाकडे गेलें नसावें असें दिसतें. शिवाय रायजींचीच पुढील पदें पहा ! :—

१

बाईल पैशाची पैशाची । कधीं नव्हे पुरुषाची ॥ ध्रु. ॥
जोंवरि धनसुत जोडी । तोंवरि लावी लाडीगोडी ॥१॥

वेडा बाहिरा पिसा । त्यासीं देखुनि करि कर्कशा ॥ २ ॥
अमृतराय तुज सांगे । मजला प्रचीति आली आंगें ।

२

किती करशिल बाइलरे । बाइलरे । बाइल तुज खाइल रे ! ॥ ध्रु० ॥
बाळी बुगडी चोळी लुगडी । ऐसी सगडी लाविल रे ॥ १ ॥
अटक चटक मटक दावुनी । मन तुझें मोहिल रे ॥ २ ॥
अमृत म्हणे तुज जवळी पैसा । तोंवरि गीत गाईल रे ! ॥ ३ ॥

रायजींचें हें मत सामान्य व्यवहाराच्या दृष्टीनें सर्वथा खोटें नाहीं. तुकोबापासून रामजोशापर्यंत बहुतेक कवींनीं स्त्रीजातीबद्दल असाच अभिप्राय दिला आहे ! रायजींचा अनुभव शिवदिनकेसरींच्या अनुभवाच्या मात्र उलट होता, दोघेही पैठणास शेजारीं शेजारीं राहत होते. दोघेही संत होते, कवि होते, विरक्त होते, पण दोघांना संसाराबद्दल अनुभव निराळा आल्यामुळें त्यांच्या मतांतही भिन्नपणा उत्पन्न झाला. 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला । तो नर भला भला' असें शिवदिन केसरी म्हणतात; व 'प्रपंच हा हरिभजनासि विरोध ! ' असें रायजी ठांसून सांगतात !! सत्य दोघांकडेही आहे पण अनुभव वेगळाले पडल्यामुळें त्यांच्या उक्तींतही वेगळेपणा आला आहे ! रायजींसारखाच अनुभव तुकोबासही आला होता असें त्यांच्या पुढील अभंगावरून दिसतें.

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगें वारावार करोनि ठेवी ॥ १ ॥
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ॥ २ ॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । या लागीं कर्कशा पाठी लावी ॥ ३ ॥
तुका म्हणे मज प्रचीत आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥४॥

७ रायजी मोठे योगी होते; त्यांचें वैराग्य अत्यंत कडकडीत होतें; त्यांची वाणी पराकाष्ठेची मोहक होती; संस्कृत, मराठी, हिंदी, फारसी, अरबी, उर्दू या भाषांचें त्यांचें ज्ञान अगाध होतें; व्यवहाराच्या अनेक बाजूंचें त्यांस फार सूक्ष्म ज्ञान होतें; त्यांची कोणताही विषय वर्णन करून तो प्रत्यक्ष पुढें उभा करण्याची हातोटी केवळ अप्रतीम होती; असें अनेक गुण त्यांत वसत होते. ' अशाश्वत संग्रह कोण करी' ह्या त्यांच्या उक्तीप्रमाणें त्यांचा निरिच्छितेचा व निःसंगतेचा बाणा होता. कृष्णदयार्णवांचा योग जन्मभर दुःख भोगण्याचा होता, त्याच्या उलट अमृतरायांचा योग मरणांत ऐश्वर्य भोगण्याचा होता. अमृतराय नित्य प्रभातकाळीं निर्वातस्थानीं सहजसमाधी लावून बसत. ' वैराग्यभाग्यासारखें भाग्य नाहीं ' हें त्यांचें पद ऐकून त्यांच्या दर्शनाची लालसा मनांत धरून एक काशीस्थ शास्त्री एकदां त्यांजकडे आले. त्यांचा तो राजविलासी थाट पाहून त्या शास्त्र्याला मोठा राग आला व तो म्हणाला, ' वैराग्यभा-

त्यासारखें भाग्य नाहीं असें नुस्तें तोंडानें म्हणणें सोपें आहे पण करणी करून दाखविणें कठीण आहे ! ' अमृतराय म्हणाले ' मी मनांतून सर्व प्रपंचसुखांना विटलों आहें, पण देहप्रारब्ध भोगल्याविना सुटत नाहीं. मीं नको नको म्हणतां हीं सुखें माझ्यामागें लागतात, त्याला मीं तरी काय करूं ? मला शालजोडी व रगटें, जिलबी व भाकरी, हीं सारखींच आहेत ! ' शास्त्रीबोवा जास्तीच रागावले व अमतरायास म्हणाले, 'चला आपण आज रानांत जाऊं' अमतराय म्हणाले ' ठीक आहे. ' दोघेही खूप लांब दहा बारा मैल चालून गेले. अमृतरायाला एका झाडाखालीं बसवून शास्त्री नजीकच्या खेडयांत भिक्षा मागावयास गेले. अधल्या दिवशीं अजीर्ण झालें होतें त्यामुळें सहजच चालण्यामुळें अमृतरायांचें पोट साफ झालें, व त्यांस तीव्र क्षुधा लागली. इतक्यांत अमृतरायांचा एक मोठा सरदार–शिष्य शिकारीनिमित्त अकल्पित तेथें आला. त्यानें तेथेंच डेरे राहुटया ठोकल्या, तों त्यास गुरुमूर्ति वृक्षाखालीं ध्यानस्थ बसलेली दिसली. तेव्हां त्याला परम हर्ष झाला. त्यानें गुरूस चौरंगावर बसवून अभ्यंगस्नान घातलें, व चंदनाच्या पाटावर बसवून गुरुपूजा केली. भोजनाची तयारी झाल्यावर त्यानें उच्चासनीं गुरूस बसवून पंचपक्वान्नाचें ताट पुढें ठेवलें, इतक्यांत शास्त्रीबोवा तेथें प्राप्त झाले ! तों त्यास अमृतराय पहिल्या जागीं दिसेनांत. हातांत भिक्षेची झोळी असलेल्या त्या शास्त्रीबोवांना शिपायानें रायजींपुढें नेलें. अमृतरायाचें तें ऐश्वर्य पाहतांच शास्त्रीबोवा फार खजील झाले, फार ओशाळले, तेव्हां अमृतराय त्यास म्हणाले, " शास्त्रीबोवा ! काय करावें ! देहप्रारब्ध भोगल्याशिवाय सुटत नाहीं ! हें ऐश्वर्य मला सोडीत नाहीं व तुमची ती झोळी तुम्हांला सोडीत नाहीं ! कर्मांचा क्षय भोगल्याशिवाय कधींही होत नाहीं ! " शास्त्रीबोवा अमृतरायाचे शिष्य झाले । ही गोष्ट प्रसिद्ध आहे व भक्तमंजरीमालेंतही अशीच सांगितली आहे. अमृतरायांचा स्वभाव मोठा विनोदी, विलासी, व दिलदार असे. पुणें मुक्कामीं नानासाहेबांच्यापुढें शनिवारच्या वाडयांत अमृतरायांचें एकदां कीर्तन झालें होतें. अमृतरायांची निष्ठा भागवतावर फार होती व श्रीएकनाथमहाराजांच्या ठिकाणीं त्यांची आत्यंतिक भक्ति होती. कीर्तनांत व कवितेंत त्यांचा सर्वकाळ उपदेश हा असें कीं ' भागवत वाचा म्हणजे तुम्ही कृतार्थ व्हाल. ' नाथांच्या पायीं उत्तरवय घालवावें अशा हेतूनें ते पैठणास रहायला गेले. त्यांचें नाथांवर एक हिंदुस्थानी पद आहेः " सज्जनमनसुमेरू गुणनिधि एकनाथ परमपुरुख परमभागवत अवतरे. " अमृतराय पैठणास गेले तेव्हां तेथें ब्रह्मरात नांवाचे एक सिद्ध नाथांच्या समाधीमंदिरांत भागवतावर पुराण सांगत असत. अमृतरायांनीं एका पदांत त्यांचें सुरस वर्णन केलें आहे. ते 'अंशुकविरहित' ( नग्न ) असत व " श्रुतिमथित भागवत कथित मलिनमति भविह्नानि उलथित, आशु अनु-

दिनिं हरि हरि हरि करित " शुकाप्रमाणें विहरत होते. तो काळ मोठा पवित्र होता. निदान पैठणांत अनेक विद्यमान संतमुनि होते. केसरीनाथ व कृष्णदयार्णव समाधिस्थ झाले होते तरी दयार्णवांचे शिष्य उत्तमश्लोक हे पैठणास व सनातनमहाराज हे मुंगीस राहत असत. हे दोघेही पुरुष मोठे साक्षात्कारी होते. पैठणास उत्तमश्लोकाशिवाय शिवदिनकेसरी, ब्रह्मरातमुनि, शाहदावल, अमृतराय वगैरे अनुभवी संत राहत होते. अमृतरायास दोन पुत्र होते. रामयोगी व शिवयोगी. हे उभयतां बापाच्या संगतीनें परमार्थांत निष्णात झाले, व दोघेही पित्याच्या अनुज्ञेनें ब्रह्मचारीच राहिले ! दोघेही समवयस्क, अनुभवी व योगाभ्यासी होते. दोघांच्या समाधी गंगातीरीं सावखेडें येथें आहेत. अमृतवाणीनें महाराष्ट्रावर कीर्तनामृताचा वर्षाव सतत तीन तपें करून अमृतरायांनीं आपला देह शके १६७५ चैत्र शुद्ध ६ रोजीं श्रीमुखनाम संवत्सरीं ठेवला पैठणाकडे ते रायजीमहाराज ह्या नांवानें सर्वांस माहीत आहेत. त्यांना कृष्णाबाई म्हणून एक कन्या होती तिचा वंश सध्या पैठणास आहे, व त्यास सालिना दीड हजाराचें वर्षासन आहे.

८ अमृतरायांची कविता मुख्यतः कडाका व कटाव या छंदांत आहे. त्यांचीं कित्येक पदें लोकमान्य झालेलीं आहेत. पण अमृतरायांच्या अजरामर कीर्तीचा मुख्य आधार म्हणजे त्यांचे कटाव होत. ध्रुवचरित्र, शुकचरित्र व भगवद्गीता यांवरचे त्यांचे कटाव सर्वांनीं अवश्य वाचावेत. गीतेवरचा कटाव ४० वर्षांमागें शीलाप्रेसवर छापला होता, पण तो अलीकडे कोणाच्याही पहाण्यांत नाहीं. बहुधा असा विषय नाहीं कीं ज्याचें उत्कृष्ट वर्णन अमृतरायांनीं आपल्या कवितेंत कोठें तरी केलें नाहीं ! गर्भवासाचें वर्णन, बाळपणचें वर्णन, विषय-दुःखवर्णन, भाग्याचें व दारिद्र्याचें वर्णन, अनेक वस्त्रांचीं व अनेक स्त्रियांचीं वर्णनें, आणि हीं सारीं इतक्या बहारीनें, आवेशानें, आणि सहज केलेलीं आहेत कीं तो तो विषय डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभा रहावा. हीं सर्व वर्णनें अमृतरायांच्या विलक्षण बुद्धिमत्तेचीं व कवित्वस्फूर्तीचीं द्योतक आहेत. कसलाही श्रोता असला तरी शब्दांच्या खणखणाटांत दंग होऊन अर्थाच्या प्रवाहांत न कळत तो वाहवत गेलाच पाहिजे ! पांच हजारांचा श्रोतृसमुदाय असू द्या आणि सुदामचरित्राच्या "ब्राह्मण ब्रम्हनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करंटा, मुलें भुकेनें करितीं तंटा, घरांत वाजे नकारघंटा, " अशा वर्णनाचा अस्खलित प्रवाह चालला कीं, क्षणार्धांत सर्वांचा लय लागलाच पाहिजे.

### ( १ ) शुकाचा मातृगर्भी असतांना ध्यास

"सोहं सोहं हा निजध्यास, वैराग्याचा जिवि हव्यास, 'बाहेर पडतां मी अभ्यास, करिन साधन बहु सायास, ताप हि साहिन, शीत न पाहिन, क्षुधेसि खाइन, मनासि घेऊनि वनासि जाइन, तृषेसि लाविन आले वाटे, हरिनामाचे

घेइन पेटे, उतरुनि भवनदि जाइन नेटें, फोडिन कर्मांचींही कपाटें, झोडिन वासनेचे कांटे, उपटिन अभिमानाचीं बेटें, उत्पाटिन मी मोक्षकपाटें, ऐसा गर्भीं ध्यास लागला, मातेचा जिव बहु भागला.”

( २ ) जीवाची दशा.

“ नऊ मास गर्भांत सांपडे, मूत्रमलादिक फार सांकडे, तनूसि तोडिति जंतूकीडे, बहुश्रमानें बाहेर पडे, स्मरण मुळींचें सर्व विसरला, कोहं कोहं रडूं लागला, दिवसांमासां वृद्धि पावला, क्षणाक्षणां अपघात चूकला, धनमदगर्वे फार दाटला, अहंपणाचा पूर लोटला, पांचा विषयांमाजि वाटला, पापाचरणें मनीं कांटला ”

अमृतरायांच्या कवितेची स्पेशल ट्रेन सुरू झाली कीं, मग इतर गोष्टींचें कसलेंही भान राहत नाहीं. यमकानुप्रासांचे चमत्कार पंतपंडितांनीं चांगलेच साधले आहेत, पण तेही पुष्कळ या रायजींच्या साध्या व जोरदार प्रासांपुढें फिके पडतात !

९ अमृतरायांची कीर्तनकार म्हणून, कवि म्हणून व साधु म्हणून अशी तिहेरी प्रसिद्धी आहे. त्यांच्या समकालीन संतकविमंडळांत त्यांची योग्यता मोठीच मानली जात होती. त्यांच्या देहावसानानंतर नऊच वर्षांनीं महिपतिबाबा भक्तविजयांत म्हणतातः—

अमृतराय भक्त प्रेमळ । ज्याचें कवित्व अति रसाळ ॥
श्रवणीं ऐकतीं निंदक खळ । द्रवती तत्काळ निजप्रेमें ॥ १ ॥

तसेंच अमृतरायांच्या अमृतोपम मधुर वाणीचा प्रभाव व त्यांच्या लोकोत्तर अशा व्यापक बुद्धीचें सामर्थ्य लक्ष्यांत आणून पंत सन्मणिमालेंत म्हणतातः —

कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा ? ॥ २ ॥

‘कलियुगांत भक्त नित्य घोटीत असलेला भगवद्भक्तीचा आनंद अनुभवण्यासाठीं साक्षात् बृहस्पतिच अमृतराय होऊन आले, कारण केवळ उत्तम रसांची खाण अशी ही अमृतासारखी मधुर वाणी दुसऱ्या कोणाच्या मुखांतून बाहेर पडूं शकेल ?’ बारामतीच्या **राजारामप्रासादी** यानेंही रायजींच्या ‘भक्तिज्ञानवैराग्यांनीं परिपूर्ण अशा प्रासादिक कटिप्रबंधांची’ अत्यंत तारीफ करून म्हटलें आहे—

मुक्ताफळासारखीं अक्षरें । यमक छंद अर्थ सपूरें ।
मानिती मनीं चमत्कार । गौरीहार स्वयें पै ॥१२॥
स्वर्गस्थ देव अवघे पाहती । भजनप्रेमा लाळे घोटिती ।
धन्य अवतार श्रीबृहस्पती । सुमनें वर्षती कीर्तनरंगीं ॥ १६ ॥
अमृत वाणी अमृत वृष्टी । कीर्तनरंगीं अमृतदृष्टीं ।
नये वर्णितां ते गोष्टी । पडली मिठी स्वानंदीं ॥ १७ ॥

———

# अमृतवाणी.

## पदें.

१

भवभय निरसावें निरसावें । आत्मसुखांत असावें ॥ ध्रु० ॥
भागवताचें पुस्तक सोडुनि । झाडातळिंच बसावें ॥ १ ॥
धनकामिनिच्या लोभावरुतें । चित्तांतूनि रुसावें ॥ २ ॥
अमृतरत्नातें साधुनि संतां- । संन्निधची बैसावें ॥ ३ ॥

२

स्मरतां नित्य हरी । मग ती माया काय करी ॥ ध्रु० ॥
श्रवणें मननें अद्वयवचनें । पळतो काळ दुरी ॥ १ ॥
करुणाकर वरदायक हरि जो । ठेवित हात शिरीं ॥ २ ॥
तोंचि निरंतर उद्धवचरणीं । अमृतपान करी ॥३॥

३

होउनि गोसावी गोसावी । हरिकथाचि परिसावी ॥ ध्रु० ॥
गमन नसे ज्या गांवीं । तेथिल वाट कशास पुसावी ? ॥ १ ॥
भिक्षा मागुनि निस्पृहतेनें । संगतिचीं पासावीं ॥ २ ॥
भिळोंत वा खंबाळें । अथवा भगवींही नेसावीं ॥ ४ ॥
दुर्वाक्यें सोसावीं । आपण अमृतवृष्टि वर्षावीं ॥ ५ ॥

४

संतपदाची जोड । देरे हरि ॥ ध्रु० ॥
संतसमागमें आत्मत्वाचा सुंदर उगवे मोड ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविशि जिविचे कोड ॥ २ ॥
अमृत म्हणें रे हरि ! भक्तांचा । शेवट करिशी गोड ॥ ६ ॥

---

# स्फुट-विचार.

## १. ठिकठिकाणची दासनवमी.

यंदाचा श्रीदासनवमीचा उत्सव महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं मोठ्या प्रमाणावर झाला. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या सज्जनगडावर जाण्यासाठीं संप्रदायाच्या पालख्या वद्य ५ स साताऱ्यास जमून तेथें त्यांची थाटानें मिरवणूक निघाली. हजारों लोक सामोरे गेले होते. साताऱ्चे राजेसाहेब व श्री. पंतप्रतिनिधी यांचा लवाजमा मिरवणुकीबरोबर होता. पालख्यांपुढें श्रीटाकळीकर बुवांचें भजन व श्री. चौंडे महाराजांचें कीर्तन झालें. गडावर यंदा मुख्य दिवशीं दहा हजारावर समुदाय श्रींच्या दर्शनास व प्रसादास जमला होता. प्रसादाच्या वेळीं थोडी कुरबुर झाली होती, पण श्री. बापुसाहेब महाराज यांनीं ती धिम्मेपणानें मिट-विली. ब्राह्मणांच्या पंक्तींत कित्येक ब्राह्मण ओवळ्यानें तसेच जेवायला बसले, तेव्हां ' यांच्यांत व आमच्यांत भेद नाहीं. सबब आम्हीही त्यांच्याच पंक्तींत बसणार ' असा कांहीं ब्राह्मणेतरांनीं हट्ट धरिला व तो रास्त होता. ओवळ्या ब्राह्मणांना पंक्तींतून उठविलें व ते मागाहून सोवळें नेसून आल्यावर त्यांना वाढण्यांत आलें. ब्राह्मणांनीं आपले आचारविचार सोडले म्हणजे असे प्रसंग यायचेच त्यापेक्षां आचारविचार पाळण्यांतच ब्राह्मण्य आहे हें उमजून त्यांनीं वागावें हेंच योग्य आहे. ' आचारविचारें । पैलपार पाविजे ते ' असें समर्थांनीं स्पष्ट सांगितलें आहे. ' आचार उपासना सांडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ' ' विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं सांडिला विचार,' इ० प्रकारें श्रीस-मर्थांनीं अनाचाराचा निषेध केला आहे. ' स्नानसंध्या जपध्यान ' करावें अशी त्यांची आज्ञा आहे. कोणीही आपले आचार सोडूं नयेत. ब्राह्मणांनीं शूद्रवत् आचरण न करितां आपले आचार उत्तम प्रकारें पाळले तर सत्य-शोधकही त्यांना मानूं लागतील, निदान त्यांची अवहेलना तरी होणार नाहीं. ' बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा ' अशी त्यांची मनोबोधांत शिकवण आहे. स्नानसंध्या, देवतार्चन, नैवेद्य, वैश्वदेव ज्या घरीं होतात तेथचें अन्न पवित्र असतें, त्यावांचून अन्नाला पावित्र्य कोठचें ! ' नसे राम तें धाम सोडोनि द्यावें ' आचार व विचार दोन्ही शास्त्रयुक्त आहेत तेंच घर पवित्र व त्यांवाचून अन्यगृहीं भोजनच गोड लागूं नये. असो, निदान सोवळें नेसून आल्याशिवाय ब्राह्मणाला जेवायला घालायचें नाहीं असा श्री. बापूसाहेबांनीं निर्बंध घातला हें फार चांगलें झालें. गडावर रात्रीं श्री. चौंडे महाराजांचें प्रेमळ कीर्तन झालें. गडाशिवाय इतरही बऱ्याच ठिकाणीं उत्सव झालें. ठाण्याची मंडळी आज कैक वर्षें हा उत्सव भक्तिभावानें करीत असतात. चाळिसगांवीं धुळ्याचे रा. शंकर-

राव देव यांचें उत्तम व्याख्यान झालें. नाशीक, येवलें, पुणें, इ० ठिकाणीं उत्सव चांगले झाले. अमदाबाद येथें उत्सवांत पुण्याचे रा. ज. स. करंदीकर यांचें सुंदर व्याख्यान झालें.

---

## २ अकोला व खामगांव.

रा. पांगारकर यंदा उत्सवासाठीं आकोल्यास गेले होते. तेथें त्यांचीं तीन प्रवचनें व दोन कीर्तनें झालीं. आकोल्याच्या मंडळींत उत्साह चांगला दिसला. दोन प्रवचन स्त्रीमंडळांतही झालीं. तेथील राष्ट्रीय विद्यालय व कन्याशाळा यांच्या चालकांनीं त्यांना शाळा दाखविण्यास व मुलांस चार बोधाच्या गोष्टी सांगण्यास नेले होते. दोन्ही शाळांचे चालक व चालिका यांनीं स्वार्थत्यागपूर्वक शिक्षणाचें काम सुंदर चालविलेलें पाहून संतोष झाला. आकोल्यास खामगांवच्या टिळक विद्यालयाची मंडळी येऊन त्यांनीं रा. पांगारकर यांस आपली संस्था पाहण्यास नेले. तेथेंही गांवांत एक व शाळेंत दोन अशीं तीन प्रवचनें झालीं. खामगांवची शाळा उत्तम प्रकारें आपलें काम करित असून तेथील चालकांस डॉ. पारसनीस व कांहीं व्यापारी यांचें साह्य फार चांगलें आहे. तेथील शिक्षकांत व विद्यार्थ्यांत उत्साह व विशेष बुद्धितेज पाहून फार समाधान वाटलें. महाराष्ट्रांत राष्ट्रीय शिक्षणाचें बीज तळेगांवच्या समर्थविद्यालयाचे चालक दे. भ. आण्णासाहेब विजापूरकर यांनीं पेरलें. वाईची प्राज्ञ पाठशाळा, चिंचवड व पुणें येथील विद्यालयेंही ठीक चाललीं आहेत. आह्मांस एक गोष्ट प्रांजळपणें सांगावीशी वाटते. देशभक्तीच्या उभारींत राष्ट्रीय विद्यालयें निघालीं आहेत व स्वार्थत्यागी चालक व होतकरू विद्यार्थीही देशाच्या सुदैवानें लाभले आहेत. औद्योगिक शिक्षणाचा व व्यायामाचा थोडा फार आदर केला जातो. हें सर्व ठीक आहे. ‘ सत्कर्मयोगें वय घालवावें ’ ह्या भावनेचें सुंदर बीजारोपण झालें आहे तथापि ‘ उपासनेला दृढ चालवावें ’ ‘ उपासनेवीण जयो प्राप्त नाहीं ’ ‘ पहिलें तें हरिकथा निरूपण ’ इकडे चालकांचें व पुढाऱ्यांचें अधिक लक्ष गेलें पाहिजे. समर्थसांप्रदायिकांचे अंगीं समर्थांचे वेळीं जें ‘ धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ’ या मंत्राचें वारें भरलें होतें तसें धर्मप्रीतीचें, परंपरेचें, उपासनेचें खरें खरें वेड शिक्षक व विद्यार्थी यांच्यांत शिरलें म्हणजे हींच विद्यालयें धर्मोद्धार म्हणजेच देशोद्धार करण्यांत अग्रेसरत्व पटकावतील यांत संशय नाहीं. आकोला–खामगांवच्या संचारांत एक कार्य झालें. आकोल्याम १०।१२ तरुणांनीं व खामगांवास दोन पदवीधरांनीं श्रीदासबोधाचीं प्रत्येकीं ११३ पारायणें करण्याचें कबूल करून त्या-

प्रमाणें आरंभही केला आहे. गोव्याहून नुकेंच एक पत्र आलें त्यांत लिहिलें आहे. " आपण येथें आठ दिवस राहून नवविधा भक्तीवर प्रवचनें केलीं व पारायणें करण्याची महती सांगितली त्याप्रमाणें येथें दहाबाराजणांनीं दासबोध नित्यनेमानें वाचण्यास सुरुवात केली आहे हें कळविण्यास मला फार आनंद वाटतो. दोघा घरवाल्यांनीं चहास अजीबात फांटा दिला आहे. " धर्मसंचाराचा कांहींना कांहीं कोणाला तरी उपयोग झाल्याशिवाय राहात नाहीं. ज्ञानेश्वरी, नाथभागवत, दासबोध यांपैकीं कोणताही एखादा ग्रंथ नित्यपठणास ठेवून त्याचीं १०८ पारायणें केलीं म्हणजे ग्रंथ उलगडण्यास व चित्तैकाग्र्य होण्यास अत्यंत साह्य होतें. एक ग्रंथ उलगडला तर हजारों ग्रंथ उलगडूं लागतात. 'एक गुरु एक देव । कोठें तरी असावा सद्भाव' असें समर्थ सांगतात. तसेंच एक संप्रदाय, एक ग्रंथ नित्याचरणास अत्यंत अवश्य आहे. समर्थभक्त हाण दिणारांनीं नुसते तीन दिवस व्याख्यानें-प्रवचनें करून चालायचें नाहीं, संप्रदायपूर्वक उपासना चालविली तरच खरा लाभ होईल.

---

## ३ महात्माजींची धर्मबुद्धि.

महात्मा गांधी यांनीं 'नवजीवन' नामक गुजराथी साप्ताहिकांत 'आत्मचरित्र' क्रमानें प्रसिद्ध करण्यास आरंभ केला असून त्याचें इंग्रजी भाषांतर रा. देसाई हे 'यंग इंडियांत' प्रसिद्ध करीत असतात. सदर आत्मचरित्र सर्व तऱ्हेनें अपूर्व होणार आहे. महात्माजींसारखा जगमान्य थोर पुरुष आपल्या चरित्राचे धागे जुळवून जनांच्या बोधार्थ किंवा सत्यप्रकाशार्थ लहान मोठ्या गोष्टी मनोरंजक तऱ्हेनें लिहीत आहे ही मोठी गोष्ट आहे. सदर आत्मचरित्र साऱ्या जगाचें चित्त वेधल्याशिवाय राहणार नाहीं. मुमुक्षुसाधकांना ह्या चरित्रांत घेण्यासारखें पुष्कळ सांपडेल, लोकसेवा करणारांना तें आदर्शवत् वाटेल यांत संशय नाहीं. मागील लेखांत त्यांनीं आपल्या ठिकाणीं धर्मबुद्धीचा प्रादुर्भाव कसा झाला हें दर्शविलें आहे. ते म्हणतात, " माझ्या वयाच्या ६ व्या वर्षापासून तों १६ व्या वर्षापर्यंत शाळेंत मला अनेक विषय शिकविण्यांत आले, पण धर्मशिक्षणाचा मात्र कोठें पत्ता नव्हता ! तथापि भोंवतालच्या परिस्थितींतुन कांहीं कांहीं कल्पना मी उचलीत होतों. 'धर्म' शब्दानें त्याचा व्यापक अर्थ जो आत्मज्ञान तोच मी येथें घेत आहें. वैष्णवपंथांत माझा जन्म झाल्यामुळें मंदिरांत मला वारंवार जावें लागे, पण याचा माझ्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. मला तेथील थाटमाट आवडत नसे. शिवाय तेथें घडणाऱ्या कित्येक अनीतीच्या गोष्टी माझ्या कानावर आल्यामुळें मला त्याचा कंटाळा आला. तात्पर्य, मंदिराचा ( हवेलीचा ) माझ्या मनावर कांहींच

परिणाम झाला नाहीं. पण मला जें मंदिरांत मिळालें नाहीं तें माझ्या दाई-पासून मिळालें. आमच्या घरांत तिनें फार वर्षें नोकरी केली असून तिचें मज-वर अत्यंत प्रेम असलेलें मला आठवतें. मला तेव्हां भूताखेतांची भीति वाटे. रम्भा मला यावर 'रामनाम' घ्यायला सांगे. माझा रामनामापेक्षां तिच्यावर ज्यास्त विश्वास असल्यामुळें कोमलवयांत भूतपिशाचांची भीति जाण्यासाठीं मी रामनाम घेत असें. हा प्रकार थोडावेळ घडला पण त्यावेळीं पेरलेलें बीज फुकट गेलें नाहीं. आमच्या भल्या दाईनें तें बीज पेरल्यामुळेंच रामनाम हा रामबाण उपाय आज मला वाटत आहे! याच सुमारास चुलतभावाच्या संग-तीनें मीं 'रामरक्षा' पाठ केली व कित्येक दिवस रोज सकाळीं ती पाठ म्हणत असें. राजकोटला गेल्यावर ती सुटली, कारण माझा तिच्यावर विश्वास बसेना!...तथापि रामायणश्रवणाचा माझ्या मनावर दृढ संस्कार झाला. रामभक्त बिलेश्वरचे लाधामहाराज हे माझ्या वडिलांस रोज रामायण वाचून दाखवीत. त्यांना महारोग झाला होता व त्यावर कोणतेंही औषध न लावतां बिलेश्वर महादेवाला वाहिलेलीं बिल्वपत्रें लावून ते रोगमुक्त झाले होते असें सांगत. ही गोष्ट खरीखोटी कोण जाणें पण आमचा तिच्यावर विश्वास होता व ते रामायण सांगत त्यावेळीं रोगमुक्त झालेले होते. त्यांचा आवाज मधुर होता. दोहे व चौपाई ते सुस्वर म्हणत व त्यावर निरूपण करितांना ते स्वतः तन्मय होत व श्रोत्यांसही तन्मय करीत. मी तेव्हां तेरा वर्षांचा होतों व मी त्यांच्या निरूपणावर भुलून गेलों होतों. माझ्या रामायणभक्तीचें बीजारोपण तेव्हां झालें. भक्तिप्रधान वाङ्मयांत तुळशीदासांचें रामायण सर्वश्रेष्ठ होय असा माझा आज पूर्ण विश्वास आहे. राजकोटास गेल्यावर एकादशीला गीता ऐका-यचे मला कांहीं प्रसंग आले, पण ती सांगणारे जरा मंद असल्यामुळें त्यावेळीं मला गीतेची गोडी लागली नाहीं. गीता धर्मप्रीतीचा झोत उत्पन्न करूं शकते हें मला आज समजतें. मी गुजराथी भाषांतरासह गीता पाहिली आहे. माझ्या २१ दिवसांच्या उपवासांत कांहीं अध्याय मदनमोहन मालवीयजींच्या तोंडून मीं ऐकले तेव्हां त्यांच्यासारख्या प्रेमळ भाविकाच्या तोंडून समग्र गीता मीं बाळपणींच ऐकली असती तर चांगलें झालें असतें असें मला वाटलें. बाळपणचे संस्कार दृढमूल होतात, पण त्या वयांत असे उत्तम ग्रंथ माझ्या श्रवणांत आले नाहींत याचें मला नेहमीं वाईट वाटतें. हिंदुस्थानांतल्या नाना-विध पंथांचे लोक, त्याप्रमाणेंच जैन, मुसलमान, पार्शी वगैरे लोक वडिलांस भेटावयास येत, व मोकळेपणानें धर्मचर्चा करीत ती ऐकत राहिल्यानें धर्म-मतसहिष्णुता माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाली" इ० इ०

---

# शिवदिनकेसरींची गुरुशिष्यपरंपरा.

पैठणास शके १८२४ सालीं मीं १५ दिवस मुक्काम केला होता त्या अवधींत श्रीएकनाथमहाराज, कृष्णदयार्णव, अमृतराय व शिवदिनकेसरी यांच्यासंबंधीं कांहीं परंपरेनें व कागदोपत्रीं माहिती मिळाली. नाथांचा समाधिशक मला तेथेंच उपलब्ध झालेल्या जुन्या लेखनावरून निर्णीत करतां आला. शके १५२१ विकारी नाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ६ रविवार रवि मीन गृहीं असतांना नाथ समाधिस्थ झाले. हें तीन जुन्या लेखांच्या आधारें मीं केसरींत (ता. २८।३।१९०५) प्रथम प्रसिद्ध केलें. पैठणास अमृतरायांचीं कित्येक पदें—काव्यसंग्रहकारांस न मिळालेलीं—मला मिळालीं. पण तेथें मुख्य लाभ झाला तो शिवदिनकेसरींच्या मठांतील त्यांच्या पदांचा संग्रह मिळाला हा होय. ह्या संग्रहांत शिवदिनकेसरींचीं बरीच पदें मिळालीं असून कांहीं त्यांचे गुरु केसरीनाथ, परमगुरु उद्बोधनाथ व परात्पर गुरु गुप्तनाथ यांचींहीं पदें आहेत. शिवदिनकेसरींचें हस्ताक्षरही मला मिळालें. त्यांच्या शिष्यांचीं पदें वगैरेही मिळालीं. असो, आज त्यांच्या गुरुपरंपरेची माहिती देतों.

## नाथसंप्रदाय.

आदिनाथ (शंकर)
|
मत्स्येंद्रनाथ.
|
गोरक्षनाथ.
|
गयिनीनाथ (गैणीनाथ)
|
निवृत्तिनाथ
|
ज्ञाननाथ (ज्ञानेश्वरमहाराज)
|
सत्यामळनाथ.

गैबीनाथ
|
गुप्तनाथ
|
उद्बोधनाथ
|
केसरीनाथ

- भोलानाथ
- शिवदिननाथ
  - नरहरीनाथ
    - महिपतिनाथ
    - लक्ष्मीनाथ
      - मालोनाथ.

शिवदिनकेसरींचा समाधिशक १६९६ जयसंवत्सर, माघवद्य १३ सोमवार हा होय असें त्यांचे शिष्य नरहरिनाथ यांनीं म्हटलें आहे.

श्लोक.

सोळाशें नृपशालिवाहन शके शाहाण्णवा अंतरीं
पाहा तो जय नाम वत्सर बरा सर्वार्थसिद्धी करी ।
माहो वद्य त्रयोदशीस रजनी यामार्ध एकावरी
सोडीली शिवदीन गुरुनें कायापुरी साजिरी ॥ १ ॥

वर जी नाथपरंपरा दिली आहे ती मालोनाथांनीं आपल्या परंपरेसंबंधानें जे श्लोक रचलेले आढळले त्यावरून मुख्यतः दिली आहे. मालोनाथांचे श्लोक येणेंप्रमाणें:—

गुणातीत अव्यक्त विद्याविलासीं । मुळारंभ आरंभ ऐश्वर्यतेसी ।
सदा सर्वदां सच्चिदानंदरूपा । नमस्कार माझा तया **आदिनाथा** ॥ १ ॥
अती सौख्य माहेर जें सज्जनांचें । परंधाम विश्राम योगेश्वरांचें ।
निरालंबदेशी अनुपम्य राजा । नमस्कार **मच्छेंद्रनाथा**सि माझा ॥ २ ॥

गुरूभक्ति जेथूनि रूपामी आली । महासिद्धि ज्यापासुनि व्यक्त झाली ॥
कसा धांवण्या धांवतो दीन काजा । नमस्कार गोरक्षनाथासि माझा ॥ ३ ॥
अनूहातसिंगी स्फुरे लक्षमुद्रा । अखंड स्वरूपस्थिती योगनिद्रा ॥
जयाचा बहू आश्रयो योगयुक्ता । नमस्कार माझा तया गैणिनाथा ॥ ४ ॥
चढेना ढळेना टळे कर्म मार्गे । उपायेविना सांपडे संतसंगे ॥
समाधान वृत्ती जया सत्य बोधी । नमस्कार निवृत्तिनाथासि आधीं ॥ ५ ॥
प्रतापें गुणें आगळा सूर्य जैसा । स्वयंज्योति शुद्ध प्रकाशीत तैसा ॥
जयाची असे या जगीं पूर्ण सत्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥ ६ ॥
वसे अंतरीं शून्य सिंव्हासनीं जो । अवस्थात्रया लागुनी खेळवी जो ॥
स्वयें सर्व कार्यं करूनी अकर्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥ ७ ॥
असे सत्य जें नित्य प्रत्यक्ष भासे । सबाह्यंतरीं पाहतां तेंचि दीसे ।
जया पाहतां पाहणें सर्व मिथ्या । नमस्कार सत्यामळ प्राणनाथा ॥ ८ ॥
धरी रूप लावण्य भक्ताभिमानी । करी स्नेह कुणीं (?) परि मोक्ष दानी ॥
कृपाळूपणें दाखवी भक्तिपंथा । नमस्कार माझा तया गैबिनाथा ॥ ९ ॥
असोनी पुढें कांनडे लोचनांसी । परी छिन्न जें नाकळे कल्पनेसी ॥
जया आदि ना अंत निर्मूळ वार्ता । नमस्कार माझा तया गुप्तनाथा ॥ १० ॥

जगीं थोर विस्तारली कीर्ति ज्याची । श्रवण मात्र होता धुनी पातकाची ॥
जयाच्या बळें जिंकिजे योग पैजा । नमस्कार उद्बोधनाथासि माझा ॥ ११ ॥
कसे साजिरे रूप आनंदराशी । विसांवा घडे पाहतां डोळियासी ॥
जयाची बहू आवडी या मनाला । नमस्कार श्री केसरीनाथजीला ॥ १२ ॥
सदानंदरूपी चिदानंदमूर्ति । सदाचार बाह्यांतरीं लक्षपूर्ति ।
गुरु सांप्रदायांत श्री नाथ भोळा । नमस्कार साष्टांग लक्षोनि डोळा ॥ १३ ॥
निराकार निर्गुण जो मूळिचा कीं । असे व्यापुनि सर्व देशीं बरा कीं ।
त्रिकूटाहि पर्ता जयाचा ठिकाणा । नमस्कार माझा गुरु शिवदीना ॥ १४ ॥

ब्रह्मत्वें परब्रह्म ऐक्य स्वरूपें अव्यक्त वीराजले
योगज्ञानविरक्तिभक्तिस्थितिनें सत्कर्म केलें भलें ।
दीनोद्धार परोपकार करितां नेणें दुजें आपलें
दांतःशांतविदग्धि श्री नरहरीनाथासि त्या वंदिलें ॥ १५ ॥

प्रतिष्ठान गोदातटीं जो विराजे । जया वंदिती थोर येऊनि राजे ।
करी पुण्यतिथी आनंदें स्वभावें । गुरू नरहरीला नमस्कार भावें ॥ १६ ॥
स्वयं ब्रह्म सच्चिद्घनानंद मूर्ती । महाराज योगी सखा चक्रवर्ती ।

प्रतापें करी कीर्तनीं भक्तिलीला। नमस्कार श्री **लक्ष्मीनाथ**जीला ॥ १७ ॥
स्मरण करित **मालोनाथ** नामावळींते। नमन करित भावें त्याचिया पादुकांतें।
अभिनव फलप्राप्ती कोड जें मानसीचें। पुरउनि दवडिलें दैन्य जन्मांतरीचें ॥१८॥
स्वयें आदिनाथादि हे संत वृंदे। जयाचे कृपें सोयरीं आत्मबोधें।
तया सद्गुरु केसरीनाथजीला। करी वंदना सांडुनि आपदेला ॥ १० ॥

शिवदिनकेसरींनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर एक अष्टक केलेलेंही मिळालें आहे. याशिवाय नाथसंप्रदायाचें एक भजन आहे त्यावरूनही वरील परंपराच सिद्ध होते. तें भजन असें:--

आदिनाथ की जय ॥ मत्स्येंद्रनाथ की जय ॥
गोरक्षनाथ की जय ॥ गैगिनाथ की जय ॥
निवृत्तिनाथ की जय ॥ ज्ञाननाथ की जय ॥
सत्यामळनाथ की जय ॥ गैबीनाथ की जय ॥
गुप्तनाथ की जय ॥ उद्बोधनाथ की जय ॥
केसरीनाथ की जय ॥ भोलानाथ की जय ॥
शिवदिननाथ की जय ॥ नरहरिनाथ की जय ॥
लक्ष्मीनाथ की जय ॥ सबसंतनकी जय ॥

हें भजन लक्ष्मीनाथांपर्यंतच आलें आहे यावरून हें लक्ष्मीनाथांचे शिष्य मालोनाथ यांनींच केलें असावें असें वाटतें.

---

क्षुधा हा एक रोग आहे आणि भोजन हें त्यावर एक भेषज आहे. यामुळें सत्पुरुष अन्नपानाचा उपयोग क्षुधानिवारणार्थ मात्र करितात. आजच्या खादाड युगांत क्षुधेला रोग समजणारे किती हरीचे लाल सांपडतील ? रोगाला भोग समजल्यावर आपला दैवयोग वर्तविण्यास कुशल दैवज्ञाची जरूरच नाहीं.

× × × ×

नाकांतून धूर सोडणारे विडीबाज तोंडाबरोबर नाकालाही व्यसनी बनवितात. आपलीं दुःखें कशीं वाढवावीत याची मोठ्या हौसेनें योजना करणारे पक्के पंडित दुःख दूर करण्यासाठीं रात्रंदिवस झटत असतात, यांना भोळा महादेव झाला तरी कसा प्रसन्न होणार ? ईश्वर मनुष्य काय मागतो याकडे पहात नाहीं तर त्याच्या आचरणावरून मनुष्याला काय पाहिजे आहे तेंच त्याला देतो.

× + × +

ल. रा. पांगारकर यांचा नवीन ग्रंथ

# श्रीसमर्थसंजीवनी

## उर्फ

# रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. (१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा 'सारांश' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण, कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन. व्ही. पी. नें २८६

पत्ताः — व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु'चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रां-सह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे.प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्त-कांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिलाः**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—ले-खांक १।२।३. ४ मूर्तिपूजा,ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटाना-दाची उपपत्ति. ७पाडव्याची राष्ट्रीयप्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ते४ .१०श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ.१२होळीची मीमांसा. १३भक्तिमीमांसा.१४ भारतवीर १५श्रद्धा.१६वेदांताचा व्यवहारांत उपयोग.१७व्यसनांतून सुटावें कसें?१८ संक्रांतीचा हलवा.१९श्रीशिवलिंगाचें रहस्य.२०हिंदुधर्म.२१निंदकांचे उप-कार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट.२४ सत्संगाची आवड. २५आमचे पुढारी संतच.२६प्रेमामृतमाधुरी.२७डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसराः**—१आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट.४मामामामींचा संसार.५सती आवडाबाई.६ योग्याची भेट. ७सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतऱ्या थमालले थमाल आपुल्या गाई.'१० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे-केव्हां वळणार ? १३साधुकथा.१४ पतिपत्नीसंबंध. १५गोपाळराव आगर-कर.१६ नामदार गोखले.१७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८भागवतधर्माचें मंदिर १९ मातृभाषेचें प्रेम.२०दयेचे प्रकार.२१वेदांताचीं चार मतें.२२ सर्वांघटीं राम. २३वाङ्मयतप. २४अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संतमहात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७निंदकांचे उपकार. २८ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९गीतारहस्य. ३० काळाचा काळ.३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहे-त्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद ( या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. )

पत्ता—**व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.**

# सन्तचरित्रमाला.

## ग्रंथकार:—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहे-त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८-१० चरित्रें ह्या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८-३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं आहेत व ८-१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रंगावल्लभदास, भक्त तिरुपनाल्वार,सूरदास, सोहिरोबा आंबिये, इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सितारामममहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव महाराज, भट गिवापू, सोनगिरचे महाराज, भोरचे दत्तंभट, अक्कलकोटस्वामी, माणिक-प्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा ( भालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहाळेकर ). बलभीमबोवा साडेकर ( श्री खाजगीवाले ) शुभराय सोला-पूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशिककर ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ २५६. पांच फोटो किं रु १८८ व्ही. पी. नें. १८१३.

---

# मोरोपंती वेचे.

आवृत्ति दुसरी. किं. १८१२

## ग्रंथकार—ल. रा. पांगारकर, बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाऊणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवातील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जरूर करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे. “ महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभि-मानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत:—

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवे-चन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ, कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ता:—व्यवस्थापक मुमुक्षु पुणें.

# कविवर्य मुक्तेश्वर

## चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

या ग्रंथांत मुक्तेश्वराचें चरित्र त्यांची कविता त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः—सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, युद्धांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वराच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत मुक्तेश्वराची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. किं. रु. १. 'मुक्तेश्वरनीतिरत्नमाला' ही शेवटीं जोडली आहे.

---

मारुतिउपासना (चौथी आवृत्ति)—सुधारून वाढविलेली छापून विक्रीस तयार आहे. किं. ८४.

---

# श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र

पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु.३।८

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

सतत आठ वर्षे हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या, श्रीक्षेत्र देहू येथील जुनीं दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्याचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ काळनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवित्वस्फूर्ती ८ चित्तशुद्धीचे उपाय ९ सगुण भक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि (उपदेशसार) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण. अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत.

ग्रंथात सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबांचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान. यांत प्रसंगानुसार तुकोबांचे अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व आवश्यक तेथें विवरणही दिले आहे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.

# श्रीगोंदवलेकर महाराजांचे अभंग.

उद्धारक:-त्र्यंबक नारायण देशपांडे, पुणें.

४७

तिनी सांजची वेळ झाली । आतां संध्या करा भली ॥ १ ॥
शुद्ध करुनिहि मन । अंतरीं निर्मळ आसन ॥ २ ॥
काम क्रोध जाळी । भस्म लावावें तें भाळीं ॥ ३ ॥
भक्तिमार्ग हृदयीं धरी । विवेकाची वारी करी ॥ ४ ॥
ऐसें करीं आचमन । ध्यानीं मनीं नारायण ॥ ५ ॥
मार्जन करावें नित्यनेम । रामनामीं लावीं मन ॥ ६ ॥
प्राणायाम साधी । भूतदया ठेवी आधीं ॥ ७ ॥
ऐसें संधेचें प्रथम अंग । पुढें कर्म होय सांग ॥ ८ ॥
न्यास मुद्रा करीं । संदेह शत्रु दूर धरी ॥ ९ ॥
तृष्णा वासना अहंकार । अर्घ्य द्यावें बरोबर ॥१०॥
समदृष्टी रूप न्याहळी । पृथ्वी प्रदक्षिणा करी ॥ ११ ॥
दास म्हणे ऐसे संध्याकाळ । मग कर्म तें सुफळ ॥ १२ ॥

४८

देह आहे बहुतांचा । मोहें शाश्वत आमुचा ॥ १ ॥
वस्तुमाटीं घट होय । त्यांत शरीर सुख काय ॥ २ ॥
अशाश्वत भ्रमला । देह तदात्मक झाला ॥ ३ ॥
दास म्हणे सांडी दुर्बुद्धी । राम जपावा तो आधीं ॥ ४ ॥

४९

जन्मामाजी मनुष्य थोर । अन्नामाजी ग्रंथ सार ॥ १ ॥
वृक्षामाजी पिंपळ खरा । खडयामाजी शोभे हिरा ॥ २ ॥
धातुमाजी तें कांचन । जनांमाजी सत्यजन ॥ ३ ॥
धनामाजी भक्तिधन । ज्ञानामाजी आत्मज्ञान ॥ ४ ॥
दास म्हणे साधन सार । राम नाम असे थोर ॥ ५ ॥

५०

नलगे वन सेवन । राजद्वारीं कीर्तिधन ॥ १ ॥

नलगे योग ध्यान । पंचाग्नि धूम्रपान ॥ २ ॥
नलगे कांहीं साधन । तीर्थ यात्रेचें भ्रमण ॥ ३ ॥
नलगे विषयांची खटपट । मंदिर आणिकही मठ ॥ ४ ॥
नलगे मान अपमान । सुख दुःख एक जाण ॥ ५ ॥
नलगे विषयांची भ्रांति । प्रिया पुत्रांची संगती ॥ ६ ॥
दास म्हणे रामराया । दृढ राहूं तुझ्या पायां ॥ ७ ॥

५१

रामनामाविणें मोठा । तोचि दैवाचा करंटा ॥ १ ॥
रामनामाविणें धन । जळो जळो तें सदन ॥ २ ॥
रामनामावांचुनि शाहणा । तोचि यमाचा पाहुणा ॥ ३ ॥
भक्तीविणें सुख । काळें त्याचें होय मुख ॥ ४ ॥
दास म्हणे सर्व सुख । रामापायीं असें देख ॥ ५ ॥

५२

कामविषयीं फिरवी मन । पुढें भजे रामराम ॥ १ ॥
लोभ क्रोध मारी । संत समागम करी ॥ २ ॥
वचन न ढळे कदा । त्यांनीं जावे गुरुपदा ॥ ३ ॥
दास म्हणे यांसी तर घेतां । त्यासारखा माता पिता ॥ ४ ॥

५३

तुझें नाम रघुवीर । पाषाण तारी सिंधुवर ॥ १ ॥
नाम प्रल्हादें घेतलें । स्तंभीं अवतरले नरहरी ॥ २ ॥
पुत्रमिषें घेतलें नाम । त्यासी दिलें निजधाम ॥ ३ ॥
दास म्हणे रघुनाथा । तुझे नामीं बहु सत्ता ॥ ४ ॥

५४

मन मारुनि पाही निजधाम । परी जपे रामराम ॥ १ ॥
वृत्ति राहे स्थिर । नामीं वसे निरंतर ॥ २ ॥
मी ईश्वर एकचि आहे । त्यासि साक्षी होऊनि राहे ॥ ३ ॥
कामक्रोधें नाहीं विटाळला । राही उपाधीवेगळा ॥ ४ ॥
अहंभाव गलित कलेवर । नेत्रीं वसे रघुवीर ॥ ५ ॥
निंदास्तुति नाहीं मुखा । अंत नाहीं त्याचे सुखा ॥ ६ ॥
होऊनिया रामरूप । घेई आपुले आपण सुख ॥ ७ ॥
दास म्हणे या साधनापुढें । ब्रह्मज्ञान वेडावलें ॥ ८ ॥

५५

मी माझें विसरुनि जाई । ऐसें करीं माझे आई ॥ १ ॥
मग मी जाईन मरून । तुझे पायीं स्थिरावीन ॥ २ ॥
तुह्मां जोडूं दोन्हीं कर । एवढें द्यावें रघुवीर ॥ ३ ॥
कृपा करी देवाधिदेवा । मला न्यावें तुझे गांवा ॥ ४ ॥
मज नको मुक्तिधन । माझें हरावें मीपण ॥ ५ ॥
दास म्हणे रामराया । आतां येऊं द्यावी दया ॥ ६ ॥

---

# मननामोद.

दगडाच्या खाणी विपुल आहेत; पण मूर्तिकारांचा दुष्काळ आहे. भाविक साधक विपुल आहेत पण त्यांचा देव बनविणाऱ्या सद्गुरूंचीच वाण आहे : आतां पाथरवट सुद्धां कांहीं तरी आकाराचे शास्त्रपद्धतिशून्य देव बनवीतच असतात त्याप्रमाणें व्यवहारशाली भाविक चेल्यांना घरबसल्या ब्रह्ममय म्हणजेच भ्रममय करीतच असतात.

× × ×

बैलाच्या गळ्यांत घुंगुरमाळा बांधल्यानें त्यांना नेहमींच शोभा येते परंतु त्याच घुंगुरमाळा रात्रीच्या वेळीं त्या पशूंचें रक्षण करण्यास समर्थ होतात. रानावनांत घंटा असलेल्या पशूंना सिंहव्याघ्र किंवा सर्प पीडा देत नाहींत. याचप्रमाणें सत्पुरुषांचीं वचनें मनुष्याच्या चालत्या काळांत त्याला भूषित करितात; परंतु तीं भूषणें मृत्युआदिकरून दुर्घट प्रसंगीं त्या वचनधारकाचे मृत्युआदिकरून सर्पांपासून रक्षण करितात. सत्पुरुषांची वाणी पुरुषास एरवीं शास्त्र म्हणून आणि ऐनवेळीं शस्त्र म्हणून उपयोगीं पडते.

× × ×

खवट खोबऱ्याचें सारण असलेली करंजी मुखाला गांजते आणि नेत्रांना रंजविते, त्याचप्रमाणें शृंगारकथा नेत्रांना रम्य आणि चित्ताला अपाय करणाऱ्या होतात.

+ × +

कपबशा बिनहरकत वापरणाऱ्यांना पणत्यांत चहा दिला तर चालणार नाहीं. मातीचें भांडें ग्राह्य नाहीं हें जाणणारे कपबशींतील माती पाहूं शकत नाहींत. भ्रांताचें समाधान म्हणतात तें हेंच !

× × × ×

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. व्ही. पी. नें ०११.

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १८८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८८.

मुमुक्षु REG, No, B. 662

# पांगारकरांचीं पुस्तकें.

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध के॰ विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८.

१४ मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

१५ पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

१६ श्रीतुकारामचरित्र:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सह्य असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. ३.

१७ श्रीतुकारामचरितामृत:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९ मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणासह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२० मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): - किं. ०४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

२२ सार्थ मनोबोध:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २.

२५ श्री एकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी )--किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वस्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९ | अधिक १८४८ | नवें वर्ष ६ वें |
| मास ८ | एप्रिल १९२६ | अंक ४ था. |



संपादक प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व्ही पी. नें रु. ३॥

मुद्रक:-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या "हनुमान" छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |
| २ पारिजातकाचीं फुलें | २ |
| ३ अभेदभक्तीची माधुरी | ३–४ |
| ४ तुकोजीरावमहाराज होळकर | ५–६ |
| ५ थोरांचा समागम | ७–९ |
| ६ कामक्रोधादि रिपु | ९–१५ |
| ७ आहे नारायण जवळीच: | १५–१८ |
| ८ पैठणचे सत्पुरुष | १८–१९ |
| ९ वैदिक युगांतील पंडिता | १९–२२ |
| १० वारा कसा वाहात आहे ! | २३–२७ |
| ११ अभिप्राय | २७–२९ |
| १२ वर्णधर्म | ३०–३३ |
| १३ तेरा कोटी रामनामाचें अनुष्ठान ! | ३३–३७ |
| १४ आद्यकवि श्रीमुकुंदराज | ३८–४० |

## महाराष्ट्रसाहित्यसंमेलन

महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाची अकरावी बैठक खास मुंबईसच येत्या ईस्टरचे सुटीचे सुमारास भरविण्याची नक्की योजना महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचे कार्यकारी मंडळीनें केली आहे. नागपूर व नाशिक या दोहों ठिकाणींही सदर बैठक होत नाहीं असें दृष्टीस आल्यावर मुंबईसच ती भरविण्याचें ठरवावें लागलें. तरी संम्मेलनांत वाचण्यासाठीं व पुढें छापून प्रसिद्ध करण्यासाठीं सर्व महाराष्ट्रभाषाभिमानी व भक्त अशा कवींनीं व लेखकांनीं आपापल्या आवडत्या विषयांवर कविता व लेख पाठविण्याची मेहेरबानी करावी. स्वतंत्र पत्राची वाट पाहूं नये ही अत्यागत्याची विनंती.

म. सा. परिषदेची कचेरी
१७१ गिरगांव रोड, मुंबई नं. २.

न. र. फाटक, वी. व्ही. रायकर,
रा. का. तटणीस, डॉ. जी. काळे.
चिटणीस ११ वे म. सा. संमेलन.



## अभंग

१

काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसे ॥ १ ॥
कैसा मी सरता जालों तुझ्या पायीं। पांडुरंगा कांहीं न कळे हें ॥ ध्रु० ॥
पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध झालें ॥ २ ॥
तुका म्हणे मज आणूनी अनुभवा । दाखवीं हे देवा साच खरें ॥ ३ ।

२

काम क्रोध माझे लावियेले पाठीं । बहुत हिंपुटी झालों देवा ॥ १ ॥
आवरितां तुझे तुज नावरती । वाटे थोर चित्तीं आश्चर्य हें ॥ ध्रु० ॥
तुझिया विनोदें आह्मां प्राण साटी । भयाभीत पोटीं सदा दुःखी ॥ २ ॥
तुका म्हणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थासी ॥ ३ ॥

३

काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पैलीकडे ॥ १ ॥
नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घांट वैरियाचा ॥ ध्रु० ॥
आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥ २ ॥
तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेला हा विचार कळों आला ॥ ३ ॥

४

काम क्रोध आह्मीं वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥
आतां कोण पाहे मागें परतोनी । गेला हारपोनी देहभाव ॥ ध्रु० ॥
रिद्धि सिद्धि सुखें हाणितल्य लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥ २ ॥
तुका म्हणे आह्मी विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥

## मोरोपंती आर्या

त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक अष्टभाव उपजावे ।
जावे अनात्मधर्म–क्रोधादि मनोविकार वरजावे ॥ १ ॥

# पारिजातकाचीं फुलें.

१

सज्जनावरील प्रेमाचा शेवटही प्रेमांतच होतो, दुर्जनप्रेमाचा शेवट मात्र द्वेषांत व वैरांत होतो. सज्जनाचा कोपही जें कल्याण करील तें दुर्जनाचें प्रेमही करूं शकणार नाहीं.

२

शुद्धचरित पुण्यवंताला मरणाच्या प्रसंगींही आनंदच वाटला पाहिजे. कां कीं मन खाण्यासारखें कोणतेंच दुष्कृत्य त्याचे हातून न घडल्यामुळें त्याला कशाचेंही भय बाळगण्याचें कारण नाहीं.

३

सर्व भूतांविषयीं अत्यंत विशुद्ध प्रेम व यथाशक्ति परोपकार करण्याची कृति—असा मनुष्य सुखी असतो.

४

रणांगणावर हजारों वीरांना जिंकणाऱ्या योद्ध्यापेक्षां मनावर जय मिळविणारा अधिक श्रेष्ठ होय.

५

कर्कश भाषेनें पशुपक्षी सुद्धां दूर होतात!

६

दुर्विचार तरंगरूप असले तरी दुष्ट संगतींत समुद्ररूप होतात.

७

ज्याला जीविताशा आहे तो जसा विषाचा त्याग करितो, त्याप्रमाणें चिरंजीवपद ज्याला पाहिजे त्यानें सर्व वाईट संस्कारांचा त्याग केला पाहिजे.

८

मनुष्यानें सत्य, प्रिय व मित बोलायचाच अभ्यास ठेवल्यास त्यावर संकटेंच येणार नाहींत.

९

आपला द्वेष करणाऱ्यांच्या मंडळांत द्वेषरहित बुद्धीनें आपण राहूं या म्हणजे कांहीं कालानें आपल्याविषयींचा द्वेषाग्नि अपाप विझेल.

१०

द्वेषानें द्वेष मरत नाहीं, त्याला मारण्याचें सामर्थ्य प्रेमांतच आहे! प्रेमामृतवल्ली ही सकल विषयवल्लींचा नाश करण्यास समर्थ आहे.

# अभेदभक्तीची माधुरी

१

उदासीं स्वदासीं न मोक्षादि कांहीं ।
बहू मानिलें भक्तिवांचूनि कांहीं ।।
असें दास्य ज्याचें तया तूज देवा !
स्वदास्यास मी मागतों वासुदेवा ॥ १ ॥

जो स्वयें रस तयां रस नाहीं । भक्तिमाजि रसही रसनाहीं ।
मुक्तिही न बरि यास्तव लोकीं । भक्ति गोड बहु मानवलोकीं ।। २ ॥
सुधा जरी गोडचि फार साची । जिभेविणें आपुलिया रसाची ।
गोडी न जाणें, रस ना तिला हो ! । असे असाची तरी भक्तिलाहो ॥३॥
रसची मुक्ति, परंतु न जी भली । ह्मणुनि तीहुनि भक्ति अजी ! भली ।
तुजहुनी तव दास्यचि सुंदरा ! । बहु सुखप्रद कौस्तुभकंधरा ! ।। ४॥
मेघबिंदु सुखसिंधुचि जाला । पावला जन मुमुक्षु अजाला ।
ऐक्य तों सुरनदीसम भक्तां । ऐक्यही–भजनही अविभक्तां ॥ ५ ॥
सहज ऐक्य कळोनिहि मागुती । घडिघडी तुज भक्तचि मागती ।
जसि पितां अमृता न पुरे धणी । निकट दास्य; असें जरि तूं धणी ॥ ६ ॥
फुटोनी जयीं पांख ये शक्ति पक्षीं । न मातेस मानील तो गोड पक्षी ।
पिलूं माउलीलाचि सर्वत्र पाहे । मुखीं अन्न तें माय घाली कृपा हे ॥ ७ ॥
प्रियोत्कंठता स्त्रीस जैसी वियोगीं । मला प्रीति ते दे हरी ! नित्ययोगीं ।
जसी भेटि अत्यंत काळें पतीची । सदा भक्ति ऐसी असो श्रीपतीची ॥ ८ ॥
प्रल्हाद गर्भांतहि आठवीला । त्या कारणें नारद पाठवीला ॥
मुक्तींत हे प्रीति न देव दावी । ते मुक्तिची गोष्टिहि कां वदावी ? ॥ ९ ॥
सोनियाचि करितां परिसाची । श्रेष्ठता वदति हे परिसाची ।।
त्या महत्व–न तथापिहि हेमीं । भक्ति थोर म्हणतों तसि हे मी ॥ १० ॥

––वामनपंडित ( भक्तिमहात्म्य. )

नित्यानित्य विचारसार करितां वैराग्य चित्तीं धरी
तो जिज्ञासु मुमुक्षु विष्णुचरणीं सप्रेमसेवा करी ।
ज्ञानें अद्वयभक्ति त्यास कळतां ती गोड मुक्तीहुनी
जीवन्मुक्त मुकुंदभक्ति करितो सर्वात्मभावें मनीं ॥ ११ ॥

—वामनपंडित ( ब्रह्मस्तुति. )

२

( वर वामन पंडितांचे जे अकरा श्लोक दिले आहेत त्यांचें मननसुख

वाचकांनीं अवश्य भोगावें अशी आमची फार फार प्रेमाग्रहाची विनंति आहे. ते उगीच वरवर वाचून ठेवूं नयेत तर बदामाच्या दाण्यासारखे फोडून चावून पचवावेत ! मनाशीं **गुणगुणत** मननसुख भोगावें ).

उदास म्ह० निरिच्छ निष्काम असे भगवद्भक्त भक्तीवांचून मोक्षादिकांची इच्छाच करीत नाहींत. असें ज्याच्या दास्याचें गोडपण आहे त्या वासुदेवाचें दास्य म्यां न मागावें तर मागावें तरी काय ?

मोक्षरूप परमात्मा रसरूप—आनंदरूप आहे पण त्याला स्वतः तो रस चाखतां येत नाहीं. ( साखर साखरेचा आस्वाद घेऊं शकत नाहीं ); पण भक्तींत रसही आहे व रसनाही आहे ! यासाठींच मी मुक्ति मागत नाहीं; भक्ति फार गोड, तीच मला मानवते ! सुधा गोड खरी, पण तिला जीभ नसल्यामुळें ती आपल्या रसाची गोडी जाणत नाहीं, तिला रसभोग नाहीं. भक्तिसुखाचा लाभ यासाठींच मुक्तीपेक्षां अधिक वाटतो. मुक्ति रसरूप आहे पण तेथें जिभली ( रसास्वादसामर्थ्य ) नाहीं म्हणून भक्ति श्रेष्ठ म्हणतों ! म्हणून वासुदेवा ! तुझ्यापेक्षां तुझ्या दास्याचीच याचना मी करितों. मेघबिंदु सुखसिंधु होतो तसा मुक्तपुरुष परमात्मरूप होतो, पण आह्मांला तसलें ऐक्य नको; गंगा—सागर—संगमाचें आह्मांला ऐक्य पाहिजे, त्यांत ऐक्यही आहे व भजनही आहे ! अभेदभक्तीची गोडी कशालाच यायची नाहीं. देवा ! तुझें व जीवाचें सहज ऐक्य आहे हें कळूनही भक्त तुलाच मागतात. अमृताहून वेगळें राहून तें पिण्याची मौज आहे, तुजशीं ऐक्य कळून तुझें दास्य मागण्यांत तीच मौज आहे. पक्ष्याला पंख फुटल्यावर तो उडून जातो मग आईला जाणत नाहीं, पण पिलूं अंतर्बाह्य माउलीचें ध्यान करितें व ह्मणून त्याला आई प्रेमानें भरवितेही ! पतीच्या विरहांत सतीच्या मनाची जी दर्शनोत्कंठा असते तशी तुझा नित्ययोग असून मला भक्ति दे ! देवाला भक्त प्रल्हादाचें गर्भांतही स्मरण झालें म्हणून त्याच्यासाठीं नारद पाठविला. भक्ताची जशी देव काळजी वाहतात तशी मुक्ताची वाहत नाहींत ! सोन्यासाठीं परिसाची श्रेष्ठता, नाहींतर परिसाला पुसतो कोण ! भक्तासाठीं देवाचें देवपण ! ह्मणून देवा ! तुझी अद्वयभक्ति दे !

# तुकोजीराव महाराज होळकर.

वर्तमानपत्रांवरून इंदोर प्रकरणाची सर्व हकीकत आमच्या वाचकांस कळलीच आहे. तो समग्र वृत्तांत येथें देण्याचें कारण नाहीं. बावलाप्रकरणाचें निमित्त काढून व्हॉइसरॉय साहेबांनीं श्रीमंत तुकोजीराव महाराजांस राज्यत्याग करावयास लावलें असून इंदोरची समस्त प्रजा आज दुःखार्णवांत पडलेली आहे. वडया लाटसाहेबांनीं चौकशी कमिशनचा घाट घातला होता, पण इंग्रजसरकारशीं होळकर राज्याचें इ० स० १८०५ सालापासून दोस्तीचें नातें आहे हें लक्ष्यांत आणून महाराजांनीं चौकशी कमिशन पत्करून मानहानि करून घेण्यांपेक्षा खुषीनें राजदंड खालीं ठेवून जो बाणेदारपणा दाखविला व राज्यवैभव आपण होऊन सोडून देण्यांत जें धैर्य दाखविलें तें खरोखर अवर्णनीय आहे. इंदोरचें राज्य म्हणजे देवी अहल्याबाईचें राज्य, धर्मराज्य, देवब्राह्मणांचें राज्य आहे. त्यावर हिंदुमात्राचें अत्यंत प्रेम आहे. महाराष्ट्रीयांच्या गत वैभवाचें स्मारक म्हणून अखिल महाराष्ट्रीयांचें इंदोरराज्यावर अत्यंत प्रेम आहे. महाराज स्वतः प्रजापालनदक्ष आहेत, बुद्धिमान् आहेत, दयार्द्र अंतःकरणाचे आहेत, उदार व धीरोदात्त कोटीचे थोर पुरुष आहेत व इंदोर रियासतींतील सर्व लोकांचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम आहे, या गोष्टी आम्हांस पूर्णपणें माहीत आहेत. टाईम्स, क्रॉनिकल व कांहीं मराठी पत्रें यांनीं पहिल्यापासून गैरमाहितगारपणामुळें त्यांजवर टीकेचा भडिमार करून चुकीची दिशा सरकारास दाखवून दिली. त्यामुळें हा प्रसंग आला कां ' वेश्यांगनेव नृपनीतिरनेकरूपा ' या राजनीतितत्वाप्रमाणें इंग्रज सरकारचें यांत कांहीं दूरचें कौटिल्य आहे हें सामान्य जनांस ठरवितां येणें कठिण आहे, तथापि यांत इंग्रज सरकारनें फार मोठी चूक व अन्याय केला आहे यांत संशय नाहीं. इंदोरचें राजघराणें पहिल्यापासून बाणेदार व स्वाभिमानी आहे. मल्हारराव, अहल्याबाई, यशवंतराव, दुसरे तुकोजीराव यांच्या कारकीर्दी पाहिल्या असतां त्या सर्वांच्या ठायीं जो मानीपणा, जी प्रजावत्सलता, जी धर्मबुद्धि, जें औदार्य प्रगट झालेलें आहे तेच ते गुण तिसऱ्या तुकोजीराव महाराजांतही आहेत हें इंदोरच्या लोकांस पूर्णपणें माहीत असल्यामुळें लोकांची महाराजांवर निष्कपट प्रीति आहे. १८५७ च्या धामधुमींत इंदोर राज्यानें इंग्रजी राज्यास जें साह्य केलें त्याचीही लॉर्ड रीडिंग साहेबांस विस्मृति पडावी हें राज्यमदांध्यच समजलें पाहिजे; पण याचा दूरवर परिणाम चांगला होणार नाहीं हें त्यांनीं विसरूं नये. शिशुपालाचे शंभर अपराध होईतों भगवंतांनीं गय केली पण सर्व पापांचें प्रायश्चित्त त्यास शेवटीं घ्यावें लागलें, हा पूर्वेतिहास ध्यानीं ठेवून इंग्रज सरकार आमच्या राजेमहाराजांशीं

व प्रजेशीं न्यायानें, दयेनें, समजुतदारपणानें अजून वागेल तर यांत त्यांचेंही हितच आहे. महाराजांविषयीं झालेला अन्याय सरकार दूर करील तर यांत त्यांचा लौकिक आहे. महाराज चौकशी कमीशनला उभे राहिले नाहींत यांत त्यांनीं दूरदर्शिपणा व स्वार्थत्याग दाखविला असून या त्यांच्या गुणांचें चीज इंग्रज सरकारनें न केलें तरी हिंदुस्थानांतील लोक केल्यावांचून खास राहणार नाहींत. लोकांच्या दुर्भाग्यानें झालेला निवाडा फिरला नाहीं तरी महाराज प्राप्त परिस्थितीचा आपल्या आत्मिक कल्याणार्थ उपयोग करून घेतील अशी त्यांची भूमिका आहे. श्रीमंत बाळासाहेब महाराज हे बुद्धिवान्, समंजस असून तीन वर्षांत राज्यभार वाहण्यास समर्थ होतील. महाराज शक्य तितका प्रयत्न करून राज्यवैभव सांभाळण्याची पराकाष्ठा केल्यावांचून राहणार नाहींत व त्यांनीं राहूंच नये असेंच कोणीही म्हणेल. पण प्रयत्नांची शिकस्त करूनही यश न आलें तरी महाराज आंतल्या परमार्थ प्रवणतेमुळें विषण्ण होणार नाहींत असें आम्हांस वाटतें. प्रत्येक जण जन्मतः महाराज नसतो, पण नरदेहाचें सार्थक करण्याचा मार्ग सर्वांसच सुलभसाध्य असतो. त्या मार्गानें गेल्यास मनुष्य-जन्माचें साफल्य होईल. आपल्याच राज्यांत, निदान आपल्या परमपूज्य भरतखंडांत, नर्मदा किंवा गंगा यांच्या तीरीं शांतिकुंजांत राहून राज्ययोग नसला तरी योगराज्याचें ऐश्वर्य भोगण्यास कोण नको म्हणणार आहे? रघु-राजानें राजैश्वर्य आपला पुत्र जो अज त्याच्या स्वाधीन केलें व आपण योगै-श्वर्य संपादनास लागला त्यावेळचें कालिदासाचें वर्णन ( रघुवंश सर्ग ८ ) महाराजांनीं एकवार नजरेखालून घातल्यास त्यांस नवीन उमेद येईल यांत शंका नाहीं.

गुणवत्सुतरोपितश्रियः परिणामे हि दिलीपवंशजाः ।
पदवीं तरुवल्कवाससां प्रयताः संयमिनां प्रपेदिरे ॥ ११ ॥
न नवःप्रभुराफलोदयात्स्थिरकर्मा विरराम कर्मणः ।
नच योग विधेर्नवेतरः स्थिरधीरा परमात्मदर्शनात् ॥ २२ ॥

हा सर्व भाग नीट पाहून महाराज आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध परमात्म-प्राप्तीच्या साधनांत खर्च करतील तर झाला हा प्रकार परम कारुणिक भग-वंतानें आपल्या कल्याणार्थच रचिला असें त्यांस पुढें म्हणावेंसें वाटेल. ‘ जें कांहीं करीसी तें माझें स्वहित ’ अशी भक्तांची भावना असते.

———

# थोरांचा समागम.

१

श्रेष्ठ भ्राता पित्यासमान आहे, भार्या व पुत्र हे साक्षात् आपली तनु आहेत, आपले सेवक आपल्या छायेसारखे आहेत, कन्या परकीय धन असल्यामुळें कृपापात्र आहे–तस्मात् या सर्वांनीं दुरुत्तरांनीं जरी अधिक्षेप केला तरी यांच्याशीं विवाद न करितां व क्रोधास वश न होतां ( असंज्वर ) भल्या गृहस्थानें सर्व सहन केलें पाहिजे. (मनुस्मृति अ० ४ ).

२

सहनशीलता हें मोठें तप आहे. यानें अंतरांतील अहंकारादि: सर्व दोष दग्ध होऊन चित्त निर्मल होतें.

३

म्हणोनी दुर्वाक्य न बोलावें । पराचें: आपण साहीत जावें ।
याहूनि श्रेष्ठ साधन बरवें । भुवनत्रयीं असेना ॥—मुक्तेश्वर

४

गौतमबुद्ध ह्मणाला:–" सज्जन कोण तर जो धार्मिक आहे तो. सौजन्य म्हणजे सदसद्विवेक बुद्धि व इच्छाशक्ति यांच्या समन्वयानें जें ठरतें तें. महात्मा कोण ? सहनशक्ति पूर्णत्वानें ज्याच्या अंगीं आहे तो. परकृत अपराध किंवा पीडा शांतपणानें सोसणें व निष्कलंक चारित्र्य संभाळणें हें महात्म्याचें लक्षण आहे. सत्कारार्ह किंवा पूज्य कोण ? ज्ञानप्रकाशानें पूर्ण असेल तो. "

Beals' catena– 13-42

५

त्रिविध ताप प्राप्त झालें असतां ज्याचें चित्त क्षुब्ध होत नाहीं तो सहनशील. ज्ञानोबाराय ह्मणतात:—

त्रिविध मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे ।
वरी पडिलिया नव्हे । वांकडा जो ॥ ३४४ ॥
अपेक्षित पावे । तें जेणें तोषें मानावें ।
अनपेक्षिताहि करवे । तोचि मान ॥ ३४५ ॥
जो मानापमानातें साहे । सुखदु:ख जेथ सामाये ।
निंदास्तुति नोहे । दुखंड जो ॥ ३४६ ॥
घेऊनि जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट ।
करी वाड पोट । समुद्र जेवीं ॥ ३५० ॥

तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींच नाहीं ।
आणि साहतसे ऐसेंही । स्मरण नुरे ! ॥ ३५१ ॥
शरीरा जें पातलें । तें करूनि घालीं आपुलें ।
तेथ साहतेंनि नवलें । घेपिजेना ॥ ३५२ ॥
हे अनाक्रोश क्षमा । जेथ आथी प्रियोत्तमा ।
जाण तेथें महिमा । ज्ञानासि गा ॥ ३५३ ॥—ज्ञाने० अ० १३.

६

Patience is the calm fretless dignity of the soul, amid the wild tempests and agonising sufferings of this mortal scene.

—Dr. Davies.

७

ज्ञानोबाराय ज्याला ' अनाक्रोश क्षमा ' म्हणतात त्यालाच डॉ. डेव्हिस ' clam fretless dignity of the soul ' म्हणतात. दोहींचा अर्थ एकच. मनांत चरफडाट ठेवून बाहेर शांत यांत मौज नाहीं. आक्रोश ह्म० क्रोध, दुःख, तडफडाट ज्यांत नाहीं ती अनाक्रोश क्षमा. महात्मा गांधींच्या अहिंसेचा अर्थ हाच आहे.

८

मनांत क्रोध व बाहेर शांति ही शांति नव्हे. आंत हिंसा व बाहेर अहिंसा ही अहिंसा नव्हे. मनांत संताप व मुखावर हास्य ही प्रसन्नता नव्हे. हें सारें ढोंग आहे, हा वरपंग आहे. दरबारी किंवा व्यावहारिक मुत्सद्दी म्हणविणाऱ्यांच्या अंगीं हा दुटप्पीपणा दिसत असला तरी हा सद्‌गुण नव्हे. ' चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता ' क्रिया, वाचा व मन यांत एकरूपता असणें हेंच साधुत्व होय.

९

भल्या बुऱ्या गोष्टी मनुष्याच्या हातून घडतच असतात. चुकत नाहीं कोण ? मनुष्य चुकत चुकतच शहाणा होत असतो. मनुष्य आपत्तींत सांपडला असतां त्याच्या वर्मीं प्रहार करणें हें सुजनाचें लक्षण नाहीं. मुक्तेश्वर सांगतातः—

वोखटें गोमटें स्वभावें । मनुष्यापासूनि घडे आघवें ।
समयीं वर्मीं जरी खोंचावें । तरी पुरुषार्थ कायसा ? ॥ १ ॥

१०

दुसऱ्याचा क्षुल्लक अपराधही पोटांत रहात नाहीं, व स्वतःच्या अपरा-

धांचे डोंगर तेथें सामावतात हें केवढें नवल आहे! दुसऱ्याच्या दोषांबद्दल क्षमा व स्वतःच्या दोषांची जागृति आणि ते दूर करण्याची उत्सुकता हे दोन्ही सहनशीलतेचे पर्याय होत. हें तप आहे.

११

नारायणा! दुसऱ्याचे दोष पर्वतप्राय असले तरी ते मला मोहरीसारखे दिसूं देत व माझे स्वतःचे दोष सर्षपमात्र असले तरी ते मला पर्वतप्राय दिसूं देत. यामुळें मी लवकर दोषमुक्त होईन व मी शुद्ध झालों कीं विश्वांत मला अशुद्ध कांहींच अढळणार नाहीं. माझ्यांत अनंत दोष आहेत म्हणून मला दुसऱ्याचे दोष दिसतात. दोषच दोषाला पहात असतो.

१२

मी निर्दोष, निष्पाप, निष्कलंक झाल्यावर दुनियेंत दोष, पाप व कलंक मला आढळणार नाहींत.

---

# कामक्रोधादि रिपु.

## काम, क्रोध व लोभ यांचा त्याग करा; व आत्महित पहा!

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥
एतैर्विमुक्तः कौंतेय! तमोद्वारैस्त्रिभिर्नरः।
आचरत्यात्मनःश्रेयस्ततो याति परां गतिम् ॥

—गीता अ० १६

भावार्थः—काम, क्रोध व लोभ हे नरकाचें त्रिविध द्वार असून आत्मनाश मूर्तिमंत हेच आहेत. म्हणून पुरुषार्थी जीवानें यांचा त्याग करावा. हे कुंतिपुत्रा वीर अर्जुना! ह्या तीन तमोद्वारांतून सुखरूपपणें पार पडलेला मनुष्य आपलें कल्याण करून घेण्याचे मार्गाला लागतो व क्रमानें उत्तम गतीला जाऊन पोंचतो.

१. ज्ञानोबारायांच्या आधारें आपण ह्याचा अर्थ ध्यानीं आणण्याचा प्रयत्न करूं. काम, क्रोध व लोभ या तिहींचें जेथें बंड माजलें असतें तेथें अशुभ पिकतें. सर्व अमंगल ओढून येतें. सर्व दुःखांचा अनुभव आणून

देणारें हे वाटाडेच आहेत ! किंवा पापी लोकांना नरकाच्या दरबारांत खेंचून नेणाऱ्या कमीटीचे हे तीन प्रमुख सभासदच आहेत असें समज ! हे तीन उठले नाहींत तोंवर 'नरक' शब्द पुराणांतच अडकून राहील, पण या तिघांचें प्राबल्य झालें कीं ते मूर्तिमंत नरक इहलोकीं प्रत्यक्ष उभा करितात. यांच्यामुळें अपाय लवकर प्राप्त होतात, यातना सवंग होतात, आणि हानी हानी म्हणून ज्यांना म्हणतात ती हानि म्हणजे यांचा चित्तांत उठाव होय. कामक्रोधलोभ ह्या त्रिदोषांचा समुदाय म्हणजे नरकाचा दारवंटाच होय. ह्या तिघांच्या पुढयांत जो सांपडला त्याची नरकाकडे रवानगी झाली म्हणूनच समजावें. हे सर्वांत अत्यंत वाईट होत.

२ या तिघांचा सर्वस्वी त्याग करावा तरच धर्म, अर्थ काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची गोष्ट बोलावी. हे तिघे खडे आहेत तोंवर खालचा अर्थ पुरुषार्थ मिळत नाहीं, मग मोक्षाची गोष्ट कशाला बोलायला हवी ! हे कोणताच पुरुषार्थ साधून देत नाहींत. हे तिघे अंतर्यामीं जागे आहेत तोंवर कोणाचें म्हणून कल्याण होईल ही गोष्टच बोलायला नको. जो आत्मनाशाला भितो व ज्याला आत्महित व्हावें असें वाटतें त्यानें यांची संगतच सोडावी. हे तिन्ही जागते ठेवून महत्कार्याच्या सिद्धीची अपेक्षा करणें ह्मणजे पोटाला दगड बांधून बाहूंनीं तरून जाणें किंवा जगण्यासाठीं कालकूट विषाचें सेवन करणें यासारखेंच अत्यंत असमंजसपणाचें आहे. म्हणून बापा ! या तिहींचा मार्गच पुसून टाक, तो पंथ बुजवून टाक. या तिघांचा त्याग करून आत्महिताच्या मार्गाला कसें लागावें हें सांगण्यापूर्वी यांचा प्रताप केवढा आहे व यांच्या संगतीनें केवढाले दुष्परिणाम होतात हें पाहूं.

३. ज्ञानोबारायांनीं कामक्रोधादिकांना ज्ञाननिधीचे भुजंग, विषयदरीचे वाघ, भजनमार्गाचे मांग, देहदुर्गाचे धोंड इ० प्रकारें वर्णिलें आहे व 'हे कृतांताच्या ठायीं मानिजती' असें बजावलें आहे. हे जीविताचे वैरी आहेत. विवेक, वैराग्य, आनंद यांना हे वाऱ्यालाही टेकूं देत नाहींत, साध्वी शांति यांच्याजवळ रहात नाहीं. अहंकार, दंभ, मोह, मद, दर्प कठोरता हे यांचे जिव्हाळ्याचे दोस्त. हे सर्वस्वाचें वाटोळें करितातः—

इहीं संतोषवन खांडिलें । धैर्यदुर्ग पाडिले ॥
आनंदरोप सांडिले । उपडूनियां ॥ २५३ ॥
इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं । सुखाची लिपी पुसिली ।
जिव्हारीं आगी सूदली । तापत्रयाची ॥ २५४ ॥

हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती ।
न बोलतां कवळिती । प्राणियांतें ॥ २५७ ॥
हे शस्त्रेंवीण साधिती । दोरेंविण बांधिती ।
ज्ञानियासी तरी वधिती । पैज देऊनी ॥ २५८ ॥
हे चिखलेंवीण रोंविती । पाशेंवीण गोविती ।
हे कवणाजोगे न होती । आंतुवटपणें ॥ २५९ ॥ ज्ञा० अ० ३

कामक्रोधादि वैरी हे संतोषरूप वनाचा विध्वंस करितात, धैर्याचे किल्ले जमीनदोस्त करितात, आनंदाचें रोपडें उपटून टाकतात, ज्ञानाचीं रोपें खुडून टाकतात, सुखाची लिपीच पुसून टाकतात व प्राणिमात्राच्या हृदयांत त्रिविध तापाच्या आगीचा भडका उठवितात ! हे पाण्यावांचून बुडवितात, अग्नीवांचून जाळतात, न बोलतां प्राण्याला ग्रासतात ! हे शस्त्रावांचून मारतात, दोरावांचून बांधतात, जाणत्यांनाही पैज देऊन ठार करितात. हे चिखलावांचून रोंवतात, पाशावांचून बांधतात व अंतर्यामीं बसून एवढाले प्रताप गाजवीत असल्यामुळें व त्यांना पकडून ठार करणें कठीण जात असल्यामुळें यांच्या तुल्यतेचें कोणीही नाहींत. यांनीं उर्वीतल जवळ जवळ निर्वीर्य केले आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

४. कामक्रोधादि षड्रिपूंच्या मंडळाचा अध्वर्यु काम आहे. त्या कामाचा प्रताप सर्वांत पुन्हा अधिक आहे. तो सहाही रिपूंचा राजा आहे. प्राणिमात्राच्या अंतर्यामीं सहाही रिपु आहेत. त्यांना ओळखून, भिऊन मनुष्यानें विवेक करावा व स्वहितमार्ग धरावा. विषयाच्या दर्शनानें व ध्यानानें त्याविषयीं आसक्ति म्ह० काम उत्पन्न होतो. काम उत्पन्न झाला कीं प्राणी घसरत घसरत रसातळाला जाऊन पोंचतो. कामापासून क्रोध, क्रोधापासून संमोह, संमोहामुळें स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशामुळें बुद्धिनाश व बुद्धिनाशापासून सर्वस्वनाश असा हा उतरणीचा मार्ग आहे [ गीता अ० २ श्लोक ६२–६३ ]. विषयध्यानापासून ही उतरण सुरू होते म्हणून विषयाच्या ठिकाणीं दोषदर्शन ठेवण्यास सांगितलें आहे [ गीता अध्याय १३ श्लोक ८ ] इंद्रियार्थ जे विषय त्याविषयीं पुरा तिटकारा हें तेथें ज्ञानाचें लक्षण सांगितलें आहे.

वमिलिया अन्ना । लाळ न घोटी जैंवि रसना ।
आंग न सुये आलिंगना । प्रेताचिया ॥ ५१४ ॥
विष खाणें नागवे । जळत वरीं न रिघवे ।
व्याघ्र वीवरां न वचवे । वस्ती जैवीं ॥ १५ ॥

अर्जुना तेणें पाडें । जयासी विषय वार्ता नावडे ।
नेदी इंद्रियांचेनि तोंडे । कांहींच जावों ॥ १७ ॥
नाराचांचीं आंथरुणें । पूयपंकीं लोळणें ।
तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ २१ ॥
तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य ।
येणें ब्रह्मानंदायोग्य । होती जीव ॥ २३ ॥ अ० १३ ॥

ओकून पाडलेल्या अन्नाविषयीं जीभ जशी लाळ घोटीत नाहीं, प्रेताला कोणी आलिंगीत नाहीं, वाघाच्या गुहेंत कोणी उडी घेत नाहीं तसे ज्याचें मनच विषयाकडे वळत नाहीं, तो ज्ञानी होय. बाणांच्या आंथरुणावर निजणें किंवा पूयपंकांत लोळणें तसे सर्व विषयभोग तो मानतो. असलें तीव्र विषयवैराग्य जेथें आहे तेथेंच आत्मलाभाचें भाग्य आहे व वैराग्य असलें तरच जीव ब्रह्मानंदाला पात्र होतो. विषयवैराग्यापासून ब्रह्मानंदाला जर सुरवात, तर विषयासक्तीपासून म्ह० कामापासून नरकाच्या खड्ड्यांत पडण्यास प्रारंभ हें उघडच झालें. कामाच्या पोटीं क्रोध, लोभ, संमोह इ० क्रमानें वाढत जाऊन जीव नरककुंडांत उडी घेतो, म्हणून विषयासक्तीचें मूलच खुडण्यांत शहाणपण आहे. समर्थ सांगतातः—

भल्यासी वैर करिती ते सारी वोळखा बरें ।
षड्रिपू कामक्रोधादि मद मत्सर दंभ तो ॥ १ ॥
काम उत्पन्न होताहे ते वेळीं नावरे जना ।
काम वेड जडे ज्याला तो प्राणी आत्मघातकी ॥ २ ॥
कित्येक योषितेसाठीं कां तरी मृत्यु पावले ।
झडाच घालिती नेटें पतंगापरि भस्मति ॥ ३ ॥
आपणा राखणें नाहीं शुद्धि नाहीं म्हणोनियां ।
सभाग्य करंटे होती वेश्येसी द्रव्य नाशिती ॥ ४ ॥
रूपहानी शक्तिहानी द्रव्यहानी परोपरी ।
कुलहानी यातिहानी सर्व हानीच होतसे ॥ ५ ॥

अशीं उदाहरणें आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यहीं घडतांना आपण पाहतों. काम म्ह. विषयांविषयीं आवड पण सामान्यतः स्त्रीविषयक आवड, सर्व आवडींत मुख्यत्वें वसत असल्यामुळें काम म्ह. स्त्रीविषयक काम असें समजलें जातें. विषयविनोद चांगला नव्हे, तो अत्यंत मारक आहे. मोठमोठे या विषयासक्तीमुळ रसातळाला गेले आहेत. श्रीएकनाथमहाराजांनीं यावर एक सुंदर पद केलें आहे.

## थट्टा उर्फ विषयासक्ति.

### पद.

अशी ही थट्टा । भल्या भल्यांसि लाविला बट्टा ॥ ध्रु० ॥
थट्टा दुर्योधनानें केली । पांचाळी सभेमाजि आणिली ।
गदाघायें मांडि फोडिली । अशी ही थट्टा ॥ भल्या० ॥ १ ॥
थट्टेनें मेला दुर्योधन । भस्मासुर गेला भस्म होऊन ।
वाली मुकला आपुल्या प्राणा । बरि नव्हे थट्टा ॥ भ० ॥ २ ॥
थट्टा रावणानें केली । नगरी सोन्याची बुडविली ।
थट्टा ज्यासि त्यासि भोंविली । बरि नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ३ ॥
विराट राजाचा मेहुणा । नाम तयाचें कीचक जाणा ।
त्यानें घेतलें बहुतांचें प्राणा । बरि नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ४ ॥
थट्टेपासुनि सुटले चौघेजण । शुक भीष्म आणि हनुमान ।
चौथा कार्तिकस्वामी जाण । त्याला नाहीं थट्टा ॥ भ० ॥ ५ ॥
एका जनार्दन म्हणे सर्वांला । थट्टेला भिऊनि चाला ।
नाहिं तरि नेइल नरककुंडाला । अशी ही थट्टा ॥ भ० ॥ ६ ॥

दुर्योधन, भस्मासुर, वाळी, कीचक, रावण असे हजारों पुरुष, महाप्रतापी व बहुगुणी, पण या विषयविनोदाच्या पायीं बेचिराख झाले आहेत ! हीं थोरा मोठयांचीं उदाहरणें पाहून गरिबांनीं अतिशयच सावध असायला नको काय ?

५. कोणी म्हणेल कीं हें एवढें वैराग्य आम्ही कोठून आणावें ? विषयाविषयीं वैराग्य हें महद्भाग्य खरें, पण हें आह्मांला काय होय, आम्हांला विषय प्रिय आहेत. तर त्याला उपाय म्हणूनच शास्त्रांनीं गृहस्थाश्रम लावून दिला आहे. समर्थ सांगतातः—

विधिनें विषया घ्यावें अविधी नसतां बरें ।
आश्रमीं न्यायनीतीनें प्रपंच करणें सुखें ॥

तुकोबांनींही म्हटलें आहेः—

विधिनें सेवन । विषयत्यागातें समान ॥ १ ॥

विधिपूर्वक विषय सेवन करण्याची परवानगी आहेना ? देव ब्राह्मणांसमक्ष 'धर्मे चार्थे च कामेच' अशी प्रतिज्ञा करून ज्या धर्मपत्नीचें पाणिग्रहण केलेत तिच्या संगतींत काय विषयविनोद करावयाचा असेल तो खुशाल करा, त्याला नाहीं कोण म्हणत आहे ? पण ध्यानांत ठेवा-विधिपूर्वक विषयसेवन हें आयुष्याचें ध्येय नव्हे, तर हें विषयत्यागाची तयारी करण्याची एक पायरी आहे. विषयत्यागावांचून परमार्थाची गोष्टच बोलायला नको, पण शुक,भीष्म,

हनुमान, कार्तिकस्वामी, शंकराचार्य, ज्ञानोबाराय, समर्थ यांच्यासारखे अंत-र्बाह्य विषयविमुख राहिले; तरी जनक, रामकृष्ण, एकनाथादि हजारों सत्पुरुष प्रपंचांत 'अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव' या वासिष्ठोक्तीप्रमाणें राहूनच कृतार्थ झाले, नव्हे जगास कृतार्थ करिते झाले आहेत ना ? विधि-मर्यादेच्या आंत प्रपंचकाम जीवाच्या परमार्थास बाधक होत नाहीं, अविधि कामाची सर्व संतांनीं निंदा केली आहे.

धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।

असें भगवंतांनींच गीतेंत सांगितलें आहे ना ? धर्माशीं अविरुद्ध म्ह. विधि-पूर्वक काम हें देवाचेंच मंगलरूप आहे.

६. तात्पर्य विधिपूर्वक विषयसेवनास बाध नाहीं, पण हेंही करीत अस-तांना विषयत्यागावरच मोहोर ठेवून विषयवैराग्य प्राप्त करून घेतलें पाहिजे. विषयसक्ति उर्फ काम ही अधोगतीची उतरण दाखविणारी पहिली पायरी म्हणून पूर्वीं सांगितलें आहे; आतां विषयविरक्ति उर्फ निष्कामता ही उर्ध्वगतीची चढण दाखविणारी पहिली पायरी आहे. हिच्यानंतरच्या चार पायऱ्या चढून कोणीही मोक्षसाम्राज्यभुवनांत प्रवेश करावा. ज्ञानोबाराय सांगतातः—

त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटीं फिटलिया नगर ।
त्रिदाह निमालिया अंतर । जैसें होय ॥ ४३९ ॥
तैसा कामादिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं ।
संग लाहे मोक्षमार्गीं । सज्जनांचा ॥ ४४० ॥

कफ वात व पित्त या तीन दोषांनीं सांडलेलें शरीर; चोरी, चहाडी व शिंदळकी या त्रिकूटापासून सुटलेलें नगर; व आध्यात्मिक, आधिभौतिक आधिदैविक या त्रिविध तापांपासून मुक्त असलेलें अंतःकरण जें सुख भोगतें तेंच श्रेष्ठ प्रतीचें सुख काम, क्रोध व लोभ ह्या त्रिविध अंतःशत्रूंपासून मुक्त झालेल्या जीवाला प्राप्त होत असतें ! कामक्रोधादिकाच्या तडाख्यांतून सुटलेला जीव असें समा-धानीचें किंवा शांतीचें सुख भोगूं लागला कीं चार टप्प्यांतच तो मोक्षागारांत प्रवेश करितो.

मग सत्संगें प्रबळें । सच्छास्त्राचेंनि बळें ।
जन्ममृत्यूचीं निमाळें । निस्तरे रानें ॥ ४४१ ॥
ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें ।
तें तैसेंचि पाटण पावे । गुरुकृपेचें ॥ ४४२ ॥
तेथ प्रियाची परमसीमा । तो भेटे माउली आत्मा ।
तये खेवीं आटे डिंडिमा । सांसारिक हें ॥ ४४३॥

ऐसा जो कामक्रोधलोभा । झाडी करूनि ठाके उभा ।
तोचि येवढिया लाभा । गोसावी होय ॥ ४४४ ॥

जीव परमार्थमार्गाला लागला कीं सत्संग, सच्छास्त्र, गुरुकृपा व आत्मप्राप्ति ह्या चार प्रसंगांतच मुक्त कोटीला पोंचतो. कामक्रोधादिकांपासून ज्याची सुटका झाली, मग ती पूर्वपुण्यसंस्कारबलानें उपजत वैराग्य प्राप्त होऊन होवो किंवा प्रपंचांतील कामक्रोधलोभादिकांच्या लाथा बसल्यावर डोळे उघडल्यानें होवो, पण जो कामक्रोधलोभ यांच्यापासून निसटला व मोक्षाची वाट चालू लागला त्याला प्रथम सत्संग मिळतो. सत्संग हें पहिलें साधन आहे. मग सत्संग जसजसा दृढतर होत जातो तसतसें सत्संगांतच सच्छास्त्र श्रवण होतें. संतांच्या मुखानें आत्मविद्येचें आकलन होतें. दोघांच्या साह्यानें तो जन्ममृत्यूचीं माळरानें ओलांडून पैलपार जातो. मग आत्मानंद जेथें मूर्तिमंत वसतो त्या गुरुकृपेच्या नगरीं तो प्रवेश करितो. तेथें परम प्रेमास्पद जो आत्माराम त्याची भेट होते व अमृतभेटीबरोबर प्रपंचाचा सारा गलबला पार ओसरतो. याप्रमाणें कामक्रोधादिकांपासून सुटलेला जीव क्रमानें स्वानंदसाम्राज्यपदावर आरूढ होतो !

---

# आहे नारायण जवळीच.

(लेखकः—**रामानुज.**)

हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःख निवारिता नारायण ।
नलगे वाहणें संसार उद्वेग । जडो नेदी पांग देवराय ।
असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ।
तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥

वरील अभंगामध्यें संतशिरोमणी तुकाराममहाराजांनीं भक्तानें कशा प्रकारची मनः प्रवृत्ति ठेवली पाहिजे, त्याची भावना काय असली पाहिजे त्यानें आपलीं कर्तव्यकर्मे कशा रीतीनें केलीं पाहिजेत व ईश्वराचा मोठेपणा व सर्व व्यापित्व कसें जाणलें पाहिजे हें सांगितलें आहे. विशेष विचार केल्यास भक्ति कर्म व ज्ञान यांचा या अभंगामध्यें समुच्चय झाला आहे असें म्हटलें तरी चालेल. पर्यायानें ईश्वराचा खरा व प्रेमळ भक्त असल्यास

त्याच्या हातून भक्ति करीत असतां कर्में कशा रीतीनें झालीं पाहिजेत व शेवटीं कशा प्रकारच्या श्रद्धेनें त्यास ज्ञान होतें हेंही सांगितलें आहे.

मनुष्यप्राणी जन्मास आल्याबरोबर सुखदुःखादि द्वंद्वें त्याच्यामागें लागलेलीं आहेत, व पुष्कळांच्या बाबतींत 'सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें' असाच अनुभव येतो. संसारांत राहून आपलीं कर्तव्यकर्में करणाऱ्या मनुष्याला भय व चिंता हीं ठेवलेलीं आहेत. सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास सुखी म्हणून गणला जाणारा मनुष्य कुठल्याना कुठल्या तरी बाजूनें दुःखी असतो. म्हणूनच समर्थांनीं 'जगीं सर्व सूखी असा कोण आहे?' असा विचारी मनास प्रश्न केला आहे. वरील पहिल्या चरणामध्यें श्रद्धाळू व भाविक लोकांस भय व चिंता बाळगण्याचें कारण नाहीं. स्वतः नारायण सद्भक्ताचें दुःख निवारण करण्यास तयार असतो असें अभय व्यक्त केलें आहे. अर्थात् ज्या ज्या मानानें श्रद्धा व भक्ति दृढ असेल त्या त्या मानानें नारायण जबाबदारी पत्करतो हें उघड आहे. इतिहास, पुराणें किंवा महाराष्ट्रांतील साधुसंतांचीं चरित्रें यांमधून परमेश्वरानें स्वभक्तांस अनेक प्रसंगीं सहाय्य केल्याचीं उदाहरणें आहेत. ज्यांची त्यांच्यावर श्रद्धा असेल त्यांना त्यांचे तात्त्विक महत्त्व सहज कळून येण्याजोगें आहे. आपणांस व्यवहारामध्यें श्रद्धायुक्त सदाचरणानें, न्यायानें चालणाऱ्या मनुष्यास संकटकाळीं कोणत्याना कोणत्या स्वरूपांत मदत मिळाल्याचीं उदाहरणें आढळतात, त्याचें मूळ तरी वरील तत्वामध्यें आहे.

प्रल्हादाचें रक्षण कशा रीतीनें झालें, द्रौपदी वस्त्रहरणाचे वेळीं प्रभूनें कसें सहाय्य केलें, सद्भक्त पांडवांचें निरनिराळ्या बिकट प्रसंगीं कृष्णानें कसें रक्षण केलें वगैरे गोष्टींचा विचार केल्यास 'न मे भक्तः प्रणश्यति' हें वचन खरें करण्याकरितां ईश्वर कशीं सूत्रें हालवींत असतो हें दिसून येईल.

खऱ्या श्रद्धावान् भक्तास संसारासंबंधीं काळजी बाळगण्याचें किंवा त्याचा कंटाळा करण्याचें कारण नाहीं. ईश्वर अशा भक्तास काळजी पडूं देत नाहीं. व संकटें आलीं तर तीं दूर करून आपल्या भक्तांचे कोड पुरवितो. वरील अभयावरून अशी शंका येईल कीं, आपण कांहींच धडपड करण्याचें कारण नाहीं. भय चिंता वगैरे परस्पर निवारण केलीं जातील व जगांतील कर्तव्याचा खटाटोप करण्याची जरूरी नाहीं. तर संसारांतील व्यावहारिक कर्तव्यकर्में करीत रहावें पण तीं करीत असतां ईशावर भार टाकून त्यापासून उद्भवणाऱ्या भय, चिंता किंवा इतर उद्वेगजनक प्रकार याविषयीं फिकीर करूं नये कारण पंगुपणा नाहींसा करणारा परमेश्वर समर्थ आहे.

संसारामध्यें तन्मय होऊन सतत त्याची चिंता करणाऱ्या मनुष्यास सतत दुःख ठेवलेलें आहे; परंतु संसारांतून मन किंचित् बाजूला काढून प्रभूच्या ठिकाणीं लावलें तर त्यास खरी शांति प्राप्त होते व तोहि मदत करण्यास तयार असतो. संसारासंबंधीं विशिष्ट गोष्टी आपल्या मनाप्रमाणें घडवून आणणें पुष्कळदां अशक्य असतें व ह्या बाबतींत पुष्कळांची फजिती व निराशा होऊन सर्वच गोष्टी आपल्या हातांत नाहींत, कोणी तरी अशी शक्ति आपल्या हातांत ठेवली आहे व त्यामुळें अनपेक्षित गोष्टी घडतात असें म्हणण्याची पाळी येते. व नंतर 'आलिया भोगासी असावें सादर। देवावरि भार घालोनियां' ह्या विचाराचा आश्रय करावा लागतो.

तिसऱ्या चरणामध्यें एका मोठ्या तत्त्वाचा अवतार केला गेला आहे. नेहमीं धैर्य धरावें व समाधान वृत्तीनें रहावें, कारण ज्याचा आपण आश्रय केलेला आहे तो आपल्याजवळच आहे. तो सद्भक्तांस कधींही विसंबत नाहीं. 'नाहं वसामि वैकुण्ठे योगीनां हृदये रवौ। मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद।' असें वचन आहे. वेदान्तदृष्ट्या ईश्वर अमुक वेळीं जवळ असतो व अमुक वेळीं जवळ नसतो अशी गोष्ट संभवत नाहीं. कारण आपणच ईश्वरस्वरूप असून आपल्या ठिकाणीं ईश्वरत्व कायमचें आहे, अशी वेदान्ताची शिकवणूक आहे. 'अहं ब्रह्मास्मि' मी ब्रह्म आहें हेंच वेदान्ताचें तत्व सगुण ब्रह्मोपासक तुकाराममहाराज जरा निराळ्या भाषेंत 'आहे नारायण जवळीच' या शब्दानें सांगताहेत.

पहिल्या दोन चरणांचा मथितार्थ 'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥' ह्या भगवद्गीतेच्या श्लोकांत ग्रथित झालेला आहे. सद्भक्ताच्या बाबतींत व्यावहारिक व पारमार्थिक योगक्षेमाची जबाबदारी ईश्वरावर राहते. सद्भक्त असेल तर ह्या सिद्धान्ताच्या प्रत्याक्षानुभवाच्या बाबतींत त्यास कुरकुर करण्यास जागा नाहीं असें अनेकांच्या चरित्रावरून दिसतें. परंतु असा सद्भक्त दुर्मिळच खरा.

चौथ्या चरणांत तर 'सर्व ज्ञानाचा गड्डा' असें जें ईश्वराचें सर्वव्यापित्व त्याचा उल्लेख मार्मिक रीतीनें करून महाराजांनीं स्वतःच्या ज्ञानाची अप्रत्यक्षपणें खूण पटविली आहे. माझा मित्र तो पांडुरंग त्या एकट्यानें हें जग व्यापलेलें आहे हें वाक्य म्हणजे 'सर्वं खल्विदं ब्रह्म' वगैरे महावाक्याचाच सगुण भक्ताच्या (ज्ञान्याच्या) भाषेंत हा पुनरुच्चार आहे. तीन चरणांमध्यें ज्या उपास्य देवतेचें व आपलें नातें, हितसंबंध, स्नेह वगैरे सांगितला तिच्याविषयीं इतकी उत्कट व चिरकालीक सतत प्रेमानें आपणांस काय वाटलें, (अनुभव आला) व इतरांस काय वाटलें पाहिजे तें येथें

सांगितलें आहे. भक्तियुक्त अंतःकरणानें, प्रभू सहाय्यकर्ता आहे अशा भावनेनें, सुखदुःखादिकांची बाधा होऊं न देतां संसारांतील कर्तव्यकर्में ( निरपेक्ष बुद्धीनें ) करणें व शेवटीं ईश्वर जवळच आहे, तो आपला जिवलग मित्र आहे, एवढेंच नव्हे तर त्यानें विश्व व्यापलेलें आहे किंवा जग हें त्याचें स्वरूप आहे, अशी श्रद्धा ठेवली म्हणजे, ह्या सगुण साकार भक्तींतून निर्गुण निराकार परमेश्वराचें ज्ञान हृदयाकाशांत प्रकाशतें, अशी महाराजांची शिकवण आहे. भक्तीचा शेवट खऱ्या ज्ञानांत होऊन भक्त व ज्ञानी ह्यांना अंतीं एकच अनुभव येतो व तोही जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतो.

---

# पैठणचे ८९ सत्पुरुष.

पैठणचे वे० शा० सं० व्यंकटेश त्र्यंबक धर्माधिकारी यांजकडून पुढील यादी मागेंच मिळाली होती. आजवर पैठणास होऊन गेलेल्या अनेक जातींच्या, पंथांच्या व धर्मांच्या सत्पुरुषांची तींत गणती केलेली आहे.

१ श्रीएकनाथ महाराज. २ दंडवत स्वामी. ३ अमृतराय उर्फ रायजी महाराज. ४ गंगाधर कोकीळ. ५ कृष्णदयार्णव. ६ अनंतशिव. ७ उद्धव (नाथशिष्य). ८ गावबा (नाथशिष्य). ९ हरिपंडित (नाथांचे पुत्र). १० उत्तमश्लोक. ११ शिवदिननाथ. १२ विश्वनाथ पाठक. १३ लोलिंबराज लोले. १४ नरहरिदेव. १५ चिंतोपंत (नाथांचे जामात). १६ लीलाबाई (नाथांची कन्या). १७ नरहरिनाथ (शिवदिन शिष्य. यांची समाधि देऊळगांवीं आहे). १८ लक्ष्मीनाथ ( समाधि आळंदीस ). १९ हरिहरेंद्र स्वामी. २० जनभट. २१ वेडा नागा. २२ भागवतबावा. २३ हरिपुराणिक. २४ चिंतामणिनाथ. २५ मालोनाथ. २६ गोपीनाथ. २७ अवधूत ज्ञानसागर. २८ एका शिवदिन. २९ तोरू भट. ३० कुंकुमेंद्रस्वामी. ३१ ऋषीभट. ३२ नागनाथ. ३३ चिदानंद. ३४ शांताराम. ३५ अत्याबाई. ३६ आनंदाश्रम. ३७ सितोपंत. ३८ ब्रह्मानंद. ३९ भोळानाथ. ४० गणेशभट वेद्रे. ४१ मुक्तेश्वर ( नाथांचे नातू समाधि–तेरवाड ) ४२ सिद्धनाथ. ४३ काशीनाथबुवा. ४४ विठ्ठलनाथ. ४५ नित्यानंद. ४६ आण्णामहाराज ( समाधि–ग्वाल्हेर ). ४७ भगवान स्वामी. ४८ बाळाजीपंत. ४९ चिमणभट बावा. ५० शिवरामबावा.

५१ भय्यामहाराज. ५२ ब्रह्मचारी कनोजी. ५३ श्रीरंग धुंडिनाथ ( समाधि देवास ). ५४ रामकृष्णस्वामी. ५५ जनार्दन पाठक. ५६ गणेशनाथ पाडुरंग ( सं० देऊळगांव ). ५७ अनंतनाथ ब्रह्मचारी ( समाधि—मांजरी ). ५८ गोंदाभाऊ पातकर. ५९ श्रीरंग लक्ष्मीनाथ. ६० सरस्वती मामी ६१ काणुनबवा नंगा. ६२ जगराम खुंट. ६३ रामानंद साळी. ६४ शिवलिंग अय्या लिंगाईत. ६५ आदित्यनाथ कनफाटा. ६६ विरजागीर गोसावी. ६७ चिमणापंडित जैन. ६८ भीमाबाई परदेशी सती. ६९ रामगोविंद मराठा ( विद्यमान ) ७० सारजा महारीण. ७१ मौलाना. ७२ सैद सादात. ७३ गोदडशा. ७४ सिद्धपीर पहिलवान. ७५ पीर ठोंबरा. ७६ सिंदडशा. ७७ पीर आंबाडा. ७८ नजरबेग. ७९ लालशा. ८० शाह अलीम. ८१ पीर बनछोड. ८२ चांदसावली. ८३ पीर नागोरी. ८४ मीरानजवल्ली. ८५ मंगलशा. ८६ जमालशा. ८७ सिद्धीमौला. ८८ रसुलशा. ८९ भगत ( विद्यमान ).

वरील ८९ पैकीं ७ जणांच्या समाधि बाहेरगांवीं असून बाकीच्या सत्पुरुषांचीं समाधिस्थानें खुद्द पैठणास आहेत. यांपैकीं कित्येकांची कविता प्रसिद्ध आहे, कित्येकांच्या कथा प्रसिद्ध आहेत व कित्येकांची नांवापलीकडे कांहीं माहिती मिळत नाहीं. पैठणास सर्वांचींच समाधिस्थळें सांपडतात असें नाहीं.

---

## वैदिक युगांतील पंडिता.

ह्या विषयावर बंगाली भाषेंतल्या एका सुंदर लेखाचा अनुवाद रा. ग. वि. आठलेकर यांनीं जानेवारीच्या ' लोकमित्रां'त केला आहे. त्यापैकीं महत्त्वाचा भाग आमच्या वाचकांसाठीं आम्ही पुढें देत आहोंतः—

स्त्रियांना वेदाधिकार नाहीं असें म्हणण्यांत येतें, पण आश्चर्याची गोष्ट कीं, प्राचीन वेदकालामध्यें किती तरी स्त्रिया मंत्रद्रष्ट्या झाल्या आहेत ! त्या वेळच्या स्त्रिया पुरुषांप्रमाणें वेदविद्याध्ययन करून बरोबरीच्या नात्यानें चर्चा करीत व मान्यही होत.

**१ विश्ववारा**—वैदिक युगांतील जेवढ्या विदुषी स्त्रियांची माहिती मिळते, त्या सर्व स्त्रियांत विश्ववारा हिचें नांव प्राधान्येंकरून घेतलें जातें. हिचा जन्म

अत्रिगोत्रांत झाला. ऋग्वेदसंहितेचें पांचवें मंडल आणि दुसरा अनुवाक यांतील २८ व्या सूक्ताची विश्ववारा ही ऋषि आहे. या सूक्तांत सहा मंत्र आहेत व एक एक ऋचा अमूल्य असून भाषा व भाव दोन्ही अनुपम आहेत.

२ ऐन्द्रमातृगणा--ऋग्वेद संहितेच्या १० व्या मंडलांतील १५३ व्या सूक्तांत ५ ऋचा आहेत. त्या पांचही ऋचांचा तत्त्वार्थ सर्वांच्या पूर्वी ऐन्द्रमातृगणा हिनें जाणून त्याचा प्रचार केला; व म्हणूनच त्या मंत्राची ती ऋषि म्हणून नियोजित करण्यांत आली. ही स्त्री कश्यप ऋषींची कन्या होती. हिच्या मातेचं नांव अदिति असें होतें. हिच्या उपरोक्त मंत्राचा संक्षिप्त भावार्थ असा आहे-" हे इंद्र! ज्या तेजानें शत्रूचा पराजय केला जातो, तें तेज तुझ्या ठिकाणीं वसत आहे असें जाणून मी तुझें पूजन करीत आहे. तूं वृत्रासुराचें पारिपत्य करणारा आहेस. तूं आकाशाचा विस्तार करणारा आहेस. सूर्य तुझा सहचारी आहे. त्याला तूं आपल्या बाहुपाशांनीं बद्ध केलेला आहेस. तुझ्या तेजाचें आम्ही पूजन करितों."

३ वाक्--ही पंडिता अत्रि ऋषींची कन्या होती. ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलांतील १२५ व्या सूक्ताच्या आठ ऋचांची वाक् ही ऋषी आहे. या मंत्रांना देवीसूक्त असेंही म्हणतात.

श्रीशंकराचार्यांनीं अद्वैतवाद सिद्धांताचा प्रचार केला हें जगप्रसिद्ध आहे; परंतु त्याच्या बऱ्याच पूर्वी वाक्देवीनें त्या सिद्धांताचें वर्णन केलेलें होतें. या देवीचे मूल सिद्धांत आदर्श मानून शंकराचार्यांनीं अद्वैत मताचा प्रचार केला होता; परंतु याविषयींच्या माहितीवरून ह्या सिद्धांताचे मूलप्रवर्तक शंकराचार्य नव्हते असें म्हणावें लागतें. त्यांनीं फक्त ह्या सिद्धांताचा प्रचार मात्र केला. या सिद्धांताची कर्त्री वाक्देवीच होय. ज्या सिद्धांतप्रचारामुळें आम्ही श्रीशंकराचार्यांचा गौरव करतों, ह्या गौरवाचा अधिकांश वाक्देवीला देणें उचित आहे. ज्या मंत्राची वाक्देवी ही ऋषि आहे, ह्या मंत्राचा तात्पर्यार्थ असा आहे:—

"मी रुद्र, वसु या सर्वांच्या स्वरूपांनीं वास्तव्य करीत आहे. मित्र व वरुण मीच आहें. इंद्र आणि अग्नि यांना मीच धारण करितें. मी सर्व जगाचा ईश्वर आहें. सर्व प्राणी माझ्याच ठिकाणीं वास्तव्य करीत आहेत. जीव जें कांहीं पाहतों, प्राण जें कांहीं धारण करतो तें सर्व मीच त्याला दिलेलें आहें. देव व मानव हे माझीच सेवा करीत असतात, त्यांच्या सर्व कामनांचा आधार मीच आहे. सृष्टीची उत्पत्ति करणारा मीच असून दुष्ट प्राण्यांना दंड शासन करण्यासाठीं मी रुद्ररूप धारण करीत असतों. माझ्या भक्तांचें रक्षण करण्यासाठीं त्यांच्या शत्रूंशीं मीच युद्ध करीत असतों. स्वर्ग-

पृथ्वी ही मीच व्यापलेली आहे. या आकाशध्वजमंडळाची उत्पत्ति करणारा मीच आहे. सर्व सृष्टीची रचना करण्यासाठीं मी वायूप्रमाणें भ्रमण करीत असतों. माझा गतिरोध करण्यास कोणीच समर्थ नाहीं. माझ्या माहात्म्यानें हें जगत् उत्पन्न झालें आहे—होत आहे. ”

या मंत्रांत ईश्वरशक्तीची महति किती उत्तम रीतीनें वर्णिली आहे हें सहजीं लक्षांत येतें.

**४ अपारा**—विश्ववारेप्रमाणें हिचाही जन्म अत्रीच्या वंशामध्यें झालेला होता. हिचें जीवन फार दुःखमय होतें. ही त्वचारोगानें जर्जर झाली होती; यामुळें पतीनें हिचा त्याग केला होता; म्हणून हिनें आपल्या मातापित्यांकडे राहून ईश्वरभक्तींत आपलें आयुष्य व्यतीत केलें. हिचा बाप शेती करीत असे; परंतु त्या शेतींत त्यास पैदास फार कमी होई; याचें कारण शेतीची जमीन चांगल्या प्रकारची नव्हती; तथापि अपारा ही सुशिक्षित असल्यानें तिनें आपल्या बुद्धिचातुर्यानें त्या नापीक जमिनीची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न करून ती सुपीक बनविली व त्यामुळें उत्तम व भरपूर पिकाची पैदास होऊं लागली; इतकेंच नव्हे, तर ऋग्वेदाच्या आठव्या मंडलांतील ८१ व्या सूक्ताच्या आठही ऋचांचा तात्त्विक अर्थ सर्वांच्या पूर्वी हिनेंच अगोदर लाविला; व त्यामुळें त्या मंत्राची ती ऋषी झाली.

**५ लोपामुद्रा**—ही विदर्भ नगराच्या एका प्रसिद्ध राजाची कन्या होती. तिचा विवाह अगस्ति ऋषीशीं झालेला होता. अगस्ति मुनी जरी वनवासी होते, तरी गुरुजनांच्या आज्ञेनुसार वंशवृद्धीसाठीं त्यांनीं लोपामुद्रेशीं विवाह केलेला होता. हिचें चरित्र फार सुंदर आहे. जशी ती विद्यासंपन्न होती तशीच पातिव्रात्यधर्माचरण करणारी आदर्शरमणीही होती. छायेप्रमाणें ती नेहमीं पतीबरोबर सहचर्य करी. पतीच्या भोजनानंतर ती भोजन उरकीत असे; व पती झोंपल्यानंतर आपण झोंपे, आणि पती जागृत होण्याचे पूर्वींच आपण जागृत होई. तिनें आपलें ध्यान आणि ज्ञान हीं दोन्हीही पतीच्याच ठिकाणीं समाविष्ट केलेलीं होतीं. पत्नीनें पतीशीं कशा प्रकारें वर्तन ठेविलें पाहिजे, याचें तिनें आपल्या वागणुकीनें उदाहरण घालून दिलेलें होतें.

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलाच्या १७८ व्या सूत्राची पहिल्या व दुसऱ्या ऋचांची लोपामुद्रा ही ऋषी होती. तिचें पतीला वारंवार असें सांगणें असे कीं, “ हे नाथ, आजन्म आपल्या सेवेंत माझें आयुष्य खर्च व्हावें; व मला शांतीचा लाभ व्हावा अशी माझी दृढतर इच्छा आहे. मी आतां वृद्ध झालें आहें, माझें शरीर जराजर्जर झालें आहे; तथापि आपली सेवा करण्यात मला फार फार आनंद होत आहे; व हीच माझी मोठी तपश्चर्या आहे, असें मी समजतें.

माझी अंतिम गती केवळ आपणच आहां. सदोदित मी आपल्या अनुग्रहाची इच्छा करते."

६ **अदिति**—देवमाता अदिति मोठी विदुषी स्त्री होती. ऋग्वेदाच्या चतुर्थ मंडलांतील १८ व्या सूत्रापैकीं सहाव्या सातव्या ऋचांची अदिति ही ऋषी आहे. सुराधिपति इंद्र हा अदितीचाच पुत्र होय. तिच्या ठिकाणीं श्लोक-रचनाचातुर्य उत्तम प्रतीचें होतें! तिच्या एका श्लोकाचा भावार्थ खालील आहे—

"जलपूर्ण सरिता हर्षसूचक शब्द करीत वाहात राहिली आहे. हे ऋषि-गण, त्या सरितेला विचारा कीं, ती काय सांगत आहे?"

७ **यमी**—ही वैदिक युगांत फार प्रसिद्ध पंडिता होऊन गेली. ऋग्वेद मंडल १० सूक्त १० मंत्र १, ३, ५, ७ व ११ त्याचप्रमाणें १५४ सूक्ताच्या ५ ही ऋषी आहे. हिनें कांहीं वेदमंत्रामध्यें "यम" शब्दाचें फार उत्तम रीतीनें विवेचन केलें. त्या मंत्रामध्यें जीवाला कर्मानुसार फल देणाऱ्या परमा-त्म्याचें वर्णन केलेलें आहे, व शुभकर्मानें जीवाला उत्तम गति प्राप्त होते आणि अशुभ कर्मानें जीव अधोगतीला जातो, याबद्दल उत्तम प्रकारें उपदेश केलेला आहे.

८. **शश्वती**—ही अंगिरा ऋषीची कन्या होती, व तिचा आसंग नांवाच्या राजाशीं विवाह झालेला होता. ही ऋ. मंडल ८ सू. १ याच्या ३४ मंत्राची ऋषी आहे. एकदां हिच्या पतीला कांहीं कारणामुळें रोग जडला; तेव्हां हिनें आपल्या घोर तपश्चर्येनें त्याला रोगमुक्त केलें. हिनें आपल्या पतीच्या स्तुतीपर अशी कांहीं काव्यरचनाहि केलेली आहे.

९. **सूर्या**—ऋ. मंडल १० च्या ८५ व्या सूक्ताची ही ऋषी आहे. विद्ये-तील नैपुण्यानेंच हिची प्रसिद्धी झालेली आहे असेंच केवळ नसून वेदमंत्रांचा गुढाशय जाणण्यामध्येंच हिनें आपली विशेष कीर्ति पसरविली आहे; व त्या-मुळेंच हिला 'ब्रह्मवादिनी' असें म्हटलें जातें. उपरोक्त ८५ व्या सूक्तांत विवाहसंबंधीं अनेक विषयांचें उत्तम प्रकारें वर्णन केलें असून त्या मंत्रांमध्यें जो भाव सूर्यादेवीनें प्रकाशित केला तोच भाव आज तागायत सर्वत्र प्रचलित आहे.

याशिवाय बृहस्पतीची स्त्री जहु, इंद्राची स्त्री **इंद्राणी, शची, गोधा, श्रद्धा**, भावगव्य नामक राजाची स्त्री **रोमशा** वगैरे वगैरे बऱ्याच पंडिता वैदिक युगांत झाल्या असून निरनिराळ्या मंत्रांच्या त्या ऋषी आहेत.

---

# वारा कसा वाहत आहे!

## १ बृहन्महाराष्ट्रमंडळ.

गेल्या नाताळांत कानपूर येथें महाराष्ट्राबाहेरील सर्व ठिकाणच्या महाराष्ट्रीयांमध्यें परस्पर संघटन व प्रेमभाव वाढविण्याकरितां ह्मणून जें एक 'बृहन्महाराष्ट्र मंडळ' स्थापन करण्यांत आलें त्याचे विद्यमानें येत्या ईस्टरचे सुटीमध्यें (ह्मणजे ता. २ ते ५ एप्रिल) झांशी येथें बृहन्महाराष्ट्र परिषद भरविण्याचें ठरलें असून त्याप्रमाणें झांशी येथें सभा होऊन स्वागत मंडळही स्थापन झालें आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाचा हा उपक्रम अगदीं स्तुत्य असून मंडळाचें आह्मीं अभिष्ट चिंततों.

—बलवंत.

## २ गणितविद्यापारंगत महाजनि.

सातारा येथील रहिवासी रँग्लर गणपतराव महाजनि यांनीं इंग्लंडांतील गणित विषयांतलें सर्वांत श्रेष्ठ असें 'स्मिथ प्राईझ' हें बक्षीस मिळवून हिंदी लोकांची व विशेषतः महाराष्ट्रीयांची बुद्धिमत्ता पुनः एकदां विशेष रीतीनें लोकनिदर्शनास आणली याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. सीनियर रँग्लर रघुनाथराव परांजपे यांनीं या एका बक्षिसाखेरीज बाकी बहुतेक बक्षिसें पटकावलीं होतीं व आतां 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' या न्यायानें त्यांच्याच शिष्यानें त्यांना न मिळालेलें हें सर्वश्रेष्ठ बक्षीस मिळविलें हें दोघांसहि भूषणावह होय. हें बक्षीस गणितशास्त्रांत कांहीं नवीन व शोधक बुद्धीचा निबंध लिहिणाऱ्यासच मिळतें व इंग्लंडांत हें बक्षीस मिळवण्याचा मान अद्वितीय असाच गणला जातो.

—केसरी.

## ३ संस्कृत वीणाकाव्यें.

कोलंबिया विश्वविद्यालयांतील प्रोफेसर ए. व्ही. विल्यम्स जॅक्सन ह्यांनीं पुण्याच्या भांडारकर–ओरिएंटल–रीसर्च–इन्स्टिटयूटमध्यें 'संस्कृत वीणाकाव्यें' या विषयावर व्याख्यान देतांना सांगितलें कीं, ऋग्वेदांतील वीणाकाव्यें हीं जगांतल्या अत्यंत उत्कृष्ट काव्यांपैकीं आहेत. ते म्हणाले, कालिदासाच्या नाटकातील वीणाकाव्यें शेक्सपियरच्या कोणत्याहि काव्याइतकी वर्णनाच्या दृष्टीनें तर सरस आहेतच, पण सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें तर ती वर्डस्वर्थच्या

काव्यांपेक्षाहि सुंदर आहेत. संस्कृत भाषेची योग्यता कोणालाहि मोहू-नच टाकील.

—उदय.

## ४ पुढाऱ्यांची एकी

हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांमध्यें हल्लीं कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. अंतःकलहानें पक्षभेदांचें पेव फुटलें असून प्रत्येक पक्षाचे पुढारी आपलेंच ह्मणणें रास्त आहे असें जोरजोरानें प्रतिपादन करीत आहेत. ह्मणून अखिल भारतीय पुढाऱ्यांचें हें आद्य कर्तव्य आहे कीं, त्यांना जर राष्ट्रामध्यें शक्ति निर्माण करा-वयाची असेल तर प्रथम पुढाऱ्यांची एकी घडवून आणली पाहिजे. ही एकी घडवून आणल्यावांचून ही शक्ति निर्माण होणें शक्य नाहीं. सर्व पक्षांचे पुढारी आपल्या पक्षाभिनिवेशाला तिलांजली देऊन राष्ट्राकरितां एक होण्याचें मनौदार्य दाखवितील काय ?

—प्रबोध.

## ५ संस्कृत शिकणारा पहिला इंग्रज.

इ० स० १७८३ सालीं सर वुइल्यम जोन्स हा कलकत्त्याच्या सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीश म्हणून हिंदुस्थानांत आला. भारतवर्षांत संस्कृत भाषेविषयीं अत्यंत आदर व भक्तिभाव आहे असें पाहून जोन्सला संस्कृत शिकण्याची तीव्र इच्छा झाली, आणि त्या प्रयत्नाला तो लागला. संस्कृत भाषेचें शिक्षण द्यावयाला कोणा तरी शिक्षकाची अर्थातच जरूर होती, परंतु अतिशय प्रयत्न करूनही जोन्सला असा शिक्षक मिळेना! शास्त्रांत म्लेंच्छाला 'देवभाषा' शिकविणें म्हणजे जवळ जवळ महत्पापच! हें 'भयंकर' आणि शास्त्रनिषिद्ध कृत्य करावयाला कोणालाही साहस होईना! शेवटीं एका विद्वान् पंडितानें हें साहस केलें पंडित रामलोचन हे एक अत्यंत श्रद्धानिष्ठ हिंदु असून, आचार-विचार ते अतिशय कडक रीतीनें पाळीत असत. यामुळें अध्यापक महाश-यांनीं आपल्या विद्यार्थ्याला पहिल्या सपाट्याला पुढील आठ अटी घातल्याः—

१. अध्यापनाची जागा तळमजल्यावरील एकीकडची एखादी खोली असावी.

२. या खोलीची जमीन संगमरवरी दगडाची तयार करून दिली पाहिजे.

३. या खोलीची जमीन आणि भिंत ( हात पोचणें शक्य आहे तितक्या उंचीपर्यंत ) दररोज गंगाजलानें धुऊन काढली पाहिजे आणि या कामासाठीं एक हिंदु नोकर ठेविला पाहिजे.

४ अध्यापनाच्या जागीं लांकडाच्या आसनाखेरीज दुसरें कोणतेंही आसन असतां उपयोगी नाहीं, आणि हीं काष्ठासनें देखील दररोज गंगाजलानें धुऊन काढिलीं पाहिजेत.

५. अध्यापनाची वेळ सकाळचीच असली पाहिजे.

६. अध्यापनाची वेळ पुरी होऊन जाईपर्यंत विद्यार्थ्यानें एक प्याला चहा-शिवाय दुसरें कांहींही पितां किंवा खातां कामा नये.

७. गाईचें मांस, डुकराचें मांस, कांटे, चमचे इत्यादि वस्तु अध्ययनाच्या खोलींत कधीं–कोणत्याही काळीं आणतां कामां नयेत.

८. या खोलीजवळची खोली अध्यापकांच्या वापरासाठीं दिली पाहिजे व ही खोलीही दररोज गंगाजलानें धुऊन काढली पाहिजे. या खोलींत दररोज धूतवस्त्रें ठेविलीं पाहिजेत. अध्यापनाच्या खोलींत जाण्यापूर्वी अध्यापक या खोलींत आपलीं वस्त्रें सोडून हीं वस्त्रें पेहरतील आणि जातांना तीं वस्त्रें सोडून पुनः आपलीं वस्त्रें परिधान करून ते घरीं जातील.

सर वुइल्यम जोन्सची ज्ञानपिपासा अत्यंत प्रबल असल्यामुळें अध्यापक महाशयांच्या या सर्व अटी त्यानें तावडतोब कबूल केल्या आणि पंडितजींनीं त्याला संस्कृत शिकविण्याला आरंभ केला. जोन्सनें एक वर्षांत त्रिंत बरीच प्रगति केली. त्यानें 'अभिज्ञानशाकुंतल' चें गद्यपद्यमय इंग्रजींत भाषांतर केलें, हें सुप्रसिद्धच आहे.

—विविधवृत्त.

## ६. राजा लुटि जरि प्रजाजनांला !

बडोदें शहर म्युनिसिपालिटीच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नसल्यामुळें श्री. महाराजांनीं प्रजाजनांच्या इच्छेविरुद्ध खालीलप्रमाणें कर वाढविण्यास मंजुरी दिली असून घरपट्टीचा नवीन बोजा रयतेवर लादला आहे. श्रीमंतांचा अर्धशतसांवत्सरिक सुवर्णमहोत्सव केल्याबद्दल तर हें बक्षीस नव्हे ?

१ इंग्रजी शाळांची फी कल्पनातीत वाढविण्यांत आली. २ कोर्ट फी वाढविण्यांत येऊन न्यायदानाचें काम महाग करण्यांत आलें. ३ म्युनिसिपालिटी-कडे करावयाच्या अर्जास स्टँप लावावे असें ठरविलें. ४ घराच्या उत्पन्नावर पांच टक्के वार्षिक कर लादला. ५ पाणीपट्टी व भंगीपट्टींत असह्य वाढ केली. ६ वाहनपट्टी वाढवून रयतेस सुखसोयींची जरूरी नाहीं असें अप्रत्यक्षपणें सांगितलें. ७ साखर, लोणी व तूप यांवरील अंतिम कर दुप्पट करून सात्विक अन्न महाग केलें. ८ चहा व सिगारेटवरील कर वाढवून मोटारीवरील कर कमी केला. इत्यादि.

या करवाढीस संमति देऊन स्वतःस सुखस्वास्थ्य मिळावें या हेतूनें श्री. महाराजसाहेब आज राणपुरा बोटीनें विलायतेस जात आहेत !

—जागृति

## ७. बालमृत्युसंख्या !

हिंदुस्थान सरकारच्या प्रसिद्धीखात्याचे माजी प्रमुख डॉ. रशब्रूक्स वुइल्यिम्स ह्यांनीं १९२३–२४ चा हिंदुस्थान ह्या आपल्या निमसरकारी वार्षिक अहवालांत म्हटलें आहे कीं,—

" हिंदुस्थानच्या आरोग्यविषयक बाबतींत सर्वांत विशेष जिकीरीची बाब जर कोणती असेल तर ती अर्भकांची प्रचण्ड मृत्युसंख्या हीच होय. असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, हिंदुस्थानांत दरवर्षी

### वीस लाख कोंवळीं बाळें

मृत्यु कोंवळ्या काकडीप्रमाणें मोठ्या मजेनें चावून टाकतो ! हिंदुस्थानांत जन्म घेणाऱ्या दर पांच मुलांपैकीं, किंबहुना दर चार मुलांपैकीं एक मूल एक वर्षाच्या आंतच परलोकचा रस्ता सुधारतें. अत्यंत दाट वस्तीच्या कारखान्यांच्या शहरांतील स्थिति तर अगदींच खेदास्पद आहे. "

हिंदुस्थानांतील हा संहार किती भयंकर आहे ह्याची थोडीशी कल्पना यावी म्हणून तुलनेसाठीं कांहीं आंकडे देण्यांत येत आहेत.

| देशाचें नांव | दरहजारीं जन्म १९०२–११ | दरहजारीं मृत्युसंख्या १९०२–११ | १ वर्षाच्या आंतील वयाच्या मुलांची दरहजारीं मृत्युसंख्या |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | ३८. ५८ | ३४. २ | ...३०० |
| जर्मनी | ३२. ३१ | १८. ३९ | ...१८६. ४ |
| जपान | ३२. ८९ | २०. ८६ | ...१५९. ८ |
| इंग्लंड वेल्स | २६. ८ | १५. १५ | ...१२७. ३ |
| न्यूझीलंड | २६. ७९ | ९. १६ | ... ६४. ३ |
| ऑस्ट्रेलिया | २६. ५२ | ११. ११ | ... ८७. ५ |
| स्कॉटलंड | २७. ९९ | १६. ३३ | ...११६. १ |

—सचित्र करमणूक

## हिंदुमहासभेंतील तट

गेल्या ता. १३,१४ व १५ रोजीं दिल्ली येथें हिंदुमहासभेची बैठक झाली. देशांत सर्वत्र विस्कळित रीतीनें पसरलेल्या प्रचंड हिंदुसमाजाची संघटना " या उद्देशानें ही हिंदुसभा स्थापन करण्यांत आली; पण या हिंदूसभेचें

पुरस्कर्ते दिवसेंदिवस संघटणाच्या नांवाखालीं ज्या ज्या उपायांचा अवलंब करीत आहेत त्यांकडे पाहिलें म्हणजे ही हिंदुमहासभा हिंदूंची संघटना करण्यास तयार झाली नसून हिंदूसमाजांतील मतभेद जास्त वाढवून हिंदुसमाज अधिकाधिक दुर्बल करण्यासच कारणीभूत होत आहे कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. हिंदूंची संघटना करण्याकरितां प्रवृत्त झालेल्या या सभेंत अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या बाबतींत सनातनी व सुधारक असे दोन मोठे पक्ष यापुढें पडणार असें दिसत आहे. गेलीं तीन चार वर्षें हिंदुमहासभेच्या संघटनाच्या कार्याचा जो प्रसार झाला त्याला मुख्यतः स्वामी श्रद्धानंद व त्यांचे आर्यसमाजी अनुयायी यांच्याच कर्तृत्वाचा पाठिंबा मिळालेला आहे. स्वामी श्रद्धानंदांनीं हजारों मलकानांना जसें हिंदूधर्मांत घेतलें त्याचप्रमाणें अस्पृश्यांवरील पतितत्वाचा कलंक नाहींसा करण्याकरितां त्यांनाही शुद्ध करण्याचा सपाटा चालविला आहे. स्वामी श्रद्धानंदांचें पहिलें शुद्धिकृत्य हिंदुधर्मीयांना जितकें प्रिय वाटतें तितकेंच अस्पृश्यांना आपलेसें करण्याची त्यांची चळवळ सनातनी हिंदूंना अप्रिय झाली असून या अस्पृश्यांना जवळ करण्याच्या बाबतच्या ठरावावर हिंदुमहासभेंत तंटा होऊन सनातनी हिंदुमहासभेंतून बाहेर पडण्यास तयार झाले होते; पण पं. मालवीयजींच्या विनंतीवरून सभेंतून बाहेर पडून आपला विरोध दाखविण्याचा उद्देश सनातनी लोकांनीं तात्पुरता मागें घेतला आहे. आर्य समाजिस्ट व सनातनी असे त्यांत दोन तट पडून या दोन्ही पक्षांनीं आपापल्या परिषदा निरनिराळ्या शामियान्यामध्यें भरविल्या.

—स्वराज्य

---

# अभिप्राय.

**श्रीरामदासस्वामीचरितम्ः**—इंदोर येथील संस्कृत विद्यालयाचे मुख्याध्यापक पंडित श्रीपादशास्त्री हसूरकर यांनीं श्रीसमर्थांचें चरित्र प्रस्तुत ग्रंथांत संस्कृत भाषेंत लिहिलें आहे. येवलें येथील प्रसिद्ध व्यापारी श्री. वल्लभदास यांनीं पुस्तकप्रकाशनास द्रव्यसाह्य केलें असून पुस्तक निर्णयसागर प्रेसमध्यें उत्तम छापलें आहे. सदर चरित्रग्रंथांत एकंदर तेरा प्रकरणें आहेतः—१ पूर्वप्रसंगः २ कुलवृत्तांतः ३ जन्मवृत्तं बाल्यलीलाश्च. ४ वैराग्यसंपत्तिः ५ उपासनासिद्धिः ६ साधुसमागमः धर्मोद्धारविचारश्च. ७ मठस्थापना भक्तियोगप्रसारश्च. ८ उपासनासामर्थ्यम्चमत्काराः ९ शिष्यसंप्रदायः १० श्रीसमर्थचरणेषु शिष्याणां विश्वासः ११ श्रीसमर्थचरणाः शिवराजश्च. १२ श्रीसमर्थांना

तत्त्वोपदेशः संसारवृत्तिश्च. १३ अवतारसमाप्तिः श्रीपादशास्त्री यांचें गीर्वाणवाणीनैपुण्य बहुजनांस ज्ञात आहे. भाषा संस्कृत असून विद्यार्थ्यांना सहज वाचतां वाचतां समजण्यासारखी सुलभ पण प्रौढ आहे. हायस्कुलांत विशेषतः राष्ट्रीय विद्यालयांत सदर पुस्तक विद्यार्थ्यांस अवश्य नेमलें गेल्यास समर्थचरित्रकथा त्यांस अनायासें समजून सुलभ गद्य वाचण्याचा अभ्यास होईल. प्रस्तावनेंत ग्रंथकार म्हणतातः " अयि भारतवासिनः सज्जनामहाभागाः ! अद्य खलु तत्र भवतां सनातनाधर्मोद्धारार्थं मृत्युलोकमागतानां, व्यवहारपरमार्थोभयसाधनयोग्यशिक्षाणां, अगणितजनसेवितपादकमलानां मान्यानां श्रीरामदासस्वामिनां पवित्रं चरितामृतं युष्माकं करकमलेषु निदधतो मे मनः संतोषस्य परांकाष्ठामवगाहते । यदा खलु ग्रीष्मरविरिव दुःसहपरितापा यवना समग्रं भारतमाक्रम्य कल्पवृक्षमिव वांछितप्रदं सनातनधर्मं नामशेषं विधातुं प्रायतन्त, तदा खलु यैरवतीर्य रक्षितोऽयं धर्मस्तथा शिवराजद्वारा परास्ता बलाढ्यायवनाधिपास्तेषां चरितामृतं कियदुपदेशकारकं स्यादिति भवद्भिरेवविचारणीयं. सांप्रतमपि घोरेण दुर्धरप्रसरेण कलिना पुनरपि ग्रस्तोऽयं धर्मः साकं भारतेन, तस्मादधुनाऽस्माभिर्यदि श्रीसमर्थचरणानां चरितमंशतोऽपि अनुक्रियेत तदा महान् लाभः स्यात् " इ० इ० पुस्तकाचीं पृ० सं० १७० किं० रु० १८८ ' मूल्यं सार्धौ रूप्यकः प्रेषणव्ययः पृथक्.'

२ **श्रीनारायणमहाराज केडगांवकर यांचें चरित्रः**—ले. भाऊ गोपाळ खराडकर व प्र. गणेश विठ्ठल काटकर; सोलापूर. किं. ८६. चरित्रभाग असा यांत फार थोडा आहे, पण भाविकांस या छोट्या प्रबंधाचें वाचन प्रोत्साहक वाटावें. महाराजांचें सविस्तर चरित्र व्यवस्थित रीतीनें कोणी लिहिल्यास महाराष्ट्रीय जनांस तें पाहिजे आहे.

३ **औद्योगिक करमणूकः**—ले० नरसो गणेश वाडदेकर, प्र० आनंद प्रेस, पुणें. आनंद मासिकाची पुरवणी म्हणून हें ग्राहकांस दिलें आहे. संवादाच्या रूपानें औद्योगिक विषयांची मुलांस गोडी लावायला अशीं पुस्तकें उपयोगाचीं आहेत.

४. **काव्यकांतारांतील पुष्पें** व ५. **सर्वस्वाचीं गद्य गाणीं**—हीं दोन्हीं पुस्तकें उमरावतीचे कविभूषण रा. बळवंत गणेश खापर्डे यांनीं लिहिलीं असून बळवंत कवीच्या सोज्वळ काव्यशक्तीची ओळख यांतील पद्यसुमनांवरून चांगलीच होणार आहे. ' नवीन धर्मावताराची चूर्णिका ' ' द्वैताची फुगडी ' ' तुम्हाचें गाणें ' ' भोंवरेवाला ' इत्यादि अनेक गाणीं अत्यंत चित्तवेधक व रसपूर्ण आहेत. रवींद्रनाथ टागोरांच्या वळणाचें कवित्व, थिऑसफीचें तत्वज्ञान व सनातन धर्मीय संस्कार या तिहींचें मोठें रम्य संमिश्रण प्रस्तुत कवींत

झालेलें आढळतें. कवित्वशक्ति व रसिकता ही तर त्यांचे ' वडिलांची मिरास ' आहे. नवल एवढेंच वाटतें कीं, ह्या काव्यांत प्रतिबिंबित झालेल्या उच्च विचारांच्या संगतींत रमणारा हा रसिक कवीच ' उदय ' पत्रांत लेख लिहीत असतो कां ह्या दोन वेगवेगळ्या व्यक्ति आहेत ?

**मराठी साधुकवि व शिवरामपंत परांजपे**:—लेखक मुमुक्षूचें पूर्ण परिचित ' गोविंदसुत.' प्रकाशक द. प. चिंचाळकर, वकील, अंमळनेर, किं. ०८ अकरा वर्षांपूर्वीचा हा जुना वाद दोघांनीहि पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून नवा केला आहे. प्रो० परांजपे यांनीं मराठी साधूंवर व मराठींतल्या वेदांतपर पद्यवाङ्मयावर कांहीं तर्ककर्कश टीका केली, व परांजप्यांचा त्यांचे मित्र गोविंदसुत यांनीं खरपूस समाचार घेतला. ही मित्रांतली झोंबी आहे. उभयपक्षीं त्यांत द्वेषमत्सराचें विष नाहीं. परांजपे आधुनिक पद्धतींचे तर्कप्रधान विद्वान् व गोविंदसुत जुन्या परंपरेचे भाविक भक्त. दोघेही लेखणीबहाद्दर पट्टीचे. तेव्हां ही मौजेची झुंज पाहण्यांस प्रेक्षकांची काय हानी आहे ! परांजपे यांचा लेख या पुस्तकाचे शेवटीं जोडला आहे, यामुळें दोघांचें म्हणणें येथें एकत्र पाहण्यास सांपडतें. तेव्हां दोघेही आजच्यापेक्षां अधिक तरुण होते, आज दोघेही साठीच्या घरांत उतरले आहेत. दोघांनींही या झुंजाच्या द्वितीय आवृत्तींत आपआपलीं नखें थोडथोडीं काढून टाकलीं आहेत ! गोविंदसुतांची विचारसरणी आम्हांस पसंत असल्यामुळें हे लेख १९१४ च्या मुमुक्षूंत प्रथम प्रसिद्ध झाले होते. वाचकांनीं ०८ खर्चून तार्किक व भाविक यांच्यातील सामना पाहाण्यास हयगय करूं नये अशी आमची शिफारस आहे.

**७ पुष्पहार**:—रा. श्रीपाद नारायण सातघर, हायकोर्ट वकील, मुंबई, किं. ०८ मुंबईसारख्या बकाली शहरांत कायद्याच्या कचाटयांत राहूनही एखाद्याला या पुष्पहारासारखा सुंदर हार रचितां येतो याचें आम्हांस नवल वाटतें. कविता विविधवृत्तांत रचली असून सामान्यतः प्रार्थनाप्रधान आहे. व कवीच्या मनांतून आलेली खऱ्या उमाळ्याची आहे असें वाटतें. कवि नवीन विद्येंत पारंगत असून कविता जुन्या वळणाची आहे. पदेंही मनोहर आहेत.

**८ मीमांसा विद्यालयाचा वृत्तांत**:—प्रकाशक वामनशास्त्री किंजवडेकर **९ प्राज्ञपाठशाळेचा अभ्यासक्रम १८४५, १० टिळक राष्ट्रीय विद्यालय खामगांव, चतुर्थ वार्षिक अहवाल, ११ सावित्रीगीत, व १२ स्वराज्यशतक**–नारायण विद्याचार्य कटी. **१३ टिळक राष्ट्रीय कन्याशाळा आकोला वार्षिक वृत्तांत** इ०

---

# वर्णधर्म.

( लेखक—बळिराम जनार्दन आचार्य, दादर. )

आर्यांची समाजरचना फार प्राचीन कालापासून अव्याहत चालत आल्यामुळें तिचा उच्छेद करण्याचें कार्य कोणी कितीहि सचोटीनें करण्याचें आरंभिलें तरी अनादिकालापासून त्यांच्या रोमरोमांत भिनलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था समूळ नष्ट होणें शक्य नाहीं; आणि अशा प्रकारचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना यश मिळत आहे असा जरी भास होत असला तरी तो भ्रममूलक असल्याची त्यांची अल्प कालांतच खात्री होईल. चातुर्वर्ण्याचा उच्छेद करण्याकरितां निघालेल्या शिकारी सुधारकांना अल्प शिकारींतच समाधान मानून समाजांत एक निराळाच पंथ स्थापिल्यामुळें लोकनिंदेस पात्र व्हावें लागेल. सनातन धर्मावर अशा प्रकारचे विघातक हल्ले सांप्रतच्या विसाव्या शतकांतच होतात असें नसून ते फार प्राचीन काळापासून होत आले आहेत; पण त्या सर्व विघातक उपायांचा विध्वंस करून सनातन धर्माची ध्वजा अजूनही सुरक्षित आहे.

२ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा प्रकारचे चार वर्ण राष्ट्राची घडी न विसकटतां लोकव्यवहार सुरळीत चालावे या उच्च भावनेनें निर्माण केले आहेत. अध्यापन, अध्ययन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह हीं कर्मे ब्राह्मणांचीं; प्रजेचें रक्षण, दान, यज्ञ हीं संक्षेपतः क्षत्रियकर्मे; पशूंचें संरक्षण, दान, यज्ञ, अध्ययन, वाणिज्य व शेती हीं वैश्यकर्मे, आणि या तीन वर्णांची परिचर्या हे शूद्रकर्म होय. अशा प्रकारची हीं व्यवस्था एकाद्या ऋषीची किंवा स्वार्थी ब्राह्मणाची कपोलकल्पना नसून ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' असें प्रत्यक्ष भगवान सांगत आहेत.

आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण ।
त्या वायोमध्यें त्रिगुण । आणी पंचभूतें ॥

सर्व ब्रह्मांडाचा विस्तार हें मायेचेंच कार्य आहे. अर्थात जडापासून चेतनापर्यंत सर्वांनां व्यापून उरलेली अशी ही त्रिगुणात्मिका प्रकृति आहे. या अनादि अनंत प्रकृतीच्या राज्यांत गुणांच्या न्यूनाधिक्यानुसार उद्भिजापासून तो मनुष्य-देवतांपर्यंत प्राणी विभागलेले आहेत. प्रकृति जर एकाच गुणानें युक्त असती तर त्या गुणांनीं युक्त असे एकाच प्रकारचे प्राणी पहावयास सांपडते, पण गुणांचें न्यूनाधिक्य प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणीं दृग्गोचर होतें-

कांहीं माणसें स्वभावानें फारच शान्त तर कांहीं क्रोधी, कांहीं आळसानें घेतलेले तर कांहीं दीर्घोद्योगी असा हा फरक केवळ गुणांच्या न्यूनाधिक्यामुळें असतो. प्रकृतीच्या गुणांचे चार विभाग पडतात आणि या चार प्रकारच्या विभागानें चार वर्ण उत्पन्न होतात. तमोगुणानें युक्त शूद्रवर्ण, तम व रजयुक्त वैश्यवर्ण, रज व सत्व गुणयुक्त क्षत्रियवर्ण आणि सत्व गुणयुक्त ब्राह्मणवर्ण होत.

३ जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज अशा चार प्रकारच्या योनि आहेत-गाय, म्हैस इ० पशु, राक्षस, पिशाचें व मनुष्यें हे जरायुज. पक्षी, सर्प, नक्र इत्यादि स्थलचर व शंखादि जलचर प्राणी अंडज होत; चिलटें, उवा, माशा, ढेंकूण इत्यादि प्राणी हे स्वेदज व वृक्षादि स्थावर पदार्थ उद्भिज होत. या चतुर्विध खाणींपैकीं विवेक करण्याचें सामर्थ्य एकटया मनुष्यप्राण्यालाच आहे. इतर प्राणी केवळ स्वभावाला अनुसरणारे, भक्षाभक्षाचा, गमनागमनाचा विधिनिषेध नसणारे असेच असतात. पण असें असलें तरी प्रकृतीच्या तीन गुणानुसार स्थावर, उद्भिज, अंडज व पशु यांच्यांतहि चार वर्ण असल्याचें, सूक्ष्मपणें पाहिल्यास ध्यानीं येतें. ज्ञानाच्या अभावीं त्यांना त्याचें भान नसतें इतकेंच. ‘ अश्वत्थः सर्व वृक्षाणां ’ अश्वत्थ वृक्षाची बीजशक्ति त्याच्या छायेपासून होणारा आनंद इत्यादि सात्विक गुणद्योतक वृक्षांना ब्राह्मणवर्ण समजणें अयुक्त होणार नाहीं. रज व सत्वगुणांनीं युक्त अशा सागादि वृक्षांपासून संसारिक कार्यांत त्यांचा संरक्षणाकडे उपयोग पाहूं लागल्यास ते आपला क्षत्रिय वर्ण प्रकट करितात. तम व रजोगुणांनीं युक्त असे आम्रादि फल व गुलाबादि सुवासिक पुष्प देणारे वृक्ष पोषणद्वारा आपलें वैश्यत्व प्रकट करितात. आणि तमोगुणांनीं युक्त व लोकसेवाद्वारें आपली परिचर्या प्रकट करणाऱ्या औषधोपयोगी वनस्पति शूद्रत्व दर्शवितात. उद्भिज योनीची ही जशी व्यवस्था लागते तशीच ती इतर योनींचीहि लागते. प्रजापतीनें सृष्टि उत्पन्न करण्याच्या इच्छेनें मुखापासून तीन प्रकारची ब्राह्मणसृष्टि केली, त्यांत देवांत अग्नि, मनुष्यांत ब्राह्मण आणि पशूंत बोकड. बाहूपासून उत्पन्न झालेल्या तीन प्रकारच्या क्षत्रियसृष्टींत देवांत इंद्र, मनुष्यांत क्षत्रिय आणि पशूंत मेष. उरूपासून झालेल्या वैश्यसृष्टींत देवांत विश्वेदेव, मनुष्यांत वैश्य आणि पशूंत गाय. पायापासून झालेल्या शूद्रसृष्टींत देव, मनुष्यें व अश्वादि प्राणी झाले असें वेदांत एका ठिकाणीं म्हटलें आहे.

४ वरील युक्तिवाद जरी शास्त्रसिद्ध असला तरी तो सर्वांनाच पटेल असें नाहीं. चातुर्वर्ण्याचा डिंडिम वाजवून परस्परांचीं मनें दूषित केल्यानें आज जी राष्ट्राला एकी पाहिजे ती लाभणार नाहीं. यास्तव आज सगळा अभिमान

गुंडाळून ठेवून प्रथम सर्वांना पंक्तिपावन करून घेऊं; मग स्वराज्याला काय विलंब ? पण सहभोजनानें जर एकी होत असती तर एकाच कुटुंबांतील किंवा एकाच ज्ञातीचीं माणसें प्रत्यहीं सहभोजनें करात असतांही त्यांच्यांत दुही माजून परस्परांच्या उत्कर्षाबद्दल मत्सर वाटण्याचें कारण काय ? खरें ऐक्य भोजनांत नसून तें शुद्धांतःकरणांत आहे. असो, स्थूल देह हा अनेक शुभाशुभ कर्मांचें फल होय.

" क्लेशमूलः कर्माशयो दृष्टादृष्ट जन्मवेदनीयः "

" सतिमूले तद्विपाको जात्यायुर्भोगः " कर्माशय ( सर्व प्रकारच्या कर्मांची उत्पत्ति होते तें स्थान ) अविद्या, अहंकार, आसक्ति, द्वेष आणि अभिनिवेश या पंच क्लेशांचें कारण आहे. त्याचा अनुभव या जन्मीं अथवा जन्मांतरीं घ्यावा लागतो. मूल जिवंत आहे तोंपर्यंत त्याचें फल आयुर्भोगादि रूपानें अवश्य उत्पन्न होतें असें पातंजलयोगसूत्रांत म्हटलें आहे. कर्मसंस्कार तीन प्रकारचे असतात. जन्मजन्मांतरीं झालेलें पण ज्याचा अजून भोग झालेला नाहीं तें संचित कर्म; प्रस्तुत जन्मीं घडत असलेलें क्रियमाण व संचित कर्मापैकीं एका देहाचे भोगवटयास येणारें प्रारब्ध कर्म. प्रारब्ध कर्मानेंच स्थूल देह, जाति, आयु व भोग प्राप्त होत असतात. यावरून जन्म-जाति यांचा संबंध स्थूलच नव्हे तर सूक्ष्म व कारणदेहापर्यंत पोहोंचतो.

५ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या कर्मांची अगदीं पृथक् व्यवस्था त्यांच्या स्वभानुसार [ प्राण्यांचा पूर्व जन्मांतील जो संस्कार—वासना या जन्मीं आपल्या कार्यरूपानें अभिव्यक्त होतो तो स्वभाव ] केलेली आहे.

शमो दमस्तपः शौचं क्षान्ति रार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजं ।।
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षत्रकर्म स्वभावजम् ।।
कृषि गौरक्ष्य वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।

वर सांगितलेल्या आपआपल्या कर्मांमध्यें अत्यन्त रत असलेला मनुष्य शरीरेंद्रियांची शुद्धि होऊन ज्ञानाची योग्यता प्राप्त होणें या उत्तम सिद्धीला प्राप्त होतो. आपआपल्या वर्णधर्मानुसार विधान केलेल्या कर्मांचें आचरण करणाऱ्या प्राण्यांना अधोगति प्राप्त न होतां त्यांचा ऐहिक व पारमार्थिक उत्कर्ष होतो. " जगतःस्थिति कारणं प्राणिनां साक्षादभ्युदय निःश्रेयसहेतुर्यः सधर्मो ब्राह्मणाद्यैर्वर्णिभिराश्रमिभिश्च श्रेयोर्थिभिरनुष्ठीयमानः " प्राण्यांच्या साक्षात् अभ्युदयाचें-उत्कर्षाचें व मोक्षाचे कारण तो धर्म होय.

पुरुषार्थाची इच्छा करणाऱ्या ब्राम्हणादि वर्णाकडून व ब्रम्हचारी गृहस्थ इत्यादि आश्रमींकडून अनुष्ठान केला जाणारा तो, धर्म होय. यावरून धर्माचरणाचा सूक्ष्म हेतु व जन्म, जाति यांचा पूर्वकर्माशीं संबंध ध्यानांत येईल. देश, काल, वय, अवस्थानुरूप धर्माचें सांग अनुष्ठान होत नसतें. म्हणून धर्मशास्त्रकारांनीं आपद्धर्माची योजना केलेली आहे. पुढें कलियुगांत लोकांना नोकरीच्या मार्गे लागावें लागेल व त्यामुळें धड जेवावयालाही फुरसद होणार नाहीं, अनेक उपाधींनीं लोक त्रस्त होतील हें भविष्य धर्मशास्त्रकारांनीं जाणलें होतें म्हणूनच त्यांनीं आपत्कालीं—अनुकूल परिस्थिति नसेल तेव्हां—धर्माचरणाला फारच थोडी सवड ठेविली आहे, पण सर्वथा कर्मलोप करणारांस प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. ब्राह्मणादिकांनीं आपत्कालीं कोणत्या वृत्तीचा आश्रय करावा याचेंही फारच सूक्ष्म विवेचन धर्मशास्त्रांत केलें आहे. तरीपण आपत्कालींही सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट म्हणजे

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

**श्रीकृष्णार्पणमस्तु.**

एकाच कुटुंबांत

# तेरा कोटी रामनामाचें अनुष्ठान !

( लेखकः—चं. पु. दा. )

१ यज्ञ हे मनुष्यमात्राच्या कल्याणाकरितांच ब्रह्मदेवानें उत्पन्न केले आहेत. किंबहुना यज्ञासहितच प्रजापतीनें प्रजा उत्पन्न केल्या आहेत असें 'सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा' या गीतावचनानें सिद्ध होतें. यज्ञ हें इष्टकाम पुरविणारे कामधेनुस्वरूपच आहेत. नानाप्रकारच्या कामना, त्यास नानाप्रकारचे यज्ञ आहेत. निरनिराळ्या यज्ञांचीं निरनिराळीं फळें आहेत. परंतु '**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि**' या वचनाप्रमाणें 'जपयज्ञ' हा परमेश्वराची विभूति असल्यामुळें तो सर्व यज्ञांत श्रेष्ठतम आहे. सर्व प्रकारच्या कामना जपयज्ञापासून पूर्ण होतात, म्हणूनही त्याचें श्रेष्ठत्व सर्वांस कबूल आहे. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीप्रेरित '**मोठा यज्ञ व साक्षात्कार**' ह्या पुस्तकांत या विषयींचा साङ्गोपाङ्ग विचार केलेला आहे तो बहुतेक सर्व धार्मिक जनांस विदित असेलच. सर्व साधनांत हें साधन 'अत्यंत सोपें' परंतु सर्व साध्यांत म्ह० फळांत याचें फळ 'अत्यंत मोठें' असें संतांनीं अट्टहासानें सांगितलें आहे.

२

“ नामसंकीर्तन साधन पैं सोपें । ”
“ याहूनि असतां आणिक साधन ।
वहातसे आण विठोबाची ॥ ”
“ फुकाचें सुखाचें कांहीं न वेंचे भांडार ।
कोटि यज्ञांपरीस तुका म्हणे हें सार ॥ ”

इत्यादि अनंत वचनें आहेत. यावरून नामस्मरणाचें फळ कोटि यज्ञापेक्षाही मोठें आहे हें कबूल केलें पाहिजे. परंतु हें सर्व साधनांत ‘ सुलभ ’ साधन म्हटलें हें मात्र तितक्या सुलभ रीतीनें कबूल करितां येणार नाहीं. कारण तसा विश्वास किंवा निश्चयच मुळीं उत्पन्न होत नाहीं ! आणि म्हणून तें सर्वांत सुलभ म्हणण्यापेक्षां कठिणांतलें कठीण म्हणावेंसें वाटतें. आणि यास—

“ जन्म जन्मांतरीं असेल पुण्य सामुग्री ।
तरिच नाम जिव्हाग्रीं येईल श्रीरामाचें ॥ ”

या वचनानें श्रीज्ञानेश्वर महाराजही पुष्टि देतात. मग आम्हांस तसें म्हणण्यास कसली भीति ?

“ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनि ।
शहाणा तो धणी घेतो येथें ॥ ”

या वचनांत देखील श्रीतुकाराममहाराजांनीं या साधनाचें काठिण्यच दिग्दर्शित केलें आहे. ‘ सोपें आहे, पण शहाणा असेल तोच हें पोटभर घेईल ’ असें ते म्हणतात. पण हें शहाणपणच मुख्य महाग आहेना ? अर्थात् नामस्मरण हें साधन सोपें नसून कठीणच आहे, अत्यंत पुण्यसाध्य आहे असेंच आपण समजलें पाहिजे. नामस्मरणाचें माहात्म्य रोज रोज ऐकून व हरिपाठामध्यें गाऊन कितीजण बरें तें करण्यास ‘ तीव्र संवेगानें ’ आज तयार झाले आहेत, करूं लागले आहेत ? फारच थोडे ! व्यापार करण्यास भांडवल नको काय ? ‘ जन्मजन्मांतरींची पुण्यसामुग्री काय वाटेवर पडली आहे ! सर्वांच्याच तिजोरींत हें भांडवल नसतें. ज्यांच्याकडे असतें, ते त्या भांडवलावर व्यापार सुरू करतातच व आपली संपत्ति वाढवितातच.

२ गु. भ. प. रामचंद्र त्रिविक्रम नाईक बांदिवडेकर राहणार कायसुव [ गोआ-बार्देस ] हे तशा भांडवलवाल्यांपैकीं एक होत. यांचें जुनें कुटुंब ( घराणें ) या प्रांतांत फार प्रसिद्ध आहे. यांच्या कुटुंबांत हल्लीं एकंदर सुमारें ४०।५० माणसें आहेत. रहण्याचें घरही बरेंच मोठें असून थोडया वर्षांखालीं ( यांच्या वडिलांच्या वेळींच ) दोनचार चुली वेगवेगळ्या झाल्या. कालपरिस्थितीनुसार घराणें सर्व बाजूनें खालावत चाललें. परंतु ‘ पुरे एकचि पुत्र माय पोटीं ’ या वचनाप्रमाणें रा. रामभाऊ हे त्या कुळांत एक दिव्य

पुरुष उत्पन्न झाले. त्यांनीं आपल्या प्रयत्नानें पूर्वपरिस्थितींत भयंकर क्रांति घडवून आणली. यांना मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज, कानडी, तुळू वगैरे भाषांचें ज्ञान असून, संस्कृत भाषेंत तर उत्तम कविता करण्यासारखें यांचें ज्ञान आहे. हे व्यवहारकुशल आहेत. तसेच परमार्थप्रवणही आहेत; इतकेंच नव्हे तर उत्तम ' गुरुपुत्र ' म्हणण्यास योग्य असे ते आहेत. हे डेंगरीकर प्रसिद्ध सत्पुरुष श्रीकृष्णभट्ट बांदकर ( विष्णु कृष्ण जगन्नाथ ) यांचे शिष्य आहेत त्याचप्रमाणें हे पराकाष्ठेचे मातृभक्तही आहेत. ' गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ' या वचनाप्रमाणें यांच्याकडे संपदा अभ्युदय चालून आला तर त्यांत आश्चर्य नाहीं.

१ पौरुष प्रयत्न दोन प्रकारचे असतात. एक ' लौकिक ' व दुसरा ' शास्त्रीय '. शास्त्रीय प्रयत्नाची जोड लौकिक प्रयत्नास दिली म्हणजे ते सिद्धीस जाण्यास वेळ लागत नाहीं. रा. रामभाऊंनीं आपल्या घराण्याची खालावलेली स्थिति लक्षांत घेऊन दहा बारा वर्षांखालीं फक्त ' श्रीराम ' या मंत्राचा तेरा कोटी जप कुटुंबांतील मंडळीकडून करविला. दोन तीन वर्षांत तो पुरा झाला. त्याची सांगता त्यांनीं घरच्या घरींच थोडक्यामध्यें पण मोठ्या आनंदानें व थाटानें त्यावेळीं केली. त्यानंतर त्रयोदशाक्षरी तारक मंत्राचें तेरा कोटींचें अनुष्ठान घराण्यांत करवावें अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली. परंतु सर्वांना त्या मंत्राचा गुरूपदेश नव्हता. गुरुचरण हे त्या पूर्वींच दिवंगत झाले होते. म्हणून त्यांनीं सर्व मंडळीला आपल्या कुलदेवाकडे ( श्रीस्थळ नागेशी येथें शके १८४१ च्या कार्तिकमासांत ) आणिलें व तेथील श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरांत लक्ष्मीनारायणाचे पायाकडे जमिनीवर ' **श्रीराम जयराम जयजय राम** ' हा मंत्र खडूनें लिहून तो प्रत्येक व्यक्तीकडून वाचविला, व कुलोपास्य देवताच गुरु असून त्या देवतेकडूनच मंत्र मिळाला अशी भावना करून जप करण्यास आरंभ करा असें सांगितलें. वयोमानाप्रमाणें व कामाच्या उपाधीमानाप्रमाणें अमुकानें अमुक इतका जप रोज करावा असें सर्वानुमतें निश्चित करून सांगून सोडलें. ठरविल्यापेक्षां जास्तच करावा, पण कमी करतां कामा नये, कांहीं अडचणीमुळें कमी झालाच तर तो दुसऱ्या दिवशीं भरती करून द्यावा, असा नियम ठरवून टाकला. संख्यायुक्त जपाचा लकडा पाठीमागें लागल्यामुळें रिकाम्या गोष्टींत वेळ वालविण्यास कोणासच सवड मिळेना. हातांतील नित्याचें काम संपतें केव्हां व माळ घेऊन बसेन केव्हां, असें झाल्यामुळें बायकांचे स्वाभाविक तंटे स्वाभाविकपणेंच बंद पडले. नामस्मरणाच्या वस्तुशक्तीमुळें व ध्येयैकत्वामुळें पुरुषांचीं मनेंही शुद्ध होऊन कुटुंबांत प्रेम नांदूं लागलें. कलीचे कलह नाहींसे होऊन, शुद्ध प्रेमामुळें तेथें पुण्यलक्ष्मीचें आकर्षण झालें. घराण्यांतील अंतर्बाह्य परिस्थितींत फरक पडलेला लोकांच्या नजरेस येऊं लागला व त्यामुळें यांच्याबद्दल लोकांत आदर

वाढत चालला रामभाऊंनीं चालविलेली दिनचर्या तर एखाद्या योग्यानेंही अनुकरण करण्यासारखी होती व आहे. रोज पहाटे ४ वाजतां उठून ५ वाजण्याच्या आंत स्नान करून संध्या व देवपूजादि आटपून श्रीमद्भागवताचा नित्य एक स्कंध वाचावा व आठ साडेआठ वाजतां घरून दोन मैलांवर असलेल्या दुकानीं जावें. रात्रौ आठाला घरीं येऊन ज्ञानेश्वरी, नाथभागवत वगैरे मातोश्रीला वाचून दाखवावें; नंतर स्नान करून संध्या, स्तोत्रपाठ, जप, भजन वगैरे उरकून जेवण करावें. १८ अध्याय गीतेचा नित्य पाठ प्रवासांतही कधीं मोडला नाहीं. यांचीं भागवताचीं पारायणें सुमारें १०८ झालीं असावीं. प्रवासामुळें व इतर श्रमांमुळें हल्लीं त्यांची प्रकृती बरीच अशक्त झाली आहे. तरी कर्तव्यनिष्ठत ते फार सशक्त आहेत. रामभाऊंचे आणखी तिघे सहोदर बंधु आहेत, तेही असेच प्रेमळ व दैवीसंपत्तिमान आहेत. तेरा कोटींचें अनुष्ठान ईश्वरी कृपेनें पूर्ण झालें. सात वर्षें लागलीं. जिकडे या अनुष्ठानाचा आरंभ झाला होता, तिकडेच म्हणजे कुळदेवाकडे ( श्रीस्थळ नागेशी येथें ) सांगता व्हावी अशी इच्छा मातोश्रीनें दर्शविल्यामुळें, पुष्कळ श्रमाचा व खर्चाचा प्रवास करून, ते सर्व मंडळीसह तिकडे फाल्गुन शु० ११ ( शके १८४७ ) रोजीं होडींमधून आले.

४ द्वादशी बुधवार रोजीं त्यांनीं कुळदेवाकडे लघुरुद्र केला. संध्याकाळीं ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत यांचें भजनी कीर्तन झालें. त्यानंतर स्वतः रामभाऊंचें रामगीतेवर पुराण झालें. तसेंच महाशय मुकुंदराज श्रीकृष्ण भट्ट बांदकर यांचें व ह. भ प बाळूबोवा नामक एका प्रेमळ व तरुण हरिदासाचेंही कीर्तन झालें. हा सर्व कार्यक्रम उरकण्यास रात्रीचे बारा वाजले.

फा. शु. १३ गुरुवार रोजीं सकाळीं देवता अधिवासन होऊन, पुण्याहवाचन झाल्यानंतर त्रयोदशाक्षरी मंत्रानें तेरा हजार हवन झालें. हवनद्रव्य तुपानें भिजविलेले तांदुळ होते. पूर्णाहुति झाल्यानंतर देवाचा महानैवेद्य मंगळारत्या वगैरे होऊन ब्राह्मणसंतर्पण झालें. सायंकाळीं ७॥ ते ९॥ म. मुकुंदराजांचें सुश्राव्य कीर्तन झालें. त्यानंतर मडगांवचे प्रसिद्ध व्यापारी व भजनप्रेमी गृहस्थ गु. भ. प. दत्तात्रय वासुदेव सडेकर यांचें वारकरी संप्रदायाचें भजन झालें. हा भजनसमारंभ मोठया थाटाचा व आनंदकारक झाला. रात्रीची श्री नागेश महारुद्राची पूजा वगैरे आटपल्यानंतर उत्सवाच्या अखेरीचा समारोप रा. रामभाऊंनीं मोठया प्रेमळ भाषणानें केला. हा समारोप म्हणजे त्यांचें थोडेंसें आत्मनिवेदनच होतें. आपलें चित्त परमार्थप्रवण करण्यास व डोंगरीची वाट दाखविण्यास कारणीभूत झालेले ह. भ. प. **दिगंबरदास** ( विठ्ठल कृष्ण कामत ) यांचें त्यांनीं प्रथम स्मरण करून आभार मानले. ते नेरळास असतांना त्यांच्या हाताखालीं आपण संस्कृत शिकण्यास

आरंभ केला, त्याच्यामुळें नेरूळगांव म्ह० भूवैकुंठ होऊन राहिलें होतें, आतां तेथें पहावत सुद्धां नाहीं; बेळगांवास गेल्या वेळीं त्यांनीं आपल्याला श्रीगोंदवलेकर महाराजांचे एक शिष्य गु. भ. प. कृष्णराव गाडगीळ यांच्या येथें नेले; त्यांच्या घरीं बायकामुलींच्याही हातांत जपमाळ पाहून, आपल्या घरींही असाच जप सुरू करावा, अशी प्रथम स्फूर्ति तेथें उद्भवली; या जपानेंच आपल्या प्रापंचिक परिस्थितींत भयंकर पालट झाला आहे, वगैरे मोठ्या प्रेमानें सांगितलें. तसेंच, दिगंबरदासांनीं जमीन नांगरून तयार केली; बीजारोपण डोंगरीकरांनीं केलें, त्यांच्याच कृपेनें बीजास अंकुर फुटले, आपण फक्त वेळच्या वेळीं पाणी वगैरे घालून मशागत केली, त्याचें हें आजचें फळ आहे; आपण फक्त माळ्याचें काम केलेलें आहे; फळाचा धनी माळी होत नाहीं; याकरितां हें फळ ज्याचें त्याला म्हणजे आमच्या श्रीगुरूचे प्रतिनिधि—आत्मरूप असे श्रीमुकुंदराज यांचे चरणीं अर्पण करितों, असें म्हणून रामभाऊंनीं मोठ्या सद्गदित अंतःकरणानें मुकुंदराजाचे चरणीं सा० नमस्कार घातला. त्यानंतर मडगांवहून मुद्दाम टाळवीणामृदंगसहित आपल्या ५।७ मंडळीस घेऊन येऊन भजनानंदाचा लाभ दिल्याबद्दल रा० दत्तोबा सडेकर व इतर पाहुण्यांचे आभार मानण्यांत आले. त्यानंतर ह० भ० प० रामचंद्र कृष्ण कामत यांनीं रा० रामभाऊंच्या दृढनिष्ठेचें व मातृभक्तीचें कौतुक करून आजचें यश हें त्यांच्या त्या साध्वी मातोश्रींच्या पुण्याईचें आहे असें सांगितलें व हल्लीं मुंबईस व इतर अनेक ठिकाणीं चालू असलेल्या तेरा कोटी नामानुष्ठानाची माहिती सांगून, हुबळीस तर आज ५।६ वर्षांपासून तेरा कोटींचें सामुदायिक अनुष्ठान दर वर्षीं होत असत, "हा काल भयंकर काल आहे, पण शुभ काल आहे, अवतारकाल आहे" असें श्रीसिद्धारूढ महाराज म्हणतात, ही देखील गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे वगैरे सांगून 'आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा' वगैरे अभंगांनीं परमेश्वराकडे प्रार्थना करून समारंभ आटपला.

५ समारंभास आलेल्या अनेक सज्जनांवर अनुकरणइच्छेचा परिणाम झालेला दिसला. परमेश्वर करो व हिंदुस्थानांत अशीं नामानुष्ठानें प्रत्येक गांवांत व प्रत्येक कुटुंबांत होऊन राष्ट्रांतील सर्व आपत्ति दूर होवोत आणि महात्मा गांधींसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मंगल इच्छा तो त्रैलोक्यमंगल प्रभु लवकर पूर्ण करो, असें प्रार्थून हा लांबलेला लेख पुरा करितों.

ॐ तत्सत्.

# आद्यकवि श्रीमुकुंदराज.

( लेखक—दिवाकर जयवंतराव चौबे, हिंगणघाट. )

१ या थोर विभूतीचा जन्म केव्हां व कोठें झाला याबद्दल सबळ पुरावा अद्यापि उपलब्ध नाहीं; परंतु स्वामींची समाधि बेतूल जिल्ह्यांत बेतूल शहरापासून पांच मैलांवर खेरडा नांवाचें खेडें आहे व तेथें फार प्राचीन काळचा किल्ला आहे त्यांत आहे. या किल्ल्याला जयत्पाळाचा किल्ला किंवा मुकुंदराज स्वामींचा किल्ला म्हणतात. स्वामीजींचे काळीं तें मोठें राजधानीचें शहर असावें; कारण किल्ल्याचे सभोंवतीं हल्लीं जीं खेडीं आहेत त्यांचीं नांवें अनुक्रमें सोमवार पेठ, मंगळवार पेठ अशीं आहेत. किल्ल्याचा परिघ सरासरी एक मैल असून त्यांत एक मोठी उंच टेकडी आहे. त्या टेकडीवर सुंदर महालाची रचना आजही स्पष्ट दिसत आहे. तेथें राजा जयत्पाळ राहात असावा असें अनुमान करितां येतें. स्वामींची समाधि त्या टेकडीच्या पायथ्याशींच आहे. त्यावर सुंदर देवालय बांधिलेलें असून पूजेकरितां महादेवाची पिंडी वर स्थापन केली आहे. तेथील कांहीं सभ्य गृहस्थांनीं इ० सन १८९७ चे सुमारास स्वामीजींची समाधि पुन्हां बांधिली, त्या वेळेला कामकरी गवंडी लोकांनीं तेथें द्रव्य असेल या आशेनें सबंध समाधि खोदली. तेथें स्वामीजींचीं हाडें व राख निघाली. ती राख कांहीं भाविक लोकांनीं आपलेजवळ पूजेकरितां ठेविली आहे. पुढें तेथील लोकांनीं स्वामींचे समाधिजवळ माफी मागितली आणि समाधीचें काम पूर्ण केलें. १९०७ सालीं त्या देवळालगतच गैबीदास उर्फ पंडितजी, माजी बेतूलचे हेडमास्तर, यांनीं सुबक सभामंडप बांधिला आणि जवळच एक धर्मशाळा बांधिली आहे. किल्ल्याच्या भिंती पुष्कळ ठिकाणीं विस्कळित झाल्या आहेत व त्याचप्रमाणें टेकडीवरील राजाचा महाल यालाही जंगलाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आज तेथें जंगली श्वापदें निःशंकपणें विचरत आहेत. हा काळाचा महिमा !

२ या किल्ल्यापासून सरासरी तीन मैलांवर रावणवाडी नांवाचें गांव आहे. तेथें एक तळें आहे. त्या तळ्याबद्दल अशी आख्यायिका आहे कीं, राजा जयत्पाळ हा साधुसंतांना राजवाड्यांत बोलावून " पावडीमें पाव तों ब्रह्म बताव " ( पावडीमध्यें पाय ठेवला न ठेवला तोंच ब्रह्माकार वृत्ति झाली पाहिजे ) असा प्रश्न करी. ज्यांच्यामध्यें हें सामर्थ्य नसेल त्यांना तो हें तळें खोदण्याला लावी. कांहीं कालानंतर स्वामीजी तेथें आले व त्या तळ्यावरील देखावा पाहून त्यांचें अंतःकरण द्रवलें सर्व साधुसंतांना एकदम काम बंद करण्याला सांगितलें व हातांतील छडी तेथें खोदकामाकरितां असलेल्या प्रत्येक वस्तुला मारली. त्या योगानें कुदळी पावडीं इत्यादि सामान आपापलीं कामें बिनचूक मनुष्यांच्या साह्यावांचून करूं लागलीं ! हा चमत्कार पाहून सर्वांना फार

आश्चर्य वाटलें. ही गोष्ट तेव्हांच राजाचे कानापर्यंत पोंहोंचली व राजानें तोच प्रश्न स्वामीजीला केला तेव्हां त्यांनीं घोडा सज्ज करून आणण्यास सांगितलें. घोड्याला तेथें आणल्यावर स्वामीजींनीं राजाला वर स्वार होण्याला सांगितलें. राजा रिकबेंत पाय ठेवितांच स्वामींनीं एक छडी त्या राजाचे डोक्यावर व दुसरी घोड्याचे डोक्यावर मारतांच दोघांनाही सात दिवसपर्यंत अचलसमाधि लागली! पुढें स्वामीजींचे आज्ञेवरून सर्व साधुसंतांना सोडून दिले व राजा आपण स्वामीजींच्या सेवेंत राहिला. त्या घोड्यासंबंधानें सुद्धां असें सांगण्यांत येतें कीं हाच घोडा पुढें ज्ञानोबारायांचे वेळेला रेडा झाला व त्यांनीं त्याजकडून वेद बोलविले. जरी कदाचित् वरील गोष्टींत खरेपणा नसेल तरी या तलावावर स्वामीजींनीं कांहीं तरी अमानुष चमत्कार दाखविला असावा. व हें तळें मागील काळाची साक्ष देतें. इकडील लोकांना या तळ्यासंबंधानें प्रश्न केल्याबरोबर वरील आख्यायिका ऐकण्याला मिळते. स्वामीजींजवळ महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

> नृसिंहाचा बल्लाळ । त्याचा पुत्र जयंतपाळ ।
> तेणें केला गदारोळ । ग्रंथरचनेचा ॥

या ओवीचा संबंध

> शके अकरा दाहोत्तरु । साधारण संवत्सरु ।
> राजा शारंगधर । राज्य करी ॥
> ऐसा समयो सर्वोत्तमु । मुकुंदराज द्विजोत्तमु ।
> विवेकसिंधु मनोरमु । निर्मिता झाला ॥

जयंतपाळाकरितां स्वामीजींनें विवेकसिंधु ग्रंथ सांगितला, व शारङ्गधरराजा हा जयंतपाळाचा युवराज असावा व स्वामीजींची पूर्ण कृपा झाल्यावर जयंतपाळानें राज्यकारभार पहाण्याचें शारङ्गधरवर सोंपविलें असावें. शिलालेख या किल्ल्यांत नसल्यामुळें याबद्दल कांहींच उल्लेख करितां येत नाहीं. तरी पण स्वामीजींचा काल शके १११० हाच असावा. व ज्ञानोबारायांच्या व त्यांच्या काळांत हल्लीं जें सरासरी १०० वर्षांचें अंतर येतें तेंच खरें असावें. लोकांमध्यें आद्यकवि मुकुंदराज झाले व नंतर श्रीज्ञानोबाराय झाले, अशीच समज दृढ झाली आहे. देवगिरीचे यादवराजे व हे राजे भिन्न असावेत.

## गुरुपरंपरा.

> ॥ आदि गुरु श्रीआदिनाथ । तेथूनि श्रीहरिनाथ ।
> ॥ तयांचा शिष्य रघुनाथ । जो गुणसिंधु ।

—विवेकसिंधु.

आदिनाथ
|
हरिनाथ
|
सुरेंद्रभारति (समाधि–आंभोरा) | रघुनाथ उर्फ रामचंद्र मुनी
| श्रीमुकुंदराज

श्रीहरिनाथाची समाधिः—“ बाणगंगेच्या तीरीं । मनोहर अंबानगरी । तेथें प्रगटले श्रीहरी ॥ जगदीश्वर ॥ ” म्हणजे वैनगंगेच्या कांठीं आंभोरा (अंबानगरी) येथें स्वामी हरिनाथांची समाधि आहे. पांच मोठ्या नद्यांचा येथें संगम असून त्या संगमावरच नाथांचें समाधिस्थान आहे. हल्लीं आंभोरा हें खेडें असल्यामुळें एकांतवासाकरितां मोठे योगी येथें येऊन राहतात. नाथांच्या समाधीवर पादुका असून वर प्रेक्षणीय देवालय व सभामंडप आहे. येथें शिवरात्रीला व दत्तजयंतीला यात्रा भरते. नाथांच्या समाधीजवळच एका उंच टेकडीवर चैतन्येश्वराचें देऊळ आहे. तें स्वयंभू लिंग असून विवेकसिंधूमध्यें शेवटच्या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें नाथांनीं तेथें यज्ञ करून महादेव प्रसन्न केला असें म्हणतात. खरोखरच यज्ञाचे कुंडाप्रमाणें सभोंवतीं जागा असून वर स्वयंभू लिंग आहे. आंभोरा हें नागपूर जिल्ह्यांत उमरेड तहसिलींतील एक खेडें आहे. येथें जाण्याला सरळमार्ग भंडाऱ्यावरून आहे. भंडारा स्टेशनवरून भंडारा शहर पांच मैल आहे. तेथें मोटार, टांगे, गाड्या मुबलक मिळतात. पुढें भंडारा शहरापासून चार कोस आंभोरा आहे. तेथें सडक नसल्यामुळें गाडीबैलानें जावें लागतें. आंभोरा हें खेडें असल्यामुळें सर्व सामुग्री भंडाऱ्यावरूनच न्यावी लागते. श्रीरघुनाथाची समाधि कोठें आहे याचा शोध मिळत नाहीं. जुन्या एका केसरीचे अंकांत [ १९०५ सालचा आक्टोबरचा अंक असावा—नक्की आठवत नाहीं. ] श्रीरघुनाथाची समाधि छिंदवाडा येथें आहे व त्यांनीं स्वात्मसुख ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिला आहे असें होतें, परंतु छिंदवाडा येथें श्रीरघुनाथाची समाधि मुळींच नाहीं. श्रीरघुनाथाच्या समाधीचा मला शोध लागल्यास व श्रीमुकुंदराजाचे किल्ल्यांत कोठें शिलालेख आढळून आल्यास आपणाकडे याबद्दल लिहून कळवीन. एकंदरींत पाहतां हे सर्व महात्मे मोठे अधिकारी होऊन गेले व या सर्वांच्या समाधि मध्यप्रदेशांतच आहेत.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पीनें ८१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२.

६. **नारदभक्तिसूत्रेंः**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८. व्ही. पी. नें ८११.

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८४.

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळे ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १८८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८८.

## पांगारकरांचीं पुस्तकें.

**११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

**१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८

**१४ मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

**१५ पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

**१६ श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

**१७ श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

**१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:-- निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

**१९ मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणासह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२० मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): - किं. ०४.

**२१ सार्थ श्रीदासबोध**—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

**२२ सार्थ मनोबोध**:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

**२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


**२४ मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २.

**२५ श्री एकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसची आवृत्ति तिसरी )--किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष १९ मास ९।१० | चैत्र वैशाख १८४८ मे जून १९२६ | नवें वर्ष ६ वें अंक ५।६ वा.



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही पी. नें रु. ३८३

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

## माहे मे १९२६


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ सरस्वतीचें मंगलाचरण ... ... ... | १-२ |
| २ मराठी वाङ्मयाचें समालोचन ... ... ... | ३-४० |


## माहे जून १९२६


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ मागील अंक पृष्ठ ४० शेवटचीं वाक्यें ... ... | २ |
| ३ भक्तीचें गौरव ... ... ... ... | ३-९ |
| ४ श्रीगोंदवलेकरमहाराजांचे अभंग ... ... ... | १०-१६ |
| ५ तुकाराम आणि रामदास-इषारा ... ... ... | १७-१९ |
| ६ हा खादीचा पराक्रम पहाल का ? ... ... | १९-२० |
| ७ जगद्गुरु हिंदुस्थान ... ... ... ... | २०-२१ |
| ८ गोविंदकवीचें शेवटचें पद्य ... ... ... | २१-२२ |
| ९ भक्तांचा स्वधर्म ... ... ... ... | २३-२६ |
| १० श्रीविश्वनाथमहाराज पाटणकर यांचें चरित्र ... ... | २६ ४० |



## निबंधमाला-तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १७४८ मध्यें 'सरस्वती-मंदिर' मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें ज्यास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ०१० आणे.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.



१

## वृत्त–ओवी.

ॐ नमोजी गणनायका । सर्व सिद्धिफळदायका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥ १ ॥
आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।
शब्दमूळ वाग्देवता । महामाया ॥ २ ॥
जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यंतर । उकलूनि दावी ॥ ३ ॥
तिहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रकट केलें ।
म्हणोन कर्तृत्व जितुकें आले । तें शारदागुणें ॥ ४ ॥
जे ब्रह्मादिकांची जननी । हरिहर जयेपासुनी ।
सृष्टिरचना लोक तिन्ही । विस्तार जयेचा ॥ ५ ॥
जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें बोळखिलें ।
जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ॥ ६ ॥
म्हणौनि थोराहून थोर । जे ईश्वराचा ईश्वर ।
तयेसी माझा नमस्कार । तदंशेंचि आतां ॥ ७ ॥

२

## वृत्त प्रमाणिका.

जिवामधील जाणती–। कळाचि ते सरस्वती ।
मनांतरीं वसे सदा । प्रसन्नरूप शारदा ॥ १ ॥

अनेक सौख्यदायिका । अनेक लोकनायिका ।
अनेक धारणा धरी । अनेन चाळणा करी ॥ २ ॥
अनेक पंथ चालवी । अनेक मत्त हालवीं ।
निःशब्द खूण पालवी । मनें मनासि मालवी ॥ ३ ॥
उरेचिना सरेचिना । पुरेचिना धरेचिना ।
असेचिना नसेचिना । वसेचिना दिसेचिना ॥ ४ ॥
अगम्य गम्य गम्य रे । प्रणम्य नम्य नम्य रे ।
असो जसी तसी असो । मंदंतरींच वीलसो ॥ ५ ॥
चतुर जाणते जनीं । करा विचारणा मनीं ।
सरस्वतीस वोळखा । उगे भरीं भरों नका ॥ ६ ॥

* * *

तुझेनि सर्व बोलणें । तुझेनि सर्व चालणें ।
तुझेनि योग धारणें । तुझेनि राजकारणें ॥ ७ ॥
तुझेनि नामरूप हो । तुझें दिसे स्वरूप हो ।
विधी भुगोळचाळके । अनंतलोकपाळके ॥ ८ ॥
तुझीच चालते सत्ता । बुझेल तोचि पूरता ।
तुझीं करूनि आस तो । फिरे उदास दास तो ॥ ९ ॥

—श्रीरामदास.

# मराठी वाङ्मयाचें समालोचन.

## अध्यात्माचा दोरा.

१ ' महाराष्ट्रवाङ्मयाचें समालोचन ' विहंगमदृष्टीनें करण्याचें मीं आज योजिलें आहे. ज्या भूमिकेवरून समर्थांनीं सरस्वतीचें स्तवन केलें आहे त्याच भूमिकेला स्पर्श करून ज्ञानेश्वरापासून मोरोपंतांपर्यंतचें बहुतेक महाराष्ट्रवाङ्मय निर्माण झालें आहे. " वाचें बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व—। स्पर्श जैसा " [ ज्ञाने० अ०१८—३`७ ] सर्व प्रबंधांत कवित्व, कवित्वांत रसिकत्व व रसिकत्वांत परतत्वस्पर्श मुख्य आहे असें प्राकृत-कवीश्वराचार्य जे ज्ञानेश्वर त्यांनीं सूत्र घालून दिलें आहे व प्रायः ह्या सूत्राला अनुसरून मराठी पद्यवाङ्मय प्रगट झालेलें आहे. परतत्वस्पर्श नसलेलें काव्य महाराष्ट्रांत लोकमान्य झालें नाहीं. समर्थांनींही कवींचे तीन प्रकार सांगितले आहेत. ' जें जें आपुल्या मनासि आलें । बळेंचि कवित्व रचिलें ' असें कवित्व करणारे 'धीट कवि' होत. बहुत ग्रंथांचें पाठांतर करून ' तयासारिखा उतार आपणही केला ' असे ' विटाळ्याचे कवि ' ते 'पाठकवि.' मनास येईल दृष्टीस पडेल त्यावर कवित्व करणारे 'कामिक रसिक शृंगारिक। वीर हास्य प्रास्ताविक ' हे सर्व 'धीटपाठ' कवि होत. दृश्यभास पंचभूतांत आला म्हणून दृश्यभासातीत तें परमात्मतत्व त्याच्या बैठकीवरून त्याला स्पर्श करून जें कवित्व उदय पावतें तें प्रासादिक कवित्व व ' सर्व काळ अंतःकरण भक्तिरंगें रंगलेलें ' असतांना भगवत्स्फूर्तीनें काव्य करणारे ते 'प्रासादिक कवि.' असे हे कवि तीन प्रकारचे आहेत. सर्वांत प्रासादिक कवि श्रेष्ठ होत ( दास०द०१४, स० ३ ). कवित्व शब्द सुमनमाळा गुंफून रामचरण पूजावे व ' ओंकार तंतु अखंडपणीं । खंडूंचि नये' असें समर्थ कवीस सुचवितात व सांगतात कीं:—

अनेक भास भासतो । परंतु सर्व नासतो ।
अनंत संत वोळखा । मुळाकडे चुको नका ॥

एकनाथांनींही ' तेवीं माझी हे मऱ्हाटी । निःशब्दाच्या सांगे गोष्टी ' असें म्हणून 'भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या' असाच बोध केला आहे. वामन पंडितांनींही ' अलवण हरीवीण कविता ' म्ह. ज्यांत हरी नाहीं—परतत्वस्पर्श नाहीं—ती कविता आळणी होय असें म्हटलें आहे. ज्या काव्यांत ( किंवा कादंबरी, गोष्टी इत्यादिकांत ) ' कुनर व अपूत नारी ' यांचेंच वर्णन आहे तें काकतीर्थ होय, मानस सरोवरीं रमणारे राजहंस त्याकडे ढुंकूनही पाहायचे नाहींत, तसेंच धनाकारणें जी वाणी पराधीनपणें दीन झाली आहे

वी सरस काव्य प्रसवण्यास असमर्थ आहे असें त्यांनीं वेणुसुधेंत म्हटलें आहे. तुकोबांनीं तर 'वाचा वाहिली विठ्ठलीं' हें प्रसिद्धच आहे. मोरोपंत, महिपति इ० कवींनींही देव व देवरूप संत यांच्यावांचून आमची वाणी कोणाचेंही गुणवर्णन करायचीच नाहीं असा आपला निश्चय जागोजाग सांगितला आहे. "गोष्टी नावडती अनंतकविला या लौकिकी वागळा' असें सामान्य कवींही बोलून दाखवितात. तात्पर्य, ज्यांत परतत्वस्पर्श नाहीं तें कवित्व कमी प्रतीचें असून परतत्वाचा दोरा, ओंकारतंतु, परमात्मस्पर्श ज्यांत आहे तें काव्य श्रेष्ठ होय असा सर्व प्राचीन कवींचा कटाक्ष आहे व त्या मोहरेवरच त्यांनीं काव्य रचना केली आहे. आतां हें सूत्र लक्ष्यांत ठेवलें तरी प्रत्येक कवीचा अधिकार, त्याचें अध्ययन, त्याची उपासना, त्याचें साहित्य व छंदःशास्त्राचें ज्ञान, त्याची परिस्थिति, त्याचा अनुभव, त्याचें भाषाज्ञान, त्याचे स्वभावविशेष यांच्यांत कमीअधिकपणा असल्यामुळें एकत्वांतही विविधत्वाचा रस अनुभवायला सांपडतो.

## मराठी भाषेची थोरवी.

२ परतत्वाचा येथें अधिक विचार करायला वेळ नाहीं. उपनिषदांतून जो ब्रह्मविचार सांगितला आहे त्याचा स्वानुभवासह उपदेश मराठी सत्कवींनीं केला आहे. निर्गुणाचा बोध व सगुणाची उपासना अर्थात् अद्वैतभक्ति किंवा भक्तीवरील मुक्ति सर्व सत्कवींनीं प्रतिपादिली आहे. ज्ञानभक्तीसमन्वय हें त्यांच्या उपदेशाचें म्हणजे महाराष्ट्रकवितेचें सारसर्वस्व आहे. मराठी कविता भक्तिपर आहे अर्थात् ज्ञानभक्तिप्रधान आहे. त्यांच्या निर्गुणज्ञानांत भक्तीचा ओलावा आहे व सगुणभक्तींत ज्ञानाचा परिपाक उतरला आहे, यामुळें ज्ञानी व भक्त दोघेही मराठी कवितेंत सारखेच रमतात. संस्कृतांतील आत्मज्ञान त्यांनीं मराठींत आणलें आहे. संस्कृत हें चंद्रमंडळ तर मराठी चंद्रिका, संस्कृत स्वातीचें जळ तर मराठी मुक्ताफळें, संस्कृत इक्षुदंड तर मराठी शर्करा इ० दृष्टांत देऊन कृष्णदास मुद्गलानें आपल्या रामायण युद्धकांडांत म्हटलें आहे:—

जैसें दधीचें मंथन केलें । त्यांतून नवनीत निवडिलें ॥
तैसें संस्कृतापासोन जालें । महाराष्ट्रकवित्व ॥

दधीचें मंथन करून त्यांतून लोणी काढावें त्याप्रमाणें मराठी सत्कवींनीं उपनिषदादि ग्रंथांचें रहस्य मराठी जाणणाऱ्या प्राकृत लोकांच्या हातीं दिलें आहे. त्यांचे ग्रंथ आबालसुबोध आहेत. 'या रे या रे लहान थोर । भलते याती नारीनर' असें सर्व जातींच्या लहान थोर स्त्रीपुरुषांना आग्रहानें आवंतून त्यांनीं भक्तिज्ञानवैराग्याचें आकंठ भोजन घातलें आहे. बालबोधकर्ते त्र्यंबकराव म्हणतात:—

जैसा सुखासनाचा मार्गु । तैसा महाराष्ट्र प्रसंगु ।
अंगीं बाणे राजयोगु । रोकडाची ॥ १ ॥
ये मऱ्हाठीचे पल्लवें । जीव उगमातें पावे ।
तरी कासया उलथावे । पानाचे कवळे ? ॥ २ ॥
धन्य धन्य हे मऱ्हाठी । ब्रह्मविद्येची कसवटी ।
हा द्वारशिलेचे पोटीं । परिसु जोडिला ॥ ३ ॥
हा सगर्भ ग्रंथ उल्हाटे । तैं सर्वज्ञता प्रगटे ।
आत्मा रोकडाचि भेटे । हें सामर्थ्य याचें ॥ ४ ॥

महाराष्ट्र ग्रंथरचना हा सुखासनाचा मार्ग आहे. मराठीचा पदर धरून जीव उगमाला ह्मणजे ब्रह्मस्वरूपाला पावतो, व 'आत्मा रोकडा' भेटून राजयोग लीलेनें अंगीं बाणतो असें मराठीचें सामर्थ्य आहे." ही घरची कामधेनु आहे, हा अंगणांतला संतान ह्म० कल्पवृक्ष आहे, हें अमृताचें सरोवर आहे, हा माध्यान्हीं आलेला स्वानुभवसूर्य आहे, हा पदरीं बांधलेला चिंतामणि आहे–'बा पुरे हे पवित्र वाणी । ऐसीच आहे ! ' महाराष्ट्र–बोली सामान्य समजूं नका, ही ब्रह्मरसाची फव्हे ( पाणपोई ) आहे, सुगंधाची कळी ( कलिका ) उमलली कीं 'गंध घ्राणमेळीं । आनंदु दावी ' तशी ही मराठी आहे. केतकीच्या पोटांतून आमोदाची पेटारी निघावी किंवा रंभेच्या ( केळीच्या) सोपटांतून शुद्ध कापराचा लाभ व्हावा त्याप्रमाणें संस्कृत भाषेच्या पोटांतून तिचें सारसर्वस्व घेऊन मराठी भाषा जगांत प्रगट झाली आहे. अशा प्रकारें ४०० वर्षांपूर्वी सप्तशृंगीच्या पर्वतावरून एका संतकवीनें मराठीचें गौरव केलें आहे. त्याच्याही मागें दोनशें वर्षें जाऊन ज्ञानेश्वर काय म्हणतात तें ऐकूं. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं संस्कृतांतील शृंगारिक नाटकें व शृंगारकथा यांचा लोकांस चटका लागला होता व साहित्यशास्त्र या पहिल्या रसाचें हस्तक बनलें होतें. ज्ञानरायांना विषयांतून सोडवून लोकांस परतत्वाची गोडी लावायची होती, प्राकृतांतून गीतारहस्य प्रकट करायच होतें व तें आबालवृद्धांच्या कानांवर घालायचें होतें, म्हणून ते म्हणतातः—

तो श्रीकृष्णार्जुनसंवादु । नागरीं बोलीं विशदु ।
सांगोनि दाऊं प्रबंधु । वोवियेचा ॥ ११५६ ॥
नुसतीच शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा ।
जे शृंगाराच्या माथां । पांय ठेवी ॥ ५७ ॥
दाऊं वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥ ५८ ॥

खेचरांचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा ।
श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ॥ ६० ॥
तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं ।
आनंदाचें आवारूं । मांडूं जगा ॥ ६१ ॥
फिटो विवेकाची वाणी । हो कानामना जिणी ।
देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ६२ ॥
दिसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।
रिघो महाबोध सुकाळा-। माजी विश्व ॥ ६३ ॥
हा ठावोवरी मातें । पुरतया सारस्वतें ।
केलें असे श्रीमंतें । श्रीगुरुरायें ॥ ६६ ॥ ( अ० १३ )

ज्ञानेश्वर आपल्या मराठीला ' नागरी बोली ' म्हणतात. नागरी ह्म०सुसंस्कारांनीं कमावलेली, गांवढळ नव्हे. ' नगरांतरीं वसिजे । तरी नागरचि होईजे । ' पुढारलेल्या नगरांत राहणारे ते नागर, नागरिक. ज्या भाषेवर शास्त्रांचें संस्कार झाले आहेत, सुधारलेले नागरिक लोक जी भाषा बोलतात ती ' नागरी बोली. ' तसेंच ते तिला ' वेल्हाळ ' म्हणजे लाडकी आवडती म्हणतात व 'नवी' ही म्हणतात. मराठी भाषेवर त्यांचें प्रेम होतें हें उघडच आहे. ' नवी ' म्हणण्याचा त्यांचें पूर्वीं मराठींत फारसे नामांकित ग्रंथ झाले नव्हते इतकाच भावार्थ दिसतो. मुकुंदराजांचे ग्रंथ विवेकसिंधु व परमामृत हे त्यांच्या पूर्वी शंभर वर्षेंच झाले होते; कांहीं मानभावी ग्रंथ निःसंशय झाले होते. पण तो पंथ व त्या पंथाचे ग्रंथ महाराष्ट्र मंडळांत मान्यता पावले नव्हते व अजूनही पावले नाहींत. ज्ञानेश्वर वरील उताऱ्यांत सांगतात कीं " माझ्या वेल्हाळ व नागरी भाषेंत मी गीताख्य कृष्णार्जुनसंवाद सांगत आहे. ही शांतिकथा शृंगाराला खालीं चेपून टाकील, त्याविषयींची लोकांची आवड उडवून देईल व गोडपणानें अमृताला मागें सारील. खेचर ह्म०तामस प्रकृतीचे लोक. त्यांनाही सात्विकाचा पान्हा फोडील व सुमन ह्म० चित्तशुद्ध पुरुषांना तर ही श्रवणाबरोबर समाधिसुखानें डोलायलाच लावील. मी असा वाग्विलास विस्तारीन व गीतार्थानें विश्व भरून टाकीन कीं, आनंदाच्या आवारांत सारें जग येईल; कोणीही बाहेर राहाणार नाहीं. विवेकाचें दैन्य फिटेल, कान व मन यांना धन्यता वाटेल, व ब्रह्मविद्येची खाण वाटेल त्याला लुटायला सांपडेल. आचांडाळ सर्वांनाच ब्रह्मविद्येचें सुख घोटायला मिळेल, परतत्व प्रत्यक्ष होईल. एकलें अवधान दिल्यानेंच ब्रह्मसाक्षात्कार सर्वांना होईल, स्वात्मसुखाचा सोहळा सर्व जीव भोगतील-कोणासही अडकाठी राहाणार नाहीं. महाबोधसुकाळांत विश्व प्रवेश करील. " ज्ञानेश्वरांच्या ह्या उद्गारांत जी लोकोद्धारकता, सर्व-

संग्राहकता, स्फूर्ति व उल्हास हे गुण व्यक्त झाले आहेत तेच कमज्यास्त प्रमाणांत बहुतेक सत्कवींच्याही ठायीं आढळतात.

## नाना सांप्रदायांची एकरूपता.

३ वरील विवेचनावरून लक्षांत येईल कीं लोकांत भगवद्भाव वाढविण्यासाठीं म्हणजे भागवतधर्माचा प्रसार करण्यासाठीं मराठी कवितेचा जन्म झाला व त्यांत उपासना अनेकविध झाली तरी पांचशें वर्षेपर्यंत तिनें हेंच कार्य मुख्यत्वें केलें आहे. भागवतधर्मप्रसार हें मराठी कवितेचें स्फूर्तिबीज ( Motive power ) होय.

पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका ह्मणे करा । जयजयकार आनंदें ॥ १ ॥

अठरापगड जातींच्या लहान थोर सर्व लोकांत भक्तिसुखाचा प्रसार करण्यासाठीं कविमंडळानें कंबर कसली व मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, मोरोपंत, महिपति, सोहिरोबा इत्यादि सत्कवींनीं आपली वाणी तत्सिद्ध्यर्थ खर्च करून मराठी भाषेस अभियुक्त भाषेच्या पदवीस चढविलें. ह्या सर्व सत्कवींचें चारित्र्य शुद्ध, वाणी निर्मळ, हेतु निष्काम, व यामुळेंच त्यांची छाप सर्व समाजावर बसली. यांनीं आपले निरोप स्वतःच जनतेच्या कानांवर घातले व पुढें पुढें कीर्तनकार, पुराणिक व प्रवचनकार यांनीं त्यांच्या महत्कार्यास हातभार लावला. सगुण निर्गुण एक हा यांचा सिद्धांत, सर्व अद्वैतसंप्रदायी उपासनांचें अनेकत्व असलें तरी आपापल्या उपास्याच्या ठिकाणीं एकांतभक्ति व साधनसाहित्य अवश्य अशी यांच्या मनाची घडण असल्यामुळें सर्वांनीं भक्तिपंथाचा प्रसार करण्याचें एक कार्य अविरोधानें केलें. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं महाराष्ट्रांत शंकराचीं मंदिरें अधिक होतीं, पण उत्तरोत्तर **वैष्णवपंथ** वाढत चालल्यामुळें रामकृष्णोपासना बळावली. शिवोपासकांना मराठी भाषेनें **शिवलीलामृत** हा ग्रंथ दिला, व दत्तोपासकांची सोय **गुरुचरित्र** ग्रंथानें लावली. शिव व दत्त या दोन उपासनांशिवाय महाराष्ट्रांत भवानीच्या उपासनेचीं स्थानें माहूर उर्फ मातापूर, तुळजापूर, कोल्हापूर व सप्तशृंगी हीं होतीं. रामदासस्वामी व शिवाजी महाराज यांची कुलस्वामिनी तुळजापूरची भवानी. तथापि या उपासनेनें मराठी भाषेला एखादा मोठा व लोकप्रिय ग्रंथ दिलेला नाहीं. महाराष्ट्रांत मोठी व सर्वलोकप्रिय अशी उपासना म्हणजे विष्णूची; अर्थात् विष्णूचे राम व कृष्ण हे जे दोन मुख्य अवतार त्यांची. यांपैकीं रामाचे एकनिष्ठ उपासक रामदास व कृष्णाचे म्हणजेच विठ्ठलाचे उपासक बाकीचे बहुतेक मराठी संतकवि. तथापि 'रामकृष्णहरी' या सामान्य मंत्रानें रामकृष्ण यांत भेद ठेवला नाहीं. हरिहरांतही भेद नाहीं

उपसनाभेदानें सिद्धांतभेद न होता मराठी कविता अफूट (एकरूप) राहिली.

## चार काळ

४ भागवत धर्माचा उर्फ भक्तिपंथाचा प्रसार करण्यासाठीं लोकोद्धारक बुद्धीनें आमच्या सत्कवींनीं आपली वाणी खर्चिली व मराठी कविता जन्मास आली व विस्तार पावली. कालानुरोधानें पाहतां:--

१ ज्ञानेश्वरकालीन
२ एकनाथकालीन
३ तुकारामरामदासकालीन
४ मोरोपंतकालीन

असे प्राचीन मराठी कवितेचे चार काल धरिले ह्मणजे यांत सुमारें साहाशें वर्षांचें वाङ्मय येतें. आतां याचा आपण अधिक ऊहापोह करूं.

## ज्ञानेश्वरांचा काळ.

५ शके ११११० च्या सुमारास मुकुंदराजाचे विवेकसिंधु व परमामृत हे दोन ग्रंथ झाले. यांत विवेकसिंधु जरा शास्त्रीय धाटीचा असून परमामृत सुबोध व अतिमधुर आहे. ह्यानंतर एक शतकानें ज्ञानेश्वर आले. ज्ञानेश्वरांनीं गीतेवर भावार्थदीपिका नामक टीका नेवासें मुक्कामीं—'श्रीगोदावरीच्या कुळीं । आणि महाराष्ट्र मंडळीं '— श्रीमहालया उर्फ मोहनीराज यांच्या संनिध लिहिली—अथवा सांगितली आणि सच्चिदानंदबावानें लिहून घेतली. तेव्हां रामदेव जाधव हा देवगड (दौलताबाद) येथून महाराष्ट्राचें राज्य करीत होता. त्याच्या काबूत देवगडापासून तो पुणतांबे, नगर, बार्शी—पंढरपूरचा सर्व प्रांत होता. ज्ञानेश्वरी अर्थात् स्वराज्यकालीं स्वराज्यांत झाली व ज्ञानेश्वरांनीं ' जो सकलकलानिवास । न्यायातें पोसी क्षितीश ' याप्रमाणें रामदेव जाधवाचें गौरव केलें आहे. संस्कृतांत अनेक धर्मग्रंथ करणारा हेमाद्रि उर्फ हेमाडपंत रामदेवरावाचा मुख्य मंत्री होता, व भागवत ग्रंथावर चार स्वतंत्र प्रबंध लिहिणारा बोपदेव त्याचा मित्र होता व पंढरपूर येथील विठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धाराचें कार्य रामदेवराव, हेमांडपंत व बोपदेव यांच्या साह्यानें शके ११९५ सालीं म्ह० ज्ञानेश्वरीच्या पूर्वीं सातच वर्षें महाराष्ट्रांतील विठ्ठलभक्तांनीं पुरें केलें होतें हें चौऱ्यांयशीचा ' शिला लेख ' म्हणून जो विठ्ठलमंदिरांत प्रसिद्ध आहे त्यावरून सिद्ध होतें. विठ्ठलाची उपासना महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरनामदेवांच्याही पूर्वींची आहे. आळंदीस एका भक्ताच्या समाधीवर विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति आहेत व तो लेख शके ११३१ मधला आहे. शके ११५९ च्या दुसऱ्या एका शिलालेखांत पुंडलिकमुनि व पंढरिणे (पंढरपुर) महाग्राम यांचे उल्लेख आहेत. चौऱ्यायशीच्या

शिलालेखांत 'स्वस्ति श्रीसकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपुर श्रीविठ्ठलदेवरायासि तिसाविसि फुले दांडे आचंद्रार्क चालावेआ नानाभक्तमालिआं दत्त पैकाका विवरु " असें स्पष्ट मराठी वाक्य आहे. ह्यांत आठ रकानें गद्यान नामक १५ रुपये किमतीचे अर्थात् त्यावेळचा एक तोळा सोनें देणाऱ्यांचीं नांवें देण्यांत खर्ची पडले आहेत. त्यांतील नांवावरून व गांवांवरून महाराष्ट्र, कर्नाटक, तेलगंण वगैरे प्रांतांतील अनेक लोक विठ्ठलांचे उपासक होते असें स्पष्ट दिसतें. अस्तु. ज्ञानेश्वरनामदेवांच्या पूर्वींच विठ्ठलोपासना महाराष्ट्रांत रूढ झाली होती हें सिद्ध आहे. विठ्ठल म्ह० कृष्ण. तेव्हां कृष्णभक्तीनें ओतप्रोत भरलेला ग्रंथ ज्ञानेश्वरी हा कृष्णाच्या (विठ्ठलाच्या) नगरींत भक्तमंडळांत प्रिय झाला यांत नवल नाहीं. त्यावेळीं पंढरपुरांत अत्यंत प्रेमळ सगुणभक्त नामदेव हे गाजून राहिले होते. ज्ञानेश्वरांच्या समागमांत नामदेव आले व ज्ञान-देव व नाम-देव एक होऊन नामासहित ज्ञानाचा-सगुणनिर्गुणाचा एकभाव होऊन पंढरीस भागवतधर्म बळावला व अद्वैतभक्तीचा जयजयकार सुरू झाला. ज्ञानेश्वरांचे शिष्य विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरु झाले, अर्थात् ज्ञानदेव हे नामदेवांचे परमगुरु झाले. ज्ञानदेवनामदेव एकमय होऊन महाराष्ट्रभक्तमंडळ त्यांच्या प्रेमांत आलें व ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हरिपाठादि अभंग हें रचणारे ज्ञानेश्वर हे ह्या भक्तमंडळाचें मेरुमणि झाले. **ज्ञानेश्वरांच्या प्रभावळींत त्यावेळीं भक्तभाविक कोण कोण** आले ते आपण पाहूं. आधीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई हीं भावंडें; कान्हो पाठक, विसोबा खेचर, नामदेव, त्यांचें सर्व पंधरा सोळा मंडळींचें कुटुंब नामदेवांची दासी जनाबाई; व गोरोबा कुंभार, सावतामाळी, नरहरि सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जोगा परमानंद, जगमित्र नागा, चोखामेळा, 'चोखयाची म्हारी' म्ह० चोखोबाची बायको व तिचा भाऊ बंका महार हीं सर्व मंडळी ज्ञानेश्वरांना अत्यंत मानीत, ते त्यांचे प्राण होते. सर्वांचे ज्ञानोबामाउलीवर अत्यंत प्रेमळपणाचे उद्गार निघालेले आहेत. सर्व विठ्ठलाचे निस्सीम भक्त, सर्वांचें विठ्ठलावर व पंढरपूरच्या भागवतधर्मावर अत्यंत प्रेम; सर्व एकरूप झालेले. प्रत्येकाचे थोडे फार अभंग उपलब्ध झालेले आहेत. खचित धन्य तो महाराष्ट्राच्या इतिहासांतला काळ कीं ज्यावेळीं महाराष्ट्रभूपति रामदेवराव जाधव, त्याचे मंत्री हेमाडपंत, तत्कालीन पंडित बोपदेव, ज्ञानेश्वरांचे जनक ज्ञानेश्वरमहाराज, सगुणभक्ताग्रणी नामदेवराव, स्त्रीमंडळापैकीं मुक्ताबाई, जनाबाई व चोखोबाची स्त्री व सर्व अठरापगड जातींचे लोक भेदभाव विसरून ' जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा' याप्रमाणें सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवून अभेदभक्तीचा महानंद भोगीत व जगाला विठ्ठल-देवरायाच्या कृपाछत्राखालीं महासुखानें गात नाचत व त्या महासुखांत 'विरत

विरत आंगे मनें.' ह्या भागवतधर्माचें रहस्य ज्ञानेश्वरांच्या मुखानें थोडें ऐकूं:—

माझिये भक्तीवीण । जळो तें जियालेपण ।
अगा ! पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ? ॥
उत्तमत्व तेंचि तरे । तेंचि सर्वज्ञता सरे ।
जें मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥
ह्मणोनि कुळजातिवर्ण । हे आघवेंचि का अकारण ।
एथ अर्जुना माझेंपण । सार्थक एक ॥
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ।
जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥
या लागीं पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना ।
मातें भजतां सदना । माझिया येती ॥ (ज्ञाने० अ० ९)
ऐसे जे निजमनीं । खेळत सुखें त्रिभुवनीं ।
जगद्रूपा मनीं । सांठवूनि मातें ॥
जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ।
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ (ज्ञाने० अ० १०)
मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें ।
मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजति ॥ (ज्ञाने० अ० १३)
मी एकवांचून कहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं ।
सोहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥
सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळ जैसा पाणिया ।
तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ (ज्ञाने० अ० १८)

अद्वैतभक्तीचें हें मर्म आहे. नामसंकीर्तन हें मुख्य साधन सर्व संतांनीं एकमतानें सांगितलें आहे. त्याबद्दल ज्ञानेश्वर म्हणतात—

माझेनि नामघोषें । नाहींच करिती विश्वाचीं दुःखें ।
अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥
रायारंका पाड धरूं । नेणती सानेयांथोरां कडसणी करूं ।
एकसरें आनंदाचे आवारू । होत जगा ॥
कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळातें विसरले ।
कीर्तनसुखें सुखावले । आपणपांचि ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे निखिल प्रबंध ।
माजीं आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ (ज्ञाने० अ० ९)

भागवतधर्मांत स्वधर्मानुष्ठान चोख करण्यास सांगितलें असून भगवत्प्रीत्यर्थ कर्मयोगाचें आचरण सांगितलें आहे:—

 म. अं. सं. ग्रं

म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥
म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञयाजन ।
जो करी तया बंधन । कहींच न घडे ॥
तुम्हां वर्णविशेषवशें । आम्हीं जो स्वधर्म विहिला असे ।
यातें उपासा मग आपैसे । पुरती काम ॥
देखा विहित क्रियाविधि । निर्हेतुका बुद्धि ।
जो असतिये समृद्धी । विनियोग करी ॥
गुरुगोत्र अग्नि पूजी । अवसरीं भजे द्विजीं ।
निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें ॥
हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें ।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥
म्हणोनि स्वधर्में जें अर्जे । तें स्वधर्मेंचि विनियोगिजे ।
मग उरे तें भोगिजे । संतोषेंसीं ॥
एथ वडिल जे करिती । तया नाम धर्म ठेविती ।
येर तेंचि अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥
हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनि कर्म न संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ॥
जे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था ।
रक्षणीय सर्वथा । म्हणवूनियां ॥
मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिक नोहावें । लोकांप्रती ॥ (ज्ञाने० अ० ३)
म्हणोनि फळीं लाग । सांडोनि देहसंग ।
कर्में करावीं हा चांग । निरोप माझा ॥
तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा होय अपारा । तोषालागीं ॥ (ज्ञाने० अ० १८)

-भागवतधर्मांत वर्णाश्रमधर्म व जातिधर्म मोडण्याची आज्ञा नाहीं, संकराला येथें थारा नाहीं- भागा आला तो व्यवसाय कृष्णार्पणबुद्धीनें करावा - कोणीही परधर्म आचरूं नयेः—

या लागीं कर्म आपुलें । जें जातिस्वभावें असे आलें ।
तें करी तेणें जितिलें । कर्मबंधातें ॥
जें विहित जया जेणें । फिटे संसाराचें धरणें ।
क्रिया कठोर तरी तेणें । तेचि करावी ॥

विठ्ठलभजनीं समरस झालेले भक्तही आपापले व्यवसाव व जातिधर्म पाळीत असतां ‘ जनी जाय शेणासाठीं । उभा आहे तिच्यापाठीं. ’ जनाबाईसंगें देव दळणकांडण करी, तिचें न्हाणेंधुणें करी, तिच्याबरोबर गोवऱ्या वेंचूं लागे, सांवता माळ्याबरोबर बाग खुरपूं लागे, इ. प्रेमळ कथांचें रहस्य हेंच आहे कीं, हे भक्त देवाचें गाणें त्याच्या रूपीं तल्लीन होऊन गात गात आपापलीं कर्मे आनंदानें करीत. ‘ नामदेव कीर्तन करी । पुढें नाचे पांडुरंग ’ याचें हेंच रहस्य आहे. पुढील गोड अभंग पहा:—

१

एकलीच गाणें गातां । दुजा साद उमटतां ॥ १ ॥
कोण गे तुझे बरोबरी । गाणें गातो तुझे घरीं ॥ २ ॥
अंतरींच विचारितां । देव दिसे तया भक्ता ॥ ३ ॥
खूण कळली नामदेवा । विठ्ठल भुले जनिच्या भावा ॥ ४ ॥

२

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥
मोट नाडा विहिर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥ ३ ॥
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोविला गळा ॥ ४ ॥

३

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ॥ १ ॥
देह बागेसरी जाण । अंतरात्मा नाम सोनें ॥ २ ॥
त्रिगुणाची करूनि मूस । आंत ओती ब्रह्मरस ॥ ३ ॥
जीवशिव करूनि फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी ॥ ४ ॥
विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केले चूर्ण ॥ ५ ॥
नरहरि सोनार हरिचा दास । भजन करी रात्रंदिवस ॥ ६ ॥

भक्ति आणि काव्य यांचें किती उत्कृष्ट एकीकरण या साध्या उद्गारांत सांठवलें आहे बरें ! द्वैतांत अद्वैत, सगुणांत ब्रह्मज्ञान, याबद्दल नामदेवांचा एकच अभंग देतों:—

तूं अवकाश मी भूमिका । तूं लिंग मी साळुंका ।
तूं समुद्र मी चंद्रिका । स्वयें दोन्ही ॥ १ ॥
तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजिरी ।
तूं पांवा मी मोहरी । स्वयें दोन्ही ॥ २ ॥
तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिणी ।
तूं कृष्ण मी रुक्मिणी । स्वयें दोन्ही ॥ ४ ॥

तूं नदी मी थडी । तूं तारूं मी सांगडी ।
तूं धनुष्य मी भातोडी । स्वयें दोन्ही ॥ ४ ॥
नामा म्हणे पुरुषोत्तमा । स्वयें जडलों तुझ्या प्रेमा ।
मी कुडी तूं आत्मा । स्वयें दोन्ही ॥ ५ ॥

या गोड अभंगांत नाना दृष्टांत देऊन नामा देवाशीं आपला जडलेपणाचा आनंद व्यक्त करीत असून 'स्वयें दोन्ही' या पदांत त्यांनीं नामा व देव ( नाम व देव ) दोन्ही रूपांनीं एक देवच नांदत आहेत असें सुचविलें आहे. परमात्माच विठ्ठलरूपानें विश्व भरून राहिला आहे असा सर्व संतांचा अद्वैत-भाव आहे. यावर श्रुतिप्रतिपाद्य ब्रह्म कोणीकडे व लहान देवाची मूर्ति कोणी-कडे; अर्थात् ब्रह्मज्ञानाची मूर्तिपूजेसी सांगड कशी घालायची, अशी कोणी शंका घेईल तर त्यास ज्ञानोबारायांनीं अमृतानुभवांत विचारलें आहे कीं:—

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरू ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा ? ॥ प्र० ९–४१ ॥

डोंगरांतील एखाद्या कोरीव लेण्यांत एकाच खडकाचे देव, देऊळ व परिवार असे प्रकार करितां येतात, त्याप्रमाणें एका चिदात्मभावांत देव, भक्त व भजन असा त्रिप्रकार कां करितां येऊं नये ? तात्पर्य, ब्रह्मबोधाला धक्का लागूं न देतां सगुणाची उपासना करितां येते. असो. ज्ञानेश्वरकालीन ह्या सर्वजातीय भक्तांच्या संमेलनानें भागवतधर्म महाराष्ट्रांत दृढमूल झाला व दूरवर पसरला.

## एकनाथांचा काळ.

६ ज्ञानेश्वरानंतर तीनशें वर्षांनीं एकनाथ आले. त्यांच्या पूर्वीं भागवताच्या दशमावर ओवीबद्ध ग्रंथ करणारा बहिरा पिसा, **उमाहरण** लिहिणारा चोंभा, गुरुचरित्राचे कर्ते प्रख्यात सरस्वतीगंगाधर ( गुरुचरित्र श. १३८० ), नाथांचे पणजे भानुदास व गुरु जनार्दन स्वामी इ० संत व कवि झाले व त्यांनीं नाथांचा काळ जवळ आणला. ह्या काळांतले महाभागवत व आपल्या सोज्वल चारित्र्यानें व अफाट ग्रंथनिर्मितीनें ज्यांनी भागवतधर्माला उजाळा दिला असे महापुरुष एकनाथ (शके १४५०–१५२०) हेच होत. जनार्दन स्वामींचे शिष्य तीन. जनीजनार्दन, रामाजनार्दन व एकाजनार्दन. त्यांत एकाजनार्दन हे ह्या काळचे ज्ञानेश्वरच होत. बृहद्ग्रंथप्रसवशक्तीच्या दृष्टीनें पहातां सर्व मराठी कर्त्यांत **दासोपंतांचा** हात कोणीही धरणार नाहीं. यांची गीतेवर जशी सव्वा लाख ओवी आहे तशीं यांची पदेंही सव्वा लक्ष आहेत असें म्हणतात ! अवधूतराज, ग्रंथराज, वाक्यवृत्ति, पंचीकरण इ० प्रकरणें, स्तोत्रें, आरत्या, अष्टकें इ० कविता अफाट व दुर्गम आहे. दासोपंतांना एक ढबूची शाई व एक संबंध लेखणी रोज लागे. लेखन व्यवसायाशिवाय यानें जन्मांत कांहींच केलें नाहीं असें दिसतें. यानें कांहीं

संस्कृत ग्रंथही लिहिले आहेत. याच्या कवितेंत कांहीं भाग उत्कृष्ट आहेत पण याचा प्रचंड ग्रंथार्णव ओलांडून जाण्याचें आपले सामर्थ्य एका तरी वाचकानें आजवर नुसतें जोखलें असेल कीं नाहीं हें मनांत आणूनच मोरोपंतांसारख्या मार्मिक कवीनें लिहिलें आहे:—

दासोपंतीं केला गीतार्णव मानवा ! सवा लाख ।
ग्रंथ परम दुस्तर तो, न तयाचि–जसें न वासवाला ख ॥

बालबोध ग्रंथ लिहिणारे सप्तशृंगीच्या देवाचे उपासक त्र्यंबक; पंचोपाख्यान, सिंहासनबत्तिशी व वेताळपंचविशी, चालकनीति. अश्वचिकित्सेसंबंधीं शालिहोत्रग्रंथ इ० ग्रथ लिहिणारा खानदेशांतील महालिंगदास, मल्हारीमाहात्म्याचा कर्ता सिद्धपालकेसरी, रामायणयुद्धकांड लिहिणारा कृष्णदास मुद्गल, कथाकल्पतरूनामक विस्तृत ग्रंथ लिहिणारा कृष्णयाज्ञवल्की, योगवासिष्ठ व चित्सदानंदलहरनिामक गीतेवर ज्ञानेश्वरीभाष्यानुसार टीका लिहिणारा रंगनाथ मोगरेकर, समग्र महाभारतावर ओवीबद्ध टीका लिहिणारा विष्णुदास नामा, विठा रेणुकानंदन इ० अनेक मराठी कवि हे एकनाथांचे समकालीन होत.

७. सर्व समकालीन सत्कवींत, इतकेंच नव्हे तर सर्व महाराष्ट्रीय सत्कवींत एकनाथ हे अनेक दृष्टींनीं अलौकिक आहेत. नाथांचा गृहस्थाश्रम हा संसारी लोकांपुढें अत्यंत दिव्य आदर्श आहे. नाथांनीं संसार ब्रह्मरूप केला. नाथांच्या साधुत्वाच्या गोष्टी. त्यांची अलौकिक भूतदया, त्यांची अगाध गुरुभक्ति, त्यांची अतुल शांति, त्यांची समदृष्टि, इ० त्यांच्या अंगच्या दिव्य गुणांची छाप जनतेवर बसली, व त्यांच्या आचरणानेंच त्यांनीं भागवतधर्म जगास शिकविला ! त्यांच्या आचारांत व विचारांत, चित्तांत व वाचेंत, भागवतधर्म लोकांस पहावयास सांपडला. महार आणि वडार, वेश्या आणि चोर यांनाही त्यांनीं आपल्या समप्रेमानें मोहिलें व उद्धरिलें. निंदकछलकांनाही गुरुमाउली म्हणून आवडून घेणारा महापुरुष एकनाथच! "Let the dogs bark, they dare not harm my reputation" असें म्हणणारा डॉ. जान्सन वीर खरा; "Censure is the tax which a man pays to the public for being eminent, it is folly for a wise man to think of escaping it and a weekness to be affected by it." असा उपदेश करणारा ॲडिसनही वीर खरा; पण 'निंदक कामाचा कामाचा। गडी आत्मारामाचा' असें ह्मणून निंदकालाही प्रेमानें गुरु मानणारा एकनाथ–ही अभेदभक्ताची कोटी कांहीं और आहे !

शिष्याचे क्षोभ न साहवती । निंदकांची निंदा न जिरे चित्तीं ।
तैं तो कोरडाचि परमार्थी । क्षोभें निश्चितीं नागवला ॥ १ ॥

येणेंचि निर्धारें गुरु तो गुरु । आह्मां शिष्य तोहि संवादगुरु ।
निंदक तो परम गुरु । निपराध सद्गुरु जनार्दनकृपा ॥ २ ॥
कथा निंदितीं वंदिती जनीं । तें माउली माझे दोन्ही ।
तो निंदक सखी जननी । मजलागुनी कृपाळू ॥ ३ ॥
निंदा म्हणजे परमामृत । निंदा निर्द्वंद्व सुखस्वार्थ ।
निंदक न पाहे निजस्वार्थ । अतिसमर्थ परोपकारी ॥ ४ ॥

काशीच्या कावडींचें गंगाजळ उन्हांत तळमळणाऱ्या गाढवाच्या तोंडांत घालून 'माझा रामेश्वर मला येथेंच भेटला' असें ह्मणून लोकांचें समाधान करणें, पितरांसाठीं तयार केलेलें अन्न महारापोरांस आनंदानें वाढणें, यवनाचें १०८ वेळां अंगावर थुंकणें सहन करून आपल्या निर्द्वंद्वतेनें त्यालाच अखेर अनुतापयुक्त करून पायांशीं आणणें, सजातीय कर्मठांचा छळ सोसूनही त्या भूदेवांच्या चरणीं नमणें, इ० अनेक चरित्रांत जो भागवतधर्माचा जयजयकार झालेला आहे तोच नाथांच्या वाणींतूनही बहारीनें प्रगट झाला आहे. अन्नसंतर्पणानें हजारों देहांना सुख देणें, व ज्ञानान्नभोजनानें हजारों जीवात्मे तृप्त करणें याप्रमाणें भूतसेवेंत अहोरात्र काया चंदनाप्रमाणें झिजवीत असतांही ह्या महात्म्याच्या हातून ६०।७० हजार अव्वल दर्जाची ग्रंथसंपत्ति निर्माण झाली ही केवढी नवलाची गोष्ट आहे! महाराष्ट्राचें व मराठी भाषेचें हें केवढें भाग्य आहे? नाथांचा पहिला ग्रंथ चतुःश्लोकी भागवत हा त्यांच्या पहिल्या पंचविशींतला असून--

शब्दापुढें ज्ञान धांवे । ओवीपुढें अर्थ पावे ॥
जे जें जीवीं विवंचावें । तें तें अवघें ग्रंथार्थ होय ॥

अशी गुरुप्रसादाची गंगा त्यांच्या मुखानें वाहूं लागली. त्यांचा मुख्य ग्रंथ 'एकनाथी भागवत.' हा अत्यंत लोकप्रिय आहे. नाथभागवत २० हजार, भावार्थरामायण ४० हजार, रुक्मिणी स्वयंवर १७०० चतुःश्लोकी भागवत १ हजार, याशिवाय आनंदलहरी, स्वात्मसुख, शुकाष्टक, हस्तामलक, इ० स्फुट प्रकरणें मिळून नाथांची ६५ हजार ओवीबद्ध ग्रंथसंख्या आहे. याशिवाय त्यांचे अभंग, पदें व इतर भारूड मिळून पांच हजार अभंगांचा गाथा प्रसिद्धच आहे. ज्ञानोबांची ओवी ३॥ चरणी व नाथांची ४ चरणी आहे. पहिली आटपशीर व दुसरी प्रशस्त. दोघांच्याही वाणींत भगवत्प्रसाद सारखाच ओतप्रोत भरला आहे. नाथांचे भागवत, रुक्मिणीस्वयंवर, चिरंजीवपद, हे ग्रंथ चिरंजीवच आहेत. नाथांचे भारूड फार मौजेचें आहे. मुरळी, रोडगा, जोहार, बाळसंतोष, भूत, विंचू, कांडण, फकीर, पांखरूं, झोंप, मुका, होळी, वासुदेव—प्रत्येक वस्तूंत आत्मदृष्टीनें पाहण्याचा त्यांचा

हेतु उदात्त आहे. एकनाथांच्या परंपरेंतच कृष्णदयार्णव, सप्तशती लिहिणारे उत्तमश्लोक, देवनाथ वगैरे अनेक सत्कवि झाले आहेत.

## मुक्तेश्वर.

८ नाथांचे पणजे भानुदास व नातु प्रसिद्ध कवि मुक्तेश्वर. एकाच घराण्यांत भानुदास, एकनाथ व मुक्तेश्वर असे तीन लोकमान्य पुरुष निपजले व त्या तिघांनींही मराठी वाङ्मयांत शाश्वत स्थान मिळविलें ही गोष्ट अपूर्व आहे. **मुक्तेश्वर** हा एका दृष्टीनें मराठी कवींत अनुपम आहे. मुक्तेश्वराचें रामायण सामान्यांपैकीं आहे पण त्याचें त्रुटित भारत आहे तें रसपूर्ण आहे. याच्या भारताचीं पहिलीं चार व पुढलें एक सौतिकपर्व अशीं पांचच पर्वें उपलब्ध आहेत. **मराठींत महाभारतावर एकंदर २० कवींनीं पद्यरचना केली आहे.** त्यांत कांहींनीं समग्र भारतावर कविता केली असून कांहींनीं कांहीं पर्वेंच तेवढीं लिहिलीं आहेत. विष्णुदास नामा याचें आदिपर्व, मुरारीकृत भीष्मपर्व व गोपाळकृत भारत हीं मीं पंढरपुरास पाहिलीं आहेत. माधवकृत सबंध भारत तेंडुलकरांनीं पाहिलें होतें. शुभानंदकृत उद्योगपर्व व भीष्मपर्व, नरहरी मोरेश्वराचीं १।२ पर्वें काव्यसंग्रहकारांनीं छापलेलीं आहेत. रामचंद्रबोवा रामदासीकृत कांहीं पर्वें, सामाज्यवामनकृत विराटपर्व, जिवाशिवाकृत भारत, चंद्रदास मुद्गलकृत उद्योगपर्व, मैराळकृत विराटपर्व, बाळकृष्णनाथ राजूरकर यांचें उद्योगपर्व वगैरे अनेक कवींचीं अनेक भारतें आहेत. यांपैकीं **तीन लोकप्रसिद्ध व लोकप्रिय आहेत** मुक्तेश्वरी भारत, मोरोपंती भारत व श्रीधरकृत पांडवप्रताप. श्रीधराच्या ग्रंथावर मुक्तेश्वराची छाया आहे. राहिलीं दोन. मुक्तेश्वर व मोरोपंत यांचीं. दोन्हींही सुंदर आहेत. मुक्तेश्वराचीं सृष्टिवर्णनें मराठी वाङमयांत अतुलनीय व अत्युत्कृष्ट आहेत. याचीं मल्लयुद्धें किंवा कुस्त्या यांचीं वर्णनें रेखीव आहेत, स्वभावचित्रें हुबेहूब आहेत. शुकरंभासंवाद व हरिश्चंद्राख्यान हीं स्फुट प्रकरणें सुंदर आहेत. कवित्वाच्या व वर्णनशैलीच्या दृष्टीनें मुक्तेश्वर अनुपम आहे, त्याची वाणी ठसठशीत व शब्दरचना समर्पक व प्रेमळ आहे. वर्षाकाळासारखा त्याचा वाक्प्रवाह वाचकांचीं मनें हरण करून नेतो. मोरोपंतांची वाणी कमावलेली व संस्कृतप्रचुर आहे, मुक्तेश्वराची सहजमनोहर व अस्सल मराठी आहे. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, रामदास व तुकाराम यांच्या भाषेंत मराठी भाषेचा अस्सलपणा अधिक दिसतो. मुक्तेश्वराचे समकालीन **शिवकल्याण.** त्यांची ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावर ओवीबद्ध टीका प्रसिद्ध आहे. यांनीं भागवतावर एक लक्ष ओंवी लिहिली असून त्यांच्या दशमस्कंधापैकीं कांहीं प्रकरणें छापलेलीं आहेत. यांची वाणी अधिकारसंपन्न, प्रौढ व रसाळ आहे. **रमावल्लभ**

-अदास यांनीं मराठी भाषेबरोबर कृष्णभक्तीचा झेंडा कारवारकडे नाचविला. यांची गीतेवरची 'चमत्कारी' टीका नुकीच प्रसिद्ध झाली आहे. यांचीं कृष्णजन्मकथा व वाक्यवृत्ति हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांचीं पदेंही फार प्रेमळ आहेत. मृत्युंजयस्वामींचेंही अमृतसार वगैरे ५।६ ग्रंथ आहेत. जुन्नरचा लोलिंबराज यानें संस्कृतांत वैद्यजीवन नामक ग्रंथ लिहिला असून मराठींतही यानें भागवताच्या दशमस्कंधावर टीका लिहिली आहे.

## तुकाराम व रामदास.

९ मुक्तेश्वरानें 'महाराष्ट्र जे सर्व राष्ट्रांसि राजे। जयाच्या भयें व्यापिले देव लाजे' असें मोठ्या प्रौढीनें महाराष्ट्राच्या प्रतापाचें जें वर्णन केलें त्याचें प्रत्यंतर जगास लवकरच आलें. शिवछत्रपतींचा काळ समीप आला. शके १५२० ला एकनाथ निजमंदिरीं पहुडले व दहाच वर्षांनीं ह्म० शके १५३० सालीं पुण्यप्रांतीं इंद्रायणीच्या तीरीं तुकाराम व गोदातीरीं रामदास जन्मास आले. या उभयतांचीं चरित्रें व कविता लोकांच्या चांगलीच परिचयाची आहे. दोघे समकालीन, पण तुकोबांच्या अवताराची समाप्ति शके १५७२त ह्म० वयाच्या ४२व्या वर्षीं झाली व त्या पुढील ३० वर्षांत समर्थांची खरी कामगिरी जगापुढें आली. महाराष्ट्रांतला भयाण दुष्काळ दोघांनींही आपल्या वयाच्या २१ व्या वर्षीं पाहिला. या वर्षीं दुष्काळांत तुकोबांचें स्त्रीपुत्र अन्नावांचून मेले व त्यांना वैराग्य होऊन त्यांनीं भंडारा काढला. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवताचीं पारायणें अखंड हरिचिंतन व नामस्मरण यांत अहोरात्र रंगून ते स्वानुभवाच्या पायरीस चढले व पुढें त्यांनीं कीर्तनभक्तीनें व अभंगवाणीनें सारा महाराष्ट्र हालवून सोडला.

दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान। स्त्री एकी अन्नअन्न करितां मेली॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें। वेवसाय देखे तुटी येता॥
देवाचें देऊळ होतें जें भंगिलें। चित्तासी जें आलें करावें तें॥
आरंभीं कीर्तन करी एकादशी। नव्हते अभ्यासीं चित्त आधीं॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरें करोनियां॥
गाती पुढे त्यांचें धरावें ध्रुपद। भावें चित्त शुद्ध करोनियां॥
संतांचें सेविलें तीर्थपायवणी। लाज नाहीं मनीं येऊं दिली॥
टाकला तो कांहीं केला उपकार। केलें हें शरीर कष्टवुनी॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश। धरिला विश्वास दृढ नामीं॥
यावरीया जाली कवित्वाची स्फूर्ती। पाय धरिले चित्तीं विठोबाचे॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात। तेणे मधें चित्त दुखवलें।
बुडविल्या वह्या बैसलों धरणें। केलें नारायणें समाधान॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा। कृपावंत ऐसें कळों आलें॥

ह्या चरणांत वैराग्योत्पत्तीपासून साक्षात्कारापर्यंतचा आपल्या पारमार्थिक जीवनाचा सुंदर दादरच तुकोबांनीं भाविकापुढें उभा केला आहे. पुढचें चरित्र काय सांगावें? 'तुका ह्मणे आतां। उरलों उपकारापुरता' पुढचें सर्व आयुष्य लोकोद्धारार्थच वेंचलें. 'आपण जेऊन जेववी लोकां। संतर्पण करी तुका.' हरिभक्तिसुखाचें परमान्न स्वतः खाऊन ओसंडून वाहणारें सर्व त्यांनीं जगाला दिलें 'वाचा बोलूं वेदनीती। करूं संतीं केलें तें॥' 'पिटूं भक्तीचा डांगोरा कळिकाळासी दरारा। तुका म्हणे करा जयजयकार आनंदें' हें सर्व त्यांनीं केलें व आपल्या हयातींत पुण्यप्रांत व नंतर सारा महाराष्ट्र आपल्या अमृतवाणीनें भिजाविला. तुकोबांची प्रेमळ पण भेदक वाणी सर्वांच्या परिचयाची आहे. त्यांच्या लोकोत्तर वाणीचा ठसा जाणत्या नेणत्या सर्वांच्या अंतःकरणावर पडला आहे.

पारमार्थिक जीवनाच्या सर्व अवस्था व अनुभव त्यांच्या अभंगांत पाहण्यास मिळतात, व ह्मणून ते मुमुक्षूला आरशासारखे सर्वकाळ सन्मुख ठेवावेसे वाटतात. हृदय भक्तिप्रेमानें उचंबळवून भक्तिमहार्णवांत बुडवून टाकण्याचें अद्भुत सामर्थ्य त्यांच्या अभंगवाणींत आहे. दांभिकावर कठोर प्रहार करण्यांत ती जितकी कुशल आहे तितकीच 'देवभक्तनामाविषयीं' ती पराकाष्टेची कोमल आहे. 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे.' श्रोत्यांच्या ठिकाणीं अंतर्मुखता तात्काळ उभी करून कल्याणाचा मार्ग ती दाखविते. मनाच्या तळमळी व समाधान दोन्ही त्यांत दिसतात. 'संवसारतापें तापलों मी देवा' येथपासून तों 'बीज भाजुनि केली लाहा। आह्मां जन्ममरण नाहीं' येथपर्यंत परमार्थमार्गांतले सारे टप्पे तुकोबांच्या अभंगांत आढळतात. कीर्तनसुखाचा महिमा तुकोबांनीं सर्वांपेक्षां अधिक वाढाविला. नामसंकीर्तनाच्या सुखांत विश्व निमग्न केलें, व विठ्ठलभक्तीचा कळस केला.

समर्पिली वाणी। पांडुरंगीं घेते धणी॥
धार अखंडित। ओघ चालियेला नित्य॥

तुकोबांच्या पूर्णतेचा एकच बहारीचा अभंग देऊन समर्थांकडे वळूं:—

रक्तश्वेतकृष्णपीतप्रभाभिन्न। चिन्मय अंजन सूदलें डोळां॥ १॥
तेणें अंजनगुणें दिव्य दृष्टी जाली। कल्पना निमाली द्वैताद्वैत॥ २॥
देशकालवस्तुभेद मावळला। आत्मा निर्वाळला विश्वाकार॥ ३॥
न जाला प्रपंच आहे परब्रह्म। अहंसोहं ब्रह्म आकळलें॥ ४॥
तत्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग। तेंचि जाला अंगें तुका आतां॥ ५॥

शके १५७० च्या सुमारास तुकोबा, समर्थ व शिवराय यांची भेट झाली असण्याचा पूर्ण संभव आहे. तुकोबांच्या कथा ऐकण्यास शिवबा रात्रौ देहू

किंवा लोहगांव येथें जात असत. नाथतुकोबांना भोंवतालीं पसरलेलें यवनी राज्य व त्याचे दुष्परिणाम दिसत होते व धर्मसंस्थापक क्षात्रशिरोमणींची ते वाटच पहात होते. नाथांनीं भागवतांत तुकोबांनाः--

गाईब्राह्मणांसी जाण । पीडा करिती दारुण ।
क्षेत्रवित्तदाराहरण । स्वार्थे प्राण घेताती ॥

असें म्हटलें आहे व लोकांच्या दुःस्थितीबद्दल--

न घडे यावरी न धरवे धीर । पीडितां राष्ट्र देखोनि जग ॥

असें तुकोबांनीं म्हटलें आहे.

ह्या सत्पुरुषांच्या प्रार्थना ऐकूनच कीं काय नारायणानें स्वदेशभक्तीचें वारें तुकोबांच्या आसपास पुण्यप्रांतांतच सुरू केलें व "हिंदवी स्वराज्य श्रींनीं आम्हा दिलें आहे." "हिंदुधर्मासाठीं आह्मीं फकीरी घेतली आहे" अशी गर्जना करणाऱ्या मर्दानें तोरणा किल्ल्यावर स्वराज्याचें तोरण बांधलें. मनू पालटला. रामदासांची टाकळीची तपश्चर्या फळास आली, त्यांनीं आपल्या चळवळीचें केंद्र कृष्णातीर केलें व पुणेंसाताराप्रांत 'स्वराज्यस्वधर्मस्वभाषादिकांच्या' जयजयकारांनीं दुमदुमून गेला सह्याद्रीच्या गिरकंदरांतून स्वराज्याचा डंका वाजूं लागला. भिमथडी गंगथडीचे घोडे सर्वत्र नाचूं लागले. नाथतुकोबांनीं जें समाजशुद्धीचें कार्य केलें त्याला गोड फळें येऊं लागलीं. समर्थांच्या ग्रंथांत त्याचें प्रतिबिंब स्पष्ट पडलेलें आहे. समर्थांनीं अस्मानीसुलतानीचें व परचक्राचें निरूपण केलें आहे. 'अखंड सावधान रे । प्रसंग हा तुफान रे' म्हणून लोकांना जागृत केलें, व--

धीधरा धीधरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।
काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटिचें ॥

असा धीर दिला. शिवरायांची भेट घेऊन त्यांना--

तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ १ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ २ ॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ॥ ३ ॥
देवधर्मगोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ४ ॥

अशा प्रकारें प्रोत्साहन दिलें. शिवबा व त्यांचें वीरमंत्री यांना क्षात्रधर्म, राजधर्म, सेवकधर्म समजावून दिले.

मराठा तितुका मेळवावा । आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ इ० इ०

समर्थांचें मुख्य कार्य श्रीरामाची उपासना वाढविण्याचें तें त्यांनीं रामाचीं मंदिरें उभारून व अनेक ग्रंथ करून जागोजाग मठस्थापना करून केलें. समर्थांचे हजारों शिष्य महाराष्ट्रांत व बाहेरही संचार करीत होते. महाराष्ट्रीयांना तालमींचा शोक पूर्वींपासूनचा, त्यांत मारुतीची स्थापना करून शक्तियुक्ति-भक्ति एकवटण्याचा त्यांचा उपदेश. भवानीच्या स्तोत्रांत ते म्हणतातः—

शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती ॥
सार संसार शक्तीनें । शक्तीनें शक्ति भोगिजे ।
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥

प्रपंच साधून परमार्थ करा, प्रपंचही रडका करूं नका, नेटका करा, सर्वत्र सावधानता ठेवा,दक्ष राहून प्रयत्न करा असा त्यांचा खणखणित उपदेश आहे. ' यत्न तो देव जाणावा' । 'अचूक यत्न तो देवो ' ' देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें ' ' कष्टेवीण फळ नाहीं । कष्टेवीण राज्य नाहीं ' असा त्यांचा प्रयत्नावर भर फार. असो. समर्थांनीं शिवबाच्या राज्याभिषेकानंतर ' **आनंदवनभुवन** ' म्हणून महाराष्ट्राच्या जयजयकाराचें जें स्तोत्र केलें आहे तें आमच्या तरुणांनीं 'वंदेमातरम्' स्तोत्राबरोबर पाठांत ठेवावें. हें राष्ट्रीयस्तोत्र फार उत्कृष्ट आहे. समर्थांची चारपंचमांश कविता इतर सत्कवींच्या कवितेसारखी निव्वळ पारमार्थिक स्वरूपाची आहे.त्यांचा मुख्य ग्रंथ दासबोध. दासबोधाची मांडणी अत्यंत व्यवस्थित आहे. त्यांचे मनाचे श्लोक अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच दोन कांडांचें रामायण, भीमरूपी स्तोत्रें, स्फुट प्रकरणें, करुणाष्टकें, अभंग, पदें वगैरे कविता पुष्कळच आहे. समर्थसंप्रदायांत झालेल्या ग्रंथांत रामीरामदासाचें भक्तिरहस्य, दिनकरगोसावी यांचा स्वानुभवदिनकर व वेणाबाईचें सीतास्वयंवर हे ग्रंथ सुंदर आहेत.

## आख्यानी कवि.

१० **वामनपंडितांची** कविताही पुष्कळ आहे. त्यांची गीताग्रंथावर यथार्थदीपिका नामक प्रौढ व सगुणभक्तीनें भरलेली व पांडित्यप्रकर्षानें विद्वानांसही दिपवणारी उत्कृष्ट टीका आहे. पण वामनांची प्रसिद्धी मुख्यतः त्यांच्या स्फुट प्रकरणांवरून आहे. भरतभाव, भीष्मप्रतिज्ञा, नृहरिदर्पण, बालक्रीडा, वनसुधा, हरिविलास, वेणुसुधा, गोपीगीत, नामसुधा, द्वारकाविजय इ० स्फुट प्रकरणें

इतकीं कमालीचीं सुश्लिष्ट, मधुर, व चित्ताकर्षक आहेत कीं 'प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला' हा मोरोपंतांचा त्यांवरील अभिप्राय अगदीं यथार्थ आहे असेंच वाटतें. वामनाच्या श्लोकांची प्रसिद्धी या प्रकरणांवरूनच आहे. पारिजातकसुमनांचा हार खोलींतून बाहेर नेला तरी खोलींत दरवळलेला परिमळ लौकर जात नाहीं, त्याप्रमाणें वामनी श्लोकांत रमलेलें मन ( श्लोक म्हणायचें सोडलें तरी ) त्यांच्या मधुर निनादांत गुंगतच राहतें. असी लोकोत्तर माधुरी या श्लोकांत भरून वाहत असते. वामन जसे पंडित तसे उत्कट कृष्णभक्तही आहेत. वामनांचीं भाषांतरेंही अनुपम आहेत. भर्तृहरीच्या शतकत्रयांचीं भाषांतरें इतकीं सुंदर आहेत, गंगालहरी इतकी उत्तम साधली आहे कीं 'भाषांतर करावें वामनानेंच' असें म्हणावेसें वाटतें. वामनांच्या लहान प्रकरणांत निगमसार प्रसिद्ध आहे. ह्या सुमारास श्लोकबद्ध आख्यानें बहुत रचिलीं गेलीं त्यांत रघुनाथपंडिताचें नलोपाख्यान, नागेश कवीचें व आनंदतनयाचें सीतास्वयंवर, विठ्ठलाचें व सामराज कवीचें अष्टसर्गात्मक रुक्मिणीस्वयंवर, इ० स्वयंवराचीं आख्यानें फार मनोरम आहेत. हीं सर्व वाचण्यासारखीं आहेत, त्यांत सामराजाचें रुक्मिणीस्वयंवर तर अप्रतिम आहे, हें मराठींतील अत्युत्तम काव्यांपैकीं एक आहे. वामन व हे चार पांच **आख्यानी कवि** यांनीं लांब लांब यमकांचा प्रघात पाडला व त्याचा उत्कर्ष मोरोपंतांनीं पुढें केला. समर्थपंचायतनांतील रंगनाथस्वामी, केशवस्वामी, आनंदमूर्ति, व जयरामस्वामी यांपैकी प्रत्येकाचीं कांहीं स्फुट प्रकरणें व पदें वगैरे आहेत. ही कविताही प्रासादिक आहे. रंगनाथस्वामींचे पुतणे **श्रीधर नाझरेकर** यांचे रामविजय, पांडवप्रताप, हरिविजय, इ० ग्रंथ लोकप्रसिद्ध आहेतच.

## मोरोपंतकालीन कवि.

११ पेशवाईकाळांतला मुख्य कवि मोरोपंत. पण मोरोपंताकडे वळण्यापूर्वीं पांच चार कवींचा विचार करूं. **निरंजनमाधव** उर्फ बनाजी कवि. हा एक कवि प्रतिभासंपन्न भक्त व योगी होऊन गेला. हा पहिले बाजीराव व बाळाजी बाजीराव यांचे आश्रयास होता. पुढें हा नाशकास जाऊन राहिला व आपली स्त्री गंगावती हिच्या बोधार्थ यानें अनेक ग्रंथ केले. याच्या कवितेचीं कविलिखित बाडें मजपाशीं आहेत व याचे (१) सांप्रदायपरिमळ उर्फ आत्मचरित्र हा हजार ओव्यांचा ग्रंथ, ( २ ) वीस सुंदर स्तोत्रें व (३) ज्ञानेश्वरविजय नामक ८०० श्लोकांचा ग्रंथ हे तीन मीं छापून प्रसिद्ध केले आहेत. मराठींत कोणीही न लिहिलेला असा संस्कृत चंपूच्या धाटणीवर यानें एक सुभद्राचंपू लिहिला आहे. यांचे छंदःशास्त्रावर तीन ग्रंथ आहेत. निरंजनमाधवांत मुक्तेश्वराच्या

घाटणीचें कवित्व व कल्पनाचातुर्य असून यांची वाणी सुबोध व प्रसादयुक्त आहे. यांची कविता १६८० ते १६९० मधली आहे. **अमृतराय पैठणकर.** हे औरंगाबादेस नोकरीस असतांना कचेरींत वरिष्ठाचा छळ व घरीं कजाग बायकोशीं प्रसंग या दोन्ही गोष्टींस कंटाळून हे पैठणास जाऊन राहिले व वैराग्यसंपन्न प्रेमळ कीर्तनकार झाले. यांची वाणी अत्यंत मधुर असून कीर्तन-सुखार्थच यांचा अवतार झाला असें लोक मानीत. यांची कविता मुख्यतः कडाका व कटाव या छंदांत असून यांचीं पदेंही प्रसिद्ध आहेत. यांचीं वर्णनें फार ठसठशित असतात. गर्भवासाचें वर्णन, बाळपणचें वर्णन, विषयदुःख-वर्णन, भाग्याचें व दारिद्र्याचें वर्णन, अनेक वस्त्रांचीं व स्त्रियांचीं वर्णनें ऐकतांना श्रोते चित्रासारखे तटस्थ होतात. सुदामाचें आख्यान चाललें कीं "ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करंटा, मुलें भुकेनें करिती तंटा। घरांत वाजे नकारघंटा—" चालला, अस्खलित ओघ चालला आहे! "नऊ मास गर्भांत सांपडे, मलमूत्रादिक फार सांकडें, तनूसि तोडिति जंतूकीडे, बहू श्रमानें बाहेर पडे, स्मरण मुळींचें सर्व विसरला, कोहं कोहं रडूं लागला, दिवसांमासां वृद्धि पावला, क्षणक्षणा अपघात चूकला, धनमदगर्वें फार दाटला, अहंपणाचा पूर लोटला"—अमृतरायांची वाणी म्हणजे पंजाब-मेलचा वेग तिच्यापुढें कमीच! यांचें शुकचरित्र अवश्य पहावें. पैठणचे दुसरे संतकवि **शिवदिनकेसरी.** रायजींना बायको कजाग मिळाल्यामुळें त्यांची स्त्रीविषयक दृष्टि कलुषित झाली व 'बाईल पैशाची पैशाची' इ० उद्गार त्यांचे तोंडून निघाले. शिवदिनांची स्त्री रमाबाई साध्वी व प्रेमळ असल्यामुळें 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला तो नर भला भला' असे त्यांनीं उद्गार काढले व 'प्रपंच परमार्थासि विरोध' असें रायजी म्हणाले! दोघेही आपापल्या अनुभवानें बोलले आहेत व दोघांचेंही म्हणणें खरेंच आहे. रायजी व निरंजनमाधव यांचे या संबंधानें अनुभव पहाः—

( २१० ) अमृतराय स्वस्त्रीचें वर्णन करितातः—

मागें ती लुगडीं, सकाप बुगडीं, आठां दिसां बांगडी,
घालीते फुगडी, कधी न रगडी, फाडीतसे आंगडी,।
खैराची सगडी तशी धडधडी, तोंडाळ मोठी खुडी,
सोन्याच्या लगडीस देखुनि गडी, ऐशी महा धागडी ॥ १ ॥
दारीं देत कडी, सदा कडकडी, बोले महा वांकडी,
दाणे चोरुनि फांकडी न कळतां खाते मुळेकांकडी।
खाते ती जसि माकडी, वसवसी दांतीं दिसे खेकडी
यायोगें अमृतेश्वरासि रुचली गंगातिरीं झोंपडी ॥ २ ॥

(म० ) निरंजनमाधवही स्वस्त्रीचें गौरव करितातः--

तूं तंव भक्तिमती नारी । माझी परमप्रिय सुंदरी ।
म्हणोनि गुरुसंप्रदायकथा विस्तरीं । कथिली म्यां प्रेमें ॥ १ ॥
गौरी शंकराची वल्लभा । किंवा सूर्याची प्रभा ।
अग्निशक्ति शुभा । स्वाहा जैसी ॥ २ ॥
किंवा ब्रह्माणी ब्रह्माची । इंदिरा जैसी विष्णूची ।
प्राणप्रिया आत्मयाची । चित्कळा जेवीं ॥ ३ ॥
जैशी शर्करेची मधुरता । कीं उदकाची शीतलता ।
सुधेची शुभ्रता । नये निवडितां भिन्नत्वें ॥ ४ ॥
तुज मज भिन्नभाव तत्वता । नसोन दिसे बोला पुरता ।
जल लहरी हे वार्ता । उपाधीकृत ॥ ५ ॥

हें चित्र पहा आणि हें चित्र पहा ! या दोहोंत खरें खोटें ठरविणें तें ज्यानें त्यानें आपल्या अनुभवानें ठरवायचें आहे ! !—**सोहिराबा आंबिये** ( शके १६३६–१७१४) हे सांवतवाडीप्रांतीं वांदें गांवीं जन्मलेले सारस्वत ब्राह्मण. हे मोठे योगी व साधुपुरुष होऊन गेले. यांची बहुतेक कविता यांच्या बहिणीनें लिहून घ्यावी. संसाराची घडी विसकटल्यावर हे उत्तर हिंदुस्थानांत यात्रेसाठीं गेले. हे प्रेमळ कीर्तनें करीत. महादजी शिंदे यांनीं देऊं केलेली जहागीर यांनीं निरिच्छपणें नाकारली यांची कविता अध्यात्मपर स्वतंत्र आहे. अक्षयबोध, महदनुभवेश्वरी, पूर्णाक्षरी, अद्वयानंद व व सिद्धांतबोध असे यांचे पांच वेदांतपर ग्रंथ आहेत. यांचा सिद्धांतबोध हा ग्रंथच अधिक प्रसिद्ध असून याची ओवीसंख्या सुमारें पाच हजार आहे. पांचही ग्रंथ मिळून सुमारें १७।१८ हजार ओवी आहे. यांची वाणी प्रौढ व प्रसन्न असून परिणामकारी आहे. यांचीं पदें प्रासादिक व प्रेमळ असून रागदारीवर बसविलेलीं आहेत. यांची ग्रंथरचना बहुतेक श. १६७० ते १६८० च्या मधली आहे. **महिपतिबोवा ताहराबादकरः**– महाराष्ट्राचे प्रमुख संतचरित्रकार महिपति. यांनीं महत्प्रयासानें शेदीडशें संतांच्या चरित्रांची सामुग्री मिळवून ती अत्यंत प्रेमळवाणीनें लिहिलेलीं प्रसिद्ध आहेत. यांचे भक्तिविजय व भक्तलीलामृत, संतविजय व संतलीलामृत असे संतचरित्रपर चार ग्रंथ असून त्यांची संख्या ३० हजारांवर आहे. हे ग्रंथ शके १६८४ ते १६९६ या बारा वर्षांत लिहिले गेले आहेत. याशिवाय कथासारामृत, पंढरीमाहात्म्य, व इतर १०।१२ छोटीं प्रकरणें आहेत. पूर्वी उद्धव चिद्धनानें कांहीं त्रोटक चरित्रें लिहिलीं होतीं तीं पाहून व नाभाजीचीं संतचरित्रें पाहून यांनाही संतचरित्रें लिहिण्याची स्फूर्ति झाली. तुकाराममहाराजांचा यांना

स्वप्नोपदेश होता. यांची वाणी अत्यंत प्रेमळ, वर्णनें रसभारित असून संतचरित्रांची गोडी महाराष्ट्रीयांस लावण्याचें श्रेय मुख्यतः महिपतबावास आहे. **देवनाथ व त्यांचे शिष्य दयाळनाथ** हे वऱ्हाड प्रांतांतील सत्पुरुष. यांचीं पदें अत्यंत लोकप्रिय व प्रसिद्ध आहेत. रंगनाथस्वामी, केशवस्वामी, मध्वमुनीश्वर, शिवदिनकेसरी, अमृतराय, महिपति उज्जनकर, सोहिरोबा, देवनाथ, दयाळनाथ विठोबाआण्णा, कृष्णंभट बांदकर इ० सत्कवींचीं पदें फार बहारीचीं आहेत.

## मोरोपंत

१२ स्वराज्यकाळांतील शेवटले महाकवि मोरोपंत (इ०स० १७२९–१७९४) हे होत. बारामति येथें कऱ्हानदीच्या तीरीं बाबूजीनाईक बारामतिकरांच्या आश्रयानें गरीबींत जन्मभर राहून यांनीं सुमारें ७० हजार रसालंकारांनीं युक्त अशी सुरस कविता रचून मराठी भाषेच्या अभियुक्ततेंत भर टाकली. मोरोपंतांची कविता माधवचंद्रोबा, काव्यसंग्रहकार, व शेवटीं पराडकर यांनीं छापून प्रसिद्ध केली. पंतांचें संस्कृतचें व विशेषतः साहित्यशास्त्राचें अध्ययन उत्कृष्ट होतें. त्यांनीं स्वहस्तानें लिहिलेल्या संस्कृत ग्रंथांची शकवार यादी मीं आपल्या मोरोपंतांच्या चरित्रांत प्रसिद्ध केली आहेच. त्यांची भाषा प्रायः ‘ प्राकृतसंस्कृतमिश्रित ’ आहे. पंत कुटुंबवत्सल कवि यामुळें संसारसुखाचीं व कौटुंबीय नीतीचीं सुंदर शब्दचित्रें त्यांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं सांपडतात. पंतांच्या कोमल, सात्विक व रामभक्तिप्रवण हृदयाची ओळख त्यांच्या काव्यावरून पडते. त्यांचा मोठा ग्रंथ महाभारत. यावर त्यांनीं १७ हजार आर्या रचिल्या आहेत. यांनीं रामायण १०८ वेळां विविधवृत्तांत गायिलें आहे. त्यांतील थोडी क्लिष्ट रचना वगळून पाहिलें तर एकंदर कवितेंत सहज ओघ,उत्कट भक्ति पूर्ण प्रसाद आहे. रामायणांत मंत्ररामायण, छंदोरामायण, सीतारामायण, गुरुरामायण, इत्यादि अनेक रामायणें फारच बहारीचीं उठलीं आहेत. पंतांनीं सुमारें ४० हजार कविता आर्यावृत्तांत व २५ हजार विविधवृत्तांत लिहिली असून ती निर्दोष, शब्दचमत्कारवती, सरस व प्रसादयुक्त आहे मुलींना झोंपाळ्यावर बसून म्हणतां यावींत म्हणून सीता सावित्री व रुक्मिणी यांवर तीन गीतें लिहून त्यांनीं स्त्रीशिक्षणाचें अंग संभाळलें आहे. काशीयात्रा प्रसंगांत नानातीर्थक्षेत्रांवर केलेली एक हजार कविता संतकवींच्या गौरवार्थ लिहिलेली सन्मणिमालादि सुंदर प्रकरणें, संशयरत्नावलि, नामसुधाचषक इत्यादि सुरस भक्तिसंयुत सुरसकल्पनामय प्रकरणें व सर्वांवर कळस म्हणजे त्यांची लोकप्रसिद्ध अत्यंत सुरस व त्यांच्या काव्यगुणांची मूस अशी केकावली, ही सर्वस्वी स्वतंत्र आहे. भक्तांच्या कवितेंत भक्तिरसाच्या खालोखाल वीररसाला व वत्सलरसाला मान आहे. वाचकांच्या

चित्तांत सात्विक प्रेमाचे व उन्नत विचारांचे कल्लोळ उत्पन्न करणारीं शेंकडों उत्तम स्थळें त्यांच्या काव्यांत आहेत. महाभारत, मंत्ररामायण, कुशलवाख्यान हीं प्रायः वीररसप्रचुर आहेत तर भागवती प्रकरणें, संतप्रकरणें व संशयरत्नाइत्यादि स्तोत्रें भक्तिमहार्णवाला भरती आणणारीं आहेत. वामन मुक्तेश्वर व मोरोपंत ही त्रयी सुसंस्कृत विचारांची असून यांनीं कीर्तनोपयोगी आख्यान-उपाख्यानांनीं मराठी भाषेची समृद्धि उत्तम केली आहे. पंत १७९४ मध्यें मेले व मराठी साम्राज्याचें ऐश्वर्यही लयाला गेलें.

मोंगलाईंत **हंसराजस्वामी** ( शके १७२७–१७७७ ) हे जुन्या परंपरेचे वेदांतविषयावर ग्रंथ लिहिणारे शेवटचे संतकवि होत. यांचे प्रमुख ग्रंथ वेदेश्वरी, लघुवाक्यवृत्ति, सदाचार, ईशावास्यावरील टीका, कुबडी, चूडालाख्यान इ० ग्रंथ प्रसिद्ध असून त्यांपैकीं कित्येक अद्याप लोकांच्या वाचण्यांत आहेत. हे समर्थसांप्रदायी होते.

## पोवाडे व लावण्या.

१३ आतां पोवाडे व लावण्या यांबद्दल दोन शब्द सांगतों. ‘ पोवाडा ’ हा शब्द ज्ञानेश्वरींत आला आहे. श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात ‘ पवाडा तुवां केला । गंधर्वासि ’ ( अ० २–१० ) म्ह० गंधर्वांनीं गाण्यायोग्य असा तूं पराक्रम केलास. पवाडा किंवा पोवाडा म्ह० गाण्यास योग्य विषय, शौर्याचें कृत्य. शूरांनीं पवाडे करावेत तेव्हां ते शाहिरांनीं गावेत व शूरांपुढेंच गावेत. ‘ शूर मर्दाचा पोवाडा । शूर मर्दानें ऐकावा ’ असें तुळशीदास शाहिरानें म्हटलें आहे. नाथांच्या पूर्वीं दामाजीची रसद विठू महारानें पोंचविली हा एक पवाडयाचा विषय होता. शिवाजीमहाराजांच्या वेळेस प्रथम पोवाडे रचण्याची स्फूर्ति शाहिरास झाली. अगिनदास शाहिरानें अफझुलखानाच्या वधावर एक पवाडा रचिला. हा ३७ चौकांचा पवाडा असून तो जिजाबाईच्या आज्ञेवरून ‘ अगिनदास कवीश्वर । त्यानें कडाका गाइला । दिला एक गांव बक्षिस त्याला । दोन सोन्याचे लंगर चढविले हाताला. ’ दुसरा ५२ चौकांचा पवाडा तुळसीदास शाहीरानें तानाजीनें सिंहगड घेतला त्या प्रसंगावर केला आहे. तिसरा बाजीपासलकरावर आहे. पोवाडे हे बहुधा तो तो प्रसंग झाल्याबरोबर गाइले जातात व वरील पोवाडे तर शिवरायाच्या सदरेंत शाहीरांना बोलावून नेऊन लोकांसमक्ष तेथच्यातेथेंच गायिले व ऐकविले आहेत. सर्व पोवाडयांत ८।१० पोवाडे चांगले आहेत. सातारचे शाहुमहाराज, प्रतापसिंह महाराज, अहल्याबाई होळकरीण, नाना फडणीस, सवाईमाधवरावांचा रंग, त्यांचा मृत्यु, नानासाहेब पेशवे, बाजीराव पेशवे इ० इतिहासप्रसिद्ध पुरुषांवर पोवाडे रचलेले आहेत. पानपतच्या लढाईवर तीन व खर्ड्याच्या लढाईवर तर आठ

शाहिरांनीं आठ वेगवेगळे पोवाडे रचिले आहेत! पोवाडे रचणारेच बहुतेक लावण्या गाणारे आहेत. या सर्वांत विद्वत्ता, रसिकता व भाषासौंदर्य या दृष्टीनें पाहतां रामजोश्यांचा नंबर पहिला लागतो. सोलापूरचे रामजोशी, संगमनेरचा अनंतफंदी व बाकी बहुतेक पुण्याचे. प्रभाकर दातार, सगनभाऊ होनाजी बाळा, परशुराम, वगैरे शाहीर पोवाडे व लावण्या दोन्ही गाणारे आहेत. पोवाड्यांत तत्कालीन सामान्य लोकांत पसरलेल्या गोष्टी, व लोकांच्या समजुती चांगल्या प्रतिबिंबित झालेल्या आहेत. यांची भाषा लोकभाषा असते यामुळें पुष्कळ सुंदर म्हणी, साधे अस्सल मराठी शब्द, प्रसंगीं जोरदार व थाटदार वर्णनें, त्या त्या वेळच्या किल्ल्यांच्या किंवा सरदारांच्या नामावळी, या पोवाड्यांत येत असून आपण ते ते प्रसंग समक्ष पाहत आहोंत, इतकीं हुबेहूब वर्णनें त्यांत येतात. इतिहासाच्या कसाला पोवाडे लावून पाहिले पाहिजेत. लावण्यांत मुख्यरस शृंगार असून कित्येक लावण्या रसदृष्टीनें मनोरम असतात व कित्येकांत बाष्कळ शृंगाराचा कडेलोट केलेला असतो तथापि हे पोवाडे, ह्या लावण्या, बायकांच्या समूहांत अद्याप लुप्त असलेलीं कित्येक सुंदर गाणीं, हीं सर्व अवश्य संग्रहिलीं पाहिजेत. यांत अस्सल मराठी लोकभाषा, सहज स्वरूपांत दृष्टीस पडते. रावबाजीच्या कारकीर्दीत 'पुणें शहर गुलजार' बनलें असून तेथें अनीतीचा सुकाळ झाल्यामुळें व त्यास ह्या पाचकळ लावण्यांनीं भर दिल्यामुळें स्वराज्याची इमारत इतक्या लवकर कोसळून खालीं पडली कीं काय असें सहज मनांत येतें. ह्यांत रामजोश्याच्या कांहीं बोधप्रद लावण्या व होनाजी बाळाची अत्यंत बहारीची 'घनश्यामसुंदरा'ची भूपाळी हे सभ्य स्त्रीपुरुषांत लोकप्रिय झाले आहेत.

## निबंधमालेपूर्वींचे गद्य ग्रंथकार.

१४ मराठी पद्यवाङ्मयाचा काळ जसा सहाशें वर्षांचा आहे तसा गद्यवाङ्मयाचा नाहीं. मराठी गद्याचा उदय होऊन एक शतकही अद्याप लोटलें नाहीं, तथापि ह्या अल्पकालावधींतही मराठी गद्यानें बरीच भरारी मारली आहे. आशा व उत्साह बाळगण्याइतकी त्याची प्रगति झाली आहे यांत संशय नाहीं. मराठी कवितेच्या प्रांतांत ज्ञानेश्वर, दासोपंत, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत इ० अतिरथी महारथी निर्माण होऊन त्यांनीं मराठी पद्यवाङ्मय सुसंपन्न करून ठेवलें आहे. तशी मराठी गद्याची अजून भरभराट झाली नसली तरी ती होण्याच्या मार्गांत आहे. शके १५०० च्या सुमारास एकनाथांनीं अर्जदास्त, ताकीदपत्र, अभयपत्र इ० गद्यप्रकार सुरू केलें व त्याच सुमारास पंचतंत्रादि कांहीं गद्यग्रंथही निर्माण झाले. स्वराज्याच्या वेळचा कार्यकर्त्या स्त्रीपुरुषांचा पत्रव्यवहार साने, पारसनीस, राजवाडे, खरे, देव

वगैरे संशोधकांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. शिवकालीन पत्रव्यवहारांत व बाजीराव, चिमाजीआप्पा, नानासाहेब, हिंगणे, सखारामबापू, नानाफडणवीस, विंचुरकर, शिंदे, होळकर, भोसले, गोविंदराव काळे इ० वीर मुत्सद्यांच्या पत्रव्यवहारांत, व तसेंच राजारामकालीन कृष्णाजी अनंत सभासदापासून तों पेशवाईच्या अखेरीस झालेल्या मल्हार रामराव चिटणीसादिकांपर्यंत झालेल्या बखरींत जें मराठी दृष्टीस पडतें त्यांत किती तरी पत्रें उत्कृष्ट मराठी गद्याचे नमुने म्हणून पुढें ठेवतां येण्यासारखे आहेत. ह्या पत्रव्यवहारांत व बखरींत मराठी भाषेचा साधेपणा, डौलदारपणा, कर्त्या पुरुषांच्या महत्त्वाकांक्षा, ईर्षा, करारीपणा, व्यापक राजकारणी बुद्धि इ० गुण प्रगट झालेले पाहून मनास उल्हास वाटतो. हा सारा पत्रव्यवहार व ह्या बखरी यांतून निवडक उताऱ्यांचा एकादा सुंदर ग्रंथ तयार केला तर त्यावरून स्वराज्यकालीन मराठी गद्याचें वैभव दृष्टीपुढें येईल व आजकालच्या तरुणांस मराठींतील वीर्यशाली गद्याची ओळख पटून कार्यस्फूर्ति होईल. शिवाजीमहाराजांनीं रघुनाथ पंडितांकडून 'राजव्यवहारकोश' करवून यवनी शब्दांच्या ऐवजीं संस्कृत शब्दांचा उपयोग करण्याची आज्ञा करून भाषाशुद्धीचा एक प्रशंसनीय उद्योग केला; तरी अरबी, फारशी, उर्दू वगैरे भाषांतील जे शब्द मराठींत घुसले त्यांचा बखरकारांनीं व पत्रव्यवहार करणारांनीं त्याग केला नाहीं. परभाषेच्या संगतीनें स्वभाषेंतील शब्दभांडार जर वाढत असेल तर तें अवश्य वाढवावें. परभाषांना आपल्या मायभाषेवर कुरघुडी करूं देऊं नये इतक्यापुरतें जपावें, पण अगदींच सोवळेपणा ठेवूं म्हटलें तर भाषाभिवृद्धीच्या कामीं जबर प्रत्यवाय येतील. गुजराथी, कानडी, हिंदी वगैरे परप्रांतीय भाषांतील कैक शब्द मराठींत घुसलेच आहेत कीं नाहीं? आजही इंग्रजी भाषेच्या सहवासानें कित्येक भाषाप्रचार आपण स्वीकारलेच आहेत कीं नाहीं? जे परभाषांतील शब्द आज आमच्या माजघरांत, स्वयंपाकघरांत व सोंवळ्यांतही शिरले आहेत ते आतां तेथून काढून टाकतां येणार नाहींत. आसपासच्या परिस्थितीचा आपण राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबतींत उपयोग करून घेतों तर मग भाषाभिवृद्धीच्या कामींच कृपणपणा कां ठेवावा? परक्यांच्या मतांना व शब्दांना आपल्या मतांवर व शब्दांवर कुरघुडी करूं देऊं नये, तथापि आपलेंपण सर्वस्वी संभाळून त्यांचा शक्य तोंवर उपयोग करून घेऊन आपलें भांडार व शक्ति आपण वाढवावी यांत अयोग्य कांहीं नाहीं. जगांतील सर्व भाषा अशाच रीतीनें सुसंपन्नतेस पोंचल्या आहेत. परक्यांची गुलामगिरी नको पण परक्यांचें कांहींच (गुणही) घ्यायचे नाहींत, ही बुद्धि अभिवृद्धीची द्योतक नाहीं. असो, स्वराज्यकालीन पत्रव्यवहार व बखरी यांची

मराठी भाषा डौलदार, ओजस्वी व फार साधी आहे. त्यानंतर आपण इंग्रजी अंमलांतच अवतरतों. इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतर प्रथम शालोपयोगी कोश, व्याकरणें, गद्य पुस्तकें, थोडेसे शास्त्रीय ग्रंथ, संस्कृत नाटकांचीं व इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें यांतच पाहिलीं साठ वर्षें गेलीं! वर्तमानपत्रें व मासिकें सुरू झालीं. भाषांतरित नाटकें व कादंबऱ्या मराठींत होऊं लागल्या. मराठी भाषेचा प्रांत विस्तीर्ण होऊं लागला. सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे (इ० स० १७८८–१८३०) यांचे 'बाळमित्र' व 'इसापनीतिकथा' हे ग्रंथ शुद्ध व सुलभ मराठींत लिहिलेले आहेत. **बाळशास्त्री जांभेकर** (इ० स० १८१०–१८४५) यांनीं 'विद्येचे उद्देश, लाभ व संतोष' 'हिंदुस्तानचा प्राचीन इतिहास' 'इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' इ० भाषांतरवजा ग्रंथ लिहिले. 'शून्यलब्धिगणित' हा त्यांचा शेवटचा ग्रंथ. याशिवाय बालव्याकरण, भूगोलविद्या, नीतिकथा, इ० छोटीमोठीं मिळून सुमारें १४।१५ पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. हे फार दांडगे विद्वान् असून त्यावेळच्या सर्व चळवळींत अग्रेसर होते. यांना मराठी, संस्कृत, इंग्रजी, लॅटिन, गुजराथी, बंगाली, कानडी, फारसी, हिंदी इ० ८।१० भाषा येत! असे हे पुरुष बहुभाषाकोविद असून यांचीं पुस्तकेंही शाळाखात्यांत पुष्कळ वर्षें चाललीं होतीं. यांनीं १८३७ मध्यें स्वतःच दिग्दर्शन नांवाचें एक प्रौढ मासिक काढलें होतें. त्यांत व १८४० मध्यें त्यांचे सहाध्यायी भाऊ महाजन यांनीं काढलेल्या प्रभाकरनामक वर्तमानपत्रांत हे प्रौढ व माहितीनें भरलेले लेख लिहीत असत. डॉ. भाऊ दाजी, केरोपंत छत्रे, व दादाभाई नौरोजी हे यांचे शिष्य होत. यांचा एकही ग्रंथ मराठी वाङ्मयांत दीर्घकाल राहणाऱ्या लायकीचा झाला नसला तरी त्यावेळच्या शालेय ग्रंथांत भर टाकून विद्याप्रसाराचे कामीं दीर्घश्रम करून अवघ्या ३५ वर्षांच्या आयुमानांत एवढी कामगिरी करणारा हा पुरुष लोकोत्तर होऊन गेला यांत संशय नाहीं. मराठी गद्याच्या इमारतीच्या पायांतला हा एक सर्वाधिक भव्य चिरा त्यावेळीं होऊन गेला. **हरि केशवजी** (१८०८–१८५८) यांनीं १८३३ मध्यें 'सिद्धपदार्थविज्ञान' हा ग्रंथ लिहिला. हा भाषांतररूप असून अतिशय सरस होता. हे मराठी फार रसाळ लिहून इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें मूळासारखीं सरस करीत. 'नीतिग्रंथ' हा Chamber's moral class book चें भाषांतर असून 'यात्रिक क्रमण' हें Bunyan's Pilgrim's Progress ह्या प्रसिद्ध ग्रंथाचें अत्यंत सुरस भाषांतर होय. देशव्यवहारव्यवस्था हा यांचा अर्थशास्त्रीय ग्रंथ होय. हरिकेशवजी हे पाठारे प्रभु ज्ञातीचे असून धार्मिक वृत्तीचे होते. पुण्याचे प्रसिद्ध वारकरी संत शामराजपंत तात्या केसकर (नानाबोवा साखरे यांचे गुरु) यांजपाशीं ते ज्ञानेश्वरी पढले व नित्य

ज्ञानेश्वरीचा पाठ करीत. केसकरांचें विठ्ठलमंदिर पुण्यास विंचुरकरांचे वाड्याजवळ आहे. केसकरांचे शिष्य नानाबोवा साखरे. सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथ यांचाच आहे. त्यांचे शिष्य आवटे यांनीं सार्थ ज्ञानेश्वरी व गाथापंचक प्रसिद्ध केले असून त्यांचे दुसरे शिष्य विष्णुबोवा जोग यांनीं सार्थ तुकारामगाथा छापला आहे. विष्णुबोवांचे शिष्य आजचे प्रसिद्ध वारकरी व्यंकटस्वामी व प्रो. दांडेकर हे स्वतंत्ररीत्या सार्थ ज्ञानेश्वरी लिहीत असून तो ग्रंथ लौकरच प्रसिद्ध होईल. हरि केशवजी केसकरांचे शिष्य म्हणून ही माहिती येथें नमूद करून ठेवीत आहे. **दादोबा पांडुरंग** ( १८१४–१८८२ ). दादोबांचें पहिलें व्याकरण १८३६ मध्यें छापलें. दादोबांची यशोपांडुरंगी ही केकावलीवरील लोकप्रसिद्ध टीका १८६५ मध्यें प्रसिद्ध झाली. दादोबांनीं ही टीका स्वतंत्रपणें लिहिली आहे. त्यांचें 'आत्मचरित्रही' स्वतंत्र आहे. हें पूर्वी मी अर्धेच छापलें असून सर्व पुस्तक लवकरच छापण्यास जाणार आहे. **परशरामपंत तात्या गोडबोले** ( १७९९–१८७४ ) या रसिकतात्यांचा सुप्रसिद्ध 'नवनीत' ग्रंथ प्रथम १८५४ मध्यें प्रसिद्ध केला. हा 'काव्यामृताचा नवनीतमेळा' लोकांच्या जिभेला गोड लागला. मयूरकविचा टाहो बंद झाल्यानंतर ४० वर्षांनीं तात्यांनीं प्राचीन कवींचीं काव्यकुसुमें एकत्रित करून त्यांची ही माळ गुंफली व ती आज ७० वर्षांत शेंकडों रसिकांत काव्याची गोडी कायम ठेवण्यास कारण झाली आहे. तात्यांनीं उत्तररामचरित्र, वेणीसंहार, मृच्छकटिक, शाकुंतल, पार्वतीपरिणय, नागानंद इ० **संस्कृत नाटकांचीं** प्रौढ व सुरस मराठींत भाषांतरेंहीं केलीं आहेत. मोरोपंतांच्या कवितेचे तात्या हे रसिक भोक्ते होते, केकावलीवर त्यांनीं संक्षिप्त 'केकादर्श' केला. त्यांची नामार्थदीपिका व वृत्तदर्पण हींही पुस्तकें लोकप्रिय झालीं. तात्यांच्याच धर्तीवर **कृष्णशास्त्री राजवाडे** यांनीं विक्रमोर्वशीय, मालतीमाधव व मुद्राराक्षस या नाटकांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध केलीं, व गणेशशास्त्री लेले यांनीं जानकीपरिणयाचें भाषांतर करून रघुवंशाचें सुंदर मराठी भाषांतर केलें आहे. यांचे पद्यात्मक शिवाजीचरित्र व साहित्यशास्त्र हे ग्रंथही प्रसिद्ध आहेत. या भाषांतरित नाटकांच्या बरोबरच दोन स्वतंत्र नाटकें **विनायक जनार्दन कीर्तने** या विद्वान् रसिकानें लिहिलीं व तीं ह्मणजे 'थोरले माधवराव पेशवे' व 'जयपाळ' हीं होत. मालकमच्या Central India memoirsचें यांनीं 'मध्यहिंदुस्थान' नामक भाषांतर केलें. पुढें पुढें नाटकांप्रमाणें नवीन नवीन कादंबऱ्याही मराठींत होऊं लागल्या. मोरोबा कान्होबा यांची 'घाशीराम कोतवाल' ही कादंबरी १८६३ त प्रसिद्ध झाली. मंजुघोषा, मुक्तामाला, विचित्रपुरी इ० कादंबऱ्या साधारण एकाच सांच्याच्या पण मनोरंजक असून सुंदर मराठींत लिहिलेल्या

आहेत. **कृष्णशास्त्री चिपळोणकर** यांच्या आरबी भाषेंतील सुरस गोष्टी, रासेलस, व अनेक विद्यामूलतत्वं, हें ग्रंथ अजूनही लोकांत मान्य आहेत. त्यांची ' पद्यमंजरी ' लोकप्रिय आहेच. सरस भाषांतर करण्याचे कामीं कृष्णशास्त्र्यांचा हातखंडा असे. त्यांचें गद्य व पद्य सारखेंच सुंदर आहे. त्यांच्या अन्योक्ति व मेघदूताचें भाषांतर अत्यंत सरस आहेत. त्यांच्या समकालीन विद्वानांत **गोपाळराव देशमुख उर्फ लोकहितवादी** यांची कामगिरी ध्यानांत धरण्यासारखी आहे. हे सुधारणाप्रिय असून समाजांतील धार्मिक व सामाजिक दोषांवर यांनीं निष्ठुर पण प्रामाणिक टीका केली आहे. हे मोठे इतिहासभक्त असत. अज्ञानानें बुडालेला देश सत्यज्ञानानें उद्धरायचा याविषयीं त्यांना मनापासून कळकळ वाटे. यांचा 'पृथ्वीराज चव्हाण' व ' ऐतिहासिक गोष्टी ' लोकप्रसिद्ध आहेत. खिस्ती मिशनऱ्यांनींही मराठींत लहानमोठी अनेक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत पण त्यांच्या मतांचा **विष्णुबावा ब्रह्मचारी** यांनीं खरपूस समाचार घेतला होता. बोवांचा 'वेदोक्तधर्मप्रकाश' हा ग्रंथ मोठा असून एकवार वाचनीय आहे. हे सनातनधर्माभिमानी होते तरी नवीन काळाचा थोडाफार परिणाम यांच्यावर झालेला उघड दिसतो. उदास यांचें 'धोम-महाबळेश्वर वर्णन,' विठोबा अण्णांचीं लोकप्रिय पदें, रघुनाथशास्त्री गोडबोले यांचे हंसकोश, प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक कोश इ० अनेक प्रयत्न मोठे यशस्वी झाले. निबंधमालेचा तोफखाना सुरू होण्यापूर्वीं मराठी गद्यवाङ्मयाची ६० वर्षांत एवढी प्रगति झाली होती. ही कमी महत्वाची आहे असें मानण्याचें कारण नाहीं. ह्या सर्व लहानमोठ्या ग्रंथांनींच मराठी गद्याची भूमिका फार चांगल्या रीतीनें तयार केली.

## निबंधमालाकार व नंतरचे ग्रंथकार.

१५ **विष्णुशास्त्री चिपळोणकर**,(१८५०-१८८२) निबंधमालेचा जन्म होण्यापूर्वीं जें वाङ्मय निर्माण झालें तें प्रायः मिशनरी व सरकारी शाळाखातें यांच्या प्रोत्साहनानें व यांच्यासाठीं बहुधा सरकारच्या रौप्यशृंखला पायीं वागविणाऱ्या लोकांनीं निर्माण केले. स्वतंत्र बाण्याचे व देशाभिमानानें प्रेरित झालेले लेखक त्यांत फार करून नव्हते. हें श्रेय प्रथम विष्णुशास्त्र्यांनीं मिळविलें. १८५७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यावर काहीं वर्षें तिच्या कार्यक्रमांत मराठी होती. पुढें तिला तेथून चाट मिळाली. १८५७ च्या धामधुमीनंतर सरकारनें कठोर दडपशाही सुरू केली. तिच्या प्रतीकारार्थ पुण्यास सार्वजनिक सभा निघाली मिशनऱ्यांच्या चळवळीस विष्णुबोवा ब्रह्मचाऱ्यांनीं मुंबईस यशस्वी रीत्या तोंड दिलें; तरी त्यांचीं पुस्तकें, व्याख्यानें वगैरे चळवळी चालूच होत्या.

व त्यांच्याच बगलेंतून जोतिबा फुले व त्यांची 'गुलामगिरी' निघाली. लोकहित-वादींचे जुन्या समजुतींवर व समाजावर तडाखे बसतच होते. रानडे व भांडारकर यांनीं हिंदुधर्माला उचलून धरावें तर ते प्रार्थनासमाज काढून सामाजिक सुधारणेच्याच मागे लागले. पुण्यास पुनर्विवाहवाद जोरानें चालू होऊन नव्याजुन्या मतांत तेढ आली. मोरोपंती कविता छापून काढण्यासाठीं परशुरामपंत तात्यांच्या साह्यानें माधवचंद्रोबांनीं इकडे 'सर्वसंग्रह सुरू केला तर तिकडे मोरोपंतवामनांना Degenerate Marathi Poets म्हणून स्वतंत्ररीत्या अर्वाचीन कवित्वाचा नमुना म्हणून कुंटे यांनीं 'राजा शिवाजी' काव्य प्रसिद्ध केलें. याप्रमाणें राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबतींत नवा पक्ष व जुना पक्ष असे दोन पक्ष होऊन समाज फुटूं लागला. अशा समयास वरील प्रश्न प्रत्यक्ष हातीं न घेतां स्वदेशाभिमानाची स्फूर्ति घेऊन राष्ट्रांत नवचैतन्याची व स्वातंत्र्य-प्रीतीची ज्योत पेटविणारी विष्णुशास्त्र्यांची 'निबंधमाला' सुरू झाली व तिचे ८४ अंक निघून व लोकजागृतीचें अद्भुत कार्य करून ती विराम पावली. विष्णुशास्त्र्यांच्या तडफदार लेखांपेक्षांही त्या लेखांनीं दिलेल्या आंदोलनाचें महत्व अधिक आहे. निबंधमालेच्या मूळ अंकांकडे पाहतां पुढीलप्रमाणें मुख्य निबंध त्यांत क्रमानें आले आहेतः—

१ मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, अंक १
२ प्रस्तुत मालेचा उद्देश, अंक २
३ विद्वत्व आणि कवित्व, अंक ३ व ४
४ संपत्तीचा उपभोग अंक ५
५ इतिहास, अंक ६।७।८
६ भाषादूषण, अंक ९
७ लेखनशुद्धि. अंक १०
८ वाचन, अंक ११
९ भाषांतर, अंक १२
१० लोकभ्रम, अंक १३।१४
११ ग्रंथावर टीका, अंक १५
१२ गर्व, अंक १६
१३ वक्तृत्व, अंक १८ ते २१ व २३।२५
१४ भाषापद्धति, अंक २६।२७
१५ इंग्रजी भाषा. अंक २८ ते ३० व ३२
१६ डॉ. जान्सन, अंक ३३,३४,३५, ३७,३९ ४०, ४१. ४२

१७ मोरोपंतांची कविता, अंक ४५, ४६, ४७, ५२, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६३

१८ लोकहितवादी, अंक ६४ ते ७१ व ७३ ते ७६

१९ आमच्या देशाची स्थिति, अंक ७७ ते ८४

१६शास्त्रीबोवांनीं हे जे १९ मुख्य निबंध लिहिले त्यांतला शेवटचा १९१० सालीं सरकारजमा झाला. हे बहुतेक निबंध वाङ्मयाचेच आहेत, तरी सर्वांतून स्वाभिमान ओतप्रोत भरला आहे. मानसिक गुलामगिरींतून राष्ट्र मुक्त व्हावें या उत्कट तळमळीनें हे लिहिले आहेत. मुख्यनिबंधाच्या जागीं रुचिपालट व्हावा म्हणून शास्त्रीबोवा कधीं कधीं ‘ पुस्तकपरीक्षण ’ घालीत. रसातळचीं मराठी भाषा, कीर्तनें यांचें टॅपेस्टनाटक, पंडितांचा वेदार्थयत्न, संस्कृत ग्रंथ, काव्येतिहाससंग्रह, जोतिबांची गुलामगिरी, तारानाटक, अपभ्रष्टचंद्रिका इ० शास्त्रीबोवांचे टीकालेख प्रसंगीं झणझणित व स्पष्टवक्तेपणाचे पण नेहमीं अत्यंत मार्मिक, विनोदप्रचुर व बहुश्रुतपणाचे असत. या मुख्य निबंधांशिवाय निबंधमालेंत जो पत्रव्यवहार झाला आहे व त्यांनीं जीं उत्तरें दिलीं आहेत तो भागही महत्वाचा आहे. चमत्कारिक माहिती, विनोदमहदाख्यायिका, भाषापरिज्ञान, सुभाषित व अर्थसादृश्य, उत्कृष्ट उतारे इ० विविध विषयही विविधप्रकारें वाङ्मयाची सेवा करण्याचे मार्ग सुचविणारे आहेत. शास्त्रीबोवांनीं वाङ्मयसेवा करण्याचे नानाप्रकार सुचविले त्याप्रमाणें त्यांच्या पश्चात् मराठी भाषेचे अनेक सेवक मराठी भाषेचे ऐश्वर्य परोपरीनें वाढविण्यांत आज गुंतले आहेत. “देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय ही संपन्नता सिद्ध करण्याचीं दोन मोठीं साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखणी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा व व्याख्यानें येतात व दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ हे येतात ” ह्या त्यांच्या लोककल्याणाकारित्वाच्या तत्वाप्रमाणें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल, केसरी व मराठा, चित्रशाळा व किताबखाना अशा पांच संस्था उभारल्या पण ते स्वतः वाङ्मयसेवेच्या द्वारें देशोद्धाराचा मार्ग दाखवून अवघ्या ३२ व्या वर्षीं निजधामास गेले. त्यांच्याच सहकारी मित्रांतून **आगरकर** व **टिळक** हे निघाले व यांनीं शास्त्रीबोवांचेंच कार्य पुढें चालविलें. आगरकरांनीं आपलें आयुष्य सामाजिक सुधारणेच्या कार्याला वाहिलें व त्यांचे वाङ्मय लोकहितवादींच्याच धर्तीवर गेले पण तें अधिक सरस व लोकप्रिय आहे. ‘सुधारकांतील निवडक निबंध’ हे आगरकरांचें वाङ्मयस्मारक होय. टिळकांची कामगिरी अधिक दीर्घकालीन व व्यापक स्वरूपाची झाली. त्यांनीं राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली व लोकांना राजकारण समजावून

देण्यासाठीं चालू राजकारणाची भाषा बनविली. मराठींतील 'राजकारणी वाङ्मयाचे' टिळक हे आचार्य होत. त्यांनीं चालू मन्वंतरांतील राजकारणाची परिभाषा बनविली, राजकारणाची लोकांना चटक लावली व राजकारणी वाङ्मय निर्माण केलें. त्यांनीं कोणत्या चळवळी केल्या व प्रत्यक्ष कार्य काय केलें हा येथें प्रश्न नसून वाङ्मयसेवा कोणत्या स्वरूपाची केली हाच प्रस्तुत विषय आहे. विष्णुशास्त्र्यांची रसिकता, पदलालित्य व साहित्य ज्यास्त मनोवेधक तर टिळकांचीं साधी जोरदार व कर्तृत्ववती वाणी अधिक प्रभावशाली. प्रतिपक्षाला चीत करण्याचें कसब दोघांच्याहि वाणींत. कालिदास व मोरोपंत, मेकाले व जान्सन, ही चोकडी शास्त्रीबावांना आपली भाषासरणी कमावण्याच्या कामीं उपयोगी पडली. टिळकांच्या बुद्धीवर महाभारतानें संस्कार केलेला. पाश्चात्य ग्रंथकार, पाश्चात्य तत्वज्ञान, पाश्चात्याचें राजकारण यांचें चिंतन करितां करितां प्रत्यक्ष समोर असलेलें हिंदीराजकारण तेल्यातांबोळ्यांनाही समजेलसें सांगणें अगत्याचें झाल्यामुळें त्यांची भाषा अत्यंत साधी पण ठसठशीत, परिणामकारक व हिशेबी बनली. साहित्याचे रंगढंग तिला ठाऊक नाहींत, तरी ती तेजस्वी व चित्ताकर्षक आहे. ती साधेपणानेंच वाचकांना डोलविणारी आहे. वक्तृत्वाच्या कलेचा व गुणांचा विचार न करितां विचाराच्या सहजस्फोटाबरोबर त्यांना जसें वक्तृत्व आलें तशी भाषा कमावण्याचा विचार न करितांही अंतर्गत अत्युत्कटतेमुळें व आपले विचार सर्वांना समजावेत या प्रबळ उत्कंठेमुळें सहज सुंदर भाषा त्यांना वशवर्तिनी झाली. त्यांच्या राजकारणी भाषेचा साधेपणाच त्यांच्या 'गीतारहस्य' ग्रंथांतही प्रगट झाला आहे. पदलालित्याचा प्रयत्न नाहीं, पण सहज स्फुरणारीं पदें समर्पक व जिव्हारीं भिडणारीं अशींच असतात. 'वाचमर्थोनुधावति' असा त्यांच्या वाणीचा प्रभाव आहे. भाषेच्या बाजूनें पाहिलें तर ज्ञानेश्वरीची रसवंती कांहींशी विष्णुशास्त्र्यांत व रामदासांची सडेतोड धाटणी टिळकांत आहे असें म्हटलें पाहिजे. गीतारहस्यग्रंथ अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. पाश्चात्य तत्वज्ञानाचे ग्रंथ व आपल्याकडील महाभारत व उपनिषदें यांचा दीर्घकाळ अभ्यास करून तौलनिक पद्धतीनें गीतेचा कर्मयोग त्यांनीं विशद केला आहे. गीतेचा भावार्थ ज्ञानेश्वरांनीं सांगितला, पदपदार्थांसह सकलशास्त्रांचा सूक्ष्म विचार करून वामनपंडितांनीं यथार्थदीपिका लिहिली व पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञानाच्या ग्रंथांचें मंथन करून टिळकांनीं गीतारहस्यग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरी ज्ञानभक्तिप्रधान आहे, यथार्थदीपिकेंत पांडित्यप्रकर्ष व सगुण भक्ति आहे व रहस्यांत चालू काळाला उचित असा कर्मयोग आहे. पहिले दोन्ही ग्रंथ निश्रेयसाचे दाते आहेत, तिसरा अभ्युदयाकांक्षी आहे. तीनही ग्रंथ गीतार्थ जाणणारानें अवश्य अभ्यासावेत असेच बहुमोल आहेत, व मराठी भाषा ह्या

तीनही ग्रंथांमुळें अत्यंत सुसंपन्न झाली आहे. टिळकांचेच सहकारी मित्र **प्रि. गोळे** यांचें 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' व 'ब्राह्मणांचा ऱ्हास' हे दोन्ही ग्रंथ एकएक वेळ वाचण्यासारखे आहेत. हंस यांचें वामन, मोरोपंत व तुकाराम यांवरील निबंध व पारखीशास्त्री यांचे बाण व श्रीहर्ष यांवरील प्रबंध वाचनीय आहेत. विष्णुशास्त्री टिळकांनंतरच्या पिढीचें वाङ्मयकार्य आपल्यापुढेंच आहे. टिळकांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संगतींतल्या पिढीची गेल्या २५।३० वर्षांतली वाङ्मयकामगिरी आपल्यापुढें आहे व ती करणारे बहुतेक पुरुष आज हयात आहेत. विष्णुशास्त्र्यांच्या सहकार्यानें रा. ब. **साने** यांनीं काव्येतिहाससंग्रह सुरू केला होता. साने यांनीं कांहीं बखरी व जुना पत्रव्यवहार छापून प्रसिद्ध केल्यावर आपल्या देशाच्या इतिहासाकडे लोकांचें लक्ष अधिक लागलें. **पारसनीस** यांनीं झांशीच्या राणीचें चरित्र प्रसिद्ध करून त्या वेळीं इतिहासप्रियतेस चांगलें चालन दिलें. त्यांनीं पुढें 'भारतवर्ष' व 'इतिहाससंग्रह' ह्या दोन मासिकांच्या द्वारें व अवांतर लेख व पुस्तकें लिहून इतिहासाची मोठीच सेवा केली आहे. काव्येतिहाससंशोधक **राजवाडे** यांचें कार्य तर फारच मोठें आहे. 'मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें' सुमारें २०।२५ खंडांत त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं महशूर आहेत. त्यांच्या प्रस्तावना व लेख यांतील त्यांचीं मतें कोणांस पटोत वा न पटोत पण त्यांचे दीर्घपरिश्रम, अतुलनीय कष्ट व विशाल बुद्धिमत्ता या गुणांमुळें जो इतिहासोपयोगी प्रचंड पत्रव्यवहार उपलब्ध झाला आहे त्यावरून त्यांचें नांव इतिहाससंशोधकांत अग्रेसरत्वानें सदैव झळकेल यांत शंका नाहीं. मिरजेचे **वासुदेवशास्त्री खरे** यांनीं पटवर्धनी दप्तरें शोधून १२ खंड पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. बखरी, पत्रें व इतर साधनें सर्वांस पाहण्यास नेहमीच सवड होते असें नाहीं म्हणून सर्वांचा निष्कर्ष काढून **सरदेसाई** यांनीं इतिहासाचे जे चार पांच भाग प्रसिद्ध केले आहेत त्यांमुळें आपल्या इतिहासाची ओळख होणें सर्वांस सोईचें झालें आहे. शास्त्रीय ग्रंथ अद्याप म्हणण्यासारखे झाले नाहींत. **दीक्षितांचा** भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास हा व हवा, पाणी, रसायनशास्त्र इ० विषयांवर कांहीं ग्रंथ झाले आहेत. टिळकांचे पट्टशिष्य खाडीलकर व केळकर यांच्या बऱ्याच कामगिरीचा समावेश टिळकांच्या राजकारणांत होत असला तरी त्यांचीं नाटकें बरीच लोकप्रिय आहेत. माझ्या मतें **आण्णा किर्लोस्कर** यांचीं सौभद्र व शाकुंतल हीं दोन व **देवलांचीं** शापसंभ्रम व शारदा हीं दोन अशीं चार नाटकें भाषादृष्टीनें निर्दोष व संविधानकाच्या दृष्टीनें सभ्यपणाचीं आहेत. या शिवाय कोल्हटकर, खाडिलकर, केळकर, वरेरकर, जोशीद्वय इ० नाटककारांची कृति लोकांपुढें दृश्य काव्य या नात्यानें

आहेच. केळकरांचा व्यासंग व चौरसपणा अधिक म्हणून 'मराठे आणि इंग्रज' व इतर चार दोन पुस्तकें त्यांच्या हातून लिहिलीं गेलीं आहेत तीं सर्व चांगलींच आहेत. विद्वत्ता, बहुश्रुतपणा, रसिकता व चौरंगीपणा हे केळकरांचे गुण त्यांच्या ग्रंथांत प्रगट झाले असून त्यांची वाङ्मयसेवा बहुमोल आहे. खाडीलकर व केळकर यांच्याबरोबर शिवरामपंत परांजपे यांचें नांव निघणें अपरिहार्य आहे. शिवरामपंतांच्या भाषेचा खोंचदारपणा, व्याजोक्तिपूर्ण उपहास, उत्तान ववतृत्व हे गुण अनन्यसाधारण आहेत. 'काळांतील' त्यांचे कांहीं राजकीय विषयावरील व कांहीं अलीकडलि वाङमयात्मक निबंध मराठी भाषेंत कायम राहणार आहेत. त्यांचा 'दगडी कोळसा' कोण विसरेल? नाटकांबरोबर कादंबऱ्या व गोष्टी यांचा विचार करितां पहिलें नांव हरिभाऊ आपटे यांचेंच आठवतें. पण लक्ष्यांत कोण घेतो, मी, उषःकाल, चंद्रगुप्त, केवळ स्वराज्यासाठीं, गड आला पण सिंह गेला, रूपनगरची राजकन्या, इ० हरिभाऊंच्या विसही कादंबऱ्या आबालवृद्धांच्या हातीं देण्यालायक आहेत. हरिभाऊंची ललितमनोहर भाषा, त्यांचीं रेखीव स्वभावचित्रें त्यांची निर्दोष लेखनशैली; त्यांची मनोहर वर्णनें, सर्व कांहीं मनोरम आहे. हरिभाऊंच्या नंतर नाथमाधवांच्या स्वराज्यविषयक कादंबऱ्या नांव घेण्यासारख्या आहेत. भिसे व पांगळ यांच्या सुरस व सरस मालांतील कांहीं मिळून ४०।५० कादंबऱ्या मराठींत वाचनीय या सदरांत येतील हरिभाऊंच्या करमणुकीचें भावंड म्हणून 'मनोरंजन' निघालें. त्यानेंही मनोरंजन बऱ्यापैकीं केलें आहे. कादंबरी व गोष्टी यांचे वाचकही ज्यास्त—मात्र अलीकडे कादंबऱ्या, लघु गोष्टी व लहान मोठ्या अनेक माला यांच्यांतून सभ्य स्त्रीपुरुषांना वाचण्यास अयोग्य असे कांहीं प्रकार कोठें कोठें दिसतात त्यांचा अजूनही बंदोबस्त न झाला तर सामान्य लोकांची अभिरुची बिघडत जाण्याचा संभव आहे, बिघडली आहे! प्रणयाचें वेड फार माजत गेल्यानें कर्तृत्वाचा ऱ्हास होतो. अश्लीलपणा व पांचटपणा टाळून मनोरम व बोधप्रद गोष्टी लिहितां येणार नाहींत असें नाहीं. लोकांपुढें उदात्त भावनांचीं व दिव्य नीतिमत्तेचीं चित्रेंच ठेवणें उचित आहे. समाजांतील घाण चव्हाट्यावर आणण्यापासून सुधारणा होण्याऐवजीं लोकाभिरुचि भ्रष्ट होत जाते. कुठल्या तरी इंग्रजी कादंबऱ्यांचीं उष्टीं व चोरटीं भाषांतरें होतांत आणि त्यांत पाश्चात्यांच्या चालीरीति मनोभाव, प्रसंग वगैरे तसेच दिले जातात व वाचकांस 'शिव शिव न हिंदु न यवनः' असें म्हणण्याचा प्रसंग येतो म्हणजे तिला इंग्रजी कादंबरी ह्मणावे तर मराठींत लिहिली आहे व मराठी कादंबरी म्हणावे तर आंग्ल समाजाचीं चित्रें तींत काढिलीं आहेत! मेरी कॉरेली, मिस

बार्कले यांच्या कादंबऱ्यांचीं सरळ भाषांतरें तरी करावींत किंवा मराठ्यांचा म्हणजे हिंदूंचा स्वभावपरिपोष होईल अशीं तींत स्वतंत्र स्वभावचित्रें तरी असावींत. असो. आपल्या समाजाला रामायणभारतभागवताची पूर्वापार अत्यंत प्रीति आहे म्हणून या काळांत चिपळोणकर मंडळीनें या ग्रंथांचीं सरळ मराठी गद्यांत भाषांतरें करविलीं व त्यांचे उपसंहार विद्वान् माणसांकडून लिहविले. महाभारताला **चिं, वि. वैद्य** यांचा उपसंहार जोडला आहे, भागवताला सांगलीचे **कोल्हटकर** यांनीं उपसंहार लिहिला आहे, व हरिवंशाचा उपसंहार माधवराव मोडक यांचा आहे. ते तिन्ही उपसंहार उत्तम आहेत, पण त्यांतल्या त्यांत कोल्हटकर यांचा भागवताचा उपसंहार तर फारच बहारीचा आहे. ह्या अप्रतिम ग्रथांकडे लोकांचें लक्ष वेधावें तितकें वेधलेलें दिसत नाहीं. यांत भागवतधर्माचें रहस्य पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञानाच्या तुलनेनें विशद करून दाखविलें आहे. टिळकांच्या गीतारहस्याशेजारी ह्या ग्रंथास ठेवून दोन्ही ग्रंथ एकदम वाचावेत. दोन्ही ग्रंथांत विलक्षण बुद्धिमत्ता, दीर्घव्यासंग पौर्वात्य व पाश्चात्य ग्रंथांचें अवगाहन; तथापि तर्कशुद्ध व तौलनिक पद्धतीनें केलेलें विषयप्रतिपादन हे गुण सारखेच आहेत; तथापि दुसऱ्या ग्रथास परंपरेची व भक्तिश्रद्धेची जोड अधिक आहे. चिंतामणराव वैद्यांचें कृष्णचरित्र व मध्ययुगीन भारत हे ग्रंथही बहुमोल आहेत. बाबा गर्दे यांची गीता व पंचदशीवरील पदें लोकप्रिय झालीं आहेत. त्यांचे वेदांताचें युक्केड, गोविंदसुतांची परमार्थविचारमाला व आत्मानुसंधान इ० वेदांतावरील ग्रंथ स्वतंत्र असून मनोवेधक आहेत. संतकवींच्या आवृत्यावर आवृत्या निघत असून त्यांचे पाठक व वाचक जुन्या समाजांत ज्यास्त आहेत. रामदासांची कविता शंकरराव देव यांनीं व मोरोपंतांची पराडकर यांनीं मूळ प्रतीवरून शुद्ध छापली आहे. नवनीतानें ५० वर्षे मराठी कवितेची गोडी सामान्य वाचकांत कायम टिकविली तेंच काम **पांगारकरांच्या** 'भक्तिमार्गप्रदीप' ह्या पुस्तकानें केलें आहे गेल्या २० वर्षांत ह्या लोकप्रिय पुस्तकाच्या १२।१३ आवृत्त्या निघाल्या असून याच्या एक लक्षावर प्रती महाराष्ट्रांत पसरल्या आहेत. संतकवींची वाणी प्रदीपानें घरोघर लोकांच्या कानावर घातली आहे. पांगारकरांचीं मराठी संतकवींचीं चरित्रें प्रसिद्धच आहेत. मोरोपंत, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम यांचीं चरित्रें त्यांनीं आजवर प्रसिद्ध केलीं असून 'संतचरित्रमालेंत' त्यांनीं ३०।४० संतांचीं त्रोटक चरित्रें दिलीं आहेत. त्यांचे मोरोपंती वेंचे व रामदासी वेंचे उर्फ समर्थसंजीवनी हे ग्रंथ प्रसिद्ध असून 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' सध्या छापत आहे. त्यांचें सार्थ दासबोध, सार्थ मनोबोध, सटीप एकनाथी भागवत हे छापले असून त्यांची सटीप ज्ञानेश्वरी लौकरच प्रगट होणार आहे. आजगांवकर यांच्या कविचरित्रमालेचे सात भाग प्रसिद्ध

झाले असून त्यांत ज्ञाताज्ञात अनेक कवींचीं चरित्रें रसिकपणानें दिलीं आहेत. मराठींत संतचरित्रांशिवाय इतरही अनेक चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. केळुसकरांचें शिवचरित्र; नाना फडणवीस, पाटीलबावा, बापू गोखले, बाजीराव इ० वीर-मुत्सद्यांचीं चरित्रें; आनंदीबाई जोशी, विष्णुशास्त्री, रानडे, गोखले, दादाभाई, टिळक, गांधी, रवींद्रनाथ टागोर, मॅझिनी, नेपोलियन, विवेकानंद, रामतीर्थ इत्यादि महनीय पुरुषांचीं चरित्रें मराठींत चांगल्या प्रकारचीं झालीं असून तीं सर्व परिश्रमपूर्वक लिहिलीं गेलीं आहेत. रमाबाईंच्या आठवणी, टिळकांच्या आठवणी, (खंड १ व २) व प्रो. कर्वे यांचें आत्मवृत्त यांचा समावेशही चरित्रग्रंथांतच केला पाहिजे. **पावगी** यांचे भारतीय साम्राज्यावरील खंड तितके लोकप्रिय झाले नसले तरी अत्यंत मेहनतीनें लिहिले गेले आहेत, व त्यांची वाङ्मयसेवा प्रशंसनीय आहे. किनरे, लोटलीकर, वांकसकर यांचे छोटे मोठे ग्रंथ व निबंध नीति व आरोग्य यांच्या दृष्टीनें परिणामकारक व उपयोगी आहेत. बालवाङ्मय महाराष्ट्रांत लोकप्रिय करणारे वासुदेवराव आपटे यांचे 'लेखनकला' 'संप्रदाय व म्हणी,' इत्यादि अनेक ग्रंथ वाचनीय आहेत.

## अर्वाचीन कविता.

१७ कुंटयांच्या 'राजा शिवाजी' पासून अर्वाचीन कवितेस प्रारंभ झाला असें म्हटलें तरी चालेल. प्राचीन कवितेस प्रायः त्या त्या कवीच्या उपासनेपासून स्फूर्ति मिळे, अर्वाचीन कवितेस कोणताच निर्बंध नाहीं. मोरोपंतानंतर बृहत्काव्यशक्ति प्रायः लुप्त झालेली दिसते. दासोपंत, एकनाथ, वामन, मोरोपंत, कृष्णदयार्णव यांची लाखपन्नास हजारांनीं मोजण्यासारखी कविता पाहिली व अर्वाचीन कवींचे लहान लहान चुटके त्यांचे शेजारीं ठेवले म्हणजे अर्वाचीन कवितेचें महाकवि अजून यायचे आहेत असें वाटतें! अर्वाचीन कवितेला प्रेरणा बहुधा इंग्रजी कवितेकडून मिळाली आहे. नवीन काळांतले सर्व रंग जसे कादंबऱ्यांवर व नाटकांवर दिसतात तसेच ते अर्वाचीन कवितेवरही दिसतात. तथापि गेल्या ५० वर्षांत अनेक चांगले कवि उदयास आले असून त्यांचीं कित्येक प्रकरणें फार चांगलीं झालीं आहेत. चंद्रशेखरांनीं:--

> काबाडकष्ट दिनभरि करोनियां रुक्ष अन्न जेवावें ।
> रात्रींहि जागुनी निज कवितांनीं देशबंधु सेवावे ॥–

अशी अलिकडील कवींची दीनवाणी स्थिति वर्णिली आहे व–

> एकसहा नवकविंचा न करावा केधवाहि उपहास ।

अशी वाचकांची योग्य प्रार्थना केली आहे. कवींना आश्रय नाहीं, सहानुभूति नाहीं, वाचक नाहींत, अशी स्थिति आहे म्हणून,–

जाया करूं नका हो ! हिमकालीं खुंट हे प्रहारांनीं ।
लवतिल हेच वसंतीं द्राक्षांच्या गोड गोड भारांनीं ।
याच कवींतुनि कोणी प्रभुसत्तेनें लिहील हो कविता ।
काव्यासह विजयध्वज निजदेशाचा दिगंत फडकविता ॥

आणि याच उमेदीनें लोक नव्यकाव्यांचा प्रेमानें आदर करायला लागले आहेत. चिंतामणीपेठकरांची 'गंगावर्णना' हें काव्य मनोहर सृष्टिवर्णनाच्या दृष्टीनें उत्कृष्ट आहे. हिमाचल, त्यावरील सृष्टिशोभा, गंगेचे प्रपात, गंगेचीं वळणें, गंगेचे उपकार इ० भाग या काव्यांत फार सरसरीत्या वर्णिले आहेत. माधव हरि मोडक यांचीं 'अद्‌भुत किमयागार' व 'एक सद्‌गुणी मित्रकन्या' हीं काव्यें व त्यांचे बंधु माधवानुज यांची 'दीपविसर्जन' 'मूर्तिकार' व इतर कोमळ कौटुंबीय प्रेमवर्णन करणारीं काव्यें भाषादृष्ट्या निर्दोष आहेत. रहाळकर यांचा 'तान्हुला' व 'माझी आई'; बाळकृष्ण अनंत भिडे यांचें 'मुलांचें कौतुक' इ० कुटुंबवत्सलांना सुखविणारीं अनेक काव्यें अर्वाचीन कवितेंत आढळतात. केशवसुत यांचीं 'तुतारी' 'रांगोळी घालतांना पाहून' 'स्फूर्ति; गोविंदाग्रज उर्फ गडकरी यांची 'राजहंस माझा निजला' 'घुंगुरवाळा' 'मुरली' 'गुलाबी कोडें; विनायककवींची 'हतभागिनी' 'संयोगिता इ० अनेक काव्यें हीं अर्वाचीन कवितेंत चमकणारीं आहेत. रे. टिळक, मोगरे, लेंभे, लोंढे अनंततनय इ० कवींनींही मराठी कवितेची सेवा चांगली केली आहे, तथापि सर्व अर्वाचीन कवींत बालकवि ठोंबरे, दत्त कवि उर्फ दत्तात्रय कोंडो घाटे, व गडकरी या तीन कवींच्या वाणींतली प्रतिभा मला विशेष मनमोहक वाटते. ठोंबरे यांच्या 'फुलराणी' 'अरुण' 'निर्झरास' इ० काव्यांत व दत्त घाटे यांच्या 'विश्वामित्रीच्या काठीं' 'बाई लतिके' 'बोलत कां नाहीं !' 'दिवाळी' इ० काव्यांत कवित्वस्फूर्ति अधिक दिसते. नाशीकच्या गोविंदकवींच्या देशभक्तिप्रचुर काव्यांनीं तरुणांचीं मनें एका काळीं उत्साहानें भारून टाकलीं होती व अजूनही त्यांचें निनाद कोठें कोठें ऐकूं येतात. नागपूरचे प्रसिद्ध कवि टेकाडे लोकांच्या पुढें आहेतच. अर्वाचीन कवितेची सेवा 'काव्यरत्नावलीनें' उत्कृष्ट केली आहे. या समालोचनांत कांहीं कवि व कित्येक सुंदर काव्यें यांचा उल्लेख आला नसेल तर त्याबद्दल मला क्षमा करावी. सर्व अर्वाचीन कवितेंतून निवडक शेंपन्नास काव्यसुमनांचा सुंदर गुच्छ तयार होईल. प्राचीन कवितेचा अर्वाचीन कवींनीं आदरानें व श्रद्धेनें अभ्यास सुरू ठेवला तर मराठी भाषेची श्रीमंती लेणीं त्यांनाही वापरायला मिळतील.

## सारांश.

१८ मराठी वाङ्मयाचें समालोचन संपलें. घोडयांच्या शर्यतीप्रमाणे ग्रंथांतही शर्यत असते. जातिवंत उत्तम घोडे नेहमीं पुढेंच राहतात, बाकीचे आपापल्या लायखीप्रमाणें मागच्या रांगांतून रेंगाळत धडपडत चालतात. अगदीं दुबळे घोडे जागजागीं मरून पडतात. त्याप्रमाणें ह्या सहाशें वर्षांच्या काळांत ज्ञानेश्वरी, नाथभागवत, दासबोध, तुकोबांचे अभंग हे पहिल्या रांगेंत राहिले व सदैव राहणार. त्यांच्या मालकांची तपश्चर्याच तशी जबर आहे. फार उंची घोडयाला किंमतही जबरदस्त द्यावी लागते. 'जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केले, मग या विठ्ठलें कृपा केली' असें नाथांनीं म्हटलें आहे. जन्मजन्मांतरींची पुण्याई, कमाई, अभ्यास, गुरुकृपा, तपश्चर्या कमालीचा निःस्वार्थपणा, परोपकारबुद्धि व भगवत्प्रसाद हे खर्चीं पडल्याशिवाय ज्ञानेश्वरी, दासबोध, नाथभागवत, तुकोबांचे अभंग हे निर्माण होत नाहींत. ही चौकडी म्हणजे महाराष्ट्रभाषेतले चार वेद आहेत. ह्या ग्रंथांची लोकमान्यताही तशीच आहे. मराठी वाङ्मयाचें परमभाग्य कीं, त्याला असले कोहिनूर मिळाले. वर सांगितलेल्या गुणांत न्यूनाधिक्य असेल त्या मानानें त्या त्या ग्रंथाची मान्यता कमी जास्त होते. मराठींत दासोपंताइतकी ग्रंथरचना कोणाची नाहीं, दोनतीन लाखांची त्याची कमाई, पण पहिल्या रांगेंत त्यांना जागा मिळाली नाहीं. कांहीं ग्रंथ लहान असून घरोघर लोकप्रिय आहेत. आकारानें लहान पण गुणानें श्रेष्ठ असे हे छोटे ग्रंथ लोकांच्या जिव्हाग्रीं जाऊन बसले आहेत. हरिपाठाचे अभंग, नाथांचें रुक्मिणीस्वयंवर, समर्थांचें मनाचे श्लोक, देवीदासाचें व्यंकटेशस्तोत्र, वामनाची नामसुधा, पंतांची केकावलि, मुकुंदराजाचे परमामृत हे ग्रंथ आकृतीनें सान असून गुणानें थोर म्हणून लोकांच्या हृदयांत यांना स्थान मिळालें आहे. वृत्ताच्या बाजूनें पाहतां वामनाचा सुश्लोक, तुकयाची अभंगवाणी, ज्ञानेशाची किंवा मुक्तेशाची ओवी व मोरोपंताची आर्या, लोकप्रिय आहे असा राम बडवे याचा अभिप्रायही मननीय आहे. कवित्वाच्या बाजूनें पाहतां 'मुक्तेश्वराच्या तोलाची कविता मराठींत नाहीं' हा कृष्णशास्त्री चिपळूणकरांचा अभिप्रायही अयथार्थ नाहीं. कांहीं ग्रंथकार उपयुक्ततेच्या बाजूनें व सरसपणाच्या दृष्टीनें लोकप्रिय झालेले आहेत. रामायणभारतावर मराठींत अनेकांनीं यत्न केले पण त्यांत श्रीधराचा रामविजय, पांडवप्रताप व हरिविजय हेच अधिक लोकप्रिय होऊन घरोघर रामकृष्णांच्या कथा सांगण्याचें पुण्य संपादिते झाले. वारकऱ्यांच्या निरूपणांत 'ज्ञानबातुकाराम' तर हरिदासांच्या कीर्तनांत 'वामनमोरोपंत' रंग भरूं लागले.

एकंदरींत पहातां मराठी वाङ्मयांतला ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर, श्रीधर व महिपति हा नवरत्नहार आहे. ही नवरत्नमाला महाराष्ट्रशारदेच्या गळ्यांत आपल्या अद्भूत दीप्तीनें सर्वकाळ चमकत राहणार आहे. जगांतल्या कोणत्याही भाषेंतल्या वाङ्मयाला हा नवरत्नहार हार जाणार नाहीं. भाषेच्या, तत्वज्ञानाच्या, भक्तीच्या, कवित्वाच्या दृष्टीनें सर्वकाळ अग्रेसरत्वानें चमकणारा ज्ञानेश्वरीच्या तोलाचा ग्रंथ कोणत्या भाषेंत सांपडेल? भक्तिज्ञानाचा महार्णव असा नाथभागवतासारखा दुसरा गोड ग्रंथ कोणता आहे? व्यवहार, राजकारण व परमार्थ यांची सांगड घालून राष्ट्राच्या अभ्युदयनिःश्रेयसाचें निश्चित श्रेय केव्हांही पदरांत टाकणारा दासबोधाशीं सामन्यास उभा राहणारा दिव्य ग्रंथ कोणत्या भाषेंत आहे? नामदेववामनाच्या कोमल वाणीशीं व तुकोबांच्या स्फूर्तिदायक अभंगवाणीशीं कोण स्पर्धा करूं शकेल? हरिश्चंद्राख्यान, दुष्यंतशकुंतलाख्यान, द्रौपदीवस्त्रहरण, व नलदमयंत्याख्यान हीं चारच आख्यानें मुक्तेश्वरासारखी कमालीच्या बहारीनें कोणत्या कवीनें वर्णिलेलीं सांपडतील? संशयरत्नावलि, आर्याकेकावली, नामसुधाचषक, नामरसायन, सन्मनोरथराजि व श्लोककेकावली असलीं हृदयहारि स्तोत्रें मोरोपंताशिवाय कोणाचीं आहेत? महाकष्टसायास सोसून शेंदीडशें संतांच्या लीला प्रेमभरानें गाणारा संतचरित्रकार महिपतिसारखा कोण आहे? महाराज! आपली मराठी भाषा ह्या असल्या दिव्य ग्रंथकारामुळें श्रीमंत आहे. गोदा-कृष्णा नद्यांच्या टापूंतले हे मराठी ग्रंथकार दुनियेंतल्या कोणत्याही भाषेपुढें मराठी भाषेची इज्जत संभाळण्यास पूर्ण समर्थ आहेत. माझें परमभाग्य मी समजतों कीं ह्या दैवी संपत्तीनें भरलेल्या महाराष्ट्रांत जन्म मिळून ह्या दिव्य ग्रंथांची जी मराठी भाषा तीच मायभाषा देऊन नारायणानें ह्या ग्रंथांशीं समरस होण्यासारखें हृदय मला दिलें आहे! हीं मराठी भाषा राजाश्रयावर वाढली नाहीं, स्वकीयांच्याही निंदास्तुतीची तिनें पर्वा बाळगिली नाहीं; धनमानाच्या लोभांत ती पडलीं नाहीं; साहित्यछंदसादि कोणत्याच शास्त्राची तिनें गुलामगिरी पत्करली नाहीं. ती थेट ब्रह्मपर्वतावर उगम पावली असून सारी महाराष्ट्रभूमि तिनें भक्तिज्ञानाच्या अमृतवृष्टीनें प्रफुल्लित केली आहे, केवळ लोकोद्धारार्थ तिचा अवतार आहे. ती ज्ञानोबांच्या मठींत, नाथांच्या घरांत, शिवथरच्या घळींत, तुकोबांच्या भंडाऱ्यावर, मोरोपंतांच्या बारामतीच्या पडवींत स्वानंदानें स्वच्छंदानें खेळली वागडली आहे. आमच्या परमपावन परमप्रिय मराठी भाषेचा सर्वकाळ जय-जयकार असो.



## अभंग.

इहीं श्रवणीं तुझे गुणनाम ऐकेन ।
इहीं चरणीं तीर्थपंथें चालेन ॥
नाशिवंत देह करणीये काजा ।
ऐसी प्रेमभक्ति देई सहजा ॥ १ ॥
अखंड तुझें नाम उच्चारीं ।
तेणें संसारा होय उजरी ॥ धृ० ॥
शाळिग्रामतीर्थें करीन आंघोळी ।
हरिदासाचे चरणरज लावीन कपाळीं ॥
कंठमंडित तुळसीमाळीं ।
तनमन तुमतें ओंवाळी ॥ २ ॥
उदरव्यथेलागीं मी न करी धंदा ।
उच्छिष्टप्रसादें हरावी हे क्षुधा ॥
आपली स्तुति आणि पराविया निंदा ।
हे दोन्ही आतळों नेदी गोविंदा ॥ ३ ॥
सर्वांभूतीं रामा तूंतेंचि देखें ।
तुझेनि प्रसादें सदा संतोषे ।
देवा ! भानुदास मागें इतुकें ।
चाड नाहीं आम्हां वैकुंठलोकीं ॥ ४ ॥

( मागील अंक पृ. ४० शेवटचीं वाक्यें )

वर जो नवरत्नहार सांगितला त्याशिवाय इतर सत्कवींचे आपणांवर कमी उपकार आहेत असें नाहीं. दामोपंतांनीं दोन तीन लाख कविता कोणत्याही क्षुद्र स्वार्थानें किंवा लौकिक लाभाच्या हेतूनें लिहिली नाहीं. आमचे सत्कवि भगवत्परायण, सच्चरित्र, निर्लोभ व निर्दंभ आहेत "आइकेल तेणें आइकावें । मानेल तेणें घ्यावें । नावडे तेणें नेघावें । दोन्हीं श्रवणीं " असें त्यांनींच ह्मटलें आहे. माझी यथार्थदीपिका तुह्मी वाचा किंवा वाचूं नका ' संतुष्ट होय कमलापति । ह्या यथार्थ निरूपणें' यांतच वामन संतुष्ट आहत. ६० हजारांवर ज्यांनीं ग्रंथप्रसव केला असे ७१८ मराठी ग्रंथकार आहेत. शिवकल्याण, कृष्णदयार्णव, देवनाथ, सोहिरोबा आंबिये, कृष्णदास मुद्गल, कृष्णयाज्ञवल्की रंगनाथ जयरामस्वामी, आनंदमूर्ती, विठ्ठल, नागेश, रमावल्लभदास, दिनकरस्वामी, उत्तमश्लोक, रघुनाथपंडित, गमीरामदास, अमृतराय, इत्याद्यनेक कवींनीं मराठी वाङ्मयाची सेवा भगवत्सेवा या बुद्धीनेंच मराठींत ग्रंथरचना केली आहे. त्यांचें आपण ऋणी आहों. मराठी पद्याचा नवरत्नहार वर दाखविला. मराठी गद्याचा नवरत्नहार अद्याप पुरा व्हावयाचा आहे. त्यांतील निबंधमालाकार व गीतारहस्यकार हीं दोन रत्नें आपणांस शंभर वर्षांत मिळालीं आहेत. बाकी सात रत्नें त्यांत घालून तो हार पुरा करणें भविष्यकाळाच्या हातांत आहे ! महाराष्ट्राच्या पुण्याईनें तोहि पुरा होवो अशी श्रीशारदेच्या चरणीं प्रार्थना करून मी पुरें करितों.

# भक्तीचें गौरव.

तुका ह्मणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥

—तुकाराम.

१ नवविधाप्रकारानें देवाची भक्ति करावयाची असली तरी भक्तीचें स्वरूप एकविधच आहे. पदार्थ नऊ वेळां सेवन केला तरी पदार्थ एकच व गोडीही एकच. तसा परमात्मा एकीएक आहे. मुख्य देव एक आहे, दोन नाहीं. निर्गुण तोच व सगुण तोच. हरि एकजिनसी आहे. मग सृष्टि त्याहून वेगळी व जीव वेगळा असें कसें होईल ? सूर्याची प्रभा, किंवा साखरेची गोडी तसा देवाचा व जगाचा संबंध आहे, देव व जग हे दोन शब्दही समजुती पुरते. बाकी शब्द गाळले कीं, हरिरसायन एकच आहे, व तो एकच आहे हेंही म्हणायला दुसरें कोणी नाहीं ! अशा हरीच्या स्वरूपीं समरसतेचा आनंद भोगणें याच नांव भक्ति. ज्ञानोबाराय १२ व्या अध्यायांत म्हणतातः—

नाना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा ।
आम्हां आणि चराचरा । संबंध तैसा ॥
जालेनि जगें मी झांके । तरी जगत्वें कोण फांके ? ।
किळेवरी माणिकें । लोपिजे काई ? ॥
अलंकार आलें । तरी सोनेपण काई गेलें ? ।
कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुके ? ॥
ह्मणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा नोहे—उखितें । आघवें मीचि ॥

लाटांना समुद्राची संतति ह्मणावी पाहिजे तर, पण तेथें समुद्रावांचून दुसरें काय आहे ? जगानें देव झांकतो तर जगद्रूपानें कोण नटलें आहे ? वरच्या प्रभेनें काय हिरा लोपतो—कां अधिक प्रगटतो ! अलंकारपणानें प्रगटलें म्हणून काय सोनेपण गेलें ? कमळ फांकल्यावर काय कमळ नष्ट होतें ? तात्पर्य जग वेगळें सारून नारायणाला पहायला नको आहे. जगद्रूपानें तोच नटला आहे. अशा देवाशीं भक्तही ' जैसें कनेकर्मी कांकणें । असिजे अनन्यपणें" तसा अनन्यच असतो. अनन्य असतो तोच भक्त !

१—२

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ।
अहैतुक्यप्रतिहता ययात्मा सुप्रसीदति ॥ १ ॥

वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।
जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥ २ ॥
—स्कंध १–२.

**भावार्थः**— अधोक्षज ह्म० भगवान् विष्णु यांच्या ठिकाणीं निर्हेतुक व अखंड ( अप्रतिहत ) भक्ति जेणेंकरून उत्पन्न होते तो पुरुषाचा परमधर्म होय. भक्तीच्या योगानें अंतरात्मा प्रसन्न होतो. भगवान् वासुदेवाच्या ठायीं उत्पन्न झालेला भक्तियोग ज्ञान आणि वैराग्य देण्यास समर्थ असतो. भक्तिमुळें वैराग्य व ज्ञान यांचा लाभ होतो व तें ज्ञानही अहेतुक असतें—त्या ज्ञानाला हेतु ह्म० तर्कादि कारण नसतात.

१ **अधोक्षजः**—अधःकृतं अक्षजं इंद्रियजं ज्ञानं येन सः ह्म० इंद्रियजन्य ज्ञानाला तुच्छ करणारा, इंद्रियजन्य ज्ञानानें प्राप्त न होणारा तो अधोक्षज. ज्ञानोबांनीं ' जो इंद्रियासी चोरून जेवी । तयासीच फावे ' असें याच अर्थानें म्हटलें आहे.

२ **वासुदेवः**—वसन्ति भूतानि यस्मिन् स वासुः । सचासौ देवो द्योतनशीलः ह्म० ज्याच्या स्वरूपीं सर्व देव राहतात असा प्रकाशमय ( देव–दिव प्रकाशणें ) थोरला देव.

१–४

भजंति ये विष्णुमनन्यचेतस
स्तथैवतत्कर्मपरायणा नराः ।
विनष्टरागादि विमत्सरा नरा
स्तरन्ति संसारसमुद्रमाश्रमम् ॥ ३ ॥
नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं
न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।
कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे
नचार्पितं कर्म यदप्यकारणम् ॥ ४ ॥
—स्कंध १–५

जे भगवान् विष्णूला अनन्यभावानें भजतात व त्याच्या प्रेमामुळें श्रौतस्मार्त कर्म करून ते त्यालाच समर्पण करितात, आणि त्यामुळें रागद्वेषरहित व निर्मत्सर होतात असे भक्त संन्यासयोगादि परिश्रमावांचून ( आश्रमम् )भवसमुद्र तरून जातात.

ब्रह्मज्ञान निरंजन म्हणजे मायारहित निर्मळ असें झालें व निष्काम कर्मयोगाशीं संगत जरी झालें तरी भगवद्भक्तिविरहित असेल तर तें शोभा पावत नाहीं. ब्रह्मज्ञान व निष्कामकर्मयोग याला भक्तीची जोड असेल तरच त्यांस

शोभा आहे, एरवीं नाहीं ! भक्तीवांचून अपरोक्ष साक्षात्कार नाहीं हा भाव-तर मग जें कर्म अभद्र आहे ह्म० देहबुद्धीनें व स्वार्थानें केलेलें असेल किंवा स्वार्थमूलक नसलें तरी भगवदर्पण बुद्धीनें केलेलें नाहीं तें शोभा पावत नाहीं हें काय सांगायला पाहिजे !

५—६

नैकात्मतां मे स्पृहयन्ति केचित् मत्पादसेवाभिरता मदीहाः ।
येऽन्योन्यतो भागवताः प्रसज्ज सभाजयन्ते मम पौरुषाणि ॥५॥
पश्यंति ते मे रुचिरावतंसप्रसन्नवक्त्रारुणलोचनानि ।
रूपाणि दिव्यानि वरप्रदानि साकं वाचं स्पृहणीयां वदन्ति ॥ ६ ॥

—स्कंध. ३—२९

कपिलदेव आपल्या मातेस भक्तिरहस्य सांगतांना म्हणतातः—मदीहाः म्ह० मदर्थ—माझ्यासाठीं ज्याच्या सर्व ईहा ह्म० चेष्टा—व्यापार चाललेले असतात असे कित्येक पुरुष माझ्या चरणसेवेंत रंगल्यामुळें एकात्मता म्ह० सायुज्यता किंवा मोक्ष याची इच्छा करीतच नाहींत. असे माझे भक्तभागवत मेळयामेळयांनीं एकत्र जमून माझ्या गुणानुवादांतच दंग होतात. माझीं पौरुषें म्ह० गुण पराक्रम गाण्यापासून भक्तांना लाभ काय होतो म्हणून विचारशील तर सांगतों कीं भगवद्दर्शनानंद मुक्तींतही नाहीं. ते माझें दिव्य परम सुंदररूप—माझें प्रसन्न मुखकमल व माझे कमलनेत्र पाहून आनंदभरित होतात व मुखानें जे शब्द बोलतात ते मला सुख देतात.

निर्गुणबोधापेक्षांही सगुण प्रेमांतच भक्त दंग होतात.

मोक्ष तुमचा देवा । दुर्लभ तो तुम्ही ठेवा ॥१॥
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥ २ ॥

—तुकोबाराय.

७

तत्कर्म हरितोषं यत्साविद्या तन्मतिर्यया ।
हरिर्देहभृतामात्मा स्वयं प्रकृतिरीश्वरः ॥ ७ ॥

स्कंध ४—२९

**भावार्थः**—तेंच कर्म कीं जें नारायणाला संतोष देतें, तीच विद्या कीं जी मति हरीकडे वळविते. कारण कीं, हरि हा सर्व देहवंतांचा आत्मा आहे, सर्वांचा तो ईश्वर म्ह० नियंता आहे व तो स्वतंत्र आहे म्ह० सर्वांचें कारण असून त्याचें कारण कोणी नाहीं.

८

हरिर्हि साक्षाद् भगवान् शरीरिणामात्मा झषाणामिव तोयमीप्सितम्
हित्वा महांस्तं यदि सज्जते गृहे तदा महत्वं वयसा दंपतीनाम् ॥८॥

स्कंध ५ अ० १८

**भावार्थः**—झष म्ह० मत्स्य. माशांना जसें सर्वोपरी जल प्रिय तसा सर्वभूतांतरात्मा हरी भक्तांना परमप्रिय असतो. अशा हरीला विसरणारा मनुष्य लौकिकांत केवढाही मोठा ( महान् ) म्ह० नानागुणप्रसिद्ध असला तरी संसारांतच गुरफटून राहील तर त्याला महत्व केवळ वयामुळेंच प्राप्त होईल, ज्ञानामुळें नाहीं.

९–१०

नारायणपराः सर्वे न कुतश्चन बिभ्यति ।
स्वर्गापवर्गनरकेष्वपि तुल्यार्थदर्शिनः
वासुदेवे भगवति भक्तिमुद्वहतां नृणाम् ।
ज्ञानवैराग्यवीर्याणां नेह कश्चिद्व्यपाश्रयः ॥ १० ॥

स्कंध ६–१७

**भावार्थः**—नारायणाचे भक्त कशाला व कोणालाही भीत नाहींत, ते निर्भय असतात. स्वर्ग, नरक व मोक्ष यांकडे ते सारख्याच दृष्टीनें पाहतात म्ह० ते यांविषयीं उदासीन असतात. भगवान् वासुदेवाचे भक्त ज्ञानवैराग्य बलावर इतर कोणताच आश्रय मानीत नाहींत. इतके ते निरिच्छ व निस्पृह असतात.

११

कौमारं आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ।
दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥११॥

स्कंध ७–६

प्रल्हाद दैत्यकुमारांना बोध करितांना म्हणतातः—कुमारहो ! सुज्ञ माणसानें बाळपणींच या भागवतधर्माचें आचरण केलें पाहिजे. कां कीं, मनुष्यजन्म दुर्लभ आहे व तोही नश्वर पण उत्तम फल देणारा आहे.

१२

रायः कलत्रं पशवः सुतादयो गृहा मही कुंजर कोशभूमयः ।
सर्वेर्ऽथ कामाःक्षणभंगुरायुषः कुर्वन्ति मर्त्यस्य कियत् प्रियं बलाः॥

स्कंध ७—७

**भावार्थः**—द्रव्य, स्त्री, पशु, पुत्रादि, गृह, शेतवाडी, गजादि, धनकोश इ० सर्व अर्थ आणि काम क्षणभंगुर आहेत, व हे बलवान असले तरी मनुष्याचें

काय प्रिय करूं शकणार आहेत ? तात्पर्य विषयार्जनाच्या नादीं लागून हरीला विसरणें निष्फल व अनर्थावह होय.

१३--१४

नालं द्विजत्वं देवत्वमृषित्वं वासुरात्मजाः
प्रीणनाथ मुकुन्दस्य नवित्तं व बहुज्ञता ॥
न दानं न तपो नेज्या न शौचं न व्रतानि च ।
प्रीयतेऽमलया भक्त्या हरिरन्यद्विडंबनम् ॥

स्कंध ७–७

हे असुरपुत्र हो ! द्विजत्व, देवत्व किंवा ऋषित्व हें हरीच्या प्रेमसंपादनाला पुरेसें होत नाहीं; वित्त, सर्वज्ञता, दान, तप, यज्ञ, शुचिता किंवा नानाव्रतें यांच्याही योगानें देव जोडत नाहीं, हरि फक्त निर्मल ( निष्काम ) भक्तीला वश होतो, भक्तीवांचून इतर सर्व साधनें व्यर्थ होत.

ही प्रल्हादाची दानवपुत्रांना शिकवणूक आहे.

मन्ये धनाभिजनरूपतपः श्रुतौजः
तेजःप्रभावबलपौरुषबुद्धियोगाः ।
नाराधनार्थाहि भवन्ति परस्य पुंसो
भक्त्या तुतोष भगवान्गजयूथपाय ॥

स्कंध ७–९

माझें मत असें आहे कीं, धन, सत्कुलजता, रूप, तप पांडित्य ( श्रुत ), इंद्रियपाटव ( ओज ) तेज, प्रताप, बल, उद्यमपरता ( पौरुष ) बुद्धि व अष्टांगयोग यांनीं पुरुषोत्तम प्रसन्न होत नाहीं. वरील धर्म नसलेल्या गजेंद्रावरही देव त्याच्या भक्तीमुळें प्रसन्न झाले म्हणून भक्तीनें देवाला भजा.

१५

आसामहो चरणरेणुजुषामहं स्यां ।
वृंदावने किमपि गुल्मलतौषधीनाम् ॥
या दुस्त्यजं स्वजन–मार्यपथं च हित्वा ।
भेजुर्मुकुंदपदवीं श्रुतिभिर्विमृग्याम् ॥

स्कंध १०–४७

गोपींच्या निर्मल कृष्णभक्तीला मोहित झालेला उद्धव ह्मणतोः––अहो ! ज्या गोपी सामान्य माणसांना त्याग करण्यास कठिण अशा स्वकीयजनांचा व क्षुण्ण आर्यमार्गांचा त्याग करून श्रुतिशोधित अशा श्रीकृष्णपदाला शरण गेल्या––त्या ह्या गोपींचा चरणरज सेवन करीत वृंदावनांत ह्या गुल्मलतांच्या मध्यें मी कोणीतरी व कांहींतरी ( यत्किंचित् ) होऊन राहीन काय ? निस्सीम

कृष्णभक्त अशा गोपींच्या चरणरजसेवनानें धन्य होण्याइतकें माझें भाग्य उजळेल काय ?

१६

दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ।
श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हि साध्यते ॥ १६ ॥
स्कंध १०–४७

उद्धव ह्मणतोः—दान, व्रत, तप, होम, जप, स्वाध्याय (वेदाध्ययन), इंद्रियजय व इतर नानाविध श्रेयस्कर साधनांच्या योगें श्रीकृष्ण परमात्म्याची भक्तिच साधायची आहे. भक्ति हें साध्य आहे व हीं साधनें आहेत.

१७

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा
बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ।
करोति यद्यत्सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयेत्तत् ॥१७॥ स्कंध ११–२

सर्व कर्मे ईश्वरार्पण करणें हा मुख्य भागवतधर्म होय. कायेनें, वाचेनें, मनानें, इंद्रियांनीं, बुद्धीनें, चित्तानें किंवा स्वभावविशेषानें जें जें कर्म घडेल तें तें नारायणाला समर्पण करावें.

१८

इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः प्रियम् ।
दारान् गृहान्सुतान् प्राणान्यत्परस्मै निवेदनम् ॥ १८ ॥
स्कंध ११–३.

आपलें सर्व इष्ट, दान, तप, जप, आचरित, प्रिय—स्त्री, गृह, सुत व प्राण—सर्व परमेश्वराला निवेदन करावेत. ही आत्मनिवेदनभक्ति होय.

१९

भक्त्याहमेकया ग्राह्यः श्रद्धयात्मा प्रियः सताम् ।
भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात् ॥ १९ ॥
—स्कंध ११–१४

सर्वांतर्यामी, सत्प्रिय असा मी भगवान् केवळ विमलभक्तीनें वश होणारा आहे. माझ्या ठिकाणीं भक्ति असेल तर ती चांडालांनाही त्यांच्या जातिदोषां-पासून मुक्त करून पावन करिते.

२०–२१

कथंविना रोमहर्षं द्रवता चेतसा विना ।
विनानंदाश्रुकलया शुद्ध्येद् भक्त्याविनाशयः ॥ २० ॥

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं
हसत्यभीक्ष्णं रुदति क्वचिच्च ।
विलज्ज उद्गायति नृत्यतेच
मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २१ ॥

स्कंध ११–१४

शरीरावर हर्षरोमांचादि सात्विक अष्टभाव उभे राहिले नाहींत, चित्त द्रवलें नाहीं, भक्तिसुखानें आनंदाश्रुप्रवाह वाहत नाहींत अशा भक्तीवांचून आशय म्ह० अंतरात्मा शुद्ध तरी होणार कसा ?

माझ्या ( हरीच्या ) भक्तिसुखानें अंतःकरणाला पाझर फुटून ज्यांचा कंठ सद्गदित झाला आहे व त्यामुळें जो कधीं हांसतो, कधीं रडतो, कधीं निर्लज्ज होऊन नाचतो व गातो असा भक्त त्रैलोक्याला पावन करितो.

२२

न मय्येकांतभक्तानां गुणदोषोद्भवा गुणाः ।
साधूनां समचित्तानां बुद्धेः परमुपेयुषाम् ॥ २२ ॥

—स्कंध ११–२०

जे एकनिष्ठ भक्त, साधुशील, समचित्त व बुद्धीपलीकडील परमात्म्याशीं समरस झालेले असतात त्या माझ्या भक्तांना कर्माकर्मामुळें उत्पन्न होणारीं पापपुण्यादि बंधनें नाहींत.

२३

केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ।
येन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरंजसा ॥ २३ ॥

— स्कंध ११–२१

केवळ भक्तिभावाच्या योगानें गोपी, गाई, वृक्ष, पशु, नाग ( कालियादि सर्प ) व इतर मूढबुद्धि प्राणी सिद्धावस्थेस पोंचले व तात्काळ ( अंजसा ) माझ्या स्वरूपीं मिळाले आहेत.

# श्री गोंदवलेकर महाराजांचे अभंग.

५६

समजून उमजून करी पाप । त्याचा यम झाला बाप ॥
आतां लेका कोठें जाशी । तुझें ठेवणें नरकवाशीं ॥
लोका सांगे नीति धर्म । आपण तेंची करी कर्म ॥
दास ह्मणे ऐसे करी । यम त्याचा अंगिकारी ॥

५७

विषय अंतरी खुला । देह दावाग्नि पेटला ॥
विषय प्रवेश केला । सत्य सुखाचा घाला झाला ॥
विषय मनीं घोळे । जगामाजी तोंड काळें ॥
विषयाची गोडी । सत्यबोधा मान मोडी ॥
ऐशी गोडि लागली । पळोपळीं पस्तावली ॥
दास ह्मणे विषयध्यान । तेंचि नरकाचें साधन ॥

५८

तुझें सुख तुझ्या आंत । मूर्ख पाहति विषयांत ॥
आत्मसुख अखंडित । विषयसुख नाशिवंत ॥
विषयसुख इच्छे मना । दुःख भोगती यातना ॥
दास ह्मणे विषय आस । त्यांच्या सुखा झाला नाश ॥

५९

कलीनें दृष्टी फिरविली । बुद्धी अवघी भ्रष्ट झाली ॥
वेदांतावांचुनि नाहीं बोल । ऐसें ज्ञान झालें फोल ॥
उत्तम मध्यम दुराचारी । नर बालक अवघे नारी ॥
स्वधर्म शास्त्र बुडविलें । शब्दज्ञान झालें भलें ॥
मर्यादा अवघीच नासली । पापबुद्धि बळावली ॥
दीनदास ह्मणे एशी वेळ । पुढें आहे कठीण काळ ॥

६०

कर्मभ्रष्ट नर नारी । वर्णसंकर घरोघरीं ॥
वेद शास्त्र नीति गेली । शब्दज्ञानें क्रिया मेली ॥
निर्दय पापबुद्धि । उघड झाली असे सिद्धि ॥
मना आलें ऐसें करिति । शब्दज्ञानें ब्रह्म होती ॥
ब्रह्म होणें नाहीं फुका । ऐसें ज्ञान ऐकू नका ॥
दीनदास म्हणे ऐसे जन । झाले कलीच्या आधीन ॥

६१

कंठ शोषला मारुनि हाका । कोठें गेला रामसखा ॥
आम्हांसाठीं सगुण होशी । आतां कांहो लपलाशी ॥
मज नकू लपू देवा । तुझे पायीं बांधीन जीवा ॥
दास म्हणे मज भेटी न देतां । काया जाळीन मी आतां ॥

६२

कर्म धर्म बुडाला बुडाला । अवघा एकंकार झाला ॥
ऐसे दुर्घट कलींत । काय करावें तें हित ॥
आतां वाटेल तरी हीत करा । रामनाम दृढ धरा ॥
निरिच्छ राही । रामावांचुनि साधन नाहीं ॥
नामें पापें जळतीं । नामें कुळें उद्धरती ॥
नसे काम क्रोध । नामें होय आत्मबोध ॥
नलगे मान कीर्ति । नामें विघ्नें अवघीं पळतीं ॥
दीनदास ह्मणे रामनाम । काटी अवघा भवभ्रम ॥

६३

नलगे खटाटोप कांहीं । नामें सिद्धि लोळे पायीं ॥
नाम राहे हृदयांत । यम त्याशीं शरणांगत ॥
नाम साक्षी आहे मला । नामें वाल्मिक तरला ॥
होय जितेंद्रिय अक्रोध । नाम ध्रुवा अढळपद ॥
नामें हटे भवकाळ । उद्धारिला अजामेळ ॥
दीनदास ह्मणे रामनाम । निज कैवल्याचें धाम ॥

६४

अहंभाव नसे ज्याला । नामें सुफळ जन्म झाला ॥
तुका वैकुंठासी गेला । नामें प्रल्हाद धन्य झाला ॥
वेद गुजाचेहि गुज । रामनाम एक बीज ॥
योगियांचें गुप्तज्ञान । शंकर जपे रामनाम ॥
ऐसी नामाचीये थोरवी । सायुज्यतेचा अधिकारी ॥
दीनदास म्हणे घेतो रामनाम । तेंचि त्याचें अधिष्ठान ॥

६५

अखंड नाम वदे वाणी । तेथें वेद वाहे पाणी ॥
वेद पाठ केला । नाम नसतां निर्फल झाला ॥
कर्म मार्ग शुद्ध आहे । नामावांचुनि मति काय ॥
शास्त्रप्रवृत्ति कथा । नामासाठीं होय वार्ता ॥

नामीं परब्रह्म गाठी । नामीं शास्त्रा नाहीं तुटी ॥
वेदनिर्मित सृष्टि आहे । नाम त्याचे आधीं पाहे ॥
चार युगीं नाम श्रेष्ठ । ह्मणुनि जपे नीलकंठ ॥
दीनदास ह्मणे नाम सुलभ । देवादिकासी दुर्लभ ॥

६६

नामापाशीं सर्व सत्ता । नामें होय ब्रह्मवेत्ता ॥
नाम धन्य तीहीं लोकीं । नाम घेता होय सुखी ॥
नामें हरे दोष पाप । नामें होता नामरूप ॥
दीनदास म्हणे नामीं प्रीती । त्याचे पूर्वज उद्धरीती ॥

६७

नाम श्वासोश्वासी वसे । तेथें ब्रह्म उभें असे ॥
नाम प्रल्हादें घेतलें । परब्रह्म प्रगटलें ॥
नाम घेतां अंतःकरणीं । सहाय होय चापपाणी ॥
नाम जिवासी तारक । शिवापासी खूण एक ॥
जन डोळा हो पहाती । काशी खंडाची प्रचीती ॥
दीनदास म्हणे मिथ्या म्हणती । कोण जाणे त्याची गति ॥

६८

सच्चिदानंदघन । नाम त्याचें अधिष्ठान ॥
वेदांतांची वेद श्रुति । नामाविणें अवघी भ्रांती ॥
नामें श्रेष्ठ संत महंत । नामें पुरती मनोरथ ॥
नामें वैरी मित्र होती । नामें चुके अधोगती ॥
नामें होय मृत्युपरता । नामा ऐसा कोण त्राता ॥
नामें अंतर रंगलें । त्याचे पूर्वज उद्धरिले ॥
नामीं नाहीं भेदाभेद । नाम वेदाचाही वेद ॥
स्वर्ग लोकीं ऋषी मुनी । नामा गाठीं बसले ध्यानीं ॥
शेष वसे पाताळांत । जिव्हा चिरुनि नाम घेत ॥
पहा मृत्युलोकीं संत । नाम रूप करिती चित्त ॥
ब्रम्हा विष्णु महेष । नामी लक्ष श्वासोश्वास ॥
दीनदास म्हणे रामनाम । प्राणाचाही आराम ॥

६९

जेथें नाम अखंडित । तेथें वेद मूर्तिमंत ॥
जेथें नामाचा हो चाळा । तेथील पापें होतीं धुराळा ॥

निष्काम नाम घेतां । तोचि जाणावा ब्रह्मवेत्ता ॥
दीनदास म्हणे नाम रूपीं चित्त । तोचि जाणावा जीवन्मुक्त ॥

७०

शत सहस्र अश्वमेध । पाठ केले चारी वेद ॥
लोहपिष्ठ भक्षियलें । कोटी कल्प तप केलें ॥
अष्टांग योग सिद्ध झाला । सकळ तीर्थांमाजी न्हाला ॥
बहु तपाचे पर्वत । अजिंक झाला तो जगांत ॥
देव दानव शरण येती । ऐसें ज्ञान आलें हातीं ॥
नामीं नाहीं स्थिरावला । अवघा योग फोल झाला ॥
दीनदास म्हणे ऐशाला । पशु म्हणावें तयाला ॥

७१

नाम जपा रात्रंदिन । न लगे शास्त्राचें शोधन ॥
बहु शाहणे विद्वत्ता । नामाविणें गेले वृथा ॥
कैसा होतो अहंब्रह्म । नामावांचुनि अवघा भ्रम ॥
नको नको आत्मज्ञान । नामाविणें आहे शीण ॥
नलगे मानवाची आस । नाम जपा श्वासोश्वास ॥
दीनदास म्हणे रघुनाथ । सर्व पुरवी मनोरथ ॥

७२

सर्व प्रारब्ध क्रियामाण । दुःखी होती अवघे जन ॥
जेथे तेथें दुःखराशि । सुख नाहीं कोणापाशीं ॥
प्राणी पाहे सुखवार्ता । सुख नलगे तया हातां ॥
बद्ध रूपीं वसे मन । दुःख सागर जीवन ॥
येथें सुख नाहीं नाहीं । वेद शास्त्र देती ग्वाही ॥
दीनदास म्हणे नाम घ्यावें । त्यांनीं सुखी व्हावें ॥

७३

काय पाहतां श्रेष्ठ जन । काळ आला हो कठीण ॥
नका भुलूं भलत्या भ्रमीं । नाम जपा अंतरयामीं ॥
भूल पडली कलीमाजीं । असत्याला जन राजी ॥
असत्याचा कंटाळा । नाम जपा वेळोवेळा ॥
जेथें तेथें बुद्धिभेद । मिथ्या ह्मणती शास्त्रवेद ॥
ज्याला सन्निपात झाला । अन्न गोड काय त्याला ॥
दीनदास ह्मणे काळगती । पहा कलीयुगाची प्रचीती ॥

७४

रामभक्ति ब्रह्मज्ञान । भगवें वस्त्र परिधान ॥
भृकुटि लिंग दिसे शिरीं । रूप लावण्या गोजरी ॥
स्वरूप सांप्रदाय सुंदर । मुखीं नाम रघुवीर ॥
ब्रह्मरूप अंतरयामीं । धर्म स्थापक झाले स्वामी ॥
अधर्माते उच्छेदिलें । गोब्राह्मण सुखी केले ॥
दीनदास ह्मणे समर्थ माझा । मारुति अवतरला राजा ॥

७५

ब्रह्म दंड कुबडी करीं । काम धेनु हातीं धरी ।
आराध्य दैवत हनुमंत । शरण जाती साधुसंत ॥
स्वामीपायीं शरण गेला । त्याचा मृत्यु चुकविला ॥
प्रारब्ध काढी रेखा । शिष्य सुखी केला देखा ॥
पहा पहा भगवा झेंडा । शिष्य शिवाजी नो गुंडा ॥
दीनदास ह्मणे स्वामीसत्ता । काळा कंप सुटे पहतां ॥

७६

अहो एका ज्ञानापुढें । ब्रह्मज्ञान ते बापुडें ॥
ब्रह्म होणें काय फुका । ऐसें ज्ञान एकूं नका ॥
एक ब्रह्म सांगे कोण । दुजा बोलत अस कोण ।
शंकर जपे रामनाम । वरकड लंडी आहे कोण ॥
नाम नसतां ब्रह्म जाहला । ऐसा कोणीं हो ऐकिला ॥
दीनदास सांगे तुह्मां । मुखी रामराम बोला ॥

७७

ऐका ऐका श्रेष्ठजन । काळ आला हो कठीण ॥
कलीराजा प्रगटला । धर्म अवघाची बुडाला ॥
देव झाले बौधराज । ब्राह्मण मोडियती लाज ॥
सोडुनिया संध्यास्नान । काणी करिती मद्यपान ।
वेद गेले नीचा हातीं । मातंग वाचतसे पोथी ॥
नास्तीक सांग ब्रम्हज्ञान । शुद्र करिती संध्यास्नान ॥
वेशाव्रत नेम करी । गरती लंपट परद्वारीं ॥
पितापुत्रामाजी वैरी । राजा प्रजासी हो मारी ॥
नीति मर्यादा नासली । पापबुद्ध बळावली ॥
संन्यासी करती विषयाक्रिया । गृहस्थे सोडीयली ॥

कोण जाणे भक्तिभाव । प्लेग झाला गांवोगांव ॥
दीनदास सांगे तुम्हां । मुखीं राम राम बोला ॥

७८

सदा राहे समाधान । तेच जाणा द्रव्यधन ॥
करा नामाचा गजर । हाची करावा व्यापार ॥
श्रद्धा पत्नी ही कुलीन । सत्य पुत्र झाला जाण ॥
अहो नम्रता लीनता । नातुपणतु हेंचे जाणा ॥
दीनदास म्हणे संसार लहान । नीट करावा जतन ॥

७९

अठरा अध्याय गीताज्ञान । मुखीं ध्यावें नाम स्मरण ॥
चारी वेद सांगती सार । आम्ही आश्री हरी नाम ॥
भागवती बोले वर्म । नामीं उभें परब्रह्म ॥
योगी करती अमृतपान । नामीं स्थिरावले मन ॥
दीनदास म्हणे सार । नाम साधनाची थोर ॥

८०

बहुत मेले आणि गेले । त्यासी कोणी काय केलें ॥
जैसे वृक्ष पान टाकी । तैसे संचित देह लोटी ॥
पान वारा घेउनि जाई । तैसा देहा दुःख राही ॥
दास म्हणे प्राण गेले । वृक्ष काय कोणी नेले ॥

८१

रामभक्त दुःखी दीन । ऐसा जगीं आहे कोण ॥
रामभक्त दुःखी देही । तिन्ही लोकीं ऐसा नाहीं ॥
रामभक्ता चिंता क्लेश । ऐसें सत्य नाहीं खास ॥
दास म्हणे जो नाहीं रामभक्त । त्याच दुःखा नाहीं अंत ॥

८२

अजवर होतो तुमचे देशीं । आतां जातो दूरदेशीं ॥
तुम्ही केली फार मेत्रा । दुःख झाले तुमचे जीवा ॥
बहु पातकी मी खळ । तुमची घेतो मी तळमळ ॥
तुम्ही नका करूं तळमळ । धरा भक्तीचे बळ ॥
धरा अंतीं शुद्ध भाव । मुक्त करा तुम्ही जीव ॥
दास म्हणे आज्ञानपण । क्षमा करा भक्तजन ॥

८३

शिमगा केला बहुतानि । परि न होती आत्मज्ञानी ॥
बोंबा मारुनि फेरे घेती । ठाई न पडे भावभक्ति ॥
वर्म नाहीं कळलें म्हणे । मज ज्ञान झालें ॥
दास ह्मणे खरें उमगा । शब्दज्ञानी शुद्ध शिमगा ॥

८४

भगवद्भजनीं भाव दावी । विषयामाजी मन लावी ॥
ब्रम्हज्ञानी बोल बोली । लोभ तृष्णा भक्ति मेली ॥
पडलि विवेकाची तुटी । गर्व दंभ असे पोटी ॥
दास म्हणे ऐसा प्राणी । त्यासी जोडे मारी कोणी ॥

८५

नाम घेता लवलाही । वृत्ती घरी पाणी वाही ॥
राम नाम घेतां गोडि । मन सदा हात जोडी ॥
रामनाम घेतां भला । काम स्वप्नीं नाहीं त्याला ॥
दास म्हणे नाम मुखीं वेई ॥ तेथें माया स्पर्श गर्व नाहीं ॥

८६

राम नामी मन करीन चिंतन । अज केला पण तुझें चरणी ॥
काम क्रोध दोन्ही न पाहे डोळां । तुझें रूप पाहे वेळोवेळां ॥
दुःखाची मी आतां न करी तळमळ । आणि सुख लेश मज नको आतां ॥
दास म्हणे आतां रामनाम घेऊं । सुखाचा सागर आम्ही सेवूं ॥

---


# मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन

ग्रन्थकारः—ल. रा. पांगारकर, बी. ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोडया शिलक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २.

पत्ताः—व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.

# 'तुकाराम आणि रामदास'–इषारा.

महाराष्ट्राला परमपूज्य असलेल्या ह्या दोन थोर विभूतींच्या कार्याबद्दल विचार करणाऱ्यांत अलीकडे २०।२५ वर्षांत असा एक वर्ग निघाला आहे कीं ज्यांना रामदासांचें गुणगौरव करितांना तुकोबाराय व वारकरीपंथ यांच्यावर दोन शिंतोडे उडविल्याशिवाय चैनच पडत नाहीं! आज केवळ इषाऱ्यादाखल त्यासंबंधीं दोन शब्द सांगावेसे वाटतात. प्रथम हें सांगणें अवश्य आहे कीं श्रीसमर्थ व श्रीतुकोबाराय हे दोघेही महात्मे व त्यांचे संप्रदाय यांविषयीं आमचे मनांत निरतिशय प्रेमादर आहे. वारकरी व रामदासी—किंवा नवीन भाषेंत 'धारकरी–' हे दोन्ही पंथ महाराष्ट्राच्या उद्धारास कारण झाले असून एकाच धर्मजागृतीच्या महत्कार्याचीं दोन रूपें आहेत, दोन कला आहेत. महाराष्ट्राला तुकोबाही वंदनीय व परमप्रिय आहेत व रामदासही वंदनीय व परमप्रिय आहेत; तर मग एकाचें गुणगौरव करितांना दुसऱ्याला कमीपणा दिलाच पाहिजे अशी राजसवृत्ति आपल्या चळवळींत उत्पन्न कां करितां? वारकरी लोक रामदासांचीं वचनें कीर्तनांतून घेत नाहींत असा वारकऱ्यांवर एक आक्षेप आहे, पण वारकरी कीर्तनांतून रामदासांना नांवें तरी ठेवीत नाहींत; आणि अलीकडचे कित्येक रामदासाभिमानी देशभक्त विद्वान् लोक रामदासांचें कार्य वर्णितांना तुकोबा व वारकरी पंथ यांना दोन शिव्या हासडल्याशिवाय स्वस्थ बसत नाहींत. आम्हांला हा मार्ग अत्यंत अप्रशस्त व घोर परिणामी वाटतो. एक तर तो अयथार्थ आहे, दुसरें तो गैरमुत्सद्दीपणाचा आहे, तिसरें तो देशांत निष्कारण वितुष्ट पाडणारा आहे. सांप्रतच्या ब्राह्मण–ब्राम्हणेतर वादाच्या काळांत हे ब्राह्मण देशभक्त केवळ रामदासांची महती वाढविण्याच्या हेतूनें तुकोबांना व त्यांच्या पंथाला उणेपणा आणण्याची खटपट करीत आहेत असा त्यामुळें गैरसमज ब्राह्मणेतरांत पिकण्याचा संभव आहे, अर्थात् हें विषबीज विनाकारण पेरलें जात आहे. तुकोबांना परमेश्वरी विभूति मानणारे हजारो लोक महाराष्ट्रांत आहेत व असणार. त्यांचीं मनें त्यांना नांवें ठेवून तुम्ही निष्कारण दुखवीत आहांत, हें शहाणपण नव्हे. ज्याला जो पूज्य व प्रिय वाटतो त्याच्या विरुद्ध कोणीं ब्र बोललेलें न रुचणें हा मनुष्यस्वभाव विसरून चालायचें नाहीं. लोकमान्यांच्या विरुद्ध कांहीं बोललें लिहिलेलें त्यांच्या भक्तांस बिलकूल आवडत नाहीं; रानडयांच्या विरुद्ध शब्दही त्यांच्या शिष्यांस—ना. गोखल्यांस अस्वस्थ करीत असे; फार काय पण केशवसुत किंवा गडकरी यांच्या चाहत्यांस त्यांच्या विरुद्ध बोललेलें

खपत नाहीं, यांत गैर आहे असें नाहीं, हा मनुष्यस्वभाव आहे. ज्या-विषयीं मनाला पूज्यता वाटते त्याविरुद्ध बोललेलें सहन न होणें हा कदाचित् मनाचा दुबळेपणा असेल पण हा मनुष्यस्वभाव आहे. हा ध्यानीं धरून सुज्ञांनीं वाणी किंवा लेखणी चालवावी हें युक्त आहे. राजवाडयांच्या एका लेखामुळें एकदा सारी प्रभू जात कशी खवळून गेली हें सुज्ञांस माहीत आहेच. समर्थांचे गुण गाणाऱ्यांना 'सावधपण सर्वविषयीं' ही त्यांची शिकवण महत्वाची वाटत नाहीं काय? कोणत्याही कारणानें समाजांत असलेला एकोपा केवळ Academic Discussions च्या योगानें ढळवूं देणें हें 'असावधपणाचें' नाहीं काय? नस्ते वाद उकरून काढून किंवा वाढीस लावून ऐक्याची घडी विस्कळित करणें व 'मना मनासि मीळणी' करून सकळ लोक एक करण्याचा समर्थांचा उपदेश विसरणें हें गैर सावधपणाचेंच लक्षण आहे. 'मूर्खांसी मूर्ख ह्मणों नये, वेडयांसी वेडें ह्मणों नये, तरीच घडे दिग्विजय, निस्पृहासी' इ० समर्थांच्या शिकवणी काय व्यर्थ आहेत? मूर्खास मूर्ख, वेडयास वेडा जेथें ह्मणायचें नाहीं तेथें शहाण्यास मूर्ख किंवा वेडा म्हणून कसें चालेल? 'भागवतधर्म—महाराष्ट्रधर्म' या बद्दलचा वाद असाच व्यर्थ आहे. वैदिकधर्म तोच भागवतधर्म व तोच महाराष्ट्रधर्म. त्यालाच लौकिक 'हिंदुधर्म' हें नांव आहे. दोन तीन नामांकित शास्त्री वैदिकधर्माच्या कैवारानें भागवतधर्माविरुद्ध बोलणारे आह्मांस माहीत आहेत; तसेंच भागवतधर्माविरुद्ध 'महाराष्ट्रधर्म' इ० प्रलापही असमंजसपणाचे आहेत. 'दासबोध हा महाराष्ट्रधर्माचा आद्यग्रंथ' ह्मणून अट्टहासानें सांगणारे एक 'रामदासी' आहेत त्यांना आह्मी विचारतों कीं मग काय ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नामदेवतुकोबांचे अभंग हे काय महाराष्ट्रधर्माचे ग्रंथ नाहींत? महाराष्ट्रधर्म ह्मणजे महाराष्ट्रांतल्या लोकांचा धर्म, हिंदुधर्म, भागवतधर्म. ज्ञानेश्वर, नाथ, नामदेव तुकोबादि सर्व संतांचे परमार्थविषयक सिद्धांत तेच सर्वस्वीं रामदासांनीं आपल्या ग्रंथांत शिकविले आहेत. ह्या सर्वांनीं एकच धर्म सांगितला आहे. समर्थांचें विशिष्टपण आह्मांस माहीत आहे व त्याबद्दल त्यांचें गौरव आह्मीही करितों, पण देश-कालवर्तमानानुसार समर्थांनीं जे 'राजकारण' जुन्या धर्मांत समाविष्ट केलें त्यामुळें त्यांनीं कांहीं वेगळा धर्म काढला असें होत नाहीं. समर्थही भागवत धर्मीयच आहेत. रामाप्रमाणें कृष्णचरित्रही त्यांनीं गायिलें आहे, रामकृष्ण एकरूपच आहेत. भागवत ग्रंथही त्यांना वंद्य आहे, त्याला त्यांनीं सच्छास्त्र ह्मटलें आहे. गीतेपासून भागवत तोडायचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. त्यांचे अभिमानी ह्मणविणारे त्यांच्या नांवावर असंबद्ध विधानें करीत आहेत. राम-

आणि कृष्ण यांत भेद, गीता आणि भागवत यांत भेद, प्रवृत्ति आणि निवृत्ति यांत भेद, महाराष्ट्रधर्म आणि भागवतधर्म यांत भेद असे पदोपदीं भेद पाडून राम, गीता, प्रवृत्ति व महाराष्ट्रधर्म यांचें समर्थन किंवा गौरव करण्याच्या भरांत कृष्ण, भागवत, निवृत्ति व भागवतधर्म यांचा उपहास किंवा हेटाळणी करण्याचा प्रघात या कित्येक देशभक्तांनीं आज २५ वर्षें पाडला आहे, पण तो चुकीचा असून नसते भेद वाढविणारा आहे. या लोकांच्या ग्रथांतील उतारे देऊन त्यांच्या मताचें खंडण करितां येण्यासारखें आहे, पण वादांत पडण्याची आह्मांस इच्छा नाहीं ह्मणून आज इषाऱ्यावरच हा विषय येथें सोडून देतों. भेदांतही अभेद पाहण्याच्या सात्विक बुद्धीनें ऐक्य वाढतें, व अभेदांतही भेद शोधून किंवा कल्पून ते वाढविणें याच्या योगानें 'नानापंथ नानामतें' यांना जोर चढून राष्ट्रांतील ऐक्याचा बंध फुटतो व समाज विस्कळित होतो. देशभक्तांनीं तरी दुहीं वाढविणें मुत्सद्दीपणाचें नाहीं. पारमार्थिक बुद्धीच्या अभेदानें न पाहतां आलें तरी निदान व्यावहारिक धोरणाच्या दृष्टीनें तरी राजकारणविरोधी असे भेद पिकवीत बसूं नका एवढेंच सांगणें आहे.

---

## हा खादीचा पराक्रम पहाल का ?

मि. रिचर्ड्स नांवाच्या एका युरोपियन लेखकानें एका इंग्रजी मासिकांत म. गांधींच्या खादीचे चळवळीसंबंधीं एक लेख लिहिला असून तिच्या प्रसारामुळें मँचेस्टरचें कसें व किती नुकसान झालें हें त्यांत त्यानें चांगलें विशद करून दाखविलें आहे. ज्यावेळीं खादीच्या चळवळींचा भर होता त्यावेळीं म्हणजे २१ सालीं मँचेस्टरच्या ठिकठिकाणच्या गिरण्यांतून सारें २९०२ दशलक्ष यार्ड कापड निघालें व त्याच्याच अगोदरच्या २० सालीं तें ४४३५ दशलक्ष यार्ड निघालें होतें ! असहकारितेच्या ओसरत्या पुरामुळें २२–२३ सालीं २१ सालापेक्षां जरी जास्त कापड निघालें तरी त्याचेंही मान ४१८४ व ४१४१ असें उतरतेंच आहे. सदर लेखक आपल्या लेखांत म्हणतोः—"म. गांधींची ही चळवळ वाढत गेल्यास मँचेस्टरला फार त्रास होईल. हिंदुस्थान दरिद्री असलें तरी मँचेस्टरच्या चांगल्या गिऱ्हाईकांपैकीं ते एक आहे, परंतु खादीच्या चळवळीमुळें दरिद्री देशाला परवडणारें कापड (अर्थात् खादी) वापरण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊन मँ. च्या सुबक कपड्याचा लोक साहजिकच त्याग करीत आहेत. हिंदुस्थानला सुसंपन्न करून हिंदुस्थानांतील असंतोष जर नाहींसा केला तर मँ. चें उत्तम गिऱ्हाईक हिंदुस्थानच ठरेल." मँचेस्टरसारख्या पुढारलेल्या व नांवाजलेल्या युरोपियन कारखा-

त्याचें लक्षावधि रुपयांनीं नुकसान करण्याचें व त्याचे सहस्त्रावधि कामकऱ्यास बेकार करण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे असें या खादीच्या चळवळीनें पूर्ण सिद्ध केलें आहे. ज्या चळवळीमुळें ब्रिटिशांसारख्या बलाढ्य राष्ट्राची इतकी हलाखीची स्थिति होऊन मि. रिचर्ड्ससारख्या त्यांच्याच जातभाईस 'हिंदुस्थानांतील असंतोष दूर करून त्यास सुसंपन्न करा,' अशी ब्रिटिश राष्ट्राला जाहीर सूचना करण्याची पाळी येते त्या खादीच्या चळवळीचा हा काय लहान सहान पराक्रम आहे ? अर्थशास्त्र व राजकारण यांचें संमिश्र व सुंदर स्वरूप म्हणजेच खादी होय हें तत्त्व महात्माजी व मोतीलालजी यांचे-प्रमाणें इतर हट्टी व या बाबतींतील कट्टर प्रतिष्ठितांस खादीचा वरील पुरुषार्थ पाहिल्यानंतर तरी पटेल तर बरें होईल. —स्वतंत्र हिंदुस्थान.

---

## ' जगद्गुरु ' हिंदुस्थानः—

इटालीची राजधानी जें रोम शहर त्या रोम युनिव्हर्सिटीचे संस्कृत भाषेचे प्रोफेसर कार्लो फॉर्मिची हे डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या विश्वभारती विश्व-विद्यालयांत कांहीं दिवस राहून परत इटालीला गेले. कविसम्राट् रवींद्रनाथांची अंतर्राष्ट्रीय ध्येयें आणि विश्वबंधुत्व ह्यासंबंधीं सहानुभूति दर्शविण्यासाठीं ते इटालीचे कर्णधार मुसलोनी ह्यांचा संदेश घेऊन मुद्दाम येथें आले होते. इटा-लीला परत जातांना मुंबईस क्रॉनिकलच्या प्रतिनिधीनें त्यांची मुलाखत घेतली. त्या मुलाखतींत प्रोफेसर साहेबांनीं हिंदुस्थानसंबंधीं जे उद्गार काढले ते मन-नीय आहेत. " जगाच्या संस्कृतीला हिंदुस्थान कोणची मदत करूं शकेल " असा प्रश्न विचारला असतां प्रो. साहेब म्हणाले, " आध्यात्मिक बाबतींत हिंदुस्थान जगाचा गुरु होऊं शकेल. महर्षि देवेंद्रनाथ टागोर ह्यांच्या दहनविधीला मी हजर होतों. त्या विधीचा माझ्या मनावर फारच चांगला संस्कार झाला आहे. हिंदी लोक ज्या पवित्र भावनेनें धर्मविधि करतात ती पाहून त्यांच्या धर्माच्या उदात्ततेची कल्पना करता येते. धर्म हेंच संस्कृतीचें उच्च व्यक्त स्वरूप आहे. " हिंदुस्थानच्या अधिभौतिक उन्नतिसंबंधीं प्रश्न विचारला असतां प्रो. साहेब म्हणाले " आध्यात्मिक आणि अधिभौतिक ह्या दोहोंच्या संयोजितेवरच हिंदुस्थानचें भवितव्य अवलंबून आहे. आम्ही पाश्चात्यांनीं आपल्याला शास्त्रीय शोधकबुद्धि आणि शक्ति द्यावयाची असून तुम्ही आम्हांला अध्यात्मिकता द्यावयाची आहे. असें झालें तर त्यांत परस्परांचेंहि कल्याण होणार आहे." " महात्मा गांधीसंबंधीं इटालीची काय वृत्ति आहे " असें विचारलें असतां प्रो. म्हणाले, " असें मी कांहीहि आढेवेढे न घेतां सांगू

शकतों कीं महात्मा गांधींच्या चळवळीच्या नैतिक परिवर्तनासंबंधानें इटालीमध्यें पुष्कळ प्रशंसा होत आहे. ही आदर्श चळवळ आहे. जगामध्यें ही चळवळ अपूर्व असून ह्या ऐतिहासिक गोष्टीचे अत्यंत महत्त्व आहे. त्यांची चळवळ पाहून मला खिस्त किंवा बुद्ध ह्यांच्या धार्मिक चळवळीची आठवण होते आणि विसाव्या शतकांत ही चळवळ चाललेली पाहणें हें अपूर्व असून स्फूर्तिदायक आहे." प्रो. साहेबांच्या एकंदर सर्व उद्गारांवरून हिंदुस्थानला कांहीं बोध घेण्यासारख्या नाहीं काय? —प्रबोध.

---

### नाशीकच्या सुप्रसिद्ध
## गोविंद कवीचें शेवटचें पद्य.

[जन्म शके १७९५ माघ वद्य ८] [मृत्यु—फाल्गुन शुद्ध १ शके १८४७

---

## धांवा.

**चाल** ( देवा धांवरे लौकरी ॥ संकट पडलें भारी )

देवा! दावी रे निजचरण। मंगल शोभन सगुण ॥
त्यातें मनःसंयमीं स्थापून। ध्यानानें पूजीन ॥ ध्रु० ॥
देवा! दावी रे निजचरण। करीन त्यांचें भजन ॥
त्यांना जाऊन मग शरण। घालिन लोटांगण ॥ देवा० ॥ १ ॥
देवा! दावी रे निजचरण। घेइन तद्दर्शन ॥
मस्तक श्रीफल त्या वाहून। वाहिन अन्तःकरण ॥ देवा० ॥ २ ॥
देवा! दावी रे निजचरण। मज कर पुण्यवान ॥
ज्याला ध्याऊनी तपोधन। झालें धन्य-मान ॥ देवा० ॥ ३ ॥
करितां पुण्याचें अर्जन। तुझें चरण दर्शन ॥
वाटे भक्तांना भक्तीचें। पुण्याहवाचन ॥ देवा० ॥ ४ ॥
होते माधवा! तव चरण। श्रेया श्रेयस्कर ॥
करिते त्याच परी पदोपदीं। प्रेयाला प्रियतर ॥ देवा० ॥ ५ ॥
झाले माधवा! तव चरण। जन नयनाचे रमण ॥
त्यांचें माहात्म्य ऐकून। रंजे मनिं रंजन ॥ देवा० ॥ ६ ॥
देवा! माधवा! तव चरण। ते न चालिचे चरण ॥
केवळ पूजेचे ते चरण। वंदनीय ते चरण ॥ देवा० ॥ ७ ॥
देवा! माधवा! तव चरण। जीवांचे ते चरण ॥
जीव चरणाला चिंतून। कळतो नारायण ॥ देवा० ॥ ८ ॥

देवा ! माधवा ! तव वदन । साऱ्यांचें तें वदन ॥
साऱ्या वदनांला मनिं स्मरुन । दिसतो श्री भगवान ॥ देवा०॥ ९ ॥
साऱ्या जीवांच्या वदनांनीं । हांसे मनमोहन ॥
साऱ्या विश्वाच्या अधरांनीं । हरि करि मुरलीगान ॥ देवा०॥ १० ॥
साऱ्या चराचराच्या नयनांनीं । पाही यदुनंदन ॥
आम्हा साऱ्यांच्या हृदयांनीं । रमे भक्त-रंजन ॥ देवा० ॥ ११ ॥
साऱ्या जीवांतील श्रीकृष्ण । ज्ञानचक्षूंनीं दिसतो ॥
साऱ्या आत्म्यांतील गोविंद । तन्मयतेनें मिळतो ॥ देवा० ॥ १२ ॥
साऱ्या हृदयांतील गोविंद । तोची प्रेमानंद ॥
देवा ! गोविंदा ! आनंदा ! । ये धांवत स्वच्छंदा ॥ देवा० ॥ १३ ॥
आहे भक्तीचा तव धंदा । न करी तो रे ! मंदा ॥
देउनि भक्ती या गोविंदा । कर त्या भक्तीबंदा ॥ देवा० ॥ १४ ॥
प्रेमें सेवाया मत्प्रेम । यावें मेघःशाम ! ॥
माझ्या आत्म्याच्या मंदीरीं । येऊं दे तव स्वारी ॥ देवा० ॥ १५ ॥
माझ्या हृदयींचा सन्मान । देतों सिंहासन ॥
त्यावर मंडित हो सुंदर । हंसवित वदनेंदीर ॥ देवा० ॥ १६ ॥
माझ्या भक्तीची कालिंदी । स्नान तुला घलील ॥
माझ्या स्तवनाची फुलबाग । पुष्पें तुज वाहील ॥ देवा० ॥ १७ ॥
माझ्या काव्याची स्वरवल्ली । माला तुज अर्पील ॥
माझ्या प्रीतीची रक्तीमा । कुंकुमास रेखील ॥ देवा० ॥ १८ ॥
माझ्या जीवाची सारसुधा । नैवेद्या दावील ॥
माझ्या स्वराची सरस्वती । सुरस गान छेडील ॥ देवा० ॥ १९ ॥
माझ्या प्रतिभेची विभा प्रभा । आरति ओवाळील ॥
माझ्या ज्ञानाची सुमंत्रता । मंत्रपुष्प गाईल ॥ देवा० ॥ २० ॥
वाजवुन टाळ ते टाळयांचे । वीणे उत्कंठेचे ॥
घुमविन मृदंग मग हर्षाचे । करीन कीर्तन तुमचें ॥ देवा० ॥ २१ ॥
देवा ! नमनें तुज हातांचीं । भालांचीं शीर्षांचीं ॥
देवा ! नमनें तुज साष्टांगें । नम्रांगें लोटांगें ॥ देवा० ॥ २२ ॥
देवा ! नमनें तुज सर्वांगें । अनंगशा आत्मांगें ॥
देवा ! नमनें तुज शब्दांचीं । अर्थाभावार्थांचीं ॥ देवा० ॥ २३ ॥
देवा ! नमनें तुज नाचून । गरगरा फीरून ॥
देवा ! नमनें तुज सहस्रदां । सहस्रदां सर्वदा ॥ देवा० ॥ २४ ॥

( अपूर्ण. )

श्री पांडुरंग प्रसन्न.

# भक्तांचा स्वधर्म.

( ले० धुंडिराज रामचंद्र महाराज, पंढरपूर )

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म ।

——तुकोबाराय.

१ परमेश्वरानें स्वतःच्या लीलेनें ही स्थावर जंगमात्मक सृष्टि उत्पन्न केली व त्यांत आपणास अतिशय प्रियतम अशी मानवी प्रकृति निर्माण करून त्यांच्या पाठीमागें जातिधर्म, आश्रमधर्म लावून दिले. उदाहरणार्थ ब्राम्हणांनाः—

शमो दमस्तपःशौचं क्षांतिरार्जवमेव च ॥

ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ गी० १८—४२.

हीं नऊ कर्मे व ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम. तसेंच क्षत्रियांसः—

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ॥

दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

इ. इ. सात कर्मे. व वैश्यांसः—

कृषिगोरक्षवाणिज्यं वैश्यकर्मस्वभावजम् ॥

हे तीन धर्म व :—

परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

हें शूद्रांचें कर्म. सारांश, कोणीही मनुष्य कोणत्या तरी एका जातिव्यतिरिक्त उत्पन्नच होत नाहीं, व तो ज्या एका जातींत जन्मला असेल त्या जात्यभिप्रेत वर्णाश्रमादिकांचें पालन करणें त्यास अवश्य आहे. न केल्यास त्यास अधोगतीला जाणें भाग पडतें असें आर्यांचें धर्मशास्त्र सांगतें. भक्तही कोणत्या तरी एका जातीमध्येंच उत्पन्न होतात; परंतु ते आपल्या जातिधर्मानें ते पाळीत असूनही लिप्त होत नाहींत. कारण, जातिविशिष्ट धर्माचरणाचें फल संकुचित ( म्ह० निष्काम रीतीनें तें कर्म आचरलें गेल्यास चित्तशुद्धी व सकामिक आचरण झाल्यास पुण्यलोकप्राप्ती ) असतें. पण भक्त अशा संकुचित फलाची मुळींच इच्छा करीत नसतात. कारण धर्म दोन प्रकारचाः एक प्रवृत्तिरूप धर्म व दुसरा निवृत्तिरूप धर्म. प्रवृत्तिरूप म्ह० जातिविशिष्ट-धर्म, व निवृत्तिरूप म्ह० त्यापेक्षां श्रेष्ठ असा भागवतधर्म. प्रवृत्तिरूप धर्माचरणाला देहाभिमानाची अवश्यकता असते, पण भक्तांचा देहाभिमान ( म्ह०

मी देही किंवा माझा देह ही भावना ) नष्ट झाल्यामुळें ते प्रवृत्तिरूप धर्मांपासून अलिप्त असतात, व भगवंतासही असाच भक्त अतिशय आवडतो.

न यस्य जन्मकर्मभ्यां न वर्गाश्रमजातिभिः ।
सज्जतेऽस्मिन्नहंभावो देहे वै स हरेः प्रियः ॥ भा. ११–२–५१.

जरी जाहला उत्तम वर्ण । तरी तो न म्हणे मी ब्राम्हण ।
स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण । मी लोहिवा पूर्ण स्फटिक न म्हणे ॥
ज्यासी नाहीं देहाभिमान । तो हातीं न धरी देहाचा वर्ण ।
तैसाचि आश्रमाचा अभिमान । भक्त सज्ञान न धरी कदा ॥ ए० भा० ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजांनींही आपला अनुभव असाच सांगितला आहे—

यातिकुळ माझें गेलें हारपोनी । श्रीरंगावांचोनि आनु नेणे ॥ ज्ञा० ॥

भक्तांच्या अंतःकरणवृत्तींची धांव ज्या एका विशिष्ट ध्येयप्राप्तीविषयीं असते ( तें ध्येय म्ह० परमात्मप्राप्तीच होय, दुसरें नाहीं.) त्याकरितां जातिवर्णाश्रमादि प्रवृत्तिलक्षण धर्मांची मुळींच अवश्यकता नाहीं हेंच श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात. " म्हणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण " ॥ज्ञा०॥ व या विषयांत त्यांनीं एक दृष्टांतही फारच सयुक्तिक दिला आहेः—

राजाज्ञेचीं अक्षरें आहातीं । तिये चामा एका जया पडती ।
तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तू ॥ १५३ ॥
वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे ॥
तेचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवी ॥ १५४ ॥
म्हणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण ॥
एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ १५६ ॥ ज्ञा० अ. ९.

प्रवृत्तिलक्षण धर्मांची पोंच ध्येयापर्यंत नसते, तो अलीकडेच राहतो असें श्रीज्ञानेश्वर महाराज सदृष्टांत सांगतातः—

कां खैर चंदन काष्ठें । हीं विवंचना तंवचि घटे ॥
जंव न घापती एकवटे । अग्नीमाजि ॥ ४५९ ॥
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ॥
जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ४६० ॥
मग जाते व्यक्ति पडे बिंदुले । जेव्हां भावें होती मज मिनले ॥
जैसे लवणकण घातले । सागरामाजीं ॥ ४६१ ॥ ज्ञा० अ० ९.

उंचनीच कांहीं नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्ति देखोनियां ॥ तु० ॥

सारांश, ईशप्राप्त्यर्थ प्रवृत्तिरूप धर्मांची मुळींच अवश्यकता नसते. इतकेंच नव्हे पण हरिचरणीं विमुख राहून कितीही वर्णाश्रमधर्मांचें पालन करणारा

ब्राह्मण असेल तर त्यापेक्षां भगवद्भक्त श्वपच श्रेष्ठ होय असें प्रल्हाद म्हणतात. ( श्रीमद्भागवत स्कं. ७ ):---

विप्राद्द्विषड्गुणयुतादरविंदनाभ–। पादारविंदाविमुखात्श्वपचं वरिष्ठम् ॥

* * * *

हो कां वर्णामाजि अग्रगणी । जो विमुख हरिचरणीं ।
त्याहुनि श्वपच श्रेष्ठ मानीं । जो भगवद्भजनीं प्रमळ ॥ ए० भा० ॥

अभक्त ब्राह्मणापेक्षां वैष्णव भगवद्भक्त चांभार श्रेष्ठ असें श्री तु० म० ही म्हणतात. म्हणून भक्त श्रेष्ठ अशा भागवत धर्माचाच स्वीकार करितात. आतां भक्त ज्या एका श्रेष्ठ धर्माचा अवलंब करितात तो धर्म कसा व कोणता हें पाहूं. या श्रेष्ठ धर्माची प्रल्हादांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें व्याख्या केली आहे :--

स वै पुंसां परो धर्मः यतो भक्तिरधोक्षजे ।
अहेतुक्यप्रतिहता ययाऽऽत्मा संप्रसीदति ॥ भा० ७ ॥

श्रीतुकाराम महाराजही म्हणतातः---

मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसानीं अंतीं ॥ १ ॥

श्रीकृष्ण भगवानही श्रेष्ठ धर्माचें हेंच लक्षण सांगतात---

"धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तो" भाग. ११. यावर श्रीएकनाथ महाराज म्हणतात---

ऐक उद्धवा निजवर्म । गुह्य सांगेन मी परम ॥
माझी भक्ति जे सप्रेम । उत्तम धर्म तो जाण ॥

श्री ज्ञानेश्वर महाराजही या परधर्माची हीच व्याख्या करितातः---

सकळ धर्माचें कारण । नामस्मरण हरिकीर्तन ॥
दया क्षमा समाधान । संतजन साधिती ॥ १ ॥

इतकेंच नव्हे तर आम्हां भागवतांचा हाच निज धर्म आहे.

" निजधर्म हा चोखडा । नाम उच्चारूं वडघडा ॥"

सारांश, " निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास " पांडुरंगाविषयीं अनन्य अहैतुकी, अव्यभिचारी भक्ति, प्रत्येक इंद्रियांकडून भगवंताचीच सेवा, सर्व कर्में भगवदर्पण करणें, " तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् " या नारदांच्या आज्ञेप्रमाणें कामक्रोधाभिमानादि विकारांना सुद्धां भगवदर्पण करणें,हाच तो श्रेष्ठ असा भागवधर्म आहे, व हाच धर्म श्रीकृष्णांनीं निर्याणप्रसंगीं दारुकाला सांगितला आहे. श्रीएकनाथमहाराज म्हणतातः---

हृदयीं नित्य माझें ध्यान । मुखीं माझें नामकीर्तन ॥
श्रवणीं माझें कथाश्रवण । करी मदर्चन सर्वदा ॥

नयनीं मम मूर्तिदर्शन । चरणीं मदालयागमन ।।
रसनें मम तीर्थप्राशन । मत्प्रसादभोजन अत्यादरें ।।
साष्टांगें मजन्ति नमन । आल्हादें मद्भक्तां आलिंगन ॥
सप्रेम माझे सेवेवीण । रिता अर्ध क्षण जाऊं नेदी ।।
ऐसी सेवा करितां पाहा हो । सर्व भूतीं देखे मद्भावो ।
हा सर्व धर्मामाजि रावो । तेथें अपावो कदा न रिघे ॥ ए० भा० ३०

सारांश, सदैव सर्वभावानें भगवत्परायण असणें हाच भागवतोत्तमांचा श्रेष्ठ असा स्वधर्म आहे, व ह्या धर्माचें आचरण करीत असतां त्यांचे ठिकाणीं जाति, विद्या, रूप, कुल, धन, क्रिया इ० भेद राहात नाहींत,कारण ते सर्वांतर्यामीं जो हरि तद्रूप झालेले असतात, असें श्रीनारद म्हणतात.

नास्ति तेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादि भेदः । यतस्तदीयाः ।।

---

॥ श्रीसद्गुरुनाथ भगवान् वासुदेवाय नमः ॥

# श्री विश्वनाथमहाराज पाटणकर ह्यांचें संक्षिप्त चरित्र.

( लेखकः—**विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर**, सरवेअर, मुंबई. )

१ संतचरित्रें हीं जगदुद्धारक व परम पवित्र असतात म्हणून संतचरित्रांचें श्रवण करणें हें मंगलांतलें परम मंगल होय. जगदुद्धार करण्यासाठीं अवतरलेली 'ईश्वरी विभूति' श्रीसद्गुरुसमर्थ विश्वनाथ महाराज ह्यांचें जन्मस्थान दक्षिण महाराष्ट्रामध्यें सह्याद्रि पर्वतापासून बारा कोसांवर रत्नागिरी जिल्ह्यांत देवगड तालुक्यांत 'वाडें-पडेल' ह्मणून एक टुमदार गांव आहे तें होय. हें गांव बारा वाड्या मिळून बनलेलें आहे. येथें भिकाजीपंत पाटणकर ह्मणून शांडिल्यगोत्री कोंकणस्थ ब्राह्मण रहात होते. हे उत्तम वैदिक असून, परम सुशीळ, स्वधर्मपरायण व ईश्वरभक्त होते. त्यांची वृत्ति भिक्षुकीची होती. ह्यांची आनंदीबाई नांवाची भाग्यशाली पत्नी होती. ही मोठी सात्विक व महापतिव्रता होती. शालिवाहन शक १७२३ ह्या वर्षीं विश्वनाथ महाराज ह्या सत्पुत्रास आनंदीबाईनें जन्म दिला. धन्य तिचा कुसवा कीं ज्यापासून असलें दिव्य रत्न जगताला लाभलें ! आणि धन्य आमची ही महाराष्ट्रभूमि कीं, जेथें 'श्री वासुदेव भक्तीची' टोलेजंग इमारत उभारण्यास, विश्वनाथ महाराजांसारखा अमोल हिरा पैदा झाला ! !

॥ ओवी. ॥

विवेक वैराग्य रूपा आलें ज्ञान । कां भक्तिनिधान प्रगटलें ॥ १ ॥
कीं नेणोनि गुण ब्रह्म साकारलें । होय रूपा आलें परब्रह्म ॥ २ ॥

भिकाजीपंत व आनंदीबाई म्हणजे मूर्तिमंत सविवेक वैराग्य आणि भक्ति हीं होत. वैराग्य व भक्ति ह्यांच्या पोटीं ज्ञानस्वरूप 'विश्वनाथ' उत्पन्न होणें ही गोष्ट स्वाभाविक आहे. "शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं"—तुकाराम. "यथा बीज तथांकुर." म्हणजे "खाण तशी माती आणि बीज तसा अंकुर" ह्या म्हणीप्रमाणें उत्तम खाणीमध्यें जीं अलौकिक रत्नें पैदा होतात, तीं तशींच योग्यतेचीं असतात. त्याप्रमाणें वैष्णवांच्या पवित्र कुळामध्यें विश्वनाथ महाराजांचें जन्म झालें. बाराव्या दिवशीं नामकरणविधि होऊन पुत्राचें नांव 'विश्वनाथ' असें ठेविलें. पुढें त्यांनीं आपल्या कुळाचा उद्धार केला. त्यांचे हातून महत्कार्य घडून आलें. त्यांनीं महाराष्ट्रामध्यें श्रीवासुदेवीभक्तीचा झेंडा रोंविला. तेच हे सद्गुरु विश्वनाथ महाराज प्रस्तुत चरित्राचें नायक होत.

२ भविष्यत् कालाचा उदय तत्पूर्वचिन्हांकित असतो, त्याप्रमाणें विश्वनाथ महाराजांच्या आंगचे भजन, पूजन, भक्ति, शांति, समाधानवृत्ति, नम्रता सहनशीलता हे गुण त्यांच्या भावी साधुवृत्तीचीं पूर्वचिन्हेंच होतीं, आणि भावी प्रच्छन्न भाग्यगुण लहानपणीं त्यांच्या खेळांत दिसून येत असत. विश्वनाथ महाराज धुळाक्षर, लेखनवाचन, व व्यावहारिक हिशोब घरींच शिकले. त्यांची कुशाग्रबुद्धि जाणून, त्यांना वेदाक्षर त्वरित येईल म्हणून, त्यांचें मौंजीबंधन लवकर केलें. मुंज झाल्यावर त्यांचेकडून वेदाध्ययन करविलें. यामुळें त्यांस ब्रह्मकर्माचें उत्कृष्ट वळण लागलें. नंतर बारावे वर्षीं लग्नसमारंभ झाला.

॥ ओवी. ॥

म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यजनयाजन ॥
जो करी तया बंधन । कांहींच न घडे ॥ १ ॥ ज्ञानेश्वरी.

प्रथमतः मनुष्यानें आपापल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें जीं जीं विहित कर्में सांगितलीं आहेत, तीं तीं यथासांग करून चित्तशुद्धि करावी, म्हणजे तो मनुष्य सद्गुरुचरणाचिंतनाला योग्य होतो. सद्गुरुभक्त बनला म्हणजे, आत्मज्ञानाचा अधिकारी बनून, आत्मज्ञानाचें फल जें आत्मस्वरूप तें त्यास प्राप्त होतें. आणि जीव जन्ममरणदुःखापासून मुक्त होतो.

३ विश्वनाथ महाराजांनीं त्रिकाळ संध्यावंदनादि विधि बिनचूक करावेत, स्तोत्रपाठ म्हणावेत, सकाळसंध्याकाळ देवास व गुरुजनांस नमस्कार करावेत. त्यांना वेदाध्ययनाचा किंवा देवाच्या पूजेअर्चेचा कंटाळा कधींच आला नाहीं.

त्यांना कथा–पुराण श्रवण करण्याची मोठी हौस असे. त्यांच्या सत्वगुणी अंतःकरणांत ज्ञानोदय लवकर होत असे. वैष्णवाच्या घराण्यांत जन्म मिळाल्यामुळें त्यांस भगवद्भक्तीचें बाळकडू मिळूं लागलें अशा प्रकारें पारमार्थिक ज्ञानामृतासारख्या पोषक खाद्यावर त्यांचा ज्ञानपिंड वाढत चालला.

॥ ओवी. ॥

सहावी भक्ति ते वंदन । करावें देवासी नमन ॥
संतसाधु सज्जन । नमस्कारीत जावें ॥ १ ॥ श्रीसमर्थ.

वाडें–पडेल येथें श्रीदेव विमलेश्वराचें सुंदर देवालय आहे. तेथें गीता, भारत व रामायण वगैरे धार्मिक ग्रंथांचें पुराण होत असें, आणि कधीं मधीं कथाकीर्तन होत असें. विश्वनाथ महाराजांचा आपल्या मातोश्रीबरोबर पुराण श्रवण करावयास व कथाकीर्तन ऐकावयास जाण्याचा परिपाठ होता. पुराण कथाकीर्तन चाललें असतां, त्यांची वृत्ति तन्मय होत असे. भारत, भागवत, पुराणादि ग्रंथांतील उत्तमोत्तम भाग व आख्यानें ह्यांची त्यांस चांगली ओळख होऊन, उदात्त विचारांशीं व अध्यात्मज्ञानाशीं, त्यांचा चांगला परिचय होऊं लागला. आत्मशिक्षणार्थ ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम व श्रीसमर्थ रामदासस्वामी वगैरे साधुसंतांचे प्रासादिक ग्रंथ वाचण्याचा व्यासंग त्यांनीं सुरू ठेविला. पुराणांत, कथाकीर्तनांत ऐकलेल्या विषयांचा शांतपणें श्रीविमलेश्वराचे देवालयांत विचार करीत त्यांनीं एकांतीं बसावें. श्रीएकनाथ, श्रीनामदेव, श्रीतुकाराम वगैरे भगवद्भक्तांचे हेतु पूर्ण करण्याकरितां श्रीभगवंतानीं निरनिराळे अवतार कसे धारण केले ? क्षणभंगुर जगताचें खरें स्वरूप ओळखून संसार करीत असूनही, कित्येक श्रीनामदेव, श्रीतुकारामांसारखे महात्मे, साधुपुरुष कसे बनले ? पांडवांनीं प्रेमभक्ति केल्यामुळें, त्यांच्या घरीं द्वारकाधीश श्रीकृष्ण परमात्मा कसा राबत होता ? श्रीएकनाथ महाराजांनीं निःसीम भक्ति केल्यामुळें, श्रीभगवान निर्गुणाचा सगुण अवतार धरून, ‘ श्रीखंडया ’ नांवानें चाकर होऊन, गंगेचें पाणी वाहून, कशी सेवा करीत होते ? आत्मज्ञानाच्या परम गुह्य भांडाराच्या किल्ल्या कोणत्या सत्पुरुषाजवळ असतील ? भवसागरापासून तारणारे श्रीसद्गुरुनाथ आपणांस कसे भेटतील ? अशा प्रकारचे अनेक विचारतरंग त्यांच्या अंतःकरणांवर वारंवार उठत असत. मानवी जीवित साफल्य करण्यास आणि आत्मज्ञानार्थ सद्गुरूला शरण गेलें पाहिजे, अशी त्यांची मनोदेवता त्यांस वारंवार सांगत असे. यामुळें त्यांस सद्गुरुचरण केव्हां दिसतील, असा हृद्रोग लागला. श्रीसद्गुरुनाथ केव्हां भेटतील, या चिंतेनें त्यांचें मन उद्विग्न होऊन, त्यांना प्रत्येक क्षण युगासमान भासूं लागला

सद्गुरुदर्शनाविषयीं त्यांच्या जीवाला सारखी तळमळ लागून राहिली. शुभेच्छा उत्पन्न होणें हें मोठ्या पुण्याईचें व भाग्याचें लक्षण होय !!

॥ ओवी ॥

प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ती । संत सचेतन माझ्या मूर्ती ।
दृढभावें केल्या त्यांची भक्ती । ते मज निश्चिती पावती ॥ १ ॥
प्रतिमा निजकल्पना उत्तम । संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम ॥
चालतें बोलतें परब्रह्म । अति उत्तम साधुसेवा ॥ (नाथभागवत)

संत हीं देवाचीं रूपें आहेत. देव ते संत व संत ते देव होत. संत हे भगवत्स्वरूपाकार झालेले महात्मे होत. विश्वनाथ महाराजांनीं मोठ्या उत्कंठेनें वाटेगांवीं जाऊन, श्रीगुरु वासुदेवस्वामी दिनानाथ ह्यांचें दर्शन घेतलें. ध्रुवास जसें नारदांचें दर्शन झालें, त्याप्रमाणें विश्वनाथ महाराजांस श्रीगुरूचें दर्शन झालें, हें मोठें सुदैव होय ! त्यांनीं साष्टांग नमस्कार करून, श्रीगुरूचे घट्ट पाय धरिले. त्यांनीं त्यांस प्रेमालिंगन दिलें; आणि विचारपूस करून, आपल्याजवळ ठेवून घेतलें. श्रीगुरूची प्रसन्न मुद्रा, त्यांच्या अंगावर झळकत असलेलें दिव्य ब्रह्मतेज, कडकडीत वैराग्य, दयार्द्र भाषण हीं पाहून, त्यांस समाधान झालें. श्रीगुरूची अद्वितीय भक्ति व ब्रह्मनिष्ठा पाहून, त्यांची चित्तवृत्ति त्यांचे ठिकाणीं जडली. 'गुरुः साक्षात् परब्रह्म' अशा परमपूज्य बुद्धीनें त्यांनीं श्रीगुरुची एकनिष्ठपणें सेवा आरंभली. 'श्रीगुरुसेवा' हीच परमेश्वरभक्ति मानून, श्रीगुरुचे पायीं देह चंदनापरी झिजवूं लागले. ते प्रेमानें तनमन सर्वस्व वेंचून गुरुपरिचर्या करूं लागले. श्रीगुरुची सेवा एकनिष्ठपणें करतां करतां त्यांचे मनोविकार मावळूं लागले. कामक्रोधादि रिपु निःसत्व होऊं लागले. अंतःकरणांत आत्मज्ञानाची ज्योत पेटूं लागली. काया दिव्य होऊं लागली. चित्ताची शुद्धि होऊन, ते साधनचतुष्टयसंपन्न बनले. ते श्रीगुरुअनुग्रहाला पात्र झाले. ते आत्मज्ञानार्थ श्रीगुरूला अनन्यभावानें शरण गेले. त्यांचें श्रद्धाबळ व प्रज्ञाबळ दांडगें होतें.

॥ ओव्या ॥

हृदया हृदय एक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें ॥
द्वैत न मोडतां केलें । आपणा ऐसें अर्जुना ॥ १ ॥
जीव परमात्मा दोनी । बैसले एकासनीं ।
जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ॥ २ ॥ (ज्ञानेश्वरी.)

* * * *

सद्गुरुबोध जेव्हां झाला । चहूं देहांस अंत आला ॥
तेणें निजध्यास लागला । स्वस्वरूपीं ॥ १ ॥

बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण ॥
तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षीं ॥ २ ॥ (दासबोध.)

विश्वनाथ महाराज अधिकारसंपन्न शिष्य पाहून, श्रीगुरूंनीं त्यांस विधिपूर्वक श्रीवासुदेवाची उपासना दिली. वरदहस्त त्यांचे मस्तकीं ठेवून तारक महामंत्र सांगितला. ॐकार गुह्यशास्त्राची अनुभविक मोडणी दाखविली. शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति व आत्मप्रचीतीचें ऐक्य पटविलें. राजगुह्य राजविद्येचा उपदेश केला. त्यांस आपणांसारखें कृतार्थ केलें.

॥ अभंग ॥

सोहं हंसा ऐसें म्हणती तत्त्वमसी । तें ब्रह्म आहेसी तूंचि स्वयें ॥ १ ॥
प्रथम नीळवर्ण पाहे निजज्योति । दुसरी ते भ्रांती कृष्णवर्ण ॥ २ ॥
तिसरा उजाळा दिसे धुद्राकार । तयामाजी फिरे अणुरेणू ॥ ३ ॥
चतुर्थ तो श्याम शांतीचिये वस्ती । उन्मनी निश्चिती पीतवर्ण ॥ ४ ॥
चंद्रज्योति समान उजळला साहावा । तुका म्हणे घ्यावा निवडोनी ॥५॥

एके दिवशीं श्रीगुरूंनीं विश्वनाथ महाराजांस सांगितलें कीं, "अध्यात्म, आत्मज्ञान विषयाचें श्रवण झाल्यावर, तीर्थयात्रा करण्याचा परिपाठ आहे. त्याप्रमाणें तुम्हीं तीर्थयात्रा करावी. क्षेत्राक्षेत्राच्या ठिकाणच्या साधुसंतांचीं दर्शनें घ्यावींत. गुरुदक्षिणा—निर्गुण सद्गुरुपासना घेऊन यावी. स्वगृहीं जाऊन गृहस्थाश्रमी बनावें. सर्व आश्रमामध्यें गृहस्थाश्रम हा उत्तम आहे. सर्व ठिकाणीं 'श्रीवासुदेव' भरलेला आहे, असें जाणून, सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवावा. दृश्य हें अशाश्वत आहे. श्रीवासुदेवस्वरूप शाश्वत आहे. तें एकमेवाद्वितीय आहे, असें जाणावें श्रीवासुदेवभक्ति वाढवावी. तुमचे हांतून जगदुद्धाराचें लोकोत्तर कार्य होईल, हा माझा तुम्हांला पूर्ण आशीर्वाद आहे." श्रीगुरूंच्या मुखांतून हीं वाक्यें श्रवण करून, त्यांचे नेत्र अश्रुपूरित झाले. श्रीगुरूंच्या वियोगाचें दुःख भोगावें लागणार, म्हणून ते अत्यंत विव्हळ झाले.

४ श्रीगुरूंचे चरण वंदन करून, ते तीर्थयात्रा करावयास निघाले. त्यांचेबरोबर त्यांचे गुरुबंधु नारायणबोवा म्हणून काशीपर्यंत होते. ही गोष्ट फाल्गुन वद्य शके १७६६ त घडली.

नारायण म्हणसी कोणे देशी । तो बदरिकाश्रमीं आश्रमवासी ॥
नारद सनकादिक ऋषी । अद्यापि त्यापासीं सेवेसी असती ॥ १ ॥
एवं परमात्मा परं ज्योती । आत्मा हृदयस्थ त्रिजगती ॥
त्यातें नारायण म्हणती । जाण निश्चिती नृपनाथा ॥ २ ॥
तरी परमात्मा ब्रह्ममूर्ति पूर्ण । तुझे हृदयीं नांदे आपण ॥
ज्याचेनि मन बुद्धि प्राण । इंद्रियें जाण वर्तती ॥ ३ ॥ (नाथभागवत.)

विश्वनाथ महाराज तीर्थयात्रा करीत करीत, पुण्यस्थळें पहात पहात, व अनेक साधुसंतांचीं दर्शनें घेत घेत बदरिकेदारास आले. तेथून शिक्यांतून ते बदरिनारायणास गेले. तेथें त्यांनीं श्रीनारायणाचें दर्शन घेऊन साक्षात् दर्शन होण्यासाठीं, तपश्चर्या आरंभिली.

कृष्णविष्णु हरि गोविंद । म्हणतां प्रगटे परमानंद ।।
जों जों उच्चारी नाम । तों तों प्रगटे मेघश्याम ।।——नाथ भागवत.

* * * *

म्हणा श्रीराम जयराम । भवसिंधु तारक नाम ।।
रामाची आवडी । काळ केला देशोधडी ।।

ते श्रीनारायणाचें एकाग्र चित्तानें ध्यान करीत असतां, व " मुखीं उच्चारितां नाम । पुढें उभा मेघःश्याम " या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें घडून आलें. भगवंताच्या दर्शनाच्या उत्कंठेनें त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. सात्विक अष्टभावांनीं त्यांचें शरीर रोमांचित झालें. वाचा सद्गद झाली. त्यांचें चित्त परमावधीचें आतूर झालें. नारायण हृदयांत हळूहळू प्रगट होऊं लागलें. निजचैतन्य ज्योतीचा प्रकाश चंद्रज्योतीप्रमाणें फांकूं लागला. भगवान् चतुर्भुज दिसत होते. मुखावर हास्य विराजत होतें. नेत्र आरक्त होते. मस्तकावर किरीट, व कानांत कुंडलें चमकत होतीं. पीतांबर परिधान केला होता. वक्षस्थळावर लक्ष्मीचें चिन्ह होतें. अशा ध्यानगंभीर मूर्तीचें दर्शन होतांच, विश्वनाथ महाराजांची स्वस्वरूपीं समाधि लागली. ते स्वानंद सुखाचे ठिकाणीं रमूं लागले. ते भक्तिसुखानंद भोगूं लागले. श्रीनारायणाचे दर्शनामुळें विश्वनाथ महाराज कृतार्थ झाले.

।। ओवी ।।

एवं भागवतधर्मीं जाण । जो कोणी अनन्य शरण ।।
त्यासी तुष्टोनियां नारायण । निजात्मता पूर्ण स्वयें देतु ।।
——नाथ भागवत.

' अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ' म्हणजे अनन्यभावानें भगवंताचे स्वरूपीं रंगुन जाणें ही उपासना होय.

हा तो केवळ आत्माराम । जो सर्व सुखाचा विश्रामधाम ।
निजध्यासीं जपतां राम । आत्मनिजपद देतसे ।। ( कपिलगीता )

पुढें विश्वनाथ महाराजांचा बेत ' महापंथाला ' जाण्याचा झाला. हा मार्ग त्यांनीं केदारकल्प ग्रंथांत वाचला होता. पुढील सर्व विघ्ननिरसनार्थ जपपुरश्चरणें करून मंत्रसिद्धी प्राप्त करून घेतली. बदरीनारायणाहून वर जाण्यास तीन

मार्ग आहेत. ( १ ) स्वर्गारोहण ( २ ) भृगुपंथ, ( ३ ) महापंथ. यांपैकीं दोन मार्ग नाशिवंत असून, तिसरा महापंथ मोठ्या पुण्याईचा आहे. हे तीनही मार्ग अंतर्बाह्य आहेत. ते महापंथास जावयास निघाले. ते प्रथम ' नारापुरीस ' गेले. तेथून ' भदेश्वर ' माला ' गौरीकुंडी ' हंसतीर्थ ' ' विधिनेश्वर ' श्रीगणपतीचें स्थळीं गेले पुढें ते उत्तराभिमुख निघाले. त्यांस एक शिला दिसली. पुढें त्यास ' अर्धचंद्र शिला दिसली. तेथून पुढें एक शिवलिंग ' दिसलें. तेथें ' हेमवयतीर्थ ' आहे. तेथें पाणी बर्फमय असून पांच प्रकारचें विचित्र रंगाचें आहे. ह्या पाण्याला स्पर्श करतांच स्थूल देह पतन पावतो. तेथें विश्वनाथ महाराजांनीं तपश्चर्या आरंभिली.

जो नित्यसिद्ध सच्चिदानंदु । प्रकृतिरूप परमानंदू ।
सगुण जाला जी गोविंदु । स्वानंदकंदु स्वलीला ॥ ( नाथ )

* * *

श्रीराम जयराम जयजयराम । ऐसा कांहीं एक करूनियां नेम ॥
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल नियमें ॥ ( समर्थ )

हरिभक्तानें हरिकृपा जोडणें, हाच नरजन्माचा पुरुषार्थ आहे. हरीसाठींच हरिचिंतन करावयाचें. हरिप्रेमा हा अक्षय सौख्यनिधि आहे. देव सगुण आहे व निर्गुणही आहे. देव प्रत्यक्ष आहे. देव आंत बाहेर भरून उरला आहे. सर्व जगताच्या हृदयांत देव आहे. विश्वनाथ महाराज ' हेमवय तीर्थी ' स्नान करावयास गेले. ते त्या पाण्याला स्पर्श करणार इतक्यांत, हृदयस्थ आत्माराम वासुदेव सगुणरूपानें प्रगटून, त्यांस वरचेवर उचलून धरिले. त्यांचा वेष सिद्धपुरुषासारखा होता. त्यांनीं मस्तकावर वरद हस्त ठेवून, त्यांस आपणांसारखे ' ज्ञानस्वरूप परीस ' बनविले. सिद्धपुरुष म्हणाले:--" तुझी भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहे. ह्या ' हेमवय ' तीर्थी मनुष्याचे पंचभूतात्मक स्थूल देह पतन पावतात. पुढें दिव्य देहानें जावें लागतें. तूं महाभागवत जन्मास आला आहेस. प्रत्यक्ष माझाच तूं अवतार आहेस. तुझ्या हातून भागवतधर्माचा प्रसार व जड मूढ जीवांचा उद्धार व्हावयाचा आहे. तूं हजारों मुमुक्षूंना श्रीवासुदेवाचें भक्तिमार्गास लावणार आहेस. तुझे हातून प्रासादिक अध्यात्म ग्रंथ निर्माण होणार आहेत. यासाठीं तूं असाच माघारा जा. मी तुला अधिकारसंपन्न मुमुक्षूंस ' अध्यात्म आत्मज्ञान बुद्धियोग आनंदानुभव समाधि ' प्राप्त व्हावी म्हणून बोधक शक्ति व सांप्रदायानुरूप अनुग्रह करण्याची ' निर्गुण मंत्रदीक्षा ' देतों, ' असें म्हणून त्यांचे स्वाधीन महाप्रसादरूप पोथी केली. आणि त्यांस डोळे झांकण्यास सांगून, आपण अंतर्धान पावले. "
विश्वनाथमहाराज डोळे उघडून पाहतात तों, आपण ' हरिद्वारीं ' आहों

असें त्यांस आढळलें. ते हृदयस्थ आत्माराम वासुदेवाच्या दर्शनानें जीवन्मुक्त स्थितीचा सोहळा भोगूं लागले. ते स्वानंदसाम्राज्यपदावर आरूढ होऊन, कृतार्थ झाले. आत्माराम श्रीवासुदेवांनीं कृपेची पाखर घालून, त्यांस जगदुद्धार करण्यास समर्थ केलें.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टवीती सर्वकाळ"—तुकाराम.
नंतर ते 'हरिद्वाराहून' काशीक्षेत्रीं आले. त्यांचें कडकडीत वैराग्य अनुपम शांति, अस्सल साधूपणा वगैरे उज्वल गुण पाहून, काशीकर शास्त्री-पंडित चकित होऊन गेले. त्यांच्या ज्ञान—वैराग्य—भक्तीची छाप मोठमोठ्या-शास्त्रीपंडितावर पडली. तेथें जे अनन्यभावानें शरण आले, त्यांस 'श्रीवासुदेवी निर्गुण उपासना' देऊन 'भागवत—आनंद सांप्रदाय' जगदुद्धारार्थ प्रथम तेथें सुरू केला. तेथून ते 'वाटेगांवीं' आले. तों त्यांचे श्रीगुरु वासुदेवस्वामी दिनानाथ ह्यांनीं शके १८६७ च्या श्रावण शु० ३ बुधवारीं समाधि घेतली होती. त्यांनीं त्या समाधीस तीन प्रदक्षिणा घातल्या. व गुरुदक्षिणा घेऊन आल्याचें सांगून तिला साष्टांग नमस्कार घातले. तेव्हां ती समाधि डोलूं लागली. कित्येक भाविक लोकांस या समाधीचा साक्षात्कार होत असतो.

तुज गुरुत्वें नमूं जातां। तंव आत्मा तूंचि आंतौता॥
आंत कीं बाहेर पाहों जातां। सर्वीं सर्वथा तूंचि तूं॥(नाथभागवत).

६. श्रीगुरु वासुदेवस्वामी दिनानाथ ह्यांनीं विश्वनाथमहाराजांस स्वप्नामध्यें दर्शन देऊन असें सांगितलें कीं, "हिमालयीं जाऊन 'गुरुदक्षिणा—श्रीवासुदेवी निर्गुण उपासना' आणिली आहे, ती माझे नातवास द्यावी." त्याप्रमाणें त्यांनीं श्रीगुरूचे नातु ह. भ. प. वाटेश्वरबोवा दिवेकर यांस सद्गुरूपासना दिली. तेव्हां त्यांस सहज समाधि लागली. नंतर ते बऱ्याच वेळानें शुद्धीवर आले. त्यांस 'भागवत—आनंद संप्रदाय, चालविण्यास आज्ञा दिली. हल्लीं वाटेगांवास महाभागवत गोविंदबुवा दिवेकर संप्रदायपरंपरा चालवीत आहेत.

तरावया संसार—आपत्ती। नौका एक सत्संगती॥
चारी पुरुषार्थ चारी मुक्ती। दासी होती सत्संगें॥ (मुक्तेश्वर.)

जिल्हा सातारा, संस्थान औंध, तालुका आडपाडी येथील ह. भ. प. तुकाराम पांडुरंग देशपांडे हे "सद्गुरुवांचुनि सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं आधीं" हा तुकारामाचा अभंगचरण शाळेंत वाचून, सद्गुरुप्राप्तीसाठीं जे निघाले, ते क्षेत्राक्षेत्राचे ठिकाणीं साधुसंताचीं दर्शनें घेत घेत, तीर्थयात्रा करूं लागले. पुढें त्यांस श्रीरामरायांनीं स्वप्नामध्यें दृष्टांत दिला. तेव्हां ते वाटेगांवीं जाऊन, सद्गुरु विश्वनाथमहाराजांचें दर्शन घेऊन, त्यांस आत्म-

ज्ञानासाठीं अनन्यभावें शरण गेले. त्यांनीं सद्गुरुसेवा उत्तम केली तेव्हां त्यांस 'श्रीवासुदेवी निर्गुण उपासना' दिली व आपला पट्टशिष्य करून ' भागवत-आनंद-संप्रदाय ' पुढें चालविण्यास अनुज्ञा दिली. पुढें ह्यांनीं महाराष्ट्रामध्यें मुमुक्षुजीवांचा उद्धार करून, श्रीवासुदेवभक्तीचा वर्षाव केला. ह्यांचा शिष्यसमुदाय बराच आहे. ह्यांचे पट्टशिष्य श्रीकृष्णबुवा स्वामी हे श्रीजयरामस्वामी वडगांवकर ह्यांच्या गादीवर विराजमान आहेत. सद्गुरु तुकाराममहाराजांनीं अवतारकृत्य संपविल्यावर, हल्लीं त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव महाभागवत दिगंबर तुकाराम देशपांडे हे पंढरपूर येथील श्रीजयरामस्वामी वडगांवकरांचे मठांत श्रीवासुदेवभक्तीचा उत्कर्ष करीत आहेत. ' मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ' ह्या तुकोक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून उपासना चालवीत आहेत.

७ वाटेगांवाहून सद्गुरु विश्वनाथमहाराज पुण्यास आले. श्रीगुरु आज्ञेप्रमाणें सद्गुरु विश्वनाथमहाराजांनीं गृहस्थाश्रम पत्करला. त्यांचे गीता, ज्ञानेश्वरी, नाथभागवत, विवेकसिंधु, परमामृत, दासबोध, कपिलगीता व आनंदलहरी हे आवडते ग्रंथ होते. हें ' अध्यात्म निरूपण ' करून मुमुक्षुजनांस श्रीवासुदेवभक्तीस लावीत आणि उपदेशानें हजारो जीवांचा उद्धार करीत; सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवून, आयुष्य घालवीत. ते देही असून, पूर्ण विदेही होते. त्यांना पत्नीही ' अन्नपूर्णाबाई ' फार सुशील मिळाली होती. लोक तिला ' भक्तिच ' मनुष्यरूपानें अवतरलेली म्हणत. त्यांच्या गृहाला ' ईश्वरीमंदिराची ' शोभा आली होती. त्यांत असा ' लक्ष्मीनारायणाचा जोडा ' अन्योन्यप्रेमानें नांदत असलेला पाहून, भाविक लोकांस मोठा आनंद होत असे. त्यांस तीन अपत्यें होतीं; दोन मुलगे व एक मुलगी. थोरल्या मुलाचें नांव माधवराव व धाकटयाचें नांव वासुदेव असें होतें. व मुलीचें नांव सौ० गोदूबाई असें आहे.

जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ॥
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ ज्ञानेश्वरी.

यानंतर घरची मंडळी घेऊन सद्गुरु विश्वनाथ महाराज वाईपासून सहा कोसावर कृष्णातीरीं ' धोम ' या क्षेत्रीं ' श्री लक्ष्मीनृसिंहाचें मंदिर ' आहे, तेथें रहावयास गेले. एके दिवशीं संध्याकाळीं ' अध्यात्मनिरूपण ' चाललें असतां त्या वेळचे बडोद्याचे जज्ज कै० श्री० जनार्दन सखाराम गाडगीळ, व श्रीमंत पंतसचिव हे तेथें आले व अध्यात्मनिरूपण ऐकून परम समाधान पावले व मुखांतून धन्योद्गार काढिले. माहुलीचे सुप्रसिद्ध विद्वद्वर्य वे. शा. सं. कै. रामशास्त्री गोडबोले हे सद्गुरु विश्वनाथमहाराजांचे शिष्य होते. त्यांनीं श्रीगुरू-

वर एक संस्कृत अष्टक केलें आहे. " धन्य म्हणे तुका जन्मा तोंच आलों । हरिरंगीं रंगलों सर्व भावें. " सत्संग, संतसेवा, व संतकृपा हीं ईश्वरीमंदिरांत जाण्याचीं तीन द्वारें आहेत. तीं उघडतांच ईश्वराचें दर्शन होतें.

८ शके १७६९ सालीं सद्गुरु विश्वनाथमहाराज रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यांत गेले. तेथून देवाचें गोठणें येथें गेले. तेथें कै० वे० वामन जोशी, दादाशेट खाडये, आत्मारामशेट नारकर, सदू तेली वगैरे मुमुक्षुजन अनन्यभावें शरण आले, त्यांस अनुग्रह दिला. सदु तेली यांचें मस्तकावर वरदहस्त ठेवतांच त्यांस सहजसमाधि लागली. तेथून ते ' वेंगुर्लें ' गांवीं गेले. तेथील मुमुक्षुजनांस अनुग्रह दिला. त्यांत नामांकित कै. श्री. काळबा यशवंत गाडेकर, नाना गाडेकर, महादेव गोविंदशेट भडगे, रामचंद्र बाळकृष्ण महाडेश्वर वगैरे बरीच शिष्य शाखा झाली.

वेंगुर्लेनजीक दापोली म्हणून एक खेडें आहे. तेथें गोखले उपनांवाचे मोठे देवीउपासक होते. ते सद्गुरु विश्वनाथमहाराजांशीं वाद करून त्या वादांत त्यांस जिंकण्याकरितां निवण्याचे तयारींत होते. परंतु रात्रीं देवीनें दर्शन देऊन सांगितलें कीं, " त्या महात्म्याचा छल करण्यास मुळींच जाऊं नकोस. गेलास तर अधःपात होईल. ती ईश्वरी विभूति आहे. " त्यामुळें त्यांची विद्वत्तेची घमेंडी जिरून ते मोठे पश्चाताप पावले; व साष्टांग नमस्कार घालून ते शरण गेले.

> हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ॥
> म्हणोनि भक्तांमाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ॥ ॥ ज्ञानेश्वरी ॥

नंतर वेंगुर्ल्याहून विश्वनाथमहाराज मुंबईस येऊन तेथून पुण्यास गेले. त्यांची ' अध्यात्म निरूपणाविषयीं ' लोकोत्तर कीर्ति ऐकून, आळंदीचे श्रीनरसिंह सरस्वतीस्वामी पुण्यास आले होते. त्यांच्या समक्ष मोरोबादादांच्या वाड्यांत नवव्या अध्यायांतील राजयोगाचें खरें रहस्य काय आहे ? यासंबंधानें सद्गुरुविश्वनाथमहाराजांचें ज्ञानेश्वरीवरील प्रासादिक निरूपण झालें. तेणेंकरून ते स्वानंदसागरांत मग्न झाले.

"अवघें ब्रम्हरूप रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे " तुकाराम.

एकदां श्रीनानामहाराज जोशी साखरे वगैरे वारकरी मंडळींनें येऊन, त्यांनीं सगुणभक्ति व निर्गुणभक्ति यांवरील, त्यांचें ' अध्यात्मनिरूपण ' ऐकिलें. त्याचा सारांश असा होता कीं, " मनुष्याला निर्गुण उपासना— सद्गुरूपासना ' प्राप्त झाली म्हणून, सगुण उपासनेचा उच्छेद करूं नये. आत्मज्ञान प्राप्त झालें तरी, नित्य कर्में व वर्णाश्रमधर्मविचार सोडूं नयेत. ब्रह्मवेत्ता झाला तरी, यथेच्छ आचरण करतां कामा नये. स्वैर वर्त-

नानें ' अतो भ्रष्टः ततो भ्रष्टः ' अशी स्थिति होते. यासाठीं स्वभावतः जबरदस्त असणाऱ्या मनास आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं तद्रूप करण्यासाठीं, ' अध्यात्म निरूपण ' व ' निष्काम कर्म ' अवश्य केलीं पाहिजेत. अंतरांत नेहमीं ' आत्मविचार ' जागृत ठेविला पाहिजे. नेहमीं चित्त भक्तिभावानें तुडुंब भरून ठेवून, तें चिन्मय केलें पाहिजे; म्हणजे शांतिसुखाचा लाभ होऊन सहज समाधि प्राप्त होते. श्रद्धावंताला सर्वत्र देव चैतन्यस्वरूपांत दिसतो, परंतु ज्यांचे ठिकाणीं ज्ञानाभिमान जागृत आहे, त्यांना जवळ असूनही मुळींच दिसत नाहीं. पाखांडयांना तर मूर्तींत देव दिसत नाहीं. परंतु भगवद्भक्तांना तेंच ' सुंदर तें ध्यान ' असें, नटलेलें परब्रह्म विटेवर चैतन्याच्या गाभेसारखें स्वयंभू दिसतें. यासाठीं सगुणानेंच निर्गुण प्राप्त करून घेतलें पाहिजे. सगुण देव तोच निर्गुण चैतन्य साकार देव होय. "

आतां ब्रह्मज्ञानाची किल्ली । सांगेन एकचि बोली ॥
ज्याची कल्पना निमाली । तोचि प्राप्त पुरुष ॥ स्वात्मसुख- एकनाथ

जें वेदाचे अभ्यंतरीं । तें काढूनि अपत्यापरी ॥
शिष्यश्रवणीं कवळभरी । उद्गार वचनें ॥ श्रीसमर्थ.

सद्गुरु विश्वनाथमहाराज लोकांत अत्यंत प्रिय झाले, त्याचें कारण त्यांचें अप्रतिम ' अध्यात्मनिरूपण ' हें होय. पुष्कळ लोक प्रेमावांचून परमार्थनिरूपण सांगत असतात. बहुतेक शब्दांचीच चर्पटपंजरी असते. प्रेमानें ' अध्यात्मनिरूपण ' सांगणारा मनुष्य धन्य होय. परमार्थग्रंथ पढून प्रेमसागर उचंबळत नसेल तर, तें पढणें निष्फळ होय. सद्गुरूपासून आत्मज्ञान प्राप्त झालें नाहीं, आणि आत्मसाक्षात्कार झाला नाहीं तर, ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी फोल होत. हृदयस्थ आत्माराम वासुदेवाच्या ठिकाणीं परम प्रेम ठेवून, त्याच्या नामस्मरणांत अखंड रंगून जाणें, व सर्वभूतीं श्रीवासुदेवभाव ठेवणें हा त्यांचा भागवतधर्माचा मुख्य उपदेश असे. त्यांच्या तत्कालिक प्रासादिक स्फूर्तींच्या अलौकिक गुणामुळें त्यांचें ' अध्यात्मनिरूपण ' अनुपम होत असें.

९ विश्वनाथमहाराजांचा जगदुद्धारार्थ संचार वाटेगांव, कऱ्हाड, सांगली, भिलवडी, पुणें, सातारा, मुंबई, राजापूर, व वेंगुर्लें वगैरे ठिकाणीं होत असे. त्यांची शिष्यशाखा बरीच आहे. वे. सं. पन्हाळगडकर, गाडगीळशास्त्री वगैरे मोठमोठे विद्वान शास्त्री पंडित त्यांचे शिष्य होते. भिलवडीस ' अवधूत नांवाचे ब्रह्मचारीबोवा होते. त्यांचें भगवद्दर्शन होण्यासाठीं अनुष्ठान चाललें होतें. त्यास सद्गुरु विश्वनाथमहाराजांस शरण जाण्याविषयीं दृष्टांत झाला. तेव्हां ते शिष्य बनून त्यांनीं ध्यानयोग साधला " सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ती ॥

भावार्थे करितां अनन्यभक्ती । शिष्यासी स्वात्मसुखाची प्राप्ती । होय निश्चितीं तत्काळ " —स्वात्मसुख, एकनाथ.

सद्गुरु विश्वनाथमहाराजांचे ठिकाणीं 'अद्वैत' इतकें लख्ख बाणून गेलें होतें कीं, ते भक्तिसुखानंद अनुभवणाऱ्या जीवन्मुक्त कोटींतल्या साधूप्रमाणें होते. ते अद्वैतज्ञानी असून 'सद्गुरुभक्त' होते. त्यांच्या ठिकाणीं ज्ञान व भक्ति हीं एकरूपच झालेलीं होतीं.

म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहो शब्दांचा अर्थु ।
श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायीं ॥ ( अमृतानुभव )
जें अद्वैतावरही भागिजे । तें अनुभवीचे तूं विरजे ॥
पुसोनि मज माझें । देतोसि सुख ॥ ( ज्ञानेश्वरी )
आत्मक्रीडः आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥ मुंडकोपनिषद्.

अद्वैतांत भक्ति नाहीं असें कित्येक ज्ञानी लोकांस वाटतें; पण तें खरें नाहीं. अद्वैतांत प्रेमभक्ति आहे इतकेंच नव्हे पण अद्वैतांतच खरी भक्ति आहे. तिला ज्ञानोत्तर भक्ति असें म्हणतात. " अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें, नोहे बोला ऐसें " असें ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. अद्वैताचा भक्तीशीं विरोध नाहीं, एकजीव आहे. स्वानंदसुख आणि भक्तिप्रेमसुख हीं एकरूप आहेत. तेथें सत्चित् आनंद । हाही नाहीं त्रिविध भेद ॥ सदोदित परमानंद स्वानंदशुद्ध कोंदला " नाथभागवत. मूळशून्यब्रह्म अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या पिंडब्रह्मांड रचनेचा व त्याच्या पलीकडील आत्माराम श्री वासुदेव स्वरूपाचा विचार पिंडब्रह्मांड—अज्ञानस्थितींत राहून न करतां संतांच्या तुर्यावस्था—जागृतींत राहून सद्गुरु विश्वनाथमहाराज आत्मस्वरूपबोधाच्या विचारानेंच करीत होते व सद्गुरुबोधाच्या स्वयंप्रकाशानें आत्माराम वासुदेवाची प्राप्ति होते हेंच तत्व प्रतिपादीत होते. हा महात्मा अद्वैत आत्मज्ञाननिरूपणाविषयीं व श्रीवासुदेवभक्तीविषयीं चोहोंकडे गाजला. मोक्षसुखाहून भक्तिसुखानंदाची माधुरी अधिक आहे हें लोकांस पटवून दिलें.

९ महाराजांची मुमुक्षुजनांच्या उद्धाराकरितां मराठीभाषेंत बरीच अमोलिक ग्रंथसंपत्ति आहे. ती अप्रसिद्ध आहे. ती पुढीलप्रमाणें:—

( १ ) भ्रांतित्रय ( २ ) सृष्टीक्रम ( ३ ) केदारकल्प ( ४ ) विविधमत मीमांसा ( ५ ) गीतार्थानुभवटीका ( ६ ) मतिप्रकाश ( ७ ) गुरुगीतेवर टीका ( ८ ) वज्रोपनिषत्वर टीका ( ९ ) चतुःश्लोकी भागवतावर टीका ( १० ) गर्भगितेवर टीका ( ११ ) अपरोक्षानुभूतीवर समश्लोकी ( १२ ) गायत्री भाष्य टीका.

हे ग्रंथ जगाच्या आध्यात्मिक उन्नतीकरितां व जडमूड जीवांना उद्धाराक-

रितां म्हणजे एक अमूल्य व अक्षय्य ज्ञानठेवाच होय. सत्पुरुषाच्या प्रासादिक वाणींतून जे स्वयंस्फूर्तीचे स्वतंत्र ओजस्वी तुषार निघतात तेच खरे ग्रंथ होत. संतांचे ग्रंथ हे कामधेनु असून, मुमुक्षूजनांना जीवमान करणारें अमृत आहे. आत्मस्वरूपाच्या बोधानें बोलणाऱ्या महात्म्याची आदेशवाणी ही पूर्णपणें उद्धारक असून, नवजीवन व चैतन्य देणारी आहे. ' गीतार्थानुभव ' हा ग्रंथ ज्ञानेश्वरीचा दुसरा अवतारच होय. ' गीतार्थानुभव ' बोध हृदयांत सांठविला तर, जीव जन्ममरणदुःखापासून सुटून, आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं मिळेल यांत संशय नाहीं. सद्गुरु विश्वनाथ महाराजांनीं महाराष्ट्रांत श्रीवासुदेव भक्तीचा प्रसार करून, जडमूढ जीवांस उद्धरलें व आपला देह चंदनापरी झिजवला व शके १८०५ वैशाख शुद्ध द्वादशीला सातारा येथें आपलें अवतार कृत्य संपवून, ते स्वरूपाकार झाले.

श्रीवासुदेवकीर्ति प्रगट केली । विश्वनाथें महिमा वाढविली ॥ शिष्यमंडळी उद्धरली । वासुदेव भक्तीनें ॥ १ ॥ आपुला जन्म सार्थक केला । वासुदेव भक्तीमध्यें बुडविला । भूमंडळीं उद्धरिला । मुमुक्षुजन ॥ २ ॥ श्रीवासुदेवाचे भक्त थोर थोर । महिमा जयांचा अपार । त्या सर्वांचा मी किंकर । विष्णु महाडेश्वर म्हणे ॥ ३ ॥ सद्गुरु विश्वनाथ कृपाबळें । चरित्र वर्णिलें विष्णु महाडेश्वरें । ज्ञानेश्वरांच्या कृपाप्रसादें । जैसा म्हैसा श्रुतीतें ॥ ४ ॥

---

## आर्याष्टक.

**( सं दत्तात्रेय तुकाराम पणशीकर, पेडणें—गोंवा. )**

' श्रीविश्वनाथ ' सदया ! गुरुवर्या ! वंदितों सदा तुजला !
निश्चल पदारविंदीं जडण्याचा भृंगभाव दे मजला ॥ १ ॥
' श्रीविश्वनाथ ' वदनीं वदतां मळ वाणीचा झडे सगळा !
ध्यातां रूप तुझें बा ! घाली मुक्ति स्वयेंचि माळ गळां ॥ २ ॥
' श्रीविश्वनाथपूजा ' करितां प्रिय होय तोहि देवास !
निजरूपही तया दे दोषांचा लव न राहुं दे वास ॥ ३ ॥
' श्रीविश्वनाथ कीर्ति ' श्रवणें देवास फार मानवतो !
भक्तिज्ञानसुबोधें गुरुभजनीं होय वंद्य मानव तो ॥ ४ ॥
' श्रीविश्वनाथ करुणा ' सद्भक्तां भजनरंगीं रंगविते !
मुक्तिपदीं बसवुनि त्या, श्रीकृष्णाच्या गुणांस गावविते ॥ ५ ॥
' श्रीविश्वनाथ मूर्ती ' आनंदाचीच मूस बा काय ! !
नवविधभक्तिनदी बा ! पोहें कीं मनिसाच हा काय ! ॥ ६ ॥

'श्रीविश्वनाथरूपें ' श्रीपरमात्मा कलींत अवतरला ।
तत्संगे जणु रंगे श्रीरंगहि भक्तवर्गही तरला ॥ ७ ॥
'श्रीविश्वनाथ संत ' श्रीभगवद्भक्तपंकजांस रवि ।
भजनप्रेमें भरला घनसा शिष्यत्रिताप जो सरवी ! ॥८ ॥
'श्रीविश्वनाथ ' गुरुचें आर्याष्टक पापताप हें नाशी ।
भक्तिज्ञानविरक्ती आणि विमुक्तीहि दे जशी काशी ॥ ९ ॥

---

॥ श्लोक. ॥

त्रिकाळीं करा घोष ह्या अष्टकाचा । चुके भोंवरा घोर येणें भवाचा ॥
विनंति असे विष्णु म्हाडेश्वराची । उपेक्षा करावी गुर्वष्टकाची ॥ १ ॥

---

**सुधारून वाढविलेलीं ) मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति.**

कविवर्य मोरोपंत यांच्या पाऊण लाख कवितेंतून वेगवेगळया विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे मोठ्या प्रयासानें यांत संग्रहीत केलें आहेत. १ ईश्वरभक्तिपर. २ कवि आणि कविता. ३ उपदेशपर. ४ वर्णनपर. ५ कथानकपर. ६ चक्रीरामायण व ७ विविधविषयपर—अशीं या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं असून त्यांत पंतांच्या कवितेंतील बहुतेक उत्कृष्ट भाग आला आहे. ग्रंथाला भरपूर टीपा, व कथासंदर्भ दिले असून पंतांच्या अजून अप्रसिद्ध अशा कांहीं कविता यांत दिल्या आहेत, व कोठें पंतांच्या हातच्या टीपाही दिल्या आहेत. प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत प्रस्तावना दिली असून तींत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे उत्तम गुण, काव्याची महती व पंतांची महाकवींत गणना होण्याचीं कारणें यांचें साहित्यशास्त्रदृष्ट्या विवरण केलें आहे व **ह्या दुसऱ्या आवृत्तींत पंतांचें त्रोटक चरित्र नवीनच जोडलें आहे.**

**केसरी**—" पंतांचा उदार, भाविक व प्रेमळ स्वभाव, त्यांची प्रतिभा व रसिकपणा यांचें या वेंच्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलें आहे. मराठींत या दिशेचा नांवाजण्यासारखा पहिला प्रयत्न म्ह० हाच होय. महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी धर्मनीतिव्यवहारज्ञ व बहुश्रुत अशा लहानथोर वाचकांनीं रा. पांगारकरांचे हे वेंचे संग्रह करण्यासारखे आहेत. " **इंदुप्रकाश**—" वेंच्यांची निवड कौशल्यानें केली असून वैचित्र्य चांगलें साधलें आहे. रसिक, विद्वान् व विद्यार्थी यांजकडून या ग्रंथाला अवश्य आश्रय मिळाला पाहिजे." **ज्ञानप्रकाश** " ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे. "

**पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.**

# सार्थ श्रीदासबोध.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातचीं शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोन्ही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोन्ही प्रतींचा मेळ घातला आहे; व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५० सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु.

# कविरामायण.

**केसरी म्हणतो:**—" हें पुस्तक मुमुक्षुकर्ते रा. रा. पांगारकर यांनीं तयार केलें आहे. यांत वाल्मिकि व तुळशीदास यांचीं संस्कृत व हिंदी रामायणें व प्रख्यात कवींचीं शेंकडों रामायणें यांतील उत्कृष्ट वेंचे दिले आहेत. हे उतारे अशा रीतीनें निवडले आहेत व त्यांचा क्रम असा धरिला आहे कीं, सर्व कवींचें एक ' कविरामायण ' निर्माण झालें आहे ! अशा दृष्टीनें उताऱ्यांची निवड करण्याचें काम जितक्या मार्मिकतेचें तितकेंच अवघडही आहे; परंतु तें रा. पांगारकर यांनीं उत्तम केलें आहे. मनोहर रामकथा व प्रमुख कवींचे उतारे यांचा लाभ एकदम घेऊं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांनीं संग्रह करण्यासारखें व वाचण्यासारखें हें पुस्तक तयार झालें आहे यांत शंका नाहीं."

प्रस्तावनेंत विषयवारीनें श्रीरामचरित्रांतील सर्व महत्त्वाचे विषय क्रमानें दिलें आहेत. किंमत चार आणे. व्ही पी. नें ॅ७.

# सार्थ मनोबोध.

श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांची सर्वमान्यता प्रसिद्धच आहे. रा० पांगारकरांनीं यांत मनाचे श्लोक सार्थ दिलेच आहेत, पण प्रारंभीं मनालाच बोध कां यांत मनाचें स्वरूप दर्शविलें आहे. सर्व श्लोकांची संगति लावून त्यांचे वर्गीकरण केले असून श्लोकांचा अर्थ समर्थांच्या एकंदर ग्रंथांच्या दृष्टीनें चोख लावला आहे. किं. ॅ१२.

पत्ता:—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**१. भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

**२. संतचरित्रमाला:**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

**३. श्रीएकनाथचरित्र:**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

**४. कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

**५. आनंदलहरी:**--( कवितासंग्रह ) त्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

**६. नारदभक्तिसूत्रें:**--हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. व्ही. पी. नें ०११.

**७. नवविधाभक्ति:**—यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४.

**८. निरंजनमाधवांची कविता:**---भाग पहिला. किं. १ रु.

**९ श्रीज्ञानेश्वरचरित्र:**---( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १०८.

**१०. भक्तिमणिमाला:**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु REG, No, B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११ **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ८५.

१२-१३ **मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १८८

१४ **मोरोपंतीं वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १८१२.

१५ **पारिजातकांचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ८८.

१६ **श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह किं. रु. ३.

१७ **श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ८५.

१८ **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ८१०.

१९ **मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२० **मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): – किं. ८४.

२१ **सार्थ श्रीदासबोध**—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४८१०.

२२ **सार्थ मनोबोध**:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ८१२.

२३ **समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं स प्रकरणाचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४ **मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २.

२५ **श्री एकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचे आवृत्ति तिसरी )—किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष १९ मास ११ | ज्येष्ठ १८४८ जुलै १९२६ | नवें वर्ष ६ वें अंक ७ वा.



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३-२

मुद्रकः-लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणे, पेठ सदाशिव, घ. नं. २००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

वर्ष ६ वें ] # विषयानुक्रमणिका [ अंक ७ वा.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १–२ |
| २ सुखाचा संसार (पद)... ... ... ... | ३ |
| ३ पारिजातकाचीं फुलें ... ... ... ... | ४–६ |
| ४ भक्ति आणि तेज ... ... ... ... | ७–११ |
| ५ मोरोपंती संशयरत्नमालेचें संस्कृत भाषांतर ... ... | १२–१८ |
| ६ आनंदतनयांची कविता ... ... ... | १९–२३ |
| ७ राष्ट्रोन्नति व मनोजय... ... ... ... | २४– |
| ८ संतनामावलि ... ... ... ... | ३४–३५ |
| ९ पांगारकरांचीं पुस्तकें... ... ... ... | ३६–४० |


## वाचकांसः–

१ मे जूनच्या जोड अंकांत ' मराठी वाङ्मयाचें समालोचन ' या मथळ्याखालीं जो ४० पृष्ठांचा निबंध छापलेला आहे तो ता. ५ मे रोजीं मुंबईस मराठी-ग्रंथसंग्रहालयांच्या २६-२७ व्या वार्षिकोत्सवप्रसंगीं रा. पांगारकर यांचें अध्यक्ष ह्मणून जें व्याख्यान झालें त्याचा गोषवारा आहे.

२ औरंगाबादेकडील १५० वर्षांपूर्वीचे प्रसिद्ध सत्पुरुष मध्वमुनीश्वर किंवा मध्वनाथ यांचीं अप्रसिद्ध पांचशेंवर पदें आमचे हातीं नुक्तीच एका सज्जनानें आणून दिलीं असून पुढील अंकापासून तीं छापण्यास सुरवात होऊन ४।५ अंकांत पूर्ण होतील. हा बहुमोल ठेवा वाचक प्रेमानें संग्रहतील अशी खात्री आहे. यांतील बहुतेक सर्वच पदें आज प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. मध्वनाथांचे गुरु श्रीशुक व शिष्य प्रसिद्ध अमृतराय यांचीं पदें फार बहारीचीं आहेत. मुमुक्षूवर व मुमुक्षुवाचकांवर चालू सालीं श्रीमध्वनाथांची कृपा वळली आहे हे आपलें भाग्य होय. त्यांची ' संतनामावलि ' याच अंकांत दिलेली वाचकांस आवडून येईल.



## दधिमंथन.

सकल गुंतलियां गृहकिंकरी । मथन ते समयीं जननी करी ॥
स्वसुत-बाल्य-चरित्र-महोदधी। स्मरत गात सुखें मथि हो दधी ॥१॥
पृथु नितंब नितंबिनिचा वरी । कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ॥
कनककंकणवृंदहि वाजती । मुखिं सुखश्रमबिंदु विराजती ॥ २ ॥
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती । गळति गुंफिलियां शिरिं मालती ॥
घुसळितां कुचकुंभहि कांपती । अमृत ज्यांतिल घे कमळापती ॥ ३ ॥
फिरविते रवितें दधिभीतरी । मिरविते रवितेज नगांवरी ॥
स्वकरि ते करि चंचलता मनीं । उपरमे परमेश्वरगायनीं ॥ ४ ॥
बाइ ! म्या उगवतांच रवीला । दाट घालुनि दहीं चरवीला ॥
त्यांत गे फिरवितांच रवीला । सार काढुनि हरी चरवीला ॥ ५ ॥
मथी पुत्रभावें असी गायमाय। स्तनीं प्रेम पान्हा तिच्या काय माय ?॥
अशामाजि ये सर्वसंसारसाक्षी। असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी ॥६॥
जननिच्या स्तनदुग्धरसार्पणें । स्वसुखतृप्तिहि मानिच तर्पणें ।
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी । मन जिचें बुडतें सुखसागरीं ॥ ७ ॥

—वामनपंडित.

# मृत्तिकाभक्षण.

स्वउदरांत चराचरमृत्तिका । पसरुनी मुख दावित कौतुका ॥
प्रगट जो करि बाल्यकथारसा । नमिन त्या हरिच्या पदसारसा ॥१॥
गोपबाळक गडी बळिराम । क्रीडतां हरिसवें अभिराम ।
'मृत्तिका सुत तुझा घननीळा । भक्षितो' कथिति हें जननीला ॥२॥
कर श्रीकांताचा करकरुनि माता धरि करें
दुजा हस्त क्रोधें हरिवरि उगारूनि निकरें ।
दटावी, ते वेळीं भयचकित डोळे करि हरी
करी अंडत्रासें वरि कर दुजा जो भय हरी ॥ ३ ॥
म्हणे 'पूससी ओष्ठ चाटूनि चाटा ! । पुन्हां बोलसी धीट गोष्टी अचाटा ॥
घडीही घरीं पाय तूझा न थारे। न आटोपसी तूं मला सर्वथा रे' ॥४॥
'नसे खादली खाउनी मृत्तिकाही' । ह्मणे या स्ववाक्यासि मिथ्यत्व कांहीं॥
दिसे, तें हरायास पोटांत सारे । तिला दाखवी मृत्तिकेचे पसारे ॥५॥
वदनिं जों अवलोकुनि पाहते । जननि विस्मित होउनि राहते ॥
स्थिरचरात्मक हें जग देखिलें । स्वसुत ईश्वर हें मनिं रेखिलें ॥ ६ ॥

—वामनपंडित.

---

# निबंधमाला—तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें 'सरस्वतीमंदिर' मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें त्यांत दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुण-दोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ॥० आणे.

पत्ताः—व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.

# सुखाचा संसार.

लेखकः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

## पद.

( चालः—उद्धवा शांतवन कर जा. )

नरजन्म फलप्रद झाला ।
संसार सुखाचा त्याला ।। ध्रु० ।।
आरोग्य नांदतें देहीं । शांति सौख्य खेळे गेहीं ।
चित्तांत हरीविण कांहीं । दुसरें नच ठावे ज्याला ।। १ ।।
धर्मानुकूल सति भार्या । सच्छील दक्ष गृहकार्या ।
आतिथ्यधर्मरत आर्या । संतोष देइ सकलांला ।। २ ।।
मायबाप बंधुजन मित्र । सोयरे पांथ सत्पुत्र ।
समदृष्टि सदा सर्वत्र । मीनला सुखाचा मेळा ।। ३ ।।
देवसंतभजनीं भाव । सम जिथें रंक व राव ।
ज्ञानामृतपानीं हांव । धणि न पुरे कीं चित्ताला ।। ४ ।।
सत्यव्रत धरिलें वाचा । न्यायनीतिपथ जीवाचा ।
आचार शुद्ध धर्माचा । सद्विचार होउनि ठेला ।। ५ ।।
काम एक हरिभक्तीचा । लोभ थोर सत्संगतिचा ।
मोहमान तेथें कैंचा । मद न शिवे तो चित्ताला ।। ६ ।।
मत्सरासि ठावाचि नाहीं । परसुखें सौख्य सकलांहि ।
प्रेमगान चाले गेहीं । विश्रांति जेथ श्रांताला ।। ७ ।।
प्रेमाचीं गाणीं गाती । प्रेमसौख्य देती घेती ।
प्रेमभक्तिभाग्यापुढती । न सुचे कांहिं कोणाला ।। ८ ।।
भूतमात्र हरिमय झालें । द्वैतांध्य सर्व मावळलें ।
शोकमोह अवघे गळले । संसारचि हरिमय झाला ।। ९ ।।
हरिरूप विषय हे होतां । त्याग तोहि ठेला परता ।
त्याग ना भोग ना—गातां । हरि गुण हा हरिमय झाला ।। १० ।।
गृह नोहे नंदनवन हें । कीं श्रीहरिमंदिर पाहे ।
स्वर्ग मूर्त येथचि राहे । पूर येत आनंदाला ।। ११ ।।
आनंद स्वयें अवतरला । आनंदचि अवघा भरला ।
आनंदरूप भव झाला । लक्ष्मणासि प्रत्यय आला ।। १२ ।।

# पारिजातकाचीं फुलें.

१

सदाचाराविषयीं प्रीति व दुराचाराविषयीं तिटकारा हा सज्जनांचा सहजधर्म आहे.

२

दुराचारापासून होणारें किंवा दुराचारमिश्रित जें सुख तें सुखसें वाटलें तरी तें विषमिश्र पक्वान्नासारखें घातक होय.

३

स्वर्गलोक व नरकलोक हे कोणी पाहिले आहेत? कामक्रोधादि दुर्विकारांनीं डहुळलेलें मन हाच प्रत्यक्ष नरक होय, आणि रम्य व प्रसन्न असें सज्जनांचें मन तो इहलोकींचा स्वर्ग होय.

४

क्रोधानें झपाटलेला पुरुष हा नरकासुर व क्रोधादि विकारांवर खोगीर घालणारा पुरुष हा भगवानाचा अंश होय.

५

परस्त्री मनोरम असून एकांतांत आपण होऊन पुरुषाच्या गळां पडायला आली असतांना तेथें जो निर्विकार राहतो म्हणजे 'परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक' असतो तो प्रत्यक्ष परमेश्वर होय; तसेंच निर्जन वनांत सोन्याच्या लगडी पाहून जो पायानें दूर सारून निर्विकल्पपणें निघून जातो तो भगवान् शंकर होय—असें मुक्तेश्वरांनीं म्हटलें आहे.

६

प्रत्येकाला आपल्या बऱ्यावाईट कर्मांचीं बरींवाईट फळें भोगावींच लागतात; सत्कर्माचें फळ सुख व दुष्कर्माचें फळ दुःख हा परिपाकही निश्चित आहे; व कोणासही दुःख नको असून सुखच पाहिजे असतें—हे तीनही सिद्धांत निर्विवाद आहेत, व हे बहुतेकांना माहीत आहेत, पण मग लोक दुःखदायक दुष्कर्माकडे कां बरें खेचले जातात?

७

अन्यायी स्वार्थामुळें जीव दुःखांत पडतात.

८

दुष्ट कर्म व दुष्ट वाणी ही ज्याची त्यालाच नागवतात.

९

पेरावें तें उगवतें.

१०

सदाचारी मनुष्य सुखानें झोंप घेतो व जागृत होतांच सुखानें प्रसन्नचित्त होऊन कामाला लागतो. दुराचारी मनुष्य दिवसां शिष्टांत शिष्टपणानें वागत असला तरी रात्रीं अंथरुणावर पडतांच त्याचीं गुप्त आसुरी कृत्यें व राक्षसी विचार भुतांप्रमाणें उठतात, त्याला भंडावून सोडतात व त्याची सुखनिद्रेशीं गांठच पडत नाहीं. सदाचार हें सुखबीज आहे.

११

सदाचारी असून प्रेमळ, 'तरी ते अपूर्वता!' दुधांत साखर. अंतरंग प्रेममय असावें, दुसऱ्याच्या मनाला दुखवावयाचें नाहीं, मनोगत जाणून वागायचें, उणें दिसेल तें आपल्या भलाईनें भरून काढायचें, दुसऱ्याचा मनानेंही अपमान किंवा उपमर्द किंवा कमीपणा करायचा नाहीं, आपणच अहंकारशून्य होऊन नीचपण संतोषानें पत्करायचें, आई लेंकराला जपते तसे दुसऱ्याच्या मनोवृत्तींला जपायचें—हा प्रेमळपणा, हें कोमल प्रेम साधूवांचून कोठें आढळेल?

१२

हे बंधूंनो! पहा, घराबाहेर पडा; लोकांच्या सुखासाठीं, कल्याणासाठीं परोपकारासाठीं झटा; दयाधर्म जागवा; लोकांचें सुख, लोकांचें कल्याण हेंच आपलें ध्येय ठेवा; ह्याच तत्वाचा सर्वत्र विजय करा. जीवनचारित्र्य पवित्र व मंगलमय ठेवा व त्याचाच उपदेश करा. (महावग्ग १–११)

१३

धर्माचें आचरण प्रेम, दया, सत्य, पावित्र्य, सौजन्य, सौम्यता इ० गुणांनीं युक्त असलें पाहिजे.

—अशोकाचें स्तंभावरील आज्ञापत्र.

१४

दया धरमका मूल है, हिंसामूल है पाप.

१५

लहान अर्भकें, स्त्रिया, अज्ञ जीव, पशु व पक्षी या सर्वांविषयीं चित्तांत प्रेम व यांच्याविषयीं वागण्यांत दया हाच खरा धर्म आहे. 'सर्वांभूतीं भगवद्भाव' (नाथ) व 'भूतमात्रीं दया' (तुकोबा) यांत सकलधर्माचें सार आहे.

१६

धनिक व दारिद्री, स्त्रिया व पुरुष, ब्राह्मण व इतर जाति, हिंदु व अहिंदु सर्वांनाच हा दयाधर्म मोक्षपंथाला पोंहचवतो.

१७

सज्जन व दुर्जन, पुण्यवंत व पापी, भलेबुरे सर्वांविषयीं चित्तांत दयाप्रेम ठेवा; यांत तुमचेंच आत्यंतिक कल्याण आहे.

१८

इतर धर्मपंथ किंवा संप्रदाय यांविषयीं तुच्छ बुद्धि बाळगूं नयेच, उलट शक्य येथें त्यांविषयीं आदरभावच प्रगट करावा. यायोगानें तुमच्या संप्रदायाविषयीं आदर वाढेल व इतर संप्रदायांचेंही हितच होईल. दुसऱ्या धर्मपंथाचा नाश करण्याच्या प्रयत्नांत तुमच्या पंथाचा नाशच होईल हें ध्यानांत धरा.

—अशोकाचे शिलालेख.

१९

देवाची पूजा करायची असेल तर आजारी, आर्त, दीन यांची सेवा करा. देव तेथें असतो. तो संतुष्ट होईल.

२०

भूतांची दया हें भांडवल संता । आपुलिया ममता नाहीं देहीं.

—तुकोबा.

२१

दीन, त्रस्त जीवांच्या पोटांत जो घास घालाल तोच नैवेद्य देवाला अगोदर पोंचतो.

२२

द्रव्य सांचवितो तो संचक नव्हे तर उदारपणानें परोपकारांत वेंचतो तो खरा संचक ! कां कीं, पहिल्याचा संचय पोरें किंवा चोरें घेऊन जातात पण परोपकारी मनुष्य सहस्रपटीनें भोगण्यासाठीं तें चहूंकडे वांटून देतो. पंचपात्री दूध दिल्यानें क्षीरसमुद्र मिळतो.

---

# भक्ति आणि तेज.

लेखक ' हरिदास. '

१. विष्णुसहस्रनामामध्यें विष्णूचें एक नांव ' शिव ' असल्याचें सांगितलें आहे. व शिवसहस्रनामांत शिवाचेंही एक नांव ' विष्णु ' आहे असें दर्शविलें आहे. खरें पाहिलें असतां ' शिव ' आणि ' विष्णु ' या शब्दांत भिन्नत्व नाहीं. दोन्हींचा अर्थ ' निर्गुण परब्रह्म ' असा आहे. याकरितां ' शिवभक्ति ' आणि ' विष्णुभक्ति ' या शब्दांच्या अर्थामध्यें भेद समजूं नये.

२. महाविष्णु प्रेममय आहेत. त्यांची सदैव ही इच्छा असते कीं, प्राणिमात्रानें प्रेमरूप होऊनच त्यांची प्राप्ति करून घ्यावी. श्रीराम, श्रीकृष्णादि अवतार घेऊन दुष्टांचा नाश करून महाविष्णु धर्माची स्थापना करीत असतात. प्रेमवश होऊनच ते दुष्टांचें शासन करीत असतात. यांत त्यांची हीच इच्छा असते कीं, या लोकांनीं संधि मिळतांच आपली उन्नति करून घ्यावी. प्रेमस्वरूपी परमात्म्याला प्राप्त करून घेण्याची ज्यांना लालसा असेल, त्यांनीं आपल्या स्वभावाला प्रेममय केलें पाहिजे. ज्याप्रमाणें कोटयाधीश होऊं इच्छिणाऱ्यास कवडी कवडी धनाचा संचय करावा लागतो त्याप्रमाणेंच मुमुक्षूनें विचार, उच्चार आणि आचार या तिन्ही साधनांनीं हळूहळू प्रेम साध्य केलें पाहिजे.

३. ज्याला खरा भक्त व्हावयाचें आहे, त्यानें आपलें मन आपल्या स्वाधीन ठेविलें पाहिजे म्हणजे मनाला एकाग्र, स्थिर आणि कामक्रोधादिकांपासून अलिप्त केलें पाहिजे. प्राणिमात्रानें अहंभाव आणि ममत्व--' मी ' आणि 'माझें' यांचा प्रथम त्याग करावा. भक्ति व ज्ञान यांची कांस धरावी आणि निष्काम कर्मे करीत राहावें म्हणजे त्यास दैवी शक्ति प्राप्त होईल. तिचा उपयोग जगावर उपकार करण्याकडे करावा याचें नांव प्रेम. ईश्वरभक्ति ती हीच.

४. अशा तऱ्हेच्या साधकास शुद्ध व शांतिदायक असें एक तेज प्राप्त होत असतें. या तेजाच्या अंगीं जवळ असलेल्या मनुष्यांमध्यें शांति आणि पावित्र्य यांचा प्रसार करण्याची शक्ति असते. हें तेज काय आहे ? याचें लक्षण काय? व तें कोणत्या नियमांनीं बद्ध आहे याचा आपण आतां विचार करूं.

५. या सृष्टींत प्रत्येक पदार्थाच्या सभोंवार सामान्यतः अदृश्य असें एक अंडाकृति वलय असतें याचेंच नांव तेज आहे. कंदिलाच्या सभोंवार दृश्य असें तेजोवलय असतें, आणि कंदील या वलयाच्या केंद्रस्थानीं असतो. कंदील जेथें जेथें जाईल तेथें तेथें त्याच्याबरोबर तें तेजोवलय जातें. ह्याचप्रमाणें या

सृष्टींत प्रत्येक लहान मोठा पदार्थ तेजोवलयांकित आहे. या सूक्ष्म तेजोवलयास इंग्रजींत Aura 'ऑरा' असें म्हणतात व उर्दू भाषेंत त्यास 'नूर' असें नांव आहे. ज्यांना दिव्यदृष्टि प्राप्त झाली आहे त्यांनाच हें वलय दिसतें; इतरांना नाहीं. परंतु ज्यांना तें दिसत नाहीं त्यांनीं 'तेजोवलय नाहीं' असें म्हणणें म्हणजे आंधळयानें 'सूर्य नाहीं' असें म्हटल्यासारखेंच आहे. सूक्ष्म दृष्टीच्या लोकांना निरनिराळ्या पदार्थांचें निरनिराळें तेज दिसतें. कांहीं पदार्थांचें तेज चांगलें असतें व कांहींचें वाईट आणि कांहींचें मध्यम प्रतीचें म्हणजे विशेष चांगलेंही नाहीं व वाईटही नाहीं असें असतें. तेजोवलयांवरून पदार्थांचें वर्गीकरण करतां येईल.

६. तुळशीदल आणि तुळशीमाळा यांमध्यें ऋषींनीं श्रीविष्णूचें तेज आपल्या दिव्य दृष्टीनें पाहिलें, तसेंच बिल्वपत्र आणि रुद्राक्ष यांमध्यें त्यांना शिवाचें तेज दिसून आलें. म्हणूनच विष्णुभक्तांसाठीं तुळशीदलाचें व शिवभक्तांसाठीं बिल्वपत्र आणि रुद्राक्ष यांचें महात्म्य शास्त्रांनीं वर्णिलें आहे. तेजोवलयाच्या आधारावरच ऋषींनीं निरनिराळ्या पूजासामुग्रीचा निर्णय केला आहे.

७. चंद्रजोत ( दारूकामांतील ) निरनिराळ्या रंगाची—लाल, निळी, पिंवळी इत्यादि रंगांची असते. एखाद्या स्वच्छ कंदिलांत लाल चंद्रजोत जाळली तर चोहोंकडे तांबडा प्रकाश दिसेल आणि कंदील कोठेंही नेला तरी त्याजबरोबर त्याच्या सभोंवार थोडया दूरपर्यंत तांबडया प्रकाशाचें आवरण दिसेल. चंद्रजोत निळ्या रंगाची असेल तर प्रकाश निळा होईल, हिरवी असेल तर हिरवा होईल; सारांश जशी चंद्रजोत तसा प्रकाश दिसेल. मनुष्याच्या सभोंवार दोन फूट अंतरापर्यंत असेंच अंडाकृति तेजोवलय असतें. मनुष्याचें शरीर कंदिलासारखें असून त्याचें मन निरनिराळ्या रंगांच्या चंद्रजोतीप्रमाणें आहे. जसा कंदिलाचा प्रकाश चंद्रजोतीच्या प्रकाशावर अवलंबून आहे, तद्वत् मनुष्याच्या तेजाचा रंग त्याच्या मनःस्थितीवर अवलंबून आहे. मन क्रोधवश असेल तर मनुष्याच्या तेजाचा रंग लाल होतो, कामवश असेल तर जास्वंदीच्या फुलाप्रमाणें होतो, स्वार्थाचा भाव मनांत असेल तर तेज नारंगी रंगाचें होतें आणि भक्तिभाव असेल तर नीलवर्णाचें होतें. प्रेमपूर्ण, परहिततत्पर अशा राजयोग्याचें तेज शुद्ध उज्वल म्हणजे शुभ्र असतें.

८. ज्याचें मन नेहमीं सर्व भूतांचें हित चिंतीत असतें व जो परोपकारांत मग्न असतो त्याचें तेज शुद्ध व उज्ज्वल स्वरूपाचें असतें. एखाद्या व्यक्तीचें तेज मनांतील भावाप्रमाणें निरनिराळ्या रंगांत बदलत असतें. हा तेजासंबंधीं पहिला नियम होय.

९. दुसरा नियम हा आहे कीं, प्रत्येक मनुष्याच्या तेजाचा चांगला किंवा वाईट प्रभाव दुसऱ्यावर पडतो. वरती सांगितलें आहे कीं, प्रत्येक मनुष्याच्या सभोंवार दोन फूट अंतरापर्यंत त्याचें तेज असतें. म्हणून दोन माणसें देहस्पर्श केल्याखेरीज आपआपल्या तेजाच्या योगानें परस्परांशीं संमीलित होऊं शकतात. कोणी रागावलेला मनुष्य शांत प्रकृतीच्या माणसाजवळ गेला तर क्रुद्ध आणि शांत तेजाचा संयोग झाल्यामुळें दोघांच्याही तेजांचा रंग बदलतो. क्रोधाचा तांबडा रंग सौम्य होत जातो व शांतीच्या शुभ्र रंगांत रक्तवर्णाची छटा येते. शांतीच्या शुभ्ररंगाचा वेग जोराचा असेल तर रागावलेल्या व्यक्तीचा राग तो शांत करील. म्हणून एखाद्या राजयोग्याकडे जर एखादा क्रूर मनुष्य गेला तर योग्याच्या उज्ज्वल तेजाच्या प्रभावानें त्यास सद्‌बुद्धि प्राप्त होते.

१०. जर एखाद्या घरीं नवराबायको निष्ठुर स्वभावाची असतील तर त्यांच्या तेजाचा वाईट परिणाम त्यांच्या मुलांवरच केवळ नव्हे तर त्यांच्याशीं खानपान इत्यादि हरतऱ्हेचे संबंध ठेवणाऱ्या सर्व व्यक्तींवर होतो. ज्याप्रमाणें एका घरास आग लागली असतां सारा गांव जळून जातो, त्याचप्रमाणें वाईट मनुष्याचा प्रभाव साऱ्या गांवावर पडतो. आपण किती अनर्थांचे कारण आहों, केवढया महान् पातकांचे वांटेकरी आहोंत, याची दुष्ट लोकांना कल्पना नसते. चांगल्या मनुष्याच्या तेजाचा परिणाम दुसऱ्यावर चांगलाच होतो, त्याच्या जवळ जाणाऱ्या सर्व मनुष्यांत चांगुलपणा उत्पन्न होतो. राजयोगाचा अभ्यास म्हणजे प्रेम आणि भक्ति यांचा नेहमीं आश्रय करीत राहिल्यास सर्व जगांत पवित्रता वाढत राहील. खरें पाहिलें असतां प्रत्येक मनुष्य आपल्या मनोव्यापारानें जगावर अनंत उपकार किंवा अपकार करीत असतो. या बंधनांतून कोणीही मनुष्य मुक्त होऊं शकत नाहीं. म्हणूनच प्रत्येक मनुष्याचें हें कर्तव्य आहे कीं, वाईट विचारांना थारा न देतां पवित्र प्रेमभावच मनांत जागृत ठेवण्याचा यत्न करावा भोजनाचे वेळीं कृतज्ञतापूर्वक ईश्वराचं नामस्मरण केल्यानें आपलें तेज शुद्ध होतें आणि शुद्ध तेजाच्या योगानें अन्न पवित्र होऊन त्याचा मनावर फार चांगला परिणाम होतो. सावधगि ठेविल्यास सांसारिक क्षुद्रभाव मनांत आपोआप उत्पन्न होतात आणि तेजाला दूषित करून अन्नाबरोबर मनांतहि तमोगुण वाढवितात. स्वयंपाक करणाऱ्या व वाढणाऱ्या व्यक्तींच्या मनोविकारांचा व तसाच त्यांच्या कपडयांच्या स्वच्छतेचा अथवा मळकटपणाचाही अन्नांवर परिणाम होतो.

११. आम्ही ज्या संकल्पानें एकाद्या वस्तूला स्पर्श करतों त्या संकल्पाचें तेज त्या वस्तूंत शिरून पुष्कळ लोकांना व्यापून टाकतें. जेवत्या वेळीं बायका-मुला-मुलींनीं मिळून आम्ही जर भगवन्नाम म्हणत त्याचें ध्यान

करीत संतोषवृत्तीनें प्रत्येक घांस घेऊं लागलों तर अन्नपानादिकांमध्यें परिशुद्ध तेज शिरून त्या योगानें सर्व शरीरांतील रक्तमांस व मेंदु परिशुद्ध होऊन सद्बुद्धीला आणि देहारोग्यतेला वाढवितें. त्यायोगानें मुलांची स्मरणशक्ति वाढून विद्यावृद्धीला कारण होते. याविरुद्ध रीतीनें जर वागलों तर रक्त वगैरे बिघडून ( अपरिशुद्ध होऊन ) क्रमानें दुष्ट बुद्धि आणि देहांत अनारोग्य यांची वाढ होऊं लागते. धान्य, भाजीपाला, दहीं, दूध वगैरे वस्तूंना स्पर्श करणें व तयार करणें, लिहिणें, देणें, घेणें, विकणें, वाटेंत चालणें, गाडींत प्रयाण करणें इत्यादि कामें करतांना आम्ही जसें आपल्या कल्याणाकरितां परमेश्वराचें ध्यान करितों त्याप्रमाणें ( सर्वभूतहितेरतवृत्ति ) म्हणजे परोपकारवृत्तीनें उत्तम संकल्प करीत गेलों म्हणजे आम्हांस स्पर्श करणारांना, वाटेंत चालणारांना, गाडींत बसून जाणारांना सुद्धां तें शुद्ध तेज व्यापून तें सगळें परिशुद्ध होऊन त्यांना उद्धारल्याचें अपरिमित पुण्य आम्हांस येईल. त्या वृत्तीनें आम्ही न वागतां दुष्ट वृत्तीनें वागलों तर सर्वांना बिघडविल्याचें पाप मात्र लागतें.

१२. कार्यवशात्–कांहीं कारणामुळें, कोणा साधकास दुष्टांच्या संगतींत फिरावें लागल्यास त्यानें आपल्याभोंवतीं तेजाचें असें एक वलय करून ध्यावें कीं जें, खोबरें आणि पाणी यांचें रक्षण करणाऱ्या नारळाच्या कवटीप्रमाणें सदैव त्याचें रक्षण करील. निद्रितावस्थेंत स्थूल व सूक्ष्म जीवांचा वाईट प्रभाव आपल्यावर पडूं नये म्हणून साधकानें निजते वेळेस परमेश्वराची प्रार्थना करावी म्हणजे एक प्रकारचें कवच त्याचें भोंवतीं बनून त्याचें रक्षण होतें.

१३. दयामय मनुष्याचें तेज अधिक विस्तृत होत जातें आणि त्याचा अखंड दयाभावच त्याच्या तेजाचें रक्षण करितो. वाईट तेजें त्याच्या जवळ येऊं शकत नाहींत. म्हणूनच आत्मनिष्ठ व दयाव्रत धारण करणारा साधक नेहमीं सुरक्षित असतो.

१४. तेजाचा तिसरा नियम हा आहे कीं, समान तेजें एकमेकांस आकर्षितात. एखादा मनुष्य रागावला असतां या आकर्षणशक्तीनें इतरांचेही क्रोधभाव त्याच्याकडे ओढले जातात आणि त्याच्या क्रोधाची मात्रा चढत जाते. क्रोधी मनुष्य मृत्यु पावल्यावर पिशाच्च होऊन रागीट माणसांवर आपला प्रभाव गाजवितो व त्यांना जास्ती रागीट करून त्यांच्या हातून जास्त पापकर्मे करवितो; त्याचप्रमाणें कामी पुरुष अथवा स्त्री एकमेकांच्या कामिक तेजाच्या आकर्षणानें आपल्या दुर्भावना वाढवीत असतात म्हणूनच वाईट मनोवृत्तींपासून नेहमीं आपणास जपलें पाहिजे.

१५. वाईट तेजानें राक्षसांची शक्ति वाढते व चांगल्या तेजानें ऋषींना मदत मिळते. याच कारणानें वाईट तेजानें अधर्माला उत्तेजन मिळतें व

चांगल्या तेजानें धर्माची अभिवृद्धि होते. वाईट तेजाच्या आधिक्यानें महामारी, प्लेग इत्यादि रोग व आपसांतले कलह, वैर, तंटे उत्पन्न होतात.

१६. उत्तम तेजानें या सर्वांचा नाश होऊं शकतो. आपलें चांगलें तेज मोठमोठे ऋषि व सत्पुरुष यांच्या तेजांशीं संमीलित होउन प्रबल होतें. अहंकाररहित ध्यान करणाऱ्या व लोकहितार्थ सदैव निष्काम कर्म करणाऱ्या राजयोग्याचें तेज फारच पवित्र असतें. मानवजातीवर उपकार करण्याकरितां सूक्ष्म शरीरानें संचार करणारे ऋषि अशा राजयोग्यांच्या भक्ति, ज्ञान आणि आनंदाची अभिवृद्धि करून जगाची सेवा करण्यास समर्थ करितात.

१७. दिव्याची वात जशी सारावी तसा प्रकाश मोठा होतो. राजयोग्यांच्या तेजासंबंधानें हाच नियम लागू आहे. राजयोग्यांची भक्ति जितकी प्रबल तितकें त्यांचें तेज अधिक विस्तृत असतें. ऋषींच्या तेजांचा विस्तार कांहीं हातच नव्हे तर कोसपर्यंत असतो. या तेजाच्या क्षेत्रालाच त्यांचा आश्रम म्हणतात. आश्रमांत पोंचल्यावर त्या तजोराशीचा स्पर्श झाल्याबरोबर हृदयांत शांति आणि भक्ति यांचा संचार होतो. याच कारणाकरितां ऋषींच्या आश्रमांत वाघ आणि हरिण एक ठिकाणीं शांतपणें आणि स्वच्छंद विचरत असतात.

१८. ज्याप्रमाणें बाप आपल्या मुलाकरितां धनाचा संचय करून ठेवतो त्याप्रमाणें ऋषींनीं आपल्या तेजाचा कांहीं भाग लोकांनीं जगाचें कल्याण करावयास समर्थ व्हावें म्हणून पवित्र नद्यांमध्यें व देवालयांत ठेविला आहे. श्रद्धायुक्त अंतःकरणानें जे लोक पवित्र मंदिरांत प्रवेश करितात त्यांना एक प्रकारच्या शांतीचा लाभ होतो व लोकहितसाधनाचें सामर्थ्य त्यांस प्राप्त होतें. मंदिराचे पुजारी जेव्हां कामक्रोधलोभादि दुर्गुणांचे पुतळे होतात, तेव्हां तेजोमंडलास जबरदस्त धक्का बसतो. हळू हळू तेज नष्ट होऊं लागतें आणि शेवटीं मूर्ति तेजोहीन, कलाहीन होते.

१९. हल्लींसुद्धां ऋषि सूक्ष्म रूपानें येऊन काशीविश्वनाथासारखी पवित्र स्थानें आपल्या तेजानें वेळोवेळीं व्याप्त करून देतात. मधून मधून जगावर समक्ष येऊन आपल्या तेजानें ते जगास शुद्ध करीत असतात. हल्लींच्या कठिण काळांत थोडयाच कालावधीनंतर स्वतः जगद्गुरु जगाच्या वाईट तेजाचा नाश करण्याकरितां व शुद्ध तेज पसरविण्याकरितां येणार आहेत असे ज्ञाते लोक सर्व जगाच्या निरनिराळ्या भागावर सांगत आहेत. तेव्हां या विषयाचें ज्ञान करून घेऊन त्यांच्या कार्यास एव्हांपासून आपआपलें तेज पवित्र व शुद्ध करून साहाय्यता करावी व ते दयाघन जगद्गुरु, येतील तेव्हां आपण त्यांच्याशीं तादात्म्य करण्याचा प्रयत्न करून जगाच्या उद्धारास हातभार लावावा यांत आपलें अत्यंत हित आहे.

———

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# मोरोपंती संशयरत्नमालेचें संस्कृत भाषांतर.

लेखकः—श्रीयुत केशव भिकाजी वापट, चिपळूण हायस्कूल.

उठतां बहु त्वरेनें कोठें जातां असें तुम्हां देवी ॥
पुसती झाली जाणों, पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १ ॥
उत्तिष्ठन्तं त्वरया पृष्टवती त्वां प्रिया ' त्वया कुत्र ॥
गम्यत ' इति, दुर्वाचं निशम्य न पुरः पदं बुधो धत्ते ॥ १ ॥

---

किंवा नारद आला, आलापीत स्वकीय सच्चरितें ॥
प्रेमळ गीत तुम्हांला हरि, हरिणापरिस बहुत वश करितें ॥२॥
गायन्भवच्चरित्रं नारद आगाद् भवत्समीपं किम् ॥
हरिणादपि तव चित्तं हरति हरे ! प्रेमगीतमविगीतम् ॥ २ ॥

---

कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें ॥
शरणागत–भय–शमना ! यास्तव येणें तुझें नसे घडलें ॥ ३ ॥
अथवा मम दुर्दैवं प्रभुमार्गे जातमेव परिपन्थि ॥
शरणागतभयशमन ! त्वं तस्मान्नागतोऽसि करुणाब्धे ॥ ३ ॥

---

किंवा मजहुनि दुसरा कोणी बहुदीन दास आढळला ॥
तच्छुभदैवसमीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला ॥ ४ ॥
मत्तो दीनतरः किं लब्धो दासस्त्वयेतरः कोऽपि ॥
करुणांबुद ! तदभिमुखं, तच्छुभदैवानिलेन वलितोऽसि ॥ ४ ॥

---

अथवा येतां झाला तन्मय शिव तांडवांत कैलासीं ॥
केला असेल गरुडें गर्व पुन्हां काय त्याच बैलासीं ॥ ५ ॥
किमु मार्गे कैलासे तन्मयता तांडवे शिवस्याभूत् ॥
बलदर्पितोऽभवत्किं पुनरपि गरुडो महेशवृषसविधे ॥ ५ ॥

---

बहुधा बळिचें द्वार क्षणभरिही सोडितां नये देवा ॥
न चुकावी छलपापप्रायश्चित्तार्थ साधुची सेवा ॥ ६ ॥

प्रायः शक्नोति न स क्षणमपि हातुं बलेः प्रतीहारम् ॥
दाक्ष्यमहो छलपापप्रायश्चित्ताय साधुसेवायाम् ॥ ६ ॥

---

प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ ॥
होय महत् कार्य परी प्रभुचा तो नित्य सहज हा खेळ ॥ ७ ॥
किंवा चिरायसे त्वं सुमुहूर्तप्राप्तयेऽपि सर्वज्ञः ॥
कामं गुरुकार्यं मम, परमेषा नित्यमेव तव लीला ॥ ७ ॥

---

कीं मी भागवतांचा भाग असें आणिलें मनीं स्वामी ! ॥
हें सत्यचि परि कैंचा हा भेद प्रभुवरा ! तुझ्या धामीं ॥ ८ ॥
स्वामिन् ! मनसि कृतं किं भागवतानामसांवनुग्राह्यः ॥
सत्यं, तव धामनि किं प्रभुवर भेदोऽस्ति कल्पितस्तादृक् ॥ ८ ॥

---

किंवा तुज एकाकी पाहुनि खळ दैत्य आडवे आले ॥
फुटतां सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले ॥ ९ ॥
खलदैत्यैरेकाकिनमवलोक्य खिलीकृतं सकलवर्त्म ॥
उद्वेले सलिलनिधौ सिकतासेतुः करोति किं बद्धः ॥ ९ ॥

---

किंवा तुज गुंतविलें भजकीं परि ते दयार्द्र या रंकीं ॥
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कष्टतां पंकीं ॥ १० ॥
भजकैरवरुद्धः किं, रंकेऽस्मिंस्ते परं दयागुरवः ॥
धेनूद्धरणपरं किं पंकात्कुर्वन्ति साधवो विमुखम् ॥ १० ॥

---

किंवा चुकतें कांहीं स्तवनीं तेणेंचि मागुता वससी ॥
तरि हें मन्मूर्खत्व प्रभु तूं दोषज्ञही तसा नससी ॥ ११ ॥
निर्दुष्टो न नवो मम, पुनरिति किं त्वं प्रभो निषण्णोऽसि ।
तदहो मन्मूर्खत्वं, न पुरोभागित्वमस्ति ते जातु ॥ ११ ॥

---

कीं कळवाया कर्में धर्में तुज दाविली असेल वही ॥
त्वद्दृष्टिपुढें राहे ऐसा पापांत त्या नसे लव ही ॥ १२ ॥
मत्पापकर्मलेखं तव पुरतः प्रेतपतिरपाठीत् किम् ॥
नास्त्यघलवोऽपि तस्मिन् यो भवदीक्षणपथेऽवतिष्ठेत ॥ १२ ॥

---

किं न श्रवणीं गेली ही माझी हाक, हा कसा तर्क ॥
काशि गुरु-जनीं सतीचीं शिवला ज्या कुमुदिनीस असदर्क ॥ १३ ॥
तव कर्णयुगं यातः करुणारावो न मे, हतस्तर्कः ॥
गुरुजनपरिषदि दुष्टस्पृष्टसतीक्रोश आश्रुतो भवता ॥ १३ ॥

---

अथवा स्वस्थचि असती कीं घेतो नाम रक्षणीं शूर ॥
हें सत्य परि प्रबळहि बळ दुर्बळ जरि रणीं धणी दूर ॥ १४ ॥
अथवा स्वस्थस्तिष्ठसि, गृह्णामि हि रक्षणक्षमं नाम ॥
किंतु स्वामिनि दूरे तस्य बलं प्रबलमपि रणे विकलम् ॥ १४ ॥

---

कीं भीतो भ्रांत वृथा मृगजळमग्नासि काय तारावें ॥
सत्यचि हें, परि शिशुचें भय जाया बागुलासि मारावें ॥ १५ ॥
भ्रांतो वृथास्मि भीतो मृगजलमग्नस्य किं समुद्धरणम् ॥
सत्यं, शिशुभयनोदो मिथ्याभयकारणं यदाऽपहृतम् ॥ १५ ॥

---

कीं कांहीं व्रतनियमीं बोलों चालों नये असें झालें ॥
तरि दीनरक्षणाहुनि अधिकफळ व्रत कधीं मना आलें ॥ १६ ॥
व्रतनियमार्थं यदि वा मौनं संसेवितं त्वया देव ॥
दीनावनात्परं ते व्रतमधिकं संमतं कदाऽधिफलम् ॥ १६ ॥

---

कीं हाक ऐकतांचि प्रभु॰ा हा रक्षणार्हसें वाटे ॥
वाटे या दुःशीलग्रीष्मीं तव नव दयानदी आटे ॥ १७ ॥
तव संजाता बुद्धिर्नूनमयं रक्षणार्ह इति, किंतु ॥
मन्ये, मयि दुःशीलग्रीष्मे तव नवदयानदी शुष्का ॥ १७ ॥

---

कीं पावावें समयीं सदय मनांतून योजिलें जरि तें ॥
तरि जेविं रुक्मिणीचें चित्ता माझें अधीर मन करितें ॥ १८ ॥
मदनुग्रहविषये त्वं निश्चितमतिरसि, तथापि चित्तं मे ॥
पाणिग्रहणात्पूर्वं रुक्मिण्या इव दयांबुराधीरम् ॥ १८ ॥

---

किंवा पुराण-पुरुषा ! संप्रति बहु भागलासि या कामीं ॥
तुज नीज लागली तों सजळों मारावयासि हाका मी ॥ १९ ॥

अथवा पुराणपुरुष ! त्वं दीनोद्धरणकर्मखिन्नोऽसि ॥
विश्रांत्यै संसुप्तं व्यवसित एवास्मि किं प्रबोधयितुम् ॥ १९ ॥

---

किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करां ॥
तरि वरि तसाच आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥ २० ॥
पूर्वं परीक्षसे मां, कर्तुमनुग्रहमनन्तरं सम्यक् ॥
अंतर्बहिरेकोऽहं, करपीडांगारघर्षणे सिद्धा ॥ २० ॥

---

कीं धाडिलें पुढें निजनाम करा सर्वसिद्धता आधीं ॥
ऐसें प्रभो म्हणावें तरि तुमचीं चरणसारसें साधीं ॥ २१ ॥
अथ निजनाम प्रहितं कर्तुं किं सर्वसिद्धतामग्रे ॥
त्वय्यनुपपन्नमेतन्नहि चरणाब्जं परिच्छदापेक्षि ॥ २१ ॥

---

कीं आर्जविला नाम–प्रतिनिधि हा अमृत उधळतो स्वैर ॥
न पुसे, न भी, न ऐके, यास्तव दोघांत लागलें वैर ॥ २२ ॥
स्वैरं विकिरति नाम–प्रतिनिधिरेषोऽमृतं विगतभीकः ॥
नच पृच्छति स त्वामपि, तस्मात्कलहायसे नु किं तेन ॥ २२ ॥

---

कीं संप्रति अभय दिलें कलिला चालावया बरें राज्य ॥
परि कोण प्राणि सदय शिंपील बळें दवानळीं आज्य ॥ २३ ॥
अभयं कलये दत्तं, राज्यं निष्कंटकं तवास्त्विति वा ॥
परमाज्यं सिंचेत्कः सदयो दावानले नरः प्राज्ञः ॥ २३ ॥

---

किंवा म्हणसि समर्थाहं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं ॥
दीनाऽवनाविणें क्षण देइल दयिता दया कशी वर्तुं ॥ २४ ॥
किंवा भणसि समर्थोऽहं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ॥
दीनावनं विना ते दद्याद्दयिता दया कथं चलितुम् ॥ २४ ॥

---

कीं अक्ष–क्रीडेनें हरिलें मन; सर्व कार्य जी चुकवी ॥
तरि बद्धमूळ एकचि भजदवन–व्यसन वर्णिती सुकवी ॥ २५ ॥
किमशेषकार्यघातिन्यक्षक्रीडा भवन्मनोऽहार्षीत् ॥
तव बद्धमूलमेकं भजदवनव्यसनमेव कविकथितम् ॥ २५ ॥

---

कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे, नसावेंची ॥
वसवा पुरें, पुरें कां ह्मणतां, धनवंत कण कसा वेंची ॥ २६ ॥
तिलमात्रं वैकुंठे शून्यं स्थानं न भक्तबाहुल्यात् ॥
पुरसर्जनं कुरु त्वं, धनवानिव भक्तसंग्रहं कर्तुम् ॥ २६ ॥

---

कीं बहु काळ विसरला फाराचि संकोचला सखा लाजे ॥
येत असेल हळु हळू म्हणुनचि एकहि न पादुका वाजे ॥ २७ ॥
व्रीडाकरमिति मनुषे निजसुहृदो दर्शनं बहोः कालात् ॥
तस्माच्छनैः शनैस्त्वं पद-रवमविधाय किंनु समुपैषि ॥ २७ ॥

---

कीं नामस्पर्शमणी स्पर्शे परि काय करिल खापर मी ॥
सदयहि घालील कसा दुर्दैवाला सुखी सखा परमीं ॥ २८ ॥
तव नाम-स्पर्शमणिः खर्परसदृशं स्पृशेत्किमर्थं माम् ॥
हतदैवं निजसुहृदं सदयोऽपि सखा कथं सुखीकुर्यात् ॥ २८ ॥

---

कीं प्रथम मदपराधें तारूं ना म्हणुनि वाहिल्या आणा ॥
प्रभुजी पुरे प्रतिज्ञा, भारत-रण-वृत्त तें मनीं आणा ॥ २९ ॥
अवधार्य मदपराधं शपथं कृतवान्न तारयामीति ॥
अनया प्रतिज्ञयाऽलं, भारतरणवृत्तमेव मनसि कुरु ॥ २९ ॥

---

कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्ति-धन-राशी ॥
भक्तिच मज द्या, द्यावें देवाला अमृत, योग्य न नराशी ॥ ३० ॥
मुक्तिधनौघो याचकजनवृन्देभ्यः समार्पितः सकलः ॥
भक्तिं मे देहि, सुधापानाधिकृता बुधा, न मनुजाताः ॥ ३० ॥

---

कीं जरि म्हणाल असतां जन्म शुचि स्वपद-नीरजा मिळतो ॥
तरि झकवितां मला आजि चुकला नव्हताचि कीं अजामिळ तो ॥ ३१ ॥
मत्पदकमलं लभते जन्मशुचिर्नेतरो, विभो वदसि ॥
व्यर्थं प्रतारयसि मामजामिळो नैव हि प्रमत्तोऽभूत् ॥ ३१ ॥

---

कीं वाटलें खळाला मुक्ति न द्यावी जशी सुधा सर्पा ॥
तरि ती अधादिकांला द्या, सुतरा भक्तिमात्र मज अर्पा ॥ ३२ ॥

पीयूषमिव भुजंगे मुक्तिर्योग्या न दातुमधमजने ॥
देह्यघरक्षःप्रभृतिषु, सुवरां ते भक्तिमेव मे वितर ॥ ३२ ॥

---

कीं अ–कृपा नावडती आवडती स्त्री कृपा तिचें प्राज्य ॥
लोक–त्रयांत देवा ! पहिलीचें काय एक मी राज्य ? ॥ ३३ ॥
अकृपा तव नाभिमताऽभिमता दयिताऽपरा कृपा तस्याः ॥
साम्राज्यं त्रैलोक्ये प्रथमाया आयतनमहं किं भोः ॥ ३३ ॥

---

कीं गमलें जरि आधीं म्हणतों दावा स्वपाद या लोकीं ॥
जो जो वांछिल जें जें तें द्यावें हें मुधा दयालो ! कीं ॥ ३४ ॥
प्रागधिकाराद्दर्शय निजपदमिति यदि वदामि किं तर्हि ॥
वितरसि भक्तसमीहितमिति विख्यातं मुधाव्रतं लोके ॥ ३४ ॥

---

कीं आजकाल ज्याचा तेणें अधिकार घेतला रागें ॥
तरि हें अश्रद्धेय प्रभ्वंतर ऐकिलें नसे मागें ॥ ३५ ॥
यस्याधिकारसमयस्तेनापहृतं रुषा तवाद्यपदम् ॥
तदिदं न श्रद्धेयं प्रभ्वंतरमश्रुतं यतः पूर्वम् ॥ ३५ ॥

---

कीं भेटि बहु दिसां भय भेटाया दीन–बंधुला वाटे ॥
तरि भेटावें विधिनें गेले जाताति साधु ज्या वाटे ॥ ३६ ॥
तव दीनबंधुदर्शनमथ बहुकालाद्भयावहं भाति ॥
सत्पथमनुसर विधिना पश्य दयालो ततश्च का भीतिः ॥ ३६ ॥

---

कीं स्त्री–पूर्व–शिखंडी त्यातें समरांत भीष्म पाहेना ॥
मीही पहिला पापी तैसे करितां सु–कीर्ति राहेना ॥ ३७ ॥
ननु भूतपूर्वनारीं समरे न ददर्श शंतनोः सूनुः ॥
मामपि कृतपूर्वाघं नहि पश्यसि यदि सुकीर्तिहानिः स्यात् ॥ ३७ ॥

---

कीं भीशीं मज एका उद्धरितां लागतील फार झटें ॥
तरि कोणाहि न कळतां न्यावा झांकूनि दास पीत–पटें ॥ ३८ ॥
भीतोऽसि मदुद्धरणाद्यतः परेषां प्रसज्यते मुक्तिः ॥
पीतांबरेण तूर्णं छादय दासं ततश्च नय निभृतम् ॥ ३८ ॥

---

कीं लक्षभोजनापरि केला संकल्प संपला देवा ॥
तरि दाते क्षुद्रिकला मग न म्हणति काय ' या बसा जेवा ' ॥ ३९ ॥
अथवा कृतसंकल्पो लक्षाद्विजभोजनाय संपूर्णः ॥
तर्हि वदन्ति न किं क्षुद्रिकलमुदारास्त्वमेहि भुंक्ष्वेति ॥ ३९ ॥

---

कीं एक मीच उरलों पापी, हें बीज ठेविलें जतन ॥
वतन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ॥ ४० ॥
अथवा पापिनमेकं बीजमिति त्वं हरेऽवशेषयसि ॥
मांगल्यं नामापि तु मामेव करोति किं निजायतनम् ॥ ४० ॥

---

कीं कार्य–बहुत्वें तुज फावेना यावया जगत्पाळा ॥
तरि रूप घ्या दुजें, ती विद्या कंठीं वसे जशी माळा ॥ ४१ ॥
बहुकार्यत्वादवसर एवास्ति न चेत्ततो जगत्पाल ॥
आतिष्ठ रुपमन्यद्विद्या कंठे तवास्ति मालेव ॥ ४१ ॥

---

कीं मागें गुप्त उभा अससि प्रेमें उभारुनी बाहे ॥
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकशी बा ! हे ॥ ४२ ॥
यदि मत्पार्श्वे गुप्तं वससि प्रेम्णा समुद्धरन्बाहू ॥
किं तर्हि सादरं त्वं बालकवचनं शृणोषि देवेश ! ॥ ४२ ॥

---


# सार्थ श्रीदासबोध.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे, डोमगांवची कल्याण-स्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधू शिरगांवम-ठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु.

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# आनंदतनयांची कविता.

आनंदतनयांचीं पंधरा स्फुट आख्यानें व शंभरांवर पदें प्रसिद्ध आहेत. रामलक्ष्मणांस मागण्यासाठीं विश्वामित्र दशरथाकडे आले तो प्रसंग, ताटकावध, यज्ञरक्षण, सीतास्वयंवर, शबरीचें आख्यान, हीं यांचीं रामचरित्रपर आख्यानें इतकीं गोड व लोकप्रिय आहेत व हरिदासांना हे प्रसंग वर्णितांना रंग उठविण्यास इतकीं उपयोगीं पडलेलीं व पडणारीं आहेत कीं, त्यांमुळें आनंदतनयांचें नांव केव्हांही बुडण्याची भीति नाहीं. इतर आख्यानांत कृष्णचरित्रपरही चार पांच आख्यानें आहेत पण त्यांत वरील आख्यानांच्या तोलाचें फक्त सुदामचरित्र आहे. वर्ण्य विषय साक्षात् डोळ्यापुढें उभा करण्याची विलक्षण करामत यांच्या वाणींत आहे. स्वभावोक्ति अलंकार यांस उत्कृष्ट साधला आहे. यांची भाषा शुद्ध मराठी आहे. चूर्णिका मात्र संस्कृतशब्दप्रचुर आहेत. यांच्या कवितेची थोडीशी ओळख करून देतों. विश्वामित्राच्या वर्णनांतः—

पायीं वाजति पादुका चटचटां, आपादमाथां जटा

हा श्लोकपाद किंवा

माला करीं, हृदय भालासि तें भसित, ज्याला मृगाजिन कटीं
लोला जटा रुळति डोलापरी, परम कोलाहलध्वनि उठी ।

हे अश्वधाटीचे दोन चरण विश्वामित्राचें चित्रच पुढें उभें करितात. राजवैभवाहून वैराग्यवैभव उणें नाहीं हें सांगतांना विश्वामित्र ह्मणतोः—

सौधसद्में आह्मांसि पर्णशाळा । स्फाटिक रुद्राक्षा मुक्तमणीमाळा ।
भस्म अंगीं पाटीर योगियाला । उणें केंवीं वैराग्यवैभवाला ॥

विश्वामित्रः—

अंभोजेक्षण रामलक्ष्मण तुझे हे दक्ष रक्षोगणा
शिक्षाया, शत लक्षलक्ष करिती एक्या क्षणें मार्गणा ।

अशा रामलक्ष्मणांना मखरक्षणार्थ मागतो तेव्हां दशरथ ह्मणतोः—

पायां नमी देइन वंश सारा । पा यां न मी दे इनवंशसारा ।
न या वयामाजि भला जनां दे । न यावया मा जिभ लाज ना दे ॥

‘ मी पायां पडतों, माझ्या वंशांतले सारे पुरुष देईन पण मी या–इनवंश ह्म० सूर्यवंश त्यांतला सार ह्म० मुकुटबाजि जो राम–या रामाला देत नाहीं. या वयांत ह्म० ह्मातारपणांत भला मनुष्य पुत्राला परजनाच्या स्वाधीन करणार नाहीं ह्मणून नकार देण्यास माझी जीभ कचरत नाहीं ’ पूर्ण यमकाचें हें सुंदर

उदाहरण आहे. यमकांतही क्लिष्टता नाहीं. पुढें वनांत ताटका भेटली. त्या राक्षसीचें भेसूर वर्णन पहाः—

वार्ता ऐकत रामलक्ष्मण अशी–तों धांवली कर्कशी
घोराकार, करालदंष्ट्रवदना, तद्दृष्टि बालार्कशी।
हाडांच्या अळुमाळ डोलति गळां माळा, कटीं कांबळा;
जिव्हा लोळतसे मुखीं लळलळां, येते धरोनी बळा ॥

ताटकेला मारून विश्वामित्राच्या सिद्धाश्रमाकडे रामलक्ष्मण निबिड वनांतून चालले, त्या वनाचें वर्णनः—

तोषे राघव दोघ जैं निरखितीं आरण्य उत्तुंगसे
जेथें व्याघ्रमृगें, मृगाधिपकरी, जाती, फणीमुंगसे।
वल्ली, गुल्म, सुफुल्ल पल्लव, तरू व्योमींच उंचावले
मोठे चित्रविचित्र पाहुनि दिठी आलोच लांचावले ॥
कुंजीं गुंजति पुंज पुंज अलिंचे, मंजु ध्वनी गुंजती,
बर्हीं ते नटती, कपोत घुमती, त्या कोकिळा कूजती,।
हंसादि द्विज झंकृती वृकशिवासिंहादिंच्या हूंकृती
कुंभी भीष्कृति, सर्प फूत्कृति, वनीं तैशाच नानाकृती ॥

या वर्णनांतील शब्दरचना किती अर्थानुरूप आहे. वरें! पशुपक्ष्यांच्या आवाजांचा ध्वनि उमटविणारीं यथार्थ क्रियापदें व एकंदर श्लोकाचें नाद-माधुर्य वर्णनीय आहे. ताटकेचा श्लोक वाचतांच राक्षसीची मूर्ति पुढें उभी राहते. सीतास्वयंवर तर कमालीचें सुंदर आहे. मराठींत सीतास्वयंवर अनेक कवींनीं गायिलें आहे पण आनंदतनयांचें आख्यान सर्वांत अत्यंत बहारीचें आहे.

'चिद्धाग्र्यें आथिला विदेह मिथिलाभूपाळ' जो जनक त्यानें शिवधनुष्य-भंगाचा पण लावून देशोदेशींचे राजे जमविलें, सभा भरली, तेव्हां सीता स्वयं-वरार्थ सभेंत आली.

हेमाद्रीवरि हेमनिर्मित जशा संफुल्लवल्ली भल्या
तैशा आभरणीं अपार तरुणी सौधांगणीं शोभल्या।
मध्यें कल्पकवल्लरीसम दिसे शीतांशुबिंबानना
सीता शीलवती शुभा नृपसभा लक्षी जना कानना ॥

भूपांना निरखीत सीता चालली तों तिच्या सखीनें 'कोण तूझ्या मनासि येतो। सांग हो सीते' असा प्रश्न केला. हें पद तर फारच बहारीचें असून कीर्तनाला ह्या एका पदानें रंग चढलेला मीं अनेकवार पाहिला आहे. सखीनें एकेक राजाचें वर्णन करावें व सीतेनें 'बाई! तो काहिं नव्हे ग' असें उत्तर देऊन पुढें चालावें. तो कुसुंबी वस्त्र पांघरलेला? तो नवरंग दुशाला घेतलेला?

तो हडपेकराकडून विडा घेणारा? तो तुरेवाला? तो कंदर्पाचा पोषाख ल्यालेला? अभिनवकंकणहस्त असलेला? तो पद्मासनीं बसून कटयार हातीं धरणारा? तो दिक्‌रिसा दोंदिलनृप? प्रत्येक प्रश्नास सीतेचें 'बाई! तो कांहिं नव्हे ग' हें उत्तर ठेवलेलें! शेवटीं येत येत सीता सखीसह ऋषिमंडळांत विश्वामित्राशेजारीं राम बसले होते तेथवर आली. रामाचें दर्शन झालें मात्र तों वाचेला मौन पडलें!

तो ऋषिमंडळि दिव्य धनुर्धर? तेव्हां न म्हणे नव्हे ग ॥

चतुर सखी चमकली, पुन्हां रामाचीच खूण पुसूं लागली—

मेघश्याम श्रीराम मनोहर? । तेव्हां न म्हणे नव्हे ग ॥

संशयनिराकरणार्थ अगर निश्चयार्थ सखी तिसऱ्यांदा विचारते—

आनंदात्मज पूर्ण परात्पर? । तेव्हां न म्हणे नव्हे ग ॥

सखीस आतां मात्र पूर्ण खूण पटली! ती म्हणत्ये—

बाणली निजखूण तन्मय! तुझी गे सीते । ॥ कोण० ॥

संस्कृतज्ञांस रघुवंशांतील सहाव्या सर्गांतील इंदुमतीच्या स्वयंवराचें येथें स्मरण होईल. त्या प्रसंगाचा सर्व आनंद आमच्या मराठी कवीनें वरील एकाच पदांत उभा केला आहे. सीता ही परमात्म्याची पूर्ण भक्त व हा सीतारामांचा विवाह म्हणजे जीवपरमात्म्यांचें ऐक्य, हा भाव आमच्या रामभक्त सत्कवीच्या पोटांत होताच. 'यतो वाचो निवर्तन्ते' हा अनुभव सगुणनिर्गुण दोहींकडे सारखाच आहे. सीता चित्तानें रामाशीं समरस झाली तों इकडे 'डंका दुंदुभि वाजवीतचि सभे लंकापती पातला ।' पुढें रावणाचें उन्मत्त भाषण, सीतेची चिंता व रावणाचा फजीतवाडा यांचें कवीनें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. शिवधनुष्य रावणाला न तोलतां त्याच्या उरावर पडलें तेव्हां—

आला भूमितळासि गर्वपुतळा, पिंजारुनी कुंतळा,
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उच्छृंखळा ।
सर्वांगींच कळा विटे मुखकळा, झाला भुजामोकळा,
वाजे ऊर गळां, स्वदेह सगळा झिंजाडितां आगळा ॥
ओकी रक्त भडाडुनी दडपतां वक्षस्थळाची फळी,
सर्वांगें ढकली, न लेशही ढळे, भूमी भुजा आफळी ।

जनकानें रावणाच्या उरावरचें तें दडपण काढविलें, व कोणीच वीर पुढें येत नाहींसें पाहून 'निर्वीर झाली धरा' असा उद्गार काढला. त्यावेळीं विश्वामित्राच्या खुणेनें राम उठले व त्यांनीं लीलेनें तें धनुष्य भंगिलें. सभा चमत्कारली. तेव्हां सभेंतील निरनिराळ्या लोकांना राम निरनिराळे कसे दिसले तें पहाः—

सीतेला स्मरसा, धनूसि हरसा, राजां दिसे वीरसा,
मूढाला नरसा, जनां नृवरसा, भक्तांसि माहेरसा, ।
देवां ईश्वरसा, रिपूंसि गरसा, ज्ञात्यांसि चित्सारसा,
ऐसा सर्वरसांसि हेतु परिसा—जो सूर्य हृत्सारसा ॥

सीतास्वयंवराचे ८३ श्लोक असून शबरीची कथा तर कवीनें अवघी २१ च श्लोकांत पण तितक्याच गोड वाणीनें गायिली आहे. शबरी म्ह० भिल्ली, एक अशिक्षित स्त्री, पण तिचा रामाच्या ठिकाणीं विमल भाव होता. देव भावाचा भुकेला; तो जातगोत, धनवित्त कांहीं पाहत नाहीं. रामासाठीं शबरीनें चांगलीं पिकलेलीं स्वादिष्ट फळें, स्वतः सोडून व चाखून आणिलीं होतीं.

सारीं क्षतांकित फळें निरखूनि डोळां
'कां हो अशीं ?' तिस पुसे रघुराज भोळा ।
'चंचूपुटेंच बहु चोखिलिं पांखरांनीं ?
नेणों दिला प्रतिफळास नखांक रानीं ! ॥'
'चंचुक्षतें हीं नव्हती कृपाळा !
मी कां तशीं आणिन ? हा कपाळा ! ।
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें—
चाखोनि घे, मी शिवते पदातें !' ॥
मधुरतर फळांची पूर्ण घेवोनि गोडी
मग मज रघुनाथा ! ठेविता होय खोडी ।
निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा ॥

अयोध्याधिप जानकीवल्लभानें प्रेमळ व विमलमनस्क भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें प्रेमभरानें व प्रसन्न हृदयानें खाल्लीं व साऱ्या लोकांचें प्रेम जोडलें—हें सांगण्यांत भक्तिभावाचा हेतु असून ही राजांनीं किंवा लोकनायकांनीं अज्ञसमाजाचें प्रेम कसें जोडावें हें शिकविण्याचाही कवीचा उद्देश नसेल काय ?

सहजपणा कायम राखून अनुप्रास लीलेनें साधीत भाषेचा डौलदारपणा संभाळण्याचा कवीचा बाणा पाहाणें असल्यास त्याचें 'सुदामचरित्र' पहावें. सुदामदेव दरिद्री, त्याची स्त्री त्यास सांगतेः—

चोळी ना लुगडी, पळी न दगडी, टोपी न ती आंगडी,
चिंतेची सगडी जिवास रगडी, पायां वळे वेंगडी, ।
जा जा पैलथडी, मधें गडगडी क्लेशाब्धिची सांगडी,
तो श्रीकृष्ण गडी तुम्हांसि पगडी, बांधी मला लुगडी ॥

नुस्ता पोरवडा, घरीं न कवडा, चित्तीं बरा नीवडा,
नाहीं भातवडा, तया दहिंवडा कैंचा ग ! तो जीवडा ।
दारिद्र्यें चिवडाचि सर्व, दवडा थोरीवडा—पांवडा,
मागा त्या यदुरावडा, गयवडा नाशील, त्या आवडा ॥

सुदामदेवाची स्त्री त्यांस सहजच प्रयत्नवादाची मसलत देतेः—

नाना प्रयत्न पुरुषें स्वकरें करावा,
यत्नें फळेल हरि, शब्द मनीं धरावा ।

सुदामा द्वारकेची शोभा पहात श्रीकृष्णदर्शनास गेले तेव्हां ‘ तो राजेश्वर, पूर्ण चिन्मय, पुढें थोरा सुखें धांवला ’ मित्रमित्र प्रेमानें भेटले. श्रीकृष्ण विचारतातः—

कांहीं आठवतें गड्या ! शिशुपणीं साळेंतलें खेळणें ?
नाना हास्य, विनोद, मोद, सगडी कुस्ती करूं, हेळणें, ।
मी तूं हा मज तूज भेद न जगीं, ते मूळ मैत्री भली
येते कीं स्मरणासि ? जाण सखया ! पुण्यें भली लाभली

पुढील कथा प्रसिद्धच आहे. आनंदतनयाच्या वाणीचा ओघ असा अकृत्रिम, अस्खलित आहे. त्याच्या वाणींत प्रसाद आहे. त्याचीं

( १ ) कां रे नाठविसी कमलनयन वासुदेव ॥
( २ ) ब्रह्म विचार करा ! गडे हो । ब्रह्म विचार करा ॥
( ३ ) देव करील दया । तयावरि । देव करील दया ॥
( ४ ) माझा कृष्ण देखिला काय । कुणि तरि सांगा हो ॥

हीं पदें लोकप्रिय आहेत. आनंदतनय रामभक्त होते. ते शहाजी यांचे गुरु होते असी प्रसिद्धि आहे. मोरोपंतांनीं ‘ सन्नामगर्भरामायणांत ’ त्यांचा उल्लेख केला आहे. त्यांनीं सन्मणिमालेंत ह्मटलें आहेः—

आनंदतनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम कांहीं ॥

---


# पारिजातकाचीं फुलें.

या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति खपत आली आहे. आकारानें लहान पण अर्थगांभीर्यानें मोठीं अशीं हीं दिव्य सुमनें परमार्थविचारांना स्फूर्ति देणारीं आहेत अनेक वर्षांचा अभ्यास, अनुभव व अवलोकन यांचा मोहक संगम अशा स्फुट विचारांत झालेला असतो. पृ. स. ८०. किं. ८.

पत्ताः—व्यवस्थापक, ‘ मुमुक्षु ’ पुणें.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# राष्ट्रोन्नति व मनोजय.

## लेखांक १

( ले. कृ. गो. पु. पे. मास्तर, मु० बेलापूर. )

१ परमेश्वरानें मानवी प्राण्यांस पवित्र ज्ञानास योग्य असा नरदेह दिला आहे. पण ते त्याचा योग्यकारणीं उपयोग करितात कीं नाहींत? त्याचा योग्य उपयोग करीत नाहींत असें न्यायानें ठरलेंच तर याबद्दल त्यांना परमेश्वराजवळ जबाब द्यावा लागेल काय? आपण कोण, जन्मास येऊन काय केलें, व काय करावयास पाहिजे होतें, कांहीं न केल्यास इहलोकीं व परलोकीं काय गति होईल? इत्यादि गोष्टींचे विचारतरंग मनुष्यांच्या डोक्यांत खेळत असतील; देह नाशिवंत व किती क्षणभंगुर आहे, हेंही हरघडीं लक्षांत येत असेल; आपण जरी अज्ञानावस्थेंत असलों, तरी वरील वाक्यांचा अर्थ सहज समजण्यासारखा आहे. पण तो आम्ही 'कळत असून वळत नाहीं' या म्हणीप्रमाणें मानून वर्तन करीत असतों. वास्तविक विचार केला असतां, अगदीं लहान दोन वर्षांचे आंतील मुलांस सुद्धां मनाप्रमाणें कांहीं गोष्टी घडाव्या असें वाटत असतें; म्हणजे त्यास तितकें ज्ञान प्राप्त होत असतें, व त्यास जरी बोलतां येत नसलें तरी रडण्याचे निमित्तानें तें प्रयत्न करीत असतें; व माता त्याचें हृद्गत ओळखून समाधान करीत असते; ही गोष्ट सर्वांस अनुभवानें माहीत आहे; मग त्यांहून जास्त वयाच्या माणसांस कांहीं तरी अधिक ज्ञान असलेंच पाहिजे. करितां अशा मानवी प्राण्यांनीं अवश्य विचार करणें वाजवी आहे, पण त्यांचें मन ताब्यांत न राहतां चंचल होऊन इंद्रियांस चिथावून सैरावैरां धांवावयास लावतें व अखेर कसें फसवितें व किती वेळां गोत्यांत आणितें व त्यामुळें मनुष्यप्राणी कसा भ्रम पावतो, व कित्येक वेळां आलेल्या संकटांतून त्याला कसें सुटावें हें सुचत सुद्धां नाहीं अशा मनाच्या ओढाताणीनें कशी त्रेधा उडते व निरुपाय होतो, या गोष्टींचा विचार करणें म्हणजे मन ताब्यांत ठेवणें जरूर आहे. म्हणून तें मन जिंकण्यास काय काय साधनें करावीं, व तीं करूं लागल्यास काय अडचणी येतील व आल्यास त्यांचें कसें निवारण करावें याचा सरळ मार्ग शोधला पाहिजे; व त्याकरितां धर्माची जागृति, नीतीचा मार्ग व सचोटीचा व्यवहार, हीं साधनें उच्च दर्जाचीं व उपयोगाचीं आहेत काय? व तीं योग्य रीतीनें बजाविलीं असतां मानवजातीची उन्नति होईल कीं नाहीं

व शेवटीं पूर्णसुखाचा म्हणजे ईश्वरप्राप्तीचा लाभ होईल किंवा नाहीं, शिवाय या साधनांचा प्रयोग जगांत कितपत सुरू आहे, व तो प्रयोग सुरू केल्यापासून जगाचे फायदे अगर न केल्यापासून तोटे झाले याबद्दल ओघानें यथामति विवेचन करण्याचा मानस आहे, तो पूर्ण होणें जगन्नियंत्या परमेश्वराच्या हातीं आहे.

२. हल्लीं जगांत ज्ञानाचा प्रसार दिवसेंदिवस सूर्यप्रकाशाप्रमाणें वाढत्या प्रमाणावर होत आहे. त्यांत माझ्यासारख्या खद्योताचा प्रकाश कितीसा पडणार, हें मी जाणून आहें; पण अंधाऱ्या रात्रीस खद्योताच्या प्रकाशाचा मनास किंचित् आल्हाद वाटतो, त्याप्रमाणें वाचकांस आनंद होईल; शिवाय सत्पुरुष तुकाराममहाराज यांचें अभंगाचाही आधार आहे. तो असा कीं, " तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे, बोल आणिकाचे नावडती " मातुश्रीपुढें मुलानें बोलण्याचें कौतुक केलें, तर त्याबद्दल तिला फार प्रेम वाटत असते; तसें तुम्ही वाचक मजविषयीं प्रेम बाळगाल, अशी उमेद धरून दोन शब्द लिहिण्याचें मी धाडस करीत आहे. त्यांची रुचि वाचकांस कितपत लागेल याचा अजमास करवत नाहीं; पण ' सत्यसंकल्पाचा दाता नारायण ' या साधूक्तीप्रमाणें संकल्प करून व श्रीसद्गुरूंचें स्मरण करून आरंभ करितों; शेवटास नेणें त्या जगदीशावर अवलंबून व गुणदोषांची माफी मागून माझें हें वृद्धपणांतील हद्दत पुरें करितों.

**मनएव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः**

३ मनुष्याला बंधांत पाडण्यास व मुक्त करण्यास मनच समर्थ असतें असा याचा अर्थ आहे. माझा जन्म ब्रह्मकुलांत, असें असतां ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें वेदाज्ञेनें वर्णाश्रमधर्म पाळून वागणें वाजवी आहे. आणि ' यद्यदाचरतिश्रेष्ठः' या गीतोक्तीप्रमाणें सर्व वर्णांस सनातनधर्माचा मार्ग खुला करून ठेविला पाहिजे; पण आजारीपणांत मजकडून सर्वच गोष्टी उलट व विचित्र घडूं लागल्या. ज्या गोष्टीची मला संवय नाहीं त्या गोष्टी करण्यास मी प्रवृत्त झालों, आणि या वेळीं असाच ईश्वरी संकेत असला पाहिजे असेंही मनास वाटलें. ज्या दोघ्याचा स्पर्श झाला असतां ब्राह्मणधर्माप्रमाणें मला विटाळ होत असे तोच मी आजारीपणामुळें बिछान्यावर अन्न भक्षण करूं लागलों; ज्या मातीच्या भांड्याकडे वाकड्या नजरेनें पाहत नव्हतों, त्याचा या वेळीं उपयोग करूं लागलों; देहाच्या सुखाकरितां औषधरूपानें अपेयपान करूं लागलों; ज्या खुल्या हवेंत हिंडणें प्रियकर वाटत होतें, तो मी कोंदट हवेंत दुःख भोगीत पडूं लागलों; ज्या वेळीं प्रकृती निरोगी असे अशा वेळीं स्वच्छतेच्या डौलांत मला दुसऱ्याचा गलिच्छपणा खपत नसे तो या वेळीं केरांत व दुर्गंधींत लोळूं

लागलों; जीं जवळची नातलग माणसें अर्ध्या वचनांत मोठया प्रेमानें वागून माझी शुश्रूषा करीत होतीं तींच दुखणें लांबल्यामुळें कंटाळवाणीं होऊन मजकडे दुर्लक्ष करून माझी अनास्था करूं लागलीं! त्यांचा तरी उपाय काय? सुखाची इच्छा ही सर्वांसच असते; अशा तऱ्हेनें सर्वच गोष्टींत स्थित्यंतर होऊन ब्राह्मणजन्मास येऊन वेदाज्ञेबाहेर आचारभ्रष्टतेचें वर्तन घडलें व मन नाना प्रकारच्या कल्पनांनीं भ्रम पावलें.

४. पूर्वी 'शापादपि शरादपि' ऋषि कसे शुचिर्भूत आचारनिष्ठ होते; ऋषिपत्न्याहि पातिव्रत्यांत किती दक्ष होत्या! ही योग्यता त्यांचे ठिकाणीं असून त्यांचे ठिकाणीं आरोग्य राहून त्यांचें तपश्चर्येचा भंग न होतां त्यांची अढळ कीर्ति अद्यापपावेतों त्रैलोक्यांत गाजत आहे. हल्लींचे काळांत इतकें रूपांतर कां झालें, याचा विचार कोणी कधीं तरी केला आहे काय? असें कां झालें, आपण कोठें व काय चुकलों व पुढें काय केलें पाहिजे, जगांत काय सुधारणा घडवून आणिल्या पाहिजेत, कां आगगाडींत बसून जेवलें पाहिजे किंवा निदान चहा तरी प्याला पाहिजे; अथवा मोठमोठया आधुनिक विद्वानांसह सकुटुंब पार्टीभोजन केलें पाहिजे अगर स्वराज्य मिळविण्याकरितां स्वाभिमानानें आपसांत यादवी माजवून गव्हाबरोबर किडे या म्हणीप्रमाणें अज्ञान व गरीब रयतेचें नुकसान करून त्यांचे हाल केले पाहिजेत अथवा धार्मिक बाजूंत पूर्वपरंपरेविरुद्ध वेदबाह्य भ्रष्टतेचें आचरण चालविलें पाहिजे वगैरे वगैरे; म्हणजे आमची पूर्वकालीन सुस्थिति आम्हांस त्वरित प्राप्त होईल व आम्हांस नेहमीं पर्जन्याची आपत्ति न पडतां असें दुर्दिन येऊन दुःख होणार नाहीं!

५. वर लिहिलेली आजारीपणाची स्थिति निरुपायामुळें भोगणें भाग पडतें, असा कोणी आक्षेप घेतील, तर हें त्यांचें म्हणणें एक पक्षीं रास्त दिसेल; पण हल्लीं अंतरबाह्य दृष्टीनें विचार केला असतां सर्व जग आजारी असल्याप्रमाणें वागून सार्वत्रिक वेदबाह्य भ्रष्टतेचें वर्तन जगांत कायम सुरू आहे. मोठमोठें वेदवेत्ते, विद्वान्, योग्य अधिकारी, शास्त्री, पंडित, आधुनिक विद्वान्, व सरकारी नोकर लोक वगैरे भ्रष्टतेच्या लाजिरवाण्या गोष्टी करून, ईश्वरप्रणीत मार्ग सोडून, सनातनहिंदुधर्माची पायमल्ली करीत आहेत, याबद्दल खेद वाटतो. चोहींकडे वर्णसंकर होण्याची वेळ आली आहे, आणि त्यावरून मागील परंपरेनें श्री भगवंताच्या उक्तीप्रमाणें धर्मस्थापना करण्यास कोणी अवतारी पुरुषही श्रीसमर्थरामदासांप्रमाणें उदयास येईल, असेंही अनुमान होत आहे. हल्लीं त्यांत आम्ही ब्राह्मण तपश्चर्यादि साधनें टाकून चहा, विडया, वगैरे नाना व्यसनांत गुंग होऊन जन्मरोगी बनलों आहों; त्यामुळें मागील

ऋषींप्रमाणें आमच्यांत वीर जन्मण्याचा संभव फार कमी दिसतो, तेव्हां हें कोडें मोठें गूढ असून त्याचा उलगडा तावडतोब होणें अशक्य आहे. आजारी मनुष्याचे दुःखास कोणी वांटेकरी होत नाहीं, हें तो रोगी जाणत असतो; परंतु त्याच्या अज्ञानामुळें असलेलें दुःख कमी होऊन जास्त सुख होईल म्हणून दुसऱ्याच्या मदतीची तो अपेक्षा करीत असतो; व वैद्य वगैरेकडून औषध घेऊन सुखी होण्याची इच्छा धरितो, पण ती सफल होणें कठीण पडतें. प्रारब्ध कर्म भोगिल्याशिवाय रोग बरा होत नाहीं. वैद्य, डाक्टर प्रयत्न करीत असतातच; त्यांत हल्लीं देशी वैद्यांचा व वनस्पतींचे औषधांचा बहुतेक लोप झाला आहे, व जे वैद्य आहेत त्यांस सशास्त्र परीक्षा नसल्यामुळें त्यांचे औषधांचा गुण येत नाहीं; आणि त्यामुळें त्यांवर लोकांची श्रद्धा बसत नाहीं. डॉक्टर चांगले शिकलेले असतात पण त्यांस नाडीपरीक्षा नसून द्रव्यावर हाव फार; त्यामुळें हरएक रोगांवर त्यांचे उपाय लागू पडत नाहींत. तरी जखमेचें वगैरे ऑपरेशन करण्यांत त्यांचें धैर्य व कुशाग्रता दिसून त्या बाजूनें त्यांचा उपयोग चांगला होतो, इतर रोगांवरही त्यांचा उपयोग होत नाहीं असें नाहीं. पण 'फी' व बिल चालू असल्यामुळें तें रोग्यांस जड पडतें. हल्लीं जगांत अशी समजूत खास होत आहे कीं आगगाडी, वकील व डॉक्टर या धंदेवाल्यांकडून जगाची उन्नति होत आहे पण मला असें वाटतें कीं ही त्यांची समजूत चुकीची असून या धंदेवाल्यांचा उपयोग नफ्यापेक्षां तोटयांच्या रूपानें जास्त होऊन जगाची अवनतीच होत आहे; कदाचित ही माझी समजूत चुकीची ठरेल. परंतु मी आपला अनुभव सांगत आहे; अशी वस्तुस्थिति जगांत भासमान होत आहे.

६. यावर प्रसिद्ध साधू तुकाराममहाराज यांचा अनुभवसिद्ध दृष्टांत आहे कीं प्रारब्धकर्माप्रमाणें शरीरभोग भोगलाच पाहिजे; त्याशिवाय रोग बरा होत नाहीं. एके प्रसंगीं तुकाराममहाराजांचे पायास एक गोळा आला. महाराजांस देहदंड भोगिल्यावांचून आजार बरा होणार नाहीं हें तत्व माहीत होतें; औषधांचा त्यांनीं प्रयत्नच केला नाहीं. सहा महिने दुःख भोगलें; आजार बरा होण्याचे सुमारास त्यांची कसोटी पाहाण्याकरितां ईशप्रेरणेनें एक वनस्पती मूर्तिमंत त्यांचे पुढें येऊन विनंति करूं लागली कीं 'आपले रोगास मजपासून आराम वाटेल.' त्यावेळीं महाराज तिला म्हणाले कीं "तूं इतके दिवस आम्हांस कां भेटली नाहींस? आतां आम्हांस तुझी गरज नाहीं." सारांश रोग बरा होण्याची वेळ आली असतां सर्व गोष्टी अनुकूळ होतात व कार्यभाग होतो; तसा हल्लीं जगास कालमानानें महारोग लागला आहे. तो प्रारब्धकर्मानें भोगणें भाग आहे. त्यांत मानवी प्राणी धार्मिक दृष्टया नीतिदृष्टया व्यवहारदृष्टया अंध होऊन अवनतीच्या पंकांत गच्च रुतले आहेत त्यांतून त्यांस काढ-

ण्यास हल्लींचे काळीं कोणी समर्थ दिसत नाहीं; एखादा अवतारी पुरुष याच कार्याकरितां ईशप्रेरणेनें उत्पन्न झाला तर कोण जाणें ! हल्लीं मनुष्यांची प्रवृत्ति केवळ स्वार्थाकडे जास्त असून सत्य अगर असत्य मार्गानें कां होईना, तो स्वार्थ साधून घेण्यास आळस करीत नाहीं; क्षुल्लक कामांत सुद्धां साहसकर्म करण्यास भीत नाहीं, व ईश्वराचें भय बाळगीत नाहीं; जसें कांहीं ईश्वराच्या आज्ञेनेंच ही गोष्ट आपण करीत आहोंत असें त्यांस वाटत असतें. मला आश्चर्य वाटतें कीं, पूर्वकालीं किती चांगली स्थिति होती. वडील माणसें सांगत असत कीं, चार सहा पिढयांच्या पूर्वी दुष्काळ पडला होता; आतां ह्या आमच्या पिढींत सुधारलेल्या देशांत सुशिक्षित मंडळीचे दृष्टोत्पत्तीस अनंत दुष्काळ पडले व पडत आहेत आणि वरचेवर पुढेंही पडतील असें सर्वांस भय वाटत आहे. या सुवर्णभूमींत दरवर्षी खात्रीनें भरपूर पर्जन्य पडेल, दोन्हीं पिकें चांगलीं येतील, लोकांस ऊर्जितावस्था प्राप्त होईल, असा कोणासही भरंवसा वाटत नाहीं. सुमारें २५–३० वर्षें अशी परिस्थिति चालू आहे; व ही स्थिति पुढ किती दिवस चालणार, याचा अजमास कोणासहि करवत नाहीं. त्यांत परदेशस्थ लोकांस या देशांत येऊन स्वार्थ साधून घेण्याची हाव फार. शिवाय अलीकडे महायुद्धापासून महर्घता व पर्जन्याची वाण यामुळें दिवसेंदिवस लोकांची कंगाल स्थिति वाढत्या प्रमाणावर आहे; त्यांत खाण्याच्या पदार्थांवर अनावर इच्छा, व स्त्रीलुब्धता, या दोन गोष्टींनीं दे माय धरणी ठाय करून सोडिलें आहे. प्राप्तीचा भाग कमी पडून गरजा मात्र जास्त वाढल्या आहेत. व्यसनांचा प्रसार वाढत्या प्रमाणावर आहे ! पूर्वी तंबाखू खाणें, क्वचित् ओढणें व तपकीर हुंगणें हींच व्यसनें थोडक्या प्रमाणांत प्रचारांत होतीं; आतां दिवस वाईट, व्यसनांचा मर्यादेबाहेर प्रसार. चहा तर एक मेजवानीचा भाग झाला आहे; जेवणापेक्षां त्याची योग्यता वाढून त्यानें मनुष्यांस वेडावून सोडिलें आहे, व त्यामुळें लोकांस विपन्नावस्था येऊन उलटी प्रजा निर्बल झाली आहे. देशांत मानसिक व शारीरिक बल वाढविण्याचा कोणीच यत्न करीत नाहीं. रोगांचें ठाणें भयंकर प्रमाणांत बसलें आहे व त्यामुळें डाक्टरांस व वर्तमानपत्रांतील औषधांच्या जाहिरातींस फार भाव आला आहे; पर्जन्याच्या आपत्तीमुळें व गाईंच्या बेसुमार वधामुळें दूधदुभत्याची अनवस्था होत आहे, गोमाता सर्वांचें दैवत असून कसायाचे सुरीखालीं भयंकर संहार होऊन तिचा अनादर होत आहे, व त्यामुळें प्रजा अशक्त होऊन चहास परदेशी दुधाची अपेक्षा करण्याची वेळ लवकरच येईल असा अजमास आहे ! पूर्वकालीं चांगली स्थिति कां होती व हल्लीं या सुधारणेच्या कालांत व न्यायी राज्यांत दुःस्थिति कां यावी हें प्रत्येकानें आपलें मनांत शोधून पाहिलें पाहिजे.

आपले वर्तनांतही चुकत आहे खास व त्याकडेच सर्वांचें दुर्लक्ष होत आहे; त्या चुका सुधारण्याचा प्रयत्न कळकळीनें झाला, म्हणजे एकंदर गोष्टींचा न्याय आपोआपच होईल; मग आपण धार्मिक बाजूंत, नीतिमार्गांत व व्यवहारांत सरळ व सत्यमार्गाचें अवलंबन करून एकंदर वर्तनांत पूर्ण सुधारणा करूं. मग पूर्वींचे सुदिन येण्यास काय वेळ आहे ? या कोडयाचें उत्तर मन ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य लोकांत नाहीं, हेंच खरें आहे व त्यामुळेंच सर्व गोष्टींत चुका घडत आहेत; हें संकल्पविकल्पात्मक मन इंद्रियांस नादीं लावून त्यांची लालसा पुरविण्यासाठीं त्यांस बरोबर घेऊन दाही दिशांस भटकावयास लावितें; कवि मोरोपंत यांचे ( मन हें ओढाळ गुरूं० ) उक्तीप्रमाणें त्या ओढाळ मनास आवरून धरण्याचे प्रयत्न कोणीही करीत नाहींत; तो मन आकलन करण्याचा मार्ग सत्संगति लाभल्याशिवाय सांपडणार नाहीं, व सत्संगति सात्विक ग्रंथश्रवणाशिवाय मिळणार नाहीं. सात्विक वृत्ति अभ्यासानें बनविली पाहिजे. पण तसें न घडतां कादंबऱ्या, नाटकें, वर्तमानपत्रें, मासिकें व पाक्षिकें वाचणें आणि संगीत नाटकें, गाणीं, सिनेमा, तमाशे, सर्कशी, खेळ वगैरे रजोवृत्ती व तमोवृत्ती वाढविण्याकडे आह्मी मोठया प्रेमानें मन वळवून लाखों रुपयांचा चकणाचूर करीत आहोंत; व त्यामुळें आम्हांस ही भयंकर विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ! तरी आमच्या डोळ्यांवरील धुंदी न जातां बेफामपणानें आम्ही वागून सर्वस्वी आपला व दुसऱ्यांचा नाश करीत आहोंत. रजोवृती तमोवृत्तीपेक्षां फार घातक आहे. तमोवृत्तीच्या मनुष्यास लाभाची वेळ आली असतां लवकर सुमार्ग सुचतो व तात्काळ कार्यभाग होतो; वाल्हा कोळी तामसवृत्तीनें दिवसांतून शेंकडों जीवांचा संहार करून पापाचरणानें कुटुंबपोषण करीत असे, पण त्यास सात्विकवृत्तींत जाण्यास फारसा वेळ लागला नाहीं; सत्पुरुष नारदांची भेट होऊन सत्संगतीचा लाभ झाला. त्यांचें संगतीनें ' अखेर परिणामीं दुःखास वांटेकरी कोणी होत नाहीं, सर्व सुखाचे सोबती असतात, ' हें तत्व त्यास पूर्णपणानें पटलें, व पश्चात्ताप होऊन तावडतोब सात्विक बनून नारदांचा सदुपदेश घेऊन त्यांच्या कृपाप्रसादानें रामनामाचें ध्यान करून कृतार्थ झाला, आणि वाल्मीक ऋषी होऊन शतकोटी रामायण लिहिलें, त्यामुळें प्रभु रामचंद्रास अवतार घेऊन रामायणाप्रमाणें वर्तन करावें लागलें. एवढया अधिकारास चढून सर्व जगावर उपकार करून शेवटीं पूर्णपदास पोंचला. सर्व ऋषींची परंपरा अशीच आहे; तपश्चर्येचें फल असेंच मिळत असतें. मागील ऋषिवृंदांनीं शुचिष्मंत राहून आचारनिष्ठ बनून आपलें ब्रह्मकर्म, स्नानसंध्या वगैरे षट्कर्म, जपजाप्य, यज्ञयाग, वेदपठण, तपश्चर्या वगैरे कृत्यें यथासांग व मर्यादेनें करून सनातनधर्माचा मार्ग जगास

खुला करून ठेविला आहे. हा त्यांचा जगावर मोठा उपकार झाला आहे. तपश्चर्येच्या बळानें ते योग्य अधिकारी व 'शापादपि शरादपि' समर्थ झाले, व इतर सामर्थ्येंही त्यांच्या ठिकाणीं प्राप्त झालें; त्या योगानें क्षत्रियवंशी राजे, त्यांचे आश्रमधर्म चालण्यास भिऊन मोठ्या पूज्यबुद्धीनें द्रव्याचें सहाय करून सर्व बाजूंनीं रक्षण करीत असत; त्यांजकडून यज्ञ-यागादि कर्में करवून घेऊन योग्य संरक्षण होत असे, याप्रमाणें चारी वर्ण व आश्रम धर्माप्रमाणें वागत असल्यामुळें पर्जन्य वेळचे वेळीं पडून सर्व देशांत सुबत्ता होऊन, सर्व प्रजा सुखानें कालक्रमणा करीत असे. हल्लींच्या काळीं सर्व गोष्टी उलट घडत आहेत. वर्णाश्रमधर्माप्रमाणें चारी वर्णांकडून वर्तन घडेनासें झालें आहे; अशा तऱ्हेनें सनातनधर्माचा लोप होत चालला आहे. विद्वान् तत्ववेत्ते स्वामी विवेकानंद यांनीं या हिंदुधर्माबद्दल आपल्या व अन्य-देशांत स्वाभिमानानें व्याख्यानरूपानें फार अप्रतिम सेवा केली आहे; कोण-त्याही धर्माचा मनुष्य या धर्माचीं तत्वें ओळखून अखेर याच धर्मांत समाधान पावतो. त्यावरून या धर्माचीं तत्वें अनादि व उच्चतर आहेत, यांत बिलकूल संशय नाहीं. पण त्याबद्दल चारी वर्णांनीं संघटन न करितां ब्राह्मणांनीं निर्वाहा-साठीं विशेषेंकरून नोकरी म्हणजे सेवाधर्म पत्करला आहे. या सेवाधर्मांत चारी वर्णांचे लोक कमी जास्ती प्रमाणानें आहेत. पूर्वकालीं सेवाधर्म शूद्रां-कडे होता; वर्णाश्रमधर्माची वांटणी भगवंतांनीं अर्जुनास सांगितली आहे. आतां नोकरीमुळें सर्वांचा दर्जा सारखा मानला जाऊन ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व इतर वर्णांवर दाब बसण्यासारखें राहिलें नाहीं, हा पाश्चात्य विद्येचा व भौतिक शास्त्रांचा प्रभाव होय; ब्राह्मणांनीं आपलें स्वधर्मकर्म सोडल्यामुळें इतर वर्णही स्वेच्छाचारानें वागूं लागले, यांत नवल तें काय! धर्मगुरूंचेंही वर्चस्व राहिलें नाहीं, त्यांच्या दृष्टीआड वाटेल तीं अनीतीचीं कर्में होऊं लागलीं व त्याबद्दल कडक शासन मिळेल, अशी कोणास भीति उरली नाहीं; सर्वांस एक मालक न राहतां, धर्माचे बाबतींत ज्याचा तो मताभिमानें मालक होऊन कोणी कोणाचें ऐकेनासें झालें आहे. मनुष्यजन्म देण्याचा परमेश्वराचा हेतु काय व त्या हेतूचा परिणाम काय होत आहे; याचा आम्ही विचार करितों कोठें! राजे परधर्मी असल्यामुळें धर्माचे बाबतींत त्यांस लक्ष देण्याचें कारण नाहीं, म्हणून कालमानानें जगाचें स्थित्यंतर झालें आहे. आम्ही मनाच्या ताब्यांत वागून रजतमोवृत्तीनें इंद्रियांची तृप्ती करीत रहावयाचें, नेहमीं ऐष-आराम भोगावयाचा, म्हणजे मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता संपली, असें आम्ही समजतों; पण खरोखर तसें नाहीं; या गोष्टींचा आपण सर्वांनींच पूर्ण विचार केला पाहिजे. इतर प्राण्यांपेक्षां आपणा मानवांस वाचा जास्त दिल्या-

मुळें ज्ञानही विशेष असतें, व त्यामुळेंच आपण सर्व प्राण्यांस आपल्या ताब्यांत ठेवितों; त्यांकडून अनेक कामें करवून घेतों. तेव्हां या ज्ञानाचा उदरंभरणापुरता, व सृष्ट्युत्पत्तीपुरता उपयोग करावयाचा नाहीं, कांहीं तरी इतर प्राण्यांपेक्षां जास्त कामगिरी बजावली पाहिजे; पण याचा अखेरपर्यंत कोणी विचारच करीत नाहीं. परमात्म्याचा हेतु काय असावा, गर्भवासाचें भयंकर दुःख सोसून हात जोडून बाहेर जन्मास यावयाचें व ज्यानें दुःखापासून सोडविलें, त्याचा विसर पडून प्रपंचाची हाव धरून द्रव्य, घर, बायको, शेतें, बाग वगैरे कमवावयाचे व शेवटीं मरावयाचें आणि पुन्हा नरकवासांत भवचक्राचे वरचेवर फेरे करावयाचे. बालवय खेळांत, तरुणपण स्त्रीपाशांत व वृद्धपण सतत ईश्वराचा आठव करण्याचा अभ्यास नसल्यामुळें अगर गात्रें शिथिल झाल्यामुळें दुःखांत, अशा तऱ्हेनें आम्ही मानव सर्व आयुष्याचें मातेरें करून अंतकाळ समीप आला तरी प्रपंचाची कोरडी हाव धरून अनादि संस्कारानुरूप मार्कंडेयाप्रमाणें जगण्याची इच्छा करीत राहून सर्वांस सांगतों कीं, "उत्तम वैद्य अगर नामांकित डाक्टर आणा, लागेल तितका पैसा खर्च करून माझे प्राण वांचवा; मी वांचलों नाहीं तर मागें कुटुंबांतील माणसांचें कसें होईल; आश्रित मंडळी निराधार होतील; अद्याप पुष्कळ कामें करावयाचीं राहिलीं आहेत. व या एवढ्या ऐश्वर्याचा उपभोग न मिळतां दुसरे चैन करतील व जीवित व्यर्थ जाईल;" पण त्यांस हें मुळींच समजत नाहीं कीं, सर्वच खोटें व नाश पावणारें आहे, हें न जाणतां भ्रम पावून अशा अखेरच्या वेळीं सुद्धां त्याचे मनांत सात्विक वृत्तीचा संचार होत नाहीं. अमानुष श्रम करून ऐश्वर्य संपादिलें व आतां सोडून जाण्याची वेळ येऊन पोंचली; एवढा मात्र ध्यास लागलेला दिसतो. "देह त्यागितां कीर्ति मागें उरावी" या रामदासांच्या उक्तीचा आठव होऊन वासना बदलत नाहीं, आजन्मांत परोपकृति नाहीं, दानधर्म नाहीं, अतिथिसेवा नाहीं, अर्चनपूजन नाहीं, मात्र अनन्वित कर्मे स्वार्थ साधून घेण्याकरितां करून प्रपंच केला; पण पुढें मरणानंतर काय परिणाम होईल, दुःखकारक यमयातना भोगून पुन्हां गर्भवासाच्या चक्रांत अनंत नीच योनींत येऊन नरकवास भोगूं, हा विचार ध्यानीं मनींही येत नाहीं, जवळ असलेले आप्तेष्ट वगैरे यांचें सांगणें पटत नाहीं, अशा तऱ्हेनें या मृत्युलोकची यात्रा संपवितो; अशी स्थिति होत असते.

७ मानवी प्राणी हे या दुर्लभ देहाचा असा दुरुपयोग करीत आहेत. या नरदेहांत पुन्हां जन्म येणें कठीण हें आम्ही ब्राम्हणांनीं जाणून सनातन वर्णाश्रमधर्माप्रमाणें वर्तन करून देहाचें सार्थक करण्याचा म्हणजे पुन्हां गर्भवासांत न येण्याचा मार्ग स्वीकारून इतर वर्णांसही साह्य केलें पाहिजे, पण तसें न

करितां आम्ही विशेषेंकरून ब्राह्मणच तो मार्ग कुंठीत करित आहोंत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. व त्यामुळें परधर्मीयांचा हात शिरण्यास जागा होऊं पाहत आहे, व ब्राह्मण निंदेस पात्र होत आहेत; या गोष्टी लिहिण्यास मी ब्राह्मण जातीचा असल्यामुळें मोठ्या संकटानें लेखणी चालवीत आहे, पण निरुपायानें लिहिणें भाग पडत आहे; " दुःख वेशीला बांधल्याशिवाय वैद्य औषध देत नाहीं व गुणही येत नाहीं " अशी एक म्हण आहे. याबद्दल ब्राह्मणांनींच प्रथम अवश्य विचार करावा; व सनातन धर्माचा मार्ग सुधारून तिन्ही वर्णांस मार्गदर्शक होऊन, आपणांत प्रेमानें मिळवून घ्यावें; हीं संघटणाची वेळ आणीबाणीची आहे, आपसांत फाटाफूट होऊं न देतां एकविचारानें सर्वांचाच तरणोपाय करून घ्यावा. मी आपला अपराधी शरणागत आहे, माफी कराल अशी उमेद धरून आहे. नुसता जातीचा अभिमान धरून मत्सरबुद्धीनें सभांचा सुळसुळाट करून द्रव्यहानि करण्याची वेळ नाहीं, हल्लीं ब्राम्हणांचा छळ करून " समूलंच विनश्यति " करण्याचा क्षत्रिय वंशस्थ म्हणविणाऱ्या मंडळींनीं एक नवा सत्यसमाजपंथ उत्पन्न केला आहे, त्यास चारपांच वर्षे होत आलीं आहेत; या पंथास माजी राजे कोल्हापूर संस्थानाधिपति हे द्रव्यद्वारा आश्रय देत होते असेंही कोणी कोणी म्हणतात व असें महत्वाचें काम मोठ्याचे मदतीशिवाय शेवटास जाणें कठीण असतें; पण मराठे लोकांच्या दुर्दैवानें ते परलोकवासी झाल्यामुळें या समाजाची मोठी हानि झाली, असें कित्येकांस वाटत आहे. ज्या साताराप्रांतीं सत्पुरुष रामदास स्वामींनीं आपल्या कृपाप्रसादानें आपले शिष्य क्षत्रियवंशस्थ श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचे करवीं धर्मस्थापनेचा प्रयोग सुरू केला, त्याच प्रांतांत या समाजिष्ट कंपूनीं प्रथमच अधर्म सुरू करून सर्व महाराष्ट्रांत त्याचा प्रसार क्रमाक्रमानें मोठ्या कळकळीनें चालविला आहे, तेव्हां हें या भरतभूमीचें कालानुरूप दुर्भाग्यच समजलें पाहिजे हे सातारा व सोलापूर प्रांतांत ब्राम्हणांच्या घरांदारांची व इस्टेटीची अतिशय नासाडी केली, व करीत आहेत; दयाळू सरकारचेंही या कामांत चांगलें लक्ष पोंचलें नाहीं, ही केवळ कालगतीच होय. हिंदुस्थानांत पूर्वीं यवन राजे व पेंढारी वगैरे रानटी लुटारू लोक येऊन त्यांनीं गरीब हिंदवासीयांचा छळ करून मोठमोठ्या संकटांत पाडिलें; त्यावेळीं क्षत्रिय वंशजांनींच देशाचें रक्षण केलें, व आतां ईशकृपेनें न्यायीराज्य येऊन तें सर्व दैन्य दूर झालें होतें; त्याच न्यायी राज्यास बाध आणण्यासारखे भीतिप्रद प्रयोग सुरू व्हावे, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होत आहे; व त्यामुळें चारी वर्णांस ती लज्जास्पद होऊन हिंदुधर्मास कमीपणा आणणारी आहे. एक दृष्टीनें त्या सत्यशोधकांकडे दोष नाहीं, असेंही म्हणावें लागतें, कीं ब्राम्हण जर ईश्वराचे

घरीं गुन्हेगार ठरले, तर त्या गुन्ह्याचें शासन त्यांस कोणत्या तरी रूपानें कोणाच्याही मार्फतीनें त्याकडून मिळणें वाजवी आहे, यांत संशय नाहीं. आपणांस जेव्हां जेव्हां कोणत्याही कारणानें दुःख अगर संकट प्राप्त होतें तेव्हां तें कोणत्या तरी गुन्ह्याची शिक्षाच होय, असें खास समजावें; पण तें आमच्या लक्षांत न येतां अज्ञानानें दुसऱ्यावर त्याबद्दल दोष देतों. शिवाय ही सत्यशोधक मंडळी अज्ञान दर्जाची. कारण त्यांनीं नांव धारण केल्याप्रमाणें सत्याचा शोध न करितां केवळ आडदांडपणानें वागून ऋषींप्रमाणें अधिकार नसतां मनाची बनावट शास्त्रें आधारावांचून केलीं; व त्याप्रमाणें वागून अधर्मानें केवळ ब्राम्हणांची निंदा व छळ करून सनातनधर्माची उन्नति करूं पाहत आहेत; पण अशानें उन्नति न होतां पापमूलक ब्रम्हद्वेष घडून स्वधर्मनिंदा होऊन, कांहीं फितुर करून शेवटीं अवनतीच्या मार्गास लागून अखेर कार्य साधणें कठीण आहे. ब्राम्हणांचें कर्म करणें व तें निभविणें यांस तपोबल पाहिजे, तें न केल्यास सर्वच गोष्टी दुःसाध्य आहेत; हें त्यांनीं पक्कें लक्षांत टेवावें, हाताचें काम पायांनीं करितां येणें शक्य नाहीं, अशीच एकंदर परंपरा आहे. केवळ अर्वाचीन विद्येंत एखादी डिग्री मिळविली, अगर एखादें निंदाव्यंजक पोरकट वर्तमानपत्र किंवा मासिक काढलें, एखादा सत्यनारायण केला, एखादें लग्न लाविलें, अधिकार नसतां क्षत्रियकुलास बट्टा लावून उत्तरकार्य केलें; व त्यामुळें ब्राम्हणांचा भिक्षुकीचा मार्ग साध्य होऊन सनातन धर्माचें खरें ज्ञान झालें, असें होत नाहीं; व ईश्वरप्राप्तीचा मार्ग सांपडणार नाहीं, व अशा वर्तनानें सर्व जग भुलून सत्यशोधक पंथांत सामील होऊन ब्राम्हणांचा नायनाट करण्यास एकाएकीं तयार होईल असें निदान मला तरी वाटत नाहीं. तर मग हें त्यांचें वर्तन किती अनीतीचें व आत्मघाताचें आहे ह्याचा त्यांच्यांतील प्रौढ व शहाण्या माणसांनीं अवश्य विचार करण्यासारखा आहे. मी दृष्टांत रूपानें यथामती सांगतों; पटल्यास मान्य करा, न पटल्यास माफी कराल च, अशी उमेद धरीत आहे.

---


## श्रीज्ञानेश्वरमहाराज—चरित्र व ग्रंथविवेचन.

(आवृत्ति दुसरी)

१ श्रीज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र. २ कुलवृत्तांत व जन्म. ३ गुरुसंप्रदाय. ४ मुंज व वेदशास्त्रमर्यादा. ५ पैठणचे चमत्कार. ६ तीर्थयात्रा—प्रकरण. ७ चांगदेव आणि ज्ञानदेव. ८ समाधिप्रकरण. ९ उपासना आणि गुरुभक्ति. १० ग्रंथविवेचन आणि वेंचे. ११ स्तुतिसुमनांजलि याप्रमाणें अकरा प्रकरणें सदर ग्रंथांत दिलीं आहेत. पृ० सं० २८८. किं० रु० १०८.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

मध्वमुनीश्वरकृत अप्रसिद्ध

# संतनामावळि.

प्रातःकाळीं करितां संतांचें स्मरण । हरती जन्ममरण महादोष ॥१॥
प्र्ल्हाद नारद ध्रुव रुक्मांगद । सुग्रीव अंगद नळ नीळ ॥ २ ॥
बळि बिभीषण अर्जुन भीमसेन । भीष्म विश्वक्सेन अंबऋषि ॥३॥
दिलीप सगर धर्मात्मा विदुर । उद्धव अक्रूर परीक्षिति ॥ ४ ॥
हनुमंत गरुड फणिपति चंद्रचूड । स्वामी हंसारूढ सनकादिक ॥५
कश्यप अत्रि श्रेष्ठ भारद्वाज शिष्ट । गौतम वसिष्ठ विश्वामित्र ॥६॥
जमदग्नि पुलस्ती अंगिरा अगस्ती । मृगांक गभस्ति साचिनाथ ॥७॥
भृगु उद्दालक मुद्गल वाल्मीक । जैमिनी शौनक पुंडलीक ॥८॥
कृष्णद्वैपायन कृपेचा समुद्र । श्रीशुक योगींद्र सद्गुरू माझा ॥९॥
गौडेंद्र गोविंद आचार्य शंकर । जयाचा किंकर हस्तामळक ॥ १० ॥
श्रीधर सुरेश्वर रामानंद इति । नरसिंहभारती अच्युताश्रम ॥११॥
विद्यारण्य क्रीडे विद्येच्या सागरी । केली विद्यानगरी हेमवृष्टी ॥ १२ ।
परमहंसस्वामी नारायणाश्रम । हरिला भवभ्रम.........॥१३॥
तारक सभेश्वर गंगाधरस्वामी । विश्वेश्वरधामीं विराजती ॥१४॥
गिरिपुरी भारथीतीर्थ सरस्वती । दशविध येती नमों त्यांसी ॥१५॥
स्वरूपप्रकाश आनंद चैतन्य । शरण अनन्य आचार्यांसि ॥१६॥
बिल्वमंगल कालीदास चिदंबर । भर्तृप्रभाकर शबरस्वामी ॥१७॥
कापिल पतंजलि भक्त चिंतामणि । उदयला अग्रणी जगन्नाथ ॥१८॥
रामानुज निंबादित्य विष्णुस्वामी । पांचरात्रागमी मध्वाचार्य ॥१९॥
सत्यनिधि सत्यनाथ सत्यव्रत । सत्याभिनवतीर्थ सत्यपूर्ण ॥२०॥
पावक कुळींचे दाहक कळींचे । गोसावी गोकुळींचे निवेदनी ॥ २१ ।
सूर्यजोसी रामचंद्रदेवस्वामी । नांदे नंदिग्रामीं वरदीशेष ॥२०॥
शूद्रसेन कासीराज रंगनाथ । अंतरीं निवांत दासानंद ॥२३॥

महाभारताचा अर्थ केला विशद । चौधरी गोविंद दीक्षितजी ॥२४॥
पंचायतनाचें जे करिती पूजन । याज्ञिक सज्जन नमो त्यासी ॥२५॥
वर्तमानीं संत शास्त्रज्ञ पंडित । त्यांसि दंडवत आहे माझे ॥ २६ ॥
मच्छिंद्र गोरक्ष गैनी श्रीनिवृत्ति । मुकुंदराज मूर्ति विवेकाची ॥ २७ ॥
जैतपाळ गोपीचंद हा विरक्त । राजा जीवन्मुक्त भर्तृहरि ॥ २८ ॥
परिसाभागवत जनमैत्रनागा । वटेश्वर चांगा बहिरो पिसा ॥ २९ ॥
परमानंद जोगा हरिदास कान्हया । सतिदास सालया पाठकनामा ॥३०॥
नरहरि सोनार गोरा तो कुंभार । चोखामेळ चतुर कनकदास ॥३१॥
वडवाळाचा सिद्ध प्रसिद्ध नागेश । मृत्युंजय निर्दोष हेमाद्रिपंत ॥३२॥
पिपाजी कुबाजी दादाजी कृपाळ । तान्हाजी गोपाळउपासक ॥३३॥
रंका बंका सधना सुया ज्ञानी जी । गिरमाजी निंबाजी लोलिंबराज ॥३४॥
रमावल्लभाचे दास भाग्यवान । जयदेव सोपान विठा नारा ॥ ३५ ॥
निपटनिरंजन सुरदास मलूक । रोहीदास नानक धनासेनी ॥ ३६ ॥
तुळसीदास हरिव्यास बनखंडी । ज्याची नवखंडी कीर्ति गाजे ॥३७॥
काकोबा रामाचा अंतरंग सखा । जीवन्मुक्त देखा माधवदास ॥ ३८ ॥
कृष्णातीरीं नांदे अनंताची मूर्ति । वृंदावनीं कीर्ति डोलतसे ॥ ३९ ॥
कृष्णउपासक वासुदेवपंत । नरहरि गुणवंत मालोबाचा ॥ ४० ॥
विजय विठ्ठलाचा रुक्मणा निजभक्त । अंतरीं विरक्त वैद्यनाथा ॥४१॥
मारकीनाथाचें वैराग्य उत्तम । गुरुभक्ति निस्सीम उद्धवाची ॥ ४२ ॥
संतबा पवार सिऊबा गुरव । विठ्ठलीं गौरव बोधल्याचा ॥ ४३ ॥
ब्रह्मानंद निजानंद रंगराव । जयाचा सद्भाव पांडुरंगीं ॥ ४४ ॥
केशव वामन शिवराम चिद्घन । जयराम सज्जन कृष्णदास ॥ ४५ ॥
सखा विठ्ठलकवि पंडीत पुण्यवान । गोसावीनंदन मानपुरी ॥ ४६ ॥
वर्तमानी संत पुढें जे होणार । त्यांसि नमस्कार आहे माझा ॥ ४७ ॥
मध्वनाथ म्हणे संतनामावळि । जपतां वनमाळी जवळी आहे ॥ ४८ ॥
ऐसी वनमाळा धरील जो कंठीं । तो नर वैकुंठीं मान्य होय ॥ ४९ ॥

# मुमुक्षूतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या ' मुमुक्षु 'चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावें म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपाया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल; पण दोन्ही भाग एक दम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिलाः**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४. मूर्तिपूजा. ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसराः**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरंगशिक्षामृतम्. ९ 'कुतन्या थमालले थमाल आपल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संतमहात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

पता—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# सन्तचरित्रमाला.

मुमुक्षूत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांतला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं आहेत व ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य, मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास. भक्त त्रिपन्नाल्वार, सूरदास, सोहिरोबा आंबिये, इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर, गोंदवलेकरमहाराज, सीताराममहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वती, गुलाबराव महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज, भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिकप्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्का ( भालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले, धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ) बलभीमबोवा साडेकर ( श्री. खाजगीवाले ) शुभराय सोलापूरकर, देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. २५६. पांच फोटो. किं. रु. १॥८ व्ही. पी. नें. १॥१३.

# मोरोपंती वेंचे.

आवृत्ति दुसरी. ] [ किं. १॥१२.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाऊण लाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकरांनीं म्हटलें आहे, " महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे " या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत:—

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचें वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे ग्रंथाला टीपा, संदर्भ, कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# श्रीसमर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वीं आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य भरून त्याला महानिद्रेतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतलि उत्कृष्ट वेंचे व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केलें आहेत. (१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रकरणें अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेंच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा 'सारांश' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाच-ल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थ-बुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजो-द्धारक व्यापकदृष्टि, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सिम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि व राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे. पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन.

# कविरामायण.

केसरी म्हणतो:—" हें पुस्तक मुमुक्षुकर्ते रा. रा. पांगारकर यांनीं तयार केलें आहे. यांत वाल्मिकि व तुळशीदास यांची संस्कृत व हिंदी रामायणें व कवींचीं शेंकडो रामायणें यांतील उत्कृष्ट वेंचे दिलें आहेत. हे उतारे अशा रीतीनें निवडले आहेत व त्यांचा क्रम असा धरिला आहे कीं सर्व कवींचें एक 'कविरा-मायण' निर्माण झालें आहे! अशा दृष्टीनें उताऱ्यांची निवड करण्याचें काम जितक्या मार्मिकतेचें तितकेंच अवघडही आहे; परंतु तें रा. पांगारकर यांनीं उत्तम केलें आहे. मनोहर रामकथा व प्रमुख कवींचे उतारे यांचे लाभ एकदम घेऊं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांनीं संग्रह करण्यासारखें व वाचण्यासारखें हें पुस्तक तयार झालें आहे यांत शंका नाहीं."

प्रस्तावनेंत विषयवारीनें श्रीरामचरित्रांतील सर्व महत्त्वाचे विषय क्रमानें दिले आहेत. किंमत चार आणे. व्ही. पी. ने ८७.

पत्ता:—व्यवस्थापक, 'मुमुक्षु' पुणें.

३९ ... ग्रंथ संग्रहालय शाखा

## कविवर्य मुक्तेश्वर (चरित्र आणि काव्यविवेचन.)

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचे चरित्र, त्यांची कविता, त्यांचे महाभारत मुक्तेश्वरीभारतांतील विशेष गुण:—सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्वें महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वळ नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वरनीतिरत्नमाला' ही शेवटीं जोडली आहे पृ. सं. १४४. किं. रु. १

## आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्रमहोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हे ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं १२.

## सार्थ मनोबोध.

श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांची सर्वमान्यता प्रसिद्धच आहे. रा. पांगारकरांनीं यांत मनाचे श्लोक सार्थ दिलेच आहेत, पण प्रारंभीं मनालाच बोध कां यांत मनाचें स्वरूप दर्शविलें आहे. सर्व श्लोकांची संगति लावून त्यांचें वर्गीकरण केले असून श्लोकाला अर्थ समर्थांच्या एकंदर ग्रंथांच्या दृष्टीनें चोख लावला आहे. किं १२.

## भक्तिमणिमाला.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकलसंतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत-मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवतांतील श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे. पृ. सं. २५०, किं. रु. १॥.

पत्ता—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.

# मोरोपंत–चारित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चारित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून. हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपुर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांची अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोड्या आहेत. पृ. सं. ६२५. किं. रु. २.

# श्रीतुकाराममहाराजांचें चरित्र

**पृष्ठसंख्या ५२८ किंमत रु. ३ ट. ख. सह रु. ३८७**

ग्रंथकार:—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

सतत आठ वर्षें हा ग्रंथ लिहिण्याच्या कामास लागलीं. श्रीतुकाराममहाराजांच्या सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध गाथा पाहिल्या, श्रीक्षेत्र देहू येथील जुनीं दप्तरें व इतर ठिकाणचे कागदपत्र पाहून आणि गाथ्यांचें व इतर साधनांचें सूक्ष्म अवलोकन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

मंगलाचरणानंतर १ कालनिर्णय २ पूर्वपीठिका ३ संसाराचा अनुभव ४ आत्मचरित्र ५ वारकरीसंप्रदायाचा साधनमार्ग ६ तुकोबांचें ग्रंथाध्ययन ७ गुरुकृपा व कवित्वस्फूर्ति ८ चित्तशुद्धीचें उपाय ९ सगुणभक्ति व दर्शनोत्कंठा १० श्रीविठ्ठलस्वरूप ११ सगुणसाक्षात्कार १२ मेघवृष्टि ( उपदेशसार ) १३ चातकमंडळ १४ तुकोबा आणि जिजाबाई १५ धन्यता व प्रयाण अशीं या ग्रंथाचीं पंधरा प्रकरणें झालीं आहेत.

ग्रंथांत सात फोटो दिले आहेत. १ पंढरपूरपति पांडुरंग २ तुकोबाचें हस्ताक्षर ३ इंद्रायणीचा डोह ४ भंडारा डोंगर ५ शिला ६ नांदुरकीचा वृक्ष व ७ तुकोबांचें जन्मस्थान. यांत प्रसंगानुसार तुकोबांचें अभंग किंवा अभंगपाद यांचीं भरपूर अवतरणें व अवश्य तेथें विवरणही दिलें आहे.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें शहर.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकास भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. व्ही. पी. नें ०११.

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४. ( सुटे शिल्लक नाहीं )

८. **निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १०८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु R. G. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ॥५.

१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १॥८

१४ मोरोपंती वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १॥१२.

१५ पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८.

१६ श्रीतुकारामचरित्र:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सद्धा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. ३.

१७ श्रीतुकारामचरितामृत:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ॥५.

१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ॥१०.

१९ मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२० मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ). -किं. ॥४.

२१ सार्थ श्रीदासबोध—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४॥१०.

२२ सार्थ मनोबोध:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ॥१२.

२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं स प्रकरणाचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं रु. २.


२४ मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २.

२५ श्री एकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें आवृत्ति तिसरी )--किं. रु. ६

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष १९ मास १२ | आषाढ १८४८ आगष्ट १९२६ | नवें वर्ष ६ वें अंक ८ वा. |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३=३

मुद्रकः- लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३००
येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या शिकवणी ... ... | ३—६ |
| ३ पारिजातकाचीं फुलें ... ... ... ... | ७—९ |
| ४ रघुनाथपंडितांची कविता ... ... ... | १०–१७ |
| ५ साभार स्वीकार ... ... ... ... | १८–२० |
| ६ आत्मदर्शनाचा आरंभ ... ... ... | २१–३१ |
| ७ मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता ... ... | ३२–४० |

## सप्टेंबरचे वर्गणीदारांस:—

सप्टेंबरपासून ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यांचें नांवामागें जो आकडा असतो त्याचा पहिला अंक ९ असा आहे. नऊहजारी वर्गणीदार सगळे सप्टेंबरचे आहेत. त्यांनीं कृपाकरून हा अंक हातीं पडतांच पुढील सालची वर्गणी रुपये **तीन मनीआर्डरनें पाठवावी** म्हणजे त्यांचेकडे पुढील अंकाची व्ही. पी. पाठविण्याचें कारण पडणार नाहीं व आमचे श्रम वांचून त्यांचे ३ आणे वांचतील. ज्यांना पुढें मासीक सुरू ठेवणें नसेल त्यांनीं मेहेरबानीनें आम्हास तसें कळवावें. व्ही. पी. परत करून आमचें व्यर्थ नुकसान करूं नये.



१

# श्रीरामाष्टक.

( शके १८२१ च्या चैत्रांत प्रथम पंचवटीस आलों त्यावेळीं लिहिलेलें हें अष्टक जसेंच्या तसेंच खालीं दिलें आहे. )

—अनुष्टुभ्—

पंचवट्यां रघुश्रेष्ठो प्रकुर्वन् विश्वमंगलम् ।
एकपत्नी एकबाणो रामो विजयतेतराम् ॥१॥
अहो मद्भाग्यधन्यत्वात् दृष्टो रघुपतिर्मया ।
योऽसौ दर्शनमात्रेण पुनाति भुवनत्रयम् ॥२॥
भूभारहरणार्थाय धृतव्रतमुदारधीं ।
सद्भक्तवत्सलं रामं ससीतं प्रणमाम्यहम् ॥३॥
सद्बुद्धिवैभवं देहि देहि सज्जनसंगतिम् ।
त्वत्पादपरिचर्यायां रतिं मे देहि राघव ॥४॥
सत्कर्मनिरतःस्यां त्वन्निष्ठो विगतकल्मषः ।
शृण्वन्गायन्सदालापान् जीवेयमिति मे मतिः ॥५॥
सुदिनो मेऽद्य संप्राप्तो हर्षाश्रुप्लुतलोचनः ।
सेवे त्वां मातृसहितो नूतनपत्न्या च संगतः ॥६॥
शिवप्रियं रामदासहनूमज्जीवितं प्रभो ।
सन्मार्गदर्शनाय त्वां याचेऽयोध्यापतिं विभुम् ॥७॥
गोदावरि नमस्तुभ्यं पापतापनिवारिणि ।
निवासं देहि निकटे शरण्यां त्वामुपाश्रये ॥८॥

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

'मुमुक्षु' साप्ताहिकांत पहिल्या १०-१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या 'मुमुक्षु'चा समागम केल्याचा लाभ होणार आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपाया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल; पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्तकाचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद-लेखांक १।२।३।४. मूर्तिपूजा ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति, ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्ममहोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ एका भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरांगशिक्षामृतम्. ९ 'कुतऱ्या थमाल्ले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सार्वराष्ट्रीय प्रार्थना १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संत महात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देशाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३५ बोध आणि विनोद [ या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. ]

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# श्रीरामकृष्ण परमहंस
## यांच्या शिकवणी.

१

" सच्चिदानंद सागराचें परिमाण करण्यासाठीं जे जे आंत उतरले त्यांपैकीं एक जण सुद्धा पुन्हां संसारांत परतून आला नाहीं !

२

" शास्त्रें आणि धर्मविषय यांवर वादविवाद माजवून काथ्याकूट करणारेच फार, प्रत्यक्ष ईश्वराची भेट घ्यायची इच्छा--अथवा त्यासाठीं प्रयत्न करण्याची तयारी--किती जणांची असते ?

### ३ भक्तिमार्गाचें रहस्य.

महाराज, ईश्वराचें दर्शन होऊं शकतें काय ?

१ " होय. मधून मधून एकांतवास करावा; त्याचें नामस्मरण करावें; सद्-सद्विचार करावा--या उपायांचें अवलंबन करावें. ईश्वरदर्शनासाठीं जीव घाबरा झाला व प्राण कासावीस होऊन रडूं येऊं लागलें म्हणजे त्याचें दर्शन होतें. ईश्वराचे ठिकाणीं प्राणाहून अधिक प्रेम उत्पन्न झालें पाहिजे.

२ " मनांत कामिनीकांचनाची आसक्ती लेशमात्र असली तरी त्याचें दर्शन होत नाहीं. शुद्ध बुद्धि व शुद्ध मन यांना तो गोचर आहे. चर्मचक्षूंनीं तो पाहतां आला नाहीं तरी साधनें करितां करितां एक प्रेमाचें शरीर तयार होतें, त्याला प्रेमाचे डोळे व प्रेमाचेच कान असतात. त्या डोळ्यांनीं ईश्वराचें दर्शन होतें व त्या कानांनीं ईश्वराची वाणी ऐकूं येते.

३ " अत्यंत व्याकुळ चित्तानें फार कांहीं नाहीं तीनच दिवस, नाहीं चोवीसच तास, त्याचा धांवा करा आणि त्याचें दर्शन होतें कीं नाहीं याचा प्रत्यक्ष अनुभव घ्या.

४ " भक्ताला जें रूप आवडतें त्या रूपांतच ईश्वर त्याला दर्शन देतो, थोडक्यांत समज कीं, ईश्वर साकार आहे व निराकारही आहे.

५ " निराकारही सत्य व साकारही सत्य, मात्र तुझा ज्यावर विश्वास असेल तें सत्य धरून ठेव व दुसऱ्याचें खोटें मानूं नकोस. कोणता तरी एकच पंथ पक्का धरून त्यावर दृढ विश्वास ठेवून चाललें पाहिजे.

६ "प्रतिमेमध्यें ईश्वरीय आविर्भाव होण्यास तीन गोष्टींची अवश्यकता असते. एक पूजकाची भक्ति, दुसरी गृहस्वामीची भक्ती व तिसरी प्रतिमा सुंदर हवी.

७ " साकारावर मन स्थिर झालें म्हणजे त्याला निराकाराची धारणा सहज होऊं शकते.

८ "भक्तिमार्ग म्हणजे व्याकुळ चित्तानें ' देवा दर्शन दे ' असा एकसारखा

त्याचा धांवा करणें; कलियुगांत नामच श्रेष्ठ पण अनुराग असेल तर ! त्यानें देह व मन शुद्ध होतात.

९ " ईश्वर तुमची प्रार्थना जरूर ऐकेल, पण ती खरी मनापासून पाहिजे. बायकापोरांबद्दल किंवा पैशाबद्दल कशीं आंतडीं पिळून निघतात ? तशी तळमळ पाहिजे.

१० " भक्तिमार्गानें अंतरिंद्रियनिग्रह आपोआप होतो; आणि सहज होतो. ईश्वरावर जसजसें प्रेम वाढेल तसतसें इंद्रियसुख आळणी लागूं लागेल.

११ " नामस्मरण उच्च घोषानें करा, अंतरीं करा—आवडेल तसें करा; मुंगीच्या पायांतल्या पैंजणाचाही आवाज ईश्वराला ऐकूं जातो ! नामाची गोडी नसेल तर ' देवा ! तुझ्या नामाची गोडी लागूं दे ' अशी व्याकुळ चित्तानें देवाची प्रार्थना करा. बायको आजारी पडली किंवा घरांत चोरी झाली म्हणजे कसें डोळ्यांला खळकन् पाणी येतें, तसें जरा देवासाठीं येऊं द्या !

१२ " पुनर्जन्म, पूर्वसंस्कार, दैव, पौरुष—हें पहा ! असल्या गोष्टी समजून घेण्याचा मी कधीं प्रयत्नच करीत नाहीं ! ' ईश्वराच्या सृष्टींत सर्व कांहीं संभवतें ' हें मीं एकदां ऐकून ठेवलें आहे. म्हणून असल्या गोष्टींविषयीं डोक्याला उगीच त्रास न देतां मी त्याचें चिंतन करीत असतों.

१३ " हजार पोथ्यापुराणें आणि पुस्तकें वाचा, व्याकुळ होऊन देवाचा धांवा केल्याखेरीज त्याचें दर्शन होणार नाहीं.

१४ " तुम्ही विचारतां मी पंचदशी वाचली आहे कीं नाहीं. पण हें पहा, ईश्वरदर्शन झाल्यावर ज्ञानाची कमतरता पडत नाहीं. आई ज्ञानाच्या राशीच्या राशी ठेवून देते. नुस्तीं शास्त्रें ऐकून कांहीं उपयोग नाहीं, त्यांच्या अर्थाची धारणा झाली पाहिजे आणि कामकांचनासक्ति नाहींशी झाली नाहीं तोंवर धारणा होत नाहीं.

१५ " मनामध्यें उत्तम भाव येतात पण ते टिकत नाहींत, हें सहज आहे. कळकाचा तुकडा चुलींत घातला म्हणजे पेटतो; पण लगेच विझतो, त्याला एकसारखा फुंकरच घालीत राहिलें पाहिजे. तसे चांगले भाव मनांत टिकवण्यासाठीं अभ्यास व साधन आवश्यक आहेत.

ब्रह्मसागरांतही पोहणें एकाएकीं येत नाहीं, तें हळूं हळूं शिकावें लागतें. वांसरूं, सत्रांदां पडतें आणि उठतें, तेव्हांच त्याला नीट उभें राहतां येतें. साधनें करीत असतांही अनेकदां पडावें उठावें लागतें. तेव्हां साधक सिद्ध होतो. अंतःकरणाच्या व्याकुळतेशिवाय सर्व व्यर्थ आहे.

## ४ जातिभेद.

"ज्ञान झाल्यावर जातिभेद राहत नाहीं, अपाप नाहींसा होतो. परंतु ज्याला

ज्ञान झालें नाहीं त्याला जातिभेद आवश्यक आहे. फोड बरा झाला कीं खपली आपाप गळून पडते, पण मध्येंच मुद्दाम काढूं लागल्यास रक्त निघतें !

## ५ थिऑसफी वगैरे मतें.

" हिंदुधर्मच सनातन धर्म. सांप्रत अनेक निरनिराळे धर्म दिसतात, ते चिरकाळ राहाणार नाहींत.

" थिऑसफीच्या मतांत ' महात्मे ' ' चंद्रलोक ' ' सूर्यलोक ' ' सूक्ष्मशरीर ' सर्व कांहीं असेल—तुला सांगतों. बाबारे ! ईश्वराची भक्ति हेंच एक सार आहे. त्यांना भक्तीचा लाभ करून घेण्याचा आवड असेल, भगवानाचा लाभ हा त्यांचा उद्देश असेल तर ते लोक चांगले. महात्मे, चंद्रलोक यांच्यांतच गुरफटून राहिल्यानें ईश्वराचा लाभ होणार नाहीं. Spiritualism, Theosophy, चंद्रलोक, नक्षत्रलोक—बाबारे ! मला यांतलें कांहीं माहीत नाहीं. या असल्या हिशेबाशीं करायचें आहे काय ? तुम्ही बागेंत आंबेच खायला आलांत ना ? मग आंबे खा. झाडेंच किती, त्यांना डहाळ्याच किती, त्यांना पानेंच किती, या हिशेबासी काय करावयाचें आहे ? जगांत येऊन ईश्वराचा लाभ करून घेणें हें तुमचें कर्तव्य. तिकडे लक्ष द्या. या असल्या पंचाइतींशीं करायचें आहे काय ? एकदा ईश्वराचा लाभ झाला म्हणजे या गोष्टी जाणण्याची इच्छाही होणार नाहीं.

"पुनर्जन्म आहे काय ? होय पुनर्जन्म आहे असें ऐकण्यांत आहे खरें. पण तुला या जन्मजन्मांतरीच्या भानगडीशीं करायचें आहे काय ? अगोदर ईश्वरलाभ करून घे, मग तुला काय पाहिजे तें त्यालाच विचार. अगोदर या गोष्टी जाणण्याचा प्रयत्न करणेंच चांगलें नाहीं.

ब्राह्मसमाज—कोणतेही समाज असोत, माणसांना संसारबंधनांतून मुक्त करणें, त्यांचा उद्धार करणें हें कांहीं उपदेशानें होणारें नाहीं, ही माणसाच्या हातची गोष्ट नाहीं. ज्यानें ही माया निर्माण केली तोच तिच्यापासून माणसाला सोडवूं शकेल ! ज्यांना ईश्वराचा लाभ झाला नाहीं, ज्यांना त्याचा आदेश प्राप्त झाला नाहीं, अथवा ज्यांच्यामध्यें ईश्वरीशक्तीचा उदय झाला नाहीं ते कसचे दुसऱ्याला संसारबंधनांतून मुक्त करितात !

## ६ देशाचें—जगाचें हित !

वैराग्याच्या उपदेशानें—वेदांतानें—जगाचा सत्यानाश झाला आहे म्हणून जगाचें हित होईल असा कांहीं उपदेश द्यावा असें तुमचें म्हणणें—पण "बाबू ! गंगेतलीं खेकडयाचीं पिलें पाहिलीं आहेस काय ? या अनंत ब्रह्मांडामध्यें मनुष्य म्हणजे तसलाच एखादा क्षुद्र प्राणी नव्हे काय ? मग त्याला स्वतःचा एवढा अभिमान कशाला हवा ? एक नुस्ता केंस सरळ करण्याचेंही सामर्थ्य

नाहीं आणि साऱ्या जगाचें हित करावयाच्या गोष्टी ! हें जग ज्याचें आहे तो तर कांहीं विसरला नाहीं ना ?

"साधनें करून अगोदर ईश्वराचा साक्षात्कार करून घ्या. त्यानें जर तुह्माला शक्ति दिली तरच तुम्ही सर्वांचें हित साधूं शकाल, नाहीं तर नाहीं.

" बाबारे ! सर्व कांहीं ईश्वराधीन आहे ही गोष्ट मनुष्याला अखेरीस कळून येते.

## ७ जगन्मिथ्या !

तूं तेवढा सत्य आणि जगत् मिथ्या होय ? आपण स्वत: आहोंत तोंपर्यंत जगत् सत्य आहेच. जेव्हां अहंकार नाहींसा होईल, ईश्वरदर्शन होईल, तेव्हांच दिसून येईल कीं तोच हे जीव जगत् झाला आहे. विचारानें समजणें निराळें आणि ईश्वरानें समजावलेलें निराळें !

## ८

ईश्वराचें ध्यान कोठें करावें ?

हृदयामध्यें. भक्ताचें हृदय हाच त्याचा आवडता दिवाणखाना होय.

## ९

एकादशी करीत जावी. त्यायोगानें मन पवित्र होतें व ईश्वराचे ठिकाणीं भक्ति उत्पन्न होते.

## १०

मुक्ति केव्हां मिळेल ? अहंकार जळेल तेव्हांच.

## ११

विवेक म्हणजे ईश्वरच नित्य व इतर सर्व अनित्य हा विचार.

## १२ साधक व साधनें

पाण्यांत नौका तरंगत असेल तर ठीक; पण नौकेंत जर पाणी शिरूं लागलें तर मात्र कठिण; त्याप्रमाणें साधक संसारांत असला तरी चालेल पण साधकांत संसार शिरला तर मात्र कठिण !

"जे लोक भक्तांची, उपासनेची थट्टा करितात; धर्म आणि धार्मिकांची निंदा करितात त्यांच्यापासून साधकानें दूर रहावें !

" विश्वासाची कास धरून शांतपणें साधनें करा. हजार तर्कविचार कराल, तर क्षुद्र मन तेव्हांच गढूळ होऊन जाईल. ज्याच्याजवळ विश्वास आहे त्याच्या जवळ सर्व कांहीं आहे. विश्वास नाहीं त्याजजवळ कांहींच नाहीं.

" ह्याच जन्मांत ईश्वरलाभ करून घेईन असली मर्दानी प्रचंड विश्वासाची भक्ति ईश्वराला फार आवडते.

———

# पारिजातकाचीं फुलें.

१

शहाणपण त्वरित शिका. आजचें उद्यावर ढकलूं नका. हा 'उद्या' कधींच संपत नाहीं व शहाणपण शिकायला मुहूर्त मिळत नाहीं. 'विलंबें पहा नाश कार्यास आहे' असें एका मराठी कवीनें म्हटलें आहे. सत्कार्याला 'आज' द्या, अकार्य 'उद्या' वर ढकला.

२

प्रपंच साधून ज्याला परमार्थ जोडायचा आहे, त्यानें प्रपंच दक्षतेनें व अक्कलहुशारीनें केला पाहिजे. प्रपंचांत जो गबाळया तो परमार्थ काय साधणार? सावधानता दोहींकडे पाहिजे.

३

लबाडी करूं नये व कोणाकडून फसून जाऊं नये. चोरी करूं नये पण चोर पकडतां आला पाहिजे. खोटें कर्म करूं नये पण खऱ्या खोटयाची निवड करितां आली पाहिजे.

मार्ग–अमार्ग देखावे। साच–लटिकें वोळखावें॥
हित–अहित जाणावें। हिताचि लागीं॥ (ज्ञानेश्वरी).

४

'सावध साक्षेपी आणि दक्ष। तयास तात्काळचि मोक्ष।'

असें समर्थ म्हणतात. ज्याला मोक्ष, मुक्तता, बंधरहितता पाहिजे त्यानें सावध असावें–बेसावध असूं नये; साक्षेपी असावें–निरुद्योगी, आळशी असूं नये; आणि दक्ष असावें–बावळट किंवा गबाळें असूं नये. गुण ते गुण. प्रपंचांत काय आणि परमार्थांत काय एकच.

५

प्रपंच परमार्थरूप करणें ह्म० प्रपंच नेटका करणें होय. 'हें राज्य देवाधर्माचें आहे' असें शिवाजी महाराज व अहल्याबाई होळकरीण ह्मणत; तद्वत् संसार देवाब्राह्मणांचा आहे; देवाधर्मासाठीं संसार आहे अशा भावनेनें वागणाऱ्याचा प्रपंच परमार्थरूप आहे.

६

देवधर्म गोब्राह्मण यांची निरपेक्ष प्रेमानें सेवा करणारा मनुष्य संसारांत असून मुक्त आहे अशी आपल्या हिंदुधर्माची शिकवण आहे, किंवा हिंदु म्हणजे देवधर्मगोब्राह्मण यांचा सेवक.

७

न्यायानें धन मिळवून त्याचा उदासपणें वेंच कर! लक्ष्मीची प्रसन्नता "सावध साक्षेपी व दक्ष' राहून जोड व धर्मन्यायाला अनुसरून तिचा खुशाल उपभोग घे. भोग व दान हे धनाचे दोन मुख्य उपयोग आहेत; पण याशिवाय तिचा तिसरा उपयोग ह्म० कोणाची गुलामगिरी न करितां स्वातंत्र्यसुख भोगतां येतें हा होय.

८

स्वातंत्र्यासाठीं लक्ष्मीची उपार्जना कर. स्वातंत्र्यरत्न पृथ्वीच्या मोलाचें आहे.

९

जो आशिष्ट, बलिष्ठ व द्रढिष्ठ असेल त्याची लक्ष्मी आहे असें श्रुति सांगते. ह्मणून आशा, बल व दृढता उर्फ मनाचा खंबीरपणा यांनीं युक्त होऊन संपत्ति मिळीव.

१०

पारिजातकाचें किंवा जुईचें फूल हातीं येतांच, सुकुन जातें. वळवाचें पाणी पाहतां पाहतां वाहून जातें, किंवा बर्फ समुद्रांत पडतांच वितळून जातें—तशीं इहलोकाचीं सुखें क्षणभंगुर आहेत; म्हणून या अशाश्वत सुखाच्या नादीं न भरितां शाश्वतसुखाचा शोध घे. तें तर 'तुझें आहे तुजपाशीं! परि तूं जागा चुकलासी.'

११

अणुरेणूंत परमात्म्याचा आनंद भरला आहे. वृक्षवेली, सूक्ष्म जीवजंतु, फळेंफुलें, नद्याओहोळ, नक्षत्रें व तारा सर्वांत हरीचा आनंद भरून राहिला आहे. रडगाणें टाकून सर्वत्र आनंद भोगायला शीक. जन्मांत व मरणांत, संपत्तींत व आपत्तींत, संयोगांत व वियोगांत, सर्वकाळीं व सर्वस्थळीं खरोखरीचा नारायणाचा आनंद पहायला व भोगायला लाग. तुझ्या जवळ आनंदाचे महासागर आहेत.

१२

एकेका ब्रह्मांडांत अनंत परमाणु व एकेका परमाणूंत पुन्हा अनंत ब्रह्मांडें आहेत! नारायण सर्वांत आहे.

१३

अनंताच्या लीलानुभवांत स्वतः विरघळून जा. तोच मोक्ष.

१४

## सच्चिदानंद.

( १ ) सत् Eternity.

This world is all a fleeting show
For man's illusion given;
The smiles of joy, the tears of woe,
Deceitful shine, deceitful flow—
There's nothing *true but Heaven.*

( २ ) चित् Knowledge.

And false the light on glory's plume
As fading hues of even;
And Love and Hope and beauty's bloom
Are blossoms gathered from the tomb.
There's nothing *bright but Heaven.*

( ३ ) आनंद Blissfulness.

Poor wanderers of a stormy day,
From wave to wave were driven,
And fancy's flash and reason's ray
Serve but to light the troubled way—
There's nothing *calm but Heaven.*

— Thomos Moore.

---


# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत, कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र-महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ०१२.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# रघुनाथपंडिताची कविता.

१ ' नलदमयन्तीस्वयंवराख्यान ' ह्या रसालंकारांनीं युक्त अशा सुंदर काव्यावरून रघुनाथपंडिताची विद्वानांत प्रसिद्धि आहे. प्रस्तुत काव्य संस्कृत काव्य-नाटकांच्या धर्तीवर लिहिलेलें व श्लेषादि अलंकारांनीं नटविलेलें असून कवीनें म्हटल्याप्रमाणें ह्यांत श्रृंगार व करुण हे दोन रस मुख्य आहेत. संस्कृतांतील पंचमहाकाव्यांपैकीं जें नैषध त्याच्या आधारें हें लिहिलें आहे. कवीची साहित्यसंपन्नता पाहून यानें ह्या आख्यानाऐवजीं याच कथेवर नाटक लिहिलें असतें तर बहार झाली असती असें वाटतें. पण त्या काळची लोकांची अभिरुचि नाट्यानुकूल नव्हती, ती अधिक परमार्थप्रवण होती. मराठींत नाट्यरचनेचा प्रघात पडला नव्हता व कीर्तनोपयोगी आख्यानें रचण्याची त्या वेळच्या कवींची शिस्त कवीला मोडवली नाहीं बाकी प्रस्तुत नलदमयंतीच्या स्वयंवराची कथा हरिदास कीर्तनांत लावतात असें दिसत नाहीं. ती काव्यलोलुप रसिकांच्याच आदरास पात्र झाली आहे. प्रथम नलराजाचें वर्णन पहा.

( दिंडी )

चौगुणींनें जरि पूर्ण शीत–भानू  
नळा ऐसा तरि कलानिधी वानूं ।  
प्रतापाचा जो न मावळे भानू  
तयासारीखा दुजा कोण मानू ॥ ४ ॥

पूर्णिमेच्या चंद्राला १६ कला असतात त्याच्या चौपट ह्म० ६४ कला असत्या तर नळासारखा चंद्र आहे असें म्हटलें असतें ! येथें गायनवादनादि ६४ कलांत नल निष्णात होता असें सुचविलें आहे. सूर्याला उदयाप्रमाणें अस्तही आहे. पण नळाचा प्रतापसूर्य कधीं मावळतच नाहीं.

( वसंत. )

चंद्रास लागति कळा, उपराग येतो,  
गंगेसि भंग, बहु पाणउतार होतो ।  
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ?  
नाहीं समान नळराज–महायशाला ॥ ५ ॥

चंद्राला कळा ह्म० क्षयवृद्धि आहेत, त्याला उपराग ह्म० ग्रहण लागतें किंवा कामी जन त्याची निंदा करितात; गंगेला भंग ह्म० लाटा किंवा भरती व पाणउतार ह्म० ओहोटी असते; मौक्तिकाचें चूर्ण होऊं शकतें–पण नळाचें यश ( कीं शुभ्रत्वामुळें ज्याच्याशीं चंद्र, गंगा व मौक्तिक यांचें साम्य सांगतां येईल ) याला यांपैकीं कोणत्याच दोषाचा स्पर्श होऊं शकत नाहीं.

ग्रंथालय

( शा. ) वाजीचें मन जाणता, सकळही राजी शिपाई जया,
याजी होउनियां द्विजांसि ह्मणतो ' या जी धनें ध्यावया ' ।
त्याजी जो धनदापरी, सुकृत जें त्या जीव ऐसें गणी
गाजी तो नळभूप हूप धरुनी गा जी गुणींच्या गणीं ॥ ६ ॥

वाजी ह्म० घोडा. अश्वविद्येंत निष्णात, शिपायांचा लाडका, याजी ह्म० यज्ञकर्ता, त्याजी ह्म० त्यागी, दाता, सुकृत ह्म० पुण्य, धर्मनीति—हा पुण्याला प्राण समजणारा, धर्मशील व न्यायी. अशा उदार नळराजाला ' द्वारीं झुलोत गजसंघ, हिसोत तेजी ' ह्म० तुझ्या दारीं हत्तींचे संघ झुलोत व अश्व हिसोत ( खिंकाळोत ) असा याचक आशीर्वाद देत. असो, त्या नळाचे गुणानुवाद विप्रमुखानें दरबारांत ऐकून वैदर्भराजकन्या त्यावर मोहित झाली. दमयंतीचें प्रेम चारमुखानें ऐकून नळही तिच्या दर्शनासाठीं उत्सुक झाला, विरहानें व्यथित झाला. या प्रणयी युग्माची गांठ एका हंसानें घालून दिली. कालिदासाच्या नायकानें मेघाला दूत बनवून प्रियेकडे पाठविलें तसेंच येथें नळानें हंसाचें सख्य जोडून त्याला दमयंतीकडे पाठविलें आहे. हें मधलें हंसाचें उपाख्यान अतिशय गोड असून करुणरसानें ओथंबलें आहे. कवीची वर्णनशैली, पदलालित्य व रसाविर्भाव अत्यंत मनोहर आहे व याच गुणांमुळें रघुनाथपंडितांचें नांव मराठी कविमालिकेंत चिरस्थायी झालें आहे. नळराजा गंगातरंगसम शुभ्र अश्वावर आरूढ होऊन गांवाबाहेरील एका उद्यानांत गेला, त्या उद्यानाचें वर्णन:—

( दिंडी ) पनस जंवू जंबीर विविधनिंबें
कुंद चंदन मांकंद[1] सुदाडिंबें ।
तुंग नारिंगें विकसलीं कदंबें[2]
वसति तेथें शुकसारिकाकदंबें ॥ ३३ ॥

( वंशस्थ ) लतेतळीं रुंद निरुंद कालवे
गळोनि तेथें मकरंद कालवे ।
परागही सांद्र[3] तयांत रंगती
फुलांसवें भृंगतती तरंगती ॥ ३४ ॥

( आर्या ) उपरि सकंटक साचे, परंतु सांचे[4] जयांत सुरसाचे ।
घोंस असे फणसाचे षणमासाचे कितेक वरसांचे ॥ ३५ ॥

( वसंत ) पीतां मरंद उदरं भर-बंभराचें
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें[5] ।

---

१ आवळी; आम्र. २ समूह. ३ दाट. ४ सांठे, सुरसाचे साठे, गरे. ५ लक्ष्मीचें मंदिर जें कमल तें भ्रमरांचेंही मकरंद पितांना मंदिर झालें; भ्रमर मोहानें कमलांत गुंतून राहिले.

जें पद्म तेथिल सहस्त्रदळां धरीतें
प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसांवर्वितें ॥ ३८ ॥

तेथील सरोवरांत राजहंस पक्ष्यांचा एक कळप पोहत असल्याचें राज–हंस-नळानें पाहिलें.

( दिंडी ) तया हंसाचें देह कांचनाचे
पक्ष झळकती वीज जशी नाचे ।
रंग माणिकसे चंचुचे पदांचे
जसे अधरींचे भीमकन्यकेचे ॥ ४० ॥

( वसंत० ) त्यांतील एक कलहंस तटीं निजेला
जो भागला जलविहार विशेष केला ।
पोटींच एक पद लांबविला दुजा तो
पक्षीं तनू लपवि–भूप तया पाहातो ॥ ४१ ॥
टाकी उपानह, पदें अतिमंद ठेवी,
केली विजार वरि डौरहि, मौन सेवी, ।
हस्तीं करी वलय उंच–अशा उपायीं
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ! ॥ ४२ ॥

स्वभावोक्ति अलंकाराचें हें किती उत्कृष्ट उदाहरण आहे ! विजार आणि डौर ( झगा ) नळाच्या वेळीं होतें कीं नाहीं कोण जाणें, पण रघुनाथपंडितांच्या वेळीं होतें खास ! मुक्तेश्वर व तुकाराम यांच्या काव्यांत असाच 'सावण' सांपडतो ! पुढें नळाची व हंसाची झटापट होऊन हंसानें उदारधी नळाच्या कोमळ मनाला आपल्या सहज हृदयभेदी वक्तृत्वानें पाझर फोडला तें वर्णन अतीव रम्य आहे.

( मालिनी ) कलकल कलहंसें फार केला सुटाया
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया ।
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू ॥ ४३ ॥
तदितर खग भेणें वेगळाले पळाले
उपवनजलकेली जे कराया मिळाले ।
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो
कठिण समय येतां कोण कामास येतो ! ॥ ४४ ॥

चवथ्या चरणांतील अर्थांतरन्यास व एकंदर श्लोकांतील तात्पर्य जगांतील कठोर सत्य कसें यथार्थ दर्शवीत आहे ! क्रीडेसाठीं, मनोरंजनासाठीं एकत्र

१ जोडा. २ मनगटावर ३ पक्षी.

झालेले मित्र खळ् सोबतीच असतात. प्रसंगीं ज्याचा तो! भक्त या व्यवहारिक अनुभवाच्या पुढें एकच पाऊल टाकतात. ‘ तुका म्हणे माझीं न होत हीं कोणी । तुज चक्रपाणी वाचोनीयां. ’ असो. नळाच्या हातांत हंस सांपडला. बलिष्ठाशीं विरोध आला. हंसानें दांडगाई करून पाहिली. ती साधली नाहीं तेव्हां नळाच्या पोटांत शिरून, त्याच्या उदार स्वभावाला व दयाधर्माला चेतवून आपला कार्यभाग होतो कीं काय हें पाहण्याचा विचार त्याचे मनांत आला व या प्रयत्नांत त्याला पूर्ण यश आलें. दंडनीति फसली आणि सामाला यश आलें. विग्रह चालला नाहीं तेव्हां संधि आठवला. हंस ह्मणालाः—

( दिंडी ) जागजागीं आहेत वीरकोटी
भले झुंजारहि शक्ति जयां मोठी।
तयां माराया धैर्य धरीं पोटीं
पाखरूं हें मारणें बुद्धि खोटी ॥ ४६ ॥

( शा. ) ह्मातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी
कांता काय वदों नवप्रसव ते सातां दिसांची तशी।
पाता त्या उभयांस मी—मज विधी घातास योजीतसे
हातामाजि नृपा! तुझ्या गवसलों आतां करावें कसें ? ॥४६॥

( दिंडी ) सखे माझे परतोनि घरा येतां
तुवां सजणे! हा समाचार घेतां।
तया शोकें घायाळ हृदय होतां
कशी होशिल तें आठवितों आतां ॥ ५२ ॥
थोर होतिल बाळके तुझीं बाळे!
तुला कामा येतील वेल्हाळे!।
माय माझी बैसेल शोकशाळे
मला आठवितां हृदय तिचें पोळे ॥ ५३ ॥

रसोत्पत्तिकाळीं कवीची भाषा सरळ, सोपी व प्रासादिकच येते, आणि साहित्याचे रंगढंग दाखवायचे वेळीं ती सालंकृत होते! रसाचे वेळीं अलंकार नसायचे! रस आणि अलंकार दोन्ही एकत्र फार क्वचित् असा प्रकार सर्वच कवींचे बाबतींत आढळतो! वरील श्लोक सहज आले आहेत व म्हणूनच त्यांत करुणरस भरला आहे. हंसाची दीनवाणी ऐकूण ‘ हेलावला नळ पयोधि दयारसाचा ’ यांत नवल नाहीं; त्यानें हंसाला मुक्त केलें.

( मालिनी ) सुटुनि खग पळाला, बैसला शालशाखे,
क्षणभरि निजदेहीं मुक्तिविश्रांति चाखे,।
स्वजन तंव तयाचे भोंवताले मिळाले,
कवळिति निजबंधू, बाष्पबिंदू गळाले ॥ ५६ ॥

नळाचें औदार्य पाहून हंस मोहित झाला. हंसच तो, कावळा नव्हे ! हंस वृक्षावरून खालीं आला व 'नृपाळाचे स्कंधीं बसुनि मणिबंधीं उतरला.' आपण होऊन नळाचे स्वाधीन झाला. ह्या उदार दयाळु थोर पुरुषापासून भय नाहीं असा त्याला विश्वास आला. 'हे दयासिंधो ! राजे खगमृगांची पारध करितात हें योग्यच आहे, हा क्षत्रियांचा धर्म आहे. हंस मिळणें हें कठिण, त्यांत माझ्यासारखा सोन्याचा हंस हातीं आला असून त्याला तूं मुक्त केलेंस या तुझ्या औदार्याला सीमा नाहीं. तुझा उपकार मी जाणतों' असें हंस म्हणाला.

( दिंडी) तुझा करपंजर होय मला थारा
तुझ्या वचनांचा ओघ दुग्धधारा ।
तुझें मानस बहु थोर गा उदारा
सत्य लोकेशहि तूंचि गुणाधारा ॥ ६१ ॥
किती रावे असतील तुझ्या धामीं
किती कोकिळा सारिका तसा मी ।
चित्त जडलें हें तूझिया लगामीं
नृपा ! स्वामी ! मज योजिं तुझ्या कामीं ॥६२॥

प्रेमानें प्रेम वाढतें व द्वेषानें द्वेष वाढतो, हें म्हणणें सत्य आहे. प्राणिमात्रांत भलाई आहे, आपल्या भलेपणानें दुसऱ्यांतली भलाई जागृत करितां आली पाहिजे. जग त्रिगुणात्मक आहे, आपल्यांत सात्विकपणाचा उठाव झाला कीं, तो दुसऱ्यांतल्या सात्विकपणाला धक्का देऊन उठवतो. नळाच्या औदार्यानें हंस वश झाला, त्याच्या सौजन्यानें हंसाला जिंकलें—आतां हंस आपल्या सौजन्यानें नळाचा उतराई होऊं पाहत आहेः—

( वसंत०) हें पांखरूं मजसि येइल काय कामा
ऐसें नृपा ! न वद पूरितलोककामा ! ।
मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारी
छाया करी तपनदीप्तिसही निवारी ॥ ६३ ॥

येथला दृष्टांत फार गोड आहे. 'सर्व लोकांचे मनोरथ पुरविणारा असा राजा ! तूं समर्थ आहेस; पण माझ्यासारखा क्षुद्र जीवही क्षणभर तुझा हृत्ताप नाहींसा करूं शकेल ! हें पहा ! एक आण्याचा पंखा, पण तो सुद्धां उन्हाचे वेळीं तोंडावर छाया करून सूर्यापासून होणारा ताप कमी करूं शकतो ! राजा ! खरेंच सांग, तूं प्रियाविरहानें व्यथित दिसतोस; मी तुझ्या हृदयंगमेशीं तुझा संगम घडवून आणतों. देतोस कां आज्ञा ?' हंसाची इंगितज्ञता, सामर्थ्य याचा नळाला विश्वास वाटला. हंसानें दमयंतीच्या लावण्याचें वर्णन केलें:—

राया तिचें मुख सुधाकर या द्वयाला
नाहींच वेगळिक हें गमतें मनाला ।
संपूर्ण नित्य असतां, नसतां कलंकी,
हा चंद्र, हें मुख–असें मग कोण शंकी ? ॥ ६६ ॥
चांफेकळीपरिसही सरलत्व नाकीं
जीचा धरी अधर विद्रुमभावना कीं ।
भासे मनांत मज बिंबफळभ्रमानें
कीं सत्य चंचुपुट वोढविलें शुकानें ॥ ६७ ॥

हे दोनच श्लोक पुरेत. दमयंतीच्या गुणरूपाचें वर्णन ऐकून नलाला "विश्रांतिही विरहखेदहि फार झाला.' तो म्हणतोः—

वेल्हाळ ते न दिसतां विरहांधकारीं
चालून मी हळुच चांचपतां पुढारीं ।
चक्रापरीच सजलों असतां फिराया
हंसा ! तुझा उदय होय सुखी कराया ॥ ७६ ॥

विरहाच्या अंधाऱ्या रात्रीं चक्रवाकपक्ष्यासारखा मी प्रियेचा शोध घेत असतां हंसाचा ( सूर्याचा ) उदय झाला हें नळाच्या भाषणांतलें रूपक मनोहर आहे. नळानें आपली प्रियाविरहव्यथा वर्णून हंसाकडेच दूतत्व देऊन दमयंतीकडे पाठविलें:—

( दिंडी ) असें बोलोनी नळें रंजवीला ।
अंजुळीमाजी हंस बैसवीला ।
गमे चंपककुसुमौघ हार झाला ।
पाठवाया युवतीस सिद्ध केला ॥ ८१ ॥

इकडे दमयंती आपल्या विलासवनांत नळाचें ध्यान करीत शिलातलावर बसली होती. हंस तेथें प्रगटला —

तो मंडळाकृति फिरे उतरावयाला
भैमी–मुखेंदुपरिवेष ह्मणों तयाला ।

हें दृश्य किती सुंदर आहे! कवि ह्मणतो—' हंस मंडलाकार होऊन पृथ्वीवर उतरण्यासाठीं फिरत हाता–जणुं काय दमयंतीच्या मुखचंद्राभोंवतालचें हें तेजोवलयच ! '

जो बैसला चपळ पक्षपुटीं धरेला ( पृथ्वीला )
हाणीतसे फडफडा, ध्वनि हो उदेला ।

दमयंतीनें वळून पाहिले तों सुवर्णहंस. तिला तो धरावासें साहजिक वाटलें.

अगाई हा वाई त्वरित वरि जाईल पळुनी
धरूं जातें हातें हळु हळु तयातें न कळुनी ।

हंसानें तिला झुळवीत झुलवीत तिच्या सख्यांपासून दूर नेलें व म्हणाला ' बाळे आकाशांतला चंद्र बाळाच्या हातीं येईल काय ? '

बाळ, बाळे ! जरि होय चंद्रकामी
हस्त त्याचा लागेल काय व्योमीं ? ।

असो. हंसानें दमयंतीचें मनोगत काढून घेतलें. तिलाही नळाचा निदिध्यास लागला आहे हें जाणून त्यानें नळाची प्रशस्ति गायिली व तिची उत्सुकता वाढविली व आपलें दूतकर्म पुरें करून नळाकडे परत आला. हंसदर्शनानंतर दमयंतीचा विरहताप फारच वाढला, सख्या विंझणवारें घालूं लागल्या, आईही समाचारास आली.

ते शीतळोपचारीं जागी झाली हळूच मग बोले ।
' औषध नलगे मजला '-परिसुनि जननी बरें म्हणुनि डोले ॥१५१॥

' औषध नलगे मजला-औषध नल गे मजला ' हा श्लेष त्या मातेस कळला कीं नाहीं कोण जाणें-वाचकांस कळून मौज वाटते खरी. दमयंतीचें स्वयंवर निघालें; इंद्रानें नळाला अपला दूत ( हेजीब )म्हणून दमयंतीकडे पाठविलें; त्यानें आपलें नांव न सांगतां दूतकर्म प्रामाणिकपणें केलें; इंद्र, वरुण, पावक व यम हे चौघे देव नळरूप घेऊन स्वयंवरास आले; दमयंतीनें इंद्रादि देवांस वंदन करून विनविलें—

माझा भीम जैसा पिता । तैसे तुम्ही जी तत्वता ।
करा कन्यादान आतां । नळनाथाचे करीं ॥ २३४ ॥

या तिच्या चातुर्यानें देव प्रसन्न झाले व नलदमयंतीचा विवाह झाला. आख्यान संपलें. रघुनाथपंडिताच्या या काव्यांतला पूर्वार्ध उत्तरार्धाहून सरस आहे. शब्दालंकार व अर्थालंकार साधून कवीनें तेथें रसरंग उधळला आहे.

२. या कवीचा ' गजेंद्रमोक्ष ' ही सरस आहे पण नलदमयंतीस्वयंवराइतका सरस वाटत नाहीं.

( स्रग्धरा ) कोठें वैकुंठ, कोठें गजपतिस बळें नक्र वोढी तटाकीं,
तेथें जो लागवेगेंकरुनि पवनसा धांवला पावला कीं ।
तो स्वामी, स्मर्तृगामी, निरवधि करुणासिंधु बंधु प्रणामी
लक्ष्मी, वत्सें ललामीं, स्मरुनि निजमनामाजि गाईन नामीं ॥१॥

ह्या पहिल्या मंगलाचरणाच्या श्लोकांतच कवीनें गजेंद्रमोक्षाची कथा संकलितरूपानें सांगितली आहे. यांतही उद्यानाचें वर्णन आहे; पण त्यांत बरेच श्लोक पूर्वीच्या आख्यानांतले घेतले आहेत. कांहीं नवीन आहेत त्यांतला १२ पहा:—

(उपजाति) विख्यात नामें लवली लता जे । फलावलीनें लवली विराजे
चंद्रोदयीं घोंस तिचे फुलांचे । होती विसांवे अलिनीकुलांचे ॥१२॥

[stamp]

गजेंद्रानें केलेला धांवा गोड आहे, पण त्या श्लोकांत वामनी श्लोकांची माधुरी नाहीं. या प्रकरणाचे श्लोक ५८ आहेत.

३. रघुनाथपंडितांनीं आपले गुरु श्रीरामदासस्वामी यांजवर ११ प्रकरणांचें एक स्तोत्र केलें आहे तें गुरुभक्तिपूर्ण असून काव्यमय आहे. त्यांतील ४।२ श्लोक येथें देतों:—

(वसंत०) आम्हांतुह्मांसि भववारिधिमाजि तारूं
जे वाचितां परिसितां मग होय तारूं ।
ते दासबोध रचना घडली जयाला
वंदूं निरंतर तया गुरुराजयाला ॥ १ ॥
वैराग्यभाग्य भरलें असतां अनन्या
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्तिकन्या ।
चौथी तयांत वरिली उरल्या न पाहे
तो आमुचा गुरु ‘समर्थ’ समर्थ आहे ॥ २ ॥
चिद्बोध शेज अरुवार नव्या फुलांची
सायुज्यमुक्ति असतां ललना जयाची ।
तो रामदास अकलत्र कसें गणावें ?
अज्ञान होत जन काय तयां म्हणावें ? ॥ ७ ॥
श्रीरामदासगुरु शांतिवधूस अंगीं
अंगीकरूनि मिरवे स्वसुखांतरंगीं ।
रंगीं उभा कर उभारुनि वंदनाचे ।
नाचे, मुखीं गुण वदे रघुनंदनाचे ॥ ३ ॥

---


# मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकार:—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षें पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोड्या शिल्लक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २.

पत्ता:—व्यवस्थापक “मुमुक्षु” पुणें शहर.

# साभार स्वीकार.

## १ श्रीरामकृष्ण परमहंसदेव यांचें चरित्र भाग १।२

लेखक–रा. न. रा. परांजपे, उमरावती. किं. कापडी बांधणी रु. ३ व रु. २८८.

बंगाल्यांतील सुप्रसिद्ध विभूति, स्वामी विवेकानंदांचे गुरु, व अर्वाचीन बंगालला भक्तिमार्गाला लावणारे महापुरुष श्री. रामकृष्ण परमहंस यांचें हें दिव्य चरित्र रा. परांजपे यांनीं लिहून मराठी वाचकवृंदावर फार उपकार केले आहेत. कागद, छपाई, बाइंडिंग, प्रकरणांची शिस्त, फोटो इ० दोन्ही भागांचें बहिरंग उत्तमच आहे पण अंतरंगांत जे अमृतरसाचे चषक सांठवले आहेत त्यांना मोल नाहीं. सद्गुरु रामकृष्ण परमहंस व सच्छिष्य स्वामी विवेकानंद यांची आज १५।२० वर्षें रा. किनरे, रा. गुणाजी इत्यादिकांनीं मराठी वाचकांस ओळख करून दिली आहेच. तरीहि श्री. रामकृष्णांचें संपूर्ण चरित्र एकत्र वाचावयास मिळण्याची सोय ह्या सुंदर ग्रंथानें केली आहे. श्रीरामकृष्णांच्या संगतींत अनेक वर्षें राहिलेले त्यांचें एक सच्छिष्य श्रीशारदानंदजी यांनीं बंगाली भाषेंत त्यांचें जें चरित्र लिहिलें आहे त्याचेंच हें बहुतेक मराठी रूपांतर आहे. क्वचित् इतर ग्रंथांचेंही साह्य घेतलें आहे. हें काम रा. परांजपे यांनीं भक्तिभावानें उत्तम केलें आहे. भाषा सरळ, सोपी असल्यामुळें सर्वांस सहज समजण्यासारखी आहे. शिवाय हें चरित्र श्रद्धेनें लिहिलें असल्यामुळें संतचरित्राची माधुरी त्यांत अवतरली आहे. श्रीरामकृष्णांनीं "कोणकोणतीं साधनें केलीं, त्या त्या कालांत त्यांच्या अंतःशक्तीचा विकास कसकसा झाला, त्यांना कोणकोणते अनुभव आले, कशा तऱ्हेच्या अडचणींतून त्यांना जावें लागलें व त्या त्या प्रसंगीं त्यांनीं काय काय केलें हें सर्व बहुतेक त्यांचें चरित्र त्यांच्याच तोंडून सहज बाहेर आलें आहे...त्यांच्या चरित्रांतील पुष्कळसा भाग जशाचा तसा खुद्द त्यांच्यात तोंडून ऐकावयास मिळणें शक्य झालें आहे." पूर्वींच्या संतचरित्रांत व ह्या चरित्रांत हा मोठा फरक आहे; दोन्ही भाग मिळून एकंदर २९+२५=५४ प्रकरणें आहेत. श्रीरामकृष्णांचा जन्म शके १७५७ फाल्गुन शुद्ध २ बुधवार, स. १८३६ फेब्रुवारीं अर्ध घटका रात्र अवशिष्ट राहिली असतां झाला. हे साधनें आचरीत होते त्या वेळीं इकडे महाराष्ट्रांत श्रीअक्कलकोटचेस्वामी व श्री माणिकप्रभु हे सिद्धपणाच्या ऐश्वर्याचा अनुभव घेत होते. ह्या महाराष्ट्रीय सिद्धांना कोणी 'विवेकानंद' भेटला असता तर यांचीं नांवें त्रिखंडांत गाजलीं असतीं. बाकी न गाजल्यानें त्यांचें

कमी झालें असें थोडेंच आहे! रामकृष्ण परमहंस हे आपल्या सिद्धाईचा आनंद भोगीत पडले असते व केशवचंद्रसेन व विवेकानंद यांनीं त्यांच्या नांवाचा पुकारा केला नसता तर न जाणों त्यांचें नांवही दक्षिणेश्वराच्या आवाराबाहेर कोणाच्याही कानीं आलें नसतें. आमच्या इकडे रानडे, भांडारकर वगैरे त्या वेळचे विद्वान् अक्कलकोटस्वामींच्या भजनीं लागले असते तर त्यांच्या तरुण पिढीवरील वजनामुळें तरुण पिढीला परमार्थाची व साधु संतांची किंमत कळूं लागली असती व देवधर्म व साधुसंत याविषयीं गेल्या २ पिढ्यांत जो अनादर बोकाळला आहे तो बोकाळला नसता! असो. ईश्वरेच्छेनेंच जर सर्व चाललें आहे तर असला 'असता–नसता'चा विचार करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. श्रीरामकृष्णांनीं महासमाधि ता. १६ आगष्ट १८८६ रोजीं घेतली. त्यांची हयात पृथ्वीवर सारी ५० वर्षे होती. ह्या अवधींत त्यांनीं जी मधुरभक्तीची, वैराग्याची, अद्भुत मोहनशक्तीची, खडतर तपश्चर्येची, भूतकल्याणाची लोकोत्तर शक्ति प्रगट केली व सनातन हिंदुधर्माचीं उज्वल तत्वें आपल्या दिव्य चारित्र्यानें जनतेस शिकविलीं त्यांची ओळख त्यांच्या प्रस्तुत चरित्रावरून मराठी वाचकांस होणार आहे. त्यांच्या शिकवणीची वाचकांस थोडक्यांत समजून पटावी म्हणून रा. परांजपे यांनीं ग्रंथाच्या शेवटीं त्यांचीं कांहीं बोधवचनें निवडून दिलीं आहेत. त्यांतील शेलकीं वचनें आम्ही आमच्या वाचकांच्या मननसुखार्थ ह्या अंकाच्या आरंभीं दिलीं आहेत. श्रीरामकृष्णांच्या सर्वच शिकवणी ततोतंत आमच्या महाराष्ट्रीय संतवचनांशीं जुळतात. त्यांत रेसभर फरक दिसत नाहीं. सत्पुरुषकथा नेहमींच गोड असतात. त्या भक्तिभावानें गायिल्या गेल्या म्हणजे अधिकच गोड लागतात. आमच्या वाचकांनीं ह्या दोन्ही भागांच्या मिळून ७१८ शें पृष्ठांतील रम्य कथांवरून पांच रुपये ओंवाळून टाकावेत व अर्वाचीन काळांतील एका महाविभूतीशीं परिचय करून घ्यावा असें आम्ही आनंदानें विनवितों.

२ **सप्तकांडात्मक श्रीसमर्थचरित्र**–लेखक रा. कृष्णाजी हरी दीक्षित बेळगांव. श्रीरामायण जसें सप्तकांडात्मक आहे तसें श्रीरामदासायन सप्तकांडात्मक लिहावें अशा बुद्धीनें रा. दीक्षित यांनीं श्रीसमर्थचरित्र लिहिण्यास आरंभ केला असून त्यांचीं बालकांड, पुरश्चरणकांड व तीर्थाटनकांड अशीं तीन कांडें त्यांनीं छापून प्रसिद्ध केलीं आहेत. सातही कांडें पूर्ण होण्याची आम्ही उत्कंठेनें वाट पहात आहोंत. बहुतेक सर्व उपलब्ध समर्थविषयक वाङ्मय रा. दीक्षित यांनीं नजरेखालून घातलें असून त्यांचें हें 'दासायन' फार उत्तम होईल अशी उमेद आहे. तीन कांडांत समर्थांच्या चरित्राचा पूर्वार्ध आला असून उत्तरार्ध पुढेंच आहे. सर्व ग्रंथ चार रुपयांत देण्याचा दीक्षितांचा विचार आहे, तोही योग्य आहे.

**३ श्रीभक्तिकल्पलता:**— खेडचे सत्पुरुष श्रीचांडिराममहाराज यांचा हा मूळग्रंथ संस्कृतांत आहे. मूळग्रंथांत श्लोक १५९ असून गीताभागवतांतील वचनें आधारास घेतलीं आहेत. ही कल्पलता नांवाप्रमाणेंच आहे. ह्या सिद्ध-वाणीवर मुमुक्षूनें अभिप्राय द्यायचा म्हणजे भक्तिनम्र होऊन ही 'प्रसाद' म्हणून शिरीं वंदायची! मराठी प्रसिद्ध कवि अनंततनय उर्फ दत्तात्रय अनंत आपटे यांनीं प्रत्येक श्लोकाचें खालीं बाळबोध भाषांतर देऊन चित्रशाळेंत प्रसिद्ध केली आहे. किं रु. १

**४ मयूरकाव्यविवेचन:**—लेखक रा. श्री. ना. बनहट्टी, एम्. ए. मिरज. हा ४०० पृष्ठाचा विवेचनात्मक ग्रंथ रा. बनहट्टी यांनीं मोठ्या परिश्रमानें व मार्मिकतेनें लिहून नुक्ताच प्रसिद्ध केला आहे. यांतील विवेचन नीट बारकाईनें तपासून पाहायचें म्हणजे अधिक सवड पाहिजे. तितकी तूर्त आह्मांस नाहीं. बनहट्टी यांनीं मोरोपंतांच्या कवितेचा अभ्यास फार बारकाईनें केला आहे व त्यांची लेखनशैलीही ओजस्वी व चित्ताकर्षक आहे. पूर्वींच्या लेखकांवर त्यांनीं जे दोषारोप केले आहेत त्यांतून ते स्वत: सुटतील असें मात्र ह्मणवत नाहीं. पहिलाच ग्रंथ असून प्रशंसेस पात्र आहे. त्यांची विद्वत्ता, मार्मिकता व भक्ति प्रशंसनीय आहे.

**५ भासप्रणीत अविमारक नाटकाचें मराठी भाषांतर:**—भाषांतरकार रा. विष्णु दामोदर देशपांडे, धुळें. किं. १८४. संस्कृत कवि भास हा कालि-दासाच्या फार पूर्वींचा असून त्याचीं नाटकें मात्र अलीकडेच उपलब्ध झालीं असून त्यांनीं विद्वानांचीं मनें आपल्याकडे वेधून घेतलीं आहेत. त्याच्या नाट-कांपैकीं 'अविमारक' नामक नाटकाचें हें भाषांतर रा. देशपांडे यांनीं केलें आहे. मुळांतील रसास्वाद जाऊं न देतां व पदपदार्थ न सोडतां भाषांतर करणें अति कठिण आहे व हें कठिण काम रा. देशपांडे यांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. जागोजाग अर्थबोधक टीपाही दिल्या आहेत. सदर पुस्तकाला १२५ पृष्ठांचा विस्तृत उपोद्घात रा. बाळाचार्य खुपेरकर यांनीं जोडला असून त्यांत म.म. गणपतिशास्त्री यांनीं संशोधून प्रकाशित केलेलीं तेराही नाटकें भासाचींच आहेत हें साधकबाधक प्रमाणांनीं सिद्ध केलें असून भासाचा कालनिर्णय, भासाचें जीवनचरित्र, भासाचें ग्रंथकर्तृत्व, काव्यगुणदोषविवेचन, अवि-मारकसमालोचन इ० मुद्यांवर विद्वत्तापूर्ण समतोलपणानें उत्कृष्ट चर्चा केली आहे. प्रस्तुत ग्रंथ प्रौढ विद्यार्थ्यांना व सर्वसामान्य रसिकांना आनंददायक वाटेल यांत संशय नाहीं.

॥ श्रीसद्गुरुनाथ भगवान् वासुदेवायनमः ॥

# श्रीसद्गुरु विश्वनाथ पाटणकर—कृपा प्रसाद

## अथवा

# आत्मदर्शनाचा आरसा.

( संपादक—**विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर**, सरवेअर, मुंबई. )

सामर्थ्याचेनि बिके । जो शिवाचेंही गुरुत्व जिंके ॥
आत्मा आत्मसुखें देखे । आरसा जियें ॥ ज्ञानेश्वरी.

१ आत्मदर्शनाचा आरसा म्हणजे जीवाची दृष्टि पंचकोशरूप पटलांनीं अंध झाली आहे, तीं पटलें काढून, त्यानें आपलें सत्यस्वरूप ओळखावयाचें मुख्य साधन होय. हें साधन आत्मज्ञानरूप आहे. हें वेदांनीं मान्य केलें आहे. ह्या आत्मज्ञानाचा विचार ज्या भूमिकेवर बसून करावयाचा, ती अद्वितीय भूमिका पंचदेहातीत शुद्ध चैतन्याची आहे. अपरोक्षानुभूति करून देणारें असें एवढेंच आत्मज्ञान आहे. यामुळें जगांतल्या सर्व ज्ञानामध्यें हें अत्यंत श्रेष्ठ आहे. एवढेंच नव्हे तर, तें प्रत्येक मुमुक्षूस अत्यंत आवश्यक आहे. ह्या आत्मज्ञानरूप नेत्राच्यायोगानें जीवाचें सत्यस्वरूप, शुद्ध, बुद्ध, शाश्वत, स्वयंप्रकाश आत्माराम श्रीवासुदेव आहे, असें स्पष्ट कळून, बुद्धीचा निश्चय होतो. आणि त्याच्या व्यतिरिक्त दृश्यादृश्य, जगदेहादि प्रपंच सर्व कांहीं अनित्य व मिथ्या आहे, असें अनुभवास येऊन, निर्विकल्प समाधींत रहातां येतें. एवढेंच केवळ नव्हे, परंतु हृदयस्थ भक्तिप्रिय, प्रेमस्वरूप, आत्माराम श्रीवासुदेवाच्या ठिकाणीं अनन्य व शुद्ध प्रेमभाव ठेवून, त्याच्या अनिर्वचनीय भक्तिसुखाचा-प्रेमसुखाचा निरंतर उपभोग कसा घ्यावा, तें समजतें. येणेंकरूनच मुमुक्षूला अद्वितीय समाधान, अनुपम आनंद व अढळ शांति प्राप्त होऊन, मुक्तीचा सोहळा भोगतां येतो. मनुष्याच्या अंध दृष्टीचीं पटलें पांच आहेत. ( १ ) अन्नमयकोशरूप पटल, ( २ ) प्राणमयकोशरूप पटल, ( ३ ) मनोमयकोशरूप पटल, ( ४ ) विज्ञानकोशरूप पटल व ( ५ ) आनंदमयकोशरूप पटल, हीं होत. ह्या पंचकोशरूप पटलांची ओळख ह्या आत्मज्ञानरूपी आत्मदर्शनाच्या आरशानें होऊन, हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवाचा अवतार, जो सद्गुरु चैतन्यनाथ ह्याच्या अनुग्रहानें तीं नाहींशीं होतात, आणि मुमुक्षूला आत्मस्वरूपाची प्राप्ति होते.

२ ह्या आत्मदर्शनाच्या आरशाचा अधिकारी जो, विवेक, वैराग्य, षट्-

संपत्ति, आणि मोक्षेच्छा अशा चार साधनांनीं संपन्न मुमुक्षु असेल, तोच समजावा. ( १ ) हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवस्वरूप नित्य, सत्य, अविनाशी आहे, आणि त्याच्या व्यतिरिक्त दृश्यादृश्य जगदेहादि प्रपंच हा अनित्य, मिथ्या, नाशवंत आहे, असा जो बुद्धीचा दृढ निश्चय करणें, त्याचें नांव विवेक होय. ( २ ) इहलोकचे प्राप्त होणारे राज्यादि ऐश्वर्य सुखभोग, आणि परलोकचे ब्रह्मलोक-स्वर्गादि लोकांत असणारे अमृतादि दिव्य सुखभोग, हे सर्व नाशवंत आहेत, असें पूर्ण विचारानें जाणून त्यांविषयीं अंतःकरणपूर्वक त्यागबुद्धि धारण करणें, हेंच वैराग्याचें खरें स्वरूप होय. ( ३ ) शमदमादि षट्संपत्ति, म्हणजे शम, दम, उपरति, तितीक्षा, श्रद्धा, आणि समाधान हीं सहा मिळून एक साधनसंपत्ति होय. ( १ ) शम म्हणजे विषय दोषयुक्त आहेत, असें वारंवार ध्यानीं मनीं आणून त्यांविषयीं विरक्ति बाळगणें. (२) दम म्हणजे कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें यांना विषयांपासून परतविणें ( ३ ) उपरति म्हणजे विहित कर्म आत्मज्ञानासाठीं ईश्वरार्पण करून, चित्तवृत्ति विषयाकार होऊं न देणें ( ४ ) तितीक्षा म्हणजे शरीराची प्रतिष्ठा फार वाढूं न देतां, स्नानसंध्यादि वर्णाश्रमविहित कर्में करीत असतां, शीतोष्णापासून होणारीं दुःखें सहन करणें. ( ५ ) श्रद्धा म्हणजे ब्रह्मनिष्ठ सद्गुरूच्या ठिकाणीं ईश्वरबुद्धि बाळगून, त्यांच्या वचनावर पूर्ण विश्वास, व वेदांत शास्त्रावर अढळ श्रद्धा ठेवून, तदनुरूप आचरण शुद्ध ठेवणें. अशा एकनिष्ठ श्रद्धेच्या योगानें आत्मसाक्षात्कार लवकर होतो. ( ६ ) समाधान ह्मणजे, ऐहिक क्षणभंगुर विषयसुखापासून मन आवरून. चित्ताची एकाग्रता करणें, आणि शांत केलेलें चित्त वेदांत व अध्यात्मशास्त्राकडे किंवा महावाक्याच्या विचाराकडे आदरपूर्वक लावणें; व त्यालाच सहाय्यभूत अशा ब्रह्मनिष्ठ सद्गुरूच्या सेवेकडे लावणें. ( ७ ) मोक्षेच्छा ह्मणजे मी दुःखरूप भवसागर कोणत्या उपायानें तरून जाईन, व अढळ मुक्त कसा होईन, मोक्षप्राप्त्यर्थ आत्मज्ञानाचा उपदेश करणारे सद्गुरुनाथ मला केव्हां भेटतील, व आत्मदर्शन कधीं पावेन, आणि कैवल्यदेहापासून स्थूलदेहापर्यंत जीं बंधनें अज्ञानानें कल्पिलेलीं आहेत, त्या बंधनांपासून सद्गुरुबोधानें जन्ममरणदुःखापासून मुक्त होण्याची जी तीव्र उत्कंठा, तिला मोक्षेच्छा ह्मणतात. अशा चार प्रकारच्या साधनांनीं युक्त मुमुक्षु, तो या आत्मदर्शनाच्या आरशाचा खरा अधिकारी समजावा. अशा पूर्ण अधिकाऱ्यालाच खरी ब्रह्मनिष्ठा उत्पन्न होते, नाहीं तर होत नाहीं.

३ मनुष्याला आपण कोणी तरी एक आहों, एवढें मात्र समजत असतें. पण आपण खरे कोण आहों, हें मात्र त्याला खात्रीनें बरोबर समजत नाहीं. आपण कोण, कोठून आलों, कधीं आलों, याचा तो कधीं आपले मनाशीं शांतपणें विचार करीत नाहीं. यामुळें त्याला आपण कोण आहों,

आपलें स्वरूप कसें आहे, याची मुळींच ओळख होत नाहीं. यामुळें तो आपणा स्वतःला पूर्णपणें जाणत नाहीं. तो देह मी असें ह्मणतो पण आपण देह खरा आहों, किंवा देहाचा कोणी जाणता आहों, देहाला आपण जाणतों, किंवा देह आपणांस जाणतो, याचा जर विचार केला, तर देहास पाहणारा म्हणजे द्रष्टा–साक्षी चैतन्य जीवात्मा आपण आहों, आणि देह आपणाला दिसणारा दृश्य, जड आहे, असें दिसून येतें. जी वस्तु आपणांस जाणते, व दुसऱ्यासही जाणते, ती चैतन्य होय. आणि जी वस्तु आपणांस जाणत नाहीं, व दुसऱ्यासही जाणत नाहीं, ती जड होय.

जे प्राणियां काम भर । देहाचिवरी आदर ॥
ह्मणोनी पाडला विसर । आत्मबोधाचा ॥ ज्ञानेश्वरी.

मनुष्य एखाद्या पांघरुणाप्रमाणें देहास धारण करून त्यास जगांत डौलानें मिरवीत असतो, हें त्यास समजत नाहीं. म्हणून पूर्ण विचार करून आपण खरे कोण आहों, आपलें खरें स्वरूप कसें आहे, याची त्यानें पूर्णपणें ओळख करून घेतली पाहिजे. त्याची खरी ओळख होऊन, जन्ममरण दुःखापासून मुक्त होण्यासाठीं ह्या आत्मदर्शनाच्या आरशाचा अवतार आहे. यासाठीं मुमुक्षुजनांनीं ह्या आत्मज्ञानरूपी आरशाच्या ज्ञानानें श्रवणमनननिदिध्यासनानें आत्मस्वरूप जाणून भवबंधांतून मुक्त होणें, अत्यावश्य आहे. हीच नरजन्माची इतिकर्तव्यता होय.

४ मनुष्याची दृष्टि पंचकोशरूप पटलांनीं अंध झाल्यामुळें त्याला आपलें खरें स्वरूप मुळींच दिसेनासें झालें आहे; आणि त्याची सर्व प्रवृत्ति विषयभोगांचीं साधनें वाढवून देहाची पुष्टि करण्याकडे असल्यामुळें आत्मदर्शनाच्या आरशाकडे पाहण्याची त्याची प्रवृत्ति मुळींच होत नाहीं. यामुळें त्याला हृदयस्थ चैतन्यस्वरूप आत्माराम श्रीवासुदेवाची मुळींच ओळख होत नाहीं. व स्वानंदसुखाची प्राप्ति होत नाहीं. मनुष्यानें विषयांचें कितीही सेवन केलें, तरी त्याची तृप्तता होत नाहीं. त्याची विषयवासना दिवसेंदिवस अधिकाधिक वाढतच जाते, तो विषयांच्या ठिकाणीं निरंतर रमतो. जीवांना विषयवासनेच्या योगानें जन्ममरणदुःख भोगावें लागतें. विषयवासनेमुळें ‘ पुनरपि जननं पुनरपि मरणं ’ अशा संसाराची निवृत्ति होत नाहीं. मनुष्याला निरंतर सुख पाहिजे असतें. म्हणून तो संसारांत सुखाकरितां रात्रंदिवस अविश्रांत झटत असतो. पण त्यास सुख न मिळतां दुःखाचीच प्राप्ति होते. संसार हा सुखमय नसून, तो दुःख, क्लेश, यातना व भय यांनीं भरलेला आहे.

“ सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ” अशी स्थिति आहे. विष्ठा भक्षण करून राहणाऱ्या श्वानसूकरांना सुद्धां परिणामीं दुःखदायक अशीं विषयसुखें भोगण्यास मिळतात, तींच विषयसुखें परम दुर्लभ

असा नरदेह प्राप्त झालेल्या मनुष्यांनीं भोगीत रहावें, हें पतितलक्षण होय. असें म्हटलें आहे:—

> " क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाहीं ।
> दुर्लभ नरतनु गेल्या मग तू पडशिल पस्ताई " मुक्ताबाई.

५ जीव स्वतःचें जें चैतन्यरूप, स्वयंप्रकाश, आनंदघन आत्माराम श्रीवासुदेवस्वरूप, तें अज्ञानानें विसरून, देहच मी असें म्हणतो. यामुळें त्यास लक्षचौऱ्यांशी योनी वारंवार फिराव्या लागतात. देहाभिमानी जीव लक्षचौऱ्यांशीं योनी फिरत फिरत, तो परम दुर्लभ अशा मनुष्यरूप मुक्तीच्या दरवाज्यांत येतो. तेव्हां त्याला आत्मज्ञानरूप आत्मदर्शनाच्या योगानें, आपलें खरें आत्मस्वरूप ओळखतां येतें आणि जन्ममरण दुःखापासून सुटतां येतें. महाप्रयासानें प्राप्त झालेला नरदेह हा मोक्षाचें द्वार आहे. जीव अनेक योनी फिरून, शेवटीं नरजन्मास येतो. यास्तव हा कपिलाषष्ठीसारखा महायोग व महापर्वकाळ आहे, असें जाणून प्रत्येक नरानें नारायण होण्याचा दीर्घ प्रयत्न करावा. नरजन्मांतच आत्मज्ञानरूपी आत्मदर्शनाचा आरसा प्राप्त करून घेतला पाहिजे, असें जीव समजत नाहीं. तो विषयसुखांत आनंद मानून त्यावरील आसक्ति मुळींच सोडीत नाहीं. यामुळें दुर्लभ नरदेहरूप मोक्षद्वार हातचें गमावितो. व आत्मघातकी बनतो. आपण देह आहों, व देहादिकप्रपंचसंबंध आपले आहेत, अशी जी देहबुद्धि धारण करणें, हें बंधनाचें रूप आहे, आणि हें बंधन स्वतःचें खरें स्वरूप जें सच्चिदानंदरूप आत्माराम श्रीवासुदेव ह्याच्या स्वरूपाच्या अज्ञानामुळें प्राप्त होतें. म्हणून आपल्या स्वरूपाचें अज्ञान, हेंच संसारबंधनास कारण होतें. मी देह नाहीं, व देहासंबंधीं माझी कोण नाहींत, असें आत्मज्ञानरूप आत्मदर्शनाच्या आरशाच्या ज्ञानानें समजल्यानें, देहाविषयीं अहंता नाहींशी होते, तिचें नांव मोक्ष होय.

## अन्नमयकोशरूपी पटल.

तामस अहंकारापासून सूक्ष्म ' अहं शब्द ' होतो. त्याचें दैवत रुद्र होय. त्याचे द्रव्यशक्तीपासून पंचमहाभूतें व पंचवीस विकार उत्पन्न होतात. मी व माझें अशा अहंपणानें प्रसिद्ध असलेला देह हा पंचमहाभूतांचें कार्य आहे. पृथ्वीपासून औषधी होतात. औषधीपासून अन्नें होतात. आईबापांनीं खाल्लेल्या अन्नानें बनलेलें वीर्य व रक्त, त्यापासून स्थूल देह बनतो. त्यापासून प्राणी उत्पन्न होतात. स्त्रीपुरुषसंयोगानें मनुष्यदेह रक्तरेताचा उत्पन्न होतो. हा स्थूल देह हाडें, मांस, रक्त, मळ, मूत्र, कफ इत्यादि अत्यंत अपवित्र व अमंगळ पदार्थांनीं भरलेला असतो, म्हणून हा निंद्य होय. हा पूर्वकर्मांनीं बनलेला असतो. ह्या स्थूलदेहीं अज्ञान जागृति अवस्था आहे. म्हणून येथें स्थूल विश्व-

यांचें प्रत्यक्षत्व होऊन, सुख दुःखें प्राप्त होतात. मनुष्याचा सर्व बाह्य प्रपंच या स्थूलदेहावर अवलंबून आहे. सत्वगुणानें जागृति अवस्था उत्पन्न होते. रजोगुणानें स्वप्नावस्था उत्पन्न होते. तमोगुणानें सुषुप्ति अवस्था उत्पन्न होते. शुद्ध सत्वगुणानें तुर्यावस्था उत्पन्न होते आणि निर्गुणानें उन्मनी अवस्था उत्पन्न होते. हा स्थूल देह अन्नापासून होतो, अन्नेंकरून वांचतो, आणि अन्न मिळालें नाहीं, तर नष्ट होतो. हा परिणामीं अन्न होऊन पृथ्वींत मिळतो. ह्याचे परिणाम तीन आहेत. जाळला तर अग्नि खातो, पुरला तर किडे खातात, पडला तर कुत्रीं खातात. भस्म, कृमि व विष्ठा होऊन, हा पृथ्वी-तत्वामध्यें मिळतो. देहाला सहा विकार आहेत. म्हणजे गर्भी उत्पन्न होणें, असणें, वाढणें, वृद्ध होणें, क्षीण होणें, व मरणें हे होत. तसेंच बाल्य, स्थूलता, कृशता, रंग, रूप, नांव, वर्ण, आश्रम वगैरे या सर्वांस मनुष्य जाणतो, म्हणून हा देह मनुष्याला विजातीय व निराळा आहे. देह जन्माच्या पूर्वी आणि मरणानंतर नसतो. केवळ वर्तमानकाळीं भासतो. क्षणोक्षणीं ह्याचें रूप, गुण, स्वभाव बदलत असतात. देहाचें मूळ पहावयास गेलें, तर, फारच अपवित्र व अमंगळ आहे. अस्थींची रास, मासानें लिंप-लेला, विष्ठेनें भरलेला, अतिशय घाणेरडा असा हा देह स्वतः आत्मा कसा होऊं शकेल ? कारण आत्मा आनंदघन व ज्ञानरूप आहे. अस्थींची रास हें त्याचें स्वरूप नव्हे. आत्मा मांसानें लिपलेला, विष्टेनें भरलेला नाहीं. अज्ञानी व मूढ मनुष्य त्वचा, मांस, मेद, अस्थि, व विष्ठा यांच्या राशीला 'मी मी' ( देह ) असें मानतो. पण विचारी मनुष्य देहाहून निराळें आपलें सत्यस्वरूप ओळखतो. अज्ञान व मूढ मनुष्याची मी देह अशी देहावर अहंबुद्धि असते. विद्वानाची मी जीवात्मा आहे, अशी जीवावर अहंबुद्धि असते. आणि अनुभव-शून्य ब्रह्मज्ञानी ह्यांची मी सच्चिदानंद ब्रह्म आहें, अशी शून्य-ईश्वरब्रह्म यांवर अहंबुद्धि असते.

देह दृश्य, विकारी, जड, परिच्छिन्न, सावयव आहे. आणि आत्मा द्रष्टा, अविकारी, चैतन्य, नित्य, ज्ञानस्वरूप, निरवयव, असा आहे. देह अपवित्र दुर्गंध, मल, मांस, मूत्र, रुधिरादिकांनीं भरलेला असा आहे आणि आत्मा शुद्ध, निर्मल, आनंदघन असा आहे. देह व आत्मा यांचीं लक्षणें एकमेका-पासून भिन्न आहेत. यामुळें देह आत्म्याहून निराळा आहे. स्थूल देह म्हणजे पंचमहाभूतें व पंचविस विकार अशा तत्वांचा सुषुप्तिकाळीं आभास, व मरण-काळीं नाश दृष्टीस पडतो. मी देह नव्हे, तसाच देहही माझा नव्हे. कारण देह हा पंचमहाभूतांचा आहे, असें असून देह माझा म्हणणें ही मनुष्याची मोठी चूक आहे. सुषुप्तीकाळीं स्थूल देहाचा अभाव झाला, तरी आत्मबुद्धि नष्ट पावत नाहीं, व प्राणावांचून देह अजाण व जड हें अनुभवास येतें. यावरून

मी देह नव्हे प्राण आहें अशी समजूत होते. यासाठीं हा स्थूल देह नित्य, शुद्ध आत्मा होण्यास योग्य नाहीं. येथें अन्नमयकोशरूपी पटल दूर होतें.

## पंचमहाभूतें आणि पंचवीस विकारांचें कोष्टक.

पंचमहाभूतें:—१ पृथ्वी, २ आप, ३ तेज ४ वायु, ५ आकाश.

पंचवीस विकार:–१ हाडें, २ रक्तमांस, ३ नाडी, ४ त्वचा, ५ केंस, ६ मूत्र, ७ रेत, ८ पित्त, ९ घर्म, १० लाळ, ११ आलस्य, १२ मैथुन, १३ क्षुधा, १४ तृषा, १५ निद्रा, १६ आकुंचन, १७ प्रसरण, १८ धावन, १९ चळण–वळण, २० निरोधन, २१ काम, २२ क्रोध, २३ शोक, २४ मोह, २५ भय.

## २ प्राणमयकोशरूपी पटल.

राजस अहंकारापासून सूक्ष्म 'कोहंध्वनि' होतो. त्याचें दैवत ब्रह्म होय. त्याचे क्रियाशक्तीपासून पंचप्राण, पंचउपप्राण, पंचकर्मेंद्रियें, पंच ज्ञानेंद्रियें व पंचविषय हीं उत्पन्न होतात. अशा तत्वांनीं सूक्ष्म देह बनतो. स्वप्नकाळीं मनवियोगें प्राण, इंद्रियें जड व अजाण यांचा अनुभव येतो. यावरून मी दशप्राण दशइंद्रियें, पंचविषय नव्हे. मन मी अशी समजूत होते. मीपणा नष्ट पावत नाहीं, कायम असतो. यावरून एका मनाशिवाय हीं सर्व जड आहेत, याची प्रतीति येते. यासाठीं हा सूक्ष्म देह नित्य शुद्ध आत्मा होण्यास योग्य नाहीं.

हे पंचविषय असे आहेत कीं, स्वतःच्या गुणांनीं बद्ध झालेले हरिण, हत्ती, पतंग, मत्स्य, आणि भुंगा हे पांच प्राणी शब्दादिक पांच विषयांपैकीं अनुक्रमें एकेक विषयावर आसक्त झाल्यामुळें प्राणास मुकतात, तर मग पांच विषयांचे ठिकाणीं आसक्त झालेला मनुष्य विषय सेवन केल्यानें मृत्युप्राय दुःख भोगील, यांत काय संशय आहे ? कृष्ण सर्पाच्या जालीम विषापेक्षांही हे पंचविषय आपल्या अंगच्या प्रखर दोषानें फार जलाल आहेत. कारण कृष्ण सर्पाचें विष खाणारास भयंकर दुःख प्राप्त होतें, पण विषय तर त्याकडे नुसती दृष्टि फेंकली कीं, त्यानें मनुष्यास पछाडलेंच. यासाठीं मुमुक्षूनें विषयासक्ति सोडून दिली पाहिजे.

## दशप्राण, दशइंद्रियें, पंचविषय, ह्यांचें कोष्टक.

पंच प्राणः—प्राण, अपान, व्यान, उदान, समान.

पंच उपप्राणः—नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय.

पंच कर्मेंद्रियेंः—वाचा, पाणी, पाद, शिस्न, गुद.

पंच ज्ञानेंद्रियेंः—श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण.

पंच विषयः—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध.

## ३ मनोमय कोशरूपी पटल.

सात्विक अहंकारापासून सूक्ष्म ‘ सोहंध्वनि ’ झाला. त्याचें दैवत विष्णु होय. त्याचें ज्ञानशक्तीपासून अंतःकरणपंचक उत्पन्न झालें. म्हणजे मन, बुद्धि, चित्त, अहंकार, अंतःकरण हीं होत. हें मन ‘मी व माझें’ अशी वस्तूवर कल्पना करतें. मन हेंच संसारबंधनाला कारणीभूत आहे. तें मन लयास गेलें म्हणजे सर्व प्रपंचाचा लय होतो, आणि तें वृद्धिंगत झालें असतां सकल प्रपंच उभारतो.

स्वप्नसृष्टीमध्यें मनच भोक्ता, भोग्य इत्यादि सकल जगताला, ज्याप्रमाणें उत्पन्न करतें, त्याप्रमाणें अज्ञान जागृति अवस्थेमध्यें तें मन सर्व जग प्रपंच उभारतें. स्वप्नांत व अज्ञान जागृति अवस्थेमध्यें फारसा फरक नाहीं. यासाठीं हा सर्व प्रपंच म्हणजे मनाची कल्पना आहे. जीवात्म्याला जें संसारबंधन प्राप्त झालें आहे, तें मनःकल्पित आहे, वास्तविक नाहीं. मन देहादिक सर्व विषयांवर प्रीति—ममता उत्पन्न करून, त्या प्रीतीच्या योगानें जीवात्म्याला संसारचक्राचें परिवर्तन करून, बंधांत घालतें. आणि तेंच मन विषयांवरची प्रीति सोडून वैराग्य धारण करून, हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं रंगविलें, तर जीवात्म्याला संसारबंधनांतून सोडवितें. यासाठीं मनच जीवात्म्याला संसारबंधांत बद्ध करण्यास, आणि त्यांतून मुक्त करण्यास कारण आहे. म्हणून मनुष्यानें मनाची शुद्धि केली पाहिजे. मन शुद्ध झालें असतां, मुक्ति प्राप्त होते. मनाची शुद्धि होण्यास, मनुष्य ज्या वर्णामध्यें जन्मून, आश्रम धारण केला असेल, त्याचीं वेदशास्त्रप्रतिपादित कर्मं यथासांग आचरून, ईश्वरार्पण करावींत, म्हणजे पुरुषार्थसिद्धि प्राप्त होते. आणि पुरुषार्थसिद्धीनें आत्मज्ञानाची इच्छा होते. आत्मज्ञानाचा अधिकारी साधनचतुष्टयसंपन्न असावा लागतो. सद्‌गुरूपासून आत्मज्ञान प्राप्त होऊन, मन आत्मस्वरूपीं एकरूप झालें म्हणजे अज्ञान नाहींसें होऊन, निर्विकल्प समाधि प्राप्त होते.

या मनाला आदि व अंत आहे. ह्याच्या अवस्था बदलतात. मन विकारी व दृश्य आहे. कारण देह म्हणजे अंतःकरणपंचक होय. एक वृत्ति कर्तृत्वामध्यें असतां, इतर वृत्ति शून्य असतात, हें अनुभवास येतें. यावरून अहंवृत्तीशिवाय सुषुप्तीमध्यें सर्व वृत्ति शून्य असतात. गाढ निद्रेला सुषुप्ति अवस्था म्हणतात. गाढ निद्रेच्या अवस्थेंत जीव असूनही, कोणत्याच विषयाची कामना करीत नाहीं. कोणत्याच प्रकारचें स्वप्न पहात नाहीं. वृत्तीचा द्रष्टा असल्यामुळें, सुषुप्ति अवस्थेंतून जागा झाल्यानंतर, मी सुखानें निजलों होतों, असें सांगतों. त्या सुषुप्ति अवस्थेच्या सुखाचा अनुभव घेणारा जीवात्माच असतो. म्हणून जागा झाल्यावर, सुखाचा अनुभव सांगतो. सुखाचा

अनुभव म्हणजे दुःखमय प्रपंचाच्या अभावाचा अनुभव होय. सुषुप्ति अवस्थेमध्यें दुःखमय द्वैत प्रपंच नसतो. जग देहादि प्रपंच जर सत्य असतें तर तें सुषुप्ति अवस्थेंमध्यें दिसलें असतें. ज्यापेक्षां तें दिसत नाहीं, त्यापेक्षां ते स्वप्नवत् मिथ्या आहेत. देहादिकांचे कर्तृत्वभोक्तृत्वादि सर्व धर्म अहंकाराच्या ठिकाणीं दृष्टीस पडतात, जीवात्म्याचे ठिकाणीं नाहींत. सुषुप्ति अवस्थेमध्यें जिवात्मा असतो, परंतु त्या अवस्थेमध्यें अहंकार लीन होत असल्यामुळें, सुखदुःखादि गुणधर्मांची प्रतीति होत नाहीं. पण जागृति अवस्थेमध्यें अहंकार जागा असल्यामुळें, सुखदुःखाचे विकार अनुभवास येतात. यावरून सर्व गुणधर्म अहंकारांत लीन असतात. सुषुप्ति अवस्थेंमध्यें पंचवृत्तीचा अभाव झाला तरी, आत्मत्व नाश पावत नाहीं. ‘ अहंस्फूर्ति ’ कायम असते, म्हणून कारण देह नित्य, सच्चिदानंद आत्मा होण्यास योग्य नाहीं. अज्ञानी मनुष्य सुषुप्ति अवस्थेंमध्यें लीन होणाऱ्या अंतःकरणाच्या वृत्तींना ‘ मी मी ’ असें म्हणतो, व त्याला आत्मा असें समजतो, ही त्याची मोठी चूक आहे; येथें ‘ मनोमय कोशरूपी पटल ’ दूर होतें.

## ४ विज्ञानमय कोशरूपी पटल.

शुद्ध सत्वगुणापासून ‘ अहंस्फूर्ति ’ झाली. ती जीवरूप होय. त्याला त्वंपद म्हणतात. शुद्धचैतन्यज्ञानसूर्याचें प्रतिबिंब अविद्यामायेमध्यें पडतें, त्याला जीव म्हणतात. सर्व कर्ता असून, साक्षी हा प्रत्यगात्म्याचा अभिमान जेथें लयास जातो, ती मूळची ‘ अहंस्फूर्ति ’ होय. हिला विद्वान् लोक संवेदना असेंही म्हणतात. ही अज्ञानवृत्ति तूर्यावस्थेमध्यें लय पावते. यावरून ही अहंस्फूर्ति खरी ज्ञानी नसून, उपाधिरूप, विकारी, जड, अनित्य अशी आहे, याचा मनुष्यास अनुभव येतो. ह्या अहंस्फूर्तीमुळें जीवचैतन्याला संसारबंधन प्राप्त होतें. ही अहंस्फूर्ति देह, इंद्रियें, मन इत्यादिकांचेठायीं ज्ञानरूप क्रिया करणारी ‘ मी ’ अशी आहे, असा मोठा अभिमान नेहमीं मानीत असते. ही अहंस्फूर्ति पूर्व वासनेच्या योगानें पुण्यकर्में किंवा पापकर्में मनुष्याकडून करविते. ही नानाप्रकारच्या योनीमध्यें जाऊन, वासनारूप कर्मांचीं फळें भोगीत असते. हिला जागृति, स्वप्न इत्यादिक अवस्था आहेत. ही सुखदुःखाभिमानी असून, सर्व उपभोग हिलाच होतो. हिच्यामुळें जीवात्म्याला संसारबंधन प्राप्त झालें आहे.

आत्म्याच्या ठिकाणीं जीवपणा जो कल्पिलेला आहे, त्याचें स्वरूप कल्पना होय. कल्पना होण्यास मिथ्याज्ञान कारण आहे. मिथ्याज्ञानाची निवृत्ति हृदयस्थ परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेवाच्या स्वरूपाच्या यथार्थ ज्ञानानें होते. सद्गुरुबोधानें आत्म्याचें व जीवाचें ऐक्य करून, त्यांचीं स्वरूपें समजणें हेंच यथा-

[library stamp]

र्थज्ञान होय. अहंस्फूर्ति ही शून्यब्रह्म ईश्वराशिवाय जड व अनित्य आहे, ही प्रकृतीपासून झालेली आहे म्हणून कार्यरूप आहे. ही अहंस्फूर्ति मायोपाधिक असल्यामुळें, नित्य, शुद्ध आत्मा होण्यास योग्य नाहीं. अज्ञानी मनुष्य तूर्यावस्थेमध्यें लीन होणाऱ्या अहंस्फूर्तीला 'मी मी' असें म्हणतो, व त्याला आत्मा असें मानतो, ही त्याची मोठी चूक आहे. येथें 'विज्ञानमय कोशरूपी पटल' दूर होतें.

## आनंदमय कोशरूपी पटल.

निर्गुण देहाभिमानानें मनुष्य 'अहंब्रह्म' असें शून्यास मानतो. तें शून्यब्रह्म सर्वांना जाणून राहणारें आहे. हें शून्यब्रह्म जाणिवेला जाणतें पण ती जाणीव देखील शून्यब्रह्मासह उन्मनी अवस्थेमध्यें लीन होते. हें शून्यब्रह्म सर्व जगास उत्पन्न करतें. आपणांस कळत नाहीं, हें अज्ञान ज्याला समजतें, तें शुद्धचैतन्यब्रह्म होय. हें आनंदमयकोशाचा साक्षी आहे. प्रिय, मोद, आणि प्रमोद या गुणांनीं हें शून्यब्रह्म युक्त आहे. हें शून्यब्रह्म चैतन्यब्रह्मावांचून जड आहे, हें अनुभवास येतें. यावरून मी शून्यब्रह्म नव्हे, चैतन्यब्रह्म आहें, अशी समजूत होते. हें विकारी व जड शून्यब्रह्म नित्य, शुद्ध, आत्मा होण्यास योग्य नाहीं. स्वसंवेद्य आपणच आपणाला जाणावयास योग्य असा स्वयंप्रकाश आत्मा एकच आहे. ज्ञानाभिमानी लोक उन्मनी अवस्थेमध्यें लीन होणाऱ्या अहंस्फूर्तीला, 'मी सच्चिदानंद परमात्मा आहे, परब्रह्म आहे' असें मानतात, ही त्यांची भ्रांति आहे.

कित्येक शब्दज्ञानी लोकांस संस्कृतप्राकृतादि भाषेंतील वेदांतग्रंथ व परमार्थपर ग्रंथ सुंदर वाचतां येतात, व नुसता शब्दार्थही बरोबर कळतो, आणि त्या ग्रंथांत लिहिलेलीं सिद्धांत वाक्यें चांगलीं बोलूनही दाखवितात कीं, "आत्मा सर्वत्र पूर्ण भरलेला आहे, तो पंचदेहत्रयाचा द्रष्टा आहे, पच अवस्थांचा साक्षी आहे, पंचकोशातीत आहे, पंचाभिमानातीत आहे, पंचवाचातीत आहे, पंचगुणातीत आहे, पंचानंदातीत आहे, सच्चिदानंदरूप, परब्रह्म, परमात्मा आहे" इत्यादि ठरीव सिद्धांत वाक्यें श्रुतिस्मृति शास्त्रसंमत बोलतात. तरी तत्ववेत्त्या सद्गुरुच्या मुखानें वेदांतशास्त्राचें व महावाक्याचें रहस्य अनुभवयुक्त जाणल्याशिवाय, आणि पंचदेहांतली चिदाचिद्ग्रंथि तुटल्याशिवाय, हृदयस्थ परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपाची प्राप्ति मुळींच होणार नाहीं, व जीव जन्ममरणापासून मुक्त होणार नाहीं; तत्त्ववेत्त्या सद्गुरूच्या अनुग्रहावांचून केवळ आपल्या स्वतःच्या विशाल बुद्धीनें व तर्कविचारानें आत्म्याचा साक्षात् अपरोक्षबोध मुळींच होऊं शकत नाहीं.

मायेस होईल कल्पांत । अथवा देहास होईल अंत ॥
ते काळीं पावेन निवांत । परब्रह्म मी ॥ १ ॥
हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान ॥
समाधानाचें लक्षण । वेगळेंच असे ॥ २ ॥ श्रीसमर्थ.

विश्वाची नामरूप प्राप्त होण्यापूर्वींची बीजभूत अव्याकृत स्थिति असते तिला ब्रह्मकल्पांत ह्मणतात. येथें सर्व कार्यकारणशक्तीचा समाहार होतो. इतर सृष्टींतील लोक जसे स्वकृत कर्माकर्मानुसार उत्पन्न होतात, तसें हें 'अहंब्रह्मास्मि' ब्रह्म उत्पन्न झालेलें नाहीं, तर तें स्वतंत्रपणें व स्वेच्छेनें अभिव्यक्त होतें. सर्व लोक त्याला सकलाचें ' परमधाम ' समजतात. ह्याचें ठिकाणीं समग्र विश्व समाविष्ट होतें. वेदवेत्ते याला सत्य, अनंत, परब्रह्म, परमात्मा, ध्रुव व सच्चिदानंद असें ह्मणतात.

महाकल्पाचे वेळीं म्हणजे दृश्यादृश्य जग उत्पन्न होण्यापूर्वीं, सर्व जीव आपापल्या वासनायुक्त कामना घेऊन अव्यक्त ब्रह्मस्वरूपामध्यें लीन होतात. परंतु ते निष्काम होऊन, भगवंताला अनन्यभावें शरण जाऊन, त्याची भक्ति करीत नाहींत, यामुळें त्यांची जन्ममरणरूप संसारनिवृत्ति होत नाहीं.

हे पंचकोशरूपी देह मूळचे जड स्वभावाचे व विकारी आहेत. ते स्वतः पदार्थरूप होत नाहींत. जड पदार्थांना चांचल्यभाव चैतन्यरूप वस्तुसान्निध्यानें प्राप्त होतो.

## आत्मज्ञान विचार.

थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे ॥
जै जगा धाकुटें होइजे । तैं जवळिक माझी ॥ ज्ञानेश्वरी.

मनुष्याच्या अंधदृष्टीच्या पांच पटलांची ओळख, ह्या आत्मदर्शनाच्या आरसारूपी आत्मज्ञानानें होते. कित्येक अद्वैतज्ञानी पांच देहातीत वस्तु आहे, असा तर्क करतात. पण तें समजणें अनुभवशून्य असतें. आतां यापुढें मनुष्याची ज्ञानदृष्टि उघडण्यास, त्यानें हृदयस्थ परब्रह्म-आत्माराम-श्रीवासुदेवाचा अवतार जो, सांप्रदायिक तत्ववेत्ता सद्गुरु चैतन्यनाथ, यास अनन्यभावें शरण गेलें पाहिजे. येथपर्यंत वेदशास्त्रांतील परमावधीच्या उदात्त विचारांची, व सर्व धर्मशास्त्रांतील प्रमेयांची मर्यादा संपली. शाखाचंद्रन्यायें श्रुति बोलल्या.

मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपुरु ॥
म्हणऊनि विशेषें अत्यादरू । विवेकावरी ॥ ज्ञानेश्वरी ॥

* * * *

प्रतिमा निजकल्पना उत्तम । संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम ॥
चालतें बोलतें परब्रम्ह । अति उत्तम साधुसेवा ॥ नाथभागवत ॥

चैतन्यब्रम्हरूपी मनुष्यानें सद्गुरूची गांठ पडण्यासाठीं निष्काम कर्में, व

भगवंताची उपासना केली पाहिजे. सद्गुरूचा सच्छिष्य बनण्यास साधन-चतुष्टयसंपन्नता असावी लागते. सच्छिष्यानें दारेषणा, पुत्रेषणा, वित्तेषणा, लोकेषणा, कर्मेषणा व देहेषणा, हीं सर्व दोषदर्शनें त्यागून, ब्रम्हवेत्त्या सद्गुरूला शरण जावें आणि त्यांच्यापासून ज्ञानदृष्टि प्राप्त होण्यासाठीं, 'गुरुः साक्षात् परब्रह्म' अशा भावनेनें सेवा करावी. त्यांचेकडून ब्रह्मदीक्षा घ्यावी. साधनचतुष्टयसंपन्न शिष्याला सांप्रदायिक आत्मवेत्ता सद्गुरु यथाविधि हृदयस्थ परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेवाची उपासना देतो. शिष्याचे मस्तकावर वरदहस्त ठेवून, कानांत तारक महामंत्र सांगतो.

सर्व सुखाचा आराम । निजहृदयीं आत्माराम ॥
सर्वदा असे सम । भजावें सप्रेमें ते ठायीं ॥ नाथभागवत

* * * *

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ॥
अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ॥ श्रीसमर्थ

सद्गुरु शिष्याला सद्रूप, चिद्रूप आणि आनंदरूप आत्मा तूं आहेस, असें महावाक्याच्या बोधाचें सार सांगतात. आत्मारामाचें हृदयमंदिर दाखवितात. सद्गुरुपद दाखवितात. सद्गुरुपादसेवनानें शिष्याचा मनोजय तत्काळ होतो. त्यांच्या बोधानें लिंगदेहांतून चिदचिद्ग्रंथि तुटते. लिंगदेह म्हणजे सजीव तत्वाचें सूक्ष्म बीज होय. लिंगदेहामध्यें जीवनवेगानें संबद्ध झालेलीं अव्यक्त द्रव्यतत्वें असतात. ग्रंथी तुटल्यानें अंधदृष्टीचें पटल नाहींसें होऊन, दिव्य ज्ञानदृष्टि प्राप्त होते. सद्गुरुबोधानें शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती, व आत्मप्रतीति ह्यांचें ऐक्य होतें. सद्गुरु पांच देहांचा अंत दाखवून, मायेची उत्पत्ति दाखवितात. ज्या आत्मस्वरूपाच्या अज्ञानानें अहं (मी) इदं (हें) वृत्तिरूपी द्वैताची उत्पत्ति होते, त्या द्वैताचा नाश, आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें कसा होतो, तें सांगतात. जीवात्म्याला आत्मारामीं मिळवून ज्ञानोत्तर भक्तीला लावतात.

(अपूर्ण.)

---

## भक्तिमणिमाला

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय [illegible] र्वमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें अमृत-मधुर वाणीनें [illegible]स सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतातील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांना कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवतातील श्लोकांबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविवचनांचाही यांत समावेश केल्यामुळें ही माला मराठी ग्रंथ या दृष्टीनें केवळ अद्वितीय झाली आहे पृ. सं. २५०, किं. रु. १॥.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता.

## पद १.

तुम्ही पूजित जा जगदंबा ॥ ध्रु० ॥ अंबुरुहासिनी शंभुविलासिनी । हेंच मनीं अवलंबा ॥ १ ॥ गिरिवर विंध्यशिरोनिवासिनी नाशिल मोहकदंबा ॥२॥ काय उणें मग या भुवनत्रयीं । अंगणीं नाचल रंभा ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे गुज । लाउं नका जी विलंबा ॥ ४ ॥

## पद २.

जयदेवी नमो तुज अंबे वो जयदेवी नमो तुज अंबे ॥ ध्रु० ॥ विंध्यनिवासिनी । बंधविनाशिनी । पृथुतर दिव्य नितंबे हो ॥ १ ॥ जय गजगामिनी । शंकरभामिनी । आनंदित शशिबिंबे हो ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर साधकहृदयीं । ध्यान तुझें न विसंबे हो ॥ ३ ॥

## पद ३. श्लोक-भ्रमरअंबिकेचे.

घारेश्वरावरिल तुंदिल वंदिला हो । राहोनि त्या स्थळिं पुरंदर निंदिला हो । त्यानंतरें जननिची तिल चंदलाहो । जीचा पदाब्जरज घेति मिलिंदलाहो ॥१॥ श्रीदेवतांगीं समीपचि भ्रामरी जी । जे वर्णिली सकल आगम डामरी जी । जेथें सदैव चरती वनचामरी जी । भिल्लांसवें मधु पिती बहु पामरी जी ॥ २ ॥ आबालई करुनि वंदन मज्जनासी । आरंभि जो गिरिसुतापदपूजनासी । दुर्गा दया करुनि उद्धरि सज्जनासी । दे शांतिमोक्षफळ तें भवबीज नासी ॥ ३ ॥ श्रीशारदा कमळजा आणि कालिका हे । देवी उपांगललिता हरितालिका हे । शाकंवरी त्रिपुरसुंदरि अंबिका हे । येका प्रसन्नवरदा कविं त्रिबका हे ॥ ४ ॥ हेमाद्रिपंत करि पूजन रामभूप । यात्रेस लोक मिळती स्तविती अमूप । चांडाल ताम्रमुख तें निरयांधकूपतत्वेंदेखोनिया जननि राहिलि गुप्तरूप ॥ ५ ॥ ज्या भांगसीवरि असे शिवभक्तवेदशागा । लिंगार्चनीं रत सदा परमार्थी जागा । गंगा वदे त्वरित दर्शन देइ कां गोदा येऊनिया मजमधें भिजवी निजांगा ॥६॥ त्या भांगसी जवळ सुंदर तीसगांव । राहूनि त्या स्थळीं महेशसतीस गाव ॥ द्वारापुढें परम जागृत मारुती हो । त्यालागिं तो करि रघूत्तम आरती हो ॥ ७ ॥ जेथें रसाळ तरु शोभति कल्पवृक्ष । वृक्षांवरी द्विजकुळास फळींच लक्ष । श्रीयाज्ञवल्क्यमुनिसंभव फार दक्ष । देखोनि स्वार्थ बुडती नसतांचि पक्ष ॥ ८ ॥ जेथें प्रयागवटसाम्य असे त्रिवेणी । पाणी पिती वसति आखरि व्याघ्रवेणी । स्नानें करूनि वनितासि अभंगवेणी । श्रीशंभु देत मनुजास भुजंग लेणीं ॥९॥ केदार-

लिंग वसतें बदरीवनीं जी। ते धन्य भूमि म्हणवि अति पावनी जी। जे पत्रपुष्प फळ अर्पिति जीवनासी। त्या आविवेक महेश्वर जीवनासी॥ १०॥ वैशाखमासिं करि सद्गुरु पूजनासी। जिंकील तो रणिं समस्त रिपूजनांसी। पाचारुनी द्विज मुनीश्वर भोजनासी। तो पूर्णकाम यमकीं करि भोजनासी॥ ११॥ आख्यान हें सकल पद्मपुराणिचें जी। श्रीमध्वनाथ कवि वर्णि भवानिचें जी। सारांश तो गुरुमुखें बरवा विचारा। बाळास तें घुसळुनी नवनीत चारा॥ १२॥

## ४. श्लोक हरशुलेश्वराचे.

मंगलाचरणिं मंगलमूर्ति। वंदिला सकल पंडित धूर्तीं। तो दयाळु मज देउनि स्फूर्ति। वाढवूं भजन आवडिपूर्ति॥ १॥ बांधुनी कनक पिंग जटा कीं। उग्र शूल असुरांवरि टाकी। भेटतो सगुण......॥ २॥ तो गजासुर वधी शशिमौळी। येत डुल्लत कसा हरशूळीं। शुद्ध नीर कपिला शुभ कूळीं। शूल रोवुनि वसे वटमूळीं॥ ३॥ तीर्थभूमि भुवनातळिं शुद्धा। पुण्यदायक पुराणप्रसिद्धा। शैल जे सकपिला अविरुद्धा। मान्य जे विधि शिवा अनिरुद्धा॥४॥ चंद्र सूर्य वसती निजकुंडीं। स्नानकाळिं पडीत मुखंडी। रामकृष्ण वदती जन तुंडीं। त्यांसि मुक्तिवनिता मग धुंडी॥ ५॥ दर्शनें स्तविति श्रीहरसाही। त्याच तीर्थें वसते हरसाई। सेवकांसि करि शीतल साई। जीस पूजित असे जलशाई॥ ६॥ देव सुंदर तेहतिस कोटी। गुप्तरूप वसती क्षितिपोटीं। ज्यावरी हरि कृपा करि मोठी। त्या नरासि तरि या स्थळिं लोटी॥ ७॥ उत्तराभिमुख मारुति जेथें। सर्वदा विजय मंगल तेथें। जानकीसहित राघव येथें। नांदतो ह्मणुनि सद्गति देते॥ ८॥ ज्येष्ठ बंधु वसतो गळनिंबा। हा कनिष्ट हृदयीं न विसंबा। लोक हो तुह्मि त्यजूनि विलंबा। शूळपाणि हर हा अवलंबा॥ ९॥ रामतीर्थ वसते अजि सीता। तेचि जन्हुतनया मुनिगीता। लोकहो जरि इचें जळ पीतां। कासया रविसुता मग भीता॥१०॥ नित्य राहि मनुजा हरशूळीं। बांधिमुक्ति वधुला गरसोळी। पातकें जळनि होइल होळी। चित्रगुप्त नयना मग चोळी॥ ११॥ जो महेश्वर मनोहर शूळी। उद्धरील जन तो हरशूळीं। बाणलिंग ह्मणवी शशिमौळी। त्यासि बांधित मुनीश्वर कैली॥ १२॥ येक ते ह्मणविती अतिरात्रीं। काळरात्रि भजती नवरात्रीं। मुख्य वैष्णव जगीं शररात्रीं। मध्वनाथ करि तो शिवरात्रीं॥ १३॥

## ५. श्लोक मोहरकटाचें.

नमस्कार केला मुनि एकदंता। तया नंतरें सद्गुरु साधुसंता। जया नावडे लेशही ते अहंता। ह्मणोनी मुनी वंदितो त्या महंता॥ १॥ रतीचा पती जीववीला तयानें। तिची राखिली संकटीं लाज यानें। स्वभक्तांसि जो देता राज्ययानें। करावें जनस्थानिचें राज्य यानें॥ २॥ जनस्थानिचा देव तोषी जगासी

झुगारूनि दे मोदकाच्या ढिगासी । स्वयें उद्धरी जो खगांसी मृगांसी । मना मुक्त होसी जरी त्यास गासी ॥ ३ ॥ गणाधीश जो हा भृगुक्षेत्रवासी । मनातीत तो सर्व विघ्नें विनाशी । स्वभक्तासि जो देतसे जीवरासी । करी मुक्त संसारिचा जीवरासी ॥ ४ ॥ युगें लोटिलीं आणिला तो घरासी । पुन्हा आजि सांभाळित... । जया चिंतितो देव कैलासवासी । पहा दारणेच्या तटीं चिद्विलासी ॥ ५ ॥ पहा गौतमीच्या तटीं मोरयासी । कसें शोभतें आसन मोर यासी सदा चिंतिती थोर यासी । ह्मणोनी भजा त्या सख्या सोयऱ्यासी ॥ ६ ॥ भजा रे भजा मूर्ति चिंतामणीची । त्यजारे त्यजा व्यर्थ चिंता मनींची । क्षुधा बाप हा मुख्य गोवर्धनीची । दयापूर्ण होइल त्या स्वर्धुनीची ॥७॥ फिरे नित्य बैसोनिया नीळकंठीं । सुखें त्रिस्थळीमाजि त्या काळ कंठी । करी साखळ्या शोभते माळ कंठीं । कवी त्यापुढें नाचतो वाळवंटीं ॥ ८ ॥ जरी जन्मले लोक हे या कलींत । तरी फार होती सुखी त्रिस्थळींत । भवाब्धीस घेऊनीयां अंजुळींत । पिती मान्य होतील मुक्तावळींत ॥ ९ ॥ गणेशासि वाहीन गंगाजळासी । समर्पीन सिंदुर दुर्वादळासी । तयाला उणें काय त्या मंगळासी । ह्मणे नाथ तो मान्य भूमंडळासी ॥ १० ॥ मध्वनाथ कवि सादर वर्णी । आयको कपिल सर्वहि कर्णी । ज्यासि आवडि बहू शमिपर्णी । तो कृपा करूं सुधाकरवर्णी ॥ ११ ॥

## पद ६ वें. भोगुरक्षेत्रवर्णन.

क्षेत्र भृगूचें भोगुर । पाहतां विघ्नें होती दूर ॥ १ ॥ कोलेश्वर भगवंता । नरहरि हनुमंता ॥ २ ॥ अंबा भैरव खंडेराव । तिहीं वसविला ठाव ॥ ३ ॥ मुख्य चिंतामणीचें स्थान । पाहतां होतें समाधान ॥ ४ ॥ जेथें वाहे भार्गव गंगा । स्नानें उद्धरिते जगा ॥ ५ ॥ माघ शुद्ध चतुर्थीस । पुजूं मंगळमूर्तीस ॥ ६ ॥ दारणेचा पाणवठा । भावें भजूं गणनाथा ॥ ७ ॥ शमी शेंदूर दुर्वा वहा । मूर्ति मोरयाची पहा ॥ ८ ॥ यारे जनहो ह्मणोनि काढूं । माझ्या सिद्धोबाचे लाडू ॥ ९ ॥ हे तो अभिनव झाली गोष्टी । भक्ति विचारावी पोटीं १० कलियुगीं कौतुक पहा । हात जोडुनि उभे रहा ॥ ११ ॥ ह्मणे मध्वनाथमुनी । मूर्ति सांपडली जुनी ॥ १२ ॥

## पद ७.

कृपा केली विनायकें । भुक्ति मुक्ति प्रदायकें ॥ १ ॥
देव कृपाळू कृपाळू । करी भक्तप्रतिपाळू ॥ २ ॥
पहा जन हो चमत्कार । कलियुगीं साक्षात्कार ॥ ३ ॥
दिव्य मोदकांच्या खाणी । दावी मज परशुपाणी ॥ ४ ॥
प्रगट गोवर्धनीं शुद्ध । जनस्थानीं तें प्रसिद्ध ॥ ५ ॥
मोहत्कट देव विकट । त्यानें दाखविल्या निकट ॥ ६ ॥

सोडुनि विकल्पाच्या गांठीं । पहा दारणेच्या कांठीं ॥ ७ ॥
विनायक उपासकीं ।गोष्ट शोधावी नासिकीं ॥ ८ ॥
सिद्धभूमी गंगातिरीं । प्रगट केल्या मुनीश्वरीं ॥ ९ ॥
उपळ मोटका सारिखें । कोण्या तीर्थीं आहे निके ॥ १० ॥
ऐसे दाखवी जो कोणी । त्याचे चरण वंदिन दोन्ही ॥ ११ ॥
म्हणे मध्वनाथयोगी । शर्त केली कलियुगीं ॥ १२॥

## कवन ८.

गंगातीरीं गोवर्धन । मुख्य काण्णवाचें स्थान ॥ १ ॥
ब्यासि क्षुधा बा प्रसन्न । दिलें त्यासी दिव्यान्न ॥ २ ॥
आतां हिंडावें तें कोणें । धूर्त पापी मुक्त होणें ॥ ३ ॥
उत्तर तीरीं जमदग्नी । जैसा प्रज्वलित अग्नी ॥ ४ ॥
त्याचें दैवत परशुपाणी । तेथें मोदकांची खाणी ॥ ५ ॥
शुद्ध मोदकांची भूमी । पहा कश्यपासंगमी ॥ ६ ॥
माघशुद्ध चतुर्थीस । पूजूं मंगळमूर्तीस ॥ ७ ॥
रात्रीं करूं जाग्रण । कथाकीर्तन पुराण ॥ ८ ॥
जाळी मानस मळीनें । ऐसें केले या कळीनें ॥ ९ ॥
सिद्ध लाडू खणोनि काढूं । दांत कळिकाळाचे पाडूं ॥ १० ॥
आपुलीं सर्वस्वेंहीं वेचूं । तोंडें नास्तिकांचीं ठेंचूं ॥ ११ ॥
छत्र मोरयावरी धरूं । सुखें सामराज्य करूं ॥ १२ ॥
म्हणे मध्वनाथकवी । येथें यात्रा भरीतो नवी १३ ॥

## पद ९. नृसिंहाचीं पदें.

जय जय जय जय नरसिंहा । संशय माझा निरसी हा ॥ करुणामृतरस वरसी हा । मग्न करी जीव समरसीं हा ॥ १ ॥ सखया लक्ष्मीरमणारे । किती तरी करूं मी भ्रमणारे ॥ करितों नामस्मरणारे । चुकवी जन्ममरणारे ॥ २ ॥ हिरण्यकशिपु उदरा तूं । दारिसी पूर्ण उदारा तूं । मध्वमुनीश्वरवरदा तूं । राखी आपुल्या बिरुदा तूं ॥ ३ ॥

## पद १०

श्रीशामराजा तूं स्वामि माझा ॥ ध्रु० ॥ श्रीनीलकंठा जय व्योमकेशा । स्तंभी प्रगट होसी नरसिंह वेशा ॥ १ ॥ सत्यज्ञानस्वरूपा लक्ष्मीनिवासा । क्षीरसागरमध्यें स्थळाचिद्विलासा ॥ २ ॥ प्रल्हाद वरदा भवबंधनाशा । मध्वनाथ विनवी करी पूर्ण आशा ॥ ३ ॥

## पद ११.

वेगीं शामराज दीनबंधु । पावला कैवल्यसिंधु ॥ ध्रु० ॥
कडकड स्तंभीं प्रगट होतां । त्रैलोक्यीं आक्रंद ॥ १ ॥
हिरण्यकश्यपु वधुनी त्याचा । छेदिला भवबंध ॥ २ ॥
प्रसन्न होउनी प्रल्हादाला । दिधला परमानंद ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर महिमा त्याचा । गातो हे स्वच्छंद ॥ ४ ॥

## पद १२.

पावलारे महाराज सिंहानन । उग्ररूप देखुनी दचकला महेशान ॥ ध्रु० ॥ कडकडाट प्रगटला । दुष्ट दैत्य निवटिला । भक्तवत्सल भेटला । मोहछाव वाटला ॥ १ ॥ नखीं चंद्रकोटी तेज । पीतपटीं चमके वीज । चक्रपाणि चतुर्भुज । रक्षी प्रल्हादाचें गुज ॥ २ ॥ देव करिती पुष्पवृष्टि । ब्रह्मानंदें कोंदे सृष्टि । नरोबाची कृपा दृष्टी । जाल्या, कोणी नाहीं कष्टी ॥ ३ ॥ ज्याचें नांव लक्ष्मीकांत । निजरूप धरी शांत । मध्वनाथा विश्रांत । दिली निरसली भ्रांत ॥ ४ ॥

## पद १३.

जय जय नरहरि रायारे । आरत तुझिया पांया रे ॥ ध्रु० ॥ नांदसी श्रीमणिपर्वतीं । जेथें मुनिजन मिरविती । पद्मतीर्थाचे कांठीं । प्रगटसी श्रीरुचिकासाठीं ॥ १ ॥ मध्यगोदेच्या बेटीं । येती सनकादिक भेटी । काश्यप गोत्रींची सेवा । सदैव घेसी तूं देवा ॥ २ ॥ प्रसन्न विश्वेश्वर झाला । घेउनि गदाधरा आला । श्रीशिवानंदासंगमीं । पूजुन झालों असंग मी ॥ ३ ॥ सिद्धेश्वर नागेशा । अवघा आपण विश्वेशा । विश्वेशावरि फणिवर । देखिला म्या धरणीधर ॥ ४ ॥ एकादशीच्या दिवशीं । दर्शन झालें सर्वांसी । दोन प्रहरपर्यंत । बसला होता अनंत ॥ ५ ॥ कीर्तन ऐकुनिया गेला । पूर्ण अनुग्रह केला । छत्र देवावरी धरितों । प्रसाद देऊनी उद्धरितों ॥ ६ ॥ मध्वनाथीं सामराज । करील विश्वेश्वर आजि ॥ ७ ॥

## पद १४. रामजन्माचीं पदें.

अवतरला रघुपति जैं । आनंदली वसुधा तैं । गंधर्ववनिता मध्यान्हसमयीं । मंगल घोषें थैं थैं ॥ १ ॥ याचक वांछावल्या । साफल्या त्या फुलल्या । प्रसूत झाल्या श्री कौसल्या । सरिता वाहती अमृततुल्या ॥ २ ॥ क्षीराब्धिसम वाडे । सुर तरूचीं फुलझाडें । अंगणीं कुंकुमकेशर सडे । गुढिया मखरें चहूंकडे ॥ ३ ॥ वाजंत्र्यांचे जोडे । वाजती द्वारापुढें ॥ अरुंधती बाळंतिणीकडे । वाटितसे बोळविडे ॥ ४ ॥ पाहुनी राममुख । राजा पावे सुख । जयजयकारें

ब्रह्मादिक । गर्जती, त्रिभुवनीं कोंदला हरिख ॥ ५ ॥ ऋषीशृंगा कारणें । पूजूनिया सन्मानें । गजरथ तुरंगादिक गोदानें । राजा वाटी समाधानें ॥ ६ ॥ देवाधर्मासाठीं । येवढी करणें आटाटी । मुक्तिच्या मस्तकीं देऊनी पाटी । मध्वमुनीश्वर साखर वाटी ॥ ७ ॥

## पद १५.

पाहूं चला सावळा रामडोळा । समाधानें बोलती बारसोळा । रत्नताटीं हातवेदीपमाला । घेउनी बुंथी चालती चमकत बाळा ॥ वो ॥ १ ॥ कृष्णावेणी चंद्रभागा भीमरथी । ताम्रपर्णी नर्मदा सरस्वती । गंगा यमुना तापी शरयू भागीरथी । या हेलकरणी सुगंधें पाणी भरिती ॥ वो ॥ २ ॥ वाजत गाजत मिरवत आल्या राजद्वारा । म्हणती कौसल्या तूं धन्य राजराजदारारा । अंकीं खेळविसी धणीवरी जगदाधारा । पायावरी न्हाणसी दीनोद्धारा ॥ वो ॥३॥ करतळकमळें कोमळ जावळ कुरवाळिसी । अंजन घालुनी निरंजना न्याहाळिसी । जांभई देतां चुंबन चुटकें चाळविसी । शतंजीव शिंकतां आळवीसी ॥ वो ॥ ४ ॥ क्षीराब्धीचा जावाई श्रीवर भूप । नित्य पाजिसी दूध तूप । पाळण्यांत निजविसी सुखरूप । स्तन्य पाजुनी लुटिसी सुख अमूप ॥ वो ॥५॥ म्हणती भाग्याचा होईल सूर्यवंशीं । परमात्मा अवतरला पूर्ण अंशीं । सनकादिक वंदिजे परमहंसीं । म्हणती कौसल्ये तूं माउली पोट हिवसी ॥ वो ॥ ६ ॥ रामजन्म ऐकुनी रावण रात्रीं कष्टी । सुरवर विमानींहुनी करिती पुष्पवृष्टी । ब्रह्मानंदें कोंदली अवघी सृष्टि । मध्वनाथास पाहिलें कृपादृष्टि ॥ वो ॥ ७ ॥

## पद १६.

दशरथाघरीं आनंद होताहे भारी ॥ ध्रु० ॥ नानावाद्यें वाजतातीं । नृत्यांगना नाचतातीं । सप्तस्वरें आळविती । थैय्यमानें तालधारी ॥ १ ॥ चैत्रमासीं गुणराशी । रामनवमीचे दिसीं । मध्वनाथ म्हणे माझा । प्रगटला सहकारी ॥२॥

## पद १७.

दशरथराजके द्वारे । तालपर वाबज ढोल बजंतर बाजत धो धो नगारे॥१॥ चंग उपांग रबाब मनोहर । करणे भेरी तुतारे ॥ २ ॥ कंचनी रामजनी नट धुडी । ठाकुर आये है रे ॥ ३ ॥ अंदर महलमे गावत तरुणी । शंकर मानस प्यारे ॥ ४ ॥ कहत है माधौनाथ गुसाई । राघोजी बलिहारे ॥ ५ ॥

## पद १८. रामाचा रात्रवर्ग.

शैव शाक्त आगमोक्त मोहबीज वर्जिती । ब्रम्हनिष्ठ अग्निहोत्री काम्यधर्म वर्जिती । रात्रिवर्ग तो ह्मणोनि रामचंद्र अर्जिती । गौतमादि वामदेव सामवेद गर्जती ॥१॥ दुष्ट दैत्य राक्षसास रामचंद्र शिक्षिता । भूतपूतनादिकांस काळरूपी

भक्षिता । शुद्ध सात्विकासि राम सर्वकाळ रक्षिता । त्यास व्यास वाल्मिकादि देलि मंत्र अक्षता ॥ २ ॥ इंद्रचंद्रमाविरंचि पंचमीस सेविती । पंच कोश वंचुनी सुधारसास जेविती । जन्ममृत्यु सांडुनी अखंडरूप नीवती । ते असो प्रसन्न मायलेंकरांसि जीवती ॥ ३ ॥ इष्ट कामदायिनी अरिष्ट सर्व नाशिनी । षष्ठि देवता वरिष्ट पूजिती सुवासिनी । गाति नारदादि सिद्ध शारदादि कामिनी । धन्य आजि रामजन्म पुण्यरूप यामिनी ॥ ४ ॥ धन्यधन्य सूर्यवंश पुण्यवंत दंपती । बारसें करून नाम राम ठेवि भूपती ॥ रामचंद्र देखतांचि कोटि काम लोपती । रावणास प्राणनाश सर्व देव कोपती ॥ ५ ॥ ब्रह्मपुत्र श्रीवसिष्ट शिष्ट सर्व हर्षती । कौशिकासि पुष्टि फार पुष्पभार वर्षती ॥ दुष्ट दैत्य कष्टताति तुष्ट होति दिक्पती । मध्वनाथरामदास नाचताति जुत्पती ॥ ६ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष ऐक्यता सुलक्षणा । शंखचक्र शेष विष्णु साम्य राम लक्ष्मणा ॥ सद्गुरूस पूजुनी करूनिया प्रदक्षिणा । मध्वनाथ वांटितो सुवर्णपुष्प दक्षिणा ॥ ७ ॥

## पद १९. रामाचे पाळणे.

येगे येगे गाई येगे येगे गाई । माझ्या रामाला दुध देई ॥ बहू नवसाची हे सामाई । माझी रामाबाई ॥ १ ॥ भरत सुलक्षण सुंदर लक्ष्मण । शत्रुघ्नासम पाहीं । बहुत गुणाची धार्जिणि आली ॥ घेउनि ती गे बाई ॥ २ ॥ भक्तजनाची शीतळ छाई । ह्मणवीते जलशायी । सुरवर किन्नर विधि हर तुंबर । लागती जीचे पायीं ॥ ३ ॥ अगणित गुण वर्णु मी काई । इजला उपमा नाहीं । मध्वमुनीश्वर म्हणतो याला । आहेत चौघे गाही ॥ ४ ॥

## पद २०.

जय जय दीनदयाळा । निज बाळा ॥ जो जो ॥ ध्रु० ॥ रत्नजडित मुगुट जाण । त्याला जडिलें पिंपळपान । त्यासि देखुनी चंद्रसूर्य लाजो ॥ १ ॥ वनमाला वैजयंती ॥ वाहिली जे भाग्यवंतीं ॥ तेथें जीवती वाघनखें साजो ॥ २ ॥ ( निज बाळा ) ॥ करारविंदे पदारविंदा । मुखारविंदीं घालितां । चरणी बाळे वांकी रुणझुण वाजो ॥ ३ ॥ सत्रावी जे कामधेनु ॥ तिचा महिमा काय वानूं । तेचि येउनि बाळा दुध पाजो ॥ ४ ॥ मध्वनाथां आळवीतें । पाळणा मी हलवीते । पतितपावन बिरुदावलि साजो ॥ ५ ॥

## पद २१.

राघोबाच्या मुखा । कौसल्या देते मुका ॥ अमृताचा रस फिका । रामकथा रस निका ॥ बाळबोध करुनी टीका । व्यास पढवीतो शुका ॥ १ ॥ लेंकुरवाळी आळवीते । जावळासी कुरवाळिते । मध्वनाथ म्हणे तिच्या । पार नाहीं सुखा ॥ २ ॥

## पद २२.

माझें अचडें बचडें छकडें वो ॥ ध्रु० ॥ विकसितपंकजलोचन त्याला । जननी ह्मणते चिपडें वो ॥ १ ॥ त्रिभुवनपाळा बाळा त्याचें । पांघरवी जें लुगडें वो ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं । ब्रह्मसनातन उघडें वो ॥ ३ ॥

## पद २३.

माझें अचडें बचडें छकडें वो ॥ ध्रु० ॥ करकमलानें उचलुनी परवडी । दशरथ चुंबी मुखडें वो ॥ १ ॥ अंगणीं रांगत मंजुळ बोलत । शिव पदकीचें ठिकडें वो ॥२॥ मध्वमुनीश्वर स्वामिस म्हणतो । माझें सोन्याचें तें तुकडें वो॥३॥

## पद २४. रामाची बाळ-लीला.

ब्रह्मविशोक तूं रोदन सांडी । बाळा पद्मनाभा कौतुक मांडी ॥ धन्य सुईण ते नाळ जे खांडी । राघोबा आवडी माझी वेडी ॥ हेचि कौसल्येची असोशि फेडीं रे ॥ १ ॥ तुज मोगरेल लावुनी न्हाणी । वर घालिते उन्हून पाणी । देते आशीर्वाद पंकजपाणी । रे राघोबा ॥ २ ॥ तुझे रुपाचें स्वरूप ध्यात्रें । तुज अनंगासी न्हाणुनी भात्रें ॥ घुगऱ्या वाटुनी ठेविलें नांव । रे राघोबा ॥ ३ ॥ शेषशयनावरी शोभे उशी । ब्रह्मा जन्मला तुझिये कुशीं । त्या तुझें बाळंत्यानें जावळ पुसी । रे राघोबा ॥ ४ ॥ दोन्ही चुरचुरा चोखिसी मुष्टी । तुज उगाळुनी पाजिते घुटी ॥ गरला न गिळितां हाणी ओष्ठपुटीं । रे राघोबा ॥५॥ तुझी संध्याकाळीं उतरिता दिठी । जिवाशिवासी पडते मिठी ॥ निज पाळण्यांत टाळ्या पिटी । रे राघोबा ॥ ६ ॥ क्षीरसागरीं रमसी अहर्निशीं ॥ दुग्ध कापिलेचें सिंपीभरि पिशी । निज साउलीस देखुनि भिशी । रे राघोबा ॥ ७ ॥ ब्रह्म त्रिभुवन व्यापक तूंचि । तुझी चंद्रसूर्यास न कळे उंची । त्या तुज लेववितें पेहरण कुंची । रे राघोबा ॥ ८ ॥ नखें आरक्त माणिकाची साथ । वदनीं झळकती हिरकण्या दांत । ध्यातो मध्वनाथ हृदयांत । रे राघोबा ॥ ९ ॥ तुझ्या वदना भाळला इंदु । काजळ लेववुनी भाळीं लावीं बिंदु । झणीं दिठीं लागे करुणासिंधु । रे राघोबा ॥ १० ॥ देते कालवुनी साकरेची फेणी । जावळ विंचरुनी घालिते वेणी । परोपरीचीं लेववितें लेणीं । रे राघोबा ॥११॥ जरी टोपीस पिंपळपान । वरी मोतियाची जाळी जाण । बाळा लेववितें टोंचुन कान । रे राघोबा ॥१२॥ जीवती वाघनखें रुळती माळे । चरणीं वाजती वाकी वाळे । भिंती धरुनी फेगडे चाले । रे राघोबा ॥१३॥ करीं बिंदली मनगट्या । माजी कडदोऱ्यासी बांधिते पेट्या । विश्वजनकासी म्हणते बेट्या । रे राघोबा ॥ १४ ॥ गोड बोबडे मंजुळ बोले । रूप पाहतां निवती डोळे । ध्येय योगियांचें बाजेवरी लोळे । रे राघोबा ॥ १५ ॥ बोल बोलसी मंजुलवाणें । तुझें

हांसणें राजसवाणें। तुझ्या कडदोऱ्याची देतसे वाण। रे राघोबा ॥ १६ ॥ करितां अवगुण मारील छडया। जन्मुनी देवांच्या तोडिल्या बिडया॥ त्या तुज सर्वज्ञास म्हणते वेडया ॥ रे राघोबा ॥ १७ ॥ जरी फडकी पांघरवून। निज कडेवरी तुज घेऊन। घेते प्रातःकाळीं अंगणांत ऊन्ह। रे राघोबा ॥ १८ ॥ जाणें मध्वनाथ अनुभवसुखा॥ वेद वानितां होतसे मुका॥ त्या तुझ्या सोगाईचा घेतसे मुका। रे राघोबा ॥ १९ ॥

## पद २५.

राजीव नेत्रारे। रामा ॥ ध्रु० ॥ मंदस्मितमुखपंकज राजसा। कोमलगात्रारे ॥ १ ॥ दशशतरतिपति मोहनरूपा सज्जनमित्रारे ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर गाई चरित्रा। पावनमंत्रारे ॥ ३ ॥

## पद २६.

रत्नजडित सिंहासनीं। राम देखिला नयनीं ॥ ध्रु० ॥
पाहतां श्रीरामाचें मुख। उणें समाधीचें सुख ॥ १ ॥
नलगे आणिक साधन। रामनामें समाधान ॥ २ ॥
मध्वनाथाच्या दर्शनें। भवबंधन निरसणें ॥ ३ ॥

## पद २७.

जय जय रघुकुळभूप ॥ ध्रु० ॥ तव भजनीं जे विन्मुख। त्यांना बुडवी भवजलकूप ॥ १ ॥ ज्या तुजसाठीं विरज्या होमीं। जाळिती यती तिळतूप२ सनकादिक तुज पूजिति हृदयीं। जाळुनि मीपणधूप ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर म्हणतो माझें। दैवत तें चिद्रूप ॥ ४ ॥

## पद २८.

जानकीजीवनराम ॥ ध्रु० ॥ दशरथनंदन दशमुखकंदन। दशशतमुखनुतनाम ॥ १ ॥ सज्जनरंजन दुर्जनगंजन ॥ पूरित निजजन काम ॥ २ ॥ नटवर नागर करुणासागर। मदनमनोहर वाम ॥ ३ ॥ कनकधनुर्धर दीनजनोद्धर। सुंदर जलधरशाम ॥ ४ ॥ तोषितात्रिंबक दूषितचुंबक। सुलालितचंपकदाम५॥ मध्वमुनीश्वर वरद परात्पर। श्रमहरसुखकरधाम ॥ ६ ॥

## पांगारकरांचीं पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्ये पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८८ व्ही. पीनें ८१२.

२. **संतचरित्रमाला**:—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८८.

३. **श्रीएकनाथचरित्र**:—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ८१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ८४.

५. **आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ८१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ८८. व्ही. पी. नें ८११.

७. **नवविधाभक्तिः**—यांत नवविधाभक्तींचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ८४. ( तूर्त शिल्लक नाहीं )

८. **निरंजनमाधवांची कविता**:—भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्र**:—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण मा[illegible] ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. रु. १८८.

१०. **भक्तिमणिमाला**:—श्रीमद्भागवतांतील निवडक [illegible]

विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

**११ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह कि. ०५.

**१२-१३ मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-कि. प्रत्येकीं रु. १०८

**१४ मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. कि. रु. १०१२.

**१५ पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. कि. ०८.

**१६ श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिक-ठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सह्रा असे सात फोटो, तुको बांचीं भरपूर अवतरणें इ० सह. कि. रु. ३.

**१७ श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. कि. ०५.

**१८ निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. कि. ०१०.

**१९ मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण, उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. कि. रु. १.

**२० मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): –कि. ०४.

**२१ सार्थ श्रीदासबोध**—कि. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

**२२ सार्थ मनोबोध**:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. कि. ०१२.

**२३ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व मुख्य प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० कि रु. २.

' **चरित्र आणि काव्यविवेचन** ):--कि. रु. २.

**ग्वत** ( निर्णयसागर प्रेसचें आवृत्ति तिसरी )—कि. रु. ६

**व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.**

# मंगलाचरण.





## पद.

वृंदावनवासी कोठें गुंतला प्राणविसांवा ? ॥ ध्रु० ॥
दुःशासन धरुनी वेणी जनलोकां संनिध राहे, ।
पांचाळी उघडी करितां सुरसरिता नदी पाहे, ।
गंगात्मज द्रोणाचार्या पांडवांसी दुःख न साहे, ॥
॥ चाल ॥ मोकली दीर्घधाय ।
आठवी कृष्णपाय ॥ वृंदावन० ॥ १ ॥
शंखासुर घेवुनि गेला वेदांसी कोण तमाशा, ।
ब्रह्मानें करुणा करितां उदधींत जाला मासा, ।
माझी कां करुणा न ये रे ! पात्र तूं संकटनाशा ॥
॥ चाल ॥ लागली थोर आशा ।
नको पाहूं हा कीं तमाशा ॥ वृंदावन० ॥ २ ॥
बैसुनी मसणीं वेडा जालासी वृंदेसाठीं, ।
लुसलुसीत हिरवा पाला तुळसीची आवड मोठी, ।
रुक्मिणी येवों नेदी घातला हार कंठीं, ।
॥ चाल ॥ कोणतें संकट पोटीं ।
लागलासि धेनुपाठीं ॥ वृंदावन० ॥ ३ ॥
गोविंदा ! गोपवेषा ! गोवर्धनगिरिधर ! येरे ! ।
मुकुंदा ! मानसरमणा ! माधवा ! श्रम हारी रे ! ।
उचलोनी कडिये घेरे ! चुकविले जन्मफेरे ॥
॥ चाल ॥ अनंता भेट देरे ! ।
सर्वही होंचि ह्मणारे ! ॥ वृंदावन ॥ ४ ॥

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या ‘ मुमुक्षू ’ चा समागम केल्याचा लाभ होणार आहे, हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रांसह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपाया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल; पण दोन्ही भाग एकदम मागविणारास तूर्त ट. ख. माफ. पुस्तकांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिला:**—१ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४. मूर्तिपूजा. ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटानादाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीय प्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचें समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर. १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य. २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उपकार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसरा:**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरांगशिक्षामृतम्. ९ ‘ कुतऱ्यां थमालले थमाल आपल्या गाई. ’ १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगरकर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर. १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ उर्फ संसारवृक्ष. २५ संतमहात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकांचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ ३१ हरिशरणागति. ३२ नरसी मेहेत्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढविवाह. ३५ बोध आणि विनोद (या सदराखालीं १९ स्फुटें आहेत.)

**पत्ताः—व्यवस्थापक ‘ मुमुक्षु ’ पुणें.**

# कळकळीचा प्रेमभाव.

१ चातुर्मास सुरू आहे. देवाधर्माचीं व व्रतवैकल्याचीं कामें या काळांत घरोघर व मंदिरांतून अधिक होत असतात. तीं कळकळीच्या प्रेमानें करावींत. किडक्या सुपाऱ्या, हलके तांदुळ व विड्यांचीं पानें, वासेरें तूप हें सारें देवाधर्माकडे व श्रीवर्धनी सुपाऱ्या, आंबेमोहोराचे तांदूळ व उत्तम नवतीचीं पानें आणि साजूक लोणकढें तूप खायला असला प्रकार कांहीं ठिकाणीं आढळण्यांत येत असतो ! ह्या कृत्रिमपणानें, खोटेपणानें देवाला माणसें ठकवूं पाहतात, पण देवाला किडकी सुपारी दिली कीं, देव किडकेंच फळ माणसाच्या पदरांत टाकीत असतो हें विसरतात ! बुद्धीसारखें फळ मिळतें. खोटेपणा मुळांतच वाईट, आणि अंतरंग जाणणाऱ्या देवापाशीं खोटेपणा म्हणजे नवलाची गोष्ट आहे. एखाद्या अधिकाऱ्याला, जांवयाला नाहीं तर स्नेह्याला मेजवानी देतांना जो मनोभाव प्रगट होतो तेवढा तरी देवाला दाखवावा ! माणसांशीं वागतांना जो खरेपणा दाखवितां तेवढा तरी निदान देवाशीं वागतांना असावा ! 'देव भावाचा भुकेला' आहे, त्याला वरपंगी ढोंग नको असतें. भाव तसें फळ; भाव खोटा तर फळ खोटें, भाव शुद्ध तर भाजीचें पानही त्याला प्रिय होतें.

जैसा भाव जयापाशीं । तैसा देव तयासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥
जरी भाव असेल माइक । तरी देव होय महाठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ १४ ॥
जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ॥ १५ ॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १९ ॥

—दासबोध द. ३ स० १०

२ भाव तैसा देव, भाव तोचि देव, हें साधुसंतांचें वचन यथार्थ आहे. देवापाशीं खोटेपणा करणारा मनुष्य माणसांशीं काय खरेपणानें वागेल ? म्हणून कृत्रिम अवघें टाकावें व खरेपणानें, कळकळीच्या प्रेमानें देवाला भजावें, अंतरंगापासून देवकार्य करावें.

देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् ।

असा श्रुतिमाउलीचा उपदेश आहे. देव बाह्य उपचाराला, बहिरंगाला भुलत नाहीं.

अर्जुना माझें ठायीं । आपणपेंवीण सोरसु नाहीं ।
मी उपचारें कवणाही । नाकळे गा ॥ ३६७ ॥

—ज्ञानेश्वरी अ० ९

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाही ॥ १ ॥
पहा जनाई सुंदरी । तेथें देव पाणी भरी ॥ २ ॥
शुद्ध पाहोनीयां भाव । त्याचे हृदयीं वसे देव ॥ ३ ॥
तुका म्हणे विठोबाशीं । ठाव देई चरणापाशीं ॥ ४ ॥

३ ढोंगधतुरें, खोटेपणा, वरपंगी प्रेम यानें मनुष्य फसत नाहीं, पशुपक्षीही फसत नाहींत; मग तो अंतरसाक्षी देव कसा बरें फसेल ? यासाठीं देवकार्यें सर्वच मनःपूर्वक सद्भावानें करीत असावींत म्हणजे देव प्रसन्न होतो व समाधानाचें फळ देतो. आतां गणेशोत्सव जवळ आले, अनंतव्रत आलें, देवाधर्माचा काळ आला आहे तरी सर्वच कर्में देवाचा संतोष जोडेल अशा कळकळीनें करावींत; टाकणें टाकायचें ह्मणून करूं नयेत. त्यांत अर्थस्वार्थ कांहींच नाहीं. जें आपल्याला मनापासून आवडतें तें देवाला वाहावें. पोरसुद्धां खोटयाला वळत नाहीं, मग प्रेममूर्ति आत्माराम कसा बरें वळेल ? त्याला प्रेम हवें. एकच फूल व एकच तुळशीपत्र—पण तें सुगंधी फूल निर्मळपणें वहावें. फुलाला सुमन ह्मणतात, सुमन मन शुद्ध करून देवाला अर्पावें. दास० द० ४ स० ८:—

देवासी परमसख्य करावें । प्रेमप्रीतीनें बांधावें ।
सख्यभक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥

देवाला जें प्रिय तें आपण करावें, ह्मणजे त्याचें आपलें सख्य जमतें. त्याला काय आवडतें ?—

भक्तिभाव आणि भजन । निरूपण आणि कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ४ ॥

देव सत्यस्वरूप असल्यामुळें त्याला सत्यच आवडतें. मनांत, वाणींत व आचारांत पूर्ण सत्य असणें हें देवाला आवडतें. असत्याची काळोखी देवदर्शन देण्यास असमर्थ आहे. देवाचीं कर्में निर्मळ सत्यत्वानें करायची संवय लागली कीं, मनुष्याकडून व्यवहारांतही असत्याचरण होऊं शकत नाहीं. व्यवहारांतलें सत्य वेगळें, राजकारणांतलें वेगळें, पारमार्थिकांचें सत्य वेगळें असें सत्याचे नानाप्रकार असूं शकत नाहींत ! सत्य तें सत्यच, त्रिकालाबाधित सत्य; सर्वकाळीं सर्वस्थळीं व सर्व अवस्थांतून एक सत्यच शाश्वत आहे. 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' अशा प्रकारें परमात्मस्वरूप सत्य आहे, ज्ञानमय व अनंत आहे असें श्रुति सांगते. देव सत्य तर भक्तही सत्यच खरा. सत्य नसेल तर भक्त कसचा ? सत्याची प्रीति भक्ताला असते ह्मणून त्याजपाशीं असत्य, कृत्रिम, ढोंग नसते; कळकळ असते.

४ देवाशीं सत्यत्वानें वागायची संवय आपण लावून घ्यावी. अंतरीच्या कळवळ्यानें आपण देवाची पूजादि कर्में करूं लागलों तर देवही आपणासाठीं अंतरीं कळवळेल. तो कळवळाच तेवढा पाहतो, त्याला बाकी कसलीही

आवड नाहीं. श्रावणी जवळ आली आहे तरी देवतर्पण, ऋषितर्पण, पितृतर्पण करायची ही महापर्वणी मोठ्या श्रद्धाभक्तीनें साधून मनाचा पवित्रपणा वाढवावा. उगाच टिवल्याबावल्या करीत चावटीचे बोल बोलत बसूं नये. थोर पूर्वजांच्या व पूर्वकालीन संतमुनींच्या पुण्यस्मरणानें चित्तशुद्धीचा हा प्रसंग आनंदानें साजरा करावा. 'भावार्थाचा दुष्काळ' पडलेला दिसत आहे. तरी सभाग्यांनीं आपला भाव जतन करावा, वाढवावा व इहपरलोक साधून धन्य व्हावें.


५ फ़ाजील तर्कटाची संवय खोटी. ती लावून घेऊं नये. देवाच्या मार्गांत तर्काला प्रतिष्ठा नाहीं. श्रद्धावंताला ज्ञान होतें असें देवच गीतेंत सांगतात. तर्कटाच्या कपाळीं भक्तिभावाचें गोड सुख नाहीं. तर्कटें, वादविवाद व संशय ह्या तीन दैत्यांनीं परमार्थमार्गाला अडथळे आणले आहेत, ह्मणून ह्यांचा वाराही मनाला लागूं न देतां मन जेणेंकरून भक्तिभावानें उचंबळत राहील तेवढेंच ध्यावें. देवाला अनुकूल तें स्वीकारावें, प्रतिकूळ तें त्यागावें. देव मधुर आहे, देव दयाळू आहे, देव वत्सल आहे, देव स्वजनांना सर्वोपरी सांभाळतो अशी वाढती श्रद्धा व वाढता प्रेमा ठेवावा.

---

# तुकोबांची पत्रिका !

बलसाड येथून रा. वा. त्रिं. दांडेकर यांनीं श्रीतुकाराम महाराजांची जन्मपत्रिका आह्मांकडे पाठविली आहे ती आह्मी पुढें देत आहोंत. आह्मांला स्वतःला ज्योतिषविद्या अवगत नाहीं व म्हणून तिच्या खरेंखोटेपणाबद्दल साक्ष न भरितां ज्योतिष्यांच्या मनोविनोदार्थ व कदाचित् सत्यनिर्णयशोधनार्थ आह्मी ती पुढें देत आहोंत ! आमचें 'श्रीतुकारामचरित्र' वाचून ही बनविली आहे.

जन्म शके १५३० कार्तिक शु० ३ मं० ३६–८ वि० ९–२४ आ० २३–३८ तै० ८ दि० मा० ४८–१२ र० उ० ५–५७ र० अ० ५–३२ चं० वृश्चिक. राशी वृश्चिक. आ० नाडी व्याघ्र राक्षस गण. वि० नक्षत्र. विप्र. मंगळवार.



# देवदास.

( शके १५४०–१६२० )

व्यंकटेशस्तोत्र ह्या प्रासादिक, प्रेमळ व लोकप्रिय स्तोत्राचा कर्ता देवदास ह्याचा काळ निश्चित झाला आहे. ह्याचेंच संतमालिकास्तोत्र म्हणून दुसरें एक स्तोत्र २५ वर्षांपूर्वी उपलब्ध झालें आहे. त्याच्या शेवटीं कवीनें स्तोत्र रचनाकाल 'क्षय संवत्सर, आषाढी तृतीया सोमवार' असा दिला आहे, व त्यांत १०५ संतांची नामावळि आहे. ती पाहतां व रचनाकाळाचा विचार करितां संतमालिकास्तोत्र शके १६०८ क्षय संवत्सर, आषाढ शुद्ध ३ सोमवार ह्या दिवशीं रचलें गेलें असें राजवाडे यांनीं ह्मटलें आहे तें बरोबर आहे. मजपाशीं या स्तोत्राची एक जुनी प्रत असून ती अधिक शुद्ध आहे. शिवाय व्यंकटेशस्तोत्राची एक कविसमकालीन सुंदर प्रत मला उपलब्ध झाली असून तिचा लेखनकाल संवत् १७२० (ह्म० शके १५८६) माघ शुद्ध १३ रविवार असा दिला आहे. कदाचित् ही प्रत मूळही असूं शकेल. देवदासाच्या दोन्ही स्तोत्रांवरून शक १५४०–१६२० हा देवदासाचा काळ धरण्यास हरकत नाहीं. माझ्या संतमालिका स्तोत्राच्या शेवटीं 'इतिश्रीकरुणामृतचैतन्यांकित देवदासकृत संतमालिका ग्रंथ संपूर्णमस्तु" असा उल्लेख आहे. इतर प्रतींतही 'चैतन्यांकित देवदास' असे उल्लेख सांपडतात. व्यंकटेशस्तोत्रांत १०२ ओवी अशी आहे:—

> श्रीचैतन्यकृपा अलोलिक । तोषविला वैकुंठनायक ॥
> वर दिधला अमोलिक । जणें सुख सर्वांसी ॥

संतमालिकेंतही १३४

> ऐशा करुणावचनें देवदास । प्रार्थितां पावला जगदीश ॥
> वोळला चैतन्यकृपेचा सौरस । सुखसंतोष पै केला ॥

ह्यावरून देवदास तुकोबांप्रमाणें चैतन्यसंप्रदायी होता हें उघड आहे. करुणामृत हें विशेषण असेल, कदाचित् देवदासाच्या गुरूचें नांवही असेल. संतमालिकास्तोत्रांत माझ्या प्रतींत:—

> करूनि दुसरेपणाची वोळवण । अवघा प्रगट जाला आपण ॥
> करुणामृत गुणसंपन्न । वंदिला पूर्ण निर्धारें ॥

असा पाठ आहे. यावरूनही करुणामृतचैतन्य हें देवदासाच्या गुरूचें सांप्रदायिक नांव असावें असें वाटतें. दोन्ही स्तोत्रांच्या मजजवळील प्रती सरस आहेत. एकच ओवी उदाहरणार्थ देतों.

> जयापासून त्रिगुण । ना भक्तिस्तव जाला सगुण ।
> षष्ठाचळीं अवतरोन । भक्तजन उद्धरिला ॥ ६ ॥

माझ्या प्रतींतील पाठः—

जयापासून निर्माण त्रिगुण । तो भक्तिस्तव जाला सगुण ॥
शेषाचळीं अवतरोन । भक्तजन उद्धरिले ॥ ६ ॥

शेषाचळ ह्म० व्यंकटेशाचा गिरि. व्यंकटेशस्तोत्रांत (१०६) त्यालाच 'फणिपर्वत' ह्मटलें आहे. व्यंकटेश हें विष्णूचें नांव आहे व स्तोत्रांत लक्ष्मी-व्यंकटेशाचें म्ह. विष्णूचेंच ध्यान व प्रार्थना आहे. सर्व विष्णुभक्तांना उर्फ वैष्णवांना ( राम व कृष्ण यांच्या उपासकांना ) हें व्यंकटेशस्तोत्र अत्यंत प्रिय आहे. मराठी स्तोत्रांत याच्या इतकं गोड, सुलभ व लोकप्रिय दुसरें नाहीं. हें पराकाष्ठेचें मधुर, प्रेमळ व भक्तिरसपूर्ण आहे. यांतील कित्येक चरण ह्मणी-वजा झाले आहेत, यावरूनच याची लोकप्रियता स्पष्ट आहे. यांतील देवाचें ध्यान आणि प्रार्थना दोन्ही अनुपम आहेत.याचा थोडासा मासला दाखवितोंः—

जयजयाजी व्यंकटरमणा !। दयासागरा परिपूर्णा ।
परंज्योति प्रकाशगहना । करितों प्रार्थना श्रवण किजे ॥ ६ ॥
जननीपरि तुवां पाळिलें । पितयापरी सांभाळिलें ।
सकळ संकटांपासूनि रक्षिलें । पूर्ण दिधलें प्रेमसुख ॥ ७ ॥
तुज न जाणतां जालों कष्टी । आतां दृढ तुझे पायीं मिठी ।
कृपाळुवा जगजेठी । अपराध पोटीं घालीं माझे ॥ ११ ॥
पुत्राचे सहज अपराध । माता काय करि तयाचा खेद ।
तेविं कृपाळुवा गोविंद । मायबाप मजलागीं ॥ १३ ॥
उडदांमाजी काळें गोरें । काय निवडावें निवडणारें ।
कुचलियाचीं वृक्षफळें मधुरें । कोठोनियां असतील ॥ १४ ॥
अराटीलागीं मृदुता । कोठोनि असेल भगवंता ।
पाषाणासीं गुल्मलता । कैसेपरी फुटतील ? ॥ १५ ॥
आपादमस्तकवरी अन्यायी । परि तुझे पदरीं पडलों पाहीं ।
आतां रक्षण नानाउपायीं । करावें हें तुझें उचित ॥ १६ ॥
समर्थाचे घरिचें श्वान । त्यासि सर्वहि देति सन्मान ।
तुझा म्हणवित असे दीन । हा अपमान कोणाचा ॥ १७ ॥
लक्ष्मी तुझ्या पायातळीं । आम्हीं भिक्षेसि घालुनी झोळी ।
येणें तुझी ब्रीदावळी । कैसि राहिल गोविंदा ॥ १८ ॥
कुबेर तुझा भांडारी । आम्हा फिरविसी दारोदारीं ।
यांत पुरुषार्थ मुरारी । काय तुजला पैं आला ॥ १९ ॥
अन्नासाठीं दाहि दिशा । आह्मा फिरविसी जगदीशा ।
कृपाळुवा परमपुरुषा । करुणा कैशी तुज न ये ॥ २२ ॥

अंगिकारीं यासी मनीं । तुज प्रार्थितों मधुरावाणी ।
अंगिकार केलिया झणी । मज हातींचें न सोडावें ॥ २३ ॥

* * *

विषयासक्त मंदमती आळसी । कृपण कुव्यसनी मळिण मानसीं ।
सदासर्वकाळ सज्जनांसी । द्रोह करी सर्वदा ॥२८॥
कामक्रोधमदमत्सर । हें शरीर त्यांचे बिढार ।
कामना कल्पनेसी थार । दृढ येथें केली असे ॥ ३० ॥
अठराभार वनस्पतींची लेखनी । समुद्र भरला मसी करुनी ॥
माझे अवगुण लिहितां धरणीं । तरी लिहिले न जाती ॥ ३१ ॥
ऐसा पतित मी खरा । परि तूं पतितपावन सारंगधरा ।
तुवां अंगिकारिलिया गदाधरा । कोण गुणदोष गणील ॥ ३२ ॥
नीच रातली रायासी । तीस कोण म्हणेल दासी ।
लोहो लागलिया परिसासी । पूर्वस्थिति मग कैची ॥ ३३ ॥
गाविचे होते लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ ।
कागविष्टेचे जाले पिंपळ । तयासि निंद्य कोण म्हणे ? ॥ ३४ ॥
तैसा कुजाती मी अमंगळ । परि तुझा म्हणवितों केवळ ।
कन्या देउनियां कुळ । मग काय विचारावें ? ॥ ३५ ॥
धांवे पावे रे गोविंदा । हातीं घेउनियां गदा ।
करीं माझ्या कर्माचा चेंदा । सच्चिदानंदा श्रीहरी ॥ ३७ ॥
गजेंद्राच्या आक्रांतासी । कैसा पावलासि हृषीकेशी ।
प्रल्हादाच्या भावार्थासी । खांबांतुनि प्रगटला ॥ ३८ ॥
व्रजासाठीं गोविंदा । गोवर्धन परमानंदा ।
उचलुनियां स्वानंदकंदा । सुखी केले तये वेळीं ॥ ४२ ॥

किती सरळ जिव्हाळ्याची प्रार्थना आहे ! प्रवाह अस्खलित आहे; ओवींतील प्रथम चरणावरून—' तैसा कुजाती मी अमंगळ '—देवदासाची जात कोणती असेल असा विचार मनांत येतो न येतो तोंच ' तुवां अंगिकारिलियां गदाधरा ' हा प्रेमाचा लोंढा तो विचार ठरूं देत नाहीं. प्रेमळ भक्ताची जात गोत कोण पहायला बसला आहे ! असो. पुढील १० ओव्यांत कवीनें देवाच्या अति सुगम नामांचा उच्चार केला आहे—तोंच ' हृदयीं आविर्भवली मूर्ति ' मूर्तिदर्शनानें तन्मय होऊन कवीनें पुढील १८ ओव्यांत श्रीमहाविष्णूचें ध्यान वर्णिलें आहे. मानसपूजेच्या पूर्वी हें विष्णुध्यान करण्याचा नित्य अभ्यास ठेवावा इतकेंच येथें सुचवितों. आपादमस्तक विष्णुरूप अतिसुंदर, अत्यंत रेखीव असें प्रेमाच्या अमृतवाणीनें वर्णिलें आहे. ध्यानानंतर मानसपूजा करून पुन्हां प्रार्थना केली आहे व एक मागणें मागितलें आहे:—

मजला देईं ऐसा वर । जेणें घडे परोपकार ।
हेंचि मागणें साचार । वारंवार प्रार्थितसे ॥ ८४ ॥

शेवटीं ग्रंथाची फलश्रुति सांगून वरप्रदानांत समाप्ति केली आहे. आधीं शरणागति, प्रार्थना, आविर्भाव, मानसिक ध्यान, मानसपूजा, प्रार्थना व वरप्रदान अशा क्रमानें हें अत्यंत हार्दिक स्तोत्र १०८ ओंव्यांत संपविलें आहे. हें मराठी भाषेंतीलच काय पण संस्कृत भाषेंतील किंवा अन्य कोणत्याही भाषेंतील उत्तमोत्तम स्तोत्रांच्या मुकुटस्थानीं शोभण्यासारखें परम मधुर आहे. हजारों लोकांच्या जिव्हाग्रीं हें आज २५० वर्षें नाचलें आहे व पुढेंही दीर्घकाळ नाचेल. वर उद्धृत केलेल्यापैकीं १३।१४।१७।२२।३५ इ० ओंव्या तर अबालवृद्धांच्या मुखीं आहेत. हें कवीनें शेषाचलावर श्रीव्यंकटेशसन्मुखच रचलें असावें असें वाटतें. शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींतच हें रचलें गेलें आहे. ‘ अन्नासाठीं दाही दिशा । आह्मां फिरविसी जगदीशा ’ ही त्या काळीं स्वराज्याबाहेरच्या अनेक दीन जनांची प्रार्थना असावी व भक्ताची आरोळी ऐकून देवानें ‘ वर दिधला अलोकिक । जेणें सुख सकळांसी.’ सकळांस सुख व्हावें, परोपकार घडावा हें कवीचें मागणें—स्वतःचा उद्धार झाल्यावर—मननार्ह आहे.

देवदासाच्या संतमालिकेंत १४६ ओंव्या असून तींत पौराणिक संतांशिवाय ज्ञानेश्वरापासून अर्वाचीन काळांतील १०५ संतांचीं नांवें आलीं आहेत. मराठींत अशा १०।१२ **संतमालिका** उपलब्ध आहेत. बहुतेकांत संतांचीं क्रमशून्य अशीं नांवेंच आहेत. ‘ उठि उठि बा पुरुषोत्तमा ’ ही संतमालिका सर्वांत अत्यंत लोकप्रिय असून ती लोकांच्या प्रातःस्मरणांत जाऊन बसली आहे. ती भूपाळी सुंदर, सरस असून तिच्यांत मधुर काव्य आहे. श्रीहरीला उठवितांना नामदेव शिंपी आंगीटोपी घेऊन, नरहरिसोनार नानापरिचे अलंकार घेऊन, सावतामाळी सुगंधसुमनें पुष्पांजळि घेऊन, सेनान्हावी करीं दर्पण करून, कान्हूपात्रा नृत्याची तयारी करून, मिराबाई दूध तुपाची भरलेली वाटी घेऊन, जनी अंगाला लावायला तेलाची वाटी घेऊन, तुकाराम गुळखोबऱ्याची गोणी घेऊन, याप्रमाणें ‘ भक्तमंडळी महाद्वारीं । उभी तिष्ठत श्रीहरि ’ अशी ललकारी कवीनें दिली आहे. ह्या भूपाळीचा कर्ता रंगनाथ किंवा रंगानुज नसून ‘ श्रीरंगानुजतनुज ’ ह्म० रंगनाथांचा पुतण्या काशिराजआण्णा हे होत असें रंगनाथांच्या वंशजांनीं मला कळविलें आहे. वरील वर्णनांतलें औचित्य मनोहर आहे. मोरोपंतांची सन्मणिमालाही अशीच सरस पण प्रत्येक संतकवीच्या विशिष्ट गुणांचें मार्मिकपणें दिग्दर्शन करणारी एक संतमालिकाच आहे. याच जातीची देवदासांची संतमालिका सरस व मार्मिक आहे. तींत नुसत्या नामावळीशिवाय अधिक कांहीं

आहे. तूं अनेक संतांची आर्त पुरविणारा, त्यांना संकटीं तारणारा, प्रसंगीं त्यांच्या सेवेंत धन्यता मानणारा असून माझी उपेक्षा कां करितोस असा त्यांचा देवास प्रश्न आहे. व्यंकटेशस्तोत्राप्रमाणेंच हें संतमालिकास्तोत्र करुणरसपूर्ण आहे. चार दोन ओव्या पहाः—

जातीचा वाणी तुकाराम । तुझ्या भजनीं अत्यंत प्रेम ।
त्या पावलासि पुरुषोत्तमा । उदकीं कागद तारिले ॥ ६९ ॥
मुक्ताई वटेश्वर सोपान । निवृत्ति देवा तुझें ध्यान ।
त्यासी देऊनि आपुलेपण । सरते केलें तिही लोकीं ॥ ७१ ॥
मुक्तेश्वरा मुक्तदशा । दिधली तुवां हृषीकेशा ।
पुरवून त्याची आशा । भारती टीका वदविली ॥ ८८ ॥

देवाचे भक्त असंख्य व देवाचे गुण अनंत. कवीनें एके ठिकाणीं भक्तांचें पर्याय सुचविले आहेत. देव कोणाला गुरुरूप होऊन ब्रह्मस्थिति देतात, कोणाच्या अंतरांतच ज्ञानदीप लावतात, कोणाला सगुणरूपानें भेटून कृतकृत्य करितात, कोणाला नामछंद लावतात, कोणाला वैकुंठधाम देतात. तात्पर्य ' भक्तालागीं चराचरीं । इच्छेसारिखा तूं होसी. '

ता. ३।११।१९०३ च्या ' केसरींत ' मीं देवदासावर एक लेख प्रसिद्ध केला होता. त्यावेळीं वरील देवदासाशिवाय आणखी दुसरेहि एक देवदास याच सुमारास झाले होते हें मला ठाऊक नव्हतें. वरील देवदास पंढरीच्या संतमेळ्यांत खपून जाणारे असले, तर दुसरे देवदास त्याच सुमारास रामदासी-पंथांत झाले होते. हे समर्थशिष्य असून यांचा मठ नगरच्या पूर्वेस १४ कोसांवर दादेगांवीं आहे. ' निजामशाहीची सत्ता डळमळित करण्यास बरेच प्रयत्न कारणीभूत झाले असावेत ' असें शंकरराव देवांचें अनुमान आहे व या अनुमानावर ' निजामशाही इ. स. १६३७ ( शके १५५९ ) नामशेष झाली. तेव्हां या देवदासाचा जन्म तत्पूर्वीं ह्म० शके १५२२ च्या सुमारास झाला असावा ' असें पोतदारांनीं दुसरें अनुमान काढलें आहे ! निश्चयात्मक कोणासच कांहीं सांगतां येत नाहीं, पण या कवीची बरीच कविता ह्म० सुमारें ६५० मराठी व हिंदी श्लोक मीं देवांकडे पाठविले होते व त्यांतले कांहीं श्लोक केसरींतही प्रसिद्ध केले होते त्या श्लोकांवरून तत्कालीन देश-हितवादी लोकांची मुसलमानांविषयींची क्रोधाची भावना प्रगट होते. त्यांत मधून मधून

तुमारा हमारा खुदा एकभाई । कहे देवदासो नही बेजुदाई ।

असा तडजोडीचाही उद्गार आहे. यांचीं कांहीं पदेंही आहेत.

# महात्माजींची तितिक्षा.

महात्मा गांधींच्या अनेक थोर सद्गुणांपैकीं तितिक्षा हा गुण अपूर्व आहे. प्रतीकार करण्याचें सामर्थ्य अंगीं असून सहन करणें याला तितिक्षा ह्मणतात. अंगीं सामर्थ्य नसून सहन करणें यांत विशेष नाहीं. शीतउष्ण, स्तुतिनिंदा, सुखदुःख निर्विकारपणें सोसणें याचें नांव तितिक्षा. हवे तेवढे पैसे मिळविण्याची शक्ति असतांना किंबहुना मिळत असतांना त्यावर पाणी सोडून लोककार्यार्थ त्यांनीं स्वार्थाचा होम केला अथवा परमार्थदृष्टीनें खऱ्या स्वार्थाच्या मागें लागले. अलीकडच्या पुढाऱ्यांत महात्माजींसारखा पुरा स्वार्थत्याग कोणीं केला आहे ? त्यांच्यासारखी तितिक्षा कोणाजवळ आहे ? मतभेद असूं देत, पण त्यांच्या या दिव्य गुणांचें चिंतनच चित्ताची उन्नति करूं शकेल. महाराष्ट्रीय पुढाऱ्यांत तितिक्षेचा अभाव आहे हें वर्तमानपत्रें पाहतां कोणासही दिसून येतें. त्यांच्यावर टीकास्त्रें फेंकीत राहण्याची, त्यांच्या विचारांचा विपर्यास करण्याची, न्यायान्याय किंवा राष्ट्रीय प्रगतीचें धोरण न पाहतां त्यांची कुटाळकी करण्याची कामगिरी महाराष्ट्र आज पांच वर्षें मनोभावें करीत आहे. पुण्यवंत निःस्वार्थी महापुरुषाचे गुण न घेतां, त्याच्या सद्धेतूकडे लक्ष न देतां, त्याची सर्वकाळ निंदा करीत राहणें हें महापाप आहे. पक्षाभिमानाला किंवा स्वमतप्रदर्शनस्वातंत्र्याला कांहीं मर्यादा पाहिजे, तिचा अतिक्रम करणें अनुचित आहे. थोरांनींच मर्यादा सोडली मग लहानांना काय आवरावें ? थोरांचें अनुकरण लहानही करीत असतात व याप्रमाणें लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच वाईट वळण लागून व बजबजपुरी माजून समाजाचा घात होतो. महाराष्ट्रांत हें झालें आहे. कोणतेंही वर्तमानपत्र घ्या, कुत्सित टीका, परस्परांवर निंदाटीकेचा भडिमार, परस्परांच्या हेतूंचे विपर्यास इ० दुर्गुण राष्ट्रांत पसरले असून उच्च प्रतीचें राजकारण पार नाहींसें झालेलें दिसतें. हें चांगलें नाहीं. धार्मिक परंपरा लुप्त झाल्याचे हे परिणाम आहेत. मतौदार्य, अन्योन्यप्रेम, विश्वास, गुणैकपरता, सहनशीलता इ. थोर गुण वाढीस लागले नाहींत तर लोकसुधारणेची आशा आहे काय ? राष्ट्राचा गाडा पुढें चालावा कसा ? राष्ट्र दुर्गुणी बनल्यानें देशाचा उद्धार होईल काय ? परधर्मीय व परदेशीय लोकांच्या राज्यपद्धतीमुळें राष्ट्रावर महान् संकटांचे पर्वत कोसळत आहेत. अशा वेळीं आपापसांतल्या यादवीचे दुष्ट परिणाम काय होतील व होताहेत हे शहाण्यांनाही दिसूं नये हें नवल आहे. असो. परमेश्वराच्या इच्छेनें जगाचे व्यवहार चालले असून त्याच्याच इच्छेनें उत्पन्न झालेली तमोगुणाची ही लाट ओसरेल व सत्वगुणाची लाट येईल.

देशाचा भाग्योदय जवळ आला ह्मणजे वरील, दुर्गुणांचें बीज मरून जातें व परस्पर प्रेमाचें, सौहार्दाचें, विश्वासाचें, सुंदर पीक येतें. हा चक्रनेमिक्रम इतिहासपुराणांत स्पष्ट दिसतो. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व पत्रें पक्षाभिमान, जात्यभिमान, इ० अभिमानांनीं भरलेलीं असून तमोगुणानें व्याप्त आहेत. अशावेळीं महात्मा गांधी आपण रेखलेल्या सरळ मार्गानें जात आहेत व टीकानिंदेच्या हौद्यांत स्वतः उतरत नाहींतच पण स्वतःवर होत असलेल्या अपशब्दवृष्टींचा मारा लोकोत्तर शांति व तितिक्षा धारण करून सोशीत आहेत यांतच त्यांचें मोठेपण आहे. निंदेनें पिसाळून जाऊन उलट निंदा करणारे पुष्कळ आहेत, पण निंदा जिरवून समता राखणारे महात्मा गांधी हे पुढाऱ्यांत एकच. सतत पांच वर्षे त्यांच्यावर, त्यांच्या हेतूंवर व कार्यावर एवढा निंदाग्नीचा भडिमार होत असतांना ते कधीं कोणाही निंदकावर किंवा टीकाकारावर उलटून पडले आहेत असें नाहीं. प्रसंगीं टीकेला उत्तर देतात पण तें शांत व सरळपणानें सभ्य भाषेत देतात. आपलें काम बरें व आपण बरें. त्यांना याहून खालीं उतरायला वेळ नाहीं व मनही मोठें ह्मणून ते विकारही पावत नाहींत. ही तितिक्षा सामान्य नाहीं. सभा व वर्तमानपत्र त्यांच्याही हातीं आहे. पण ते आपल्या वाणीचा व लेखणीचा सदुपयोग करीत आहेत. त्यांच्याशीं असलेला प्रामाणिक मतभेद कायम ठेवूनही त्यांच्या या तितिक्षागुणाचें अनुकरण महाराष्ट्र करील तर काय होणार नाहीं ?

२ एकदा एका मोठया शहरांत एक जंगी जाहीर सभा भरून सभेंत खडाजंगी वाद चालला होता. हजारों श्रोते टक लावून वक्त्यांचीं भाषणें ऐकत होते. रंगभूमीवर दोन मुख्य वीरांत लढत चालली होती. अशा वेळीं एक अगदीं जंगली घोंगडया तेथें अकस्मात प्राप्त झाला. ‘ अबब ! किती किती माणसें ! इकती माणसं कशापाइ जमल्याती ! ’ तो बिचारा ‘ आ ’ करून प्लॅटफार्मवरच्या मुख्यांना टेहळीत होता. शेजारच्या एका सुशिक्षित माणसाला त्याच्या जिज्ञासेचें कौतुक वाटलें व त्यानें त्याला विचारलें ‘ अरे, तूं मघापासून कान टवकारून व डोळे फाडफाडून काय पाहतोस ? तुला यांत काय समजतयं ! ’ यावर त्या घोंगडयानें उत्तर केलें “ दादा, मसनी समदं समजलया ! यो बगा ! त्यो बामन लई शिरा तानुन वरडतुया, गागतुया, पिसाळल्यावानी हातपाय झाडतुया त्यो—इचिभन त्यो हरला. अन् त्यो दुसरा—त्यो बगा अक्शी सांबावानी संथ बसलिया, बोलत नाय, डोकं बी त्येच तापलं नाय, बगा देवावानी थंड बसलाया—त्येनी जितली—ये मसनी समजलं बगा ! पिसाटावानी शिया देतुयात्येची अकल नाय. जो शिया ऐकुतया अन् थंड. बोलत नाय त्येची अकल बडी हाय. त्ये मसनी समजलं ! ”

———

# हळहळणाऱ्या दुःखितास--

लेखक-श्री. बा. गाडगीळ, पुणें.

( चालः—अर्धतनू वारुळीं बुडाली० )

शांति धरी तूं मनी मानवा ! संसृतिच्या सागरीं;
येउं दे संकट--नक्रां तरी.
स्मरण हरीचें, स्तवन तयाचें संतत बघ रे करीं;
तुला तो पावेलच लौकरी.
दुःखीं प्रभुला आळवितां तो कदा न जाई दुरीं;
तयाची येइ न कवणा सरी.
हा असे सदाचा संकटमयची भव
मोहानें बुडती इथें किती मानव
सौख्याचा नसतो फार इथें संभव
दुर्लभ नर-वपु पुण्यबलानें तुला लाभली अतां
चीज तूं करी तिचें तत्त्वतां !

२

हरिनें दिधली मुक्ति गजेंद्रा नक्राला मर्दुनी;
तुलाही मोचवील तो क्षणीं.
अति कनवाळू जगत्पिता तो वाहुनि चिंता मनीं—
सोडवी दुःख-कर्दमांतुनी.
भक्त--कार्य तो करण्या तत्पर; शरण तयालागुनी—
जाउनी रम तूं तच्चिंतनीं
तूं हरिमय बनुनी भोग सुखा शाश्वत
तो करील बघ रे तुझें सदाचें हित
हरिविना बरी जागीं दुजी नसे संगत
नको नको तूं विषयीं गुंतूं, हानि तिथें रे सदा
स्मरावें प्रभुच्या पावन पदां.

३

नाम-वज्र तें हरिचें नाशी अघ--पर्वत संतत
तयाला भक्ति बहू संमत
त्यागुनि सारें झडकरि बापा ! हरीपुढें हो नत
दैव मग काय करी तें हत !

प्रभु--गुण-संकीर्तनीं सदाही मनुजा ! हो तूं रत
नको रे होऊं भक्तिच्युत
तारील भक्तिची नौका भव-सागर
गवसेल शेवटीं श्रेयाचें मंदिर
होईलहि तुजसी प्रभु-दर्शन सुंदर
ठेव भरंवसा प्रभु--पदिं संतत लाभ मला तेथची
प्रभु--गुणश्रवणीं धरी रे रुची !

४

भालिं असे जें, कवणा टळतें ? धरीं तितिक्षा पुरी,
निवारी अशिवातें श्रीहरी.
सारे संकट--जंबुक नाशी लीलेनें तो हरी,
तुला ही तोषवील अंतरीं.
कलधौताची म्हणुनी हृदयीं खुपसावी कां सुरी ?
विषय मग बाळगिसी का उरीं ?
किति तरी आजवरि बुडले विषयांमुळें
रमतात मनुज परि तिथेंच अजुनी खुळे
आपुलें तयांना श्रेय न अगदीं कळे
हरि--गुण--गानीं रमवि मतिसी, कशास मग ती चळे ?
तिचा तो अहंभाव ही गळे.

५

संसृति--सागरिं संकट--नक्रां किती बोचरे सुळे !
टोंचती तीक्ष्ण जणूं ते खिळे !
मृदुल हृदय त्यामुळें होतसें, संतत तें हळहळें,
परी ती भक्ति तेथुनी गळे !
दुःख--कर्दमीं पद्म भक्तिचें रुजतें तें आगळें,
तरी तूं सोस दुःख रे बळें !
सुख संतत मिळतां भान न हरिचें उरे
दुःखांतचि होतें स्मरण तयाचें खरें
तें तिथेंच कळतें महत्त्व त्याचें पुरें
दुःखाग्नीनें दग्ध जीव तो पुरा पुरा होउं दे
मोह--मल साराही जाउं दे !

६

कंटक--मय जरि असे अती ही दुःखाची वल्लरी
भक्तिचा गुलाब ये तिजपरी

बहु धैर्यानें निज हृदयांतरिं धारण तिज तूं करी
सफलता तदाच होईल खरी.
संत–बोध–जल सिंचुनि हृदयीं दुःख–वल्लरी वरी—
वाढवी भक्तीची मंजरी
ही गुलाब–कलिका फुलेल तुझ्या मनीं
दरवळेल तीचा गंधहि तो त्रिभुवनीं
आनंद तुला मग संतत होइल मनीं
भक्तीच्या ह्या गुलाब–सुमना हरि चरणीं वाहुनी
धन्यता मिळेल तूतें जनीं !
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

# " हीं भांडणें मिटवा ! "

( महाराष्ट्रीयांना उद्देशून पुढील लेख खामगांवच्या नवीन निघालेल्या 'युगांतर ' पत्रांत आला आहे. तो बहुतांशीं आमच्या विचारांशीं जुळता असल्यामुळें अंशतः आमच्या वाचकांसाठीं पुढें दिला आहे. तो त्यांनीं वाचून विचार करावा. विद्वान् माणसें आपापसांत अशीं भांडतात कां, 'आमचें चुकतें कोठें' व तें कसें सुधरेल, याचा शांतपणें विचार व्हावा. महात्माजींच्या **यंग इंडिया** वाचून बाकीचीं सारीं पत्रें एकमेकांचे वाभाडे काढीत आहेत ! )

१ नाना पंथ, नाना भेद, नाना मतें, नाना कारणें, ह्या सर्वांनीं इतका गोलमाल करून टाकला आहे कीं, बा हिंदुस्थान देशा ! हे सगळे जीव तत्वाचेच गुलाम आहेत, तुझा कोणीच का गुलाम नाहीं ? असें वाटल्यावांचून रहात नाहीं. महाराष्ट्रांतील मराठ्यांनो, मद्रासेंतील ब्राह्मणेतरांनो, यू. पी. तील पंडितजींनो, बंगाल्यांतील बाबूंनो ( आणि पुण्यांतील ब्राह्मणांनो )–काय ही अवस्था आणि काय हीं भांडणें ? मीच तेवढें हिंदुस्थानचें हित करितों आणि अन्य हितशत्रु आहेत ही भावना कां ? माझाच मार्ग तेवढा सर्वांत उत्कृष्ट आणि इतरांचा मार्ग अत्यंत वाईट किंबहुना राष्ट्राला अधोगतीला नेणारा असा समज कां ? मी जें करीन तेवढेंच चांगलें आणि इतर करितात तें सर्व अहितकारक अशीं कल्पना कां ? मीच जेवढें प्रतिपादीन तेवढें श्रेष्ठ आणि इतरांचें नुसतें बोलणेंहि फोल अशी घमेंड कां ? एकमेकांनीं एकमेकांच्याबद्दल हेवादेवा करण्याचे हे दिवस आहेत काय ? राष्ट्रदेवाला सबंधच्या सबंध घशांत घालण्याकरितां गुलामगिरीची राक्षसी माया आपला जबडा पसरून बसलेली;

राष्ट्रदेवाच्या प्रकृतीचें अस्वास्थ्य नाकाला सूत बांधून बसण्याइतक्या पल्ल्यापर्यंत गेलेलें; मायदेशाचे प्राण त्याच्या कंठाशीं आलेले; दारीचा भिकारी बरा पण चार एकर शेती असलेला शेतकरी वाईट इतकी हलाखीची स्थिती आलेली; व्यापार नाहीं, उद्योग नाहीं, कला नाहीं, कौशल्य नाहीं, श्रीमंती नाहीं, पैसा नाहीं, सामर्थ्य नाहीं, धारिष्ट नाहीं, छाती भिडवून संकटकालीं उभें राहण्याची हिंमत राष्ट्रांत राहिलेली नाहीं; इतर परकीय राजकीय आपत्तींना तोंड देण्याचें सामर्थ्य शिल्लक नाहीं—किंबहुना जगावयाचें का मरावयाचें ही ज्या देशाची स्थिति, त्यांतील देशभक्तांनीं, त्यांतील पंडितांनीं, त्यांतील आचार्यांनीं, त्यांतील राष्ट्रहितेच्छूंनीं एकमेकांबद्दल वाटेल त्या कंडया उठवाव्या, एकमेकांला गालीप्रदान करावें, एकमेकांबद्दल निंदाप्रचुर लेख लिहावे, एकमेकांबद्दल हेत्वाभास उत्पन्न करावेत आणि एकमेकांवर असद्हेतूंचा आरोप करावा ?—काय हें दृश्य ! कोण भीषण देखावा ! किती हृदयविदारक प्रसंग ! ज्या आर्यसंतानांनीं तिच्या स्वातंत्र्याचा अपहार करणारांना शासन करित असतां रणांगणावर घायाळ होऊन पडल्या पडल्या एकमेकांच्या जखमेची विचारपूस करावयाची तींच आर्यभूमीचीं संतानें एकमेकांचीं हृदयें तुडवून त्यांतून रक्त सांडत असलेलीं कोणाला बरें पहावेल ? ज्या आर्यभूमीच्या सुपुत्रांनीं आपल्या हितशत्रूचा पाडाव करण्याकरितां कमर कसून एकजुटीनें पुढें व्हावयाचें तेच आर्यभूमीचे पुत्र आज एकमेकांच्या उरावर बसून एकमेकांच्या नरडीचा घोट आतां घेतात कीं मग घेतात हें दृश्य कोणाच्या दृष्टीला बरें वाटेल ? ज्या भरतखंडाच्या भारतीयांनीं इतर देश पादाक्रांत करून मानवी जीविताच्या श्रेष्ठ ध्येयाकडे त्यांना कसें नेता येईल याचा स्थिर बुद्धीनें विचार करावयाचा त्याच भारतीयांचा भरतखंड आज गुलामगिरीच्या मालिन्यांत लोळत पडलेला असतांना त्याची खंतहि भारतीयांना वाटत नाहीं हें पाहून कोणाच्या तोंडून दुःखोद्गार निघणार नाहींत ? हे विचार मनांत आले, हीं दृश्यें कल्पनाचक्षूसमोर दिसूं लागलीं, हीं मतभेदांचीं भुतें समोर थयथयाट करूं लागलीं म्हणजे अद्यापीही हिंदभूमीचें नष्टचर्य संपलें नाहीं असेंच म्हणणें प्राप्त होतें !

२ ज्या वऱ्हाडांत वीर वामनराव जोशी आणि बापुजी अणे खांद्याशीं खांदा लावून काम करीत होते, ज्या वऱ्हाडांत श्री. कोठेकर व बाबासाहेब परांजपे हे एका गाडींतून बिगारबलुत्याची चळवळ करतांना लोकांच्या दृष्टीस पडत होते, ज्या वऱ्हाडांत अबदुलशैफ शहा आणि हिंदु मंडळी एका दिलानें राष्ट्रकार्याचा गाडा ओढीत होतीं; ज्या महाराष्ट्रांत श्री. नरसोपंत आणि श्री. खाडीलकर या दोघांचीही लेखणी एकसमयावच्छेदेकरून महाराष्ट्राला देशाभिमानाचें शिक्षण देत होती, ज्या महाराष्ट्रांत प्रो. शिवरामपंत परांजपे आणि भाऊसाहेब लवाटे यांचीं तरुणांना कर्तव्यरत करण्याचीं सपाटून व्याख्यानें

चालली होती; ज्या नागपुरांत डॉ० मुंजे आणि अभ्यंकर ही जोडी नरनारायणासारखी तळपत होती; ज्या नागपुरांत खरे चोळकरांसारखे कुशल कर्णधार राष्ट्रकार्याचीं सूत्रें बरोबर हाकीत होते; त्याच महाराष्ट्रांत, त्या वऱ्हाडांत आणि त्या नागपुरांत आज काय दृश्य दिसत आहे ! आज वामनरावजींनीं बापूजींना 'राजकारणमूढ, परप्रत्ययनेय, परानुकरणास चटावलेला, स्वातंत्र्यप्रेमशून्य पंडित' म्हणावें तर उद्यां बापूजींच्या एखाद्या चेल्यानें 'खादीबहाद्दर, कार्यक्रमशून्य' म्हणून वामनरावांची थट्टा करावी, आज कोठेकरांनीं 'ब्राह्मणांचा कावा मला समजून आला' असे प्रवाद करावेत तर उद्यां बाबासाहेबांच्या अनुयायानें 'अक्कलशून्य' कोठेकर असा किताब द्यावा. आज मुंजांनीं अभ्यंकरांना नाठाळ म्हणावें तर उद्यां अभ्यंकरांनीं मुंजांना 'दगलबाज' म्हणावें; आज खाडीलकरांनीं केळकरांना नालायक म्हणावें तर उद्यां केळकरांनीं खाडीलकरांना धनलोभी म्हणून विशेषण द्यावें; आज परांजप्यांनीं केसरीला नाकें मुरडावींत, तर केसरीनें उद्यां स्वराज्याचे वाभाडे काढावेत—खरोखरी हें दृश्य अतिशय ओंगळ आणि पहावेनासें झालें आहे ! भांडणास कसले भिकारडे विषय ह्या मंडळींनीं शोधून काढले समजत नाहीं ! एखादी जागा तांब्यांनीं घेतली, किंवा एखादी सभा अभ्यंकरांनीं हजर न राहतां घालविली, एखादी जागा केळकरांनीं पटकाविली, किंवा एखादा नापसंतीचा ठराव एखाद्या आचार्यानें आणला, हे काय भांडणाचे विषय आहेत ? भांडावयाचेंच असेल तर राजकीय स्वातंत्र्य कमावण्यांत अहमहमिका दिसूं द्या. या असल्या पोरभांडणांत शक्तिसर्वस्व खर्च होण्यापेक्षां आपल्या हितशत्रूंची हड्डी नरम करण्यांत तें खर्च होऊं द्या. ह्या असल्या शुष्क वादविवादांत हिंमत घालविण्यापेक्षां त्या हिंमतीचा उपयोग शत्रूच्या माऱ्याच्या जागा सर करण्यांत करा ! असल्या गोंधळांत एकमेकांवर मिथ्यारोप करण्यांत होणाऱ्या बलाचा अपव्यय शत्रूंचीं मर्मस्थानें शोधून काढण्यांत त्या बलाचा उपयोग होऊं द्या. हीं भांडणें काय वामनराव जोशी किंवा बापुजीसारख्यांनीं भांडावींत ? हे झगडे काय डॉ. मुंजे अभ्यंकरांसारख्यांनीं झगडावेत ? ही शिवीगाळ काय केळकरखाडिलकरसारख्यांनीं करावी ? असलीं महारभांडणें भांडण्यापेक्षां या पुढाऱ्यांना अत्यंत मोलाची कामगिरी बजावावयाची आहे. सभ्यतेला न शोभणारी भाषा वापरण्याच्या कामीं लेखणीचा दुरुपयोग करण्यापेक्षां तरुणांच्या स्वातंत्र्यकल्पना उल्हसित करण्याकडे त्या लेखण्यांचा उपयोग व्हावयाचा आहे. सिंहगर्जनेसारख्या त्यांच्या वाणीचा उपयोग एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यापेक्षां तरुणांच्या चित्तवृत्ती उचंबळून त्यांना राष्ट्रकार्यप्रवण करण्याकडे त्या वाणीचा उपयोग व्हावयास पाहिजे आहे !

३ या व्यक्ती तरुण पिढीला—विशेषतः महाराष्ट्रांतील तरुण पिढीला—वंद्य

होत्या व त्या अजूनही आहेत. ह्या एवढया व्यक्तींची एकवटलेली जिव्हा, ह्या एवढया व्यक्तींचे एकत्रित झालेले हात, आणि ह्या एवढयाहि व्यक्तींची एकाच स्वातंत्र्याच्या विचारानें निगडित झालेलीं मनें काय करूं शकणार नाहीत ? ह्या एकत्रित शक्तींत सह्याद्रींच्या उत्तुंग शिखरांना वाचा फोडण्याचें सामर्थ्य आहे. ह्या एकवटलेल्या हातांत गगनचुंबित वृक्षांना डोलविण्याचें सामर्थ्य आहे. ह्या एकटलेल्या मनांत मुक्याला बोलके आणि आंधळ्याला डोळस बनविण्याची शक्ति आहे. ह्या एकवटलेल्या अंतःकरणांत पुन्हां शिवबांचें गेलेलें मराठी साम्राज्य प्रस्थापिण्याचें बल आहे.

४ आम्हीं हात जोडून, नम्रपणें आपला माथा त्यांच्या पायीं नमवून, आर्जवानें तळमळून या गुरुजनांना अशी विनंती करतों कीं ' मिटवा हीं भांडणें, आणि लागा आपल्या स्वातंत्र्याच्या उद्योगाला ! '

५ महाराष्ट्रांत स्वातंत्र्यप्रेम आहे, महाराष्ट्रांत हुषारी आहे, महाराष्ट्रांत मर्दुमकी आहे, महाराष्ट्रांत बुद्धी आहे म्हणून त्या बुद्धीचा, त्या हुषारीचा, त्या स्वातंत्र्यप्रेमाचा, त्या कर्तबगारीचा व्यय असा होऊं द्यावयाचा काय ? महाराष्ट्र आपसांत भांडतो ही बेअदबी अन्य प्रांतांत पसरलेली कोणाला बरी वाटेल ?

६ ज्याच्याकडून जेवढी शक्ति कामीं येईल तेवढा तिला अवसर देऊन आपलें काम पुढें हाकारणें हेंच राष्ट्रांतील बुद्धिमान् पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. यांतच राष्ट्रीयत्वाची वाढ आहे. यांतच स्वातंत्र्याच्या कल्पनेचें संवर्धन आहे.

—युगांतर ( खामगांव )

---


# मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन.

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांचीं अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रति थोडया शिल्लक आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २.

पत्ताः—व्यवस्थापक " मुमुक्षु " पुणें शहर.

# नरदेहाची नौका.

( लेखक, बलराम जनार्दन आचार्य, दादर. )

१ कष्टानें मिळविलेल्या द्रव्याचा व्यय एकादा धनिक ज्याप्रमाणें योग्य ठिकाणीं व योग्य काळीं अतिशय दक्षतेनें करितो, त्याचप्रमाणें परमभाग्यानें प्राप्त झालेल्या नरदेहाचा आपल्या बुद्धिसामर्थ्यानें पुरुषार्थ–प्राप्त्यर्थ उपयोग केल्यास, " याचि जन्में व येणेचि काळें " निरतिशय भगवत्सुखाचा आस्वाद घेतां येतो. बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर प्रत्यक्ष देवांनाही चटक लावणारें स्थान फक्त मनुष्यालाच प्राप्त करून घेतां येत असल्यामुळें, विशेषतः या भरत-भूमींत आपणांस एकाद्या भाविक कुलांत जन्म मिळावा म्हणून स्वर्गांतील देव-सुद्धां जगन्नियंत्यापाशीं नित्य प्रार्थना करितात ! स्वर्गांतील देवांना व पृथ्वी-वरील इतर कोणत्याहि प्राण्यांना ज्या परम पवित्र स्थानाची नुसती अंधुक कल्पनाहि करितां येत नाहीं, त्या निरुपमस्थानास प्राप्त होण्याची किल्ली पर-मेश्वरानें एका मनुष्यप्राण्यालाच दिली आहे. पण तें स्थान अनायासानें प्राप्त होणारें नसून, त्याकरितां मनुष्यप्राण्याला सर्वस्वावर तुलसीपत्र ठेवावें लागतें. आपणां सर्वांस पूर्ण परिचित असलेली बोट समुद्रांतून सुरक्षित पार पडण्यास तिच्या कप्तानाचा सावधपणा जरूर असतो. तदभावीं बोटीचा कप्तान जर कैफी पदार्थांच्या सेवनामुळें निशा करणारा असेल, तर बोट इष्ट स्थानीं जाण्या-च्यापूर्वींच एकाद्या खडकावर आपटून तिचा चक्काचूर झाल्यावांचून रहाणार नाहीं. नृ-देहनौकेचें अगदीं तसेंच असून ती भवसागरांत ममत्व, मान,सन्मान, ईर्षा राग--द्वेष इत्यादि षड्विकाररूप खडक; शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इत्यादि लहरी; अविवेक, अधर्म इत्यादि भोंवरे; यांच्या तडाख्यांतून सुटून निरतिशय भगवदानंदरूप बंदरास पोहोंचण्यास नृदेहरूप नौकेचा विवेकरूप नावाडी विषयरूप कैफी पदार्थांच्या व्यसनापासून अलिप्त असला पाहिजे. त्याच्या अभावीं नृदेहरूप नौकेची नऊंहि द्वारें मोकळीं राहून त्या योगें विष-यरूप पाण्यानें ती भरून गेल्यामुळें 'समुद्रास्तृप्यन्तु' ह्मणजे अधोगतीस जाते. भवसागरांतील नृ-देहरूप नौकेचे नावाडी प्रायः विषयरूप कैफी पदार्थांच्या स्वाधीन होत असल्यामुळें, त्यांच्या नौका खडकावर आपटल्यावांचून रहात नाहींत!

२ पुढच्यास ठेंच लागलेली पाहून मागून येणारे वाटसरू जसे फार दक्ष-तेनें मार्गक्रमण करितात, त्याचप्रमाणें विषयांध नावाड्यांच्या नौका बुडालेल्या पाहून कोणी एकादाच विवेकसंपन्न नावाडी आपल्या नौकेची अधोगती थांब-विण्याच्या उद्देशानें भगवच्चरणाचा आश्रय करितो.

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ गीता ४–३६॥

" पापाचरण करणाऱ्या सर्वांहून तूं जरी अतिशय पापी असलास तरी

ज्ञान-ईश्वरासंबंधींज्ञानरूप नौकेनेंच सर्व पापांपासून अनायासें तरून जाशील" असा वरील श्लोकाचा भावार्थ आहे. नृदेह नौका विषयाधीन झाल्यानें आपण आलों कोठून, जावयाचें कोठें, आपलें खरें हित कशांत आहे, इत्यादि गोष्टींचा विवेक जागृत न राहिल्यामुळें धोक्यांत सांपडते; तद्वतच नृ-देहरूप नावेचेंहि होऊन, अविवेकी नावाडी देहसुखाच्या नादीं लागल्यामुळें ती भवसागरांत बुडून जाते.

३ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम नृदेह-नावेला पैलतीरास सुखरूप पोंचविण्यास अत्यंत सहाय्यक आहेत. प्राचीन काळीं आपापल्या वर्णाश्रम धर्मानें यथासांग अनुष्ठानद्वारां आपलें हित साधण्यास प्रत्येकजण तत्पर असे; पण सांप्रत या चारांहि आश्रमांची जवळ जवळ दुर्दशा झालेली दृष्टीस पडते. वेदाध्ययन-अध्यापनादि विधिबद्दल द्विजांच्या ठिकाणीं औदासीन्य दिसतें. उपनयनोत्तर ब्रह्मचर्यपालन, अध्ययन इत्यादि गोष्टी सांप्रतच्या कालांत सद्यःफलदायी नसल्यामुळें, चरितार्थाच्या साधनांचाच विचार व आचार लोकांच्या मनांत व कृतींत उतरला आहे. गृहस्थाश्रमांतील गृहस्थांनीं आस्थेनें करावयाच्या नित्यनैमित्तिकादि कर्मांबद्दलहि उदरंभरणाच्या व्यथेपुढें फारशी जरूरी भासत नाहीं. मग पुढील निवृत्तिप्रधान दोन आश्रमांबद्दल काय बोलावें ! अशा रीतीनें आपली कर्तव्याबद्दल अनास्था व अकर्तव्याबद्दल-निषिद्धाचरणाबद्दल-आस्था वाढूं लागल्यामुळें, सद्धर्माची वाट आज फार भयप्रद भासूं लागली आहे. व्यष्टिदृष्टीनें नृदेहनौका अविवेकामुळें आत्मघातास प्रवृत्त झाली असल्यामुळें त्याचा परिणाम समष्टिदृष्टीनेंहि नृदेहनाव बहिर्मुख होऊन, निषिद्धाचरणसंपन्न होण्याकडे झाला आहे आणि त्यामुळें आज सनातन धर्म आसन्नमरण असल्याचें दृष्टीस पडतें.

४ स्वधर्माचरणाला अनुकूल परिस्थिति नसल्यामुळें लोकांकडून धर्मानुष्ठान होत नाहीं, असा एक मुख्य आक्षेप घेण्यांत येतो; आणि सूक्ष्म रीतीनें विचार करूं लागल्यास तो अगदींच उपेक्षणीय आहे, असें कोणीहि म्हणणार नाहीं. पण अल्प स्वल्प धर्माचरण सांप्रतकाळीं होणारच नाहीं असें मात्र नाहीं. प्रपंचांत उदर भरण्याच्या व्यवहाराव्यतिरिक्त आपण आपला वेळ अनेक निरुपयोगी कामाकडे खर्च करतों याचा प्रत्येकानें आपल्या मनाशीं विचार केला असतां कळून येईलच. सचित्र अचित्र वर्तमानपत्रें वाचण्यांत, मनोरंजनाकरितां करमणुकीचे खेळ खेळण्यांत आपण आपलें बहुमोल आयुष्य किती खर्च करितों, त्यांपैकीं थोडासा वेळ गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध यांपैकीं रुचेल त्या ग्रंथाचें अध्ययन करण्यास आपणांस खर्च करतां येण्यासारखा नाहीं, या गोष्टीवर कोण भरंवसा ठेवील ? प्रपंचांतील व्यवहारांत-

अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
दानं दमो दया क्षान्तिः सर्वेषां धर्मसाधनम् ॥

प्राण्यांस पीडा न देणें, प्राण्यांस पीडा न होईल अशा प्रकारचें यथार्थ भाषण करणें, दिल्यावांचून दुसऱ्याची वस्तु न घेणें, बाह्य व आंतर शौच, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांची निषिद्ध विषयांच्या ठिकाणीं प्रवृत्ति न होणें, यथाशक्ति अन्न व जल देऊन प्राण्यांची पीडा कमी करणें, निषिद्ध विषयांपासून मनाला आंवरणें, आपत्तींत पडले असतील त्यांचें रक्षण करणें, कोणी कांहीं अपराध केला असताहि चित्तास प्रक्षुब्ध होऊं न देणें इत्यादि गोष्टींचें आचरण प्रत्येकाला यथाशक्ति करणें शक्य आहे. योगयागादि साधनें करण्याची पात्रता सर्वांनाच नसते व सध्यांच्या परिस्थितींत तर योगयागाच्या गोष्टी दीर्घ श्रमाच्या आहेत. याहीपेक्षां सुलभ व पाहिजे तेव्हां सहज करितां येण्यासारखी नामसंकीर्तन ही गोष्ट आहे. पण याहि बाबतींत " कलौ करितांहि न करवे स्वकर्म । धरतांहि न धरवे स्वधर्म । न कळे कैसें भूतदयावर्म । नामहि फुकाचें नये मुखीं । " या समर्थउक्तीचा अनुभव येतो.

५ मनाला विषयसुखापासून परतवून भगवदुपासनेंत स्थिर केल्यानें, हरिनामस्मरणाची त्याला गोडी लावल्यानें, देवाच्या कथाकीर्तनांत रमूं लागल्यानें, त्रिविध तापाच्या सोसाटयाच्या वादळाला न जुमानताहि नृदेहनौका भवसागराचें उल्लंघन करून मुक्तिमंडपांत प्रवेश करूं शकेल. नृ-शरीररूप नावेचें सुकाणू इतर पश्वादिकांच्या स्वाभाविक प्रवृत्त्यनुरूप न फिरवितां तें पुरुषार्थाच्या वाटेकडे फिरविण्याची ज्या नावाडयाला बुद्धि होईल त्याची नौका भवसागरांतील कोणत्याहि प्रतिबंधाला अगर मोहाला न जुमानितां सहज पैलतीरास जाईल कारण—

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ गीता.

" माझा भक्त जरी दुराचारी असला तरी तो सत्वर धर्मात्मा-धार्मिक होतो, आणि नित्य शांतीला प्राप्त होतो. हे अर्जुना ! माझा भक्त कधींहि नाश पावत नाहीं," असें भगवद्वचन आहे. यास्तव आसुर स्वभावाचा निरोध करून मोक्षोपयोगी दैवी संपत्तीचा ह्मणजे अभय, चित्तशुद्धि, ज्ञान व योग यांच्या ठिकाणीं एकनिष्ठता, दातृत्व, बाह्य इंद्रियांचा संयम, यज्ञ, वेदाचें अध्ययन, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य भाषण, राग न येणें, संन्यास, अंतःकरणाचा उपशम, चहाडी न करणें, प्राणिमात्रावर दया करणें, वैराग्य, नम्रता, जनलज्जा, स्थिरपणा, प्रगल्भता, क्षमा, धैर्य, शुचिर्भूतपणा, दुसऱ्याचा हेवा न करणें व मानीपणाचा अभाव हीं दैवी संपत्तीचीं लक्षणें नृ-देहरूप नौकेच्या नावाडयानें आचरिल्यास त्याची नौका निर्वेध पैलतीरास जाईल.

—श्रीकृष्णार्पणमस्तु—

# श्रीसद्गुरु विश्वनाथ पाटणकर–कृपा प्रसाद
## अथवा
# आत्मदर्शनाचा आरसा.

( संपादक––**विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर**, सरवेअर, मुंबई. )

( मागील अंकावरून समाप्त. )

जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ॥
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ ज्ञानेश्वरी.

हृदयस्थ परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेवाचे ठिकाणीं निरतिशय प्रेम ठेवून, त्या प्रेमरंगांत आपलेपणही विसरून जाणें, ही खरी भक्ति होय. आनंदमूर्ति आत्माराम वासुदेवाची एकनिष्ठपणें व अनन्यभावानें भक्ति केली, म्हणजे तो प्रेमळ भक्तांच्या हृदयमंदिरीं प्रत्यक्ष प्रकट होऊन, त्यांवर कृपा करतो. भक्तांना सगुण साकाराचें भक्तिप्रेमानंदसुख निरंतर भोगावेसें वाटतें. भक्त सगुण साक्षात्कारद्वारां निर्गुण स्वरूपाला पोंचतात. भगवंताच्या नामस्मरणानें भगवत्प्रेम चित्तांत अखंड दाटूं लागतें. निरुपचार प्रेम हें अद्वैत भक्तीचें स्वरूप आहे. आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं रंगून जाणें, व आपणासकट विश्व आत्मस्वरूपवत् अनुभवणें हें खरें प्रेम होय.

एवं भागवतधर्मी जाण । जो कोणी अनन्य शरण ॥
त्यासी तुष्टोनियां नारायण । निजात्मता पूर्ण स्वयें देतु ॥
नाथभागवत.

अशा प्रकारचें निरुपम भक्तिप्रेमसुख ज्यांस प्राप्त झालें, ते भक्त ह्या जगांत धन्य होत. हेंच जीविताचें खरें सार्थक आहे. आत्माराम श्रीवासुदेव हृदयमंदिरीं प्रकट आहे. त्याच्या नित्य स्वानंदसुखाच्या समागमानें भक्तही आत्माराम होतात. अशा भक्तांना सर्व काळीं व सर्व स्थळीं आत्माराम श्रीवासुदेवावांचून जगांत दुसरा विषय नसतो. यासाठीं मुमुक्षूंनीं भगवद्भक्तीवांचून, आयुष्याचा एक क्षणही व्यर्थ दवडूं नये. सर्वदा सर्वभावें हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवाचेंच चिंतन करावें, त्यांचे गुणानुवाद गाण्यांत रंगून जावें, म्हणजे तो प्रभु तात्काळ प्रत्यक्ष प्रकट होतो, आणि भक्ताचा उद्धार करतो.

सद्गुरु उपासनाकाळीं ज्ञान, भक्ति व वैराग्य हीं एकाच वेळीं कशीं घडतात, त्याचा अनुभव हृदयीं पटवितात. उपासना ज्याची त्यानेंच केली पाहिजे, समाजांत आत्मोपासना पूर्ण होत नाहीं. आत्मोपासनाकाळीं सच्छिष्याचें पूर्वसंचित व क्रियमाण यांचा नाश होतो. प्रारब्ध भोग संपण्यासाठीं मात्र राहतें.

आत्मोपासनेच्या वेळीं आवरणशक्तीची निवृत्ति, मिथ्याज्ञानाचा नाश व विक्षेपापासून झालेल्या दुःखाची निवृत्ति हीं होतात.

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥
इति यस्य दृढा बुद्धिः स मुक्तो नात्र संशयः ॥ आचार्य. ॥
सोहं हंस तत्वमसी । तें तूं ब्रह्म आहेसी ॥
विचार पहातां स्थिति ऐसी । सहजचि होते ॥ श्रीसमर्थ. ॥

जें जें म्हणून आकारानें युक्त किंवा दृष्टीला दिसणारें आहे, किंवा जाणतां येणारें आहे, तें तें नाशिवंत आहे, असें समजून त्याचा त्याग करावा. आणि मग जें बाकी राहील, तेंच परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेवस्वरूप होय. हा आत्मा पंचकोशाहून वेगळा, स्वयंज्योति, पंचअवस्थातीत, पंचदेहातीत, निर्विकार, निरंजन आणि सच्चिदानंदरूप आहे. आत्म्याची अवस्था म्हणजे शुद्ध चैतन्याची होय. प्रत्यग्रूपानें निरंतर 'मी मी' यास आपल्या चैतन्य शक्तीनें स्फुरण देणारा आत्मा, जागृति, स्वप्न, सुषुप्ति अवस्थांचे ठायीं अत्यंत स्पष्टपणें भासमान होतो. हृदयामध्यें सच्चिदानंदरूपानें स्फुरण पावत असतो. अज्ञानी मनुष्य पाण्यांत प्रतिबिंबित झालेल्या सूर्यमंडळाला भ्रांतीनें सूर्य मानतो त्याप्रमाणें अविचारी मनुष्य उपाधींत असलेल्या चिदाभासाला भ्रांतीनें 'मी मी' असेंच मानतो. यासाठीं पाणी आणि त्यांत असलेलें सूर्याचें प्रतिबिंब हीं सर्व सोडून दिलीं असतां, जसा वेगळा दोघांस प्रकाशित करणारा स्वयंप्रकाश सूर्य मनुष्य पहातो, त्याचप्रमाणें देह, बुद्धि आणि चिदाभास यांस सोडून दिलें असतां, द्रष्टा, अखंड बोधरूप, सर्वांना प्रकाशित करणारा, हृदयस्थ परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेव उत्तम प्रकारें जाणतां येतो.

जाणिजे परमात्मा निर्गुण । तयासीचि म्हणिजे ज्ञान ॥
त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ श्रीसमर्थ. ॥

ज्ञान दोन प्रकारचें आहे. एक परोक्ष ज्ञान, आणि दुसरें अपरोक्ष ज्ञान. शून्यब्रह्माचें रूप आत्म्याच्या रूपाहून भिन्न आहे, असें ज्या ज्ञानानें जाणलें जातें, किंवा वेदांतशास्त्राच्या व महावाक्याच्या शाब्दिक अर्थानें आत्मा सच्चिदानंदरूप आहे, असें जें जाणणें, त्याला परोक्ष ज्ञान असें म्हणतात. आणि सद्गुरु बोधानें, वेदांतशास्त्राच्या ज्ञानानें, व महावाक्याच्या बोधानें आत्मा आपणच आहों, हें अनुभवानें जाणणें, याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात. तत्ववेत्ते सद्गुरु यांनीं महावाक्याचा बोध करून, सर्व 'जगत् मिथ्या आणि ब्रह्म सत्य आहे' हें जरी ठसविलें, तरी प्रमाणसंभावना उत्पन्न होते. प्रमाणसंभावना म्हणजे वेदांतशास्त्र, सद्गुरु व महावाक्याचा बोध, हीं जें सांगतात, तें खरें कशावरून ? ही शंका सद्गुरु बोधानें निवृत्त होते. नंतर प्रमेयासंभवना उत्पन्न होते. प्रमेयासंभावना म्हणजे मी आनंदस्वरूप आत्मा कसा ?

ही तळमळ मनाला लागते. ती आत्ममननानें नाहींशी होते. नंतर अनेक जन्मांच्या वासनायुक्त संस्कारामुळें देहादिक प्रपंच—जग खरें वाटतें, व तेणें-करून आत्मानुसंधानापासून च्युति होते. ह्याचें नांव विपरीत भावना, ही आत्मनिदिध्यासानें दूर होते.

सत्य, ज्ञान, अनंत । ब्रम्ह मी निश्चित ॥

ऐसें जाणूनि मज भजत । उत्तम भागवत ते जाण ॥ नाथभागवत.

सद्गुरु शिष्यास आत्म्याचें स्वरूप सहा प्रकारांनीं ओळखतां येतें असें सांगतात. जसेः—उपक्रमोपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद, आणि युक्ति हे होत. उपक्रम म्हणजे हें सकल विश्व त्या आत्म्यानें व्यापिलें आहे, व उपसंहार म्हणजे आत्मा सर्व ठिकाणीं परिपूर्ण व्यापून निराळा राहिला आहे. अभ्यास म्हणजे आत्मा अचल, अद्वितीय असून, तो सर्व विश्वाच्या हृदयांत वास करतो, तें पाहणें. अपूर्वता म्हणजे जग, पंचमहाभूतात्मक देह, पंचप्राण, दश इंद्रियें, पंचविषय, अहंस्फूर्ति, शून्य ब्रह्म इत्यादि जड विकारी व मायिक हीं आत्म्याचे ठिकाणीं पोंचलीं नाहींत. फल म्हणजे आत्मस्वरूप एक अद्वितीय सच्चिदानंद आहे, असें अपरोक्ष ज्ञानदृष्टीनें पाहाणारांस शोक व मोह होत नाहीं. अर्थवाद म्हणजे काम्यकर्मे करून अज्ञानप्रचुर स्थावर योनींत जातात, अशी जीवाची निंदा करून, आत्मैक्य जाणणारांची स्तुति करणें. युक्ति म्हणजे आत्म्याच्या सत्तेमुळें सूत्रसंज्ञक प्राण प्राण्यांचीं देहतः प्रकाशादि कर्मे विभागतात.

पाहतां देहांचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ॥

तत्वें तत्व झाडितां सार । आत्माच उरे ॥ श्रीसमर्थ. ॥

आत्मा सत्य आहे, आणि पंचदेहादिक सर्व प्रपंच जगत् खरें नसून, सच्चिदानंदरूप आत्म्याचे ठिकाणीं कल्पित आहेत. ज्याप्रमाणें रज्जूच्या ठिकाणीं सर्प कल्पित असतो, पण त्या कल्पित सर्पाची सत्ता दोरीहून भिन्न नसते, किंवा शिंपल्याच्या ठिकाणीं कल्पिलेल्या रुप्याची सत्ता शिंपल्याहून भिन्न नसते, त्याप्रमाणें पंच देहादिक सर्व प्रपंचाची सत्ता आत्म्याच्या चैतन्य शक्तीहून भिन्न नाहीं. सच्चिदानंदरूप आत्म्याचे ठिकाणीं जें कल्पित असद्रूप भासतें, त्या असद्रूपानें भरलेल्या पंचदेहादिक प्रपंचानें द्वैत होत नाहीं. पंच देहादि सर्व जगत् असत् आहे, आणि आनंदस्वरूप आत्मा काय तो एकच सत्य आहे. आत्मा सर्वव्यापक असून निराळा आहे. अस्ति, भाति आणि प्रिय या तीन रूपांनीं तो नामरूपात्मक सर्व पिंडब्रह्मांडांस व्यापून राहिलेला आहे. पंच देहांत द्रष्टरूपानें, पंचावस्थेंत साक्षिस्वरूपानें, पंचकोशामध्यें प्रकाशरूपानें, तो आत्मा व्यापक असून निराळा आहे.

आत्मा एक स्वानंदघन । आणि ' अहमात्मा ' हें वचन ॥
तरी मग आपण कैचा भिन्न । उरला तेथें ॥ श्रीसमर्थ.॥

आपण सच्चिदानंदरूप आहों, म्हणजे जागृत, स्वप्न, सुषुप्तींत आहों, म्हणून सत् आहों, या तीन अवस्थास जाणतों, म्हणून चित् आहों आणि परम प्रेमाचें स्थान आहों, म्हणून आनंद आहों. आपण स्वतः स्वभावतः प्रकाशरूप आहों, आपण दुसऱ्यास प्रकाश करतों, व आपणास कोणी प्रकाश करीत नाहीं, म्हणून आपण स्वयंप्रकाश आत्मा आहों. जगांत जे पदार्थ दिसतात, ते सूर्य, दीप इत्यादिकांच्या प्रकाशानें दिसतात, म्हणजे ते पदार्थ परप्रकाश आहेत, असें समजावें. आणि जी वस्तु स्वतः प्रकाशरूप असून दुसऱ्या वस्तूस प्रकाश करते, व जिला प्रकाश करणारी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं; अशीला स्वयंप्रकाश म्हणावी. अशी स्वयंप्रकाश वस्तु एक सच्चिदानंदरूप आत्मा होय. त्यावांचून जो कांहीं जगांतील नामरूपात्मक भूतभौतिक प्रपंच आहे, तो सर्व परप्रकाश आहे. आत्मा स्वयंप्रकाश आहे याचा निश्चय अनुभवानें, सद्गुरूच्या बोधानें आणि वेदश्रुतिस्मृतींच्या प्रमाणांनीं दृढ होतो. विद्येच्या उपाधीनें ' तत् ' पदाचा अर्थ शिव, अविद्येच्या उपाधीनें ' त्वं ' पदाचा अर्थ जीव, आणि ब्रह्मविद्येच्या उपाधीनें दोन्ही पदांचें ऐक्य करणारे ' असिपद ' याचा अर्थ ईश्वर. हे तीन उपाधी सोडून, सद्गुरुबोधानें एक अद्वितीय आनंदमूर्ति आत्मस्वरूप सिद्ध होतें.

अशा प्रकारें तत्ववेत्त्या सद्गुरूचा बोध हृदयांत सांठवून, त्याच्या मननिदिध्यासनाच्या योगानें, आपण ज्ञानस्वरूप व स्वयंप्रकाश आत्माराम श्रीवासुदेव आहों, असा त्याचा अपरोक्ष साक्षात्कार करून घेणारा सच्छिष्य जीवन्मुक्त होऊन कृतकृत्य झाला.

## उपसंहार.

### आत्मबोधाची दीपिका

आतां ब्रह्मज्ञानाची किल्ली । सांगेन एकचि बोली ॥
ज्याची कल्पना निमाली । तोचि प्राप्तपुरुष ॥ स्वात्मसुख. एकनाथ.

सुषुप्तिकाळीं व मरणकाळीं पंचमहाभूतात्मक स्थूलदेह आणि पंचमहाभूतांचे पंचवीस विकार अशीं तत्वें प्राणांवांचून जड व अजाण याचा अनुभव येतो. तसेंच स्वप्नकाळीं पंचप्राण, पंच उपप्राण, दशइंद्रियें, व पंचविषय अशीं तत्वें मनावांचून जड व अजाण आहेत, यांचा अनुभव येतो. तसेंच सुषुप्तिकाळीं अंतःकरणपंचक वृत्ति, अहंस्फूर्तिवांचून जड व अजाण आहेत, यांचा अनुभव येतो. तसेंच तूर्यावस्थेच्या वेळीं अहंस्फूर्ति, शून्यब्रह्मावांचून जड व अजाण आहे, याचा अनुभव येतो. तसेंच उन्मनि अवस्थेच्या वेळीं शून्यब्रह्म, चैतन्यब्रह्मावांचून जड व अजाण आहे, याचा अनुभव येतो. येथपर्यंत

वेदशास्त्रांची, व इतर सर्व धर्मशास्त्रांची मर्यादा झाली. पुढें हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवांचा अवतार, जो अध्यात्मतत्त्ववेत्ता सद्गुरू चैतन्यनाथ, यास शरण जाऊन आत्मोपासना व आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावें. आणि त्याच्या मनन-निदिध्यासनानें आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपीं तद्रूप व्हावें, असें ह्या आत्मज्ञानविचाररूपी आत्मदर्शनाच्या आरशाच्या योगानें दिसून येतें.

हें विश्वाचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ॥
किंबहुना चराचर । आपण जाहाला ॥ ज्ञानेश्वरी.

आपण केवळ ज्ञानस्वरूपानें जिकडे तिकडे स्वानंद सुखामध्यें गढून राहिलों आहों, अशा प्रकारचा जो सतत अद्वैततत्वज्ञानरूपी आत्मदर्शनाच्या आरशाच्या योगानें विचार करणें, त्याला आत्मनिदिध्यास म्हणतात. यामुळें चिदाकाशरूपी आपण-सच्चिदानंदरूप आत्माच मात्र सर्वत्र भरलेला आहे, असें दिसूं लागतें. तें आत्मस्वरूप ज्ञानानें व आनंदानें परिपूर्ण भरलेलें आहे. तें ज्ञानासच जाणतें. पंच देहाचा निरास करून, कधींही नाश न होणारें स्वयंप्रकाश व ज्ञानानें भरलेलें आत्मस्वरूप सद्गुरुबोधानें जाणून घ्यावें. श्रीसद्गुरुनाथ उपासनाकाळीं आपल्या अभावासह, ह्मणजे पंचदेहातीत, पंच अवस्थातीत असणाऱ्या शुद्ध चैतन्य ब्रह्माशीं एकरूप करतात. तेंच स्वयंप्रकाश, सच्चिदानंद आत्मस्वरूप होय. अशा प्रकारें आत्मस्वरूपाचा अभ्यास करून, अद्वैततत्वज्ञानरूपी आत्मदर्शनाच्या आरशाच्या योगानें आत्मस्वरूपाची पक्की ओळख करून घ्यावी आणि निश्चळ स्वयंप्रकाश अशा त्या आत्मस्वरूपाचे ठायीं मनाला अखंड रंगवावें. स्वयंप्रकाश आत्मस्वरूपाच्या आनंदाचा उपभोग घेत, तें मन डोलत राहील, व स्वानंदसुख भोगीत राहील. ही अद्वैतस्थिति प्राप्त होतेवेळीं, अंगीं आठही सात्त्विक भाव प्रकट होतात. चित्त हें चैतन्यामध्यें लीन होऊन जातें. ज्ञान आत्मस्वरूपीं मिळन, ज्ञानी अखंडित, निरुपम अशा आनंदाचा अनुभव घेतो. ह्या अनुपम सुखानंदाची गोडी अमृतापेक्षांही अधिक आहे. येथें आनंदच आनंदाचा उपभोग घेतो. सुखच सुख अनुभवतें. हें अनुभवगम्य आहे. ह्या स्थितीचा अनुभव बोलतां येत नाहीं. असे ज्ञानी भक्त मुक्तिसुखाचा अनुभव घेऊन, सद्गुरुपरमात्मा याची अनन्यभावें सेवा करीत असतात. हिलाच ज्ञानोत्तरभक्ति असें ह्मणतात.

भक्तिं लब्धवतः साधो किमन्यदवशिष्यते ॥
मय्यनंतगुणे ब्रह्मण्यानंदानुभवात्मनि ॥ भा० ए० ॥

रहस्यः-" सकल षड्गुणैश्वर्यसंपन्न, आनंदमूर्ति, आत्माराम, सगुणब्रह्म, अशा वासुदेवाची भक्ति ज्याला लाभली, त्याला येथें आणखी मिळवावयाचें असें काय राहिलें."

हें समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ॥
म्हणोनि भक्तामाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ॥ ज्ञानेश्वरी.

अद्वैततत्वज्ञानाचें द्वैताशीं विलक्षण ऐक्य आहे. हें महाराष्ट्रीय साधुसंतांचे व तत्ववेत्त्यांचे प्रासादिक ग्रंथ पाहिले ह्मणजे दिसून येतें. अद्वैत तत्वज्ञानानें आत्मदेवता–श्रीवासुदेव ह्यास प्राप्त करून घेण्याची प्रथम पायरी सगुणाची उपासना करणें ही होय. भगवत्प्रसाद होण्यास सगुणभक्ति हेंच उत्कृष्ट साधन आहे. मोक्षापेक्षांही भक्ति श्रेष्ठ आहे. भक्ति दोन प्रकारची आहे, ह्मणजे मुखानें नामसंकीर्तन करणें, व चित्तानें भगवन्मूर्तीचें ध्यान करणें ही होय. भक्तीची पराकाष्ठा झाली, ह्मणजे भक्ताला "वासुदेवः सर्वमिति" अशा प्रकारचा अनुभव येतो. सांप्रतकाळीं संसारसागरापासून तरून जाण्यास भक्तीशिवाय दुसरें श्रेष्ठ व सुलभ साधन नाहीं.

येथ पार्था पुढत पुढती । तेंचि तें सांगों किती ॥
जरी मिया चाड तरी भक्ति ॥ न विसंबे गा ॥ ज्ञानेश्वरी.

कलियुगीं जीवांस हृदयस्थ परब्रह्म–आत्माराम श्रीवासुदेवस्वरूपाची प्राप्ति होण्यास भक्तीशिवाय दुसरें साधन नाहीं. परमेश्वराविषयीं प्रेमलक्षणा जी मनोवृत्ति, तिलाच भक्ति असें ह्मणतात. परमेश्वर भक्तीनें जसा वश होतो, तसा सांख्ययोगादि इतर साधनांनीं होत नाहीं. भक्तीनेंच अनंत जीव भगवत्पदाला पोंचले आहेत. मुक्तिसुखापेक्षांही परमेश्वराचें भक्तिसुख हेंच अधिक श्रेष्ठ आहे. भक्तिप्रेमाशिवाय मजा नाहीं. ज्ञेणेंकरून भक्तिसुखानंद यथेच्छ घ्यावयाला सांपडेल, जेथें प्रेमसुखाच्या यथेच्छ क्रिया चालतील, तोच भक्तिमार्ग अनुपम सुखाचा व आनंदाचा आहे. भक्तिसुख लुटण्यांत खरी मजा आहे. साखर होऊन तिचें सेवन करण्यांतच खरी गोडी आहे. परमेश्वर भक्तिप्रिय आहे. परमेश्वराचें कोणत्याही रूपानें सेवन केलें, त्याची निःसीम भक्ति केली, त्याचें चिंतन केलें, किंवा नामस्मरण केलें, म्हणजे तो भक्तावर प्रसन्न होतो. त्याला सुखी करतो. आपलें अढळपद देतो. सर्व जगाचें ध्येय एक तो परमेश्वर आहे.

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये ॥
भावे हि विद्यते देवो तस्माद्भावोहि कारणं ॥ स्मृतिः ॥
येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मजसी भजले ॥
तयां ऐलीच थडी सरलें । मायाजाळ ॥ ज्ञानेश्वरी.
तया हृदयस्थाच्या ठायीं । दृढदृष्टि जंव बसली नाहीं ॥
तंव सगुणमूर्ति हृदयीं । भजावी पाहीं सर्वात्मभावें ॥ नाथभागवत.

निर्गुण आत्माराम श्रीवासुदेवाची उपासना, ज्याचे बुद्धीस आकलन होत नाहीं, त्यानें प्रथम सगुण उपासना करावी. सगुण उपासना ह्मणजे परमेश्वराच्या सगुण स्वरूपाचें–त्याच्या सुंदर ध्यानगंभीर मूर्तीचें, मोठ्या प्रेमानें भजन, पूजन,

अर्चन, गुणकीर्तन इत्यादि मार्गांनें सेवन करणें हें होय. भक्तानें आपल्या प्रेमाचा व आनंदाचा विषय तो करावा. परमेश्वर ही भावना कशावरही आरोपित केलेली असो, परमेश्वर भावनेनें त्याची सेवा केली तर ती त्याला पोंचते. ध्यानाला सुंदर व हास्यमुखमूर्ति घ्यावी. हृत्कमलामध्येंच ध्यान करावें. भक्तानें आत्माराम श्रीवासुदेवाच्या मूर्तीचें चरणापासून मस्तकापर्यंत ध्यान ठसविण्यास शिकावें. म्हणजे चित्ताची स्थिरता, तन्मयता व तद्रूपता होते. नंतर ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटी नाहींशी होते. ईश्वर सगुण स्वरूपांनीं या जगांत, भक्तीचे ठिकाणीं नित्य नांदत आहे. असें म्हटलें आहे कीं:--

भक्तिप्रियः श्रीपतिः ॥

जन्ममरणरूपी संसारदुःखापासून एक हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवच सोडविणारा आहे, असा दृढ विश्वास असल्यावांचून. त्यावर आत्यंतिक प्रेम बसणार नाहीं; आणि अशा एकनिष्ठ भक्तीवांचून संसारांतून मुक्तता होणार नाहीं. परमेश्वराला अनन्यभक्तीचीच आवड आहे, यासाठीं मनुष्यानें भक्तीचा झरा आपल्या अंतःकरणांत वहाता ठेविला पाहिजे. नित्य नामस्मरण करीत असावें.

परी तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ॥
जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ ज्ञानेश्वरी.
मुखीं उच्चारितां नाम । पुढें उभा मेघश्याम ॥ तुकाराम.

नामस्मरण हें अत्यंत सुलभ असें साधन आहे. कोठें जावयास नको, कांहीं खर्चावयास नको, विशेष श्रम व कष्ट नाहींत. बसल्या जागीं वाटेल तेव्हां नामस्मरणादि साधनांनीं हृदयस्थ आत्माराम श्रीवासुदेवाविषयीं भक्तिसुख प्राप्त करून घेणें, हाच जीवांचा परमधर्म आहे. आणि भगवन्नामोच्चार करणें हीच भगवंताची सेवा आहे. ती केल्यानें भक्त संसारसागरांतून तरून जातो. हरिभजनामध्यें जो रंगला, तोच धन्य होय

परी होचि आत्मसिद्धि । जो कोणी भाग्यनिधी ॥
सद्गुरुकृपालब्धि--। काळीं पावे ॥ १ ॥
तेवीं सदभ्यास निरंतर । चित्तासी परमपुरुषाची मोहर ॥
लावी मग शरीर । जावो अथवा राहो ॥ २ ॥ ज्ञानेश्वरी.
याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होईजे निराळें ॥
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ श्रीसमर्थ.

मनुष्यच ( जीवात्मा ) स्वतः सच्चिदानंदरूप परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेव आहे पण हें नुसतें ग्रंथ वाचून पढून अनुभवास येणार नाहीं. एक वेळ सद्गुरुबोधानें पंचदेहातीत होऊन, ज्ञानदृष्टि प्राप्त झाली, आणि जीवात्मा व परमात्मा ह्यांचें ऐक्य झालें कीं अद्वैततत्वज्ञानी बनला. नंतर त्यानें स्वयंप्रकाश आत्मस्वरूपाचें अतिशय प्रेमानें ध्यान धरून, स्वरूपानुसंधान ठेवीत

जावें. संसारासंबंधानें भ्रम पडूं देऊं नये. आत्मस्वरूपाचा ध्यास धरून, त्याच्या चिंतनाकडे लक्ष्य ठेवावें. वेदांतशास्त्र, अध्यात्म निरूपण सदोदित ऐकत जावें. एकल्याचें मनन व निदिध्यास करून तें अनुभवावें. म्हणजे आत्मस्वरूपाची प्राप्ति निःसंशय होते. नेहमीं हृदयस्थ परब्रह्म आत्माराम-श्रीवासुदेवाची कृपा वाढत जाईल, अशा रीतीनें वागत जावें, म्हणजे मुक्तीचा सोहळा भोगतां येतो. मुमुक्षु पुरुषानें संसारबंधनास जें मिथ्या वस्तूचें अनुसंधान, तें सोडून देऊन 'मी स्वतः परब्रह्म आत्माराम श्रीवासुदेव आहें' अशी आत्मबुद्धि निश्चयाची करून रहावें. आत्मनिष्ठा स्वानंदानुभवानें सुख देत असते. सद्गुरूपासून ज्ञानदृष्टि प्राप्त करून घेऊन, आत्मस्वरूपाची पक्की ओळख करून अखंड बोधरूप सच्चिदानंदरूप आत्म्याचे ठिकाणीं रंगून जावें, म्हणजे संसारबंधनातून मुक्त व्हावयास होतें. भ्रमराचें ध्यान करणारा किडा, जसा स्वतः भ्रमरपणाला पावतो, त्याप्रमाणें एकनिष्ठपणें आत्म्याचें ध्यान करणारा पुरुष परमात्मरूपास पावतो.

श्रवण मननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ॥
रोकडा मोक्ष उद्धार । बोलोंचि नये ॥ श्रीसमर्थ.

मुमुक्षूनें आपल्या नेत्रावरील पंचकोशरूपी पटलें काढण्यासाठीं ब्रह्ममूर्ति सद्गुरुनाथ यांच्या मुखानें ह्या आत्मदर्शनाचा आरसारूपी अद्वैत तत्वज्ञानाचा प्रयोग केला असतां ज्ञानदृष्टि उघडून हृदयरूपी दर्पणांत अंगुष्टपर्व स्वयंप्रकाश आत्मज्योति दिव्य दिसते. त्याची प्रभा चंद्रकांतीसारखी असते. सद्गुरूकृपेनें एकदां आत्मस्वरूपाची पूर्ण ओळख झाली म्हणजे अज्ञाननिद्रा जाऊन, सच्चिदानंदात्मानुभवजागृति प्राप्त होते. द्वंद्व राहात नाहीं. देहबुद्धीचा लोप होतो. शांतिसुखाचा लाभ होतो. पांचवी अवस्था 'उन्मनि' तीही मावळून जाते. सर्व विश्व वासुदेवमय होतें. अनुपम अशा भक्तिसुखानंदांत रहातां येतें. म्हणून मुमुक्षुनें ह्या अद्वैत तत्वज्ञानाचें श्रवण, मनन, व निदिध्यासन करून सर्व जग व त्यांतील जन चिद्रूप आहे, असें दिव्य ज्ञानदृष्टीनें पहावें म्हणजे त्याला सर्व जग आत्मस्वरूपमय दिसतें, व तो स्वतःही आत्मस्वरूप असतो. म्हणून त्याला आपल्याशिवाय जगांत दुसरें कांहींच दिसत नाहीं. तो निरुपाधिक ब्रह्मानंदाचा पूर्ण अनुभव घेऊन, स्वयंज्योतीमध्यें रममाण असतो. हिला अखंड स्वरूपस्थितीची तूर्यभूमिका असें म्हणतात. अशाला परमानंदाची प्राप्ति झाली असें समजावें. असे पुरुष अद्वैत तत्वज्ञानाचा कल्पवृक्ष होत. त्यांस परमेश्वरता प्राप्त होते.

मीचि देवो मीचि भक्तू । पूजोपकार मी समस्तु ॥
मीचि मातें पूजितू । ही इत्थंभूत उपासना ॥ नाथभागवत.

गेलों ज्याच्या शुद्धीशीं । पाहे तें आपणांशीं ॥
तैं विस्मित मानसीं । आश्चर्य करी ॥ १ ॥
जया इतुकें धुंडिलें । तें जवळीच देखिलें ॥
आपणा पाहूं गेलें । तेंचि आपण ॥ दासबोध.

धन्य म्हणे तुका जन्मा तींच आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥

मुमुक्षूनें भक्तिप्रिय हृत्कमळीं असणारा आनंदमूर्ति आत्माराम श्रीवासुदेव यास सद्गुरुबोधानें जाणून, त्याच्या अनुपम अशा भक्तिप्रेमानें निरंतर अंतःकरण रंगवून सोडावें. आणि अद्वैत भक्तीचा अखंड सुखानुभव घ्यावा. देव होऊन देवाला भजावें ही अद्वैत भक्ति आहे. हीच मुक्तीवरील भक्ति होय. निरंतर प्रेमयुक्त अंतःकरणानें व अनन्यभावानें त्या सच्चिद्घनंद आत्माराम श्रीवासुदेवाच्या स्वरूपाचें अखंड अनुसंधान, व गुणांचें संकीर्तन, भजन करावें. आणि 'सर्वं विष्णुमयं जगत्' म्हणजे परमात्माच विश्वरूपानें नटला आहे असें जाणून, जीवन्मुक्तीचा सोहळा भोगीत रहावें. सच्चिदानंदाचें स्वरूप हृदयांत प्रकट झालें म्हणजे, सर्व प्रपंचाचा लय होऊन, परमात्म्याशिवाय कांहींच दिसत नाहीं. ह्याप्रमाणें अद्वैत तत्वज्ञानाचें रहस्य, 'हरिदर्शन' हें जाणून, तें सदैव आचरणांत आणावें, हेंच खरें जीवितसाफल्य होय. येणेंकरून भगवत्पदास पोंचतां येतें. पुण्यकीर्ति भगवान् श्रीवासुदेवाच्या सगुणरूपाची भक्ति करणें हेंच सर्व सार होय. "मुक्तीवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण—" तुकाराम. जीवाचें खरें स्वहित, खरा लाभ, खरी शांति, खरें सुखसमाधान, हें भगवद्भक्तीतच आहे. भवांतून तरून जाऊन, नराचा नारायण भक्तीनें होतां येतें, व सच्चिदानंदपदवी प्राप्त होते. ह्या अद्वैत तत्वज्ञानरूपी आरशाची फलश्रुति अशी आहे कीं, हें ज्ञान एकाग्र चित्तानें श्रवण केलें असतां, किंवा ऐकिलें असतां देहबुद्धीचें बंधन तुटतें. अंतःकरणाची शुद्धि होऊन, बुद्धीचा सत्यस्वरूपाविषयीं निश्चय होतो. अभिमान गळीत होतो. पंचकोशातीत आत्माराम श्रीवासुदेव ओळखतां येतो. मन भगवंताकडे जडून, तत्स्वरूप होतें. आत्मस्वरूपाची स्थिति अंतःकरणांत बिंबते. जन्माचें सार्थक्य होऊन, मोक्षप्राप्ति होते. ज्ञानोत्तरभक्ति घडून मुक्तिसुखानंद भोगतां येतो. अशा प्रकारें मुमुक्षूचें कल्याण होऊन, तो कृतकृत्य होतो.

श्रीसद्गुरुनाथ भगवान् वासुदेवार्पणमस्तु. ॥

# दोन चांगलीं माणसें गेलीं.

## १ आण्णा विजापूरकर ( १८६३--१९२६ ).

प्रो० विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए. यांचें नांव महाराष्ट्रांतील राष्ट्रीय शिक्षणाचे आद्यप्रवर्तक ह्मणून कायम राहील. 'समर्थ विद्यालयाचे' संस्थापक व 'ग्रंथमाला' व 'विश्ववृत्त' या मासिकांचे संपादक म्हणून महाराष्ट्रांत त्यांची ख्याति आहे. अण्णांना एकवार कारागृहवासही घडला होता, त्यामुळें किंवा एकुलत्या एक मुलाच्या अकालीं निधनामुळें हताश न होतां त्यांनीं आपलें राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य नेटानें व धैर्यानें सतत चालू ठेवलें होतें. 'स्वदेश स्वधर्म स्वभाषादिकांचा । जगीं मान व्हावा असा हेतु साचा' चित्तीं धरून त्यांनीं कायावाचामनानें लोककार्य करण्यांत आयुष्य वेंचलें ही मोठी गोष्ट आहे. आण्णांचें हें लोककार्य प्रशंसनीय आहेच, पण यापेक्षांही त्यांचें चारित्र्य फारच वंदनीय असे. आण्णांसारखा साध्या राहणीचा, निर्मळ मनाचा, आपल्या मताप्रमाणें देशकार्य करीत राहून लहानापासून थोरांपर्यंत सर्वांशीं सारख्या प्रेमभावानें व मोकळेपणानें राहणारा सच्छील पुरुष विद्वानांत अत्यंत विरळ सांपडतो. त्यांचा स्वदेशी बाणा, स्वदेशी राहणी व स्वदेशी विचार सर्वांस मोहून टाकीत. आण्णांच्या स्वभावांतली ह्मणजेच हृदयांतली गोडी कांहीं अपूर्व असे. 'मोकळें मन रसाळ वाणी । याचि गुणीं संपन्न' ह्या तुकोबारायांच्या उक्तीचें मूर्तस्वरूप आण्णा होते. 'यः क्रियावान् स पंडितः' ह्या वचनाप्रमाणें आण्णा क्रियावंत पंडित होते. त्यांच्या आचारविचारांत मोकळेपणा व निर्मळपणा अलौकिक असे. 'विद्या ददाति विनयं' याचें प्रत्यंतर आण्णांना पाहून मिळत असे. आण्णांचे हजारों विद्यार्थी, स्नेही, बरोबरीचे कार्यकर्ते पुरुष महाराष्ट्रांत असून सर्वतोमुखीं सौजन्यप्रेमाबद्दल आण्णांचें गौरव होत असे. आचरण अत्यंत शुद्ध, विचार पवित्र अशी ही मूर्ति पुन्हा दृष्टीस पडणार नाहीं याबद्दल सर्व लोक हळहळत आहेत.

## २ रा. ब. लक्ष्मणराव आपटे ( १८७६--१९२६ ).

पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष रा. ब. आपटे हे गत झाले. हे आमचे कॉलेजापासूनचे मित्र होते. १८८६ सालीं पुण्यांत इंग्रजी शिक्षणासाठीं आह्मीं प्रथम पाऊल टाकलें तेव्हांपासून आपटे यांचा परिचय. हे चांगले बुद्धिमान्, लोकांत मिळून मिसळून वागणारे, शक्य तोंवर दुसऱ्याच्या उपयोगीं पडणारे असून यांची रहाणी साधी असे. हे घरची गरीबी असून स्वपराक्रमानें उदयाला आले होते. यांची पुण्यांतील हुषार उत्तम वकील ह्मणून ख्याति होती. लो० टिळक व महात्मा गांधी यांना पुणें म्युनिसिपालिटीनें यांच्याच नेटामुळें व यांच्याच हातानें मानपत्रें दिलीं. पक्षभेदाच्या वावटळी पुण्यासारख्या ठिकाणीं व कमिटींत वावरत असतांना सर्वांशीं गोडीनें वागून,

बहुमत आपल्या बाजूनें संभाळून व पुन्हां आपली सर्वांवर छाप ठेवून वागण्याची यांची हातोटी विलक्षण होती. ना. गोखले यांच्या मागें आपटे यांनींच असा नांवलौकिक मिळविला.

---



# मोरोपंती वेंचे.

आवृत्ति दुसरी. ] [ किं. १॥१२

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाऊण लाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकरांनीं म्हटलें आहे, " महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहानथोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे " या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत:—

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ, कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

# सार्थ श्रीदासबोध.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुत आहे. परमार्थ, प्रपंच व राजकारण यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही दिव्यवाणी आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. पांगारकर यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्याचें मराठी सुबोध भाषांतरहि केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर **वर मूळ व खालीं सरळ भाषांतर** असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची कल्याणस्वामींची प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहुन तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोनही प्रतींचा मेळ पाहून रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत. पृ. सं. ७५०. सुंदर सोनेरी बाइंडिंग. किंमत ४ रु.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता.

संशोधकः—**प्रल्हाद व्यंकटेश गुब्बी.**

## पद २९.

सावळा सकुमार ज्याचें राजस लावण्य ॥ सूर्यवंशीं भूषण हृदयीं विलसे कारुण्य ॥ जटामुगुटमंडित शरीरीं वैराग्य तारुण्य । जानकीसमवेत ज्यानें सेविलें आरण्य ॥ १ ॥ जनस्थानीं गंगातटीं वसवुनी पंचवटी । मुनिजना दुःखदायक ऐसे राक्षस निवटी ॥ कोदंड घेउनी लागे हरिणाचे पाठीं । येक्या बाणें मारिला तो जानकीच्या साठीं ॥ २ ॥ ज्याच्या नामस्मरणें जडजीव उद्धरती । तो हा वश केला जिहीं धन्य ते भावार्थी ॥ दक्षिणभागीं लक्ष्मण उभा मध्यें दाशरथी । मध्वनाथ तिघाजणा ओवाळी आरती ॥ ३ ॥

## पद ३०.

सगुणस्वरूप ज्याचें लावण्य अमुप । रत्नजडित सिंहासनीं अयोध्येचा भूप । वामभागीं जगन्माता जानकी सुखरूप । कपिकटकाचा नायक हनुमंत समीप १ भरतशत्रुघ्न बंधु उभा पार्श्वभागीं । छत्रचामरें विंझणा वारिती रामालागीं । सुग्रीवादिक वानरसेना राघवीं अनुरागीं । ऐसें ध्यान उमटतें साधकाच्या अंगीं ॥ २ ॥ शतकोटीचें बीज तो हा कौसल्येचा तान्हा । ब्रह्मादिक देव ज्याला आणिताती ध्याना । सनकादिक योगियांला देतो जो वरदाना । मध्व-नाथीं निजदासा प्रसन्न तो जाणा ॥ ३ ॥

## पद ३१.

राजस दशरथबाळ । सीतयेला घाली माळ ॥ ध्रु० ॥ कमलदळांपरी नयन विशाल । मृगमदचर्चित भाळ ॥ १ ॥ मदनमनोहर रूप जयाचें । म्हणवी परम दयाळ ॥ २ ॥ कनक धनुर्धर दीन जनोद्धर । दानव कुळींचा काळ ॥ ३ ॥ काळा डोंगर अंतरीं वोंगळ । रावण तो फटकाळ ॥ ४ ॥ देखुनी तुझें रूप वेडावले भूप । अंतरीं घोटिती लाळ ॥ ५ ॥ येवढें त्रिंबक धनु कैसा उचलील नेणु । वेडा जनक नृपाळ ॥ ६ ॥ मध्वमुनीश्वर सगुण दयानिधी । करील तुझा प्रतिपाळ ॥ ७ ॥

## पद ३२.

तो मज आवडतो रघुराणा । नवरा राजसवाणा ॥ ध्रु० ॥ दशरथ राजाचा कुमार । सावळा सकुमार ॥ १ ॥ मोर्चेल वारितो लक्ष्मण । बंधु सुलक्षण ॥ २ ॥ कटीं-तटीं चांगला नेसला । पिवळा सोनसळा ॥ ३ ॥ कैसा बांधिला उदार । चिरा

खिडकी दार ॥ ४ ॥ प्रसन्नवदन पूर्णेंदु । हृदयीं करुणासिंधु ॥ ५ ॥ भाळीं रेखिला आळवट । कस्तुरी मळवट ॥ ६ ॥ कर्णीं कांचन कुंडलें । कोदंड दंडलें ॥ ७ ॥ पाळी येकला त्रिजगा । अंगीं पिवळा झगा ॥८॥ त्यावरी बांधिला नेटका । चिकंदोजी पटका ॥ ९ ॥ माजी खोविली कटयार । चिमणी तलवार ॥ १० ॥ पाठीशी बांधला तर्कश । दिसतो रणकर्कश ॥ ११ ॥ कंठीं शोभते घननीळा । वैजयंती माळा ॥ १२ ॥ पायीं नेपुरें वाजती । बिरुदें विराजती ॥ १३ ॥ चरणपंकजीं मधुकर गाती । मधुरस्वर ॥ १४ ॥ मध्वनाथाचा कैवारी आखिल विघ्नें निवारी ॥ १५ ॥

## पद ३३.

चिमणासा श्रीराम । त्याचें चिमणेसें स्वरूप । चिमणें सगुण ब्रह्म । चिमणें लावण्य अमूप ॥ ध्रु० ॥ चिमणा स्नान संध्या करुनी शोभे पीतांबर । चिमणा नित्य तृप्त म्हणवी राजा विश्वंभर ॥ १ ॥ चिमण्या हाते करुनी बांधी चिरा खिडकी दार । चिमणा गोपेच त्यावरी कलगी झळके फार ॥ २ ॥ चिमणीं अंगीं ल्याला त्यावरी चिमणी कुडती साजे । चिमणा कमरबंद देखुनी पायां पडती राजे । चिमणीमाजी कटयार बांधी चिमणीसी तरवार । चिमणी पाठीसी ढाल थाटी चिमणासा दरबार ॥ ४ ॥ चिमणा तर्कश बांधी हातीं चिमणी कमान ॥ ५ ॥ चिमणें केशर मळवट भाळीं रंगीत अक्षता ॥ चिमणा प्रसन्नवदन निजभक्तां संरक्षिता ॥ ६ ॥ चिमणीसीं झुलपें मोगरेलें विलसती चिमणे गाल । मुक्ताफळ कुडक्यांमध्यें झळकती लाल ॥७॥ चिमणी तुळसीमाळ कंठीं नवरत्नाचा हार ॥ चिमणी सीता वामभागीं सौंदर्याचें सार ॥ ८ ॥ चिमणा बंधु लक्ष्मण वारी मोरचेल ॥ चिमणे भरतशत्रुघ्नादिक सेवक जवळ ॥ ९ ॥ चिमणा मध्वनाथ त्याचा चिमणासा दिवाण ॥ चिमणा विजयी होईल करवील लंकेचें निर्वाण ॥ १० ॥

## पद ३४.

धन्य पिता दशरथ । ज्याचे उदरीं रघुनाथ । जन्मला ॥१॥ धन्य धन्य कौसल्या । किती पुण्यराशी केल्या । कोण जाणें ॥ २ ॥ धन्य धन्य नगर । अयोध्या मनोहर । पुण्यभूमि ॥ ३ ॥ धन्य धन्य शरयूतीर । जेथें खेळे रघुवीर । स्वामी माझा ॥४॥ विश्वामित्रें रायाप्रति । मागितला रघुपति । लक्ष्मणेंसी ॥५॥ ताटिका विंधोनी बाणें । हरिले सुबाहूचे प्राण । राघवानें ॥६॥ रामें आणि लक्ष्मणें । केलें यज्ञसंरक्षण । कौशिकाचें ॥ ७ ॥ जानकीच्या स्वयंवरा । मूळ आलें मुनीश्वरा । मैथिलीचें ॥ ८ ॥ मार्गीं अभिनव केली लीला । उद्धरिली जड शीला । गौतमाची ॥ ९ ॥ रायें केला सन्मान । जानकीच्या संभ्रमानें । राघवाचा ॥ १० ॥ जनकें केली प्रतिज्ञा । जाणविली सर्वज्ञा । कौशिकानें ॥ ११ ॥ शाण्णव कुळीचे

राजे । आले भूमंडळींचे । थोर थोर ॥ १२ ॥ सभेमध्यें साभिमान । भांभड-भूत दशानन । बैसलाहे ॥ १३ ॥ कोटि जेठी लागले । उचलिता भागले । त्रिंबकासी ॥ १४ ॥ दशानन ऊठला । धाकें ऊर फुटला । रावणाचा ॥ १५ ॥ धनुष्या घालिता कव । झोक गेला आली तव । रावणासी ॥ १६ उरावरी आदळलें । तेव्हां धैर्य गळालें । रावणाचें ॥ १७ ॥ मेरुचा तो खचला कडा । किंवा कैलासीचा हुडा । कोसळला ॥ १८ ॥ सभेमध्यें हलकल्लोळ । ह्मणती लावा हळदबोळ । नोवऱ्यासी ॥ १९ ॥ सभा अवघी घनवटली । रामीं वृत्ति विनटली । जानकीची ॥ २० ॥ सीता नवसी नवसा । राजसदननीवासा । मोरयासी ॥ २१ ॥ फाल्गुन वद्य चतुर्थीस । पूजीं मंगलमूर्तीस । मोरया रे ॥ २२ ॥ त्रिंबक नुचलो रावणा । परिणो मजला राघवराणा । सूर्यवंशी ॥ २३ ॥ मोगुर गोवर्धनीं फार । जनस्थानी बांधीन पार । मोरयासी ॥ २४ ॥ मध्वनाथ हे खूण । खणोन काढील वळखोन । कलियुगीं ॥ २५ ॥ सफल झाला नवस । पावला तो गणाधीश । जानकीला ॥ २६ ॥

## पद ३५.

सखिबाई साजणी तुम्ही सांगा माझ्या बापा ॥ ध्रु० ॥ चरणीं अहल्या उद्धरिली वो । परिहरि गौतमशापा ॥ १ ॥ रघुपति नवरा म्यां वरिला वो । माझें केलें स्थापा ॥ २ ॥ यासी न द्या तरी आपुल्या हातें । मान हे माझी कापा ॥ ३ ॥ जनक विदेही तूं ह्मणवीसी । न सिवसी करुनी पापा ॥ ४ ॥ मदन मनोहर आवडतो गे । नुचालिता त्रिंबकचापा ॥ ५ ॥ मध्वमुनीश्वर बहुत गुणाचा । सुंदर सोलीव चाफा ॥ ६ ॥

## पद ३६.

रावण गडबडा लोळे । फिरवी गरगरा डोळे । वोकी रक्ताचे गोळे । तरी स्वगर्वे बोले ॥ १ ॥ भट ब्राह्मण वराडी । पंडीत जोसी वऱ्हाडी । वरकड राजे कावाडी । अवघी दिसते लबाडी ॥ २ ॥ कानीं घालुनी गेठे हो । मुकुट हेटे मेटे हो । उठा महाजन सेटे हो । काय पहातां बेटे हो ॥ ३ ॥ उचला उचला धनुष्य । देव दानव मनुष्य । माझें पुरलें आयुष्य । न कळे पुढील भविष्य ॥ ४ ॥ तुमचा उपकारी झालों । झक माराया आलों । नवरी देखुनी निघालों । स्वयंवरीं निवालों ॥ ५ ॥ मी तो लंकेचा राजा ॥ आलों बहुतांच्या काजा । ब्रम्हा माझा तो आजा । त्यासी कोणी सांगा जा ॥ ६ ॥ उदकीं बुडतो पोहणार । आवचटचुकतो लिहिणार । शाहाणा होतो गंवार । न कळे पुढील होणार ॥ ७ ॥ याला आलें फेफरें । ऐसें म्हणती लेंकरें । घासी भूमीस कोपरें । बरवें केलें शंकरें ॥ ८ ॥ राजद्वारीं नरनारी । हांसती सुकुमार कुंवारी । रावण देतो वोकारी । जे ते त्याला धिःकारी ॥ ९ ॥ याचा जाला

अपमान । भारें दडपली मान । राम उचलील कमान । पावे राजसन्मान ॥ १० ॥ सीता रामाच्या गळां । घाली कमळाची माळा । मध्वनाथा सोहळा । जाला सर्वां आगळा ॥ ११ ॥

## पद ३७. पदें वनवासाचीं.

श्रीसद्गुरुनाथा । सांगा विचारा आतां ॥ ध्रु० ॥ शरण आलों हे स्वामी समर्था । उद्धरा दशरथा ॥ १ ॥ पायांवरी म्यां ठेविला माथा । पुरवा मनोरथा ॥ २ ॥ कलेवराची व्यर्थचि आस्था । माझी वृद्धावस्था ॥३॥ मातापिता माझा श्रीराम भ्राता । सद्गतीचा दाता ॥ ४ ॥ हें राज्य देउनी जानकीकांता । साधीन एकांता ॥ ५ ॥ श्रृंगारा नगरा शोधुनी पंथा । पाहूनीया ग्रंथा ॥ ६ ॥ अधिकार देखुनी पढवा वेदांता । शांता आणि दांता ॥ ७ ॥ श्रीमध्वनाथा त्यजुनी अहंता । पूजीन महंता ॥ ८ ॥

## कवन ३८.

अयोध्याकांडीची विमल वदला वाल्मिकि कथा । शिवें श्रीगौरीला सरस कथिली नाहिं वितथा ॥ तयाचा बाधीं तो कविवर महाराष्ट्र उलथा । यमाच्या सैन्याचा पळवित बळें वीर चळथा ॥ १ ॥ रायें पाठविला रघूत्तम गृहा श्रीसद्गुरु आपला । जाला जर्जर देह वृद्धपणिंचा तापत्रयें तापला ॥ श्रीरामा सुमुहूर्त पाहुनि वरें सिंहासनीं स्थापणें । वेदांत श्रवणें करून धरणें वैराग्य तें आपणें ॥ २ ॥ रघुवीर करी गुरुपूजन तें । शिरीं तीर्थ धरीं अवनें जनते ॥ म्हणवी शिवतत्व निरंजन तें । गुरुभक्तिस लावितसे जन ते ॥ ३ ॥ गुरु म्हणे परिसे रघुनाथजी । दशरथें कथिली शुभ मात जी ॥ राज्य तूं करिं नृपासनिं बैसुनी । सकल इच्छित लोकमनींहुनी ॥ ४ ॥ राज्याभिषेक उदईक तुला करावा । त्वां भूमिभार अवघा बरवा हरावा ॥ सीता सत्यांस बहू वांटिल वायणें जी । देतील भूप तुज सर्व उपायनें जी ॥ ५ ॥ वसिष्ठास रामें नमस्कार केला । गुरू आपल्या आश्रमालागिं गेला ॥ अयोध्येमधें लोक सोत्कंठ सारे । खरा टांकसाळेंत पाडूं ठसारे ॥ ६ ॥ गुढया तोरणें जोड वाजंत्रयांचे । थवे शोभती ठाइं ठाईं स्त्रियांचे ॥ अलंकार लेवूनी दिव्यांबरासी । पहायास आलेति विश्वंभरासी ॥ ७ ॥ समाचार हा ऐकिला कैकेयीनें । पुढें निंद्य आरंभिलें विघ्न तीनें ॥ स्वपुत्रास दे राज्य मागूनि सारें । असें संचरे मंथरेमाजि वारें ॥ ८ ॥ यावा पंचवटींत गौतमितटीं श्रीराम सीतापती । ऐसें इच्छिति भूमिदेव अवघे दैत्यांस जे कांपती ॥ शेषाचा अवतार लक्ष्मण पहा शिक्षील दुष्टास तो । धर्म स्थापिला मध्वनाथ म्हणतो रक्षील शिष्टांस तो ॥ ९ ॥ श्रीगजानना वंदुनी मनीं । पावनी कथा वर्णिता मुनी ॥ व्यास वाल्मिकीं गाइली जुनी । मुक्तिदायका गौतमीहुनी ॥ १० ॥ मध्वनाथ हे वर्णितो कथा । ते

ह्मणो नका संतही वृथा ॥ डोळसें पुढें काढिजे पथा । आंधळ्यासवें चालते तथा ॥ ११ ॥ माय वागवी लेंकरा जया । कंटकव्यथा कायसी तया ॥ माझि येऊ द्या अंतरीं दया । वंदितों पहा या पदद्वया ॥ १२ ॥ उद्धरी पदें जो अरण्य कीं । त्या रघूत्तमा मी शरण्य कीं ॥ तेथिची कथा देत पुण्य कीं । ऐकतील तें पापशून्य कीं ॥१३॥ मंथरा वदे कैकयी प्रती । वाटते तुला वश्य भूपती ॥ त्यासि आवडे रघूनाथ गे । कश्यपा जसा श्रीउपेंद्र गे ॥ १४ ॥ तो करील हें राज्य सर्व गे । व्यर्थ वाहसी रूपगर्व गे । दासिच्या परी मानितो तुला । राज्य माग तूं आपुल्या मुला ॥ १५ ॥ मंथरा करी बुद्धिभेद हा । कैकयी मनीं दुःख खेद हा ॥ देव प्रेरितां भारती वदे । वाढला कली दंपतीमधें ॥ १६ ॥ कैकयी ह्मणे युद्धकाळिंचें । रीण तें नव्हे आजकालचें ॥ त्या वरद्वया द्या मला नृपा । भामिनीवरी ते करा कृपा ॥१७॥ काननाप्रती राम पाठवा । सूर्यवंशिचें सत्य आठवा ॥ धर्म तो पुला त्या बहू-श्रुता । राज्य मागतें आपुल्या सुता ॥ १८ ॥ मंथरा जुडे अंतरी उडे । ते वदे मुढे टाकि वो चुडे ॥ ऐकुनी कुडें कैकयी पुढें । भूपती रडे मूर्च्छितु पडे ॥ १९ ॥ त्या क्षणामधें राम धावला । देखुनी वदे भूप बावळा ॥ कैकयीस हा डाव फावला । राघवा कसा म्यां गवाचला ॥ २० ॥ राजयापुढें रामजी वदे । पुत्र तो पित्यासाठिं जीव दे ॥ स्वार होउनि जातसे वना । मी करीन जी तीर्थ-सेवना ॥ २१ ॥ राज्य येथिचें भाउ तो करूं । मी जसा तसा तेंहि लेंकरूं ॥ ऐकुनि नृपें कंठ दाटला । अंतरीं बहू खेद वाटला ॥ २२ ॥ कैकयीसुता राज्य द्या सुखें । सांगतों तुम्हां आपुल्या मुखें ॥ दीधलें तया म्यांच भातुकें । तो करील जी दिव्य कौतुकें ॥ २३ ॥ जानकीसवें पुण्यकाननीं । काळ कंठितों दीनयामिनी ॥ जे शिवास ती सिंहवाहिनी । ते सहाय हो शंभुभामिनी ॥ २४ ॥ मध्वनाथ ज्या राहतो मठीं । मी वसेन त्या गौतमींतटीं ॥ सेविली असे जे सदा भटीं । ज्यासि पूजिता मुक्त सेवटीं ॥ २५ ॥

## पद ३९.

परिसावें दशरथा । राज्य द्यावें भरता–। लागिं माझ्या ॥ १ ॥ वरदान आठवावें । रामचंद्रा पाठवावें । वनवासा ॥ २ ॥ स्मरण तुह्मांलागीं कैचें । पतिव्रता कैकयीचें । युद्धकाळीं ॥ ३ ॥ बरवें राज्य करीन हर्षें । राम जावो चवदा वर्षें । वनवासा ॥ ४ ॥ राम जावो वनांतरा । समागमीं मुनीश्वरा । घेउनिया ॥ ५ ॥

## पद ४०.

दशरथ वदतो रघुवीरा । मानसपंजरिच्या कीरा । सांडुनी शरयुच्या तीरा । नेसुनी जाऊं नको चिरा ॥ १ ॥ कैकयी पापिणी नष्टगिरा । तिजवरी लोटुनी

घाली चिरा ॥ बांधिन सोनेरी चिरा । त्यावरी झळक जडित हिरा ॥ २ ॥ सेवुनी तूप अपूप । जिंती राजे अमूप ॥ अयोध्येचा तूं भूप । रामा राहे सुखरूप ॥ ३ ॥ तुझिया वियोगें जाण । जाईल माझा प्राण ॥ मध्वनाथा तुझी आण । वाहुनी करितो निर्वाण ॥ ४ ॥

## पद ४१.

पतिव्रता म्हणवी तोचि सीते वो ॥ घरा बाहेरी घालितां पाय भीते वो ॥ १ ॥ करी सासूसासऱ्याची नित्य सेवा वो ॥ पूजी संतमहंता भूमीदेवां वो ॥ २ ॥ न करी जे पतीचा मनोभंग वो ॥ गुण तुझे सहज अंतरंगे वो ॥ ३ ॥ कैकयीचें बरवें जालें राज्य वो ॥ सेविल शर्करा घालुनी पायस साज्य वो ॥ ४ ॥ आम्ही जातों सानुज वनवासा हो ॥ सांभाळीं तूं आपुल्या दासीदासां हो ॥ ५ ॥ पायीं रुपती कंटक क्लेशी होसी वो ॥ तुझ्यासंगें संकटें कोण सोसी वो ॥ ६ ॥ घरीं राहतां पावसी सर्व सौख्यें वो ॥ माझा अभिप्राय हाचि मुख्य वो ॥ ७ ॥ रक्षी कौसल्येशी लावुनी पंचप्राणा वो ॥ मध्वनाथाची घालितो तुज आण वो ॥ ८ ॥

## पद ४२.

राम वदे वो जानकी । न करीं अपुलें जान कीं ॥ आशय माझा जाण कीं । तुजहूनी मी सुजाण कीं ॥ १ ॥ कौसल्येस मान कीं । शैल्यजेसमान कीं । दिधलें ग्यां उपमान कीं । न करी तूं अपमान कीं ॥ २ ॥ कैकयी जीवनासी वो । जानकी जीवनासी वो ॥ धाडी आजि वनासी हो । राजीव नयनासी वो ॥ ३ ॥ कनखर खडे रुपती वो । पायीं कंटक रुपती वो ॥ न मिळे पलंग सुपती वो । तेव्हां स्मरसी पशुपती वो ॥ ४ ॥ पक्षी भात भात वो । हरिनामें वोभात वो ॥ होतांचि प्रभात वो । मानसी दूधभात वो ॥ ५ ॥ न मिळे घारी पुरी वो । शाक तेंही पुरी वो ॥ न बुडे भवनदी पुरींवो । सेवी अयोध्यापुरी वो ॥ ६ ॥ राहूं नको तूं उपासी । मेवी गुळ वरी तुपासी ॥ गुंतु नको तूं पाशीं । जीव माझा तूपासीं ॥ ७ ॥ ऐकुनी नमकें चमकें वो । पूजी पार्थिव चिमकें वो ॥ मध्वमुनींचीं यमकें वो । गातां मग तो यमकें वो ॥ ८ ॥

## पद ४३.

विनवी जानकी देवा श्रीरामचंद्राजी । येतें मी समागमें आनंदसांद्रा जी ॥ तुमच्या वियोगें नये मजलागीं निद्रा जी । भरताच्या हातीं घाला ते राजमुद्रा जी ॥१॥ भविष्य बोलुनी गेला तो वाल्मिकि जी । श्रीराम ठेउनी गेला घरीं जानकी जी ॥ हें नाहीं ऐकियेलें प्रमाण कीं जी । विचारुनी या गा रामायण आणखी जी ॥ २ ॥ माहेरीं आला होता तो एक जोशी कीं । सांगुनी गेला बहु तूं भाग्याची होसी कीं ॥ भर्तारासंगें कांहीं वनवास सोसी कीं । अंतीं करिसी

राज्य त्रिभुवन पोसी कीं ॥ ३ ॥ हे सत्य वाणी त्याची घडोनि यावीजी । सर्गे सर्वज्ञा प्राणवल्लभा न्यावी जी ॥ ओटी पसरिते येवढी आज्ञा द्यावी जी । श्रीमध्वनाथ चरण सेवेसी लावी जी ॥ ४ ॥

## पद ४४.

जाऊं नको रामा । टाकुनी आह्मां । वाटुनी वैभवधामा ॥ ध्रु० ॥ देवा तुझा अगाध महिमा । नकळे आगमनिगमा । नाम स्मरतां दाविसी उगमा । भक्ति तुझी ते सुगमा ॥ १ ॥ रमा ज्याची म्हणवी रामा । मुनिजनहृदयारामा सांभाळूनी दक्षिणवामा । शिक्षा लावी अधमा ॥ २॥ वामभागीं घेउनी भामा । सुवर्णपंचक दामा । सिंहासनीं तूं बैस उद्यामा । लेउनि तगटी जामा ॥ ३ ॥ कैकयी पापीण मेघश्यामा । न वदे इसि सामा । यातनेचा मेळउनी सामा । छेदिन ईर्ष्या चामा ॥ ४ ॥ दशरथ भुलला कामिनीकामा । सानुज भरत रीकामा । दुष्ट युधाजित खडतर नामा । मारीन त्याचा मामा ॥ ५ ॥ लक्ष्मण वदतो सांडुनि ग्रामा । करितां हे संग्रामा । मध्वनाथा विजयी होउनी । वाजवितो मी डमामा ॥ ६ ॥

## पद ४५.

माते आतां प्रणाम करितों तुझिया चरणांसी । आम्हां आशिर्वाद देणें तीजणासी ॥ १ ॥ कैकयीवरदानें बद्ध झाला दशरथ । मुक्त होइल येथील राज्य करितां भरत ॥ २ ॥ सूर्यवंशीं राजे त्यांची सत्यप्रतिज्ञा । विपरित करितां नरका जावें विदित सर्वज्ञा ॥३॥ राम म्हणे वो कैकयीनें केली पूर्ण कृपा । दंडकारण्यासी जातों संमत हेंचि नृपा ॥ ४ ॥ कंदमुळें फळें सेवुनी राहीन एकांती । संतसंगें अंतरंगे पावन विश्रांती ॥ ५ ॥ सुवेळेसी स्वार झालों जाऊनी त्या प्रांतीं । अहंकार मर्दुनी आणिन बरवी निजशांती ॥ ६ ॥ क्षणामध्यें चवदा वर्षें जातील निघोनी । पुनरपि तुजला भेटेन सत्वर भद्रीं रिघोनी ॥ ७ ॥ देवें समाधान केलें आपुल्या जननीचें । मध्वनाथें रहस्य कथिलें श्रवणमननींचें ॥८॥

## पद ४६.

तुजविण रामारे मी परदेशी आज ॥ ध्रु० ॥ गुणमयी कैकयी झगडत मजसी । बांधुनी आपुल्या माज ॥ १ ॥ सवत अविद्या छळत जीवातें । आणियलें बहु वाज ॥ २ ॥ घेउनी दशरथा सानुज भरता । ते करूं येथील राज्य ॥ ३ ॥ जाउ नको मज टाकुनी कोठें । नाहीं वनांतरीं काज ॥ ४ ॥ वत्साविरहित तळमळी धेनु । तीस जळ सीत पाज ॥ ५ ॥ शरयूतटीं मठ बांधुनी राहूं । काय जनाची लाज ॥६॥ सनकादिक मुनि पूजिन सुमनीं । पाहीन दिव्य समाज ॥ ७ ॥ त्रिभुवनविजयी तूं होशिल रामा । करशील ते साम्राज्य ॥ ८ ॥ मध्वमुनीश्वर स्वामी दयाळा । म्हणविसी गरिब नवाज ॥ ९ ॥

## पद ४७.

रामा जायेंरे वनवासा । समजुनी आशय माझा ॥ १ ॥ दशरथरायाची प्रतिज्ञा । सत्य करीं सर्वज्ञा ॥ २ ॥ संगें घेउनी लक्ष्मणा । सीता सुलक्षणा ॥ ३ ॥ जावें त्रिवर्गें निज हर्षें । चतुर्दश वर्षें ॥४॥ तेथील आनकुळ पाहाणें । येणें अथवा रहाणें ॥ ५ ॥ भरत राज्य करूं हें विहीत । शत्रुघ्नासहित ॥ ६ ॥ हें मज संमत रघुराया । सीतळ होईल काया ॥ ७ ॥ रघुपति चीताचा वदान्य । आज्ञा होइल मान्य ॥८॥ वंदुनी कैकयीच्या चरणा । वाटी वस्त्राभरणा ॥ ९ ॥ कैकयी गौरवीते रघुवीरा । देउनि वल्कल चीरा ॥१०॥ सीता घेउनी हस्तकीं । वंदी निजमस्तकीं ॥११॥ आली दशरथाजवळी । भूपति घाली कवळी ॥१२॥ सांगे सुमंता दशरथ । आणविला निजरथ ॥१३॥ रथीं बैसवुनी रघुवीरा । नेले तमसातीरा ॥ १४ ॥ श्रीरघुनाथाच्या वियोगें । दुःखित झालीं दोघे ॥ १५ ॥ करिती सकळिक ते शोक । अयोध्येचे लोक ॥ १६ ॥ शोकें व्याकुळ दिनरजनीं । लक्ष्मणाची जननी ॥१७॥ मध्वनाथासी तो चिंतीं । भूप...॥ १८ ॥

## पद ४८.

वेडा वेडा गे दशरथ राजा झाला वेडा । कैकयीचा गे बळकट बाई चेडा । घरामध्यें तो पोसियला रेडा । सूर्यवंशीं पाडिले उजेडा गे ॥ १ ॥ लंकेशाच्या नगरा सागराचा वेढा । याही दशानना लाविला वेढा । भार्गवरामाचा तो वाहियला मेढा । ज्याच्या नामापुढें मधुर न लागे पेढा गे ॥ २ ॥ ऐसा रामचंद्र वनवासा धाडी । यानें आम्हांवरती आणियली धाडी ॥ म्हाताऱ्याची या पिकली अवघी दाढी । दुःख संकटांत अयोध्येस पाडी गे ॥ ३ ॥ आतां आम्ही वसवूं दुसरी रामवाडी । तेथें जाउनि राहूं बांधुनी एक माडी ॥ जेथें जानकी ते पंचामृत वाढी । मुक्ति सायुज्यता अंगण झाडी गे ॥ ४ ॥ कौसल्येच्यापुण्यें आम्हां काय उणें । सुमित्रेसीं तें सौख्य होइल दुणें ॥ कैकयी भुंकेल जैसें पिसाळलें सुणें । नाचे मध्वनाथ रामकृपागुणें वो ॥ ५ ॥

## पद ४९.

जाऊं नको तूं दुरी रे । रामा जाऊं ॥ ध्रु० ॥ नव्हे वरदान हें माझें आदान । कैकयी गुळाची सुरी ॥ १ ॥ वृद्धासी तरुणी जहर मरणी । केल्या तीरां तुरी ॥ २ अंतरीं कपट बैसुनी निकट । पाय घरामधें चुरी ॥ ३ ॥ गुळाचा कवळ गिळिला केवळ । गुंतला माझ्या उरीं ॥ ४ ॥ हीन चढे पदीं । नीट नव्हे कधीं । न राखी भल्याची उरी ॥ ५ ॥ रामा तुजाविण व्यर्थ माझें जिणें । वाहवलों भवपुरीं ॥ ६ ॥ दिवस न गमे मानस न रमे । बैसुनियां गोपुरीं ॥ ७ ॥ मध्वनाथा धांवे आळवितो भावें । सांभाळी अयोध्यापुरी । रे रामा ॥ ८ ॥

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**१. भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति बारावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

**२. संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

**३. श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून गाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

**४. कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

**५. आनंदलहरीः**--( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

**६. नारदभक्तिसूत्रेंः**--हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. व्ही. पी. नें ०११.

**७. नवविधाभक्तिः**--यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०४. ( तूर्त शिल्लक नाहीं )

**८. निरंजनमाधवांची कविताः**--भाग पहिला. किं. १ रु.

**९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः**--( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं १०८.

**१०. भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

मुमुक्षु REG. No. B. 662

# पांगारकरांचीं पुस्तकें.

११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै० विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १॥०

१४. मोरोपंतीं वेंचे ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

१५. पारिजातकाचीं फुलें ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८

१६. श्रीतुकारामचरित्र:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिक-ठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ० सह. किं. रु. ३.

१७. श्रीतुकारामचरितामृत:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य:--निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख—विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

१९. मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणासह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

२०. मारुतिउपासना ( चौथी आवृत्ति ): - किं. ०४.

२१. सार्थ श्रीदासबोध--किं. रु. ४. व्हीं. पी. नें ४०१०.

२२. सार्थ मनोबोध:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

२३. समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.


२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--किं. रु. २.

२५. श्रीएकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी )--किं. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २० मास २ | भाद्रपद १८४८ आक्टोबर १९२६ | नवें वर्ष ६ वें अंक १० वा. |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



**वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३०३**

मुद्रकः–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

# विषयानुक्रमणिका.




| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ मंगलाचरण ... ... .. ... | १–२ |
| २ त्रिगुणांचे धर्म ... ... ... ... | ३–५ |
| ३ मोगलाईंत वऱ्हाडांत संचार ... ... ... | ६–१४ |
| ४ तुळस ... ... ... ... ... | १५–१६ |
| ५ काळाचा फेरा ! ... ... ... ... | १६ |
| ६ प्रेमभक्तिमीमांसा ... ... ... ... | १७–२९ |
| ७ श्रीअनंतव्रत ... ... ... ... | २९–३२ |
| ९ मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता ... ... ... | ३३–४० |



## नवी आवृत्ति तेरावी.

# भक्तिमार्गप्रदीप.

मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांच्या घरोघर हें पुस्तक धर्मग्रंथ म्हणून मान्य झालें आहे. ' नवे जुने, सुशिक्षितअशिक्षित, वृद्धतरुण, स्त्रीपुरुष या सर्वांना अत्यंत प्रिय झालेलें असें कोणतें पुस्तक आहे ? ' म्हणून विचारल्यास " **भक्तिमार्गप्रदीप** " हाच उद्गार सर्वांच्या तोंडून निघेल यांत शंका नाहीं ! ! यांत साधुसंतांच्या प्रसिद्ध भूपाळ्या, आरत्या, अभंग पदें, श्लोक वगैरे यथाक्रम दिले आहेत. पृ. सं. १३६. किं. ८ व्ही. पी. नें ८१२.

**विविधज्ञानविस्तार**—" पूर्वींची पिढी जात चालल्यामुळें तिजबरोबरच नष्ट होऊं पाहणारी जुनी भजनाची परंपरा ही रा. पांगारकरांचा प्रदीप प्रकाशित झाल्यापासून कोठें कोठें दृग्गोचर होऊं लागली आहे हें त्याचें महद्भाग्य होय. या पुस्तकामुळें धर्मशिक्षणाच्या कामगिरीला मोठीच मदत झाली आहे. मराठी भाषा जाणणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाजवळ प्रदीपाची एकेक प्रत अवश्य असली पाहिजे. "

पत्ताः—व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# मंगलाचरण.





## पद १.

चिमणेसें मूल याचा चिमणासा पावा गे ।
वाजवी सुंदर बरवा, चिमणा हा भावा गे ॥ ध्रु० ॥
चिमणी जडित कुंची, पांघुरे कवळावा गे ।
चिमणे कशीदी मोचे, पदीं लक्ष्य लावा गे ॥ १ ॥
चिमणाले गडी मिळवी, चिमणा मेळावा गे ।
चिमणाल्या गोपिका, तेहीं खवळावा गे ॥ २ ॥
चिमणी वेताटी करीं, शोभताहे यावा गे ।
चिमणालीं वासुरें, चारी तो पहावा गे ॥ ३ ॥
ऐसा चिमण्याच्या भक्तीचा ओलावा गे ।
रमावल्लभदास, गाइल यावो लावा गे ॥ ४ ॥

## पद २.

जाईन पंढरीं, विठोबा पाहीन धणीवरी ।
संतचरणरज तेथें लोळेन प्रीतिकरीं ॥ ध्रु० ॥
दक्षिण द्वारका पावन तिहीं लोकां ।
तेथें पूर्ण ब्रह्म नांदत कृष्ण निजसखा ॥ १ ॥
ठायीं ठायीं उत्सावो करिती दास हो ।
हरीच्या नामकीर्तनें महादुरित नासे हो ॥ २ ॥
श्रीरमावल्लभदास म्हणे सफळ जन्म येणें ।
अनायासें मुक्ति या पुंडलिका गुणें ॥ ३ ॥

## पद ३.

गोपाळराया तुजवीण मज कोण रे ।
देहाची कुरवंडी करीन लोण रे ॥ ध्रु० ॥

तुझाचि भरंवसा माझिया मानसा ।
मोकलिसी तरी भक्तवत्सल कैसा रे ॥ १ ॥
सकळांचें मन तुझेचि कीर्तनें ।
विश्रांति पावती नित्य नूतन रे ॥ २ ॥
नखापासोनि शिखा धरोनि ।
अपराधी आहे तारीं करुणा करोनि रे ॥ ३ ॥
शरण आलिया नरा तूं लोहपांजिरा ।
तुझे शरणागता मरण नाहीं परात्परा रे ॥ ४
देहाचि उपजत देहाचि मरत ।
उपजणें मरणें नाहीं दासमतें रे ॥ ५ ॥
लटकाचि देह लटकाचि स्नेह ।
सत्य धरिलें तुज निःसंदेह रे ॥ ६ ॥
मी गा तुजमाजीं तूं गा मजमाजीं ।
रमावल्लभदास म्हणे प्रेम पाजीं रे ॥ ७ ॥

## पद ४.

प्रेमळ जना प्रेम सांगतां न ये रे ।
सांगतां सांगतां मन लय होयरे ॥ ध्रु० ॥
घटाकाश मठाकाश नामविलास रे ।
महदाकाशीं हारपली दोहींची भास रे ॥ १ ॥
सैंधव सिंधूची ह्या पाहूं जाय खोली रे ।
सैंधव-सिंधु ऐसी राहे बोली रे ॥ २ ॥
कीटकी भृंगुटीच्या धाकें तन्मय रे ।
भृंगुटी होउनि जाय नभीं निर्भय रे ॥ ३ ॥
सुवर्ण अलंकार सुवर्ण पाहे रे ।
अलंकार स्वतंत्र बोल हा राहे रे ॥ ४ ॥
श्रीरमावल्लभदास सज्जन संगे रे ।
सकळांचें प्रेम एक पांडुरंगें रे ॥ ५ ॥

---

# त्रिगुणांचे धर्म.

गीतेंत गुणत्रयविभागयोगाचा १४ वा अध्याय प्रसिद्धच आहे. ह्या विषयाचें असेंच सुंदर निरूपण भागवत स्कंध ११ अ० २५ मध्यें आहे. त्याच्याच आधारें पुढील कोष्टक तयार केलें आहे. तमाहून रजोगुण चांगला, रजाहून सत्वगुण चांगला व गुणातीत होणें सर्वांत उत्तम. रजतम दाबून सत्वगुण वाढवावा म्हणजे पूर्णसत्वोदयानें निस्त्रैगुण्यावस्था प्राप्त होते. असो. कर्म, कर्ता, ज्ञान, देश, श्रद्धा, आहार, सुख इत्यादि सर्व त्रिगुणात्मक आहेत. त्यांतील सत्वाचा भाग तेवढा घेऊन बाकीच्यांचा त्याग करावा. पुढील कोष्टकास ७ आंकड्यांपुढें भागवतांतील १३ अध्यायाचा आधार घेतला आहे.

| तामस. | राजस. | सात्विक. |
|---|---|---|
| १ ता० कर्म—हिंसा, दंभ, निंदा, मत्सर इ० मलिन वृत्तींनीं केलेलं कर्म. | रा० कर्म—इहामुत्र फलाची इच्छा ठेवून केलेलें कर्म. | सा० कर्म०—ब्रह्मार्पणबुद्धीनें किंवा फलेच्छा व कर्तृत्वाभिमान सोडून केलेलें कर्म. |
| २ ता० कर्ता—निःशेष हारपे विवेकज्ञान । स्मृति सैरा वळवे रान । नाठवे कार्यकारण । ऐसा कर्ता जाण तामस॥३४९॥ नाथ. | रा० कर्ता—फळाभिलाषेच्या चित्तीं गांठी । तेणें अंध झाली विवेकदृष्टी । राजस कर्ता फलाशेसाठीं । अति दुःख कोटी स्वयें सोशी ॥ नाथ ॥ ३४८ | सा० कर्ता—सद्गुरुचरणसंगें । सकळ संग छेदी विरागें । सात्विक कर्ता निजांगें । विजयसंगें असंगीं ॥ नाथ ॥३४७ |
| ३ ता० ज्ञान—आहार, निद्रा, भय मैथुनादि सेवनापुरतें जें प्राकृत ज्ञान तें तामस होय. " महामोहो गिळी ज्ञानस्फूर्ति । मी जड अंध मानी निश्चित्ती । नश्वर पदार्थीं आसक्ति । तें ज्ञान निश्चितीं तामस. " | रा० ज्ञान—वेदशास्त्रांचें सांग अध्ययन होऊनही 'अद्वैतनिश्चयो नाहीं चित्तीं, असें असेल तर तें ज्ञान राजस होय. विषय व इंद्रियें यांच्या सेवेंत खर्च होणारें भेदज्ञान राजस होय. | सा० ज्ञान—आध्यात्मिक ज्ञान तें सात्विक होय. एकपणाचें अभेदज्ञान तें सात्विक ज्ञान. ' देहीं असोनि देहातीत । भूतीं भूतात्मा भगवंत । भूतां सबाह्य सभराभरित । हें ज्ञान निश्चित सात्विक ॥ —नाथ ॥ ३१५ ॥ |

| तामस. | राजस. | सात्विक. |
|---|---|---|
| ४ ता० देश--द्यूतालयें, कलालांचीं किंवा अंमल करणाऱ्यांचीं घरें, गुण दोषचर्चा जेथें होतें किंवा साधुनिंदा घडते अशीं स्थानें तामस होत. | रा० देश--चव्हाटा, राजद्वार,बाजारपेठ, सभास्थानें,नाटकगृहें इ. राजस स्थानें होत. | सा०देश—एकांतवास 'पवित्र आणि तीर्थभूत। विजनवन एकांत। ऐसिये वस्तीं सुखावें चित्त। तो वास निश्चित सात्विक' हरिमंदिर,सत्संगतीं वास,सात्विक होत. |
| ५ ता० श्रद्धा--अधर्माला धर्म समजणारी श्रद्धा. 'जेथें अपेयाचें पान। स्वेच्छा अभक्ष्य भक्षण। अगम्यादि वडे गमन। ते श्रद्धा जाण तामसी.' | रा० श्रद्धा--कर्मश्रद्धा राजस. आपल्या वर्णाश्रमाचा,जातीचा,देशाचा भाषेचा,अभिमान घेऊन केलेल्या कर्मांत दिसून येणारी श्रद्धा राजस. 'मीदेह' ही श्रद्धा राजस. | सा० श्रद्धा—आत्मज्ञानाविषयींची श्रद्धा सात्विक होय. 'मी आत्मा, मी ब्रह्म' अशी श्रद्धा सात्विक. |
| ६ ता० सुख--मोहदैन्यापासून उत्पन्न झालेलें सुख तामस. | रा० सुख--वैषयिक सुख राजस. विषय व इंद्रियें याच्या संयोगानें होणारें सुख राजस. | सा०सुख--आत्मसुख सात्विक. विषयेंद्रियांच्या संगतीवांचून सहज आत्मसुख होतें तें सात्विक. |
| ७ ता०आहार--पीडादायक व अपवित्र आहार तो तामस होय. | रा० आहार--इंद्रियप्रेष्ठ आहार तो राजस-गोड, खरपूस, आंबट, तळीव, चमचमीत,फोडणीचे, पन्हीं, चटण्या इ. | सा० आहार—पवित्र सुलभ व अप्रयासानें मिळणारा आहार सात्विक. अल्प व धर्मार्जित आहार तो सात्विक होय. |
| ८ ता०शास्त्रें—पाखंड मत हें तामस शास्त्र होय. वेद व ईश्वर यांना न मानणारीं पाखंडशास्त्रें होत. | रा० शास्त्रें--प्रवृत्तिपर शास्त्रें हीं राजस होत. राजकारण, इतिहास, अर्थशास्त्र, काव्यनाटकें; गणित, भूगर्भशास्त्र, धर्मशास्त्र, चौदा विद्या,चौसष्ट कला, व्यवहारनीतिशास्त्र, कृषि, इ० राजस होत. | सा०शास्त्रें—निवृत्तिपर शास्त्रें हीं सात्विक होत. श्रुति, गीताभागवतादि ग्रंथ, संतांचे ग्रंथ हे सात्विक होत. |

| तामस. | राजस. | सात्विक. |
|---|---|---|
| ९ ता० उदकें—मद्यादि. | रा० उदकें—सुगंधी उदकें, अत्तरें, वासाचीं तेलें, नाना प्रकारचे रस, वाळ्याचें पाणी, कापराचें पाणी इ० | सा० उदकें—तीर्थोदक व गुरुपादोदक हें सात्विक होय. |
| १० ता० जन—पाखांडी, ढोंगी, लबाडलोक. | रा० जन—प्रवृत्तिमार्गांतले लोक. सभापति, व्यापारी, शेतकरी, राजकारणी व प्रपंचव्यवसाय करणारे विविध प्रवृत्तीचे लोक. चव्हाठा ज्यांना आवडतो ते लोक राजस. | सा० जन—विरक्त संत, ज्ञानी, योगी, व भक्त, 'देव वसे ज्यांचे चित्तीं' ते सात्विक लोक. दुराचारी लोक तामस, संसारी लोक राजस व विरक्त पुरुष सात्विक होत. |
| ११ ता० काल—मध्यरात्र. चोर, वेश्या, पापी, यांचा अनुकूलकाल. | रा० काल—प्रदोषसमय; सूर्योदयापासूनचा व्यवहारकाल सारा राजस. | सा० काल—ब्राह्ममुहूर्त. 'ब्राह्मेमुहूर्ते चोत्थाय चिंतयेदात्मनो हितम्.' |
| १२ ता० ध्यान—शत्रूंचें व त्यांच्या घातपातादि साधनोपायांचें ध्यान तें तामस. | रा० ध्यान—विषयांचें ध्यान, म्हणजे स्त्रीपुत्रगृहादिकांचें ध्यान राजस. | सा० ध्यान—"सत्वोपाधि शरीर साचें। चैतन्यघन स्वरूप ज्याचें। तो श्रीविष्णु ध्येय सात्विकांचें। ध्यान याचें करावें"-नाथ॥ ९४॥ उपास्याचें ध्यान तें सात्विक होय. |
| १३ ता० मंत्र—क्षुद्र जारणमारणादि मंत्र. | रा० मंत्र—काम्यमंत्र. | सा० मंत्र—प्रणव. 'सकल मंत्रांची जननी, म्हणजे गायत्री होय. |

# मोगलाईंत व वऱ्हाडांत संचार.

## १ सत्संगतियोग.

या संसारांत कांहीं योगायोग असे अकल्पित येतात कीं, मनुष्यप्रयत्नानें ते आणून येणार नाहींत. सुखें आणि दु:खें अप्रार्थित येतात, मनुष्याचा अहंभाव वृथा आहे. असो. एक परम भाग्याचा योग आम्हांस गेल्या महिन्यांत आला. श्रावण शुद्ध १३ शनिवारपासून आमचा तब्बल एक महिना सत्संतीच्या सुखांत गेला. नारायणानें सत्संगाचें सुख महिनाभर अपार दिलें. आचार विचारांच्या सुरांत सूर मिळालेले असे आमचे परमार्थांतले स्नेही 'माई' व 'आण्णा' यांनीं व आम्हीं दक्षिण हैद्राबादेस जाण्याचा बेत एकदम ठरविला व त्याप्रमाणें आम्ही निघालों. हिंगणघाटकडील दोन भाविक तरुण नाशकास दोन महिने येऊन राहिले होते, तेही बरोबर निघाले. वडील 'बाळकृष्ण' व धाकटा त्याचा मेहुणा 'उद्धव.' आमच्या सर्व पुस्तकांचा कॉलेजच्या विद्यार्थ्यांसारखा सूक्ष्म अभ्यास केलेला 'बाळकृष्ण' हा जातीचा सोनार असून आचारविचारांत पुरा ब्राह्मण आहे! दोघेही तरुण परमार्थप्रवण आहेत. एक म्हातारे 'मामा' ही संगें निघाले. ते मोठे विनोदी असल्यामुळें साऱ्या वाटेंत करमणुकीला कांहीं उणें नव्हतें. माई आणि आण्णा व बाळकृष्ण, उद्धव आणि मामा हे बरोबर घेऊन आम्हीं निघालों. हैद्राबादेस १६ दिवस मुक्काम झाला. येतांना पूर्णास्टेशनावर उतरून आंवढयानागनाथाचें दर्शन पूजन वगैरे झालें, टाकळीच्या दाजीमहाराजांची एक दिवस संगतपंगत जाली. परत आल्यावर गणेशचतुर्थी नाशकास घरीं करून मी गणेशोत्सवासाठीं वऱ्हाड व मुंबईच्या फेऱ्या करून आलों. हा सारा महिना प्रवास, प्रवचनें, संभाषणें, भजनपूजन, परमार्थचर्चा, साधुसंतांच्या भेटीगांठी यांत इतका बहारीचा गेला व मोगलाई वऱ्हाडांतील मंडळींच्या सहवासाचा आनंद एवढा झाला कीं, प्रपंचास पार विसरून आनंद महोदधींतच रहिवास करणारे आम्ही--

> निरंजनीं अक्षयीं निद्रा केली हो।
> तेणें माझी सर्वही चिंता गेली हो॥
> सुखशयनीं सर्वदा निरालंबी हो।
> माझें मीपण बुडालें आत्मबिंबीं हो॥

ह्या केशवस्वामींच्या वचनाप्रमाणें नारायणाचे खरोखरीच लाडके आहों असें आम्हांस निभ्रांत वाटून राहिलें.

## २ सत्संगांची आवड.

पहिला सत्संग म्हणजे सत्संगाविषयीं निरतिशय प्रीति; आंतरिक निर्मळ भावना हा होय. आपला शुभ भाव हाच आपला तारक आहे. हा नसेल तर सत्संगांत भिजूनही खडक कोरडाच्या कोरडाच राहतो; तुकोबासारख्या पाहरी ' पाझर रोकडे । फोडूं पाषाणांमध्यें ' अशा स्वप्रत्ययबलानें गरजणाऱ्या आहे-तच; तथापि सामान्यतः विमलभाव मूळचाच असेल तर सत्संगापासून लाभ शीघ्र व सुकर होतो, ' भाव तोचि देव भाव तोचि देव ! ये अर्थीं संदेह धरूं नका" असे साधु गर्जून सांगतात तें यथार्थ आहे. पाकड आणि तांदुळ वेगळे करण्याचें तर्काचें काम झालें. साच आणि लटिकें जाणतां आलें. म्हणजे ' साचा'च्या ठायीं विमलमनानें बुडी द्यावी. देवाविषयीं विमलभाव व सदाचार प्रीति पाहून मग प्रेम द्यावें घ्यावें; दोषदर्शनाची कातर फार चालवूं नये. प्रकृतिजन्य गुणदोष प्रकृतीच्या माथीं मारून देवभाव तेवढा घेण्यास शिकावें. म्हणजे सत्संगतींतला आनंद भोगतां येतो. नारायणानें बाळपणापासून आम्हाला सत्संग दाखविला असल्यामुळें सत्संगाची आवड सहज आहे. सत्संगाविषयीं अकृत्रिम अहेतुक प्रेम ही एक नारायणाची देणगी आहे.

मज वाटतसे सभाग्य मोठें, भगवद्भक्त तयांत म्यां जुडावें ।
तदधीन तुझ्या यशःसुधेचा, ऱ्हद गंभीर तयामधें बुडावें ॥

तुज वर्णिति संत संगमुक्त, प्रकृति प्रेमळ तद्गणीं शिरावें ।
तुझिया गुणसागरांत माझें, मन हें सैंधव माधवा विरावें ॥

मोरोपंतांनीं आपली ' आशंसा ' याप्रमाणें व्यक्त केली आहे.

हे शब्द त्यांच्या मुखानें आले पण त्यांत माझ्या चित्ताचा सारा भाव उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झाला आहे ! भगवद्भक्तांच्या मेळांत ' म्यां जुडावें ' हें माझें केवढें भाग्य ? कां कीं, कीर्तिसुधेच्या गंभीर सरोवराच्या किल्ल्या त्यांच्या स्वाधीन आहेत व मला तर त्यांत मनमुराद पोहायची उत्कट इच्छा आहे. हरियशाची गोडी हरिभक्तांच्या मुखानें ऐकल्यानेंच लागत असते. गुणानुवाद कोणीही गावेत, पण ते भक्तांच्या तोंडून ऐकण्यांत खरी मौज आहे. देवा ! तुझे गुणानुवाद संत गातात, ते संगमुक्त होऊन गातात, बाह्यसृष्टीचा किंवा देहगेहादिकांना विसरून हरीमय होऊन गातात. अशांचा संग मला पाहिजे. ते पुन्हा प्रकृतिप्रेमळ असावेत. प्रेमळ भक्तांच्या समूहांत म्यां शिरावें आणि मिठाचा खडा समुद्रांत टाकतांच जसा विरघळून जातो तसें अहंकाराच्या काठिण्यामुळें चैतन्यांतून वेगळें पडलेलें माझें हें चित्त देवाच्या गुणसागरांत विरून जावें, वेगळेपणानें न उरतां हरीशीं समरस व्हावें, हें सर्व सत्संगांत

लीलेनें होतें म्हणून देवा ! मला संतसंगांत मिळवून घे. सत्संगांत प्रेमामृत फुकाचें यथेष्ट प्यायला मिळतें. देहाचीं कर्मे चालत असतांना देहाचें भान हरपतें, संसार सुखाचा होतो. अविरत आनंदाचा सुकाळ होतो. निरभिमानता सहज होते, दुःखलेश उरत नाहीं, देहविकार जाऊन आनंदलहरींनीं व अष्टसात्विक भावांनीं वारंवार चित्त भरून प्रसन्न होतें. सत्संग सर्व साधनानां वरिष्ट आहे. सत्संगांत नवविधाभक्तीचा लाभ फुकाचा होतो.

महत्संगस्तु दुर्लभः । अगम्य अमोघश्च ।
लभ्यतेऽपि तत्कृपयैव ॥

असें नारदभक्तिसूत्रांत म्हटलें आहे. सत्संग फार दुर्लभ आहे, लाभला तरी उमगत नाहीं, उमगलाच तर मात्र अमोघ आहे. पण तोही नारायणाच्या कृपेनेंच मिळतो. भूतमात्रीं हरि पाहण्याचा ज्यांचा अभ्यास दृढावला, ज्यांचे हरिप्रेम निस्सीम आहे, ज्याच्या डोळ्यांत हरि भरला आहे, असे संत भेटणें म्हणजे काय सांगावें ती देवाचीच भेट होय. संत व देव वेगळे नाहींत. प्रतिमा ह्या देवाच्या अचेतन मूर्ति व संत प्रत्यक्ष सचेतन देवच होत. म्हणून तुकोबांनीं 'देव सारावे परते । संत पुजावे आरते' असें सांगितलें आहे. असो.

## २ माई आणि बाबा.

'माई' आणि 'बाबा' यांची पुरी ओळख तूर्त वाचकांस करून देतां येत नाहीं. ही प्रसिद्धि त्यांना आवडणार नाहीं. संसारांत असलीं झांकलीं माणकें धूनमधून आढळतात. हीं फार विरळ आहेत. नाशकास आज ३।४ वर्षे आम्हीं ज्या परमार्थाच्या लोभासाठीं वस्ती केली आहे तो लोभ माई व बाबा यांच्या अंतरंगपरिचयानें झाला. माई प्रायः नाशकास राहतात व बाबा हैद्राबादेस राहतात. दोघेही 'प्रपंची' आहेत. प्रपंच्याच्या शाळेंतच त्यांना परमार्थ शिकतां आला. पुष्कळ वेळां साधु, संन्याशी, गुरुजी, बोवा, महाराज, इ० नांवानें प्रसिद्धीस आलेल्या पुरुषांत जो शुद्ध परमार्थ आढळणें दुर्घट होतें तो असल्या 'प्रापंचिकांच्या' राहणींत आढळतो. माई व बाबा या दोघांचे गुरु वेगवेगळे, पण दोघांचा गुरुभाव एकच आहे. आमचा यांचा परिचय आज आठ वर्षांचा, पण खरी ओळख या तीन वर्षांतली आहे. उभयतांच्या परमार्थसुखांत प्रासादिक कविता उगम पावते. ती त्यांच्या संगतीत त्यांच्या तोंडून ऐकण्यांतच मौज आहे. त्या कवितेचा परिचय पुढेंमागें वाचकांस करून देतां येईल. सत्संगाचें सुख किंवा सुखप्रसंग कागदावर लिहितां येणें अशक्य आहे.

## ४ हैद्राबादेस पंधरवडा.

आमचे बरोबर पंधरा दिवस हैद्राबादेस राहणें झालें. माई, बाबा, अण्णा व मी असे चौघेजण तर अहोरात्र सद्भक्तीच्या गोड विचारांशीं व सगुणप्रेमेमींशीं खेळत, बागडत, नाचत, गात होतों. कधीं आम्ही भटजीबापूंच्या मठींत, कधीं दंडीस्वामींच्या आश्रमांत, कधीं वामन नाइकांच्या बगीच्यांत व बंगल्यांत व हमेशा घरीं किंवा मोटारींतून फिरण्यांत पण सर्वकाळ नारायणाच्या व संतसद्गुरूच्या कथालापांत तरंगत होतों, एक प्रकारच्या हरिप्रेमांत मस्त होतों म्हटलें तर चालेल ! प्रत्यहीं रात्रीं ९ ते ११ पर्यंत माझें रेसिडेन्सींत जोशी वकिलांच्या भव्य वाडयाच्या मध्य चौकांत प्रवचन होत असे व घरीं आल्यावर रात्रीं २।३ वाजेपर्यंत सुखसंवादांत आम्ही दंग होत असूं. आठ वर्षांपूर्वी हैद्राबादेस माझे दासबोधावर २॥ महिने सतत प्रवचन होत होतें. तेवढया वेळांत दासबोधाचे सहा दशक सांगून झाले हाते व त्याच वेळीं हैद्राबादकर दाक्षिणी स्त्रीपुरुषांचा घरोब्याचा परिचय झाला होता. या खेपेस तर प्रेमसुखाच्या देवघेवीशिवाय आम्हांस दुसरा विषयच सुचत नव्हता. रसिक गोविंदराव अफझलपूरकर, आमचे विद्यालयकालीन जुने परिचित पुरोहित, शिवभक्त शंकरराव भोगले व त्यांची सात्विक गृहमंडळी, वामन नाईक व त्यांची प्रेमळ मंडळी, न्यायमूर्ति केशवराव व असे कित्येक सज्जन यांच्याशींही संभाषणसुखाचे अनेक प्रसंग येत. या पंधरवडयांतच गोकुळाष्टमीचा उत्सव आल्यामुळें स्वसुखाचा रंग अधिकच चढला. गोकुळाष्टमीच्या दिवशीं दोन प्रवचनें होऊन रात्रीं जन्मोत्सवाचें कीर्तन झालें. सतत बोलण्याचे व फिरण्याचे श्रम, जागरणें, नियमित भोजनाशिवाय सर्व प्रकारचा अनियमितपणा, हें अंतःप्रसन्नतेमुळें बाधले नाहींत. चित्ताच्या उल्हासापुढं अनियमितपणाचे दोषही टिकत नाहींत. आत्मा अजरामर आहे, नित्य तरुण व आनंदरूप आहे. परमार्थ संगतींत आत्म्याचें तारुण्य वाढत आहे असें वाटतें, शरीर मात्र वयोमानानें क्षीण होत जातें. त्यापुढं कोणाचाच इलाज चालत नाहीं. काळाची सत्ता देहावर चालते; आत्मा कालसत्तेला जुमानीत नाहीं. उल्हासाची घडी अखंड टिकायलाही सत्संगच पाहिजे. गोकुळाष्टमीचा सप्ताह घरींच चालू होता. रोज मायबहिणींचा मेळा घरींच दुपारीं प्रहरभर जमत असे. श्रीकृष्णलीलानुकरणाचे गोड प्रसंग आम्हांस पाहावयास व भोगावयास मिळाले. हुबळीचे प्रेमळ कृष्णभक्त सुब्रावबावा उभयकर यांचे घरीं कृष्णजन्मोत्सवाचा आठवडा असाच एकदां आनंदांत गेला होता. तो आनंद यंदा द्विगुणित झाला. परमार्थाच्या आनंदांत श्रोतावक्ता हे भेदभाव लयाला जातात व ‘ होवोनियां श्रोतावक्ता । करी आपुली आपण कथा ’ याप्रमाणें श्रीहरि एकलाच नांदत

असतो. 'गायन् विलज्जो विचरेदसंगः' हें भागवतकारांचें वर्णन यथार्थ आहे. पुरुष पुरुषपणा विसरतात व स्त्रिया स्त्रीपण विसरतात व उभयत्र पुरुषोत्तमच विलसूं लागतो. हैद्राबादेस सुविद्य, सुसंपन्न व सुविचारी असा स्त्रीपुरुषसमाज आमच्या इंग्रजी मुलखांतील लोकांपेक्षां अधिक धार्मिक, प्रेमळ व भाविक आहे. आमच्याकडे दुस्तर्काचें व फाजील चिकित्सेचें बंड फार माजत चालल्यामुळें भक्तिसुखाचा खडखडाट उडत आहे. 'तार्किकांचा टाका संग । तुमगे खरें, बुडाल' असा इषारा तुकोबांनीं दिलेला आहेच. भाविकपणा बराच वऱ्हाडांत आहे पण त्यापेक्षां अधिक मोगलाईत आहे. भटजीबापूंसारखे निस्सीम भगवद्भक्त, दंडी स्वामींसारखे योगी व ज्ञानी, टाकळीच्या दाजीमहाराजांसारखे कर्मनिष्ठ तपस्वी या प्रांतांत असल्यामुळें भगवद्भक्तीचें, पूर्वपरंपरेचें. जुन्या हिंदु संस्कृतीचें वळण या भागांत सामान्य जनतेंतही अधिक प्रमाणांत जागृत असलेलें आढळतें. पुण्यामुंबईस गणेशोत्सवासारख्या धार्मिक उत्सवांतही कांहीं वक्ते 'साधुसंतामुळें देश दुबळा होतो, संत देशाला निरुपयोगी आहेत' असें सांगत असतात, पण साधुसंतांमुळेंच राष्ट्रांत धर्मपरंपरा, सद्भाव, सदाचार, हे जागृत राहतात. संतांवांचून धर्माला आधार कोण आहे ? आधीं मनुष्यभावांत आणून देवभाव जागृत करणारे संतावांचून कोण आहेत ?

तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति वानूं ?

* * *

संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोनि जाय ॥
मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडीं वाढों लागे ॥

* * * *

संताचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥

हें वर्णन यथार्थच आहे. संसारदुःख विसरवून संसार ब्रह्ममय करून टाकणारी एक संतगुरुमाउली आहे. असो. हैद्राबादेस परम भागवत भटजीबापू हे अनेक जीवांचें विश्रांतिस्थान आहे. यांचें चरित्र 'संतचरित्रमाला' नामक ग्रंथांत आम्हीं दिलेंच आहे. भटजीबापूंची भूतदया, अन्नदानादि सत्कर्म, उपासना, अखंड चालूच आहे. त्यांना आतां नेत्र व कर्ण यांनीं सोडलें आहे. तरी मुखांतून हरिनामाचें पाठ अजून ऐकूं येतात. त्यांची प्रेमनिर्झरी न आटणारी आहे. अद्याप हे बोलतात, व फार थोडे ऐकतात. धन्य पुरुष आहेत. देह जीर्ण आहे, पण यांची नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा तरुण आहे. यांच्या संगतीपंगतीचा लाभ झाला. शहरापासून ७।८ मैलांवर पर्णकुटिकेंत राहणारे दंडीस्वामी महान् विरक्त, ज्ञानी व योगानिरत आहेत. आजन्म ब्रह्मचारी असून

७५ वर्षांच्या वयांतही त्यांचें तीव्र अनुष्ठान, उत्साह, व बळ पाहून मस्तक कोणासही नमवावेसेंच वाटतें. उभयतांचाही विनय अपूर्व आहे. कृतकार्य असून अनुद्धत, उदार असून लज्जित, तपःस्वाध्यायनिरत असून नम्र, जीवोद्धरणसमर्थ असून भूतमात्रीं विनत सत्पुरुषांचे गुण कोठवर वानावेत ?

भवन्ति नम्रास्तरवः फलोद्गमैः
नवांबुभिर्भूरिविलंबिनो घनाः ।
अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः—
स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥

ह्या सिद्धांताचें वर्म असे सत्पुरुष पाहिल्यानेंच आकळतें. हैद्राबादेस एक श्रीमान् हलवाई उत्तम गुरुभक्त पाहिला. पतीचा छळ सोसूनही सतीधर्माला जागविणारी व गुरुभक्त एक सती पाहिली. अशीं अनेक नररत्नें व स्त्रीरत्नें जगांत आहेत म्हणूनच जग चाललें आहे.

मागें झाले, आतां असती, होणार जे पुढें काय ।
त्या भागवतांचे म्यां भावें साष्टांग वंदिले पाय ॥

## ५ आर्वढ्या नागनाथ व टाकळी.

हैद्राबाद सोडतांना अनेक स्त्रीपुरुषांचा तो परमार्थजनित प्रेमा पाहून आह्मांसही जड वाटलें. मेजवान्या, पानसुपाऱ्यांचे समारंभ, ना० केशवराव यांच्या अध्यक्षतेखालीं झालेला बडा पानसुपारीचा समारंभ, त्यावेळीं केशवरावांनीं व इतर वक्त्यांनीं केलेला प्रेमगौरव, निघण्यापूर्वी भेटावयास येणाऱ्यांपैकीं कित्येक स्त्रीपुरुषांच्या नेत्रांतून वाहणारे प्रेमाश्रुप्रवाह, इ० प्रकारांमुळें गुणगौरवभारानें वांकलेलें चित्त लज्जित होऊन वाटलें कीं, काय समाजाचें हें कारुण्य व दया आहे, या जनीजनार्दनाचा मी एक यःकश्चित किंकर असून यांचा गौरव हा आशीर्वादपरच आहे. स्तुति सामान्यतः अहंकाराला व पतनाला कारण होते. पण शुभाशय व प्रेमळ अशा सज्जनांनीं केलेली स्तुति निरहंकारतेला व चिद्धशुद्धिद्वारां आपल्या उद्धाराला कारण होते. हे पायां पडून पाया पडायला शिकवितात, नम्र होऊन नमायला शिकवितात, देव संतपणाचा निर्मळ भाव ठेवून जगाकडे देवबुद्धीनें पाहायला शिकवितात. स्वतःची देहबुद्धि विसरून देहभावाचे कांटे उपटून टाकतात. यांची स्तुति हे आशीर्वाद आहेत, यांची पूजा ही देवभावाची जागृति आहे.तस्मात् हेच माझे संत व गुरुमायबाप आहेत. मी यांना शिकवायला बसलों पण हेच मला शिकविणारे माझे गुरु आहेत. जनीजनार्दनाच्या चरणाचा मी रजरेणु आहे. गाडींत बसून परत येतांना असले विचार मनांत येऊन चित्ताची प्रसन्नता झाली, व तळमळ पार निघून गेली. स्वभावतः स्तुतिप्रिय व उद्धत अशी

मनोवृत्ती जनीजनार्दनानें आपल्या निर्मलभावानें धुवून स्वच्छ केली. या चित्त-शुद्धीच्या आनंदांत आम्हीं पूर्णास्टेशनवर उतरलों. श्रावण वद्य ३० सोमवार पासून बैलगाडीनें १४ मैलांवर असलेला आवंढयानागनाथाच्या दर्शनास गेलों. तेथें स्नानदर्शनपूजनादि कर्मे मनःसमाधानाचीं झालीं. हें स्थान अगदीं एकीकडे एकांतात आहे. मंदीर फार प्राचीन असून भव्य आहे. नितांत रमणीय आहे. हे प्रख्यात बारा ज्योतिर्लिंगापैकीं आहे. नामदेवासाठीं देऊळ फिरविलें तें येथेंच ! समोर नामदेवाची समाधि आहे. बाहेर विसोबा खेचराचें स्थान आहे. शिवभक्तीच्या रसांत विष्णुभक्तीची माधुरी येथें समरस झाली आहे. अशा ह्या पावन क्षेत्री दोन दिवस राहिलों. मंदिरांत श्रीवासुदेवानंद स्वामींचे शिष्य गांडामहाराज उर्फ योगानंदस्वामी चतुर्मासार्थ राहिले आहेत. ते टेंभेस्वामींचें ओवीबद्ध चरित्र लिहीत आहेत. त्यांच्याही भेटीगांठी झाल्या. धर्माची ग्लानि दूर व्हावी याविषयीं यांना तळमळ आहे. नागनाथाच्या मंदिरांत दोन दिवस आणखी आनंदांत गेले. लघुरुद्रब्राम्हणसंतपर्णादि झाले. तेथून पूर्णास्टेशनवर उतरून पुन्हां बैलगाडीनें सहा मैलांवर असलेल्या धनगरटाकळीस गेलों. तेथें गोदातीर आहे यथेच्छ जलविहार झाला. दाजी महाराजांचें दर्शन झालें. प्रसाद त्यांचेकडेच झाला. कर्मनिष्ठ तपस्वी ब्राम्हण महान् सत्पुरुष आहे. यांची किर्ति सर्वत्र पसरलीच आहे. तेथून निघून श्रीगणेशचतुर्थीसाठीं नाशकास आलों.

## ६ गणेशोत्सवाची आमंत्रणें.

ता ९ सप्टेंबरला ह्म० बरोबर तीन आठवडयांनीं मोगलाईतील प्रवास संपवून आलों तों गणेशोत्सवांतील ७५।८० आमंत्रणांचीं पत्रें घरीं येऊन पडलेलीं पाहिलीं ! सर्वांवर ताण ठाण्याचे मराठी भाषासेवक मित्र विनायकराव भावे यांच्या मुलाची तार कीं, 'आण्णा अत्यवस्थ आहेत व जरूर निघून या.' मग भोजनोत्तर तसाच पंजाबमेलनें निघून रात्रीं पुण्यास आलों. रात्रभर राहून गणेशोत्सवासाठीं नाशकास गेलों. घरचें श्रीगणेशपूजन यथाविध होऊन दुसरें दिवशीं वऱ्हाडचे फेरीस निघालों. गणेशोत्सवाचीं पत्रें गाडींत वांचलीं. कित्येकांस 'सवड नाहीं, तसदीची माफी असावी' अशीं उत्तरें लिहविलीं. ३५ आमंत्रणें एकटया मुंबईतील व मुंबईच्या आसपासचीं दादर, मांटुगा, विलेपार्ले इ. ठिकाणचीं होतीं ! बाकीच्यांत तंजावरपासून व कुरुंदवाड पासून तों वऱ्हाड सी.पी. पर्यंतचीं होतीं. हे लोकांचें प्रेम अनिवार आहे. सर्व पत्रांस उत्तरेंही देत आलीं नाहींत. तरी ज्या ज्या ठिकाणीं जातां आलें नाहीं तेथील उत्सवकर्त्यांची येथेंच माफी मागतों.

## ७ वऱ्हाडांत गणेशोत्सव.

नाशकास उत्सवांतलें पाहिलें प्रवचन करून त्याच रात्रीं नागपूर मेलनें आकोल्यास गेलों. तेथें आमचे स्नेही रा. बापूसाहेब फडके वकील यांचा प्रेमाचा सहवास घडला. दोन दिवसांसाठीं स्पेशल मोटार करून बापूसाहेब व मी वासीमला गेलों. तेथील बालाजीचें भव्य मंदिर पाहिलें. देऊळगांवराजा येथील बालाजीचें संस्थान सर्वोत्तम आहे. त्याच्याच बरोबरीचें हें सुंदर देवस्थान आहे. देवदर्शन करून व भोजन सारून रात्रीं श्रीगणेशोत्सवांत दुसरें प्रवचन केलें. सकाळीं पुसद येथें गेलों. पुसद येथील लोकांची आस्था व भक्तिभाव पाहून आनंद झाला. तेथें २२ तासांत ३ प्रवचनें व गीतेच्या बक्षिससमारंभांत अध्यक्षपणाचें भाषण झालें. पुसदकरांचा कित्येक वर्षांचा प्रेमाग्रह. तेव्हां यंदा पुसद मुक्रर केलें होतें. आमच्याकडील लोकांपेक्षां वऱ्हाडमोगलाईंतले लोक अधिक भाविक, प्रेमळ, व हिंदुसंस्कृतीला चिकटून राहिलेले आहेत. इंग्रजी विद्या व इंग्रजी संस्कृति आणि रेल्वे यांपासून आपले लोक जितके दूर तितके आपल्या संस्कृतीला धरून असलेले अधिक आहेत. शहरांतील नाटक सिनेमा, वर्तमानपत्रांचे व मासिकांचे झगडे, पुढाऱ्यांतील परस्पर असूयाद्वेषादि भाव, चहाफराळाचीं दुकानें, नापिकांचीं स्थानें, ते मस्तकावर रुपते अर्धनास्तिक विचार, देशाविषयीं वाढती भक्ति पण देवाधर्माविषयीं अनास्था, पिंडपोषणाचे व नटवेगिरीचे बाजार–जाऊं द्या हा सर्व प्रकार गोविंदसुत चिंचाळकर यांनीं आपल्या नवीन पुस्तकांत ('आधिभौतिक सुधारणा व आध्यात्मिक धारणा') चटकदार रीतीनें वर्णन केलेला आहे व हा शहरांतला प्रकार खेडोपाडीं पसरत आहे व इंग्रजांच्या राज्यापेक्षां ह्या आधिभौतिक सुधारणेपासून देशाचें अधिक वाटोळें होत चाललें आहे. परमेश्वर धर्माचा वाली आहे. 'धर्मस्य प्रभुरच्युतः' तो सांभाळील तरच धडगत आहे. नाहींतर धर्माची हानि होऊन स्वराज्य मिळालें तरी त्याचा काय उपयोग आहे? धर्मासाठीं स्वराज्य पाहिजे. स्वराज्यसाधनाच्या प्रयत्नांत धर्महानि होत असेल तर तें स्वराज्य तरी कोणाचें! असो. वऱ्हाडांत पुसदची आनंददायक फेरी संपवून अकोलामलकापूरमार्गे बुलढाण्यास गेलों. बुलढाण्याचे देशपांडे व क्षीरसागर वकील वगैरे ५।७ मंडळी मलकापूर स्टेशनवरच घेण्यास आली होती. बुलढाण्यास दोन प्रवचनें होऊन परत फिरलों. बुलढाणें उंच टेकडीवर वसलें असून तेथील हवापाणी उत्तम आहे. गांव टुमदार व थंड हवेचें आहे. पाऊस पुष्कळ. यामुळें वऱ्हाडांत कोठें कोठें कपाशी व ज्वारी यांची हानि झाली आहे. तथापि एकंदर पीकपाण्याची सरासरी बारा आणे निघाली. लोक चांगले आहेत.

## ८ मुंबईची फेरी.

बुलढाण्याहून थेट मुंबई गांठली. तेथें ब्राह्मणसभा, दादर, गिरगांव पोस्ट-लेन येथील गणेशापुढें तीन प्रवचनें झालीं. मुंबईचा गणेशोत्सव म्हणजे बहुधा पुण्यामुंबईच्या राजकारणी लोकांचा 'इलेक्शनच्या' धामधुमीचा आखाडाच बनला होता ! श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांचें एक व्याख्यान ऐकावयास मिळालें. शास्त्रीपंडित व भिक्षुक आणि गृहस्थ यांचेमध्यें सलोखा व प्रेम वाढावें तों उलट स्वामींचा शास्त्रीपंडित व भिक्षुक यांचेवर कटाक्षच दिसला व त्या भरांत वासुदेवानंदस्वामी कृप ठेवणारांस जवळ येऊं देत नसत याबद्दल ह्या महान् विभूतिवरही थोडी टीका झाली ! हे मला बरें वाटलें नाहीं. टेंभ्येस्वामी या काळांतले अवतारी थोर पुरुष होते. हजारों लोकांवर त्यांची छाप पडली आहे. लोकसंग्रहाचें काम सोपें नाहीं एवढें खरें ! श्रीगणेशोत्सवांत देवाधर्माचें प्रेम, पूर्वपरंपरेचें रक्षण, समाजसेवेची प्रीति लोकांत उत्पन्न करणें अवश्य आहे. स्वपक्षस्तुति, परपक्षनिंदा, कडोविकडीचीं भाषणें व भांडणें इ० प्रकार देवतेपुढें गर्हणीय आहेत. मूर्तीच्या ठिकाणीं देवत्त्वबुद्धि उत्पन्न होऊन तिच्यापुढें आपलीं गाऱ्हाणीं सांगायचीं असतात. बाप्टिस्टासारखे राजकारणांत वावरणारे पुरुष कितीही चांगले असले तरी आमच्या देवतांपुढें अशा खिस्ती लोकांचीं व्याख्यानें कशाला ? त्यासाठीं स्थळें व प्रसंग दुसरे काय थोडे आहेत ? जेथें वेदघोष, कथाकीर्तनें व्हायचीं तेथें तरी हें प्रकार नसावेत. श्रीसमर्थांनीं कीर्तनभक्तीच्या समासांत सांगितल्याप्रमाणें देवतोत्सवाचें कार्यक्रम आखावेतः—

> भक्तिज्ञानवैराग्य लक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
> साधन मार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावे ॥ १५ ॥
> प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ।
> निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ १६ ॥
> करावें वेदपारायण । सांगावें जनांसी पुराण ।
> मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ॥ १९ ॥
> ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
> गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ॥ २० ॥
> कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्यसमाधान तें उडे ।
> नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ २२ ॥

# तुळस.

—:०:—

कलकत्त्यांतील एका दैनिक पत्रांत विचारणा झाल्यावरून, रावबहादूर गुप्ते यांनीं तुळशीचें वर्णन दिलें आहे तें उपयुक्त वाटल्यावरून येथें देत आहों. रावबहादूर म्हणतात:—" तुळशीचें रसायनशास्त्राच्या मदतीनें परीक्षण झालेलें आहे. लंडन येथील इंपीरियल इन्स्टिटयूट संस्थेंत डॉक्टर गोल्डिंग यांनीं व मिस्तर पेली यांनीं असें ठरविलें आहे कीं, तुळशीच्या पानांत एका प्रकारचें हवेंत उडून जाणारें अंमली तेल सांपडतें. हें तेल औषधी आहे. रोग—जंतुनाशक थॉयमल म्हणून एक पदार्थ वैद्यशास्त्रांत प्रसिद्ध आहे. या तेलाचेच गुण तुळशीच्या तेलांत आढळून येतात.

मेजर लारीमोर या साहेबानींही अनुभव घेऊन सिद्ध केलें आहे कीं, तुळशीच्या अंगीं चिलटें मारण्याची शक्ती आहे. म्हणजे तिच्या हवेनें चिलटें मरून पडतात. सर जॉर्ज बर्डवुड हे मोठे ग्रंथकार आहेत. ' बॉंबे ड्रग्स ' म्हणून त्यांनीं येथें असतांना एक जंगी पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ते ग्रँट मेडिकल कॉलेजांत प्रोफेसर होते. त्यांनींच राणीचा बाग बसविला. त्या वेळीं ती जागा दलदलीची असल्यामुळें तेथें चिलटांचा मोठा उपद्रव होता, व तापसराईही फार होती. त्यांच्या हाताखालीं देखरेख करणारे पालेकर नांवाचें सारस्वत ब्राह्मण होते, त्यांच्या सूचनेवरून सर साहेबांनीं जिकडे तिकडे तुळशीच लावल्या. परिणाम—चिलटांचा नाश व तापसराईचें उद्वर्चन ! तुळशीला प्रदक्षिणा घालण्यांत बायकांच्या शरीरप्रकृतीस मोठा फायदा आहे. वृंदावन उंच करून त्याजवर तुळस लावण्याची वहिवाट आपल्या देशांत आहे. तिचा हेतु प्रदक्षिणा घालणाऱ्या बायकांच्या नाकापर्यंत तुळशीची उंची येऊन तींतून निघणाऱ्या वायूचा पुरापुरा फायदा मिळावा असा दिसतो ! तुळस खिस्ताच्या थडग्यावर रुजली होती त्यामुळें तिच्या पाश्चिमात्य नांवानें सेंट बेसिल डे म्हणून एक सण ग्रीस देशांत मानला जात आहे ! त्या दिवशीं तेथील मडमा तुळशीची फांदी ( बेसिलची ) हातांत घेऊन पाद्र्याकडे जातात, व त्याजवर पवित्र जलसिंचन करवून त्या परत घरीं आणतात आणि आपल्या मुलांबाळांसह त्यांतील थोडा पाला आमच्या गुढीपाडव्याच्या लिंबाप्रमाणें खातात ! शिल्लक राहिलेली ' डहाळी ' घरांत टांगून ठेविली म्हणजे चिलटांचा, कसरीचा व उंदरादिकांचा उपद्रव होत नाहीं अशी त्यांची समजूत आहे. मुसलमानी धर्मांत तुळशीच्या वर्गांतील सबजा नांवाचें झाड पवित्र मानलें आहे. तें दर्ग्याजवळ प्रेतें पुरतात तेथें लावण्याची वहिवाट आहे. एकंदरींत पहातां पाश्चिमात्य शास्त्रान्वयें तुळशीच्या तेलांत

शेंकडा ३२ भाग थॉयमल हा औषधी पदार्थ असल्यामुळें तो दाराशीं लावि-ल्यापासून फायदाच आहे. मात्र ती आवारांत पुष्कळ लावावी." सदरील वर्णन रावबहादूर यांनीं कलकत्त्यांतील सर्व संग्रहालयांतील वनस्पतिपरीक्षणपटु डॉ. हूपर यांस पहाण्यास पाठविलें तेव्हां त्यांनीं कळविलें कीं, तुळशीचा आम्हीं तीन वेळ तपास केला आहे. तिच्यांतील सुगंधि तेल औषधी आहे. थायमल हा पदार्थ हवा साफ करण्यास फार उपयोगी आहे व डॉक्टर लोक त्याचा शस्त्रक्रियेस आणि क्षतें पडतात तेव्हां उपयोग करीत असतात.

( मुमुक्षु १९११ ),

---

# काळाचा फेरा !

## १ बाबा गर्दे.

सुप्रसिद्ध वेदांती सज्जन बाबासाहेब गर्दे हे गेल्या महिन्यांत दिवंगत झाले. शाळाखात्यांत नौकरी करून पुष्कळ वर्षें यांनीं पेन्शन भोगलें. श्रीसिद्धारूढ स्वामींच्या संगतींत यांनीं पुष्कळ काळ घालविल्यामुळें वेदांतशास्त्राचा यांचा विचार पुरा झाला होता. यांचें 'वेदांताचें युक्लिड' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे यांचीं प्रवचनें कधीं कधीं होत तीं भारदस्त व प्रौढ जनांना बोधप्रद असत यांची खरी प्रसिद्धि यांनीं गीता व पंचदशी यावर जीं पदें केलीं आहेत त्या वरून आबालवृद्धांत पसरली आहे. कीर्तनांत यांचीं पदें मान्यता पावलीं आहेत व पुष्कळशीं प्रौढ स्त्रियांच्या पाठांतही आहेत. हे निरलस, निर्व्यसनी व सच्छील असत.

## २ विनायकराव भावे.

ठाण्याचे आमचे मित्र विनायक लक्ष्मण भावे हे गेल्या महिन्याच्या १२ व्या तारखेस वयाच्या ५५ व्या वर्षी पुण्यास दिवंगत झाले. यांचा मराठी भाषेचा व्यासंग, काव्येतिहासाचें संशोधन, व ग्रंथकर्तृत्व यामुळें यांची ख्याति मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत स्थिर राहील. 'महाराष्ट्र सारस्वत' 'तुकोबांच्या अस्सल गाथ्याचे दोन खंड, ( जगनाडी संहिता ) 'अफझुलखानाचा वध' 'शाहि-स्तेखानाचें प्रकरण, 'नेपोलियन बोनापार्टचें चरित्र' मानभावी काव्यें इ० द्वारें त्यांनीं मराठी भाषेची उत्कृष्ट सेवा केली आहे. श्री व सरस्वति दोघींची य जवर कृपा होती. हे स्वभावानें मोकळे, निर्भीड व बाणेदार होते.

---

श्रीपांडुरंग प्रसन्न.

# प्रेमभक्तिमीमांसा.

( लेखकः—धुंडिराज रामचंद्र महाराज, पंढरपूर. )

१ आध्यात्मिक, अधिदैविक आधिभौतिक, या त्रिविध तापांमुळें तप्त होऊन मूर्छित झालेल्या जीवास समजत नाहीं कीं कोठून दुःखरूप उत्ताल तरंगराशि येऊन अशांतिरूप सागरांत बुडवूं लागतात. जेव्हां संयोगभोगवियोगरूप अग्निज्वालांनीं दग्धांतःकरण झालेला जीवात्मा किंकर्तव्यमूढ होऊन आक्रोश करीत इतस्ततः दुःखानें भटकत फिरतो, अशा दैन्यावस्थेंत कळत नाहीं कीं त्या अंतरहृदयामध्यें कोण हृदयसखा प्रगट होतो व त्यास दुःख दूर करण्याचें आश्वासन देऊन गाढ आलिंगन देतो ! जेव्हां दुर्धर रोगरूपी शय्येवर भयंकर व्यथेनें पीडित होऊन जीव घाबरून जातो, त्या वेळेस मातापित्यांचा स्नेह, कन्यापुत्रांची श्रद्धा, किंवा स्त्रीचें आत्यंतिक प्रेम, वैद्याची औषधी, आणि आज्ञाधारक सेवकगणाची उत्कृष्ट सेवा, इतकीही सामुग्री त्याच्या मर्मविदारक क्लेशांची निवृत्ति करूं शकत नाहीं. जेव्हां या निःसार भवाटवीमध्यें आपल्याआपण दुःखरूपी भयंकर दावानल उत्पन्न होऊन या निःसहाय जीवाला चारी बाजूंनीं व्यापून टाकितो, कोणीकडूनही त्याचा आयुष्यवृक्ष कायम रहाण्याची आशा रहात नाहीं, त्या वेळेस कोण दीनदुःखहारी हृदयाकाशनिवासी परमात्मा स्मरण केल्याबरोबर " न मे भक्तः प्रणश्यति " म्हणून प्रगट होतो, तेव्हां जीवाचें सर्व क्लेश शांत होऊन निराशारूपी तमाचा पूर्ण नाश होतो व त्याचे हृदयांत सात्विक आशेचा दिव्य प्रकाश पडतो. हें गूढ कोडें कोण उकलूं शकेल ? या आध्यात्मिक परिवर्तनाचें नितांत रहस्य कोण विशद करून सांगण्याविषयीं समर्थ आहे ? कोणा सद्गृहस्थांना जर ह्या अंतर्जगदीय परिवर्तनाविषयीं प्रश्न केला तर ते सर्व बाह्य जगदंतःपाती व्यवहारानें मोहित झाले आहेत, करितां या गूढ रहस्याचें ते केव्हांही उत्तर देऊं शकणार नाहींत. सर्व मातापितरांकडूनही ह्या प्रश्नाचें निःसंदिग्ध उत्तर मिळणें शक्य नाहीं; कारण ते सुद्धां या मोहमदिरेनें मोहित झाल्यामुळें स्वकर्तव्याला पराङ्मुख होऊं लागले आहेत. वर्तमानकालीन आचार्यगणांकडूनही ही जिज्ञासा तृप्त होईल असें भासत नाहीं. भगवज्जनांनो ! साधकांनो ! आमचा भरंवसा सर्वस्वी तुमचेवर आहे. तुम्हीच या भवरजनीजन्य भीषण अंधःकारांतून या विपथगामी जीवाला मार्गदर्शक ध्रुव आहांत. तुमचेकडूनच या आत्माविषयक अनिर्वचनीय परिवर्तनाचा शोध लागणें शक्य आहे.

२ कोण तो आपला आप्त आहे, कोण तो जिवलग मित्र आहे, कीं आम्ही त्याला विसरलों असूनही तो आम्हांला विसरत नाहीं ! सांगा ! जीवाचा त्या अंतर्यामीशीं काय संबंध आहे, कीं जेव्हां मातापिता, भ्राता पुत्रवित्तकलत्र यांचा कांहींही उपयोग होत नाहीं, अशा अवस्थेंत तो एक मात्र जीवाचा जिवलग एकदम प्रगट होऊन जीवाचें सांत्वन करून कुरवाळून त्याचे अश्रू स्वतःच्या कृपापदरानें पुसून टाकितो.

३ जीव प्रेमाचा भुकेला आहे. जेव्हां त्याची प्रीति मातापिता आणि गुरुजनांवर स्थिर राहते, त्यावेळेस ती ' श्रद्धा ' या नांवानें संबोधिली जाते. जीवाच्या स्त्रीमित्रांचे ठायीं असणाऱ्या प्रीतीस ' प्रेम ' म्हटलें जातें. जेव्हां ती प्रीति कन्यापुत्र इत्यादिकांचेठायीं म्ह० तिचा प्रवाह निम्नगामी असेल तर त्या प्रीतीस ' स्नेह ' हें नांव दिलें जातें, परंतु या अविद्यक संसृतीला असत्य समजून जीव आपल्या हृदयांतील निर्मल प्रीतिप्रवाहाला त्या हृदयेश्वर जगन्नियन्त्याकडे समर्पण करितो त्या प्रेमविशेषासच ' भक्ति ' असें म्हणतात.

४ जीवाचा नैसर्गिक संबंध परमात्म्याशीं मूळचाच आहे. पण तो त्या संबंधास विसरून पुनः पुनः सुखप्राप्त्यर्थ अनित्य वस्तूंकडे धांव घेत असतो. परंतु अनित्यापासून नित्य सुख कोठून मिळणार ? जेव्हां जीवाची आशा अनित्य पदार्थांपासून पूर्ण होत नाहीं, त्यावेळेस त्याचे हृदयावर दुःखाचे आघात होऊं लागतात. अशा विपत्यवस्थेंत त्याला कोणीच हितकारी दिसत नाहीं; व ह्या दीन स्थितींमध्यें त्याची पूर्वस्थिती जागृत होते, तेव्हां अति करुणेनें तो म्हणतो, "हे हृदयेश्वरा ! हे दीनबंधो ! तुम्ही कोठे आहांत ? मी सदैव तुम्ही दुःखनिवारण करणारे आहांत अशी तुमची कीर्ति ऐकतों, तुम्ही दीनाचे सोयरे आहांत.

॥ ईश्वरस्यपि नभिमानिद्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाच्च ॥ ( ना. भ. सू. )

आतां ह्या दीन पामराला तुमचेवांचून कोठेंच थारा मिळणें शक्य नाहीं. पुष्कळ दिवसपर्यंत तो तुम्हांला विसरून नाना विषयांमध्यें भटकत फिरत होता, परंतु हे नाथ ! आतां हा जागा झाला आहे तुम्हींच या विपथगामी दुष्टाची कुमती पाहून परीक्षा घेण्याकरितांच ह्या मूर्खाला धन, जन, पुत्र, मित्र, कलत्र इत्यादिकांकडून मोह घातला होता, परंतु, प्राणेश्वरा ! आतां परीक्षेची वेळ राहिली नाहीं. मी आतां पुत्रधनदारा इत्यादिकांची इच्छा करीत नाहीं, इतकेंच नव्हे पण स्वर्गसुखाची देखील वासना ठेवीत नाहीं, आतां हीच प्रार्थना आहे कीं तुमच्या चरणयुगुलावरच माझी भक्ति राहोः--

"अपराधसहस्रसंकुलं पतितं भीमभवार्णवोदरे ।
अगतिं शरणागतं हरे कृपया केवलमात्मसात्कुरु ॥ १ ॥
न धर्मे न वसुनिचये नैव कामोपभोगे ।
यद्भाव्यं तद्भवतु भगवन्पूर्वकर्मानुरूपं ॥
एतत्प्रार्थ्यं मम न बहुलं जन्मजन्मांतरेऽपि ॥
त्वत्पादाम्भोरुहमुपगता निश्चला भक्तिरस्तु ॥ २ ॥"

भक्तिमार्गाचे श्रेष्ठाचार्य महर्षि शांडिल्यांनीं भक्तीची व्याख्या 'सापरानुरक्तिरीश्वरे' अशीच केली आहे. व भक्ताग्रण्य देवर्षि नारद म्हणतात, 'सात्वस्मिन्परमप्रेमरूपा सा न कामयमाना निरोधरूपत्वात्' तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजही भक्तीची हीच व्याख्या करितात—

परि तेचि भक्ति ऐसी । पर्जन्याची सुटिका जैसी । धरातांचूनि अनारिसी । गतीचि नेणें ॥ तैसें सर्वभारसंभारें । नधरतप्रेम एकसरें । मजमाजी संचरे । मीचि होऊनि ॥ ज्ञा० ११–५४ ॥

सारांश, ईश्वराविषयीं निरतिशय अनुराग (प्रेम) म्हणजेच भक्ति होय. जीवाच्या सर्व चित्तवृत्ति जेव्हां या निःसार संसारास विटून भगवच्चरणारविंदींच लीन होतात, "आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमीयल्या चित्ता पासोनिया ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ॥" अशी स्थिती अंगीं बाणते, ही परम प्रेममय अवस्था म्ह० भक्ति. पण जर ती भक्ति सहेतुक असेल तर ती यथार्थ म्हटली जाणार नाहीं, तर ती निर्हेतुकच असणें अवश्यक आहे.

५ भक्तपरिपालक व दुष्टसंहारकतेचें ब्रीद सत्य करण्याकरितां म्ह० हिरण्यकशिपु वधाकरितां दिनानाथ परमेश्वरानें नृसिंह अवतार धारण करून आपल्या अलौकिक सामर्थ्यानें त्या असुराचा वध केला. तेव्हां त्या भयानक स्वरूपाजवळ जाण्याची देवादिकांचीसुद्धां छाती झाली नाहीं, त्यावेळीं सर्व देवांनीं प्रल्हादास पुढें केलें. भक्तवर्य प्रल्हादानें आपल्या प्रेममय अमृतवाणीनें त्या देवाधिदेवाचें स्तवन केल्याबरोबर त्या स्तुतीनें प्रसन्न होऊन श्रीनृसिंह म्हणतातः—

प्रल्हाद भद्र भद्रं ते प्रीतोऽहं तेऽसुरोत्तम ॥
वरं वृणीष्वाभिमतं कामपूरोस्म्यहंनृणाम् ॥ भा० ७ ॥

भावार्थ—"हे असुरोत्तमा प्रल्हादा, तुझें कल्याण असो. मी तुझ्यावर संतुष्ट आहे, करितां तूं वाटेल तो वर माग. मी तो पूर्ण करीन. कारण, सर्व प्राणिमात्रांच्या कामना पूर्ण करणारा मीच आहे."

त्या वेळेस भक्ताग्रणी दैत्यकुलतिलक प्रल्हादानें नमस्कार करून हात

जोडून विनंति केली कीं, ' हे प्रभो ! मी वर मागण्याकरितां येणारा कांहीं व्यापारी नाहीं. ' सारांश तो एकनिष्ठ भक्त असल्यामुळें त्यानें कांहींच मागितलें नाहीं.

एवं प्रलोभ्यमानोपि वरैर्लोकप्रलोभनैः ॥
एकान्तित्वाद्भगवति नैच्छत्तानसुरोत्तमः ॥ भाग० ७-१०॥

नारद धर्मराजास सांगतात कीं-" अशा रीतीनें बहिर्मुख जनांस लोभ उत्पन्न करणाऱ्या वरांची प्रल्हाद हा एकान्तिक भक्त असल्यामुळें त्यानें इच्छा केली नाहीं. "

६ अशाच अनन्यभक्तीचा आश्रय केल्यामुळें पांडवांना भगवद्भक्त हीं पदवी मिळाली होती. दुर्योधनाकडून कपटद्यूतामध्यें पराजय पावल्यामुळें धर्म-भीमअर्जुनादिकांना अरण्यवास पत्करावा लागला. अशा निःसहाय अवस्थेमध्यें वनांत फिरत असतां भीमार्जुन नकुळ सहदेव, इत्यादिकांचे क्लेश पाहून सहधर्मचारिणी सती द्रौपदी एके दिवशीं एकान्तात धर्मराजाजवळ येऊन म्हणते कीं, " महाराज ! तुम्ही त्या भक्तवत्सल श्रीकृष्णपरमात्म्याचे एकनिष्ठ भक्त असूनहि तुम्हांला इतके क्लेश सहन करणें भाग पडत आहे. हे धर्मराज ! तुम्ही दुःखनिवारणासाठीं त्या प्रभूची प्रार्थना कां करीत नाहीं ? " हे द्रौपदीचें भाषण ऐकून परमभक्तवर्य धर्मराजांनीं उत्तर दिलें कीं, " प्रिये ! हा जो प्रपंचाचा खेळ आहे हा सर्व पूर्वजन्मांतील कर्माचा परिणाम आहे. आपल्याच चांगल्या वाईट प्रारब्धबलानें सुखदुःखाचा उपभोग घ्यावा लागतो.

॥ प्रारब्धेंचि होये सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥१॥ ( तु० )

याविषयीं विशेष विचार करणें अनवश्यक आहे. शिवाय, मी कांहीं स्वार्थ साधण्याकरितां भगवंताची भक्ति करीत नसून माझ्या अंतःकरणाचा प्रवाह आपोआपच त्या मनोहर मूर्तीकडे धांव घेत असतो. म्हणूनच मी त्याची भक्ति करीत असतो. पहा ! हा पुढें कसा महान् सुंदर व प्रशांत असा हिमालय पर्वत उभा आहे. माझे नेत्र या पर्वतापासून कांहींच इच्छीत नाहींत, पण त्या पर्वताची निसर्गसिद्ध सौंदर्यताच माझ्या नेत्रांचें आपणाकडे आकर्षण करून घेते. याच कारणास्तव मोहित होऊन ते त्याकडे सदैव टक लावून पहात असतात.

भक्ति स्वरूप वर्णनाविषयीं महर्षि शांडिल्यांचें आत्मरत्यविरोधेनेति 'शांडिल्यः' असें मत आहे ह० जगाचें सत्यत्वानें भान नष्ट होऊन साधकानें अखंड ब्रह्मानुसंधानामध्यें निमग्न राहून निरतिशय आनंदाचा आस्वाद घेणें ह० आत्मरति. ह्या आत्मसुखप्राप्तीनंतरहि आपल्या हृदयनाथाशीं एकात्मतेनें राहून

पूजाकथादि करीत काल घालविणें ह्म० भक्ति असें आहे. श्रीशांडिल्य ऋषींच्या
या व्याख्येंत आणि अद्वैत्यांच्या ब्रह्मसद्भाव अवस्थेंत किंचिदपि विरोध नाहीं.
याविषयासंबंधीं देवर्षि नारदांचे

" नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलतेति "

असें मत आहे. ह्म० सर्व कर्मे भगवदर्पण करणें व त्या परमात्म्याचें क्षणभरही विस्मरण झालें तरी व्याकुळ होणें. लौकिक व पारमार्थिक भेदानें कर्माला द्विविधता प्राप्त होते. जेव्हां साधक पुत्रकलत्रपालनादि लौकिक व तप, यज्ञ, दानयोगादि पारमार्थिक कर्मे करीत असतो त्या वेळीं त्याची एकाग्रता इतकी कायम असणें अवश्य आहे कीं, मी जी कांहीं लौकिक पारमार्थिक कर्मे करीन तीं सर्व त्या भगवंताची सेवाच आहे असें वाटलें पाहिजे. व खऱ्या भक्तांची अशीच स्थिती असते, असें श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.

एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन ॥
अद्वया मज गमन । तो चाले तेंचि ॥
तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जप माझा ॥
तो निजे तेंचि कपिध्वजा । समाधी माझी ॥ ज्ञा० १८–५५॥

तुकोबारायही श्रीपांडुरंगाजवळ आपला अनुभव सांगतातः—

वाचा बोले ते तुझेचि गुणवाद । मंत्र जप कथास्तुती ॥
भोजन सारूठायीं फल तांबुल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ॥
चालता प्रदक्षिणा निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रति ॥ तु० ॥

श्रीमच्छंकराचार्यांनींही परापूजेचे शेवटीं असें उद्गार काढले आहेत कीं,

यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥

तात्पर्य, जेव्हां असे स्पष्ट उद्गार साधकाच्या मुखांतून निघतील तेव्हांच तो पूर्ण भक्त ह्मणविला जाईल.

७ भक्तिमार्गांतील प्राचीन पूज्यपाद महर्षि नारद, वेदव्यास, गर्ग, शुक, शांडिल्यादि आचार्यांनीं तसेंच अर्वाचीन रामानुज, वल्लभाचार्य, श्रीकृष्णचैतन्य, श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराममहाराज, समर्थ, इत्यादिकांनीं भक्तांच्या वर्णनप्रसंगीं व्रजवासी गोपीगणांचें फारच प्रशंसन केलें आहे. श्रीनारद ह्मणतातः—

" यथा व्रजगोपिकानाम् " ॥ ना. भ. सू.

वृंदावननिवासी गोपीजनांनीं भक्तीची पराकाष्ठा केली आहे. वस्तुतः श्रीकृष्णप्रेमाकरितां गोपिकांनीं आपल्या सर्व संसारसुखाला तुच्छ लेखलेलें होतें. खरोखरच असे भक्त क्वचितच सांपडतील. आनंदकंद श्रीकृष्ण परमात्म्याच्या प्रेमामुळें विव्हल होऊन त्या गृह, आश्रम, मान, संभ्रम, कुल, लज्जा, लोकलज्जा इत्यादिकांना पारख्या झाल्या होत्या. म्हणूनच श्रीकृष्णांनीं स्वमु-

त्यानें उद्धवाजवळ गोपिकांची स्थिती निवेदन केली होती. श्रीकृष्ण भगवान् म्हणतातः—

ता मन्मनस्का मत्प्राणा मदर्थे त्यक्तदैहिकाः ॥
ये त्यक्तलोकधर्माश्च मदर्थे तान्बिभर्म्यहम् ॥
धारयन्त्यतिकृच्छ्रेण प्रायः प्राणान्कथंचन ॥
प्रत्यागमनसंदेशैर्बल्लव्यो मे मदात्मिकाः ॥ भाग. १०-४६ ॥

भावार्थ—गोपिकांनीं माझे ठिकाणींच आपलें मन समर्पण केलें होतें. मीच त्यांचा प्राण आहें. माझ्या करितांच त्यांनीं आपल्या दैहिक कार्यांचा त्याग केला. ज्यांनीं माझ्याकरितां लौकिक, व्यावहारिक व धार्मिक विधिनिषेधादिकांना तुच्छ मानलें होते त्या गोपिकांचें रक्षण ( योग-क्षेम ) मीच करितों. माझ्या दूर रहाण्यामुळें त्या माझें स्मरण करीत दारुण विरहव्यथेनें व्याकुळ होऊन अविरत ध्यानानें स्वतःस विसरतात. माझ्या दर्शनावांचून त्या फार कष्टानें जिवंत राहिल्या आहेत. श्रीकृष्ण केव्हांना केव्हां तरी वृंदावनास परत येईल या अपेक्षेनेंच त्यांनीं प्राण धारण केले आहेत.

८ पण यावर जर कोणी तार्किक अशी शंका विचारील कीं गोपिकांचें श्रीकृष्णविषयक प्रेम केवल प्राकृत स्त्रीपुरुषांप्रमाणें जर असेल तर त्या प्रेमाला भक्ति असें म्हणतां येणार नाहीं. कारण, 'माहात्म्यज्ञानपूर्वक स्नेहाख्यांतःकरणवृत्तिविशेष म्ह० भक्ति' अशी भक्तीची व्याख्या श्रीनारदांनींच पांचरात्रागमांत केली आहेः—

माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः ।
स्नेहो भक्तिरिति प्रोक्तो तया मुक्तिर्नचान्यथा ॥ ना. पां. ॥

परंतु पुराणांतून असलेल्या गोपिकांच्या चरित्रावलोकनाभावींच अशा शंका उद्भूत होतात. श्रीमद्भागवतांतील कृष्णप्रेममदोन्मत्त गोपीगणांचे उद्गार पाहिले तर तेव्हांच हा संशय निवृत्त होईल. रासक्रीडेच्या वेळीं त्या गोपिका श्रीकृष्णपरमात्म्यास म्हणतात—

अस्त्वेत्र मे तदुपदेशपदेत्वयीशे । प्रेष्ठोभवांस्तनुभृतां किल बंधुरात्मा ॥
व्यक्तं भवान्व्रज भयार्ति हरोऽभिजातो । देवो यथादि पुरुषःसुरलोकगोप्ता ॥
॥ नखलु गोपिकानंदनो भवानखिलदेहिनामंतरात्मदृक् ॥

इ० इ० वचनांवरून विवेकिजनांस गोपिकांना ईश्वरविषयक ज्ञान पूर्ण होतें, श्रीकृष्णास ईश्वरावतार समजूनच गोपिकांनीं आपलें सर्वस्व गोपालचरणावर समर्पण केलें होतें, असें सहज लक्षांत येईल. एवढें सामर्थ्य प्राप्त करून घेण्याकरितां व्रजवासी स्त्रियांनीं कांहीं शास्त्राध्ययन केलें नव्हतें; कृच्छ्रचांद्रायणादिक तपेंही त्यांनीं आचरलीं नव्हतीं; किंवा तत्वमसि आदिकरून

महावाक्यांचाही विचार केला नव्हता. केवल श्रीकृष्णपरमात्म्याच्या अनन्य भक्तीचा आश्रय करूनच त्या मोठमोठ्या योग्यांना किंवा ऋषींना अप्राप्य अशा सद्गतीला प्राप्त झाल्या होत्या. याविषयींच श्रीनारद भक्तिसूत्रांत सांगतात:—

न तत्रापि माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः । तद्विहीनं जाराणामिव ।

या गोपिकांच्या उदाहरणांत श्रीकृष्णमहात्म्याची त्यांना क्षणमात्र विस्मृती होत होती, असा अपवाद ( आरोप ) कोणालाही तेथें आणतां येणार नाहीं. श्रीकृष्ण सच्चिदानंद स्वयंप्रकाश भेदशून्य असा परमात्मा आहे हें ज्ञान त्यांस नसतें तर त्या प्रेमास जारप्रेम अशी संज्ञा देतां आली असती. सारांश, वरील विवेचनावरून गोपिकांचें प्रेम ज्ञानपूर्वक होतें, व्यावहारिक प्रेमाप्रमाणें तें कुत्सित नव्हतें हें सिद्ध झालें. आतां ज्ञान व भक्ति यांमध्यें साध्य-साधनविषयक वाद प्राचीन व अर्वाचीन विवेकी किंवा शास्त्री पंडितांमध्यें बराच उत्पन्न झाला आहे, करितां या वादाच्या यथार्थतेचा थोडासा विचार करूं.

१. ज्ञानपक्षपाती 'ज्ञान हेंच जीवाचें अंतिम ध्येय म्ह० साध्य, त्यापेक्षां जगांत दुसरी कोणतीहि श्रेष्ठ अशी साध्य वस्तु नाहीं, व या ज्ञानप्राप्तीकरितां भक्ति या साधनाची अपेक्षा आहे' या आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ "यस्य देवे पराभक्तिः" (श्रुति) "तेषां सततयुक्तानां" किंवा "भक्तिविनाज्ञानं नास्त्युपायशतैरपि" इ० इ० श्रुतिस्मृतींचीं प्रमाणेंही पुढें करितात. तसेंच भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते म्हणतात कीं, ज्ञानाची मुळींच अवश्यकता नाहीं. साधन व साध्य सर्व कांहीं भक्तीच आहे. कारण श्रीनारदसुद्धां म्हणतात कीं, "सा कर्मज्ञानयोगेभ्योऽप्यधिकतरा । फलरूपत्वात्"

"स्वयंफलरूपतेति ब्रम्हकुमार:" ना. भ. सू.

कर्म, ज्ञान, योग ह्यांपेक्षां भक्तीच श्रेष्ठ आहे. कारण भक्ति ही फलरूप आहे. श्रीतुकोबारायही हेंच सांगतात कीं "बीज आणि फळ हरिचें नाम" तात्पर्य, भक्ति ही साधन नसून सिद्धरूप आहे असें त्यांचें मत आहे.

आतां तिसरे समुच्चयवादी म्हणतात कीं, भक्ति व ज्ञान यांचा अन्योन्य संबंध आहे. विचार करून पाहिलें असतां ज्ञान म्ह० जाणणें. जेव्हां कोणी मनुष्य दुसऱ्याच्या सर्व वृत्तांताची ( इतिहासाची ) माहिती करून घेतो, त्या वेळेस तो त्या दुसऱ्या गृहस्थाशीं मैत्री ( प्रेम ) स्थापित करितो. जेव्हां साधकास वेदगुरुशास्त्रद्वारां ईश्वरविषयक ज्ञान होईल, तेव्हांच तो ईश्वराची भक्ति करूं शकेल. या सिद्धांतासंबंधीं विचार करितांना महर्षि शांडिल्य म्हणतात:—

ज्ञानमिति चेन्न द्विषतोऽपि ज्ञानस्य तदसंस्थितेः ।

ईश्वरविषयक ज्ञानविशेषानें नांव भक्ति नाहीं. कारण शत्रूसही आपल्या प्रतिपक्षाचें ज्ञान असतें. विचार करा, एका गृहस्थास आपल्या शत्रूचें ज्ञान

आहे. तो जाणतो कीं, माझ्या शत्रूचें स्वरूप असें असें आहे, तो अमुक गुणांनीं युक्त आहे, तर एवढ्या ज्ञानावरून काय त्याची भक्ति (प्रेम) त्या शत्रूवर राहील ? ह्यावरून हें सिद्ध झालें कीं, ज्ञानाचें फल भक्ति नाहीं, किंवा भक्तीचें फल ज्ञान नाहीं. त्यांत विशेष एवढाच कीं, ज्ञान हें भक्तीला सहाय्यक आहे. म्हणजे ईश्वरासंबंधीं ज्ञानानें भक्ताच्या हृदयांत भक्तीची वृद्धी होते. शांडिल्य पुनः म्हणतात कीं " तयोपक्षयाच्च " म्ह० पूर्ण भक्तीचा उदय झाल्यानंतर ज्ञानाचा संपूर्ण नाश होतो. भक्तिमार्गनिरत आचार्यांचा हाच अनुभव आहे कीं, जेव्हां भक्ताची ईश्वराविषयीं पूर्ण प्रीति (पराभक्ति) जडते त्यावेळीं भक्त व परमप्रेमास्पद परमात्मा यामध्ये कांहींच भेद नसतो. अशा अवस्थेमध्यें आपोआपच ज्ञानाचा (त्रिपुटीचा) लोप होतो. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं भक्ति व ज्ञान ह्यांचा समुच्चय केव्हांही होत नाहीं.

१० भक्तीचा उदय साधकाच्या अंतःकरणांत स्वयंस्फूर्तीनेंच होत असतो. अभ्यासानें किंवा वेदांत गुरूपदेशद्वारा साधक विचार करीत ईश्वरविषयक ज्ञानाची प्राप्ती करून घेतो. परंतु भक्तीची प्राप्ती ज्या वेळेस साधकाचें मन त्या अनिर्वचनीय स्वरूपदर्शनानें मोहित होऊन तो तन्मय होईल त्याच वेळेस प्रगट होतें. तिला क्रिया वगैरेची अपेक्षा नाहीं असें श्रीशांडिल्य ऋषि म्हणतातः—

न क्रियाकृत्यनपेक्षणाज्ज्ञानवत् ॥ शां. भ. सू.

असाच एकान्तिक भक्त मला अतिशय आवडतो असें श्रीकृष्ण भगवानच अर्जुनास सांगतात. "प्रियोहिज्ञानिनोत्यर्थं" "ज्ञानीत्वात्मैवमेमतं" व हाच पराभक्तीचा अधिकारी आहे. व त्याची ती एकान्तिकी अथवा पराभक्ति समजाऊन देण्याकरितांच गीतेमध्यें "अनन्याश्चितयंतो मां" "यो मां पश्यतिसर्वत्र" "न मे भक्तः प्रणश्यति" "सर्व धर्मान्परित्यज्य " इ. इ. श्रेष्ठवचनांचा प्रयोग श्रीकृष्णांनीं केला आहे. तसेच श्रीनारदही म्हणतात—

भक्ता एकान्तिनो मुख्याः (ना. भ. सू.)

ज्या अधिकाराची प्राप्ती झाल्याबरोबर तो साधक सिद्ध होतो, पूर्ण तृप्त होतो, ज्या अवस्थेचा उदय झाल्याबरोबरच भक्त परमानंदरूप होतो, नंतर त्यास चहूंकडे एका भगवंताशिवाय कांहींच दिसत नाहीं, ह्या दिव्य अवस्थेसच भक्ति असें म्हणतात.

११ भक्तीचें मूलभूत स्वरूप एकच असूनही भागवतधर्मीय सत्पुरुषांनीं स्वतःच्या आवडीनें ११ प्रकार केले आहेत असें नारद सांगतातः—

१ गुणमाहात्म्यासक्ति. २ रूपासक्ति. ३ पूजासक्ति. ४ स्मरणासक्ति. ५ दासासक्ति. ६ सख्यासक्ति. ७ कांतासक्ति. ८ वात्सल्यासक्ति. ९ आत्मनिवेदनासक्ति. १० तन्मयतासक्ति. ११ परमविरहासक्ति.

आपल्या आवडीनुसार एकाच सुवर्णापासून अनेक नामरूपात्मक अलंकार मनुष्य करीत असतो तरी या अनेक दागिन्यांमध्यें सोनें एकच असतें, तसाच ह्या एकादशभक्तीचा प्रकार आहे.

ह्या संसारामध्यें जो ज्याच्याशीं प्रेम करीत असतो, त्यास आपल्या प्रिय वस्तूच्या सर्व चेष्टा व तिचें सर्व अंगही सुंदर दिसतें. कळत नाहीं कीं, जीवाचा स्वभाव कसा चमत्कारिक आहे ! त्याच्या प्रियवस्तूकडून तो पूर्णपणें मोहित झाला असतांहि त्याचें मन त्या प्रिय वस्तूच्या विशिष्ट सौंदर्यविशेषामध्यें व विशिष्ट स्वाभाविक चेष्टेमध्येंच अधिक रंगून जातें. ह्या तारतम्यामुळेंच भक्त्याचार्यांच्या प्रेमरूपिणी भक्तीमध्यें अनेकविधता दृष्टोत्पत्तीस येते. कारण, सर्व भक्तवर्यांची श्रीभगवंताचे ठिकाणीं पूर्ण आसक्ती असूनही अशा चित्तवृत्तिच्या विषमतेमुळेंच भगवंताच्या विशिष्ट प्रकारच्या ( म्ह० नवविधा किंवा एकादशविधा ) भक्तीनें ते मोहित झाले आहेत.

१२ पहिल्या गुणमाहात्म्यासक्तीचीं उदाहरणें पुराणांत बरींच आढळतात. त्यांतल्या त्यांत देवर्षि नारद, वेदव्यास, शुक, परीक्षिती, इत्यादिकांना अग्रपूजेचा मान मिळतो. द्वितीय रूपासक्तीविषयीं यशोदेचें श्रीकृष्णाच्या बालरूपांत मोहित होणें आणि गोपिकांचा किशोरअवस्थेंतील भगवद्रूपाचा मोह ( प्रेम ) जगप्रसिद्ध आहे. तृतीय पूजासक्तीविषयीं राजा पृथुसारखे भक्त दृष्टीस पडतात. चतुर्थ स्मरणासक्तीचा पूर्ण प्रकाश दैत्यकुलतिलक अद्वितीय भक्त प्रल्हाद बालकाच्या दिव्यचरित्रांत पडलेला दिसतो. भक्तश्रेष्ठ हनुमान्, विदुर इत्यादिकांच्या दास्यासक्ति ( सेवा ) नेंच पुराणांची सौंदर्यता वृद्धिंगत झाली आहे. इतिहासांत अर्जुन, सुग्रीव, अक्रूर, सुदाम, इत्यादि भक्तवर्यांची सख्यभक्ती पूर्णपणें दृष्टिगोचर होते. तसेंच व्रजवासी राधा आदिकरून गोपिकांची किंवा रुक्मिणी, सत्यभामा अथवा सीता इत्यादिकांची कांतासक्ति भक्तांच्या हृदयमंदिरांत प्रामुख्यानें विराजमान आहे. अष्टम वात्सल्यासक्तीच्या उदाहरणांत महर्षि कश्यप, नंद, यशोदा, दशरथ, कौसल्यादि प्रसिद्ध आहेत. नवम आत्मनिवेदनासक्तीविषयीं राजा बलीच श्रेष्ठ आहे. किंवा दशम तन्मयतासक्तीच्या उदाहरणांत श्रीशंकरापेक्षां श्रेष्ठ असें दुसरें उदाहरण सांपडणें अशक्य आहे. कारण ते अभेदभक्तीनें एकरूप झाले असूनही पुन्हां त्या भगवंताची भक्ति करितात. एकादश विरहासक्तीचा प्रकाश श्रीकृष्ण परमात्मा स्वधामास गेल्यानंतर सखा उद्धव, अर्जुन किंवा गापीगणांच्या विरहामुळें प्रकाशित आहे.

१३ इतर सर्व साधनांच्या अपेक्षतेनें हा भक्तिमार्गच सर्वांत सुलभ आहे. कारण ईशभक्ति या साधनाला न विद्यासंग्रहाची अवश्यकता किंवा द्रव्य

खर्च करण्याचेंही कारण नाहीं. किंवा आचारविचारांची कांहीं मर्यादा नाहीं. वर्णाश्रमधर्म यथायोग्य परिपालन करण्याचीही गरज नाहीं. किंवा ह्या साधनांत योगाभ्यासाची कठिणता नाहीं. तसेंच व्रतें, तप इत्यादिकांची कठोरताही नाहीं. या कारणास्तवच श्रीनारद म्हणतात "अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ" व सर्व अर्वाचीन संतमंडळींचाही हाच साग्रह सिद्धांत आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात—

"तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनि" "भक्तिपंथ बहुसोपा."

जर ईशकृपेनें साधक भक्तिमार्गाचा अधिकारी होईल तर तो सत्वरच लक्ष्यस्थलीं जाऊन पोहोंचतो. भक्तीचा उदय कसा होतो याचा पत्ता कोणीही लाऊं शकत नाहीं परंतु भक्तिमान् साधक इतकेंच म्हणतात कीं, केवल भगवत्कृपेनेंच भक्तीचा उदय होतो. जसा सूर्य स्वकीय किरणशक्तिद्वारा समुद्रजलापासून वाफ उत्पन्न करून त्या ढगानें आपणच आच्छादित होतो व पृथ्वीवर अंधार करून टाकितो, परत पुन्हां आपल्याच तेजानें उष्णतेची वृद्धि करून मेघांना वितळवून आपण तमोमुक्त होऊन पृथ्वीला पूर्वीप्रमाणें प्रकाशित करितो, तसेंच श्रीभगवानही आपल्या अलौकिक दिव्य शक्तिद्वारा जीवाला मायामोहित करून नानाप्रकारच्या खेळांत गुंतवून टाकितो, पुन्हां भक्तिरूप पर्जन्य पाडून त्याला पवित्र करून आपल्या कडेवर घेऊन त्यास आपल्या स्वरूपांत समरस करून टाकितो. ईश्वरकृपा ह्मणजेच संतकृपा. हीच भक्तीच्या उदयाला कारणीभूत आहे असा नारदादि सर्व भक्तमंडळींचा साग्रह सिद्धांत आहे. श्रीनारद म्हणतात—

"मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा ॥" ना. भ. सू.

तसेंच श्रीतुकोबांनींही भक्तीकरितां श्रीपांडुरंगाचीच वेळोवेळीं प्रार्थना केली आहे.

आणिक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्ती राज्यत्राडधने ।
सांकडे न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविण मायबापा ॥ तु० ॥
मज भीक कांहीं देवा । प्रेम मातुकें पाठवा ॥
हे तों देणें तुमचे देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥
प्रेम देवाचें हें देणें । देहभाव जाय जेणें ॥ तु० ॥

इ० इ० प्रमाणांवरून भगवद्भक्ति भगवत्कृपाधीन आहे, तशीच तिला संतकृपेचीही अवश्यकता आहे हें ठरलें, पण ती संतकृपा देखील ईशकृपेवांचून प्राप्त होत नाहीं.

यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमात्मनः ॥
तावन्न सद्गुरुं कश्चित्सच्छास्त्रमपि नोलभेत् ॥ १ ॥

याच आशयानें श्रीतुकाराम महाराजांनीही वेळोवेळीं संतभेटीविषयीं किंवा संतसेवासंग याबद्दल श्रीपांडुरंगाचीच प्रार्थना केली आहे.

देव वसे ज्याचे चित्तीं । त्याची घडावी संगति ॥ १ ॥
हेंचि आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ २ ॥
कोण पुण्यें यांचा होईन सेवक । जिहीं इंद्रादिक दुरावले ॥
ऐसें वर्म मज दावी नारायणा । अंतरींच्या खुणा प्रगटोनी ॥ २ ॥

तात्पर्य, भगवद्भक्तीकरितां संतकृपेचीही अवश्यकता आहे.

सत्संगें भक्तीची प्राप्ती । उद्धवा जाण निश्चिती ।
संतापाशीं माझी भक्ति । वास पाहतां उभी असे ॥१॥ ए. भा.
सत्संगेंविण रोकडी । सद्भक्ति चोखडी न पविजे ॥
संतांसी शरण गेलिया वांचोनि । एका जनार्दनीं न कळे नाम ॥ १ ॥

इतर यत्नानें किंवा साधनानें भगवद्भक्ति प्राप्त होत नाहीं, तर संतांचा अनुग्रह झाल्याबरोबरच मी त्या साधकावर कृपादृष्टी करितों, असें श्रीकृष्ण भगवान् उद्धवास सांगतात.

सत्संग लब्धया भक्त्या मयि मां समुपासिताः ॥
सवै मे दर्शितं सद्भि रंजसा विंदते पदम् ॥ भा. ११-११-२५ ॥

सारांश, संतकृपेवांचून कोणतेंही साधन सफळ होत नाहीं हें सिद्ध झालें. पण तो संतसंगही पण फार दुर्लभ आहे. नारद म्हणतात—

महत्संगस्तु दुर्लभो ऽगम्यो ऽमोघश्चलभ्यते ऽपि तत्कृपयैव ॥ ना. भ. सू.
बहु अवघड असे संतभेटी । परि जगजेठी करुणा केली ॥ तु० ॥

तो वास्तवच दुर्लभ आहे कीं जरी कदाचित साधकास संतांचें दर्शनही होईल तरी अंतःकरणाच्या मालिन्यामुळें संसारीजन संतांना असंतच समजतील. त्यामुळें उत्तम अदृष्टावांचून सत्संग दुर्लभच आहे. महत्संग ह्यामुळेंच अगम्य आहे कीं, जरी संतांना साधू म्हणून ओळखिलें तरी पण त्यांच्या एकनिष्ठ सेवेवांचून त्यांची कृपा होत नाहीं. महात्म्यांचा समागम या कारणास्तवच अमोघ आहे कीं, साधकानें त्यांच्या स्वरूपास ओळखलें किंवा न ओळखलें तरी त्याच्या अधिकारानुसार दर्शनानेंच त्यास सत्संगाचें फळ मिळाल्यावांचून राहणार नाहीं. संत सत्वगुणावलम्बी असतात, व प्राकृत गृहस्थगण रजमिश्रित सत्वगुणानें किंवा केवळ राजसिक व तामसिक असतात. पण प्राबल्यामुळें इतर गुण सत्वगुणापुढें दबून जातात, म्हणून महात्म्यांकडून निम्नगुणावलम्बी प्राकृत जीवावर कांहीं तरी उपकार झाल्यावांचून रहात नाहीं.

१४ संतकृपा व भगवद्भक्तिराहित्यामुळें मोठमोठया विद्वान् ज्ञानी पंडित म्हणविणाऱ्यांनाही ईश्वरसत्ते ( शक्ति ) विषयीं संशय उत्पन्न होतो. हे सर्व

नितान्त सत्य असतांही ज्ञानी सर्वशक्तिमान् सगुण परमात्मा व तत्संबंधीं अवतार या विषयांत शंकित होतात.

हे भगवद्भक्तिहीन बुद्धिमान गणहो, ज्या सर्व शक्तिमान् जगत्पित्या परमात्म्याच्या इच्छामात्रानेंच सर्व सृष्टीच्या अनेक घटना चक्रवत् चालू आहेत, ज्या पूर्ण शक्तिधारी जीवत्रितापहारी परमात्म्याच्या अवलोकनानेंच अनंत जीवांचें संरक्षण होतें, तो भगवान् आपल्या भक्तांच्या इच्छापूर्तीसाठीं किंवा कल्याणासाठीं शरीर धारण करण्यास असमर्थ आहे ?

ह्याकरितां हे सूज्ञ हो ! अज्ञान्याप्रमाणें अशा प्रकारचा अहितकारी संशय किंवा भावनांना आपल्या हृदयमंदिरांत स्थान मिळूं देऊं नका व भगवंताच्या अतुलनीय शक्तीवर विश्वास ठेवून परम कल्याणास पात्र व्हा.

ह्या संसारामध्यें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें असतां त्यांत दोन अवस्था दृष्टिगोचर होतात. ( १ ) जड ( २ ) चेतन. एक अज्ञानपूर्ण व दुसरी ज्ञानपूर्ण. अज्ञानपूर्ण अवस्थेच्याद्वारें सृष्टीचा विस्तार व ज्ञानपूर्णअवस्थाद्वारा तिचा बाध व परमानंदाची प्राप्ती होते. जेव्हां जडमय सृष्टिविस्तार करणाऱ्या अवस्थेचा पूर्ण विकास होतो त्याच वेळेस सृष्टिनियमानुसार जडनाशाला कारणीभूत चेतनमय ज्ञानपूर्णअवस्थेचा पुन्हा प्रकाश होतो. जीवाच्या अंतःकरणांतही हे दोन्ही भाव सदैव दृष्टीस पडतात. जीव अज्ञानास वश होऊन मोहानें पापकर्मामध्यें प्रवृत्त होतो, तेव्हां त्याच्या अंतःकरणांत सद्बुद्धिरूपानें जो पापनाशक व मोहनाशक भावाचा उदय होतो, तर तें परिवर्तन कर दिलेल्या नियमानुसारच होतें. या अभ्रांत नियमानुसार जीव शिला आदिपासून उन्नत होत होत अति श्रेष्ठ जी मानवयोनी तिला प्राप्त होतो. ह्या सृष्टिकौशल्याकडे पाहण्यानें किंवा या ईश्वरीनियमावर लक्ष दिल्यास हें कबूल करणें भाग पडेल कीं, ज्या वेळेस अज्ञानरूप पापाचा पूर्ण विस्तार होतो त्या वेळेस पूर्ण ज्ञानमय अवताराचेंही प्रयोजन आहे यांत कांहीं संशय नाहीं. करितां, सर्व संशयांना दूर सारून पूर्णशक्तिधारी भगवंताच्या अतुलनीय शक्तीवर विश्वास ठेवणें हेंच सूज्ञांना योग्य आहे ह्यारीतीनें त्या परमेश्वराचें ध्यान करणारा साधक क्रमानें तत्स्वरूपाला प्राप्त होतो. भिंगुरटी ( भृंग ) त्या किडयाला पकडते तेव्हां एकाग्रतेनें तो किडा भिंगुरटीचें ध्यान करीत करीत तत्स्वरूप होतो. बाह्य जगतांत जर असें परिवर्तन दिसून येतें तर ह्या एकाग्रतेचें अंतर्जगतांत परिवर्तन होणें काय अशक्य आहे ? गौणीभक्तीनेंच पराभक्तीची प्राप्ती होते. भगवन्नाम जप करीत करीत किंवा भगवद्रूपाचें ध्यान अथवा भगवद्गुणानुवाद गातगात साधक पराभक्तीचा अधिकारी होऊन भगवत्स्वरूपांत तन्मय होतो. अतएव सर्व जीवांना आत्यंतिक कल्याणदर्शक अशा या भक्ति-

मार्गापेक्षां दुसरा सहजसुलभ व सद्यःफलदायी असा श्रेष्ठ मार्गच नाहीं. म्हणून त्रिकालदर्शी श्रीनारद उच्च स्वरानें ऊर्ध्व बाहु करून सांगतात—

त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी । भक्तिरेव गरीयसी । भक्तिरेव गरीयसी ॥
एवं निर्विघ्न मजमाजी सरता । मार्ग नाहीं भक्तीपरता ।
त्रिसत्य सत्य गा सर्वथा । भक्ति तत्वता मज पढिये ॥ एकनाथ ॥ इतिशम् ॥

---

# श्रीअनंतव्रत

( लेखक—**नरहर सदाशिव जोशी** रा. खरशी जि. सातारा. )

१ सांप्रतकालीं सनातनधर्माचें शुद्ध ध्येयास आमचा समाज पारखा होत चाललेला दृष्टोत्पत्तीस येत आहे. आमचीं श्रुतिस्मृतिप्रणीत कर्मे अतिशय शुद्ध, ऐहिक पारत्रिक साधून देणारीं व जीवास भवपाशांतून सोडविणारीं आहेत. नित्यनैमित्तिक कर्मे बंधांतून सोडविण्यास समर्थ आहेत; परंतु त्यांत काय दिव्यत्व भरलें आहे हें जर शोधलें नाहीं तर याच कर्मास काम्यकर्माचें स्वरूप येऊन निरंतर वासना वृद्धि पावत जाऊन जन्ममृत्यूचें चक्र सतत डोक्यावर फिरत राहतें, एवढ्यासाठीं कर्म शुद्ध झालें पाहिजे. शुद्धकर्म म्हणजे—

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानिच ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् । गीता अ० ८.

* * *

तरी महायाग प्रमुखें । कर्मे निफजतांही अचुकें ॥
कर्तेपणाचें न ठाके । फुंजणें आंगीं ॥ १ ॥
जो मोलें तीर्था जाय । तया मी यात्रा करितु आहे ॥
ऐसिये श्लाघ्यतेचा नोहे । तोषु जीवीं ॥ २ ॥
तैसें कर्तृत्व अहंकारें । नेघोनि यथा अवसरें ॥
कृत्यजातांचे मोहरें । सारीजती ॥ ३ ॥
ऐसी हे हातवटी । घेऊनि जे क्रिया उठी ॥
आपणा आपुलिया गांठी । लाहेचि तो ॥ ४ ॥
म्हणोनि फळीं लागु । सांडोनि देहसंगु ॥
कर्मे करावीं हा चांगु । निरोपु माझा ॥ ५ ॥ ज्ञानेश्वरी.

सारांश, कर्माचें फळ ज्याप्रमाणें समर्पण करावयाचें तसेंच सर्व कर्मांचा कर्ता परमात्मा आहे हें ओळखून कर्मे करावयाचीं; परंतु हल्लीं असें शुद्ध कर्म होत असलेलें दिसत नाहीं.

२ श्रीमदनंतव्रतही फारच श्रेष्ठदर्जाचें आहे. या व्रताचा संपूर्ण महिमा श्रीभगवान् गोपाळकृष्णानीं पांडवांना सांगितला व पांडव हें व्रत यथासांग आचरून राज्यप्राप्ती करून घेते झाले. सारांश, हें व्रत अभ्युदय–प्रापंचिक उन्नति–व निःश्रेयस–मोक्षप्राप्तीही करून देण्यास समर्थ आहे. यांतील तात्विक भाग संक्षेपतः दाखवीत आहे.

शब्दौमित्येकाक्षरंच खंमयं सर्वतो मुखं ।
चैतन्यमेवसत्ताच साक्षं सगुणमेवच ॥
निर्गुणंच वाचकंच, अनुभवंच रुद्रकं ।
आनंदच तदाकारं अनिर्वाच्यं चतुर्दश ॥
( हा श्लोक कोठील आहे हें सांगतां येत नाहीं. )

सदर श्लोकांत चतुर्दश ब्रह्माची योजना सांगितली आहे.

१ शब्दब्रह्म म्हणजे वेद हे ब्रह्म आहेत.
२ ओमित्येकाक्षर ब्रह्म म्हणजे ॐ हेंच ब्रह्म आहे.
३ खं ब्रह्म म्हणजे आकाशच ब्रह्म. आकाश सर्वव्यापी आहे.
४ सर्व ब्रह्म म्हणजे सर्वं खल्विदं ब्रह्म. सर्व चराचर ब्रह्म आहे.
५ चैतन्यब्रह्म म्हणजे सर्व जडाजडास प्रकाशित करणारें.
६ सत्ताब्रह्म म्हणजे चैतन्यांतही सत्ता स्फूर्तित्वानें असणारें.
७ साक्षब्रह्म म्हणजे सत्तेस जाणणारें.
८ सगुणब्रह्म म्हणजे ज्यापासून साक्षब्रह्म कळतें तें स्वरूप त्रिगुणांत असणारें.
९ निर्गुणब्रह्म म्हणजे जेथें गुणवार्ता उत्पन्न होत नाहीं तें.
१० वाच्यब्रह्म म्हणजे वाचेनें बोलावें परंतु अनुभवास येत नाहीं तें.
११ अनुभवब्रह्म ह्मणजे जें अनुभवून सांगतां येत नाहीं तें.
१२ आनंदब्रह्म ह्मणजे अखंड आनंदरूप असतें तें.
१३ तदाकारब्रह्म ह्मणजे आनंदांत तद्रूपपणानें असणारें.
१४ अनिर्वाच्यब्रह्म ह्मणजे ज्या ठिकाणीं भाषा खुंटते तें.

बृहदारण्योपनिषदांत निरनिराळ्या प्रसंगीं चौदा ब्रह्मांचें वर्णन सहज येऊन गेलें आहे.

३ अनंतदोरक हा रेशमाचा असावा. रेशमांत विद्युत् असते. ही विद्युत् जर शुद्ध ब्रह्ममय आहे अशी भावना असेल तर मनश्चक्षुरादिक इंद्रियें सहज ब्रह्मरूप होतील. हें जाणून रेशमाच्या दोरकाची योजना आहे, व चौदा ब्रह्मांच्या चौदा गांठी देऊन त्यांचें पूजन करून आपणासह–अहंस्फूर्तीसह अनंत अपार अनिर्वाच्य स्वरूपांत लीन व्हावें, एतदर्थ तो दोरक उजव्या हातांत बांधावा. दोरकांत पूजनाचे द्वारां संपूर्ण ब्रह्मस्वरूपाची विद्युत्–तेज–

सांठविलें असल्यामुळें त्यांपासून ब्रह्मप्राप्ती होते; व ब्रह्माच्या--अनंताच्या- यथासांग पूजनानें अंतर्बाह्य शुचित्व येऊन समाधान उत्पन्न होतें. हें व्रत सकाम झाल्यास इच्छा पूर्ण होते व निष्काम झाल्यास ब्रह्मप्राप्ती होते. ऐहिक पारत्रिकाची इच्छा असणाऱ्यानें हें व्रत निष्कामत्वानें ( ब्रह्मभावनेनें ) करावें व ब्रह्मरूप धारण केलें ह्मणजे आपणही ब्रह्मरूप आहोंत याचा ध्यास असावा; आरंभीं गीताश्लोकांत व विवरणांत सांगितल्याप्रमाणें कर्तृत्वाभिमान सोडून निरहंकार वृत्तीनें कर्म होऊं दिल्यास तें कर्म स्वानंदप्राप्तीस खात्रीनें कारण होऊं शकेल.

४ मनासहित एकादश इंद्रियें व त्रिगुण यांच्या घट्ट गांठी कोठें पडतात तर फक्त इंद्रियें व त्रिगुण ब्रह्मस्वरूपाचेंच ठिकाणीं लीन होतात, म्हणून एकादश इंद्रियें व त्रिगुण यांच्या चौदा गांठी बांधून ब्रह्मस्वरूपांत लीन केल्या असतां त्रिगुण व इंद्रियवृत्तीही ब्रह्मरूप होतात व अशी भावना झाली म्हणजे प्रपंचांतील दुःखांचा निरास होऊन आनंदीआनंद अनुभवण्यास सांपडतो; या दृष्टीनेंही हें व्रत फार श्रेष्ठ आहे.

५ चतुर्दश भुवनें ज्याच्या अंतरांत सांठवतात तो परमात्मा अनंत आहे. या शुद्ध भक्तिप्रेमामुळेंच चतुर्दशभुवनरूपी ग्रंथी देऊन त्यांचा स्वामी अनंत याचा अंत लागणार नाहीं असा अनंत अपार परमात्मा हस्तावर बांधून शुद्ध उपासना करण्याचा हा थोर मार्ग आहे.

६ शेषाचेंही नांव अनंत आहे. पृथ्वी धारण करणाऱ्या शेषाचें सामर्थ्यही अनंत आहे. असा अनंत सामर्थ्यवान शेष याची पूजा करून अनंतस्वरूपाचें सतत स्मरण ठेवणें हा यांतील विशेष होय.

संसारगव्हरगुहां सुसुखं विहर्तुं वांछंति ये कुरुकुलोद्भव शुद्धसत्वाः ।
संपूज्यते त्रिभुवनेशमनंतदेवं बध्नाति दक्षिणकरे वरदोरकं ते ॥ १ ॥

श्रीकृष्ण म्हणतात—हे कुरुकुलोद्भवा धर्मा, ह्या संसाररूपी भयंकर गुहेमध्यें जे सुखानें विहार करण्याची इच्छा करितात, ज्यांची अंतःकरणें शुद्ध आहेत, जे त्रिभुवनेश्वर जो भगवान अनंत त्याची पूजा करून त्याचा तो दोरक आपल्या उजव्या हातांत बांधतात ते इहलोकीं सर्व सुखें भोगून अंतीं मोक्षपदाला प्राप्त होतात.

७ अनंताची कथाही फार सुरस आहे. कौंडिण्यऋषीस देहाभिमान होतांच (माझ्या तपाचें फल ऐश्वर्यप्राप्तींत झालें आहे असा अ देहाभिमान उदित होतांच) सर्वस्वाचा लय झाला परंतु ही चूक कौंडिण्याचे ध्यानांत येऊन तो परब्रह्म अनंताचे शोधास निघाला व त्यानें देहासुद्धां सर्वस्व समर्पण करण्याचा निश्चय केला. याप्रमाणें सर्व कर्ता भोक्ता अनंतपरमात्मा आहे, अव्यक्त परब्रह्माचें अनंत हें व्यक्त सुंदर

साकाररूप आहे, अशी शुद्ध भक्ति उदित झाली, व नाहंकर्ता नाहंभोक्ता अशी कौंडिण्यऋषीची स्थिति होतांच श्री अनंत दर्शन झालें व देहाभिमान-राक्षसाचें निर्दलन अनंतपूजा करून झाल्यामुळें संसारगुहेपासून निर्भय होऊन ऐहिक पारमार्थिक सौख्य कौंडिण्यऋषीस लाभलें.

८ या कथेंत बरींच गूढें आहेत. स्वतः विद्यासंपन्न असून विद्यामदानें ग्रस्त होऊन कोणासही विद्यादान केलें नाहीं म्हणून एका श्रोत्रिय ब्राह्मणास अंब्याचा वृक्ष व्हावें लागलें तथापि त्याचीं फळें कोणींच ( पक्षीसुद्धां ) खात नसत. [ इतकीं तीं अपवित्र होतीं. ] हें विद्यादान न केल्याचें फल होय.

९ पृथ्वीरूपी गाय होती तिला गवत खातां येत नसे. याचें कारण पूर्वकाळीं तिनें सर्व औषधींचीं बीजें आपल्या अंगांत मुरवून टाकलीं होतीं. [ परोपकारार्थ बिलकूल खर्च न केल्यामुळें असें फल प्राप्त झालें. ]

१० पुढें वृषभरूपी धर्माचें हिरव्या गवतांत कौंडिण्यास दर्शन झालें. नंतर दोन सरोवरें पाहिलीं तीं धर्माधर्माच्या व्यवस्था होत्या. ब्राम्हणकुलांत उत्पन्न झालेल्या या दोघी बहिणी होत्या. त्या एकमेकींवर प्रेम करीत. यामुळें अत्यंत दानधर्महि आपसांत करीत असत. ब्राह्मण, अतिथी वगैरे कोणासही भिक्षा समर्पण न केल्यामुळें त्या सरोवरें झाल्या होत्या. त्यांचें पाणी इतकें खराब होतें कीं, तें कोणीही पीत नसत. यावरून स्वार्थी, मतलबी लोकांची जगामध्यें कशी निंद्य स्थिती होते हें दिसून येतें.

११ नंतर वाटेनें कौंडिण्यास त्याच्या क्रोधाचें रूप गर्दभरूपांत व मदाचें रूप हत्तीरूपांत दिसलें; व शुद्ध ब्रह्मरूपी प्रत्यक्ष अनंत दर्शन झालें. तथापि जेथवर मी कर्ता भोक्ता अशी ताठ्याची वृत्ती होती तेथवर कौंडिण्यास दुःख सोसावें लागलें व सर्व कर्ता करविता अखिल विश्वांतरवासी अनंत अपार आहे असा निश्चय होतांच अनंतदर्शन होऊन पूर्ण वैभव प्राप्त झालें व अखंड आनंदानुभव सहज मिळाला.

आमचा सनातन धर्म आकुंचित नसून कसा व्यापक आहे हें या अनंतव्रतरहस्यावरून सहज ध्यानीं येतें. शुद्ध भावनेनें अनंतव्रत झाल्यास आमचें गत वैभव खात्रीनें प्राप्त करून देण्यास श्री अनंत समर्थ आहेत. प्रापंचिक वैभव मिळून पारमार्थिक वैभवही देतील व आमच्या गळ्यास लागलेल्या पारतंत्र्य संसारपाशाचा सहज छेद करून सर्वत्र निजानंदाचें साम्राज्य पसरविण्यास श्रीमदनंत समर्थ आहेत.

———

# मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता

संशोधकः—प्रल्हाद व्यंकटेश गुर्वी.

## पद ५०

रायासन्मुख राहोनि उभी कौसल्या करी शोका हो ॥ ध्रु० ॥ गोरस खातां अपथ्य करितां कफवातानें खोका हो ॥ १ ॥ आतां वोखद कैकयीचें अधरामृतरस चोखा हो ॥ २ ॥ दरवेशाचें वानर जैसें म्हणुनी घेती फोकाहो ॥ ३ ॥ अझुनी वरि तरी रडे तीचा फाडुनी टाका रोखा हो ॥४॥ कामिनी कामुकसंगति खोडी ऐकुन त्या कोका हो ॥ ५ ॥ उदरा आलें ब्रह्मसनातन नाम तयाचें घोका हो ॥ ६ ॥ सिंहासनीं रघुवीरा बसतां संमत होतें लोका हो ॥ ७ ॥ रामापासुनी भरता तुमच्या कांहीं न होता धोका हो ॥ ८ ॥ रामउपासक परधन वनिता मानिती विषया वोका हो ॥ ९ ॥ पोपट गंगारासाठीं पोसिला जो बोका हो ॥ १० ॥ पांचभौतिक पिंजऱ्याला पाडिल तो कीं भोका हो ॥ ११ ॥ तप्त लोहावरी जैसा पडत घणाचा ठोका हो ॥ १२ ॥ ऐसें कळलें जेव्हां तेव्हां देहा भळतें हो काहो ॥ १३ ॥ मध्वमुनीश्वर दिव्य कवीश्वर वर्णित पुण्यश्लोका हो ॥ १४ ॥

## पद. ५१

कैकयीनंदन आला । अंतरीं व्याकुळ झाला ॥ नगरी देखुनी भ्याला । म्हणे पडला मोठा घाला ॥ १ ॥ जननी म्हणे त्या तनया । उतरुनी आला सीण या ॥ देखोन तुझ्या विनया । रायें केलें सुनया ॥ २ ॥ भरत म्हणे वो आई । जळो तुझी खाई ॥ केलें हें तां काई । माझा अंतरविला भाई ॥ ३ ॥ तूं नव्हेसी माझी माता । केलें पतिच्या घाता ॥ अहारे दशरथताता । नाहीं निरखिलें रघुनाथा ॥४॥ भावांत कल्पुनी भेदा । अपमानुनिया वेदां ॥ कारण झालिस खेदा । तुझ्या करितों शिरच्छेदा ॥५ ॥ भरत घरामधें लोळे । उदकें भरलें डोळे ॥ सानुज अंतरीं पोळें । तेव्हां सद्गुरु ग्रन त्या वेळे ॥ ६ ॥ वसिष्ठ म्हणे रे भरता । दशरथ गेला वरता ॥ विचार पाहणें तरता । त्याची सद्गति करणें तरी तां ॥ ७ ॥ मध्वमुनीश्वर नामा । आणिन मंगलधामा ॥ भरता होय रिकामा । तुजला भेटवितों श्रीरामा ॥ ८ ॥

## पद ५२

कौसल्येच्या सदना आला । भरत शोकें व्याकुळ झाला । नागनात ॥ १ ॥ राममाता देखुनी दृष्टीं । धाउनिया घाली मिठी । कंठदेशीं ॥ २ ॥ रडे मोकलुनी धाय । म्हणे रामा हाय हाय । काय करूं ॥ ३ ॥ तुजविण जालों परदेशी । फिरोनि गांवासि कधीं येसी । हें कळेना ॥ ४ ॥ क्षणभंगुर संसार । आहे एक सार । नाम तुझें ॥५॥ सद्गुरुचरणीं ठेवुनी हात । म्हणे हें मीनणें मात । कैकयीची ॥ ६ ॥ भरता झाला अनुताप । वदे गुरुहत्येचें पाप । मज॰

लागो ॥७॥ हे प्रजाजन हो समस्त । पापीण हे उन्मत्त । फार झाली ॥ ८ ॥ इची आतां करितों हत्या । ऐसी कामा नये कृत्या । सूर्यवंशीं ॥९॥ कौसल्येनें धरिला पोटीं । म्हणे धैर्य धरूनि घोटी । शोकसिंधु ॥ १० ॥ परिहारा नलगे देणें । आतां समाचार घेणें । राघवाचा ॥ ११ ॥ सुकुमार राम माझा । सीतेसहित वनवासा । धाडियला ॥ १२ ॥ मागें रायें दिधला प्राण । अनर्थासी मूळ जाण । माय तुझी ॥१३॥ तुझ्या हृदयीं नाहीं कपट । राहसी मध्वनाथानिकट । जाणतें मी ॥ १४ ॥

## पद ५३.

जानकीरमणा रामा । श्रीरामा राम रामा ॥ ध्रु० ॥ रामा पतितपावननामा । अवाप्तपूर्ण कामा ॥ परिस मंगलधामा । संगें नेरे आह्मां ॥ १ ॥ रामा प्राणाचा तूं प्राण । जिवलग आत्मा जाण ॥ तुजविण नको अन्न । वाहतो तुझी आण ॥ २ ॥ रामा तुजविण अवघें भाग्य । लावीन त्याला आग ॥ जालें हें वैराग्य । होचि मजला श्लाघ्य ॥ ३ ॥ रामा मध्वमुनीला आज । नलगे त्रिभुवनराज्य ॥ आलो यालावाज । आह्माला नवाज ॥ ४ ॥

## पद ५४.

कनकमृगामागें श्रीराम लागे ॥ ध्रु० ॥ पंचवटीमध्यें देखुनी त्यासी । कंचुकी जानकी मागे ॥ १ ॥ गोदातटाकीं भक्त जटायु । पर्णकुटीपुढें जागे ॥ २ ॥ गुंफेचे रक्षण करी सुलक्षण । सेवेंत लक्ष्मण वागे ॥३॥ मध्वमुनीश्वरस्वामीस स्तवितां । रसना शेषाची ते भागे ॥ ४ ॥

## पद ५५

जनस्थानीं गोदातटीं । पहा धन्य पंचवटी ॥ जेथें उभा जगजेठी । ज्याला चिंती धूर्जटी ॥ १ ॥ मांडुनी दिव्य ठाण । हातीं घेउनी धनुर्बाण ॥ हरिले राक्षसांचे प्राण । छेदुनी शूर्पणखेचे घ्राण ॥ २ ॥ वामभागीं जगन्माता । जे करवी दानवघाता ॥ दक्षिणभागीं लक्ष्मण भ्राता । मध्यें त्रैलोक्याचा त्राता ॥३॥ सफळ तयांचे नेत्र । जे पाहती ऐसें क्षेत्र ॥ मध्वनाथाचें चरित्र । ऐकुनी होती पवित्र ॥ ४ ॥

## कवन ५६ ( त्रिंबक कविकृत )

सेवि तूं विमल पंचवटी रे । पापताप अवघें निवटी रे ॥ ह्या स्थळीं करुनि पर्णकुटी रे । सिद्ध होउनि यमासि कुटी रे ॥ १ ॥ विराजे श्रीगंगातट निकट सत्क्षेत्र बरवें । सदा जेथें सीतेसहित सगुण ब्रह्म मिरवे ॥ जयानें संग्रामीं असुर वधिले कंटक तिन्ही । तयाला चिंतावें हृदयभुवनीं या अनुदिनीं ॥ २ ॥ विराजे वामांगीं जनकतनया सौख्यसदना । विलोकीं श्रीरामा कमलनयना हास्यवदना ॥

सुवर्णाच्या कांतीपरिस वपुलावण्य विलसे । घनश्यामीं रामीं अचल मज सौदामिनि दिसे ॥ ३ ॥ जनस्थानीं नांदे अतिसबळ दुर्गा नवकरे । महालक्ष्मीचें जें नगर वर देतें निजकरें ॥ प्रयागापेक्षांही अधि...संगम वसे । महाराजा जेथें पशुपति कपालेश्वर वसे ॥ ४ ॥ पिता माता भ्राता स्वजन तिळभांडेश्वर सखा । अनाथाला देतो अमित गुणसिंधू निजसुखा ॥ मठीं संन्याशाच्या अज्ञुनिवरि सांभाळ करितो । तयाचे आचार्या हृदयकमळीं ध्यान धरितो ॥ ५॥ विराजे श्रीगंगातटनिकट ते पंचवटिका । वसे जीवा तेथें करुनि बरवी पर्णकुटिका ॥ वदावें वैदेहीरमणचरणा येक घटिका । करी लेणें पुण्यें सकल मग संसारसुटका ॥ ६ ॥ जनीं काव्यें भव्यें कविवर अनेकें विरचिती । विना प्रेमें नेमेंकरुनि गुणवंता न रुचती ॥ प्रसादें देवाच्या सरस कविता सर्व रुचते । अशीं आचार्यांच्या हृदयकमळीं युक्ति सुचते ॥ ७ ॥ जनस्थानीं नांदे द्विजवर सदा त्रिंबक कवी । तयाच्या काव्याचा चतुर रस जाणे अनुभवी ॥ जयाची हे वाणी विषयरसशृंगार दिसते । जगीं ते गायत्री मुनिजनमनामाजि वसते॥८॥

## पद ५७

चिंतावा श्रीरघुवीर ॥ ध्रु० ॥ नासिक त्रिंबक नगर मनोहर । पावन गंगातीर ॥ १ ॥ पंचवटीमधें पर्णकुटी करी । सेउनी राहे नीर ॥ २ ॥ मधुर हरीच्या नामाविरहित । न रुचे साकर खीर ॥ ३ ॥ लौकिक लज्जा सांडुनी अवघी पांघर भगवी चीर ॥ ४ ॥ मध्वमुनीश्वर म्हणतो रामीं । चित्त करावें स्थीर ॥ ५ ॥

## पद ५८

माशुक माशुक तेरे सुरतपर हम है आशक ॥ ध्रु० ॥ तनधन छांडू बनबन धुंडू । दिल दिवाना लाशक ॥ १ ॥ त्रिंबर जाऊं गंगा न्हाऊं । शहर न छांडूं नाशक ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर हरदम जपता । नाम गुरूका मा शुक ॥ ३ ॥

## पद ५९ ख्याल.

बालम बालम बालम मोसो बोलोजी प्यारे बालम ॥ ध्रु० ॥ हु भई कमरी चरण की दासी । धुंडत फीरती अलम ॥ १ ॥ निसीदिनी तेरे दरशनको प्यासी । जबी रहे सजनको जालम ॥ २ ॥ मध्वमुनेस्वर तिहारे मिलनकु । खेलत पवनकी तालीम ॥ ३ ॥

## पद ६०

येथें बैस कावकाव । येथें बैस चिवचिव ॥ राळा खाउनी पाणी पिउनी भुरकन उडून जाईल जीव ॥ ध्रु० ॥ सद्‌गुरुचरणामृत सेवी । धणीवरी बोधामृत जेवीं । भावें शरण जाउनी त्यांच्या चरणावरि मस्तक ठेवी ॥ १ ॥

येथें नाहीं ऊन हींव । चित्तवृत्ति तेथें नीव ॥ दारोदारीं उष्ट्यासाठीं व्यर्थचि मुखीं भाकिसी कींव ॥ २ ॥ कल्पवृक्ष सदाशिव । त्यांच्या मोक्षफळा शीव ॥ मध्वमुनीश्वर दाखवितो निरवधि आनंदाची शीव ॥ ३ ॥

## पद ६१

लवती साळया वाजवी तूं टाळ या । सरोवरीं पाणी पिती मोरे प्रातःकाळीं या ॥ ध्रु० ॥ पिंजऱ्यांत आलिया पराधीन जालियां । दूधभात जेउनी देती ढेंकर घालीयां ॥ १ ॥ सोहं सोहं बोलती सोलीव दाणा सोलिती । परमहंस शुकादिक दोहीं पक्षीं डोलती ॥ २ ॥ मध्वनाथीं खेळती मुक्ताफळें झेलिती । चकोर चक्रवाकें बदकें उदकावरी लोळती ॥ ३ ॥

## पद ६२

पाटावांच्या करिती चिंध्या ॥ काय जाग ती स्नानसंध्या ॥ ज्याचें कपाळ तें हुलें ॥ त्यासीं परब्रह्म भुललें ॥ २ ॥ लिखा अंडावरील खाती ॥ जैसी मर्कटाची जाती ॥ ३ ॥ पानफूल फळ खावें ॥ आपलें इंद्रिय चोखावें ॥ ४ ॥ नाहीं आचारविचार ॥ सदा प्रिय व्यभिचार ॥ ५ ॥ त्यांचें अवगुण न मानी ॥ तेही मिरविलें विमानीं ॥ ६ ॥ रामें तारिलें वानरां ॥ कैसा उद्धरिना नरा ॥ ७ ॥ सेतुबंधनाच्या मिसें ॥ देवें सरती केलीं रिसें ॥ ८ ॥ आम्ही आहों नरपशु ॥ नाहीं पुण्याचा तो लेशु ॥ ९ ॥ मुख्य अंजनीसुत ॥ त्याचा म्हणवितो दूत ॥ १० ॥ आम्हांवरी कृपा पूर्ण ॥ समजे मध्वनाथ खूण ॥ ११ ॥

## पद ६३

विजयी माझा श्रीहनुमान ॥ अंजनीनंदन शौर्यनिधान ॥ ध्रु० ॥ उपजत ज्यानें दीनमणी धरिला । आम्रफळाचा जाणुनी वान ॥ १ ॥ अंतक कली युगीं ताम्रमुखाचा । साजे सुग्रीवास प्रधान ॥२॥ कौपिन कटितटीं हाटकाचा । कपि कटकाचा मुख्य प्राण ॥ ३ ॥ घेउनि मुद्रा तरुनि समुद्रा । गेला आला हे महिमान् ॥ ४ ॥ अखया मारुनि लंकेशाला । दिधले रंकाचें उपमान ॥५॥ वन विध्वंसुनी दशवदनाचा । केला दाटुनिया अपमान ॥ ६ ॥ जाळीत सुटला नगरी तेव्हां । साह्य झाला तो पवमान ॥ ७ ॥ सीताशुद्धिस घेउनी आला । गौरवी झाला श्रीभगवान् ॥ ८ ॥ शोकविनाशक जानकीचा । म्हणउनी राघव दे बहुमान ॥ ९ ॥ द्रोणाचल रणीं घेउनी आला । वाचवी राघवबंधु सुजाण ॥ १० ॥ कपटी काळनेमीस निवटी । करुनि तपोवनीं तें जलपान ॥ ११ ॥ उपवासप्रिय तो शनिवारीं । दोषनिवारक तें अभिधान ॥ १२ ॥ वज्रशरीरीं कीर्तनीं उभा । श्रीरामाचें हें वरदान ॥ १३ ॥ त्रिभुवनीं ज्याला विषम न भासे । ब्रह्म सनातन सर्व समान ॥ १४ ॥

मर्कट बळकट ब्रह्मचारी । धरि निजदासाचा अभिमान ॥ १५ ॥ मध्वमुनीश्वर बलभीमाचा । अनुचर येथें कां अनुमान ॥ १६ ॥

## पद ६४

पहा नयनीं हनुमंत । ज्यासीं वानिती महंत ॥ ज्याचा महिमा अनंत । मुख्य प्राण रामाचा ॥ १ ॥ सदा बांधुनिया माज । करी राघवाचें काज ॥ ज्याचें शिरीं रघुराज । सेवक पूर्ण रामाचा ॥ २ ॥ स्वामी रामाचें वहन । केलें लंकेचें दहन ॥ ज्याचें करणें गहन । बलभीम नामाचा ॥ ३ ॥ सर्वां देवांचा वरिष्ठ । वारी दासांचें अरिष्ट ॥ मध्वनाथीं एकनिष्ठ । मानिती हा नेमाचा ॥ ४ ॥

## पद ६५

देवा गर्वाचा पर्वत रावण रे ॥ ध्रु० ॥ पंचवटीमधें गोदातटीं जेणें । हरिलें जानकीकारणें रे ॥ १ ॥ कुंभकर्ण ज्याचा भाऊ दळाधिप । जैसा मदोन्मत्त वारण रे ॥ २ ॥ मंत्रशास्त्रीं अति प्रविण म्हणविती । जाणती जारण मारण रे ॥ ३ ॥ आम्ही रणांगणीं मारूं दोघां जणां । करूं भूताहातीं पारण रे ॥४ ॥ रामा तुझें बळ पहावया जेणें । धाडियलें शुकसारण रे ॥५॥ मध्वनाथा तुम्ही अवतार धरुनी । सर्वहि जग तारण रे ॥६॥

## पद ६६

रावण म्हणे जानकी । आतां अंतरला राम वो ॥ ध्रु० ॥ समुद्राचे परतीरीं राक्षसांनीं । त्याचें पुरतें केलें काम वो ॥ १ ॥ लक्ष्मणाची पुरती केली पाठी दुमती । त्याचें काढियलें चाम वो ॥ २ ॥ वानर येथें आलें होतें एक वेडें । त्याचें तोंड झालें शाम वो ॥ ३ ॥ लंकेमधें अलौकिक राज्य भोगीं । तुझें सुवर्णाचें धाम वो ॥ ४ ॥ मध्वनाथ स्वामीमहाराज । ह्याचें येथें घेऊं नको नाम वो ॥ ५ ॥

## पद ६७

लंकापति रावण धरीं आतां बरवा धीर ॥ ध्रु० ॥ काळाग्नि हा रुद्ररुपी रामराजा । तुझा भाजिल हिरवा हीर ॥ १ ॥ पिसाळलें सुनें आले यज्ञ-शाळे । त्याला प्राप्त कैची खीर ॥ २ ॥ सेतुबंधीं रामेश्वरीं कीर्ति केली । जाला महोदधि थीर ॥ ३ ॥ वानरांचे बळवंत दळ भारी । यांत दोघे वीर भारी ॥ ४ ॥ राजपुत्र तपोनिधि ब्रह्मचारी । योगी पांघरले चीर ॥ ५ ॥ कुंभकर्ण इंद्रजित मारतील । तेव्हां नयना येईल नीर ॥ ६ ॥ रणभूमिवरी तुला निजवील । रामतर्कशाचा तीर ॥ ७ ॥ मध्वनाथस्वामिचिया पूर्वपुण्यें पाहीन शरयूतीरा रे ॥ ८ ॥

## पद ६८

घणघण कां रे करितोसि बापा ॥ ध्रु० ॥ जो करकमळीं धरी शरचापा । तो भज रघुवीर सोलीव चांपा ॥ १ ॥ या विषयांचा वोंगळ वाफा । त्यांत किती तूं पेरिसी पापा ॥ २ ॥ न करी कांहीं व्रततपजापा । येक पुरे तो गुरुनाम छापा ॥ ३ ॥ मध्वनाथाघरीं अनुतापा । भवजळीं तारी नरदेहतापा ॥ ४ ॥

## पद ६९

श्रीरामाचें स्वरूप आधीं चिंती । तेणेंकरूनी कामादिक वैरी जिंती ॥ हेंचि पुण्य कामासी येईल अंतीं । हाच पूर्वीं उपाय केला संतीं ॥१॥ ऐके ऐके सावध हरिकथा । वय जाऊं देऊं नको वृथा ॥ येणें तुझी हरेल भवव्यथा । क्षणभरी आठवी रघुनाथा ॥ २ ॥ गर्भवासीं सोशिले बहु क्लेश । विषयांमध्यें कैंचा तो सौख्यलेश ॥ मूढा तुज करितों उपदेश । मध्वनाथा न सोडी जगदीश ॥ ३ ॥

## पद ७०

करो मन राघोजीसे प्रीत ॥ ध्रु० ॥ तात मात सुत बंधु वनिता । इनकी उलटी रीत ॥१॥ जो कोई आपनो आपनो गरजी । कोन कोई को मीत ॥२॥ कहत माधोनाथ गुमाई । करले आपनो हीत ॥३॥

## पद ७१

रामाचें करूं ध्यान । मनामध्यें रामाचें करूं ध्यान ॥ ध्रु० ॥ मानसपूजा ऐसी आहे तीचें हेंच विधान ॥ रम्य अयोध्यानगरीमध्यें पुष्पक दिव्य विमान ॥ १ ॥ नंदनवन उपमेस न राजे कामाचा अपमान ॥ मंद सुगंध सुशीतळ निववी शरयूचा पवमान ॥ २ ॥ कापूराचे दीपक जळती वरता श्वेत वितान ॥ सिंहासनीं रघुवीर विराजे दाशरथी भगवान् ॥ ३ ॥ चंदनचर्चित नील कलेवर पीतांबर परिधान ॥ मुगुट मनोहर कवच धनुर्धर तरकसी कांचनबाण ॥ ४ ॥ श्रीवनमाळेवर ते मधुकर करिती कलरव गान ॥ कविगुरुमध्यें मंगळ तैसें कुंडलमंडित कान ॥ ५ ॥ प्रसन्न देखुनी राममुखाला हिमकर जाला म्लान ॥ रघुनाथाची शोभा विलसे दिनकरकोटिसमान ॥ ६ ॥ भरत सुलक्षण सानुज लक्ष्मण जानकीचें सन्निधान ॥ छत्रें चामरें मेघडमरें माळेल सूर्यापान ॥ ७ ॥ सुग्रीवादिक सेवक उभे सन्मुख तो हनुमान ॥ ज्याचें दर्शन होतां नाहीं मुक्तीस ते अनुमान ॥ ८ ॥ धन्य वसिष्ठ पुरोहित ज्याचा राघव तो यजमान । कांचनपात्रीं वाढी अरुंधती सुंदर तें परमान्न ॥९॥ सुरवर किन्नर आळविती स्वर दाविती तालज्ञान ॥ तुंग मृदुगध्वनि मृदुमंजुळ रंजवी पंचम मान ॥१॥ राजांगणीं करी कीर्तन नारद वाल्मिक दे अवधान ॥ शुकसनकादिक सादर करिती रामकथारसपान ॥ ११ ॥ रघुपति विष्णुदासालागीं देत असे वर-

दीन ॥ राम उपासक राजद्वारीं पावती ते सन्मान ॥ १२ ॥ मंगल आरती करिती त्याचा देवाला अभिमान ॥ घणघण घंटा त्या वरघंटा गाजत भेरी निषाण ॥ १३ ॥ जयकारें गर्जती वानर नाचत जांबवान् ॥ अबीर गुलालें पालटवीला गगनाचा तो वान ॥ १४ ॥ वाजंत्र्यासम दुंदुभि वाजती मांगल्याचें निदान ॥ नाम स्मरतां कळिकाळानें खालीं केली मान ॥ १५ ॥ विश्वेश्वर निजहृदयीं जपतो रामाचें अभिधान ॥ अंतकाळीं उपदेशी तो तारक मंत्र प्रधान ॥ १६ ॥ रामार्चनविधिपद्धती पाहुनी केलें म्या व्याख्यान ॥ मध्वमुनीश्वर म्हणतो माझा सद्गुरु सौख्यनिधान ॥ १७ ॥

## पद ७२

कोदंड पाणि लवकरि येई ॥ ध्रु० ॥ तळमळ करितो जीव तुझ्या वियोगें । दर्शन देउनी मजला सद्गति देई ॥ १ ॥ अनुदिनीं हृदयीं रामा नामासि जपतो मध्वनाथा आपुलें जाणुनी नेई ॥ २ ॥

## पद ७३

देवा आदि देवा लक्ष्मीनारायणा । परिसें क्रियाहीन वचन माझें ॥ १ ॥ कोणें देवें तुला दिली द्वैतबुद्धि ॥ जीवशिवउपाधी वाढविली ॥ २ ॥ उपाधीच्या योगें छळिसी तूं आम्हां ॥ बरें सर्वोत्तमा आरंभिलें ॥ ३ ॥ तुम्ही आम्ही पूर्वीं होतो जी एकत्र । मध्यें हें चरित्र रचिलें का ॥ ४ ॥ समर्थाचीं बाळें लाविलीं भिकेसी ॥ बरवें हृषिकेशी नांव केलें ॥ ५ ॥ अक्षई आमुचें बुडलें ठेवणें ॥ आम्हासी मीपणें भुलवुनी ॥ ६ ॥ ब्रम्हारण्यामध्यें भुरले घाली भेद ॥ तैसा तूं गोविंद भेटलासी ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे घेई माझा जीव ॥ तुज काय कींव भाकूं आतां ॥ ८ ॥

## पद ७४

कारें मजशीं तां धरिला अबोला ॥ भेदा बाहेर भोळा दिसतोसी ॥ १ ॥ ऐसा काय माझा आहे अपराध ॥ सांगे निर्विवाद विचारोनि ॥ २ ॥ सत्यवादी तुझा पिता दशरथ ॥ तयाची शपथ घातली हे ॥ ३ ॥ मनामध्यें कांहीं धरूं नका गूढ ॥ रुसले जडमूढ समजवावें ॥ ४ ॥ ऋण वैर हत्या न सुटे कांहीं केल्या ॥ सळिती जितां मेल्यां बहुतासीं ॥ ५ ॥ थोड्या बहुतानें आम्हासी संतोष ॥ करितो कंठशोष द्वारापुढें ॥ ६ ॥ जळो कळंतर आग लागो आतां ॥ मुद्दल येवो हातां येकदांचें ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे लौकिक न करीं ॥ उमज श्रीहरी घरामध्यें ॥ ८ ॥

## पद ७५

दीनबंधु तुझें नाम दयानिधि ॥ बिरुदें व्यर्थ पदीं वागविसी ॥ १ ॥ अनाथाचा नाथ पतितपावन ॥ हें करी जतन नांव आधीं ॥ २ ॥ समर्थासी

लाज आपुल्या नांवाची ॥ नांवासाठीं वेंची सर्वस्वही ॥ ३ ॥ कोटिध्वजाचिये घरीं काय उणें ॥ सदावर्ती दुणें पुण्य जोडीं ॥ ४ ॥ समर्थांच्या नांवें तरती पाषाण ॥ प्रत्यक्ष पुराणें गाही देती ॥ ५ ॥ चोरटा चांडाळ गणिका अजामेळ । नावेंचि केवळ मुक्त केलीं ॥ ६ ॥ काशीविश्वेश्वर सांगतों नेटकें ॥ तें तुवां लटिकें आरंभिलें ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे कलिचा महिमा ॥ उरली नाहीं सीमा बोलायाची ॥ ८ ॥

## पद ७६

येवढा कारे माझा तुझा वैराकार ॥ मारेकरी फार घातले तां ॥ १ ॥ वाघाचे जाळीत बांधुनिया गाय ॥ पाहातोसी काय कृपावंता ॥ २ ॥ लांडग्यासी तान्हें वांसरूं मिरविले ॥ पारणें करविलें त्याचें हातीं ॥ ३ ॥ हिंसकासी दिली पोसणिता शेळी ॥ त्यानें पुरती केली गती तिची ॥ ४ ॥ जीवना वेगळा तळमळी मीन ॥ बगळ्या आधीन केला जैसा ॥ ५ ॥ मांजराच्यापुढें टाकुनी मूषक ॥ पाहसी कौतुक दुरूनियां ॥ ६ ॥ पहिल्यापासुन तुझा स्वभाव निश्चळ ॥ परदुःख शीतळ भाग्यवंता ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे न कळे तुझा माव ॥ विउनी खातें लांव लेकरांसी ॥ ८ ॥

## पद ७७

मार्गें चालविले बाळेभोळे लोक ॥ तैसा मी सेवक नव्हे तुझा ॥ १ ॥ तुझीं वर्मं कर्मं आहेत मज ठावीं । तें तां आठवावीं रामचंद्रा ॥ २ ॥ दाशरथि राम म्हणविसी नेटका ॥ मारिली ताटिका बायको ते ॥ ३ ॥ सुबाहू मारूनि यज्ञ सिद्धि नेला ॥ पुढें घात केला मारिचा ते ॥ ४ ॥ गौतमाच्या रागें निजली होती शीळा ॥ पाय लाउनी तिला जागें केलें ॥ ५ ॥ विश्वामित्राचें तां म्हणविले शिष्य ॥ मोडिले धनुष्य जुनाट तें ॥ ६ ॥ काकतालन्यायें मेळविली सीता ॥ प्रणिली दुहिता विदेहाची ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे आलें होतें झट । परसरामभट दबा दिलें ॥ ८ ॥

## पद ७८

रामराज्य व्हावें कौसल्या नवसी ॥ उठविली दिवसी घरामध्यें ॥ १ ॥ कांहीं केल्या तुझें राज्य नये योगा ॥ तूंही काय भोगा करशील ॥ २ ॥ कैकयीनें राज्य घेतलें हिरूनी ॥ पडली फिरूनि अवघी तुज ॥ ३ ॥ मायबापीं तुला घातले बाहेरी ॥ तधींचा श्रीहरि नव्हेसी तूं ॥ ४ ॥ समागमें होता सेवक लक्ष्मण ॥ त्यानें संरक्षण केलें तुझें ॥ ५ ॥ जानकी घेऊनी गोसावी झालासी ॥ परदेशी आलासी गंगातिरा ॥ ६ ॥ गंगातिरीं होता गूहक माझा गडी ॥ त्यानें पैलथडीं पावविलें ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे उगा राहे चप ॥ मारू नको गप मजपुढें ॥ ८ ॥

# पांगारकरांची पुस्तकें.

१. **भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ८ व्ही. पीनें ९१२.

२. **संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १८.

३. **श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ९१२.

४. **कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ९४.

५. **आनंदलहरीः**--( कवितासंग्रह ) यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ९१२.

६. **नारदभक्तिसूत्रें**:--हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ९८. ( तूर्त शिल्लक नाहीं )

७. **नवविधाभक्तिः**--यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ९४. ( नवी आवृत्ति छापत आहे. )

८. **निरंजनमाधवांची कविताः**--भाग पहिला. किं. १ रु.

९. **श्रीज्ञानेश्वरचरित्रः**--( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १८.

१०. **भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण सारांश दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १८.

मुमुक्षु REG. No. B. 662

## पांगारकरांचीं पुस्तकें.

**११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:--वारकरी मंडळाचे प्रसिद्ध कै॰ विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह कि. ८५.

**१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-कि. प्रत्येकीं रु. १८८

**१४. मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. कि. रु. १८१२.

**१५. पारिजातकांचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):--परमार्थविचारांची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. कि. ८८.

**१६. श्रीतुकारामचरित्र**:--तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण चरित्र ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे वगैरे असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ॰ सह कि. रु. ३.

**१७. श्रीतुकारामचरितामृत**:--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. कि. ८१.

**१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:- निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. कि. ८१०.

**१९. मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):--श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. कि. रु. १.

**२०. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): - कि. ८४.

**२१. सार्थ श्रीदासबोध**—कि. रु. ४. व्ही. पी. नें ४८१०.

**२२. सार्थ मनोबोध**:--मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. कि. ८१२.

**२३. समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:--यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ॰ सं. ४०० कि. रु. २.


**२४. मोरोपंत ( चरित्र आणि काव्यविवेचन** ):--कि. रु. २.

**२५. श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी )—कि. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ॥

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारी होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ( श्रीरामदास )


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २० | आश्विन–कार्तिक १८४८ | नवें वर्ष ६ वें |
| मास ३।४ | नोव्हेंबर–डिसेंबर १९२६ | अंक ११–१२ |



संपादक व प्रकाशक,

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.**

मुमुक्षु कचेरी, बुधवार पेठ, पुणें सिटी.



वार्षिक वर्गणी रु. ३ व व्ही. पी. नें रु. ३।=

मुद्रक:–लक्ष्मण भाऊराव कोकाटे यांनीं पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान " छापखान्यांत छापिलें.

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण ... ... ... ... | १ |
| २ निंदाद्वेषांचीं भूतें ... ... ... ... | ३–५ |
| ३ पारिजातकाचीं फुलें ... ... ... ... | ६ |
| ४ पुस्तकांवर अभिप्राय ... ... ... ... | ७–१५ |
| ५ काळाचा फेरा ! ... ... ... ... | १६ |
| ६ श्री आवडी मठांतील कृष्णजन्मोत्सव... ... ... | १७–२२ |
| ७ मुरलीवाला ( कविता ) ... ... ... | २३–२४ |
| ८ संध्येची परिभाषा व संध्येचा काल ... ... ... | २५–२६ |
| ९ श्रीतुळसीदासचरित्र ( कविता ) ... ... ... | २७–३१ |
| १० औदार्य कोणाचें, देवाचें कीं भक्ताचें? ... ... ... | ३१ |
| ११ कै० विनायक लक्ष्मण भावे ... ... ... | ३३–४१ |
| १२ मूर्तिमंत कुबेर जॉन डेव्हिसन राकफेलर ... ... ... | ४२–४४ |
| १३ जादूची लकेर ( कविता ) ... ... ... | ४४ |
| १४ दीननारायणांचीं बोधवचनें ... ... ... | ४५–४६ |
| १५ मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता ... ... ... | ४९–८० |

## सूचना

जानेवारीपासून ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यांनीं हा अंक हातीं पडतांच पुढील वर्षाची वर्गणी रुपये तीन मनिऑर्डरनें पाठविण्याची कृपा करावी म्हणजे त्यांचेकडे पुढील अंकाची व्ही. पी. पाठवावी लागणार नाहीं. व आमचे श्रम वांचून त्यांचें ८२ वाचतील. ज्यांना कांहीं अडचणीमुळें पुढें मासिक सुरू ठेवावयाचें नसेल त्यांनीं मेहरबानीनें आम्हांस तसें लौकर कळवावें. व्ही. पी. परत करून आमचें व्यर्थ नुकसान करूं नये.

व्यवस्थापक, मुमुक्षु



## पदें

राघवाचा धर्म जागो । कीर्ती अद्भूत माजो ।
ठाईं ठाईं देवालयें । भक्तमंडळी साजो ।। ध्रु० ।।
शक्ति आहे तोंचि फावे । दोन्ही लोक साधावे ।
इहलोक परलोक । सर्व शत्रु रोधावे ।। १ ।।
संसारीचें दुःख मोठें । हें मी कोणाला सांगों ।
जन्म गेला तुजवीणें । आणिका काय मी मागों ।। २ ।।
मागता समर्थाचा । तेणें कोणा मागावें ।
रामेवीण कोण दाता । कोणामागें लागावें ।। ३ ।।
रामदास म्हणे देवा । पुरे आतां संसार ।
असंख्य देणें तुझें । काय देतील नर ।। ४ ।।

## २

संसारसंगदोषें । मी गुंतलों कामा ।
धांव रे धांव आतां । दीनवत्सला रामा ।। ध्रु० ।।
मानवदेहधारी । माझा कितुला केवा ।
जाणीव जाणपणें । तुज चुकलों देवा ।। १ ।।
विषय भोगितां रे । वय वेंचलें माझें ।
स्वहित आठवेना । ध्यान चुकलें तुझें ।। २ ।।
तारुण्यअभिमानें । देहीं भरला ताठा ।
वैभव संपत्तीचा । मज फुटला फाटा ।। ३ ।।
विषईं मानवती । संपत्ती तोंवरी ।
लक्ष्मी वोसरता । सर्व राहिली दूरी ।। ४ ।।
वैभवें मोकलिलों । तुज शरण आलों ।
धांव रे । सोडी आतां । दास डिंगर जालों ।। ५ ।।

# श्रीसमर्थसंजीविनी

## उर्फ

# रामदासी वेचे.

महाराष्ट्राचे पारमार्थिक व राजकारणी गुरु श्रीरामदासस्वामी यांनीं तीनशें वर्षांपूर्वी आपल्या अमोघ व वीर्यवती वाणीनें महाराष्ट्रांत चैतन्य ओतून त्याला महानिद्रेंतून जागें केलें. ती समर्थांची वाणी आजच्या महाराष्ट्रीयांसही जागृत करण्यास पूर्ण समर्थ आहे. ती सर्वांच्या कानांवर घालण्यासाठीं रा. रा. पांगारकर यांनीं प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या सर्व कवितेंतील उत्कृष्ट वेचें व्यवस्थेनें निवडून व त्यांवर भरपूर टीपा देऊन एकत्र केले आहेत. **(१) प्रपंच (२) राजकारण (३) परमार्थ व (४) विविधविषयक प्रकरणें** अशा चार भागांत मिळून सुमारें १५० निवडक वेच्यांत समर्थांच्या सर्व शिकवणी संकलित केल्या आहेत. सर्व प्रकरणांचा 'सारांश' प्रथम ८० पृष्ठांत क्रमानें सरळ गद्यांत सांगितला असून तो वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य ध्यानांत येईल. ही समर्थांची वाणी लोक अंतरांत ऐकतील तर त्यांचा प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल व परमार्थबुद्धि शुद्ध होऊन विस्तार पावेल. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांनीं जशी सांगड घातली आहे तशी कोणत्याही देशांतील तत्त्ववेत्त्यानें घातलेली नाहीं. समर्थांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची समाजोद्धारक व्यापकदृष्टी, शंकासमाधान करण्यांतली त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतील त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची निस्सीम व कोमल रामभक्ति, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी, त्यांची लोकसंग्रहबुद्धि, राष्ट्रकल्याणाची कळकळ ह्या सर्व थोर गुणांचा परिचय प्रस्तुत ग्रंथावरून होणार आहे. सर्वांच्या, विशेषतः तरुणांच्या हातीं हा ग्रंथ सदैव असावयास पाहिजे.

पृष्ठसंख्या ४००, कागद ग्लेज, टाईप उत्तम, बाइंडिंग मजबूत व सुंदर. किंमत रुपये दोन. व्ही. पी. नें २॥८

पत्ता:-व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# निंदाद्वेषांचीं भूतें.

१

श्रीसमर्थांच्या वेळीं कौन्सिलनिवडणुकी नव्हत्या, पण पुढें होणार हें ओळखूनच कीं काय त्यांनीं एका सुंदर पदांत सांप्रतच्या स्थितीला लागू असे यथार्थ उद्गार काढले आहेत. दोन महिने जिकडे तिकडे इलेक्शनच्या धामधुमींत निंदाद्वेषमत्सरादि दुर्वृत्तींना वर्तमानपत्रांच्या रकान्यांतून व सभांतून नुस्ता ऊत आला होता! आपल्या पक्षाची तारीफ व इतर पक्षांची सडकून निंदा, आपल्या पक्षाच्या उमेदवारांची मनसोक्त स्तुति व त्यांच्या प्रतिपक्षीयांची मनमुराद कुचेष्टा या निंदाद्वेषांतच भारतीयांचें सारें ' राजकारण ' आटून गेलें होतें! ही निंदाद्वेषांचीं भूतें सर्वत्र नाचत असतांना महात्मा गांधींनां जो कौन्सिलबहिष्कार पुकारला होता तोच दूरदर्शीपणाचा व मुत्सद्दीपणाचा होता असें विवेकी माणसांस वाटल्यावांचून राहिलें नाहीं!

२

मनासि लागली चट। वायांवीण खटपट।
करी वटवट। रामेंवीण रे॥ ध्रु०॥
उणें हें एकाचें एक। पाहती सकळ लोक।
राहिला विवेक। राघवाचा रे॥ १॥
मत्सर आठवे पोटीं। पडिल्या दुःखाच्या गांठी।
होतसे हिंपुटी। वायांवीण रे॥ २॥
रामदास म्हणे राम। सोडितां होय विराम।
राहिला विश्राम। तेणें गुणें रे॥ ३॥

३

हेंच तें समर्थांचें सुंदर पद. त्यांत ते म्हणतातः—" लोकांच्या मनाला असें व्यसनच लागलें आहे कीं, ज्यांत कांहींच लाभ नाहीं अशा व्यर्थ खटपटी व वटवटी कराव्यात; सर्वांना हेंच कसें एक व्यसन लागलें आहे! एकमेकांचें उणें पाहण्यांत सर्वजण दंग आहेत व त्यामुळें सकलभूतांतर्यामीं असणाऱ्या रामाच्या विवेकाला लोक पारखे झाले आहेत! एकमेकांच्या मत्सरानें हे जळतात व त्यामुळें त्यांची दुःखाशींच गांठ पडते व हे व्यर्थ कष्टी मात्र होतात. एक राम सोडला कीं सर्व थंडगार आहे. ' सर्वांघटीं राम भावशुद्ध ' तो भूतद्रोह झाल्याच्या योगानें दूर होतो, चित्ताची विश्रांति भंग पावते व ज्या जनताजना-

देनाची सेवा म्हणून हे करायला जातात त्याचाच तेवढा द्रोह यांना घडून हे रावणाचे अनुयायी म्ह० असुर बनतात.

४

कोंबडीं झुंजवायला दाणे टाकावेत त्याप्रमाणें हे निवडणुकीच्या लोभाचे दाणे दिसतात. आपापसांत पक्षभेद, मतभेद हाच मोठा अधःपात. सर्व हिंदी लोकांचा एकच पक्ष असावा, समर्थ सांगतातः--

धरूनि पक्ष काय रें । उपाय तो अपाय रे ।
तुम्ही तुह्मांसि वीवरा । स्वहीत तें मनीं धरा ॥

५

मौन सर्वांत उत्तम. पण बोलायचेंच झालें तर पुढील दहा दोष टाळून बोलावें. १ विरोधवादबळ २ प्राणितापदाळ म्ह० दुसरा कासावीस होईल असें ३ उपहास ४ छळ ५ वर्मस्पर्श ६ आटुवेग म्ह० कोरड्या आवेशाचें बोलणें ७ विंदाण म्ह० छद्मी किंवा कपटी भाषण ८ आशेचें बोलणें ९ शंका उत्पन्न होईल असे शब्द १० प्रतारण म्ह० फसवेगिरीचें बोलणें— हे आसुरी दोष टाळून बोलणें तें बोलावें. हे दहा दोष टाळून 'साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचें' (ज्ञाने.१४-२७०) असें बोलावें. निवडणुकीच्या हमरीतुमरीच्या भाषणांत व लेखांत ह्या दहाही दोषांचा नुस्ता वर्षाव होत होता ! हा प्रकार फार वाईट आहे. देशसुधारणेचा हा मार्ग नाहीं. आसुरी मार्गानें जाऊन कोणाचेंच इहामुत्र कल्याण होणें नाहीं. समर्थांनीं मनोबोधांत वादविवादाचें सुंदर विवरण केलें आहे.

६

तास्तु वाचः सभायोग्या याश्चित्ताकर्षणक्षमाः ।
स्वेषां परेषां विदुषां द्विषामविदुषामपि ॥

स्वकीय, परकीय, शत्रु, मित्र, विद्वान्, अविद्वान् या सर्वांचें चित्ताकर्षण होईल असेंच भाषण सभेंत करणें योग्य आहे. पण या नीतीचे निवडणुकीच्या सभांतून खून पडत असत. महायुद्धांत जर्मनांनीं विषारी धुराचे लोट सोडून शत्रूंचा नाश केला, या निवडणुकीच्या युद्धांत वक्त्यांनीं दुर्नीतीचा विषारी धूर सोडून स्वकीयांच्या सद्बुद्धीचा नाश करून देशांत निंदाद्वेषांचें विष कालवून दिलें ! कौन्सिलांत काय दिवे लागतील तें दिसतेंच आहे, पण निवडणुकीच्या सभा म्हणजे पक्षांध लोकांचा धुडकूस होता. देशबंधु, ऐक्य, लोकमान्य, महात्मा, देशकल्याण इ० चांगले शब्द मधून मधून उच्चारले जात पण एकंदरींत या सभा 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः' या भगवद्वाणीचें स्मरण करवीत !

७

सत्य, अहिंसा, शांति या गुणांचें महात्माजी प्रतिपादन करितात म्हणून महात्माजींबरोबर या दैवी संपत्तीच्या सद्गुणांचीही कुचेष्टा करितांना कित्येक तरुण वक्ते पाहिले तेव्हां आह्मांस फारच आश्चर्य वाटलें. 'अहिंसा सत्यमक्रोध-स्त्यागः शांतिरपैशुनम्' हे दैवीसंपत्तीचे थोर गुण राष्ट्राला नकोत, मग राष्ट्र काय असुरांचें बनवायचें आहे ? राष्ट्रांत आसुरी संपत्तीची वाढ झाल्यानें स्वराज्य मिळेल काय ?

८

Without purity of public life, स्वराज्य is an impossibility म्ह० समाजांत नैतिक शुद्धीचा विकास झाल्याविना स्वराज्य मिळणें अशक्य असें महात्माजींनीं 'यंग इंडिया'च्या ताज्या अंकांत लिहिलें आहे तेंच बरोबर आहे.

९

निवडणुकीच्या धामधुमींत जे लोकांचे दुर्गुण प्रच्छन्न होते ते प्रगट झाले हें एकापरी बरेंच झालें, कां कीं खरें दुखणें कोठें आहे हें समजून आलें. खरें दुखणें सरकारच्या दुष्कृत्यांत नाहीं, समाजनायकांच्या अधःपातांत आहे. आमचें स्वराज्य कोणी हिरावून नेलें नाहीं, आमच्या धर्मनीतिशून्यतेमुळें आम्ही तें गमावून बसलों आहोंत. आपल्या पायापाशीं भांडावें, आपणच आपले शत्रु आहोंत. आपण आपलें आचरण सुधारलें, परस्पर प्रेमभाव आंतून वाढविला, दैवीसंपत्तीचा उत्कर्ष करण्यास झटलों, खरें ऐक्य कोठें आहे तें शोधून घेतलें कीं स्वराज्य आपलेंच आहे.

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।

दैवी संपत्तीनें मोक्ष मिळतो, आसुरी दुर्गुणांनीं बंधन घट्ट होतें.

१०

हा निजधर्म जैं सांडे । आणि कुकर्मीं रति घडे ।
तैंचि बंध पडे । सांसारिक ॥ ८२ ॥
स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला ।
जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥ (ज्ञाने० ३)

# पारिजातकाचीं फुलें.

१

विषानें माखलेल्या पक्वान्नासारखें अनीतिदूषित सौख्य हें त्याज्य आहे. हें सुख आभासमात्र असतें.

२

दुर्विचार, दुरुक्ति व दुष्कृत्यें ज्याचीं त्यालाच मारक होतात.

३

सज्जनाचें चित्त हा स्वर्ग व दुष्टाचें मन हा नरक होय.

४

सज्जनांना सत्कृत्यांपासून होणारें समाधान शाश्वत स्वरूपाचें असतें; दुर्जनांपासून झालेला दुःखछल कमलावरच्या जलबिंदुसारखा त्यांच्या मनांतून गळून जातो.

५

सर्व सौख्याचें निधान व दुःखाचें भंजन एक हरिचिंतन आहे. हरिनामासारखें भवरोगावर निश्चित परिणाम करणारें गोड औषध दुसरें नाहीं.

६

सर्व हरिमय आहे या भावनेसारखें पापहारक दुसरें काय आहे ? 'पापोहं पापकर्मात्मा पापात्मा पापसंभवः' या चिंतनापेक्षां 'पुण्योहं पुण्यकर्मात्मा' हें चिंतन करावें व 'पापपुण्य आम्हीं वाहिलें विठ्ठलीं' असें म्हणून केवळ श्रीहरिचिंतनच करावें हें सर्वोत्तम. चिंतनानें तद्रूपता होते, मग चिंतन वाईटाचें कां करावें ? सर्वांत उत्तम, पवित्र, मंगल, सुखदायक, शाश्वत अशा हरीचें चिंतन करावें म्हणजे जीवभाव गळून जाऊन हरिभाव—नव्हे हरिच उरतो.

७

चिंत्याचे गुण चित्ताला लागतात. श्रुतिमाउलीनें 'पापोहं' असें चिंतन करायला नाहीं सांगितलें. 'अहं ब्रह्मास्मि' हें चिंतन सांगितलें आहे.

८

चिंतनच जर करायचें ( आणि चित्त चिंतन केल्याशिवाय राहत नाहीं ) तर मी पापी, भ्रष्ट, जन्ममृत्युवान्, दरिद्री, असलें चिंतन करण्यापेक्षां मी पुण्यस्वरूप, अमर, सुखसंपन्न असलें चिंतन कां करूं नये ?

९

सतत चिंतनानें चित्त अचिंत्य देवाशीं समरस होतें.

# पुस्तकांवर अभिप्राय.

## १ आधिभौतिक सुधारणा व आध्यात्मिक धारणा.

( लेखक 'गोविंदसुत' ) किं. रु. २८६:—मुमुक्षूचे परिचित रा. रा. परशुराम गोविंद चिंचाळकर उर्फ 'गोविंदसुत' यांचा हा चौथा ग्रंथ होय. परमार्थविचारमाला, रहस्यनिरीक्षण, आत्मानुसंधान या तीन ग्रंथानंतर गोविंदसुतांचा हा चौथा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. पहिले तीन ग्रंथ सांप्रत मिळत नाहींत. हा ग्रंथ कदाचित् 'शेंडेफळ' म्हणून समजला जावा अशी त्यांची इच्छा आहे. 'मराठी साधुकवि विरुद्ध प्रो. शिवरामपंत परांजपे' हें त्यांचें पांचवें पुस्तक दरम्यान प्रसिद्ध झालें होतें. 'मुमुक्षू'नेंच आग्रहानें त्यांच्या हातीं लेखणी देऊन त्यांना प्रथम लिहावयास लावले व वरील पांचा-पैकीं तीन ग्रंथ त्यांचे मुमुक्षूंत प्रथम प्रसिद्ध होऊन नंतर ते पुस्तकरूपानें प्रकट झाले आहेत. गोविंदसुत 'शेंडेफळा'कडे जातानां हें 'मूळ' विसरलें असलें तरी मुमुक्षूचे जुने वाचक हें खास विसरले नाहींत! गोविंदसुतांच्या वाणींत एक प्रकारचें तेज आहे, मुरलेपणाचा रंग आहे, दीर्घाभ्यासाचा परिपाक आहे, व्यवहार आणि परमार्थ ह्या दोन्ही दृष्टींचा मेळ आहे. अर्वाचीन सुधारणांचा तिटकारा व पूर्वकालीन आर्यपरंपरेचा अभिमान पदोपदीं व्यक्त होत असून आपला समाज मूळ सोडून खालीं घरंगळत चालला आहे याबद्दलची त्यांची तीव्र संवेदनाच ग्रंथप्रसूतीस कारण झाली आहे. ते नाहीं म्हणत असले तरी देशक-ल्याणाची कळकळच त्यांच्या ग्रंथलेखनाच्या मूळाशीं आहे. आधिभौतिक पाश्चात्य सुधारणांचे जे दुष्परिणाम घडत असलेले पदोपदीं आपणांस दिसत आहेत त्यांचा पुसट समाचार निबंधमालाकारादिकांनीं वेळोवेळीं घेतला असला तरी आध्यात्मिक धारणेनें सुधारणांचे दुष्परिणाम कसें टाळतां येतील हें मुद्देसुद रीतीनें चटकदार-पणानें स्पष्ट सांगणारा मराठी भाषेंत हा एकच एक ग्रंथ आहे. पाश्चात्यांच्या अंधानुकरणानें कादंबऱ्या, नाटकें व गोष्टी यांच्या रूपानें व उसन्या राजकीय व सामाजिक चळवळींनीं आपल्या देशाला अधःपाताचें वळण लावणारे बहुत आहेत; पण "थांबा थांबा ! खड्डयांत पडूं नका, मागें पहा, आंधळेपणानें आपली प्राचीन परपरा सोडून बहकू नका, मागें वळा" असें जोरदार भाषेनें सांगणारा हा ग्रंथ आमच्या वृद्धतरुणांनीं एकवार तरी अवश्य वाचावा व 'आपलें चुकतें कोठें' हें समजून घ्यावें अशी आमची महाराष्ट्रीय वाचकांस आग्रहाची शिफारस आहे. गोविंदसुतांच्या भाषेंतही विलक्षण मोहनी आहे.

लोकांच्या बोलींत हा ग्रंथ लिहिला आहे. लोकव्यवहार सूक्ष्मतेनें लोकांत मिसळून करण्याचा अभ्यास व परमार्थ विचारांची उपासनेनें प्राप्त करून घेतलेली बैठक हे दोन्ही रंग गोविंदसुतांच्या विनोदी पण यथार्थ भाषणांत तसेंच या ग्रंथांत भरलेले आहेत. राजकारण व समाजकारण यांचा विचार करितांना लोकमान्यादिकांचा हस्तावलंब केला आहे व परमार्थ विचार सांगतांना ज्ञानेश्वरमहाराज व समर्थ यांचा आश्रय केला आहे, तथापि सर्व ग्रंथांत 'गोविंदसुतीपण' स्वतंत्रपणानें भरलें आहे. त्यांच्या वाक्चातुर्याला भुलून विरुद्ध विचाराचा मनुष्यही ग्रंथ पांक्त वाचल्याशिवाय खालीं ठेवणार नाहीं. "प्रचलित सुधारणा हाच कां अभ्युदय ? हा मतिविभ्रम आणि आत्मघात ! ही समाजघटना कां विटंबना ? मुलांच्या शिक्षणांत परंपरेचें रक्षण पाहिजे; बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, स्पृश्यास्पृश्यतेचा बाऊ, यांत्रिक सुधारणा, औद्योगिक उन्नति, जातिभेद मोडणें शक्य व अवश्य आहे काय ? आजकालचें राजकारण," इ० पूर्वभागांतील विषयांवरचें ग्रंथकारांचें विवेचन सर्व स्थळीं सर्वांस पटण्यासारखें नसलें तरी त्याचा विचार सर्वांनीं करणें अवश्य आहे यांत संशय नाहीं "वेदोपनिषदें, चातुर्वर्ण्य, सनातन वैदिक धर्म, अभ्युदय आणि निःश्रेयस्, दृश्य सृष्टीचें मापन व आत्मशोधनाचें साधन, सद्गुरूपासनासंप्रदाय, आत्मबोध, बोधाचा परिपाक," इ० उत्तर भागांतील प्रकरणें तर उत्तरोत्तर अधिक सरस, बोधप्रद व अधिकाराच्या तेजानें लिहिलीं आहेत. पूर्वींच्या ग्रंथापेक्षांहि येथें गोविंदसुतांचें विवेचन अधिक सरळ, सप्रमाण, किंबहुना प्रासादिक उतरलें आहे. त्यांचें हृदय येथें पूर्ण खुललें आहे. ते अध्यात्मांत पारंगत आहेत. क्लिष्टता किंवा संदिग्धता हे दोष त्यांच्या वाणींत नाहींत. निःसंदेहपणाच्या बैठकीवरचे हे त्यांचे उद्गार समाधान देणारे आहेत. असा हा बहुरंगी असून एकपणाच्या दोऱ्यांत ओवलेला सुंदर ग्रंथ प्रत्येकानें अवश्य पहावा.

२. **टिळकसूक्तिसंग्रहः**—( स. वि. बापट कि. रु. २८ ):—लोकमान्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' दोन भागांत प्रसिद्ध करून लोकमान्यांचे एकनिष्ठ भक्त रा. सदाशिवराव बापट यांनीं टिळक वाङ्मयांत उत्कृष्ट भर घातलीच आहे, पण एवढेंच करून न थांबतां त्यांनीं आपल्या गुरूची सेवा आणखी एका नवीन ग्रंथानें केली आहे. ग्रंथाला रा. माधवराव मोडक यांनीं मार्मिक व विद्वत्तापूर्ण प्रस्तावना जोडली आहे. केसरींतल्या २५ वर्षांतील टिळकांच्या अग्रलेखांतील व गीतारहस्यांतील निवडक सुंदर उक्ति एकत्र करून त्यांची व्यवस्थेशीरपणानें मांडणी केली आहे. 'कोणत्या ना कोणत्या एका प्रधान शब्दावर आधारलेल्या प्रत्येक सूक्तींतील सूचक शब्द

( Key-word ) शोधून व तो मोठ्या टाईपांत छापून त्याच्या अक्षरानुक्रमावर सूक्तींची मांडणी केलेली आहे. ' व ही रा. बापट यांची योजना दीर्घ परिश्रमाची व मार्मिकपणाचीच आहे यांत शंका नाहीं. टिळकांची बुद्धि विशाळ व व्याप मोठा यामुळें बहुधा प्रत्येक विषयांवर त्यांनीं २५ वर्षांच्या आपल्या आयुर्मानांत काढलेल्या उद्गारांत स्थिर महत्त्वाच्या कांहीं उक्ति आढळणारच, त्यांची योग्य निवड करून हीं सूत्ररूप वचनें एकत्र शिस्तीनें मांडण्यांत बापटांनीं टिळकभक्तांची मोठी सोय केली आहे. कोणत्या विषयावर लोकमान्यांचें काय मत होतें हें हें पुस्तक चाळून वाचकाला चटकन् काढायला सांपडतें. इंग्रज लोक, स्वातंत्र्य, स्वराज्य, शिवराजजन्मोत्सव, गणेशोत्सव, रामदास, शंकराचार्य, ग्रंथ, इंद्रियदमन, देशकार्य, देशाभिमान, जुलूम व त्याचा प्रतिकार, धर्म, भागवतधर्म, पोलिस, राजनीति, युनिव्हर्सिटी, राष्ट्रीय सभा, लोकमत, सामाजिक सुधारणा, स्त्रीशिक्षण, विद्या, विद्यापीठ, विद्यार्थी व विद्वत्ता, स्पर्शास्पर्श, समाज, स्वभाषा, सत्पुरुष,–तात्पर्य कोणत्याही विषयावर लोकमान्यांचें मत काय होतें हें संक्षेपानें पाहणें झाल्यास ह्या पुस्तकाचा उपयोग फार होईल. बापट यांनीं अतिशय काळजी घेऊन हें पुस्तक तयार केलें आहे.

**३. वऱ्हाडचा इतिहास** ( ले. यादव माधव काळे, बुलढाणा, किं. रु. ३) —बुलढाण्याचे प्रसिद्ध वकील व सी. पी. कायदेकौन्सिलचे अध्यक्ष रा. यादवराव काळे यांनीं २ वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेला हा ग्रंथ महाराष्ट्राच्या इतिहासभक्तांस अत्यंत उपयुक्त वाटेल यांत संदेह नाहीं वऱ्हाड हा महाराष्ट्राचाच एक महत्वाचा भाग आहे, इतकेंच नव्हे तर महाराष्ट्राचे तें हृदय आहे. त्याविषयीं आमच्या इकडील लोकांस असावी तितकी ऐतिहासिक माहिती नव्हती; ती सदर ग्रंथानें पुरविली आहे. देशवर्णन, पौराणिक काळ, मुसलमानी काळ, मराठी साम्राज्याचा काळ, प्राचीन व अर्वाचीन काळांतील वीर, मुत्सद्दी, संत, कवि व इतर कार्यकर्ते पुरुष, वऱ्हाडांतील प्रसिद्ध पुरुष व प्रमुख घराणीं, ऐतिहासिक महत्वाचे दुर्ग, तीर्थक्षेत्रें व संस्थानें, सामाजिक चालीरीति, वतनदारी, जुन्या इमारती, वगैरे संबंधानें भरपूर माहिती सदर इतिहासग्रंथ वाचून होणार आहे. महाराष्ट्राचा इतिहास ह्या ग्रंथाच्या साह्यावांचून या पुढें पुराच होणें शक्य नाहीं इतकें या ग्रंथाचें महत्व आहे. शेवटीं स्थलवर्णनात्मक सूचि दिली आहे तीही फार महत्वाची आहे. रा. काळे यांनीं सर्व माहिती मोठ्या परिश्रमानें मिळवून संगतवार दिली आहे. सर्व साधनांचा त्यांनीं आस्थापूर्वक चिकित्सकपणानें उपयोग करून सदर बिनमोल ग्रंथाची उठावणी केली आहे. वऱ्हाडचा इतिहास पिढीजाद वऱ्हाडी माणसानेंच लिहिल्यामुळें त्यांत आपलेपणाचा योग्य अभिमान आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाङ्मयांत सदरग्रंथानें फार मोलाची कामगिरी केली आहे.

४ **मयूरकाव्यविवेचन** ( प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी, एम्. ए. एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई ):—प्रसिद्ध महाराष्ट्रकवि मोरोपंत यांचा हा एक नवीन भक्त वाङ्मयाच्या क्षितिजावर चमकूं लागला हें पाहून आम्हांस सकौतुक आनंद वाटतो. प्रो. बनहट्टी यांनीं सदर ग्रंथाच्या पूर्वार्धांत पंतांच्या भागवती काव्यांचें सांगोपांग तुलनात्मक विवेचन केलें असून उत्तरार्धांत पंतकाव्यांचा कालनिर्णय, पंतांची भाषाशुद्धि व पंतभाषेचें व्याकरण, दोषांचें विवेचन, काव्यतत्वविचार व पंतकविता इ० विषयांचें ह्म० पंतांच्या एकंदर कवितेचें सर्वसामान्य विवेचन केलें आहे. प्रो. बनहट्टी तरुण आहेत, विद्याव्यासंगी आहेत, दीर्घ परिश्रम घेण्याची त्यांना हौस आहे व ताकद आहे, त्यांचा साहित्यशास्त्राचा अभ्यास ताजा आहे, प्रतिपक्ष्यांशीं दोन हात करण्याची उत्साहबुद्धि आहे व झुंज घण्यास लागणारे गुण त्यांचे अंगीं आहेत; इतकी सिद्धता असल्यावर चिकित्साबुद्धीच्या जोरावर ते जे म्हणतील ते तरुणांस मान्य होण्यासारखें आहे ! त्यांच्या ह्या ग्रंथाचें आम्हीं विस्तृत परीक्षण करावें अशी त्यांची फार इच्छा आहे पण आम्हांस तितकी सवड नाहीं व 'अधरोत्तरव्यक्ती'ची म्ह० वादाची प्रवृत्तिही बहुतेक मावळली आहे ! मोरोपंतांची सेवा आम्हांस करावयाची होती ती आह्मीं तारुण्यांत 'मोरोपंतांचें चरित्र व काव्यविवेचन,' आणि 'मोरोपंती वेचे' ह्या दोन ग्रंथांच्या द्वारें केली आहे. आतां त्यावर ज्याला जें वाटेल तें त्यानें लिहावें. रामकृष्णपंत पराडकर यांनीं मोरोपंतांची अस्सल कविता प्रसिद्ध करितांना अनेक विद्वानांना हातीं धरून आम्हांवर म्ह० आमच्या मतांवर सडकून टीका केली आहे, त्यांस आम्हीं आजवर उत्तर केलें नाहीं. बनहट्टींच्याही टीकेला उत्तर देण्यास सवड नाहीं. इतकें खरें कीं जें साहित्य अनेक वर्षांच्या सतत परिश्रमानें आम्हीं जमवून पंतचरित्राची इमारत उठविली व पंतकाव्यविवेचनाचा मार्ग घालून दिला त्याच्या चकारीबाहेर कोणी गेलेले नाहीं, जागच्या जागीं अंगाला आळेपिळे देत, 'पण माझें मत असें आहे' असें म्हणण्याची हौस मात्र सर्वांनीं पुरवून घेतली आहे ! आपलीं मतें प्रगट करितांना झटके दिले आहेत, पण कोणीही नवीन पत्रें किंवा माहिती उजेडांत आणली नाहीं. आम्ही जमविलेल्या माहितीवरच सर्वांनीं आपापलीं टीकास्त्रें पाजळलीं आहेत. त्यांतल्या त्यांत बनहट्टींनीं आपली बुद्धि बरीच निर्मळ ठेविली आहे. त्यांना आमच्या ग्रंथांत दोषांप्रमाणें गुणही आढळले आहेत व आमचें एके ठिकाणी ( पृ० ३२–३३ ) मनःपूर्वक स्तवनही केलें आहे. ह्या त्यांच्या सात्विकपणाबद्दल कौतुक वाटतें. आमच्या आजच्या मनःस्थितींत 'त्वया जितं मया जितम्' असें करण्यापेक्षां 'बाप्या ! तुझें म्हणणें खरें आहे !' असें एकदम् कबूल करून मोकळें व्हावें हेंच

योग्य वाटतें. 'कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली' अशा वयांत वादाची हमरीतुमरी करण्यापेक्षां 'त्वया जितम्' म्हणून अजिंक्य पत्र देण्याचाच मार्ग अधिक प्रशस्त वाटतो! असो. प्रो. बनहट्टी यांनीं आपला ग्रंथ उत्तम व्यासंग ठेवून सुंदर लिहिला आहे. त्यांची बुद्धि भागवतधर्मानुकूल सत्वसंपन्न आहे हें पाहून आह्मांस समाधान वाटतें. तारुण्याला सहज अशा कांहीं उसळ्या त्यांनीं मारल्या असल्या तरी त्या क्षम्य आहेत. ही कडकड अभ्यासपरिपाकानें शांत होणारी आहे. पंतकवितेच्या अभ्यासकांस प्रस्तुत ग्रंथ उपयुक्त वाटेल यांत शंका नाहीं. प्रो. बनहट्टी यांच्या हातून मराठी वाङ्मयाची अधिकाधिक सेवा घडो व मराठी ग्रंथकारांच्या प्रभावळींत ते ताऱ्याप्रमाणें चमकोत अशी इच्छा आहे ती ते पूर्ण करोत.

५ **श्रीकृष्णजयन्तीव्रतोत्सवभजन** ( सुब्राव गोपाळ उभयकर, नारायणपूर, हुबळी ) किं० रु १:—सदर ग्रंथाची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति असून तींत श्रीरमावल्लभदासांची कांहीं नवीन उपलब्ध झालेलीं पदें व अभंग यांचाही समावेश केला आहे. श्रीरमावल्लभदासांनीं कृष्णभक्तीचा जो संप्रदाय तीनशें वर्षांमागें कारवार प्रांतीं उभा केला त्या संप्रदायासाठीं श्रीकृष्णजन्म-प्रसंगावर जीं पदें, पाळणे, पवाडे, अभंग इ० कवित्व करून ठेवलें होतें तें महाशय सुब्रावबावांच्या उत्कट गुरुभक्तीमुळें प्रकाशांत आलें आहे. ही सर्व कविता प्रेमळ व प्रासादिक आहे हें सांगणें नकोच. ग्रंथारंभीं श्रीकृष्णचरित्रावर आठ उत्कृष्ट चित्रें सुबक कागदावर आकारलेलीं दिलीं आहेत तींच आधीं मनोहर आहेत. नंतर श्रीरमावल्लभदासांचें विस्तृत चरित्र दिलें आहे तेंही गोड आहे. एक रुपयांत सदर ग्रंथ म्हणजे फुकटच आहे. सगुणप्रेमी सज्जनांनीं या ग्रंथाची एकेक प्रत संग्रही ठेवून कृष्णभक्तीचा आनंद लुटावा.

६ **समर्थवाङ्मयमाला**:—( सदाशिव खंडो आळतेकर, कऱ्हाड ) किं. ८६ —श्रीसमर्थांच्या कवितामहोदधींतून छोटीं छोटीं पुस्तकें बालबोधार्थ काढण्याचा संकल्प रा० आळतेकर यांनीं केला असून त्या संकल्पाचें पहिलें फळ म्हणजे ही 'समर्थांची करुणापर कविता' होय. हा प्रयत्न स्तुत्य आहे. बालांना ( आणि बाल नाहीं कोण ? ) रोज देवापुढें बसून प्रार्थना करण्यास हें पुस्तक उपयुक्त वाटेल. समर्थांच्या वाणीनें श्रीरामसमर्थाला आळविण्यांत कोणाला आनंद वाटणार नाहीं ? रा. आळतेकरांनीं समर्थांची कविता लोकप्रिय कराण्याचें हें जें काम आरंभिलें आहे तें फार उत्तम आहे.

७ **मनबोध ( गुजराथी समश्लोकी)**:—अनुवादक व प्रकाशक कृपाशंकर व्हेचरलाल पंडित, अमदाबाद किं. ८५. समर्थांच्या मनोबोधाची ही समश्लोकी गुजराथींत तयार करून समर्थांची दिव्यवाणी गुर्जरबंधूंच्या कानावर पाडण्याची

उत्कृष्ट सोय झाल्याचें पाहून समाधान वाटतें. याला प्रो० आठवले यांनीं सुंदर प्रस्तावनाही लिहिली आहे. कृपाशंकरांनीं समर्थांच्या कृपेचा पाट फोडून गुर्जरदेशांत नेला ही आनंदाची गोष्ट आहे.

८ **पद्यात्मक गोष्टी** ( महादेव पांडुरंग ओक, पुणें ) किं. ८६. रा. माधवराव ओक हे उत्तम संस्कृत शिक्षक आणि रसिक व कवि म्हणून पुण्यांत प्रसिद्ध आहेत. ह्या सर्व पद्यात्मक गोष्टी स्वतंत्र आहेत व फार मनोरंजक व बोधप्रद आहेत. साध्या गोष्टींतून बोध कसा घ्यावा हें यांपासून शिकण्यासारखें आहे. भाषा प्रौढ, साधी व प्रसादयुक्त आहे. यांत कथावैचित्र्य व वृत्तवैचित्र्यही आहे. हा पद्यात्मक गोष्टींचा अभिनव प्रकार सर्व रसिकांस आवडेल अशी आम्हांस उमेद आहे.

९ **मानसोपचारपूजनयोग** ( ले. केशव सखाराम बोपेरीकर, पो. कुरम ) किं. ८१२. पूजेचे अनेक प्रकार असले तरी मानसपूजा ही सर्वांत मुख्य आहे. ‘ हा आत्यंतिक सुखाचा सोपा उपाय ’ या पुस्तकांत अनेक ग्रंथवचनाधारें सांगितला आहे. आत्मोन्नति, मायेचें मूळ, मनाची मीमांसा, मार्गसोपान, भक्तिपंथ यांचें विवेचन करीत करीत लेखकानें मानसपूजा वर्णन करून सांगितली आहे. पुस्तक एकवार वाचण्यासारखें आहे.

१० **संकल्प सामर्थ्य**:—( ले. आनंदघनराम उर्फ रामचंद्र विनायक कुळकर्णी, तासगांव ) किं० ८१२. ‘ आपल्या संकल्पसामर्थ्याच्या जोरावर पूर्वकर्मांवरही सत्ता चालवून आपली कष्टमय परिस्थिति बदलून समर्थ व सुखी व्हा ’ हें सांगण्यासाठीं ग्रंथकारानें हा ग्रंथ लिहिला आहे. रा. कुळकर्णी हे सूक्ष्म विचार शास्त्रशुद्ध रीतीनें करणारे आहेत. यांनीं मानसशास्त्रासंबंधीं अनेक ग्रंथ लिहिले असून ते फार चांगले आहेत, विचाराला चालन देणारे आहेत. संकल्प म्ह. काय, संकल्पत्यागाचा अर्थ काय, पापसंकल्प व पुण्यसंकल्प यांत भेद काय, संकल्पांत सामर्थ्य कसें असतें, शुद्धसंकल्प अंगच्या शक्तिबलानेंच कसे सिद्ध होतात याचें सुंदर विवरण रा. कुळकर्णी यांनीं केलें असून सत्यसंकल्प सिद्धीस नेण्याचा अभ्यास वाचकांनीं करावा व समर्थ व्हावें.

११ **परागंदा**:—( डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, पुणें ) किं. १८२ ह्या कादंबरीवर अभिप्राय देणें कठीण आहे. ज्ञानकोशासारखें प्रचंड काम अंगावर घेऊन पार पडणार केतकर हे एक कर्तृत्वाचे पुरुष आहेत. ते बुद्धिवंत आहेत. विद्वान् व शोधक आहेत व अविचारांतही विचारी आहेत. ‘ अमेरिकेंत गेलेला व तेथें कायम झालेला किंवा कायम होऊं पाहणारा जो सुशिक्षित भारतीयांचा वर्ग आहे त्याच्या विचारौघाची निदर्शक ही कादंबरी आहे. ’ डॉ. केतकर यांच्या ह्या सामाजिक कादंबरींत वाङ्मयदृष्ट्या कांहीं गुण आहेत. तिच्यांत

अनेक सामाजिक वाद समतोलपणानें दिले आहेत, भाषेंत विशेष डौल नसला तरी भाषा साधी आहे. व्यक्तिस्वभावचित्रें अकृत्रिम वठविलीं आहेत; तथापि परदेशांत जाणारा सुशिक्षित तरुणांचा वर्ग बहुधा बहकलेलाच परत येतो, अशा स्थितींत तरुणांचीं मनें असल्या कादंबऱ्यांच्या वाचनानें अधिक बहकण्याचा संभव असल्यामुळें त्यांचें हातीं असलीं पुस्तकें पडावीत हें इष्ट वाटत नाहीं. जातिभेद नष्ट व्हावा, मिश्रविवाह व्हावेत, प्रियाराधनाची पाश्चात्य पद्धत सर्रास सुरू व्हावी असा कादंबरीकारांचा हेतु उघड दिसतो; तथापि जुन्या परंपरेची विचारसरणीही ग्रंथकारानें शांतपणानें मांडली आहे. तिच्यांत स्वाभिमानपोषक द्रव्यें आहेत आणि नाहींतही ! अशा ह्या मिश्र विचाराच्या कादंबरीस बरें म्हणावें कां वाईट म्हणावें हें ठरवणें कठिण आहे ! प्रौढांनीं वाचण्यास हरकत नाहीं, तरुणांना अपायकारक होण्याचा संभव आहे. समाजांत क्रांतिकारक विचार फैलावण्यास साह्य करणारी असून प्रस्तुतच्या हिंदुसमाजघटनेस बाधक आहे.

१२. **वेदांच्या काळाचा इतिहास**—( ले० परशुराम हरि थत्ते, नाशीक किं. रु. ३ ): —' परशुराम ' संहितेचा हा पहिला भाग छापून झाला, यापुढें बुद्ध व हिंदुकाळांतील इतिहास व इतर भाग प्रसिद्ध होतील. रा. थत्ते यांचे निरलसता, बहुश्रुतपणा, श्रमसातत्य व कल्पकता हे गुण ह्या ग्रंथावरून प्रतीत होतात. वेदकालीन इतिहासावर प्रकाश पाडणारा बहुत मजकूर सदर ग्रंथांत संकलित केलेला आढळतो. प्रवृत्तिभाग व निवृत्तिभाग, संस्कृतसारस्वत, चार वर्ण व पंच जन, प्राचीन भूप्रकाश, राशिचक्राचा नकाशा, तारकापुंज व देशांची ओळख, नौकायन, व्यापार व वसाहती, स्थलकाल निर्णय, टिळक आठवले व पावगी यांच्या शोधांचा विचार, मूळ आर्यावर्त इ० अनेक विषयांवरचें विविध प्रकारचें विवेचन सदर ग्रंथांत आलें आहे. ग्रंथकारांच्या परिश्रमाच्या मानानें ग्रंथाचा प्रसार झाला तरच त्यांच्या श्रमाचें चीज होईल. सामान्य वाचकांसही या ग्रंथानें पुष्कळ प्रकारचें प्राचीन कालाचें ज्ञान होईल. सदर ग्रंथप्रकाशनास इंदूरच्या महाराजांनीं बरेंच साह्य केलें आहे.

१३. **राजर्षि भीष्म**:—उत्तर हिंदुस्थानांतील स्वामी सत्यदेव यांच्या हिंदी-ग्रंथांचा महाराष्ट्रवाचकांस परिचय करून देण्याच्या उद्देशानें रा. श्रीधर नारायण हुद्दार, बालाघाट सी. पी. यांनीं ' अभिनव ग्रंथमाला ' सुरू केली असून त्या मालेचें हें तिसरें पुष्प आहे. किं. ॥५. ग्रंथ सर्वांनीं, विशेषतः तरुणांनीं अवश्य वाचावा. भीष्मांचें तेजस्वी व धीरोदात्त चरित्र स्वामी सत्यदेवांसारख्या नामांकित हिंदी देशभक्तानें लिहिलेलें असून त्याचा अनुवाद रा. हुद्दार यांनीं सुबोध व सरळ मराठी भाषेत केला आहे.

**१४. श्रीसमर्थसंप्रदायाचीं लक्षणें:**—( ले. रघुनाथ गोविंद रिसवडकर. किं. ८४ ) श्रीसमर्थांविषयींचा प्रेमादर व्यक्त करण्यासाठीं लेखकानें हरिकथा-निरूपण, राजकारण व सावधानता ह्या समर्थांच्या मंत्रत्रयीचा समर्थवचनाधारें प्रपंच केला आहे, तो वाचनीय आहे.

**१५. सुभाषितपुष्पमाकरंद** किं. ८५ व **१६ श्रीसमश्लोकीगीता** ( किं. ८१२ ) हीं दोन्हीं पद्यात्मक पुस्तकें प्रसिद्ध अर्वाचीन कवि रा. मुकुंद गणेश मिरजकर, पुणें यांनीं लिहिलीं आहेत. मिरजकर यांची वाणी सरस, प्रौढ व सुसंस्कृत आहे. पहिल्यांत १५० लोकप्रसिद्ध संस्कृत श्लोक त्यांच्या मराठी पद्यात्मक भाषांतरासह दिले आहेत. त्याची प्रस्तावनाही सुंदर आहे. त्यांची समश्लोकीगीता तर फारच रम्य झाली आहे. मराठींत वामनांची गीता समश्लोकी प्रसिद्ध आहे, व जुन्या परंपरेच्या लोकांत ती नित्यपाठांत असे. मिरजकरांची समश्लोकीही अशीच लोकांना आवडण्यासारखी आहे. रचना ठाकठिकीची आहे, आबाळ गबाळ नाहीं. एका पानांवर गीतेचें श्लोक व दुसऱ्या पानांवर त्याचें समश्लोकी भाषांतर अशी या पुस्तकाची रचना आहे. गीता व समश्लोकी दोन्ही समोरासमोर आहे. अलीकडच्या काळांत इतकी निर्दोष व सरस कविता क्वचित वाचावयास मिळते. वाचकांनीं मिरजक-रांचीं दोन्हीं पुस्तकें अवश्य संग्रहावींत अशी आमची शिफारस आहे.

**१७. श्रीगुंडामाहात्म्य:**–हें ओवीबद्ध चरित्र २४ अध्यायांचें असून गुंडा भक्तांनीं व भाविकांनींही वाचण्यायोग्य आहे. हे गुंडोजीबोवा मोरोपंतांच्या व शेवटच्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत होऊन गेले. पंढरीस यांचा मठ आहे.

**१८. श्रीराममारुतींचें ओवीबद्ध चरित्र:**–कल्याण भिवंडीकडील ह्या प्रभु-ज्ञातींतील सत्पुरुषांचें हें चरित्र रा. हरि रामचंद्र पाठक यांनीं ५ अध्यायांत गायिलें आहे.

**१९. भीष्मचरित्र ( नाट्यरूप ):** -सौ. राधाबाई करमरकर यांनीं हें लिहिलें आहे. मनोरंजक तऱ्हेनें भीष्मांची कथा मुलामुलींच्या वाचनांत येण्यास हरकत नाहीं.

**२०. धेनुगाथा:**–श्रीज्ञानेश्वरादि सत्पुरुषांची अहिंसा, गो पालन, गृहस्थाश्रम या विषयांवरचीं निवडक वचनें यांत एकत्रित केलीं असून गोरक्षण हें हिंदु-मात्राचें पवित्र कर्तव्य आहे हें दाखविलें आहे.

**२१. माझी भवळी:**–हा शेतकरी व त्याची लाडकी गाय यांवरचा अत्यंत हृदयद्रावक पोवाडा रा. काकडे यांनीं लिहिला असून वरील पुस्तकाप्रमाणें श्रीगोवर्धन प्रेस, कांदेवाडी, मुंबई यांनीं प्रसिद्ध केला आहे. ८२

**२२. भक्तियोगः**—यांत ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायाचें संक्षिप्त निरूपण असून तें रा. ना. वि. आठवले यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

**२३. पुरुषोत्तमयोगः**—अर्थात् गीतेचा पंधरावा अध्याय अन्वयार्थासह **२४ चिन्मार्तंड, २५ श्रीरामहृदय व २६ आत्मदर्शन व चित्सोपान** हीं तीन रा. भेंडे यांचीं पुस्तकें, **२७ कैवल्यपुष्प**—श्रीहणमंतराव कोटणीस यांची शिष्या गुप्तनाथारचित इ० छोटेछोटे प्रबंध.

**रिपोर्ट,अहवाल वगैरे:**—महाराष्ट्रमंडळ, कलकत्ता; नगरच्या हिंदसेवामंडळाचा १९२२ ते २४ पर्यंतचा अहवाल; महाराष्ट्र मित्रमंडळ, रंगून, यांचा पंचविसावा वार्षिक अहवाल; मुंबई गोग्रासभिक्षासंस्थेचा दहा वर्षांचा अहवाल; बुद्धिबळाचा मार्गदर्शक, सांगली; खामगांवच्या टि. रा. विद्यालयाचा पांचव्या वर्षाचा अहवाल; पैसा फंडाचा विसावा वार्षिक अहवाल; धी डेक्कन लिटररी ॲसोशिएशन, हैद्राबाद या संस्थेचा रिपोर्ट; गोवर्धनसंस्था, वाई व मुंबई—विसाव्या वर्षाचा वार्षिक अहवाल; इ. इ. वरील सर्व संस्था आपापल्या परीनें उत्तम काम करीत आहेत. रंगून व कलकत्ता अशा दूरच्या ठिकाणीं महाराष्ट्रीय मंडळीची जूट असणें अवश्य आहे व तेथील महाराष्ट्रीयांनीं ती चांगल्या प्रकारें केली आहे हें पाहून समाधान वाटतें. अहमदनगर येथील स्वार्थत्यागी मंडळींनीं अनाथ विद्यार्थीगृह, राष्ट्रीय पाठशाळा व उद्योगमंदिर या संस्था निरपेक्ष प्रेमानें चालविल्या आहेत. मुंबईस गोवर्धन व गोग्रास दोन्ही संस्था गोरक्षणाचें काम फार चांगलें करीत आहेत.

---

# दाता आणि संचक.

संस्कृत भाषेंत समुद्राला वारिधि ह्म० जलसंचय असा एक शब्द आहे व मेघाला वारिद ह्म० जलदाता असा शब्द आहे. यावर एका रसिकानें एक सुंदर कोटी केली आहे. वारिधि ह्म० पुष्कळ जलसंचय असलेला. वारिधि हा खालीं पडतो व जलदान करण्यांत धन्यता मानणारा मेघ वर उंच स्थळीं असतो. संचय असला तरी दातृत्व नसेल तर खालींच स्थान मिळतें व दातृत्वाच्या योगानें उंचस्थान मिळत, जग डोक्यावर घेतें. तसेंच ज्ञानाच्या संचकापेक्षां वक्तृत्वसंपन्न होऊन ज्ञानदान करणारा वक्ता लोकांत मान्यता पावतो आणि मेघाप्रमाणें उदारपणें जीवोद्धारार्थ निरपेक्ष झटणारे संतसज्जन तर जगाला शिरोभूषण होऊन वंदनीय वाटतात. तात्पर्य, संचयापेक्षां ज्ञानाची मातब्बरी फार अधिक !

# काळाचा फेरा !

मुंबईचे **सीताराम शिवराम लोटलीकर ऊर्फ सीताकांत** हे वयाच्या ३५ वे वर्षी कालवश झाले. त्यांच्या प्रेमळ पत्नीवर व आतेष्टांवर हा दुःखाचा प्रसंग गुजरला. हें दांपत्य मोठें प्रेमळ, विद्याव्यसनी, आतिथ्यप्रिय, सात्विक व नित्य प्रसन्नमुख होतें. असें शांतीचें घर क्वचित् पाहण्यास मिळतें. हे प्रथम मासिक मनोरंजन, नंतर संदेश पत्रांत लिहीत व पुढें करमणुक पत्रांत लिहीत. पण त्यांचे लेख तात्पुरते झाले. त्यांनीं लेखनव्यवसाय इतका निरलस बुद्धीनें, सातत्यानें व दीर्घोद्योगानें चालविला होता कीं असे 'विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिः' वर्णनाचें पुरुष फार विरळ सांपडतात. आरोग्य, सौख्य, शांति, परोपकार, दीर्घायुष्य, निर्व्यसनता इ० गुणांचें समाजांत पोषण व्हावें या बुद्धीनें यांनीं १०।२० छोटीं मोठीं पुस्तकें सुंदर मराठी भाषेंत लिहिलीं असून तीं चांगलीं लोकप्रिय झालीं होतीं. 'सामर्थ्य, समृद्धि व शांति' 'संजीवनी विद्या' 'शक्तिसंरक्षण,' 'मार्ग व मार्गदर्शक,' 'आत्मोन्नति', 'आरोग्यचिंतामणि' 'महात्मा गांधींचें चरित्र', इ० यांचीं पुस्तकें वाचनीय, मननीय व आचरणीय आहेत. यांची भाषासरणी साधी, गोड, कोणासही न खुपतां सद्बोध व सन्मार्ग देणारी अशी आहे. शरीर व मन यांचें बळ वाढवून आत्महित कसें साधावें हे समजून घेण्यास यांच्या पुस्तकांचा फार उपयोग आहे. सज्जन मनुष्य अकालीं गेला याबद्दल कोणास वाईट वाटणार नाहीं ?

४ गेल्या दोन महिन्यांत मराठी भाषेचे कैवारी असे ४।५ चांगले पुरुष एकामागून एक गेले. राष्ट्रीयशिक्षणाचे आद्यप्रवर्तक आण्णा विजापूरकर, प्रसिद्ध वेदांती बाबा गर्दे, महाराष्ट्रसारस्वताचे कर्ते विनायकराव भावे, हे सीताकांत—हे वेगवेगळ्या अधिकाराचे पण महाराष्ट्राचे व मराठी भाषेचे उपकारकर्ते सज्जन एका मागून एक गेले हें देशाचें मोठें दुर्दैव होय.

ॐ तत्सत्—श्रीसद्गुरु प्रसन्न.

# श्री आवडीमठांतील कृष्णजयन्त्युत्सव.

( लेखक—ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत )

१ **श्रीरमावल्लभदास** सांप्रदायिक महाशय सुब्राव गोपाळ उभयकर यांचें नांव व त्यांचा कृष्णजयंत्युत्सव 'मुमुक्षु' वाचकांच्या कानांवरून पुष्कळ वेळां गेलाच आहे. म० पांगारकर हेही एक वर्षी हुबळींतील कृष्णजयंत्युत्सवास येऊन त्यांनीं तो उत्सव पाहिला आहे; त्यांनीं त्याबद्दलचे आपले उद्गार कैक वेळां प्रसिद्ध केले आहेत व श्रीरमावल्लभदासांची मूळ शिष्या व उभयकरांची पूर्वजा आवडीबाई यांचा परिचय म. पांगारकर यांनीं मुमुक्षु वाचकांना करून दिलेला आहे. प्रस्तुत लेखांत त्या परम साध्वीच्या मठांतील यंदाच्या महोत्सवाचें वर्णन मीं देण्याचें योजिलें आहे; अनेक दृष्टीनें वाचकांना तें रंजवील अशी मला आशा आहे.

२ हुबळींतील श्रीशिवकृष्णमंदिरांतील कृष्णजयंत्युत्सव श्रावण वद्य ८मीला दरसालप्रमाणें मोठया आनंदानें झाला. म० सुब्रावबावांच्या सन्निधानांत पुरुषांप्रमाणें बायकांचेंही प्रेमळ भजन दोन दिवस झालें. नवमी रोजीं सायंकाळीं गोपाळकाला व रात्रौ मुलांचें 'कुंजविहारी' नाटक झालें. म० पांगारकरांनीं परमप्रेमानें श्रीकृष्णाला चांदीचा वाडगा व लहानसें ताट पाठवून त्यांतून शेवयाच्या खिरीचा नैवेद्य कृष्णप्रभूला अर्पण करण्यास विनंति केल्याप्रमाणें सुब्रावबावांनीं केलें; ह्या प्रेमोपायनाबरोबर आलेलें पांगारकरांचें प्रेमळ पत्र सभेंत वाचून दाखविलें; तें ऐकून सर्वांस मोठा आनंद झाला, व त्यापेक्षांही आनंदाची एक मोठी गोष्ट अशी घडून आली कीं, हुबळींतील प्रसिद्ध व्यापारी श्रीयुत गणपतराव माडिमन यांनीं दोन हजार व श्रीयुत गोपाळराव उभयकर यांनीं दोन हजार मिळून चार हजार रुपये शिवकृष्णमंदिराच्या खजिन्यांत अर्पण करून रामनवमीउत्सवानंतर व कृष्णजयन्तीउत्सवानंतर अन्नसंतर्पण करण्याची कायमची योजना करून सोडली. म. सुब्रावबावांनीं उत्सवांत सकाळ संध्याकाळ 'प्रातःस्मरण' व नित्य नेमाचें भजन करणाऱ्या लहान मुलामुलींना दुधपाक ( मसाल्याचें दूध ) देण्याच्या संकल्पानें कांहीं वर्षांपूर्वी तीनशें रुपये जमवून व्याजास लावलेले होते. त्याच्या व्याजांतून दुधाच्या ऐवजीं ते बुंदी आणून वांटीत असत. परंतु पांगारकरांच्या वाटग्यानें त्यांचा पूर्वीचा संकल्पच यंदापासून सिद्ध करण्याचा योग आणला. श्री गोपाळकृष्णाला लाडवांपेक्षां दूधच आवडतें; गोकुळामध्यें त्यानें त्याचीच

लूट केलेली होती. गोपाळबाळांना त्यानें दहींदूधच पुष्कळ चारलें होतें. त्याप्रमाणें सुब्रावबावांच्या इच्छेनुसार व्यवस्थापक मंडळींनीं भजनकर्त्या बाळगोपाळांना केशरी दूधच देण्याचा ठराव करून यंदापासूनच ती व्यवस्था अमलांत आणण्यास सुरवात केली. वाडग्याचा दुसरा परिणाम वर सांगितल्याप्रमाणें चार हजार रुपये अन्नसंतर्पणाकरितां कायमच्या निधींत येऊन पडण्याचा झाला. ही शक्ति त्या वाडग्याची म्हणजे वाडगा पाठविणाऱ्या प्रेमळ व जोरदार अंतःकरणाचीच होय यांत बिलकुल संशय नाहीं. तो जगत्सूत्रधारी परमात्मा कोणाच्या अंतःकरणांत कशी प्रेरणा करून कोणाकडून काय करवील व तें कशाकरितां, हें त्याचें तोच जाणें! असो.

३ म. सुब्रावबावांबरोबर त्यांच्या फार वर्षांच्या आग्रहावरून दशमी रोजीं मोटारमधून हुबळीहून मल्लापुरास गेलों. आवडीमठाची जीर्णोद्धार केलेली नवीन सुंदर व भव्य इमारत पाहून मनास संतोष वाटला. हुबळीस कृ. ज. चा उत्सव होतो, तो फक्त ' भजनीउत्सव. ' मल्लापुरास होतो तो विध्युक्त ' व्रतोत्सव.' मठांतील माळामुद्राधिकारी यानें श्रावण वद्य प्रतिपदे रोजीं मंगलस्नान वगैरे करून विध्युक्त कंकणबद्ध होऊन व्रत चालविलें पाहिजे. उपवास व ब्रह्मचर्यादि नियम पाळून व्रत संपेपर्यंत अगदीं शुचिर्भूतपणें राहिलें पाहिजे. त्या दिवसांत द्वादशाक्षरी वासुदेव मंत्र व षोडशाक्षरी दत्तमंत्र यांचा जप व गीतापाठ वगैरे व्रतांतर्गत कर्तव्यें बरींच आचरावीं लागतात. आवडी मठांत कृष्णजन्म वद्य द्वादशी रोजीं करण्याचा संप्रदाय आहे. त्रयोदशी रोजीं गोपाळकाला व अवभृतस्नान वगैरे विधी असतात. रोज रात्रौ दिवट्यांचा विधि मोठा असतो.

४ आवडी मठाचे सांप्रतचे माळामुद्राधिकारी सुब्रावबावांचे पुतणे श्रीयुत पद्मनाभराव हे असून तेच वर सांगितल्याप्रमाणें कंकणबद्ध होत्साते व्रतस्थ होऊन पंधरा दिवस तेथें राहिलेले होते. व्रतांतर्गत इतर कर्तव्यांप्रमाणें नित्य रात्रीं दिवट्या घेऊन नाचण्याचें काम हेच करीत असत. हे सुशिक्षित व श्रीमंत मनुष्य पूर्वजांनीं घालून दिलेल्या विधीप्रमाणें भजनपूजनादिक करून दिवट्या घेऊन नाचतांना पाहून मोठें कौतुक वाटे. उभयकर व चंदावरकर घराण्यांतील अनेक सुशिक्षित लोक या उत्सवास मोठ्या भक्तिभावानें येतात. इतर प्रेमळ व भाविक लोकही येत असतात. दिवट्या घेऊन ओंवाळणें व नाचणें यांत काय हेतु आहे, दिवट्यांचा काय अर्थ आहे, त्या कशाच्या दर्शक आहेत, हें ते पूर्वज महापुरुषच जाणत; परंतु कांहीं तरी अर्थ त्यांत असलाच पाहिजे. गोमांतकांतील डोंगरीवर सुद्धां रामनवमीच्या उत्सवांत शेवटच्या दिवशीं रात्रौ दिवटी घेऊन नाचण्याची चाल आहे. दिवट्या घेऊन ' गोंधळ ' घाल-

ण्याची चाल फक्त देवी उपासकांचीच असावी असें पूर्वी वाटत होतें; परंतु राम–कृष्ण–उपासकांमध्येंही उत्सवांतील हें एक प्रधान अंग म्हणून ज्ञानी भक्तांच्या संप्रदायांत सुद्धां असलेलें पाहण्यांत येतें. दिवटयांसंबंधाचा शास्त्रकारांचा व एकनाथादि महात्म्यांचा हेतु काय असावा, हें कोणी प्रसिद्ध करील तर जिज्ञासूंवर मोठे उपकार होतील. असो.

५ श्रावण वद्य द्वादशी रोजीं रात्रौ कृष्णजन्माचा उत्सव यथासांग झाला. जवळच्या कुमटागांवांतील मंडळीही बरीच जमलेली होती. हा कार्यक्रम लांबलचक असल्यामुळें पहांटे चार वाजले. त्रयोदशी रोजीं सकाळीं वहिवाटीप्रमाणें भजनास प्रारंभ झाला. उत्सवांतील नित्याचीं 'गोंधळाचीं' पदें चालत असतांना एका वृद्ध मनुष्याच्या अंगांत संचार झाला. हा मनुष्य म. सुब्रावबावांपेक्षांही वृद्ध आहे. यांचें नांव नारायणराव चंदावरकर. हे कै. सर चंदावरकरांचे चुलत बंधु म्हणे. अर्थात् उभयकर घराण्यांतीलच एक पुरुष. यांचेवर श्रीस्थळ मंगेशीमधील 'मोळकेश्वर' देवाचा भार येत असून तो बहुधा प्रतिवर्षी येतो. भार आल्या वेळीं त्यांचें नाचणें व ओरडणें चमत्कारिक वाटलें. "विठोबा केशरी गंध विठोबा तुझा मला छंद । विठोबा केशरी उठी, विठोबा देईं मला भेटी ॥" हा गजर म्हणत भजनी मंडळी सभामंडपांतील रंगशिळेवर टांगलेल्या दिव्या सभोंवतीं प्रदक्षिणा घालीत होती. त्या वेळीं रा. पद्मनाभराव यांचें देहभान उडालें. त्यांचे डोळे, त्यांचा चेहरा, त्यांचा आवाज चमत्कारिक झाला. त्यांचें भजन म्हणणें तशा आवाजांत मोठ्या त्वेषानें चाललें. डोळे झांकून 'विठोबा देइं मला भेटी' हें म्हणतांना पाहून असें वाटे कीं, आतां हे विठोबा भेटल्यावांचून शांत होणार नाहींत. इतकी त्यांची तद्रूपता झालेली दिसत होती. 'तीव्रसंवेगानां' या पातंजल सूत्राप्रमाणें त्यांच्या ठिकाणीं तीव्र संवेगाचा उद्भव झालेला त्या वेळीं भासूं लागला.

६ संतांनीं हा जो भजनमार्ग सुरू केला त्यांतील इंगित हेंच आहे कीं, सर्वांबरोबर ओरडून भजन करतांना लोकेषणेची भीति अथवा लज्जा न रहातां, अंतरांतील भाव निर्लज्जपणानें व अट्टहासानें देवाला निवेदन करतां येतो. हा 'सुप्त' भाव एकदां जागृत झाला व झाल्याप्रमाणें जर तो टिकला तर भावाचा भुकेलेला देव भक्ताला भेटण्यास उशीर नाहीं लावणार. सर्वांबरोबर ओरडून भजन करण्यांत भाव जागृत होण्याची एक उत्तम संधि असते. परंतु भजन करतांना अथवा म्हणतांना मन तालसुराकार न होऊं देतां 'अर्थाकार' होऊं दिलें पाहिजे व कळकळीनें देवास आळविलें पाहिजे. असें केलें असतां मूळ कवित्वकर्त्या कविभक्ताच्या भावाशीं याचें तादात्म्य होऊन, त्या भक्तांवर–संतांवर–झालेली भगवत्कृपा याचेवरही होईल. अस्तु.

७ वरीलप्रमाणें भजन चाललें असतां, प्रेक्षकांपैकीं एका तरुण मनुष्याच्या अंगांत भार आला. तो मुसमुसूं लागला व देवाकडे एकसारखी टक लावून पाहात व टाळ्या पिटीत, देवाकडे हात करून रागारागानें कांहीं बोलल्यासारखें करूं लागला. त्यानें संज्ञेनें दोन नारळ मागून घेतले, परंतु आमच्या (प्रेक्षकांच्या) अपेक्षेप्रमाणें ते त्यानें कोणास प्रसादार्थ वगैरे न देतां; आपल्या डोकीवर इतक्या जोरानें मारून घेतले कीं सांगतां सोय नाहीं. डोकीवर मारून घेतल्यानंतर, तितक्याच जोरानें छातीवर बडवून घेतले, नंतर मांडीवर मारून घेण्यास आरंभ केला. एवढें काम त्यानें एका अर्ध्या मिनिटांत केलें! लोकांच्या लक्षांत त्याची ती तुफानी वृत्ति येतांच महत्प्रयासांनीं त्याच्या हातांतून ते हिसकून घेण्यांत आले. हा मनुष्य कुमटयांतील सर्कल इन्स्पेक्टर म्हणे. नवीनच, यंदाच हा उत्सव पाहण्यासाठीं इकडे आलेला. त्याजवर आलेला भार कोणाचा व कशाकरितां आला वगैरे चौकशी कोणीं केली नाहीं. कांहीं प्रेक्षकखेरीज करून सर्वजण भजनाच्या कार्यक्रमांत गुंतलेले. यजमान पद्मनाभराव तर निराळ्याच वृत्तींत अथवा स्थितींत गेलेले, वृद्ध सुब्रावबावा हे डोळे झांकून खुर्चीवर भजनाच्या अर्थाशीं तादात्म्य पावून ध्यानस्थ बसलेले; तेव्हां कोणी कोणास विचारावें? कोणी तरी त्यास प्रश्न करतील व तो कांहीं तरी सांगेल, अशी मी वाट पहात होतों. मला वाटतें, माझ्याप्रमाणेंच सर्वजण तटस्थ वृत्तीनें व जिज्ञासेनें वाट पहात राहिले असावे. कित्येकांस, याबद्दल जास्त चौकशी केली तर लोक आपणांस भोळे म्हणतील व आपली 'एज्युकेटेड' पणाची अब्रू कमी होईल असेंही वाटलें असावें. भजनाचा कार्यक्रम लांबलचक असल्यामुळें भजन कांहीं कोणी थांबविलें नाहीं. (त्या मनुष्यावरील तो भार अर्धा पाऊणतास होता.) त्याच्या बरोबर पूर्वीच्या वृद्धाच्या भाराची कांहीं सांकेतिक भाषा झाली, ती त्यांची त्यांनाच माहीत.

८ त्यानंतर "**संतपदरजाचा, निजदास मी साचा**" हा प्रबंध चालू असतां एकमेकांस नमस्कार करण्याची व आलिंगन देण्याची चाल आहे, त्याप्रमाणें कार्य सुरू झालें. त्या भजनाच्या गजरांत तो प्रकार चालू असतां कोणाही सहृदय मनुष्याच्या अंगांत सात्विक प्रेमाचें भरतें येऊन कंठ दाटून येतो, हा माझा कैक वेळचा अनुभव आहे. माझे डोळे भरून आले. रा. पद्मनाभरावांनीं इतरांप्रमाणें माझ्याही गळ्यांत तुळशीची माळ घालून, नमस्कार करून मला मिठी मारली, त्या वेळची आमची उभयतांची स्थिती स्वसंवेद्यच होती. रा. गोपाळरावांनींही थोडया वेळानें तसेंच केलें. त्यांचा गहिंवर अनावर झाला. त्यांनीं मला मारलेली मिठी ५।१० मिनिटें सुटेना. लोकांनीं ती बळेंच सोडविली. असा हा भजनानंद त्या देवालयामध्यें व तेथें जमलेल्या हरएक व्यक्तीच्या

अंतःकरणामध्यें एक तासभर दुमदुमून राहिलेला होता. भार आलेल्या दोन्हीं व्यक्ती त्याच आनंदांत निमग्न झालेल्या दिसत होत्या. कांहीं वेळानें तरुण मनुष्याच्या अंगावरील भार विसर्जन झाला व तो सावध होऊन इतर सामान्य मनुष्याप्रमाणें सामान्य वृत्तीनें प्रेक्षकांत उभा राहिला.

९ थोडया वेळानें नैवेद्य, आरत्या, अष्टावधान सेवा वगैरे भजनाचा कार्यक्रम संपल्यावर गोपाळकाल्यास आरंभ होऊन देवाची पालखी देवालयाच्या प्राकारांत असलेल्या एका अश्वत्थ वृक्षाखालीं जाऊन बसली. तिकडे गोपाळांची बाळक्रीडा सुरू होऊन टांगलेलें दह्याचें मडकें वगैरे फोडल्यानंतर व दहींपोह्यांचे लाडू वांटल्यानंतर पालखी गावांत फिरावयास गेली. एका तासानें फिरून येऊन, कृष्ण–सत्यभामासंवादाचा कार्यक्रम कानडी भाषेंत झाला. मग महानैवेद्य, आरत्या, मंत्रपुष्प वगैरे होऊन पानें मांडण्यास सायंकाळचे पांच वाजले. एकंदर पात्र सुमारें तीनचारशें झालें. या प्रकारें उत्सव झालेला पाहून मनाला फारच समाधान वाटलें. रजतमाचा नाश करून सत्व वृद्धिंगत करण्याचें भजनासारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. हा साधनसंप्रदाय ज्या संतांनीं चालू केला, त्यांचे फारच आभार वाटले.

## श्री गोकर्णयात्रा.

१० मल्लापुराहून गोकर्ण क्षेत्र सुमारें १०।१२ मैलांवर असल्यामुळें तेथें जावेसें वाटून म. सुब्रावबावांचा निरोप घेतला व तिकडे गेलों. तेथील स्वाभाविक सृष्टिसौंदर्य, समुद्रसन्निधान वगैरे पाहून मनाला आनंद वाटला. श्री गोकर्णमहाबळेश्वराच्या दर्शनस्पर्शनानें धन्यता वाटली. श्रावणमास, शेवटचा सोमवार व दर्शअमावास्या, या दिवशींच श्रींच्या पूजनाचा योग अकल्पितपणें व सहज घडून आला, ही त्या महाप्रभूचीच दया होय असें वाटलें. म. सुब्रावबावांनीं दिलेल्या पत्राच्या वशील्यामुळें मला तेथें देवाच्या अगदीं समोर चांगल्या संगतींत व बराच वेळ बसून, शांतपणानें पूजा करतां आली. स्नान करून सोवळ्यानें महालिंगाच्या पूजेस बसलों असतां, उजव्या डाव्या बाजूस अनेक स्त्रीपुरुष पूजेस येऊन लिंगावर पाणी ओतून पूजा करून जात होते. आमची पूजा पंचामृताभिषेकयुक्त एकादशनीची व सहस्रनामार्चनाची असल्यामुळें देवासमोर सुमारें पाऊण तास बसावें लागलें. तितक्या अवधींत माझ्या डाव्या बाजूस किती तरी स्त्रीपुरुष येऊन टेकून बसून प्रभूची पूजा करून गेले. त्यांत एक विशेष प्रकार हा दिसला कीं, एक काळा भिल्ल शूद्र, ज्याच्या कमरेंत रुप्याचा कडदोरा व लंगोटी होती कानांत सोन्याच्या जाड मुद्या होत्या, असा येऊन माझ्या डाव्या अंगास

खांबास खांदा टेकून बसला व उपाध्यायानें सांगितल्याप्रमाणें पूजा करूं लागला. वेदोक्त कर्माचे अनधिकारी स्त्रीशूद्रादिक यांना महाकर्मठ वैदिकब्राह्मणांप्रमाणेंच, किंबहुना त्यांच्या बरोबर बसून, त्या महालिंगाला स्पर्श करून पूजा करण्याचा अधिकार अथवा मोकळिक तेथें असलेली पाहून मनाला मोठें कौतुक वाटलें. पुष्कळ सुधारक मित्रमंडळींची आठवण आली. श्रीस्थळ सांखळी ( गोमांतक ) किंवा नृसिंहवाडी इत्यादि स्थानांच्या उलट हा प्रकार! परंतु विचार करून पहातां दोन्हीही प्रकार खरेच आहेत. मूळ प्रतिष्ठा करतांना प्रतिष्ठा करणाऱ्यांचा जो संकल्प तोच अखेरपर्यंत चालावयाचा अथवा चालविला पाहिजे. त्या संकल्पास हरकत घेण्याचा अधिकार दुसऱ्या कोणास कसा पोंचेल? कांहीं ठिकाणीं विधि अथवा नियम पाळण्याच्या आग्रहाचा अतिरेक होतो, त्यास उपाय नाहीं; परंतु मुळाकडे दृष्टि देऊन, आपल्या मनाचें समाधान समंजस माणसांनीं मोडून घेऊं नये, असें माझें मत आहे. असो.

११ हिंदुस्थान ही दैवी चमत्कारांची खाण आहे. पृथ्वीवरील इतर देशांत बुद्धिकौशल्याची, भौतिक शास्त्राच्या प्रगतीची व शोधाची कमाल होत आहे; स्वाभाविक गोष्टींपेक्षां कांहीं विशेष प्रकार कोणत्याही बाबतींत दिसून आला कीं त्याची कार्यकारणमीमांसा लावण्याची, कारणांचा शोध करण्याची प्रवृत्ति तेथें अत्यंत आहे. परंतु आमचे हिंदी लोक असे कांहीं ज्ञानतृप्त आहेत कीं, त्यांना जणूं ज्ञातव्य किंवा कर्तव्य ह्मणून कांहीं उरलेंच नाहीं. " तुका ह्मणे उगी रहावें। जें जें होईल तें तें पहावें " या वचनाप्रमाणें अगदीं निर्विकार तटस्थ, साक्षिभूत होऊन ते राहातात! कोणीही आपल्या देशांत येवोत; कांहींही हिरावून नेवोत, आगगाड्या, तारायंत्रें यांसारखे चमत्कार करोत, आह्मी आपले ' आश्चर्यवत्पश्यति ' वृत्तीनें पहाणार! त्यांसारखे आपण कांहीं करावें, त्याची कार्यकारणमीमांसा लावावी अशी कल्पनाच आमच्या ठिकाणीं उत्पन्न होत नाहीं! भौतिक चमत्कार बुद्धीच्या अलीकडील टप्प्यांत असतात; परंतु दैवी चमत्कार हे बुद्धीच्या पलीकडील टप्प्यांत बसतात. वर लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थान ही दैवीचमत्कारांची खाण आहे परंतु आमच्यामध्यें शोधकबुद्धि अद्याप जागृत झाली नसल्यामुळें—बुद्धिरूप कुदळ आमच्या हातांत मिळाली नसल्यामुळें—त्या चमत्कारांच्या कारणांचा शोध लावून त्यापासून व्यवहारांत फायदा करून घेतां येत नाहीं; त्या खाणींतील तीं चिद्रत्नें हस्तगत करून घेतां येत नाहींत, हें देशाचें दुर्दैव होय. हिंदुस्थानची अभिमानी देवता ह्या बुद्धीची प्रेरणा हिंदी मनुष्यांमध्यें करो अशी मागणी मागून व माझ्या पहाण्यांत आलेल्या देवतासंचाराच्या एक दोन महत्त्वाच्या गोष्टी मुमुक्षूच्या वाचकांपुढें मांडण्याचें आश्वासन देऊन आजचा हा लेख पुरा करितों.

———

# मुरलीवाला.

श्रीकृष्णाचें वचनाप्रमाणें राधिका तद्दर्शनार्थ कुंजवनांत येते, परंतु एकमेकांची लवकर भेट होत नाहीं. अशा प्रकारें विरहावस्थेंत तळमळत असता दैवयोगें श्रीकृष्ण राधेस भेटतात, व आपल्या मुरलीनें तिला मोहून टाकितात.

कवि– 'गिरिजात्मज,' बडोदा.

( चाल०–नृपममता रामावरती० )

मम हृदया चोरुनि नेई ॥ हा कोण असे गे बाई ॥ सांग हें ॥
हृदयातें लावी चटका ॥ हे कोण मारिते हाका ॥ मजप्रती ॥
बावरी होउनी पाहे ॥ नाकळे कोण तो आहे ॥ साजणी ॥
नच दिसे, परी मम–कानीं ॥ घुमते ती मंजुळवाणी ॥ त्याचि गे ॥
( चा. ब. ) या वनीं ॥ जरी ना कुणी ॥ हृदय चोरुनी ॥
नेतसे खास ॥ कां मजला झाला भास ! ॥ व्यर्थ हा ॥ १ ॥
" तुज कुंजवनीं भेटेन " ॥ गेला तो देउन वचन ॥ हें मला ॥
हें वंचन कीं हें वचन ॥ मोहितो मला हा कोण ॥ नाकळे ॥
वेणूच्या मंजुळ–नादें ॥ डोलवी मला जो मोदें ॥ कोण तो ॥
हृच्चोर असा हा कोण ॥ आणिलें मला भुलवून ॥ या स्थलीं ॥
( चा. ब. ) आनंद ॥ सुखाचा–कंद ॥ यशोदानंद ॥
हृदय–विहारी ॥ भेटेल कधीं गिरिधारी ॥ मजप्रती ॥ २ ॥
सांवळी ठेंगणी मूर्ती ॥ शोभते नभासम कांती ॥ नील ती ॥
मृदुकोमलरम्य कपोलीं ॥ हांसऱ्या उषेची लाली ॥ विलसते ॥
चोरुनी हळू तो पाही ॥ त्या वाटे राधा नाहीं ॥ या वनीं ॥
आतां मज श्रीहरी दिसला ॥ सांपडला मुरलीवाला ॥ मजप्रती ॥
( चा. ब. ) मागुनी ॥ हळूं जाउनी ॥ करा पसरुनी ॥
नयन मिटवावें ॥ लीलारत क्षणभर व्हावें ॥ वाटतें ॥ ३ ॥

* * * *

बावरा होइं वनमाली ॥ राधिका कुठें ती गेली ॥ ना कळे ॥
दशदिशीं बघतसे तिजला ॥ बन्सीधर दुःखित झाला ॥ मानसीं ॥
पुसतसे वृक्षवल्लींनां ॥ राधिका कुठें दावा ना ! ॥ कुणितरी ॥
राधा मम प्राणविसावा ॥ लपविला कुणी कां दावा ! ॥ सत्वरी ॥
( चा. ब. ) हृदयांत ॥ राधिकामूर्त ॥ चेतवी प्रीत ॥
चित्त–चकोरी ॥ तिजविणें शून्य मज सारी ॥ अवनि ही ॥ ४ ॥
पुष्कर्णीसन्निध आला ॥ मुखचंद्र तयाला दिसला ॥ त्या जलीं ॥
वृक्षांच्या जाळींतून ॥ पाहे ती डोकावून ॥ मागुनी ॥
ते जलीं देखिलें दृश्य ॥ पाहुनी हंसे हृशिकेष ॥ तेधवां ॥
तरु–लता–जलद भेदीत ॥ राधा–शशि उदया येत ॥ तधवां ॥
( चा. ब. ) सत्वरी ॥ पळे श्रीहरी ॥ राधिका धरी ॥
आडवी मार्ग ॥ जातसे कुठें तूं वद गे ॥ मजप्रती ॥ ५ ॥

* * * *

लाजली जरा मग बोले ॥ तुज रमवाया मीं केले ॥ खेळ हे ॥
तुजला मी सोडुनि राया ॥ पदनत मी कोणा ठायां ॥ होइन ? ॥
सत्वरी भेट मज दे तूं ॥ हा पुरव मनीचा हेतू ॥ माधवा ॥
मुरलीच्या मंजुळ–नादें ॥ ही डुलव राधिका मोदें ॥ एकदां ॥
( चा. ब. ) मोहुनि– ॥ टाक तूं झणी ॥ फेक मोहनी ॥
अतां वनमाली ॥ श्रवणातुर राधा झाली ॥ माधवा ॥ ६ ॥
तो भक्तिसुधें भरलेला ॥ प्रेमाचा सुंदर पेला ॥ घेउं दे ॥
वेणुच्या दिव्यमय–नादीं ॥ मज झुलव कन्हैय्या आधीं ॥ एकदां ॥
जीवाचा काढुनि सूर ॥ हत्तारेचा झंकार ॥ होतसे ॥
हें " मी-पण " जळुनी जाई ॥ बासरींत मन्मन होई ॥ उन्मन ॥
( चा. ब. ) अद्वैत– ॥ जाहलें चित्त ॥ सदा हें शांत ॥
राधिका रमली ॥ मुरलींत राधिका मुरली ॥ तेधवा ॥ ७ ॥
एकी या जीव–शिवाची ॥ जाहली कुणा देहाची ॥ काळजी ॥
सप्तसूर सगळे देख ॥ मुरलीच्या नादीं एक ॥ जाहले ॥
" तत्वमसि–" वृत्ती बनली ॥ राधिका कुठें मग उरली ? ॥माधवा॥
राधिका–कृष्ण हे एक ॥ एकाच हृदयिं या देख ॥ राहती ॥
( चा. ब. ) गुंगली ॥ जगां विसरली ॥ वृत्ति रंगली ॥
तन्मय झाली ॥ मुरलींत राधिका मुरली ॥ तेधवां ॥ ८ ॥

---

ॐ तत्सत्

# संध्येची परिभाषा व संध्येचा काल.

( लेखक—'आनंदघन राम', तासगांव. )

१ सृष्टशास्त्राप्रमाणें संध्या या नित्यकर्तव्याचा तपास केला तर—

(१) **स्वानुभव** हें 'प्रमाण' आहे;

(२) **आत्मा** ही सर्वाद्य 'देवता' आहे;

(३) **मानस** ही 'शक्ति' आहे;

(४) **आत्मसामर्थ्यजागृती** हा 'हेतु' किंवा 'संकल्प' आहे; यासाठींच—

(५) **संध्या** हें 'नित्यकर्तव्य' आहे;

(६) **ईश्वरी शक्तीशीं योग करण्याची इच्छा** व त्यासाठीं **शुद्धता राखण्याची तयारी** हा 'अधिकार' आहे;

(७) **अंतःशुद्धता** हें तिचें 'शरीर' आहे;

(८) **अंतःस्वस्थता** हें तिचें 'हृदय' आहे; या भूमिकेवर—

(९) **सर्वव्यापक सूर्यस्वरूपांत सच्चिदानंद परमेश्वराचें सम्यक् चिंतन** हें 'ध्यान' आहे; या कार्यासाठीं—

(१०) **संस्कृत किंवा प्राकृत जो वाक्यउच्चार** करूं तो 'मंत्र'च आहे;

(११) **या शारीरिक व मानसिक उन्नतावस्थेचा अनुभव घेणारा** हा त्या कालीं 'ब्राह्मण'च आहे; याप्रमाणें—

(१२) **शारीरिक व मानसिक उन्नतावस्थेला पोचण्याचें सामर्थ्य मिळविण्याचें** जें नित्य कार्य तीं 'संध्या' होय;

(१३) या **नित्यकार्याचें स्मृतिजागृतीकर सूत्रचिन्ह** तें 'यज्ञोपवीत' होय;

(१४) **प्रणवाचा स्पष्टार्थ** हा 'महामंत्र' आहे;

(१५) ब्रह्म ही त्याची 'व्याप्ति' आहे;

(१६) **तेज** हें त्याचें 'स्थूलदर्शन' आहे; या सर्व ज्ञानालाच '**सावित्री**' म्हणतात. अशी ही या सृष्टशास्त्रोक्त संध्येची 'परिभाषा' आहे.

२ सृष्टीनें उत्पन्न केलेल्या नियमांनींच सर्व सृष्टीवर ताबा चालवून तिचे मालक होण्यासाठीं संध्या या नित्यकर्तव्यानें सामर्थ्याचा जो नित्य थोडा थोडा सांठा करावयाचा, तो करण्यास **सृष्टीच्या सामर्थ्यदान वेळेचाच आश्रय** केला पाहिजे.

(१) दिवसाच्या शरीरसंरक्षणवृद्धिकार्याला उपकारक अशी साधन सामुग्री प्राप्त करून घेण्यासाठीं ज्या वेळीं सृष्टिदेवी शारीरिक व

मानसिक दृष्टसामर्थ्य सर्वांना मुबलक वांटीत सुटते, त्या प्रभातकाळींच तो सामर्थ्यसंचय करण्याचें संध्यारूपी नित्य कर्तव्य केलें पाहिजे. आणि—

( २ ) देहबंधनरूप परतंत्रतेमुळें न करितां येणाऱ्या व या सृष्टींतील संगतन्यायाच्या ( Law of causation ) कायद्यामुळें न घडवितां येणाऱ्या अदृष्ट सामर्थ्याच्या गोष्टी करण्यासाठीं सर्वांना मानसिक व योगिक सामर्थ्य मुबलक मिळावें म्हणून सृष्टिदेवी ज्या सायंकाळच्या वेळीं तें वांटीत असतें, त्या **संध्याकाळीं** संध्या करून ते मिळविण्याची ' मुख्य वेळ ' आहे. ' संध्या ' ह्म० भगवान् यस्यां वेलायां ' सम्यक् ध्यायते ' सा संध्या. भगवंताचें योग्य ध्यान ज्या वेळीं होते तो संध्याकाळ होय.

( ३ ) सृष्टिदेवीनेंच या वेळा सर्वांना ठरवून दिल्या आहेत. पशुपक्षी व उद्भिजें या वेळांचा उपयोग करून घेत आहेत. या वेळींच जर आपण त्या त्या सामर्थ्याचा संग्रह केला तर तें विपुल मिळून इच्छेप्रमाणें त्याचा भरपूर उपयोग करितां येतो. रात्र संपून सूर्योदय होण्याच्या संधीला, सूर्योदय होण्यापूर्वींच पशुपक्षी जागृत होऊन उठून दिवसाच्या आपल्या व्यक्तींच्या नित्याच्या प्राणसंरक्षणासाठीं सामुग्री मिळविण्यास लागणारें व कुटुंबपोषण सामुग्री मिळविण्यास लागणारें शारीरिक व मानसिक सामर्थ्य, उल्हास व आनंद सृष्टिदेवीच्या या अमृतवर्षाव वेळेच्या समृद्धींतून घेत असतात, व त्याच नित्यकर्तव्याच्या जोरावर नित्यकार्य साधीत दिवसभर श्रम करून **निरोगी, सशक्त व सुखी** रहात असतात. परंतु बुद्धिमान् म्हणवून घेणारा मनुष्य प्राणी मात्र या वेळीं तें सामर्थ्य मिळविण्याचें संध्यारूपी कार्य न करितां झोंपेंत घोरत पडलेला असतो ! मनुष्याचें खरें कर्तव्य म्हटलें तर सृष्टीनें दिवस आणि रात्र व त्याजबरोबर जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था कोणकोणत्या कार्यासाठीं व कां दिलेल्या आहेत, त्या प्रत्येकींतील कर्तव्यकर्में कोणचीं, ह्या प्रत्येक अवस्थेंत मानसाधिकार कसा वाढत असतो, ह्या अवस्थेंतील तो आपला सामर्थ्यपूर्ण अधिकार बाह्य जगावर कसा चालवावा त्यायोगें बाह्य जगांत इच्छेनुरुप कार्य कसें निर्माण होतें व तें कां होतें या संबंधीं शास्त्रीय उपपत्तीसह अनुभवाचें ज्ञान करून घेणें हें त्याचें कर्तव्य नाहीं काय ? हें सर्व ज्ञान मानसिकशक्तिशास्त्रज्ञानावांचून प्राप्त होणार नाहीं. या मानसशक्तिशास्त्रांतील ' संध्या ' या नित्यकर्तव्यशाखेकडे लक्ष वेधावें व तिची माहिती घेण्याची जिज्ञासा उत्पन्न व्हावी, म्हणून या लेखाचा उपक्रम केला आहे.

---

# श्री तुलसीदासचरित्र.

बांदाप्रान्तीं राजा-पुरिं सरयूपारिं एक विप्र वसे।
आत्मारामदुवेदी पाराशर हें यदीय गोत्र असे ॥ १ ॥
चवदाशें पंचावन शाकिं वर्षतुंत अभुक्त मूलदिनीं।
आत्मारामसती दे अदर्शनीयाख्य बालकास जनी ॥ २ ॥
जन्मे दुष्ट कुयोगीं पारावर म्हणुनि बाळ तें जनकें।
ठेवविलें, चोखितसे मधु चिरटोळी सुखें हळू स्वमुखें ॥३॥
साक्षात्करुणा तेथें नृसिंहदासस्वरूपिं अवतरली।
पाहुनि सद्योदित शिशु-मुखेंदु तो इंदुकान्तशी द्रवली ॥४॥
अविलंबें उचलुनि घे त्या झट पटपट निजस्थलास निघे।
प्रेमें वाढवि वरदुधि तो तत्संस्कार सर्व करि सविधि ॥५॥
स्वतपस्यासिद्धीचें मूल सुफल हें तदीय पितरांस।
चोरा विधु जारा रवि तैसें कुमतें गमे अहित-रास ॥ ६ ॥
निज वांझपण फिटाया केले असतिल किती द्वयें नवस।
शिशुरूपिं देव पावे मूर्ख म्हणाति त्या स्वगेहिं परि न वस ॥ ७ ॥
देव्हारिं कामधेनु प्रगटे सत्पात्र सर्वथा जतिला।
मूर्ख न संग्राह्य गणीं बघुनी कीं अधिक एक थान तिला ॥ ८ ॥
एकोनशतक्रतुसहि दुर्लभ तें सहज लब्ध संतान।
टाकी त्या मूर्खाचें न म्हणे कोण न घडो निसंतान ॥ ९ ॥
प्रभुचा परमपवित्र प्रसाद सत्पुत्र पाप पदरिं पडे।
तरि पुण्याचरणाचे गिरवावे कां कुणी कठोर धडे ॥ १० ॥
अनुसंधान कथेचें-नृसिंहदासें कृतस्त्र हा बाळ।
साक्षर तथोपनीतहि केला प्रेमें मुदें यथाकाळ ॥ ११ ॥
निजरामनाम-आवड रामचरित्रामृतश्रवणसक्ती।
याच्या मृदु हृद्भूमित त्यानें रुजवून शिंपिल्या भक्ती ॥१२॥
ज्या जाइजुईवेली व्यापिति हिंदी धरागिरा सारी।
मृदु-मधु-सुगंध-सुमनीं सुमनें रिझती जयांचिया भारीं ॥ १३ ॥
कोणी सात्विक सज्जन पाठकनामा सुकन्यका-तात।
गुणरूपवती स्वसुता अर्पुन यातें करी स्वजामात ॥ १४ ॥
पुष्पवती ती युवती निजयौवनमदनबाणसुमगंधीं।
तुलसीदासभ्रमर प्रेममरंदीं मिलिंद करि फंदी ॥ १५ ॥

निजपति जपति सती ती राहे पतिसंगतींत नैकसमा ।
न स्मरतां न पहातां माता जनिता हिता स्वमित्र समा ॥ १६ ॥
एकटिला तिज लागे कंठावा दीर्घ काल सदनांत ।
माहेर त्यांत बिंबे तन्मानसिं मित्र जेविं सुदिनांत ॥ १७ ॥
पितरें पाठविलीं, परि पति परतवि नैकदां मुळें तीस ।
तत्पितरप्रेमा प्रति–पाळी अशि दे परंतु भरतीस ॥ १८ ॥
भगिनीला स्वगृहाला न्यायाला भाउ कैकदां आला ।
पतिनें न धाडिलें परि अविरल सहवास सौख्यदा तीला ॥ १९ ॥
शान्ततुं असों आपण विश्वास असा पुढें तिला पटला ।
भावासह ती गेली पति घरिं नचशा बघून संधीला ॥ २० ॥
मागें येउन पाहे पति तों स्वप्रेमपात्रहीन घर ।
अस्थिर मन हो त्याचें हुरहुर चित्तास चेतवी फार ॥ २१ ॥
वारंवार म्हणे मी मउ लोणी मेण तन्मना नीचें ।
निज कटुवाक्शीतानें केलें निस्नेह जेवि अशनीचें ॥ २२ ॥
नीचें तदुच्चरतिचें, कोमळ लुसलुसित नूत्न पागोरें ।
तोडुन प्रेमलता ती दुखवुनि केलें स्वसौख्यमातेरें ॥ २३ ॥
भलतेंसलतें कांहीं केलें नसलें तिनें पुरें म्हणजे ।
ऐसें मनीं ह्मणत तो पुसे तयां जवळ राहते गण जे ॥ २४ ॥
तेंव्हां भावासह ती गेली नुकतीच हो जनकगेहा ।
ऐसें कळतांक्षणिं मग लगबग गेला तिच्याच मागें हा ॥ २५ ॥
पुरती न भेटली ती निजपितरांहीं कुटून मग इतरां ॥
तों हा आला पाहुन श्याल म्हणे नर न हा परी कुतरा ॥२६॥
सुतरां इजला नाहीं आज घरा धाडणार मी याच्या ।
यांचा वृथा जहाल्या. लागे धरणें पथा लुटायाच्या ॥ २७ ॥
हा रामभक्त न खरा नखरा तो रामभक्तिचा आज ।
काळा पडला रामासक्तितपें यास देवता भाज ॥ २८ ॥
तुलशीदाससतीही किंचित्क्रोधें विनोदसह रागें ।
उपरोधेंही बोधक वदे असें वच बघे कृपापांगें ॥२९॥
कीं जैसी प्रीति तुह्मां मम या मृदुमांसमूर्तिवर आहे ॥
ऐसीच प्रीति जरी तुमची कधिं रामचंद्रजी लाहे ॥ ३० ॥
तरि काय गोष्ट होती उत्तम जी शारदा न वर्णुं शके
कीं रामचंद्रिं जें तें दुर्लभ सौंदर्य विश्वि या असिकें ॥ ३१ ॥
होतें प्रसंग पाहत पूर्वप्राक्तन निज प्रभावास ।

पूर्णपणें प्रगटविण्या पावे तो त्या असा अनायास ॥ ३२ ॥
परिपूर्णप्रेमपद प्रियंवद स्त्रीमुखेंदु वदतांना ।
तानातानांत असा तुलसी वैराग्यसिंधु घेतांना ॥ ३३ ॥
वैराग्यार्णवलहरीं वरुनी वाराणशींत तो गेला ।
पुनरपि घरा न आला संसारीं तृर्ण पूर्ण रागेला ॥ ३४ ॥
तेथें केवळ ईशाराधनतत्पर अहर्निशीं राहे ।
स्वप्नींहि न ऐहिकसुखसाधनकरवस्तुदर्शना लाहे ॥ ३५ ॥
श्रेयोमार्गज्ञाना स्त्रीवच हें मूलसूत्र हो त्याला ।
वैराग्यवन्हिकुंडीं कृतस्ववर्णोक्तकर्म होत्याला ॥ ३६ ॥
तुलसीदासें नेमें ब्राह्ममुहूर्तीं बहिर्दिशे जावें ।
लोटयामधि उरलें जल येतां बेलातळांत रेचावें ॥ ३७ ॥
एक दिनीं बघतां निज नियमाचरणा न उदक लोटयांत ।
म्हणुनी स्तब्ध उभा जों तुलसी त्या स्थानिं चूर चिन्तेंत ॥ ३८ ॥
बेलावरला उठला बोलत मुंजा तदा भले बोल ।
कीं " नित्योदकदानें तव मी संतुष्ट, आज हो न जल ॥ ३९ ॥
तो नच अपराध तुझा, माग हवें तें प्रसन्न मी आहें ।
शंका न मनीं वाहे ठेउनि विश्वास तत्फला वाहे " ॥ ४० ॥
" श्रीराम यास भेटिव कान्ताधनकनक यास कांहिं नको ।
किंबहुना इंद्रपदेंही नच हा तुष्ट होय तव धनको ॥ " ॥ ४१ ॥
स्ववचनऋणकोपाशीं तुलसीनें मागतां असाच वर ।
भूत म्हणे " हें देण्या बलि या योनींत कां कुजोंच, तर ॥ ४२ ॥
अस्तु ! तथापि तुला मी तवेष्टसिद्धीस बुद्धि सांगतसें ।
श्रीरामदर्शनाचा पुरवि तुझा काम जी अशीच असे ॥ ४३ ॥
येथील कर्णघाटीं चाले रामायणीय वाचन तें ।
कुष्ठी दरिद्रिवेषें ऐकाया होति मारुती येते ॥ ४४ ॥
त्यांचें दर्शन घ्यावें लोळावें तत्पदांवरी भावें ।
अभयप्रदान होतां रठुनी त्यां स्वेष्ट उघड कळवावें " ॥ ४५ ॥
प्रेतगिराही यमुना, गंगा भार्योक्ति, फल्गु तुलसीच्छा ।
यांचा त्रिवेणिसंगम ब्रह्मानंदानुभूति करि तुच्छा ॥ ४६ ॥
त्या या त्रिवेणिसंगमिं तुलसी बुडि दे क्षणैक हो स्तब्ध ।
मुंजा अंतर्हित हो तुलसीला शुद्धि हो यदा लब्ध ॥ ४७ ॥

प्रेतोक्तपथें तुलसीदासा श्रीरामदास दर्शन हो ।
षण्मासजपें सिद्धिद शिवमंत्राचा तिथून या लाहो ॥ ४८ ॥
स्थान जपा नेमियलें मारुतिनीं चित्रकूटगिरिशिर तें ।
सीतारामसलक्ष्मण आरण्यीं होति जेथुनीं शिरते ॥ ४९ ॥
करुनी कुटीस राहे चित्रकुटीं जप करी मनोभावें ।
रामारामप्रेमीं समरस होऊन जाय निजभावें ॥ ५० ॥
अविरल अतंद्र जागरिं शिवनामस्मरण चालवी तुलसी ।
कुळशीलवती वृंदा कृष्णाशीं रमुनि हो जशी तुळशी ॥ ५१ ॥
तैशीच वृत्ति याची रात्रंदिन रातली निजोपास्यीं ।
सिद्धि न रमावि कैशी ऐशा प्रेमळ सुनिश्चितीं दास्यीं ॥ ५२ ॥
षण्मासपूर्तिपूर्वींच एक दिनीं काय हा चमत्कार ।
ऐकावा श्रीरामा वाचकिं करुनी मनीं नमस्कार ॥ ५३ ॥
एक दिनीं प्रहरिं तिज्या सहजीं गिरिकंदरांत फिरतांना ।
अश्वद्वयीं धन्वीद्वय फिरे मृगावरि करीत संधाना ॥ ५४ ॥
तुलसी प्रकार पाहे परि पारधि हे गणीच सामान्य ।
शंका हि न त्या कीं हें दासा तदुपास्य ये करूं धन्य ॥ ५५ ॥
प्राग्वर्षारंभींच्या विद्युल्लेखासमान देखावा ।
दिसला त्रिपंच वेळां घटयर्धिपुढें मिळेच सदभावा ॥ ५६ ॥
मागुतिं मारुति होती तुलसीच्या चर्मचक्षुसहि दिसते ।
" श्रीराम पाहिलेना " प्रश्न असा तुलसिला विचारिति ते ॥ ५७ ॥
प्रत्यक्ष मारुतीच्या प्रश्नें समजून चूक अनुताप ।
झाला तुलसीदासा म्हणे ' खरोखर अतींव मी पाप ' ॥ ५८ ॥
हनुमत्पदपद्मदलीं जडला तुलसी हटें जसा भृंग ।
त्यांनीं वांकुनि त्यातें वात्सल्यें परि दिला निजोत्संग ॥ ५९ ॥
हनुमत्कृपा जहाल्या श्रीरामकृपा न होय कोठवर ।
दाता धनीच होतां धना न माघार घेउं येणार ॥ ६० ॥
श्रीराम मारुतीचें निजधन ते तें कुणाहि देउं बळी ।
सामान्य धनें दानें संपतिं कीं यास वाढती उबळी ॥ ६१ ॥
ह्मणुनी धनी न याचें कृपण कदाही उदार परि दाते ।
होति प्रसन्न ज्यातें दुसरी निजमूर्ति करिति पळिं त्यातें ॥ ६२ ॥
श्रीरामाचा निजसम भक्तोत्तम ज्या अनन्य बनवीलें ।
या जनिं अंजनिपुत्रें श्रीदर्शन मग तयास करवीलें ॥ ६३ ॥

हें तुलसीचरित्रार्थ । तुळसीदल अर्पिलें ॥
श्रीरामचरणीं भावें । मुमुक्षू जेथ लोभले ॥ १ ॥
रामचंद्रानु घे जन्म । मुमुक्षूत्तम लक्ष्मण ॥
तत्पदा नतिसाहस्त्री । नारायण समर्पितों ॥ २ ॥
श्रीकृष्ण विश्वजनक । हा विश्वांतीलची कण ॥
स्वभावें कृष्णपुत्रत्व । सत्कृपें मग सार्थ हो ॥ ३ ॥
कौशिक गोत्री कृष्णात्मज नारायण लिही स्वमोदार्थ ॥
तें स्वमहाराष्ट्रगिरा बंधूंच्या प्रेषि कालहरणार्थ ॥ १ ॥

वाई, मधली आळी ३२६, } नारायण कृष्ण गद्रे.
ज्येष्ठ शुक्र १४ गुरुवार १८४८ शा.

---

# औदार्य कोणाचें ? देवाचें कां भक्ताचें ?

एका शिवभक्तानें शंकराची प्रार्थना करितांना म्हटलें आहे: "बा शंकरा, तुझी संकटावस्था पाहून मला तुझी फार कींव येते. हें पहा. तूं हिमाचलपर्वतावर निरंतर राहतोस, हिमाचलकन्या तुझी अर्धांगी व तुझ्या मस्तकावर गंगा. तर याप्रमाणें त्रिविध हिमानें (थंडीनें) तूं कांकडलेला आहेस. घर हिमाचें, बायको हिमाची व मस्तकावर हिम असा तूं त्रिविध हिमानें कुडकुडत आहेस हें पाहून मला तुझी दया आली. मी यावर तुला एक तोडगा सुचवितों, पहा बुवा ! त्याप्रमाणें चागलास तर यांत तुझेंच हित आहे ! हें पहा ! माझ्या हृदयांत तीन शेगडया अगदीं धगधगीत पेटल्या आहेत. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशा त्रिविधतापाच्या तीन शेगडया अखंड पेटल्या आहेत. तुला थंडी जावी असें वाटत असेल तर तूं माझ्या हृदयांत येऊन रहा ! अशी उबाऱ्याची जागा तुला दुसरीकडे मिळायची नाहीं. थंडी जावी असें तुला वाटत असेल तर मी उदारपणें तुला माझ्या तीन शेगडयांपाशीं बसूं द्यायला तयार आहे. माझें कांहींच म्हणणें नाहीं. माझ्या हिताची गोष्ट मी काढीत नाहीं, तुझ्याच कल्याणाची मसलत तुला फुकट देत आहे !"

ही सुंदर कल्पना अप्पया दीक्षितांची आहे. या वेळीं श्लोक आम्हांला आठवत नाहीं.

---

# मुमुक्षूंतील निवडक निबंध.

मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १०।१२ वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे दोन भाग जवळ असले म्हणजे १२ वर्षांच्या ' मुमुक्षू ' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. हें जाणून महाराष्ट्रीयांनीं हे भाग विकत घेऊन स्वतः स्त्रीपुत्रां-सह हे नियमानें वाचावे म्हणजे धर्मशिक्षणाचा प्रश्न अनायासें सुटणार आहे. प्रत्येक भागाची किंमत दीड रुपया. व्ही. पी. टपालखर्च वेगळा पडेल. पण दोन्ही भाग एकदम मागविणारांस तूर्त ट. ख. माफ. पुस्त-कांचें स्वरूप पुढील विषयानुक्रमणिकेवरून ध्यानीं येईल.

**भाग पहिलाः**— १ मंगलाचरण. २ मुमुक्षु. ३ ईश्वरविषयकसंवाद—लेखांक १।२।३. ४ मूर्तिपूजा, ले. १।२।३. ५ आत्मतृप्तीचे ढेकर. ६ घंटाना-दाची उपपत्ति. ७ पाडव्याची राष्ट्रीयप्रार्थना. ८ रामप्रार्थना. ९ श्रीरामजन्म महोत्सव. ले. १ ते ४. १० श्रीकृष्णावताराची माधुरी. ११ पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ. १२ होळीची मीमांसा. १३ भक्तिमीमांसा. १४ भारतवीर १५ श्रद्धा. १६ वेदांताचा व्यवहारांत उपयोग. १७ व्यसनांतून सुटावें कसें ? १८ संक्रांतीचा हलवा. १९ श्रीशिवलिंगाचें रहस्य २० हिंदुधर्म. २१ निंदकांचे उप-कार. २२ हिंदुधर्माची योग्यता. २३ भिक्षूची गोष्ट. २४ सत्संगाची आवड. २५ आमचे पुढारी संतच. २६ प्रेमामृतमाधुरी. २७ डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म. २८ मूर्तिपूजेची महती.

**भाग दुसराः**—१ आईचा पराक्रम. २ एक गांवढळ तत्वज्ञ. ३ एका गाणेशाची भेट. ४ मामामामींचा संसार. ५ सती आवडाबाई. ६ योग्याची भेट. ७ सतीचें आत्मतेज. ८ श्रीगौरांगशिक्षामृतम्. ९ ' कुतऱ्या थमाल्ले थमाल आपुल्या गाई.' १० शेतकऱ्याची गोष्ट. ११ सुखाची दिवाळी. १२ धर्माकडे केव्हां वळणार वळणार ? १३ साधुकथा. १४ पतिपत्नीसंबंध. १५ गोपाळराव आगर-कर. १६ नामदार गोखले. १७ सर्वराष्ट्रीय प्रार्थना. १८ भागवतधर्माचें मंदिर १९ मातृभाषेचें प्रेम. २० दयेचे प्रकार. २१ वेदांताचीं चार मतें. २२ सर्वांघटीं राम. २३ वाङ्मयतप. २४ अश्वत्थ ऊर्फ संसारवृक्ष. २५ संतमहात्मे. २६ सत्संग आणि व्यवहार. २७ निंदकाचे उपकार. २८ ईश्वरप्रार्थनेची सिद्धता. २९ गीतारहस्य. ३० काळाचा काळ. ३१ हरीशरणागति. ३२ नरसी मेह-त्याचीं दोन पदें. ३३ देवाची सेवा. ३४ बालविवाह आणि प्रौढ विवाह. ३६ बोध आणि विनोद. [ या सदराखालीं १९ स्फुटें आहेत. ]

पत्ता—**व्यवस्थापक मुमुक्षु; पुणें.**

सुप्रसिद्ध मराठी ग्रंथकार.

# कै० विनायक लक्ष्मण भावे

इ. स. १८७१–१९२६

( ले० सीताराम महादेव अभ्यंकर, बी. ए. एल् एल्. बी. ठाणें. )

१ कै० विनायक लक्ष्मण भावे ह्यांचा जन्म मुक्काम पळस्पें ता. पनवेल येथें आश्विन वद्य ९ शके १७९३ रोजीं त्यांचे वडिलोपार्जित घरीं झाला. त्यांचे कोकणांतील मूळ गांव श्रीवर्धन हें होय. त्यांचे पंजोबा रा. लक्ष्मणराव भावे हे मुक्काम पळस्पें येथें रहावयास आले असावे. त्यांच्या वडिलांचें नांव लक्ष्मण बल्लाळ उर्फ कोंडोपंत भावे व त्यांच्या मातुःश्रींचें नांव सरस्वतीबाई असें होतें. त्यांचे जन्मापूर्वीच ४।५ महिने त्यांचे वडिलांस ठाण्यास वकिलीची सनद मिळाली होती. सबब विनायकरावजी ८।९ महिन्यांचे असल्यापासूनच ठाण्याचे रहिवाशी झाले.त्यांचे वडील हे जुन्या पिढींतले मोठे नांवाजलेले वकील होते. त्यांचें चरित्रही होतकरूं व गरीब तरुणांस मोठें अनुकरणीय आहे. त्यांनीं वकिलीच्या धंद्यांत मोठा लौकिक व पुष्कळ पैसा संपादन केला. त्यांचा स्वभाव मोठा करारी असे, व तोच त्यांचे चिरंजीवांत म्हणजे आमच्या चरित्र-नायकांतही उतरला होता.

२ विनायकरावजीस मातृसुख फार दिवस लाभलें नाहीं. कारण त्यांच्या मातुःश्री ते सुमारें १०।११ वर्षांचें असतानांच निवर्तल्या. मातुःश्री लहानपणीं निवर्तल्यामुळें त्यांचें लहानपण साहजिकच लाडांत गेलें, व त्या लाडाचा परिणाम ह्मणजे विनायकराव स्वछंदी बनले व त्यांचें लहानपण उनाडण्यांत व खेळांतच गेलें. लहानपणीं पक्षी बाळगणें, त्यांस खेळावयास व बोलावयास शिकविणें, वगैरे गोष्टींत विनायकरावांचा फार वेळ जाई. फुलपाखरूं, पतंग, चतुर, रेशमाचे किडे वगैरे लहान लहान प्राणी बाळगून त्यांच्या संवयी, त्यांच्या आवडी, त्यांचें आयुष्य त्यांचा जीवनक्रम यांविषयीं, ते खातात काय, पितात कसें वगैरे बारीक सारीक गोष्टी शिकण्याचा छंद त्यांना लहानपणापासूनच लागला होता. कबुतरांचा नाद तर त्यांना अतिशयच होता. व सुमारें १०।१२ वर्षांपूर्वीं पर्यंत कबुतरांचा घोळका त्यांच्या घरीं असे ! मैना, बुलबुल, पोपट, ससे, कुत्रीं वगैरे प्राणी बाळगण्याचा त्यांना फार शोक होता. व ह्याप्रमाणें त्यांनीं हे बाळगलेले प्राणी पुष्कळांनीं पाहिलेले आहेत.

३ पांखरें पकडावीं कशीं, त्यांना वाढवावें कसें, त्यांना शिकवावें कसें या गोष्टींचा अभ्यास त्यांनीं लहानपणापासूनच्या खेळापासून करण्यास सुरवात केली होती व ह्या सर्व अभ्यासाचें व परिश्रमाचें फळ म्हणजे त्यांनीं पांखरांवरील लिहिलेले लहान लहान निबंध हे होत. हे लेख अप्रकाशित असून त्यांचे चिरंजीव छापून प्रसिद्ध करितील त्या वेळीं त्यांचा रसास्वाद सर्वांस चाखावयास मिळेल.

४ विनायकरावजींची मुंज त्यांचे वयाचे ८ वे वर्षीं झाली व त्यानंतर त्यांचा मराठी शाळेंत प्रवेश झाला. शाळेंतील अभ्यासाकडे त्यांचें कधींच लक्ष नसे ! एक तर ते वडिलांचे फार लाडके होते व दुसरें कारण म्हणजे त्यांची अतिशय वाईट शरीरप्रकृती. ते लहानपणीं अगदीं अशक्त होते. त्यामुळें त्यांचेवर शिक्षणाचा फारसा बोजा लादला जात नसे. मराठी शाळेंत ३ । ४ वर्षे काढल्यावर त्यांनीं शाळेस रामराम ठोकला व पुढें ते हायस्कुलांत एकदम ४ थे इयत्तेंत प्रविष्ट झाले.

५ इंग्रजी शाळेंतही त्यांचें लक्ष अभ्यासाकडे नसे. वर्गांत त्यांचा नंबर शेवटींच असावयाचा ! त्यांचे वेळीं ठाणा हायस्कूलमध्यें पुण्याचे कै. शंकरराव भागवत हे त्यांचे कांहीं दिवस मास्तर होते. त्यांना वाटे हा मोठ्या वकिलाचा मुलगा, त्यानें अभ्यास करावा, उनाडपणा करूं नये. सबब ते शिस्त लावण्याकरितां विनायकरावजीस फार कडक रीतीनें वागवीत व वेळीं जबर शिक्षाही करीत; परंतु रा. विनायकरावांनीं आपल्या वर्गांतल्या अभ्यासाकडे असें कधींच मन लावलें नाहीं. त्यांचे आपले निराळेच उद्योग चालत. आज काय परसिकच्या डोंगरावर जा, उद्यां काय पोखरणीवर जा, तर तिसरे दिवशीं आणखी कोणीकडे तरी स्वारी जावयाची. असे फिरावयास गेले असतांना ते कधीं घरीं रिकामे यावयाचे नाहींत, कांहीं तरी नवीन पांखरूं किंवा एखाद्या पांखराचें अद्भुत असें वाटणारें घरटें वगैरे कांहीं तरी नवीन चीज पैदा करून आणावयाचेच. लहानपणीं त्यांना लोखंडाची गाडी (Ring) घेऊन फिरण्याचा नाद असे. ते ज्या ठिकाणीं फिरावयास जातील तिकडे तिकडे त्यांचें हें चक्र त्यांचे बरोबर असावयाचेंच !

६ शाळेंत असतांना जरी विनायकराव अभ्यासाकडे असें फारसें लक्ष देत नसत तरी त्यांना वाचनाची फार गोडी लागली होती, ती इतकी कीं घरीं ते तासचे तास वाचनांत गुंग असत. शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या नवनीतांतील कविता वाचण्याचा नाद त्यांस फार असे. त्याचप्रमाणें त्यावेळची ५ वी व ६ वी चीं क्रमिक पुस्तकें व त्यांतील कविता त्यांस फार आवडत. त्यांचे लहानपणीं ठाण्यास अरुणोदय, जगत्समाचार, हिंदुपंच वगैरे दोन तीन वर्तमानपत्रें निघत व त्यांतील बातमीपत्रें व विविध विषयांवर आलेली चर्चाही

ते वाचीत व त्यांत त्यांचें मन रमे. रा. भावे यांचा स्वभाव लहानपणापासून विनोदी व थट्टेखोर होता त्यामुळें हिंदुपंचांतील ते हास्यरसोत्पादक व दुसऱ्यांच्या कुचेष्टेनें भरलेले लेख त्यांस फारच आवडत. त्यावेळचे हिंदुपंचाचें मालक कोणी दावक या नांवाचे गृहस्थ होते त्यांची ओळख झाली व त्यामुळें ते हिंदुपंच ऑफिसमध्यें जाऊन बसत व तेथें येणारीं निरनिराळीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें ते तासचे तास वाचीत बसत व पुढें पुढें ते त्यांत लेखही लिहूं लागले. अशा रीतीनें त्यांस मराठीची गोडी लागली.

७ विनायकरावजीस सुदैवानें फारच चांगले हेडमास्तर मिळाले होते. कै० जनार्दन बाळाजी मोडक यांचें चरित्र मोठें अनुकरणीय होतें व तें इतरत्र वेगळें प्रसिद्धही आहे. ते सच्छील, उद्योगी व विद्याव्यासंगी असत. त्यांना प्राचीन कावे व कविता यांचा फार नाद असे हें त्यांनीं चालविलेल्या ' काव्येतिहास संग्रहा ' वरून व ' काव्यसंग्रहा ' वरून सहज कळून येण्यासारखें आहे. अशा गुरूस विनायकरावासारखा नादी शिष्य मिळाला व त्यानें गुरूजींचें आवडतें काम हातीं घेतलें. ते काव्यसंग्रहांतील जुन्या कविता वाचूं लागले व त्यामुळें त्यांस मराठी काव्यें वाचण्याची गोडी लागून व त्यामुळें साहजीक शाळेंतील अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन ३।४ वर्षांत संपणारा हायस्कूलांतील अभ्यासक्रम विण्यास विनायकरावजीस ७।८ वर्षें लागलीं. हायस्कूलमध्यें असल्यापासूनच मराठी कवींच्या काव्याबद्दल व त्यांच्या चरित्राबद्दल ते बारीक बारीक निबंध लिहूं लागले होते व अशा रीतीनें त्यांचा मराठी वाङ्मयावरील व्यासंग वाढत वाढत गेला.

८ ज्याप्रमाणें त्यांस मराठी कवि व काव्यें ह्याबद्दल प्रेम व आवड होतीं त्याचप्रमाणें त्यांस मराठी इतिहासही आवडूं लागला होता व त्यासंबंधीं ते पुस्तकें वाचीत असत व अगदीं लहानपणीं त्यांनीं लिहिलेलें श्रीशिवाजी महाराजांचें चरित्र त्यांचे दप्तरीं आम्हीं पाहिलेलें आहे. मराठी भाषेवरील त्यांचा व्यासंग ते शाळेंत असतांनाच ठाण्यांतील शिष्टमंडळीस अवगत होऊन तो त्यास फार प्रिय झाला होता. ले. डॉ. कीर्तीकर यांचें मन विनायकरावजींच्या बारीक बारीक निबंधांनीं आकर्षून घेतलें व त्यामुळें त्यांचा आणि विनायकरावांचा स्नेह जडला व तो आजन्म राहिला.

९ ते हायस्कूलमध्यें असतांना ठाण्याचे तुरुंगाचे मि. वेलिन नांवाचे एक युरोपियन अधिकारी होते व त्यांना ३।४ मुलगे होते. त्यांतील समवयस्क मुलांबरोबर विनायकरावांची ओळख झाली व ही बहुतकरून पांखरें पकडणें व कबुतरें खाडीवर उडविणें ह्या प्रकारच्या खेळाडूपणामुळेंच झाली असली पाहिजे. या आंग्ल युवकांच्या संगतीचा असा परिणाम झाला कीं विनायकरावजीस इंग्रजी

वाङ्मयाची असलेली अभिरुचि जास्त वाढत गेली व त्यांना इंग्रजी ग्रंथ वाचण्याची गोडी लागली. आपल्या इकडले कवि वाचतां वाचतां त्यांनीं मिल्टन्, शेक्सपिअर, थ्याकेरे, ॲडिसन, पोप, मेकॉले वगैरे जे जे आंग्ल ग्रंथकार त्यांना त्यांच्या या नूतन परिचित मित्रांचे पुस्तकालयांत सांपडले त्यांचा त्यांचा त्यांनीं रसास्वाद घेऊन इंग्रजी भाषेवरही चांगलें प्रभुत्व संपादन केलें. ते इंग्रजी बोलण्यांत तर इतके पटाईत झाले होते कीं मॅट्रीकची परीक्षा पास होऊन वुइल्सन कॉलेजमध्यें गेले तेव्हां तेथील प्रोफेसर मंडळीस त्यांचें तें बोलणें ऐकून कौतुक वाटे. या आंग्ल मित्रांच्या परिचयानें जसा त्यांना खेळण्यांत व हूडपणांत उपयोग झाला त्याचप्रमाणें ज्ञानार्जनाचें कामीं त्यांना अप्रत्यक्ष रीतीनें फायदा झाला. त्यांच्या संगतींत बरेच दिवस काढल्यामुळें युरोपिअन लोकांच्या चालीरीती काय, ते वागतात कसे, बोलतात कसे वगैरे गोष्टींत विनायकराव अगदीं तरबेज झाले. त्याचप्रमाणें पुढें त्यांच्या धंद्यांत सुध्दां मोठमोठ्या युरोपिअन अंमलदारांस ते आपल्या मिष्ठास वाणीनें व शैलीनें गार करीत व अचुक आपणांस काय हुकूम हवा असेल तो ते घेऊन येत असत. असो.

१० विनायकरावजी सन १८९१ सालीं मॅट्रिकची परीक्षा पास झाले व त्यांनीं मुंबईच्या वुइल्सन् कॉलेजमध्यें प्रवेश केला. त्यांच्या सहाध्यायांमध्यें कायस्थ मंडळींचाच विशेष भरणा होता. कै. बाबा दोंदे, शंकर नारायण खारकर; शंकरराव खारकर, सिन्नरचे वकील रा. गोविंदराव प्रधान, मुंबईचे स्मालकॉज कोर्टचे जज्ज रा. आत्मारामपंत चित्रे, वगैरे मित्र त्यांचे ठाण्यापासूनच परिचयाचे होते. कॉलेजमधील नवीन मित्र म्हणजे रा. वसंत सखाराम राऊत, डिक्शनरीकर्ते कै. निळकंठ बाबाजी रानडे, सॉलिसीटर ठक्कर वगैरे होत. कॉलेजमधील वसतिगृहामधील विनायकरावांची खोली म्हणजे लहानसा क्लबच होता. त्यांचे खोलींत ठाणेकर मंडळी व नवीन परिचित स्नेही मंडळी यांनीं वर्ग सुटल्यावर जमावें, गप्पागोष्टी कराव्यात, निरनिराळ्या विषयांवर चर्चा करावी वगैरे गोष्टी घडत. विनायकरावांचे वर्गांतील अभ्यासाकडे जरी फारसें लक्ष नसे, तरी त्यांस विद्याव्यासंगाची गोडी ह्यापूर्वीच लागली होती. मॅट्रिकच्या परीक्षेंत त्यांची दुसरी भाषा जरी परशियन होती तरी कॉलेजमध्यें गेल्यावर संस्कृत भाषेचें अध्यापक कै. प्रो. हरिभाऊ भडकमकर यांचेवर त्यांची फार निष्ठा बसली व या गुरुशिष्यांचें नातें पुढें फारच दृढ झालें. प्रो. भडकमकरांविषयीं त्यांना फारच आदर वाटत असे व ते वारंवार त्यांचें घरीं जात असत व त्यांचे साधेपणाविषयीं व अति स्वच्छील राहणीविषयीं ते आपल्या सहाध्यायांस अनेक गोष्टी सांगत व शेवटपर्यंत ते त्यांच्या भलेपणाविषयीं पूज्य बुद्धीनें उद्गार काढीत असत. मिशनरी लोकांविषयीं त्यांचें

फारसें चांगलें मत नसे तरीपण त्यांचे त्यावेळचे प्रिन्सिपाल डॉ. मॅकिकन् यांच्या विद्वत्तेविषयीं व सर्वसाधारण बुद्धिमत्तेविषयीं त्यांना फार आदर वाटे. विनायकरावजींस महाराष्ट्रीय संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, ह्यांच्या ग्रंथांविषयीं व अभंगांविषयीं फार आवड व व्यासंग असल्यामुळें त्यांचें व गुरुवर्य डॉ. मॅकिकन् यांचें सख्य झालें व विशेषतः विनायकराव हे सायन्सचे विद्यार्थी असल्यामुळें या गुरुशिष्यांचें नातें उत्तरोत्तर वाढत गेलें व विनायकरावजींचा कॉलेजमधील अभ्यासक्रम संपल्यावर इतर विद्यार्थ्यांप्रमाणें या दोघांचा स्नेहसंबंध न सुटतां अव्याहत राहिला व पत्रव्यवहारहि चालत असे असें ते सांगत.

११ विनायकरावांचा स्वभाव नादी असे. त्यांना एखाद्या विषयाचा छंद लागला म्हणजे ते त्याची पाठ कधींही सोडीत नसत व हें त्यांच्या सर्व लेखांवरून स्पष्टपणें दिसणारें आहे. त्यांचे म्हणण्यांत असें येई कीं, त्यांच्या सर्व विद्यार्थीदशेंत त्यांच्या मनाजोगें असे फक्त दोनच गुरुजी त्यांना लाभले. ते म्हणत 'मजसारख्या नादी व छंदी मुलास आपलासा करून घेऊन त्याच्याकडून काम करून घेण्याचा किंवा चांगल्या मार्गास लावण्याचा वकूब त्यांना लाभलेल्या शिक्षकांपैकीं दोघां शिवाय इतरांत त्यांस आढळून असला नाहीं. ते दोघे म्हणजे शाळेंत असतांना कै. जनार्दन बाळाजी मोडक व कॉलेजमध्यें असतांना प्रो. डॉ. अलेक्झांडर हे होत. वाचनाचा व काव्यव्यासंगाचा नाद त्यांस कसा लागला हें आम्हांस अजूनपर्यंत खात्रीलायक असें समजलें नाहीं. परंतु मधून मधून त्यांच्या बोलण्यावरून व त्यांचे कांहीं लेखांतील उल्लेखांवरून असें दिसतें कीं, त्यांस वाचनाचा नाद लागण्यास छत्रे यांचें बाळमित्र व कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें अरेबियन नाईट्सचें भाषांतर हीं होत. त्याचप्रमाणें रा. छत्रे यांनीं भाषांतर केलेली इसापनीतिही त्यांस फार आवडे. बाळमित्राची पहिली आवृत्ति त्यांस सर्वांत प्रिय असावी असें दिसे. कारण आपल्या शेवटल्या दुखण्यांत सुद्धां आपल्या मुलांमुलींकडून ते वांचून घेत. कारण ती शुद्ध मराठी जुनी भाषा त्यांना फारच आवडे. प्राचीन कवींच्या कविता वाचण्याचा नाद त्यांस शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या नवनीतावरून व विशेषतः त्यांचे गुरुजी कै. मोडक यांचे स्फूर्तीनें व उत्तेजनानें लागला. जुन्या कवींच्या कवितांचें संशोधन करणें किंवा प्राचीन वस्तूंचा छंद घेणें ह्या गोष्टी त्यांना शाळेमध्यें असतानांच जडल्या असाव्या. शाळेंत असतानांच त्यांचें एक बारीकसें पुस्तकालय असे व त्यांना त्याकरितां पुस्तकें गोळा करण्याचा नाद होता. त्याचप्रमाणें ठाणें शहराचा किंबहुना साष्टी तालुक्याचा प्राचीन इतिहास जाणण्याचा नाद त्यांस फार लहानपणीं लागला. याचें कारण असें सांगतात कीं, ठाणें शहरांत ज्या पोखरण तळ्यांतून नळाचें पाणी आणिलें आहे तें ज्यावेळीं

प्रथम खोल करण्याकरतां खोदलें तेव्हां फार प्राचीनकाळीं बुद्ध लोकांची वस्ती असल्याचीं दृष्य चिन्हें म्हणजे स्तूप ते त्या तळयांत सांपडले व त्यांपैकीं ह्या राजश्रीनीं तेथील कोणासही न समजणारी ही वस्तू घरीं आणून ती उघडून त्यांतील जिन्नसांवरून निघणारीं अनुमानें काढून तीं तेथील स्थानिक वृत्तपत्रांत जाहीर केलीं. तेव्हां ते स्तूप कांहीं तरी प्राचीन वस्तू असून फार महत्वाचे आहेत असें अधिकाऱ्यांस समजून त्यांनीं त्यांबद्दल सरकारांत रिपोर्ट केला. सांगण्याचा सारांश इतकाच कीं, ही संशोधन करण्याची बुद्धि व चिकित्सकपणाची प्रवृत्ति त्यांचे अंगीं लहानपणापासून होती. साष्टीच्या इतिहासाचें संशोधन त्यांनीं बरेंच केलें होतें व सुमारें १२।१३ वर्षांपूर्वी त्यांनीं तेथील क्रीडाभुवनांत ' साष्टीची कहाणी ' या विषयावर एक व्याख्यानही दिलें होतें. असो.

१२ कॉलेजमध्यें असतांना प्रो. डॉ. अॅलेक्झांडर यांनीं विनायकरावांचें मन पूर्णपणें आकर्षण करून घेतलें व त्यांस पूर्णपणें त्यांनीं वनस्पतीशास्त्र व प्राणिशास्त्र या विषयांत पारंगत करून टाकलें. गुरूस मनासारखा शिष्य व शिष्यास मनाजोगा गुरु मिळाले म्हणजे जसें एकमेकांचें सूत जमतें किंवा त्यांच्या अध्ययनअध्यापनास जसा रंग येतो त्याप्रमाणें या गुरुशिष्यांचें झालें होतें. प्रो. अॅलेक्झांडर यांचा बी. एससी. च्या क्लासांत शिकविला जाणारा रसायनशास्त्र ( Chemistry ) हा विषय विशेष आवडीचा होता सबब विनायकरावांनीं तोच विषय आपल्या परीक्षेकरितां घेतला होता. प्राणिशास्त्र व वनस्पतीशास्त्र ह्या दोन विषयांचा त्यांस इतका नाद लागला कीं, कॉलेजांतील परीक्षा पास होण्याकरितां जो अभ्यास करावयास पाहिजे किंवा जीं क्रमिक व नेमलेलीं पुस्तकें वाचावयास पाहिजेत तीं वाचण्याकडे त्यांचें कधींच लक्ष नसावयाचें. त्याच विषयावरील दुसरीं अनेक पुस्तकें ते वाचीत असावयाचे व मराठी वाङ्मयावरील त्यांचा व्यासंग जोरानें चालू होताच. त्यामुळें साहजिकच परीक्षा पास होण्याकडे त्यांचें लक्ष नसे. कॉलेजमधें गेल्यापासून त्यांचे सर्व खेळ व भटकणें सुटून त्यांचा विद्याव्यासंग मात्र उत्तरोत्तर वाढतच गेला.

१३ कॉलेजमधील त्यांचे बरोबरचे सहाध्यायी अजून बरेचजण हयात आहेत, व त्यांपैकीं विनायकरावजींची बरीचशी माहिती त्यांपासून मिळण्याजोगी आहे व आम्हीं जो थोडासा प्रयत्न केला त्यांत आम्हांस चांगलें यश आलें आहे व ती सर्व माहिती छापून काढल्यास एक लहानसा ग्रंथच होईल. सबब स्थलसंकोचास्तव आम्हीं येथें त्या सर्व माहितीचा विहंगमदृष्ट्या विचार करणार आहोंत.

१४ आम्हीं वर सांगितलेंच आहे कीं, विनायकराव आपल्या खोलींत मित्रमंडळीस ' महिपति ' व ' श्रीधर ' यांचें ग्रंथांतील अनेक उतारे वाचून

दाखवीत व मुक्तेश्वरांचीं वनपर्वांतील उत्कृष्ट सृष्टिवर्णनें वाचून दाखवीत व त्यांवर त्यांनीं स्वतः लिहिलेले निबंध व टांचणें वाचून दाखवून आमचे मराठी कवी आंग्ल किंवा इतर युरोपिअन कवींपेक्षां कमी नसून कांकणभर सरसच आहेत असें ते प्रतिपादन करीत. अमृतरायांचे कटाव वाचून दाखविण्याकडे त्यांचा ओढा फार असे, असें त्यांचे मित्र सांगतात जुनीं पुराणीं पुस्तकें जमविण्याचा नाद त्यांस शाळेंत असल्यापासूनच होता. ते पुढें मुंबईस अभ्यासाकरितां राहूं लागले त्यावेळीं ते नेहमीं जुन्या बाजारांत जाऊन जुनीं पुस्तकें व मासिकें आवडीनें विकत घेत व त्याबद्दल त्यांची सहाध्यायी मंडळी चेष्टा करीत. त्यांचे टेबलावर नेहमीं मराठी पुस्तकें पडलेलीं असावयाचीं व त्यांचे कांहीं तरी मराठी वाचन किंवा लेखन चाललेलें असावयाचें.

१५ डिक्शनरीकर्ते कै. नीळकंठ बाबाजी रानडे हे विनायकराव कॉलेजमध्यें असतांना गणीत विषयाचे फेलो होते व तेही कॉलेमजधील वसतिगृहामध्यें रहात असत. मधून मधून विनायकरावांच्या खोलींत गप्पा मारावयास तेही येत. असेच एक दिवस ते तेथें आलें असतां इंग्रजी—मराठी एकही चांगला कोश नाहीं तरी तो कोणी तयार करावा असा प्रश्न त्या मंडळींत चर्चेस निघाला व तें काम करण्याचें रा. रानडे यांनीं अंगावर घेतलें व असें ठरलें कीं, विनायकरावांनीं त्यांस त्या कामीं सहाय्य करावें. याप्रमाणें ह्या प्रचंड कोशाची मूळ कल्पना (Germification) पहिल्यानें रा. विनायकराव भावे यांचे खोलींत निघाली. ही गोष्ट सन १८९३ किंवा १८९६ मध्यं घडली असावी असें रा. वसंतराव राऊत सांगतात. कोशाचे कामास सुरवात झाल्यावर पहिल्या पहिल्यानें विनायकरावजीनीं रानडे यांस सहाय्य केलेंही, परंतु पुढें दोघांचे स्वभाव व मतें फारच निरनिराळीं असल्यामुळें दोघांचें पटलें नाहीं व विनायकरावांनीं त्या कामांतील आपलें अंग काढून घेतलें.

१६ कॉलेजमध्यें असतांना विनायकरावांचे अनेक उद्योग चालत, असें मागें सांगितलें. त्यांतील नांव घेण्यासारखा पहिला उद्योग म्हणजे ज्येष्ठ वद्य २ शके १८१५ ( ता. १ जून १८९३ ) रोजीं त्यांनीं पुढाकार घेऊन ठाण्याचें ' **मराठी ग्रंथसंग्रहालय** ' स्थापन केलें. हें स्थापन करण्यांत त्यांचे हेतु अनेक होते, परंतु त्यांतील मुख्य हेतु काय होता हें त्यांच्याच शब्दांत सांगतों:— " आपली देशी भाषा सुधारण्यासाठीं आजपर्यंत पुष्कळांनीं पुष्कळ उपाय केले; कोणी नवीन ग्रंथ लिहिले, कोणी परक्या भाषांतील ग्रंथांचीं भाषांतरें केलीं, कोणी जुने ग्रंथ मिळवून तपासून ते प्रसिध्द केले; परंतु या सर्वांची मेहनत म्हणजे हे सगळे ग्रंथ एके ठिकाणीं जमविण्याचा प्रयत्न कोणी नीटसा

केलेला ऐकिवात नाहीं. आपल्या देशांत पुस्तकालयें बरींच आहेत. परंतु मराठी भाषेसंबंधानें पाहतां त्यांतील व्यवस्था समाधानकारक नाहीं. बहुत करून सर्व ग्रंथसंग्रहालयांत मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांतील पुस्तकें ठेवण्याचा संप्रदाय असतो. आतां इंग्रजी भाषेंत मराठीपेक्षां ग्रंथसंग्रह विशेष चांगला व जास्त यामुळें बहुतेक पैसा इंग्रजी पुस्तकें घेण्याकडेच खर्ची पडतो; व मराठी ग्रंथांचा संग्रह व्हावा तसा होत नाहीं, ही आपल्या देशांत भाषेसंबंधानें एक मोठी उणीव आहे; **'ही उणीव लक्षांत आणून हें मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन झालें.'** हे त्यांचे ग्रंथसंग्रहालय स्थापन करण्याविषयींचे विचार त्यांनीं सन १८९४ च्या जून महिन्यांत नमूद करून ठेविले आहेत. त्यावरून त्यांचें त्यावेळीं मराठी भाषेवर केवढें दांडगें प्रेम होतें हें सहज दिसून येईल. निव्वळ मराठी ग्रंथांचाच संग्रह करावा ही कल्पना त्यापूर्वीं कोणासही सुचली नव्हती. ती विनायकरावांस त्यांचें वयाचे केवळ २२ वे वर्षीं सुचून त्यांनीं अमलांतही आणिली व सदरहू संस्था उत्तम प्रकारें चालवून तिच्याकडून पुढें त्यापूर्वीं कोणत्याही सार्वजनिक संस्थेनें न केलेलें असें कार्य—'**महाराष्ट्रकवि**' नांवाचें मासिक सुमारें ४–४॥ वर्षे चालवून—करवून संस्था नांवारूपास आणिली. ठाणेकरांच्या मतें सदरहू संस्था म्हणजे कै. विनायकरावजींचें स्मारक होय. या संस्थेचा इतिहास व उत्कर्ष म्हणजे विनायकरावांचें चरित्रच होय. संग्रहालय स्थापन केल्यानंतर लगेच एक वर्षांतच त्यांनीं त्यांतील पुस्तकांची यादी तयार करून छापिली.

१७ परीक्षा पास होऊन कॉलेजमधील विद्यार्थीदशा संपण्यापूर्वींची विनायकरावांची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनीं वेळोवेळीं निबंधरूपानें लिहून ठेविलेले '**महाराष्ट्र सारस्वत**' या ग्रंथाचें प्रकाशन हें होय. हा ग्रंथ क्रमशः कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांच्या 'ग्रंथमाला' नामक मासिकांतून प्रसिद्ध झाला. सन १८९८ च्या मार्च किंवा एप्रिल महिन्याच्या ग्रंथमालेच्या अंकांत या ग्रंथास सुरवात होऊन १८९९ मध्यें मेच्या अंकांत तो संपूर्ण झाला आहे. तत्पूर्वीं तो बरेच दिवस लिहून तयार होतासें दिसतें. कारण त्यांच्या बोलण्यांत असें येई कीं 'तो माझा ग्रंथ कोणी तरी मासिककर्त्यांनीं प्रसिद्ध करावा म्हणून मीं पुष्कळ खटपट करून पाहिली, कांहीं जणांनीं अभिवचनें दिलीं व लेखी प्रतहि पुष्कळ दिवस त्यांनीं आपल्या जवळ ठेवून घेतली, परंतु प्रसिद्ध करीनात, तेव्हां पुष्कळ दिवसांनीं ती गहाळ होईल म्हणून त्या शिष्टसंपादकाकडून ती मी घेऊन आलों' तें मासिक मुंबईस चालू आहे असें ते सांगत परंतु त्याचें नांव मात्र सांगत नसत. असो.

१८ कॉलेजमध्यें असतांना ज्याप्रमाणें एक मोठा इंग्रजी-मराठी कोश प्रसिध्द करणें, ठाण्याचें संग्रहालय स्थापन करणें व 'महाराष्ट्रसारस्वत' हा ग्रंथ लिहिणें या कामगिऱ्या झाल्या त्याप्रमाणें त्यांचे मनांत आपल्या देशांतील प्रसिद्ध अशा ऐतिहासिक व्यक्तींचीं लहान लहान चरित्रें लिहावीं असें होतें व त्यांचे मित्र रा. वसंतराव राऊत यांचें सांगण्यांत असें येतें कीं, त्यांनीं त्याप्रमाणें लिहिण्यास सुरवातही केली होती व सुमारें १०० बंद लिहून झाले होते परंतु त्यांचे कोणी तरी लबाड मित्रानें ते वाचावयास म्हणून नेले ते तो दडपूनच बसला. व पुढें त्यांनीं तो नादही सोडून दिला.

१९ रा. विनायकराव बी. एस्सी ची परीक्षा पास झाल्यावर एल्. एल्. बी. चा अभ्यास करण्याकरितां १ वर्षभर मुंबईस राहिले होते परंतु मध्यंतरी त्यांचे वडील प्लेगला बळी पडल्यामुळें तो मार्ग त्यांस सोडून देणें भाग पडलें व त्यांच्या आयुष्यांतील एक मोठें स्थित्यंतर ( Turning point ) घडून आलें.

( पुढील अंकीं समाप्त. )

---

## गोमयाचें महत्त्व.

आपण गाईच्या शेणास पवित्र मानून देवस्थानांत, स्वयंपाकगृहांत व सर्वत्र सारवण्याच्या कामीं त्याचा उपयोग करितों. कांहीं विद्वानांस या गांवढळपणाबद्दल खेद वाटतो. पण कलकत्त्याचे सुप्रसिद्ध डॉ० नवरत्न सरकार एम्. डी. यांनीं कांहीं वर्षांमागें प्रसिद्ध केलें होतें कीं, " आजकाल वायुसंशोधनाकरितां ' फिनाईल वगैरे ज्या औषधांचा उपयोग केला जातो तीं सर्व औषधें गोमयाची बरोबरी करूं शकत नाहींत. शेण हें वायुशुद्धीच्या कामीं सर्वांत श्रेष्ठ आहे "

---


## नवविधाभक्ति.

### आवृत्ति दुसरी

ही नुकतीच छापून प्रसिद्ध झाली आहे ह्यांत नवविधा भक्तीचें दासबोध भागवत ज्ञानेश्वरी, नाथभागवत, तुकोबांचे अभंग यांचे आधारें नऊ प्रबंधांत विवरण केलें आहे. किं. ८६

पत्ताः—व्यवस्थापक मुमुक्षु, पुणें.

# मूर्तिमंत कुबेर !

## जॉन डेव्हिसन् राकफेलर

१ अपरिमित संपत्तीचा धणी त्यास आपण कुबेर म्हणतों. कुबेर आपण कोणी पाहिला नाहीं, पण आज ज्याला मूर्त कुबेर म्हणतां येईल असा मनुष्य अमेरिकेंत हयात आहे वाटेल त्यानें जाऊन पहावा. जगाच्या इतिहासांत असला श्रीमंत मनुष्य कोणी झालेला नाहीं. वीस हजार मनुष्यांचा प्रपंच वर्षभर चैनीनें चालण्यास जितकें द्रव्य लागेल तितकें २४ तासांत मिळविणारा मनुष्य पाहणें असल्यास राकफेलर यांस पाहावें. कित्येक राज्यें, कित्येक लढाऊ जहाजें जो लीलामात्रें करून खरेदी करूं शकेल असा हा मनुष्य आहे.

२ ही सारी संपत्ति यानें आपल्या पराक्रमानें मिळविली आहे. भाजीभाकरी जेमतेम मिळविणारा हा जॉन ' कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं । केल्यावीण होत नाहीं । साध्य जनीं ॥ ' ह्या समर्थवचनाचा प्रत्यय आणून देतां झाला. सालचें ३०० पौंडाचें उत्पन्न झालें म्हणजे मी सुखी होईन असें त्यास वयाच्या १६ वें वर्षी वाटत असे, पण तो तेव्हां ज्या शेतावर चरितार्थ चालवी त्या शेतांत आज माती कमी असेल इतकें सोनें त्याचेजवळ आहे !

३ एका ऑफीसांत पट्टेवाल्याचें काम करीत असतानां हा लोकव्यवहाराचें वर्म शिकला, लोक धंदा कसा करितात व कसा करावा याचें त्याच्या सूक्ष्म-बुद्धीस आकलन झालें व ' द्रव्याच्या राशि ' आपणही सहज मिळवूं शकूं अशी त्यास स्फूर्ति झाली. तो म्हणतो, ' मला ते दिवस आठवले म्हणजे मौज वाटते. सारें जग व्यवहार करण्यास मला मोकळें आहे असें माझ्या मनांत भरलें. महत्वाकांक्षा मनीं उचंबळली व अत्यंतात्यंत कष्ट भोगल्याशिवाय मला द्रव्यराशि मिळणार नाहींत असा माझ्या निश्चय झाला. '

४ आणि निश्चयाचें बळ तेंच फळ होय ! स्वस्त माल मिळेल तेथें घ्यावा, तो स्वच्छ साफसूफ करून त्याची गरज तेथें अधिक भावानें विकावा आणि त्यांत किफायत व्हावी असा त्यास अनुभव आला. थोडक्याच काळांत त्याचे पाशीं दहा हजार डॉलर जमले. रॉकेल तेल स्वच्छ करून विकण्याच्या धंद्यांत तो वाहवला व दैवाची अनुकूलता होऊन त्यांत त्याच्या कल्पनेच्या अनंतपट त्यास किफायत झाली. स्वच्छ केलेलें रॉकेल तेल बाजारांत येऊं लागतांच

त्यावर गिऱ्हाइकांच्या उड्या पडल्या, इतक्या कीं, माल पुरवितां पुरवितां त्याच्या नाकीं नव आलें ! दोन वर्षांच्या आंत त्यानें अनेक कारखाने काढले व रोजीं दोन हजार बॅरेल्स तयार होऊं लागले. धंदा बेसुमार वाढला तेव्हां १८७० मध्यें त्यानें आपले भाऊ व मित्र मदतीस घेऊन एक तेलाची कंपनी काढली. हीच जगप्रसिद्ध '**स्टँडर्ड ऑईल कंपनी**' होय ! आज तिच्यांत २५००० मनुष्यें काम करितात. ४० लक्ष पौंड त्यांची मजुरी होते. ४० हजार तेलाचे तलाव, २०० स्टीमर्स, ७००० डिलिव्हरी वॅगन्स असा तिचा व्याप वाढला आहे ! मूळ भागीदारींत ज्यांनीं एक भरला त्यास आज एका पौंडावर दरसाल ८० पौंड मिळतात ! १ कोटी ६० लक्ष पौंड (पौंड म्ह० पंधरा रुपये) भागीदारांत नफा म्हणून दरसाल वाटले जातात. रॉकफेलर कोट्यधीशांत गणला जाऊं लागला, त्याचे साथीदार कोट्यधीश झाले. यानंतर खाणी, रेल्वेस्टॉक्स, गॅस इ० किफायतशीर धंदे त्यानें हातीं घेतले व जाईल तिथें तो मालक अशी स्थिती झाली. मोठमोठ्या व्यापाऱ्यांना जन्मांत मिळायची नाहीं इतकी संपत्ती एकेका दिवसांत तो मिळवूं लागला.

५ इ० स० १८६५ मध्यें त्याचें सर्व भांडवल १००० पौंडांचें होतें; १८७५ मध्यें तें २ लक्ष पौंडाचें झालें; १८८५ मध्यें तें १ कोटी पौंडावर गेलें; १८९० मध्यें तें २ कोटी पौंड झालें; १८९५ मध्यें तें ५ कोटी पौंड (७५ कोट रुपये) झालें ! आज त्याची संपत्ती १० कोटी पौंडांहून किती तरी अधिक आहे ! १९०० सालची त्याची एकट्याचीच किफायत ३ कोटी पौंडांची झाली ! दीर्घायुष्य व अपरिमित धन मिळवणें ह्या त्याच्या दोन्ही महत्वाकांक्षा पूर्ण झाल्या. हा ऐन तारुण्यांत अत्यंत बळवान् असे. बैलासारखी त्याची गर्दन पुष्ट होती. त्याचे डोळे बारीक, सूक्ष्म म्ह० भेदक व खोल आहेत. त्याचे ओंठ पातळ असून निश्चयाचें द्योतक आहेत. चेहरा रुबाबदार असून एकदां पाहिल्यावर न विसरण्यासारखा आहे. त्याचा खाजगी आयुष्यक्रम कोणासही माहीत नाहीं. क्लबांत सभांत, मेजवान्यांत तो कुठें दिसायचा नाहीं. केवढाले टोलेजंग राजवाडे, केवढाल्या इस्टेटी, केवढी अगणित संपत्ति पण राहणी व आहार अगदीं साधा आहे. प्रभातीं उठायचे, दिवसभर कष्ट करायचे, दूध व पोळी हा आहार ! चैन नाहींच.

६ तो एकदा म्हणाला, " केवळ संपत्ति ही मनुष्याच्या सुखाला कारण होत नाहीं, पण संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न करणें यांत कांहीं चूक नाहीं. परोपकार करण्याच्या कामीं संपत्तीचा अत्यंत उपयोग होतो. दरिद्री लोकांत जसे पुष्कळ वाईट लोक सांपडतात तसे श्रीमंतांतही पुष्कळ वाईट लोक आहेत, हें खरें आहे, तरी गोरगरिबांच्या उपयोगी पडण्यासाठीं देवानें हा ठेवा आपल्याजवळ दिला आहे अशीच धनिकांची भावना असते.

७ आणि राकफेलरची तरी तशी भावना आहे. त्यानें परोपकारांत आपल्या संपत्तीचा विनियोग केला आहे. जगप्रसिद्ध कार्नेजी वगळल्यास त्याच्या इतका संपत्तीचा उपयोग परोपकारांत कोणी केला नाहीं. ५ कोटी पौंडांहून अधिक संपत्ति त्यानें परोपकारांत वेंचली आहे. जनरल एज्युकेशन बोर्डला ८६ लक्ष पौंड, चिकॉगो युनिव्हर्सिटीला २२ लक्ष पौंड, रश मेडिकल कॉलेजला १२ लक्ष पौंड त्यानें दिले आहेत. ह्याशिवाय जगभर त्याच्या दातृत्वाचा फायदा अनेक गरिबांस मिळाला आहे. राकफेलर आतां वृद्धत्वास पोंचला असून काळाची उडी पडायची वाट पाहत आहे. अर्थ, काम व धर्म हे तीन पुरुषार्थ त्यानें साधले आहेत. पुरुष अलौकिक यांत संदेह नाहीं.

---

# जादूची लकेर.

( चाल—माशि बोलुं नको. )

मोहिनी गायनीं दिव्य माधुरी जीव लकेरी भारी ॥ धृ० ॥
सूर न लगे रागदारी । बोल नलगे तालदारी ।
परि वृत्ती लहरी एकतारिवर सूर धरी, मन हारी ॥ १ ॥
तोडितां भिल्लीण मोळी । स्वैर गाते रान माळीं ।
नाचे कीं सळसळ पिंपळ, मुरली वाजवि वायू लहरी ॥ २ ॥
चाकिवरुनी लोहशीला । मालकरि ओढीत शिणला ।
' चल जाउं सये राउळीं ' सरसरा ओढी जरि जड भारी ॥ ३ ॥
कप्पिचे आवाज घुमती । घुंगुरे त्या साथ देती ।
बैलास सोडितो रंजविणारी शेतकरी ललकारी ॥ ४ ॥
खडबडे ती रामप्रहरीं । येइ जात्याशीं बिचारी ।
इवल्यास निजविण्या गाउनि ओव्या आणि मनास हुशारी ॥ ५ ॥
अंतरीं आनंदवृत्ती । गायनें उत्पन्न होती ।
करि दुःखभार किंचितसा हलका तरतांना संसारीं ॥ ६ ॥
गायनें करि जीव हलका । स्फूर्तिच्या लावून पंखा ।
वाऱ्यावर घेइन उंच भरारी विसरुन दुनिया सारी ॥ ७ ॥

—कृष्ण-किशोर, नाशिक.

---

ॐ नमः श्रीलक्ष्मीकांताय.

# दीन नारायण यांची बोध–सुधा.

१ जमीन तयार न करतां त्यांत बी पेरल्यानें जसें तें उगवत नाहीं, तद्वत् मनाचें आकलन करून त्यास ईशठायीं न गुंतविल्यास वाया जातें.

२ मन हें अवघड आहे असें म्हणून उद्योग केला नाहीं तर तें कधींही आकलन व्हावयाचें नाहीं. यासाठीं मनुष्यानें सदुद्योग करून त्यास प्राप्त करून घ्यावें.

३ जो भलत्या मार्गांत कालक्षेप करतो त्याचा जन्म फुकट जाऊन त्यांस नेहमीं दुःखेंच भोगावीं लागतात.

४ सौभाग्य व नानाविध संपत्ति प्राप्त करून घेण्याची असल्यास मनुष्यास उद्योग हेंच प्रमुख साधन आहे.

५ ईशभजनीं मन गुंतविल्यास पाण्यांतील मिठाप्रमाणें देव व भक्त एक होतात.

६ ईशप्राप्त्यर्थ न झटणारा, यज्ञ–यागादि क्रिया न करणारा, निरुद्योगी राहणारा, अशा पुरुषास ईशप्राप्ती होत नाहीं.

७ ईशप्राप्ति करून घेणें, व्रतादिकांचें पालन व परोपकार, हेंच सज्जनांचें भूषण आहे.

८ जयेच्छु मनुष्यानें न्याय्य मार्गापासून कधींहीं ढळूं नये.

९. दुर्जनाची संगती ऐहिक व पारमार्थिक सुखालाही हानीकारक आहे.

१० सज्जनांच्या संगतीनें त्वरित आत्मविश्वास प्राप्त होतो.

११ मोठ्या गुणामुळें अल्पदोषांचा नाश होतो.

१२ गुणी मनुष्यास सद्गुरु मिळाला कीं, गुण विशेष वाढतो.

१३ कितींही सोंगें केलीं तरी भक्तीच्या जिव्हाळ्याशिवाय व्यर्थ होय.

१४ संकटांस तोंड देऊन राहिलें, वागलें तरच ईशास कळवळा येतो.

१५ बेंबीच्या देठापासून तान्हुल्यानें आकांत केला नाहीं तर जशी आई स्तनपान करीत नाहीं तद्वत् जिव्हाळ्याशिवाय ईशप्राप्ति होणें नाहीं.

१६ उत्साहानें व नेटानें काम करणाराजवळच सिद्धि उत्कंठेनें येते.

१७ ज्या संपत्तीचे बळावर दुसऱ्यावर उपकार करितां येतो तीच संपत्ति खरी.

१८ ईशतेजापुढें इतर तेजावर विरजण पडतें.

१९ नाम जयामुखीं आहे । तेथें लक्ष्मीकांत राहे ।

२० जो वाणीस भगवत्स्मरणाचा विसर पाडीत नाहीं,त्याजवळ संकल्प-विकल्पाची बाधाच राहत नाहीं.

२१ श्वासोच्छ्वासाबरोबर सुद्धां ज्या मनुष्याचें नामस्मरण होतें, त्याची देह बुद्धि नाहींशी होते.

२२ जो बलात्कारानें आपली वैखरी नामास अर्पितो, तोच मनुष्य.

२३ अखंड नामस्मरण करणें यालाच गुरुभक्ति म्हणतात.

२४ ईशनामाचा कंटाळा कां येतो ? त्याचे ठिकाणीं विषयाचें गोडीमुळें भक्ति उत्पन्न होत नाहीं म्हणून. करतां बलात्कारानें जिव्हेस नामस्मरण करण्यास लावावें म्हणजे कांहीं कालानें आपोआप जिव्हा ईशनामास रत होईल.

२५ प्रपंचांत हजारों दुःखें, नाना आधिव्याधि, उपाधी येतात, या सर्व विस्तवाच्या इंगळावर झोंप घेण्यासारखें आहे. म्हणून मानव त्याची अवहेलना करतो का ? तद्वत् मनीं नाम ठेवल्यास ईश त्याची अवहेलना करीत नाहीं.

२६ आपलें मरण जवळ आहे असें समजून माया, मोह, तृष्णा, वित्त यांचा त्याग करून दया, शांति, क्षमा, विवेक ठेवावा म्हणजे जनप्रियता मिळते.

२७ सुख, दुःख कर्माधीन असते, त्याचा बोल परमेश्वराकडे ठेवणें बरें नाहीं. करितां तें शरीराचें माथीं मारून त्या शरीरास ईशसाधनीं तत्पर ठेवावें.

२८ दया, क्षमा, शांति । तेथें देवाची वसती ।

२९ नशीब देतें झालें । तेथें कोणाचें न चालें ।

३० तीर्था गेलियाच्या खुणा । कांहीं पालटावें अवगुणा ।

३१ भगवद्भक्ति केल्यावांचून, मृत्युलोकीं, स्वर्गीं अगर पाताळीं कोठेंही सुख नाहीं.

३२ तुम्ही कोठेंही असा, जेथें नाम-स्मरण चालू आहे, तेथें देव आहे.

३३ जेथें नामाची महती । तेथें देवाची वसती ।

३४ मनुष्य जसा मोठा होत जातो तशीच काळजी जास्त वाढते. करतां ल्हानपणापासूनच परमार्थाचें प्रातीस लागावें.

३५ मुली खेळ मांडतात पण आईनें हाक मारतांच निघून जातात. तद्वत् प्रपंचांत राहून मनास ईशमार्गास लावावें.

३६ रोज मानसपूजा करावी व आपणांस जे जिन्नस आवडतात, ते सर्व देवास अर्पावें.

---

## नवी आवृत्ति तेरावी.

# भक्तिमार्गप्रदीप.

मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांच्या घरोघर हें पुस्तक धर्मग्रंथ म्हणून मान्य झालें आहे. ' नवे जुने, सुशिक्षितअशिक्षित, वृद्धतरुण, स्त्रीपुरुष या सर्वांना अत्यंत प्रिय झालेलें असें कोणतें पुस्तक आहे ? ' म्हणून विचारल्यास " **भक्तिमार्गप्रदीप** " हाच उद्गार सर्वांच्या तोंडून निघेल यांत शंका नाहीं ! ! यांत साधुसंतांच्या प्रसिद्ध भूपाळ्या, आरत्या, अभंग, पदें, श्लोक वगैरे यथाक्रम दिले आहेत. पृ. सं. १३६. किं. ८८ व्ही. पी. नें ८१२.

**विविधज्ञानविस्तार...**" पूर्वीची पिढी जात चालल्यामुळें तिजबरोबरच नष्ट होऊं पाहणारी जुनी भजनाची परंपरा ही रा. पांगारकरांचा प्रदीप प्रकाशित झाल्यापासून कोठें कोठें दृग्गोचर होऊं लागली आहे हें त्याचें महद्भाग्य होय. या पुस्तकामुळें धर्मशिक्षणाच्या कामगिरीला मोठीच मदत झाली आहे. मराठी भाषा जाणणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाजवळ प्रदीपाची एकेक प्रत अवश्य असली पाहिजे. "

---

## सार्थ व सभाष्य.

# मनोबोध उर्फ मनाचे श्लोक.

प्रकाशकः—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

श्रीसमर्थ रामदासस्वामींचे मनाचे श्लोक सर्व लोकप्रिय आहेत. हे दिसतात तितके सोपे नाहींत. श्रीदासबोध व समर्थांची सर्व कविता यांत प्रगट झालेल्या तत्वज्ञानाच्या अंतर्मुख दृष्टीनें ते लावले पाहिजेत व तसे ते येथे लावले आहेत. पदाचा अर्थ न सोडतां संदर्भ व कथानकें देऊन अर्थविवरण केलें आहे. प्रथम प्रस्तावनेंत श्लोकांचा प्रसंग, मनाचें स्वरूप व श्लोकसंगति दिली आहे. श्लोक समन्वयानें लावले आहेत.

खिशांत ठेवण्यासारखा आकार. कागद ग्लेज. पृ. सं. ३२०, किंमत बारा आणे.

पत्ताः— व्यवस्थापक ' मुमुक्षु ' पुणें.

# सन्तचरित्रमाला.

## ग्रंथकार—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत अनेक सत्पुरुषांचीं चरित्रें वेळोवेळीं येऊन गेलीं आहेत त्यांपैकीं कांहीं निवडक चरित्रें घेऊन त्यांसला पाल्हाळ गाळून व नवीन स्वतंत्र ८–१० चरित्रें ह्या ग्रंथासाठीं लिहून हा ग्रंथ श्रीकृष्णाष्टमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध केला आहे. यांत ४३ चरित्रें असून त्यांपैकीं सुमारें २८–३० चरित्रें रा. पांगारकरांनीं स्वतः लिहिलीं आहेत व ८–१० चरित्रें अधिकारी तज्ज्ञ पुरुषांनीं लिहिलीं आहेत. आद्य श्रीशंकराचार्य मोरया गोसावी, राजा कुलशेखर, दामाजीपंत, रमावल्लभदास, भक्त तिरुपन्नाल्वर, सूरदास सोहिरोबा आंबिये, इ० प्राचीन व नारायणमहाराज जालवणकर व केडगांवकर गोंदवलेकरमहाराज, सीताराममहाराज मंगळवेढेकर, वासुदेवानंदसरस्वति, गुलाबराव महाराज, भटजीबापू, सोनगीरचे महाराज, भोरचे दत्तभट, अक्कलकोटस्वामी, माणिक प्रभु इ० अर्वाचीन संतांचीं चरित्रें रा. पांगारकरांनीं लिहिलीं आहेत. बाकीचीं अक्खा ( भालेराव ) राजकवि यशवंतराव पवार व रामसनेही ( का. कृ. लेले धार ) सिद्धारूढ महाराज ( फणसळकर ), चिदंबर दीक्षित ( विठ्ठल कृष्ण कामत ) दाजी महाराज टाकळीकर ( काहळेकर ) बलभीमबोवा साडेकर ( श्री खाजगीवाले ) शुभराय सोलापूरकर देव मामलेदार व रघुनाथ भटजी नाशीककर ( प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले ) इ० पृ. २५६. पांच फोटो किं. रु. १॥८ व्ही. पी. नें १॥१३.

# मोरोपंती वेंचे.

आवृत्ति दुसरी. ] [ किं. १॥१२

## ग्रंथकार – ल. रा. पांगारकर, बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाऊणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकविताार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे. " महाराष्ट्रांतलि रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहानथोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेत:—

१ ईश्वरभक्तिपर, २ कवि आणि कविता, ३ उपदेशपर, ४ वर्णनपर, ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ. विषयांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ, कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

# मध्वमुनीश्वरांची अप्रसिद्ध कविता.

संशोधकः--प्र. व्यं. गुर्व्वी.

## पद ७९

मागें दशरथा दिल्हें बहु दुःख ॥ परतुन त्याचें मुख न पाहिलें ॥ १ ॥ चित्रकुटीं त्याचा ऐकुन समाचार ॥ वनामध्यें फार शोक केला ॥ २ ॥ कंदें मुळें फळें आणोनी गोमटीं । केलें गंगातटीं पिंडदान ॥ ३ ॥ जिवंत असतां नाहीं दिल्ही भेटी ॥ मेल्या पूर लोटी आसवांचे ॥ ४ ॥ समजावया आले भरत भावंडें ॥ तेथेंचि फावंड रचिलें तां ॥ ५ ॥ शत्रुघ्नासहित केलें वेडें पिसें ॥ त्यासी चौदा वर्षें भांबाविलें ॥ ६ ॥ डोईवरी हात ठेउनी गेले गांवा ॥ रडे जेव्हां तेव्हां नंदिग्रामीं ॥ ७ ॥ मध्वनाथ ह्मणे मनामधें कुडें ॥ तुझें तुजपुढें निववतों ॥ ८ ॥

## पद ८०

भरतासी केली अयोध्या पारखी ॥ होणारासारखी बुद्धि तुझी ॥ १ ॥ सुमित्रेसहित रडविली माय ॥ मोकलित धाय घरा गेली ॥ २ ॥ कांहीं केल्या तुझें द्रवेना तें मन ॥ अयोध्येचे जन रडविले ॥ ३ ॥ माय बाप सखा बंधु सहोदर ॥ त्यासी टाकुन दूर गेलासी तूं ॥ ४ ॥ जनस्थानीं दिव्य पाहून पंच-वटी ॥ तेथें पर्णकुटी बांधिली तां ॥ ५ ॥ जानकीच्या बोलें धाऊन मृगापाठीं वेडया थोडयासाठीं नाश केला ॥ ६ ॥ आपुली ते हाणी जगाची मरमर ॥ आश्रमीं तस्कर संचरला ॥ ७ ॥ मध्वनाथ ह्मणे भूमीचें ठेवणें ॥ तें नेलें रावणें उचलोनी ॥ ८ ॥

## कवन ८१

ठेवण्याच्यामुळें बहुतांचा नाश ॥ रोकडी निरास झाली तुझी ॥ १ ॥ पूर्वी आम्हांसी तां केलें होतें कष्टी ॥ त्याचें फळ दृष्टि देखियलें ॥ २ ॥ कारे जटायूचे उपडविले पंख ॥ त्याची केली राख आपल्या हातें ॥ ३ ॥ अंजनीचें वज्रफळ जगजेठी ॥ त्यानें केली भेटी सुग्रीवाची ॥ ४ ॥ सुग्रीवाचा भाऊ मारियला बाणें ॥ तुझें काय त्यानें केलें होतें ॥ ५ ॥ येकाची वनिता घालिसी येकापुढें ॥ हें ही तुझें कुडें जाणतों मी ॥ ६ ॥ आपल्या कामासाठीं करसी मनधरणी ॥ सत्वर तरुणी भेटवावी ॥ ७ ॥ मध्वनाथ ह्मणे दिससी परमार्थी ॥ आहेसी कार्यार्थी गोडबोल्या ॥ ८ ॥

## कवन ८२

गोड बोलुनिया घ्यावें त्याचें काज ॥ रीसाहातीं माज बांधविला ॥ १ ॥ वानरांचे शिरीं वाहविले दगड ॥ केला तो अवघड शिळासेतु ॥ २ ॥ बिभि-

षणु न येतां शरण ॥ रावणाचें मरणें कळतें कैसें ॥ ३ ॥ नाहीं तरी तुझ्या दैवासी अटक ॥ लंकेचें कटक ऐसें होतें ॥ ४ ॥ अष्टादश पद्में होमिली दुर्बळ ॥ बंधुवींही बळ दिल्ही होती ॥ ५ ॥ काय मारुतीचा होशील उतराई ॥ त्यानें तुझा भाई उठविला ॥ ६ ॥ रावण मारुनी विजयी झालासी ॥ वांचुनी आलासि आमुच्या भाग्यें ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे विचारी तूं आज ॥ केलें रामराज्य भक्तजनीं ॥ ८ ॥

## कवन ८३

आसेचें बांधलें आहे अवघे जन ॥ म्हणूनी जे ते भजन करिती तुझें ॥ १ ॥ पोटाचे पाईक करिती खुशामती ॥ ऐसें रघुपती आहेत फार ॥ २ ॥ समर्थांसीं भीती सेवक सर्व गुण ॥ त्याचें कोणें उणें बोलावें जी ॥ ३ ॥ आपल्या जीवावरी जाला जो उदार ॥ रायाचा झुंजार तोचि एक ॥ ४ ॥ पतिव्रतामध्यें प्रमाणिक वृंदा ॥ ते कां रे गोविंदा भोगिली तां ॥ ५ ॥ वालीचा अन्याय आणुनी मनास ॥ त्याचा जीवनाश तुम्हीं केला ॥ ६ ॥ पापी अजामेळ तयाचा सन्मान ॥ गणिकेसी विमान पाठविलें ॥ ७ ॥ मध्वनाथ म्हणे पित्यासी पतन ॥ धर्म सनातन करितां तुम्हीं ॥ ८ ॥

## कवन ८४

तुम्ही आम्ही पूर्वी होतों एकेठायीं ॥ पुढें गती नाहीं तुजवीण ॥ १ ॥ मध्यें दोन दिवस पडला अंतराय ॥ म्हणोनि तुझे पाय धरितों आम्ही ॥ २ ॥ आम्हां गरीबासी न करी निकर ॥ देवा दोन्ही कर जोडितों मी ॥ ३ ॥ वोटी पसरोनि धरितों मी दाढी ॥ नर्कांतुनी काढी एकदांचें ॥ ४ ॥ माझ्या बोलण्याचा राग न धरावा ॥ येवढा उद्धरावा महापापी ॥ ५ ॥ सिणले भागले मनामध्यें कष्टी ॥ बऱ्या वाईट गोष्टी बोलते जी ॥ ६ ॥ मागें पुढें तुझी करितों मी निंदा ॥ दुसरें गोविंदा व्रत नेणें ॥ ७ ॥ निंदाव्रताचिया करी उजवण ॥ नाथ म्हणे रीण देई माझें ॥ ८ ॥

## कवन ८५

वडीलपणाची बरी केली नीति ॥ भला रघुपती दीनबंधु ॥ १ ॥ आपण घेतली सद्विद्या अयोध्या ॥ आम्हांसी अविद्या नगरी दिल्ही ॥ २ ॥ लक्ष चौऱ्यायशींत आम्ही होतों दुःखी ॥ तुम्हीं नित्यसुखी अवतारांत ॥ ३ ॥ लंकेसी जाऊनी ब्रह्महत्या केली ॥ समुद्रांत गेली वाहवत ॥ ४ ॥ समर्थ जें करी तें दिसे उत्तम ॥ येरां अंधतम जडजीवां ॥ ५ ॥ आम्ही रक्तबीज मारूं

चोपलीका ॥ त्याचें तुम्हीं लेखा महापाप ॥ ६ ॥ कौसल्येचे परी आम्हांसी कोंडिलें ॥ वैर कां मांडिलें घरीच्याघरीं ॥ ७ ॥ वैकुंठलोकीचें करितां तुम्हीं राज्य ॥ आम्हांसी सायुज्य तेथील नाहीं ॥ ८ ॥ तुम्हां आम्हांमध्यें लागला झगडा ॥ जातों मी उघडा संतांपाशीं ॥९॥ संत माझा तुझा करतील निवाडा ॥ घेववीन झाडा त्यांच्या हातीं ॥ १० ॥ मूर्ख जाणुनियां घातले विभक्त ॥ संत भगवद्भक्त करितील येक ॥ ११ ॥ तुझा माझा वांटा करतील बरोबर ॥ उणा तिळभर न लेखती ॥ १२ ॥ काय संतांचें मी होऊं उतराई ॥ तुझी चतुराई न सरे तेथें ॥ १३ ॥ मध्वनाथ म्हणे तुम्ही आम्ही एक ॥ वेदांतीं विवेक हाचि केला ॥ १४ ॥

## कवन ८६

नाव घेऊन डोईवर ॥ नाच जानकीसमोर ॥ १ ॥ पारिता जो पाहिना ॥ त्याचें भलेपणा राहिना ॥ २ ॥ आळवितां कंठशोक ॥ ज्याला हासताती लोक ॥३॥ परी तूं न देसी उत्तर ॥ कैसा जालासि निष्ठुर ॥ ४ ॥ गेली नामाची त्या वीरी ॥ म्हणुनि लाजसी तूं हरी ॥५॥ मुक्ताफळ झालें जुनें ॥ त्याचें मोल येतें उणें ॥ ६ ॥ कोणी फुकट घेईना ॥ गेलें पाणी तें येईना ॥ ७ ॥ आम्हां नलगे तुझें नाम ॥ जालों उदास निष्काम ॥ ८ ॥ संत आमुचें कुळदैवत ॥ मायबाप गणगोत ॥ ९ ॥ त्यांचें सेवूं चरणोदक ॥ तेचि चित्ताचे शोधक ॥१०॥ धन्य संतसनकादिक ॥ त्यांचा महिमा तुजहूनि अधिक ॥११॥ घेतां वैष्णवांचीं नांवें ॥ नलगे वैकुंठासीं जावें ॥१२॥ संत कीर्तन करिती जेथें ॥ तूं धावुन येसि तेथें ॥ १३ ॥ आम्हीं तुजकडे पाहूं ना ॥ नाम घेऊंहि वाहूं ना ॥ १४ ॥ पडसी संतांच्या तूं पायां ॥ आपलें नांव जाईल वायां ॥ १५ ॥ शरण आला वनमाळी ॥ संतीं वाजविली टाळी ॥ १६ ॥ मध्वनाथास दिवाळी जीवें संतास ओवाळी ॥ १७ ॥

## कवन ८७

कै पाहीन मी घननीळा ॥ ध्रु० ॥ रत्नजडित किरीट सुमस्तकीं ॥ कुंडलें देतीं सुढाळा ॥ १ ॥ कमळदळाहूनि नेत्र विशाळ ते ॥ कस्तुरीचर्चितभाळा ॥ २ ॥ कुंदरदस्मित सुंदर तें मुख ॥ देखुनि इंदु गळाला ॥ ३ ॥ आंगीं झगा पिवळा झळके वरी ॥ त्यावरती वनमाळा ॥ ४ ॥ पंचवटीवनीं शोभतसे अती ॥ संन्निध जानकीबाळा ॥ ५ ॥ बंधु सुलक्षण दक्षिण लक्ष्मण ॥ संगति योग्य मिळाला ॥६॥ रामशरें मृग निर्बळ होउनि ॥ घेऊनि जीव पळाला ॥ ७ ॥ हातीं शरासन घेऊन शासन ॥ दावितसे दनुजाला ॥ ८ ॥ बांधून तर्कश तो

रणकर्कश ॥ मेळवि मर्कटपाळा ॥ ९ ॥ रामपराक्रम देखुनि अंतरीं ॥ रावण फार जळाला ॥ १० ॥ जानकी घेउनियां जयवंत ॥ घरासि रघूत्तम आला ॥ ११ ॥ ओवाळी आरती मध्वमुनीश्वर ॥ भेटुनि दीनदयाळा ॥ १२ ॥

## पद ८८

जय दाशरथी रघुनाथा ॥ ध्रु० ॥ राम निरामय नाम मनोहर ॥ वेद वदे गुण-गाथा ॥ १ ॥ तूं करुणानिधि दीनजनोद्धर ॥ हे निरसी भवव्यथा ॥ २ ॥ प्रार्थी निरंतर मध्वमुनीश्वर ॥ दे अभयकर माथां ॥ ३ ॥

## पद ८९

रघुराज दयाळा समर्था ॥ ध्रु० ॥ मी शरणागत तव चरणाप्रति । वारि तूं सर्व अनर्था ॥ १ ॥ तूं करुणाकर पूर्ण सुखात्मक । बोधविसी परमार्था ॥२॥ वर्णी तुझें यश मध्वमुनीश्वर । तूं जगदीश या कर्ता ॥ ३ ॥

## पद ९०

ऐ राघव मामव स्वामिन् ॥ ध्रु० ॥ राजीवलोचन रावणमोचन ॥ पुष्पक-वाहनगामिन् ॥ १ ॥ जानकीनायक वैभवदायक ॥ श्रीधर श्रीजलशायिन् ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर हृत्सरसीरुह—॥ मध्यग सद्गतिदायिन् ॥ ३ ॥

## पद ९१

सेवी रामकथारससार ॥ ध्रु० ॥ रामकथेविण व्यर्थ तें साधन ॥ वरकड अवघे चार ॥ १ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे येणें ॥ पावसी तूं परपार ॥ २ ॥

## पद ९२

रामकथारस पी पी प्राण्या ॥ ध्रु० ॥ रामकथारस सेविसी तूं जरी ॥ काळ करील तरि जी जी जी ॥ १ ॥ संतति संपत्ति जाई जाणरे ॥ मीपण धरितां ची ची ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे तुज ॥ दुष्ट जनाला भी भी ॥ ३ ॥

## पद ९३

सगुण समाधि समाधि लागो मज ॥ध्रु०॥ कोणें योगाभ्यास करावा ॥ कठिण शमादि दमादि ॥ १ ॥ रामपदीं मन तन्मय हें हो ॥ वारुनि सर्व उपाधि ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर साधक म्हणतो ॥ मी उतरेन भवाब्धि ॥ ३ ॥

## पद ९४

अरे हा राम सनातन रे ॥ राजा राघव हा ॥ ध्रु० ॥ पंचवटीमध्यें जानकी-सांठीं ॥ धावे मृगापाठीं घेउनी हातीं शरासन रे ॥ १ ॥ बांधुनी तर्कश तो

रणकर्कश ॥ मर्दुनि दानव दाखवी दारुण शासन रे ॥२॥ मध्वमुनीश्वर जिंकुनि लंकेश ॥ आला अयोध्येस भार्गवगर्वविनाशन रे ॥ ३ ॥

## पद ९५

श्री रामा जय रामा जय जय श्रीरामा जय ॥ ध्रु० ॥ दशशतकरकुलभूषण दशरथतोषण जळधरश्यामा ॥ १ ॥ दशशतलोचन बंधनमोचन दशमुखहृदयविरामा ॥ २ ॥ दशशतवदनें वर्णित गुणगुण ॥ दशकर जपतों नामा ॥ ३ ॥ दशअवधानी दशही दिगंती गाती मंगलधामा ॥ ४ ॥ दशअवतारी दर्शन देतो ॥ मध्वमुनीश्वर आम्हां ॥ ४ ॥

## पद ९६

संचित आणि प्रारब्ध क्रियमाण रे ॥ आत्मज्ञानापुढें अप्रमाण रे ॥१॥ आम्हीं आहों सदैव नित्यमुक्त रें ॥ कधीं जालों नाहीं बुद्धियुक्त रे ॥ २ ॥ असंगासी अनादि गुण संग रे ॥ न मानिती सज्ञान अंतरंग रे ॥ ३ ॥ मध्वनाथें शोधुन शुद्ध सत्व रे ॥ अनुभवा आणिलें येक तत्व रे ॥ ४ ॥

## कवन ९७

निर्मळ नर्मदेचे खडे । देवा त्यांची पूजा घडे ॥ १ ॥ तेही म्हणविती देव । गणराज सदाशिव ॥ २ ॥ काळी गंडकीची शिळा । शालिग्राम ह्मणती तिला ॥ ३ ॥ द्वारकेचे चक्रांकित । दोघे पुजावे निश्चित ॥ ४ ॥ मातापुरिचे तांदळे । सूर्यकांतासी पूजा मिळे ॥ ५ ॥ आम्ही खडयाहूनी हीन । दीन जालों कर्माधीन ॥ ६ ॥ आमची कां रे नाहीं पूजा । भाव तुझ्या मनीं दुजा ॥ ७ ॥ जीव म्हणवी तुझा अंश । चिखलीं रुतला राजहंस ॥ ८ ॥ आम्हां लागलें जें कर्म । त्याचें न कळें तुजही वर्म ॥ ९ ॥ मूळ अविद्याचि आदि । न कळे सर्वज्ञासी आधीं ॥ १० ॥ शहाणपणाची प्रतिज्ञा । सोडा सोडा जी सर्वज्ञा ॥ ११ ॥ देवाकडे आली हारी । संतीं उभा केला द्वारीं ॥ १२ ॥ मध्वनाथस्वामी चतुर । दासीं केला निरुत्तर ॥ १३ ॥

## कवन ९८

तुम्हीं आह्मीं करूं पूजा । देवराया गरुडध्वजा ॥ १ ॥ वर्म सांगितलें संतीं । राजास जोगव्याची खंती ॥ २ ॥ आह्मीं पाळावी विनंती । तुम्हीं भोगावी महंती ॥ ३ ॥ जीव तुझा अंश ह्मणवी । अंश अंशास विनवी ॥ ४ ॥ ऐसें नाहीं म्यां देखिलें । कोठें तरी हें ऐकिलें ॥ ५ ॥ यांत आह्मांस लाभ काय तुझे पुजावे ते पाय ॥ ६ ॥ सूर्य आपुल्या किरणा । न ह्मणे वंदा माझ्या

चरणा ॥ ७ ॥ अग्नि न ह्मणे स्फुलिंगासी । माझ्या पूजा सर्वांगासी ॥ ८ ॥ गंगा न ह्मणे तरंगासी । माझ्या भेटा निजांगासी ॥ ९ ॥ पृथ्वी न ह्मणे परमाणूंसी । मी विहीण होईन तुझी ॥ १० ॥ जेथें नाहीं द्वैतभाव । तेथें पूजेसी कैचा ठाव ॥ ११ ॥ कैचें अद्वैतीं भजन । सेव्य आणि सेवकजन ॥ १२ ॥ आपण आपल्या खांद्यावरी । कैसें वैधावें गा हरि ॥ १३ ॥ काय बोल बोलूं कितवा । घरामध्यें केला फितवा ॥ १४ ॥ मध्वनाथें देवासगट । केली उपासना गट्ट ॥ १५ ॥

## कवन ९९

सहस्र नामाची घालितां लाखोली ॥ तरला एक कोळी वाल्मिकी तो ॥ १ ॥ पुराणप्रसिद्ध गोष्टी त्या ऐकाव्या ॥ प्रत्यक्ष त्या देखाव्या कोणे ठायीं ॥ २ ॥ जरी आपुल्या अंगें अनुभवा आणाव्या ॥ तरीच वानाव्या संतांपुढें ॥ ३ ॥ नाहीं तरी मज वाटे कां न कोर्डे ॥ अमृत ह्मणे तोंडें चवीं नेणें ॥ ४ ॥ मध्वनाथ ह्मणे पोटामध्यें भूक ॥ तृप्तीचें तें सुख बोलूं कैसें ॥ ५ ॥

## कवन १००

तुझें नाम आतां घेईना मी हरी ॥ गेली त्याची खरी महिमा भाई ॥ १ ॥ येका दोघावरी झाले कारीगर ॥ आतां हलूं फार वजन झालें ॥ २ ॥ मिरवूं नको आपल्या नामाच्या बडिवारा ॥ कलीचा पहारा विपरीत ॥ ३ ॥ येकाद्या पाप्याचें घेतां आडनांव ॥ आपला स्वभाव दाखवितें ॥ ४ ॥ तुझें नाम हलूं फूल तयाहुनी ॥ ह्मणे मध्वमुनी रामचंद्रा ॥ ५ ॥

## कवन १०१

जरी तुझें नाम मजला नुद्धरी ॥ बुडतां भवपुरीं अकस्मात ॥ १ ॥ तरी मी तयाची करीन विटंबना ॥ मग नारायणा रुसूं नका ॥ २ ॥ कोटिध्वज घाली चिमण्यास चारा ॥ भिकाऱ्यास द्वाराबाहेर घाली ॥ ३ ॥ तरी तो जाणावा सावकार दिवाळ्या ॥ देती शिव्यागाळ्या कंगालें तें ॥ ४ ॥ मध्वनाथ ह्मणे सांग सीतापती ॥ ऐसी का फजिती करूनि घ्यावी ॥ ५ ॥

## कवन १०२

कळीचा जो चुना त्याचें नांव सुधा ॥ सेविली त्या क्षुधा काय जाय ॥ १ ॥ तैसें तुझें नाम पतितपावना ॥ जानकीजीवना देवराया ॥ २ ॥ माझ्या अनुभवा येईल तें जेव्हां ॥ ह्मणेन मी तेव्हां खरें त्यासी ॥ ३ ॥ अंधःकारामध्यें मरतां दिनमणी ॥ तरी काय रजनी जाईल लया ॥ ४ ॥ जैं धोतऱ्याचें नाम

तें कनक ॥ गहाण त्यासी धनिक न ठेविती ॥ ५ ॥ मध्वनाथ म्हणे गौडया नांव राज ॥ राजाघरीं गज लोखंडाचा ॥ ६ ॥

## कवन १०३

शुकसारिका डोलती ॥ नाम रामाचें बोलती ॥ १ ॥ त्यांचा न दिसे उद्धार ॥ नामें मुक्तिचा उद्धार ॥ २ ॥ मुक्ति होणें नाहीं नेमें ॥ नाम आळवावें प्रेमें ॥ ३ ॥ माझ्या अनुभवा आलें ॥ चित्त नाहीं राम जालें ॥ ४ ॥ राम नाम जपे सती ॥ तिसी काय होते गती ॥ ५ ॥ तिचा जीव प्राणनाथ ॥ त्याचा धरूनी गेली हात ॥ ६ ॥ पाहाती कौतुक जे लोक ॥ तेहीं करितीं तिचा शोक ॥ ७ ॥ म्हणती धन्य पतिव्रता ॥ जैसी रामाची ते सीता ॥ ८ ॥ त्यासी न येती विमानें ॥ गेलें नामाचें महिमान ॥ ९ ॥ उत्तरेचा जो प्रणाम त्यासी ह्मणती रामराम ॥ १० ॥ तेही कांहो नुद्धरती ॥ सांगा खरें रघुपती ॥ ११ ॥ मध्वनाथ ह्मणे रामा ॥ तुझ्या स्मरेन मी नामा ॥ १२ ॥

## कवन १०४

तुम्हीं उद्धरिला गांव ॥ मुक्त त्रिभुवन नांव ॥ १ ॥ हाहीं अनर्थ आघवा ॥ कळू आला जी राघवा ॥ २ ॥ नामें तारिली गणिका ॥ गोष्टी सांगाव्या आणिका ॥ ३ ॥ अजामेळ पुत्रनांवें ॥ स्मरतां वैकुंठासी जावें ॥ ४ ॥ याही गोष्टीचें हीनत्व ॥ गेलें नामाचें महत्व ॥ ५ ॥ येक नांव दोघां जणा ॥ पाचारितां तर्कें शहाणा ॥ ६ ॥ हें तों तुह्मासी कळेना ॥ बुद्धियोगासी मिळेना ॥ ७ ॥ स्मरतां वज्री रवी फणी ॥ धाउनि यावें तिघांजणी ॥ ८ ॥ हे तो न पडे उचितात ॥ गोष्टी समजावी चित्तांत ॥ ९ ॥ आम्ही जाणुनी म्हणतों ॥ भवचक्रांत शिणतों ॥ १० ॥ ऐसें तुम्हां न पाहिजे ॥ धरूनि अबोला राहिजे ॥ ११ ॥ परिसा देवाजी सर्वज्ञा ॥ येईल घडोनी अवज्ञा ॥ १२ ॥ जीवेभावें जगन्नथा द्यावें अज्ञान माझे माथा ॥ १३ ॥ तुम्हीं नामरूपातीत ॥ तेथें कैचें जी पतीत ॥ १४ ॥ मध्वनाथा नलगे मुक्ति ॥ द्यावी सद्‌गुरुची भक्ति ॥ १५ ॥

## कवन १०५

चित्रकार लिहितो चित्रें । नाना अवतार चरित्रें ॥ १ ॥ त्यासि कांहो नव्हे गती । सत्य सांगा रघुपति ॥ २ ॥ स्मरण मानसाचा धर्म । चितार्‍याचें शुद्ध कर्म ॥ ३ ॥ नामस्मरण ऐलिकडे । सोपें सुगम पक्षी पढे ॥ ४ ॥ आम्हीं करितों वर्णाचार । नेणो प्रेमाचा विचार ॥ ५ ॥ नाम स्मरणाची किल्ली । नाहीं माझ्या हातीं आली ॥ ६ ॥ नुवडे मुक्तिचें कवाड । फिरतों मायेच्या पडद्याआड ॥ ७ ॥ मध्वनाथ ह्मणे देवा । न कळे प्राक्तनाचा ठेवा ॥ ८ ॥

## कवन १०६

अनंत पातकी मोडुनि घाडिलें । बाहेर दवडिलें प्रायश्चित्तीं ॥ १ ॥ माझ्या पदरीं पुण्य असतें उत्तम । तरि मी तुझें नाम आठवितों ॥ २ ॥ रामनामीं रत तो नर विरक्त । म्हणती जीवन्मुक्त संत त्यासी ॥ ३ ॥ नामासि विन्मुख तो महा पातकी । विश्वासघातकी अमंगळ ॥ ४ ॥ माझ्या पातकाचा मातंग संभार । करूं त्याचा संहार नामसिंह ॥ ५ ॥ मदोन्मत्त गज वैरिया पाचारी। मग काय संहारी सिंह त्यासी ॥ ६ ॥ जो ज्याचा स्वभाव तो नव्हे अन्यथा ॥ गुरुमुखें मध्वनाथा कळलें ऐसें ॥ ७ ॥

## कवन १०७

नाममहिमा लाटिका ह्मणे । त्याच्या पूर्वजासी उणें ॥ १ ॥ जेथें उच्चारिती नाम । तेथें प्रगटे श्रीराम ॥ २ ॥ धन्य धन्य साधु संत । ज्यांसी भेट भगवंत ॥ ३ ॥ नामासरसी वाजे टाळी । होते पातकांची होळी ॥ ४ ॥ एका पायाळाच्या गुणें । दिसतीं पाताळींचीं धनें ॥ ५ ॥ तैसें सद्गुरुच्या संगें । निवतीं साधकांचीं अंगें ॥ ६ ॥ नाथ ह्मणे अनुतापें । नाम स्मरता जातीं पापें ॥ ७ ॥

## कवन १०८

दाता सकळांचा म्हणवितो आपणां । सदावर्तीं जाणा दुकळांत ॥ १ ॥ दारापाशीं नाहीं कोणासी आडकाठी । आपल्या हातें वाटी अन्नोदक ॥ २ ॥ तेथें येक आलें भुकेलें भिकारी । अधीर हांका मारी पोटासाठीं ॥ ३ ॥ सांडून सर्व काम आधीं द्यावें त्यासी । दीन उपवासी चरफडी तें ॥ ४ ॥ न देतां तयासी करील अमर्यादा । धाल्या स्तुतिवादा करील ते ॥ ५ ॥ मध्वनाथ ह्मणे हेचि माझी दशा । तुम्हासी जगदीशा कळों द्यावी ॥ ६ ॥

## कवन १०९

जरी महापुरीं बुडतां चांडाळ । देखुनि दयाळ उडी घाली ॥ १ ॥ लाउनिया कासे देउनिया धीरा । नेतो पैलतीरा दीनबंधु ॥ २ ॥ तैसें तुझें नाम तारक उदारा । तरी माझा उद्धार करूं देवा ॥ ३ ॥ परि मी तयाचें करीना स्मरण । आलिया मरण येक वेळे ॥ ४ ॥ मध्वनाथ ह्मणे धरुनि माझ्या कंठा । मज ने वैकुंठा बलात्कारें ॥ ५ ॥

## कवन ११० श्लोक.

श्रीपांडुरंगपदपंकजपूजकानें । केली हरीस विनती प्रभु केशवानें ॥

श्रीव्यंकटेश्वरउपासक पुण्यधामा ।। तो पत्रिका परिसवी द्विज कृष्णनामा ॥ १ ॥ देवा गणेश करुणा बहु भाकियेली । ते पत्रिका गिरिवरी तिस ऐकवीली ॥ मागीतलें विमळ उत्तर पत्रिकेचें । आरंभिलें सकळ सार्थक मैत्रिकींचें ॥२॥ देवा गणेश कथिलें गुज व्यंकटेशें । देईन दर्शन रघूत्तम मूर्तिवेषें ॥ स्वप्नामधें कथिन मी लिखितार्थ त्याला । ऐसा निरूपम निरोप तयास जाला ॥ ३ ॥ श्रीमध्वनाथकविच्या घरीं रामचंद्रें । केली कृपा रघुविरें गुणरत्नसांद्रें ॥ श्री लक्ष्मणासहित जानकीकांत आला ॥ उत्साह मंगळतुरीं नगरांत जाला ॥ ४ ॥ कन्याप्रदानविधि व्यंकटराजभक्ती । केला महोत्सव यथोचित तो स्वशक्ती ॥ सीतास्वयंवर मनोहर लग्न केलें । वैकुंठराजभुवना कुळ सर्व नेलें ॥ ५ ॥ श्रीमद्गणेशतनयेति मया भिधानें ॥ दिव्यांबरें कनकभूषण अन्नदानें ॥ श्री व्यंकटेशभजनीं अति सावधानें ॥ ते पूजिली वधुवरें करुणानिधानें ॥ ६ ॥ श्रीरामचंद्रपदपंकजसेवकासी । उत्साह थोर हृदयीं अति भाविकांसी ॥ कोदंडपाणि चिमणा भवदुःख वासी । तो भेटला सगुण पंचवटीनिवासी ॥ ७ ॥ श्रीमध्वनाथसदनीं प्रतिमा विराजे । लावण्य देखुनि जिचें रतिनाथ लाजे ॥ पायीं सदैव बिरुदावळि दिव्य वाजे । भागीरथी पतितपावन कीर्ति गाजे ॥ ८ ॥ श्रीमध्वनाथ रघुनाथउपासकानें । हे श्लोक पैं विरचिले अति भाविकानें ॥ जो चित्त घालुनि सदा परिसेल कानें । तो वंदिजे सुरवरीं निजमस्तकानें ॥ ९ ॥

## कवन ११?

क्षेत्र नासिक धरातळिं आहे । मध्वनाथ कवि ज्या स्थळिं राहे ॥ गौतमीजळ सुशीतळ वाहे । साधका परम कौतुक पाहे ॥१॥ ठाण मांडुनि उभा जगजेठी । नित्य येति सनकादिक भेटी ॥ राममूर्ति भुवनत्रयिं मोठी । वर्णिताति महिमा शतकोटी ॥ २ ॥ सेविं तू विमल पंचवटी रे । पापताप अवघे निवटी रे ॥ त्या स्थळीं करुनि पर्णकुटी रे ॥ सिद्ध होउनि यमास कुटी रे ॥ ३ ॥ सेवितांच अरुणा वरुणा रे । वृद्ध होइल नवा तरुणा रे ॥ स्नानदान करितां स्मरणा रे । राम त्यावरि करी करुणा रे ॥ ४ ॥ पूर्ववाहिनि सरस्वति जेथें । नित्य वैष्णवसमागम तेथें ॥ नीळकंठ गतिदायक सर्वां । सेवि तूं त्यजुनि वैभव गर्वा ॥५॥ तीर्थराजमहिमा न कळे रे । दर्शनें करुनि दुःख जळे रे ॥ त्यास्थळीं वसति पंडितवृंदे ॥ वेद घोष करिती द्विज छंदे ॥६॥ अस्थिचें उदक ज्या स्थळिं होतें । तीर्थपावन अगाध अहो तें ॥ शंभुच्या हरुनि ब्रह्मकपाटा । पातकें पळतिं सर्व तिवाटा॥७॥ रुक्मिणीरमण विठ्ठल भोळा । पुण्यवंत पाहाती निजडोळां ॥ दक्षिणेस विलसे बळराम । पांडुरंग भज मंगलधाम ॥८॥ पाहतां नयनिं त्या नरसिंहा ।

साधका भवरिपू निरसी हा । चिंतिल्या सकळ दोष निवारी । कामना पुरविते शनिवारीं ॥ ९ ॥ पाहतां नयनिं त्या हनुमाना । मूर्ख लोक करितीं अनुमाना ॥ तीर्थरक्षक उभा उमजाना । रामदूत हृदयांत भजाना ॥ १० ॥ इंदिरारमण तो जलशाई । तापत्रयास करि शीतलशाई ॥ पाहतां विमल सुंदर डोहा । काळशत्रु मतिमंद रडो हा ॥ ११ ॥ चक्रतीर्थ महिमा वदवेना । देखतांच पळते कलिसेना ॥ पूजितां शिवसनातन भावें । दर्शनें करुनि निर्मळ व्हावें ॥ १२ ॥ मुक्त ईश्वर उमापति वंदी । स्वर्गिचें सुख अमंगल निंदी ॥ विघ्नराज हनुमंत पहातां । सर्व सौख्य मग येइल हातां ॥ १३ ॥ पाहत नयनिं शूर्पणखा रे । पाप कायिक कदापि न थारे ॥ ब्रह्मयोनि चुकवी चवऱ्यायशी । सर्वि सप्तऋषिंच्या विवराशी ॥ १४ ॥ सांडुनी सकळ देह अहंता । पूजि तूं विमळ संतमहंता ॥ हा उपाय तुजलाच तराया । सोडि पोकळ वृथा चतुरा या ॥ १५ ॥ श्लोक पंचदश हे यमकाचे । ऐकतां श्रवणिं तो यम काचे ॥ काळमृत्युं झगडू न शके रे । संकटें इतर तें मशकें रे ॥ १६ ॥

## पद ११२

जय देवी नमो तुज गंगे वो ॥ ध्रु० ॥ दर्शन वंदन मज्जन करितां सज्जनमानस रंगे वो ॥ १ ॥ तव तटिं अर्जुनसारथि भेटे । दुर्जन दुर्गति भंगे वो ॥२॥ मध्वमुनीश्वर मागतसे तुज । माझी निनवी अंगें वो ॥ ३ ॥

## पद ११३

आनंद झाला । देवकीउदरा देवचि आला गे ॥ १ ॥ हरीखेलीं मायबापें ठाईंच्या ठाईं करपलीं महापापें ॥ २ ॥ वर्षती सुर सुमनें । योगीश्वर हर्षती सुरसमनें ॥ ३ ॥ नारद तुंबर गे । जयजयकारें नाचति सुंदर गे ॥ ४ ॥ दुंदुभि वाजविती । मध्वनाथा देव नवाजविती ॥ ५ ॥

## पद ११४

घेउनी पंकजनयना । दशशतफणिवर शयना ॥ जातो व्रजपती अयना । इतरांचें मज भय ना ॥१॥ माया तूं माझी यमुना । तव पदीं वाहिन सुमनां ॥ भावें करितों नमना । विघ्न नको करूं गमना ॥ २ ॥ ऐसी विनती करितां । होउनी स्वानंद भरिता ॥ हरिपद शिउनी त्वरितां । द्विधा झाली सरिता ॥३॥ मध्वमुनीश्वर संगीं । असतां राखे प्रसंगीं ॥ म्हणोनि अंतरंगीं । भाव धरा श्रीरंगीं ॥ ४ ॥

## पद ११५

धन्य ते गोपाळ धन्य ते मथुरा । धन्य यशोदादेवी चतुरा ॥ध्रु०॥ नंदाघरीं अवतरला कान्हा । द्वारीं वाद्यें वाजतीं नाना ॥ गर्जति घंटा जगठ झणाणा । गंधर्व गाती करिती तनाना ॥ १ ॥ गौरवी गोपति दीना दरिद्रा । गोवळ सिंपिती दधी हरिद्रा ॥ अभ्यंग करूनी लाउनी मुद्रा । पाहती परमानंदसमुद्रा ॥ २ ॥ पूजुन ब्राह्मण त्या नंदानें । दानें दिधलीं आनंदानें ॥ गौळणी घेती देती मानें । वाटिती साकर पिकलीं पानें ॥ ३ ॥ साधक सांडुनि देती मुक्ती । परिसती गोपिकांच्या उक्ती ॥ तार्किकांच्या न चलती युक्ती । नाम स्मरतां चारी मुक्ती ॥ ४ ॥ गोकुळगांवीं प्रगटली कमळा । दिनमणितनया वाहे विमळा ॥ कुंजवनीं मधु मन्मथ जमला । मध्वमुनीश्वर ज्या स्थळिं रमला ॥ ५ ॥

## पद ११६

पाहुं दे वो बाई तुझा कान्हा ॥ध्रु० ॥ उपजला मज स्नेहो । पायख यासी न हो ॥ न धरत आला पयपान्हा ॥ १ ॥ यासी झणिं लागो दिठी । नामरूपीं पडो मिठी ॥ गुणवंत आहे भला तान्हा ॥ २ ॥ सांवळें हें जावळाचें । बाळ बहू नवसाचें ॥ यासि परब्रह्म ऐसें माना ॥ ३ ॥ आंगीं शोभे आंगडें वो । माथां कुंची चांगलें वो ॥ मध्वनाथ आणी यासी ध्याना ॥ ४ ॥

## पद ११७

तूं नंदगोपा संसारीं धन्य धन्य रे ॥ध्रु०॥ त्रिभुवनीं तूंचि श्लाघ्य । उदित तुझेंचि भाग्य । गेलें दिगंता दुःख दैन्य रे ॥ १ ॥ स्मरणें तुझ्या बापा । ठाव नुरेचि पापा ॥ धाकें निमालें दैत्यसैन्य रे ॥ २ ॥ यशोदेसी मायबाई । म्हणतो क्षीराब्धिशायी ॥ त्यासी पाजी निज स्तन्य रे ॥ ३ ॥ मध्वनाथा आळवितें । वोसंगा खेळवितें ॥ काय वर्णूं मी तिचें पुण्य रे ॥ ४ ॥

## पद ११८

पावन गुणगण हरिचे गाई । रे ॥ध्रु० ॥ हलधर गिरिधर गोकुळीं जाले । बाळक नंदाघरिंचे ॥ १ ॥ उद्धरिले हरिनें पशुपक्षी । तरुवर यमुनातीरिंचे ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर म्हणतो मनुजा । वर्णि तूं नाना परिचें ॥ ३ ॥

## पद ११९

ब्रह्मसनातन ब्रह्मसनातन ब्रह्मसनातन शौरी ॥ध्रु०॥ जाईल तो दुरि ह्मणोनि यशोदा । पायांसि बांधिते दोरी ॥१॥ निर्गुण व्यापक नित्यमुक्त मूर्ति । पाहते गोरी मोरी ॥ २ ॥ स्वयंतृप्त जरि म्हणवितो तरी । करितो गोरस चोरी ॥३॥

स्वानन्द ईश्वर अवाप्त काम तो । चाळवी गौळ्यांच्या पोरी ॥ ४ ॥ नित्य सदोदित नाम रूपातित । आवडे राधा गोरी ॥ ५ ॥ मध्वमुनीश्वर दिसतो लहान । कोण जाणें त्याची थोरी ॥ ६ ॥

## कवन १२०

नंदनंदन गोविंदा । दावी तव पदअरविंदा ॥ मानस मधुकर मकरंदा । सेविल सुखकर मुकुंदा ॥ १ ॥ मारिसी माउसी विवसीला । अधरीं धरिसी वंसीला ॥ पावन जाणुनि कुळशीला । भावें भुलसी तुळसीला ॥ २ ॥ कुंजवनीं श्रीगोपाळा । देखुनी कदंब झोपाळा ॥ तेथें बांधुनी चौपाळा । झुलविती गोपी कृपाळा ॥ ३ ॥ हरिसी संचित गोरसा । हरि तूं न दिससी चोरसा ॥ गोपीस त्रासती किशोरसा । मध्वमुनीश्वर थोरसा ॥ ४ ॥

## पद १२१

सोडी तूं सावळ्या मैदा । जनमनमोहना राजीवनयना नंदा रे ॥ ध्रु० ॥ अलगट गोवळा बाल मुकुंदा । नेणें कंदुक मी गोविंदा रे ॥ १ ॥ निर्दय माझ्या सासानणदा । दरभावे करिती निंदा रे ॥ २ ॥ बाहेरल्याली हा वोंगळ धंदा । मी त्या जाउनी सांगतें नंदा रे ॥ ३ ॥ कांरे दादुनी भोगिली वृंदा कोण दंडिल पैं तुज लौंदा रे ॥ ४ ॥ मध्वमुनीश्वर सच्चिदानंदा । तुझ्या वंदितें चरणारविंदा ॥ ५ ॥

## पद १२२

हाले किसना सावल्या । ताक पिला बावल्या ॥ वेले वेले चाल कलिसी । का ल वाकुलपावल्या ॥ १ ॥ आह्मीं काली बलवंता । काले वोल्हिसी पलवंता ॥ देखल सासू कपाल फोलिल । हातीं घेउनि वलवंता ॥ २ ॥ आंत बाहेल हिलवा तूं । दिससी बीद मिलवा तूं ॥ गोल्या भुलक्या पोली भुलविसी । आहेस भोंदू बलवा तूं ॥ ३ ॥ वोलें खोवले खालका । म्हणसी आह्मां फालखा ॥ मध्वमुनीश्वर गलजू होसी । बिजवल नवल्या सालखा ॥ ४ ॥

## पद १२३

सोडि कर झडकरिं सखया । मज भरूं दे नीर ॥ ध्रु० ॥ वंशवटातळीं चेटक केलें । भारूनि यमुनातीर ॥ नेटकीं देखुनी ललना । तिचें वोढिसी चीर ॥ १ ॥ खटपट घरिची वारूनि येतें । न लावी कांहीं उशीर ॥ चटपट लागली तुजला । राहे घडीभर थीर ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर भोंदू दिससी । केवळ तलुर अधीर ॥ भुलविसी नागरअबला । गोवळ कपटी आहीर ॥ ३ ॥

## पद १२४

सर सर सरसिजनयना । सर परता जाय ॥ ध्रु० ॥ अवचित माझ्या पदरा धरिसी । अनुचित करिसी काय ॥ संचित गोरस हरिसी । वरि तुरविसी साय ॥ १ ॥ मध्वमुनीश्वर देवा तुझा । अघटित उलटा न्याय ॥ अकपट निकट मी वनिता । शिरीं धरितें पाय ॥ २ ॥

## पद १२५

हारे मनमोहना लाल कान्हो सर परता तूं लबाडा ॥ध्रु०॥ घोर अंधारींरात्रीं मुरारि उघडिलें कां रे कवाडा ॥१॥ परपुरुषाचा संगचि खोटा । माझा दहाचा वाडा ॥ २ ॥ चहूंकडे तुझा उजेड पडला । केला जिवाचा निवाडा ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर सेवक तुझा । गातो हाचि पवाडा ॥ ४ ॥

## पद १२६

पहा पहा सावळा कैसा धीट । न बोलावें बोलतो तेंचि नीट ॥ बोलण्याचा कोणासी नये वीट । बोलावरुनि वोवाळा मोहऱ्या मीठ ॥ १ ॥ म्हणतो माझी पिंवळी लपविली हे गोटी । उलटया भोंवऱ्याची चोरी लावि मोठी ॥ कंचुकींत पाहतो गोष्टी खोटी। परोपरी घालितो खडे पोटीं ॥ २ ॥ अवचित माझ्या डोळां गेलें होतें कणू । शहाणा तुझा जाणुन नारायणू ॥ फुंकुन काढिल ऐसें आम्ही हेंच जाणूं। चुंबन देतसे ते वेळीं काय म्हणूं ॥ ३ ॥ गोरस देखुनी लावितो गोडीमोडी । गोडबोल्या राजस डोळे मोडी ॥ ऐशा याच्या उदंड आहेत खोडी । मध्वनाथासि बाई ये हात जोडी ॥ ४ ॥

## पद १२७

तो हा वो बाई मदनमोहन अति नाटकी ॥ ध्रु० ॥ मथुरे जाता हाटा । गोरसाचा मागे वाटा । वृंदावनीं चंद्रानना अटाकितो हा वो बाई ॥ १ ॥ यमुनेच्या वाळवंटीं । वोशी वटातळवटीं । येतां जातां गोपिकासि । हटकितो हा वो बाई ॥ २ ॥ भोगुनिया व्रजनारी । म्हणतो ब्रह्मचारी । मध्वनाथाची हे माया लटकी । तो हा वो बाई ॥ ३ ॥

## पद १२८

कानडा कौसालि मोठा कपटी ठकडा गे ॥ ध्रु० ॥ यानें मोडिला गाडा । उमळून पाडिलें झाडा ॥ सगळ्या बगळ्याचा बाई केला रगडा गे ॥ १ ॥ ध्याती जयासि योगी । तो चंद्रवदना भोगी ॥ वृंदावनीं गाई चारी उघडा गे ॥ २ ॥ बाहेरख्याली मोठा । रचितो प्रपंच खोटा ॥ गाऱ्हाणें देतां माय

करितो झगडा गे ॥ ३ ॥ नांवाचा मध्वनाथ । यासि जोडावे हात ॥ जेथें तेथें याचा पडतो पगडा गे ॥ ४ ॥

## पद १२९

सये बाई आवरी हा यदुराज ॥ध्रु०॥ घरोघरीं चोरी करुनि खातो । याला धणिवर गोरस पाज ॥ १ ॥ गोकुळ टाकुनि मथुरे जावें । याभीण आलों चाज ॥ २ ॥ कुंजवनामध्यें राधिकेसीं । कौतुक केलें आज ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वरस्वामीस कांहीं । तिळभर नाहीं लाज ॥४॥

## पद १३०

तुम्ही सांगा कांहीं त्याला ॥ ध्रु० ॥ अवचट माझ्या सदना आला । गोरस अवघें प्याला ॥ १ ॥ निर्दय बहुत्र घरधनी माझा । नाहीं तयाला भ्याला ॥ २ ॥ मध्वमुनीश्वरवरद यशोदे । छळितो ज्याला त्याला ॥ ३ ॥

## पद १३१

मोठा अनिवार अवो बाई । ठकडा कृष्ण लबाड ॥ ध्रु० ॥ लहान बाळें मिळवुनी गोवळ आपण करितो चोरी । गोरस पीतो न कळे कैसें उघडुनिया कवाड ॥ १ ॥ करुनि अकर्ता ह्मणवितो हें भुलउनी तरुण्या नारी ॥ स्वरूपीं यांच्या विन्मुख त्याला लावितो लिगाड ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर हृदयविहारी अगुणी अक्रिय साचा ॥ धरीन म्हणतां पळून जातो लपतो मायेआड ॥ ३ ॥

## पद १३२

मोठें अनिवार तुझें लहान श्रीधर पोर ॥ ध्रु० ॥ येक दिनीं माझ्या सदना आलें नाहीं कोणा भ्यालें ॥ माझें संचित गोरस प्यालें ऐसें हे शिरजोर ॥१॥ प्रातःस्नाना यमुनातीरा गेल्या सगुणानारी ॥ कळंबावरि वेंधुन त्यांचे लपविले परकोर ॥ २ ॥ मध्वमुनीश्वरहृदयविहारी गोपीमानसचोर ॥ लाविल हें वो बोल कुळाला नंदाचें घर थोर ॥ ३ ॥

## पद १३३

नाहीं अनिवार माझें तान्हें लहान बाळ ॥ ध्रु० ॥ निजघरीं याला काय उणें मग बाहेर करितो चोरी । सगुण गुणाचा लाटिका यावरि घालितां हा आळ ॥ १ ॥ तलग्या तरण्या मिळुनि यांचा करितां तंटप सारा ॥ गाऱ्हाण्याची वेळ नव्हे हे जाला प्रातःकाळ ॥ २ ॥ मध्वमुनीश्वरहृदयविहारी अभिनव करणी याची ॥ शाहाण्या गरती समजुनी याला उगविती मायाजाळ ॥३॥

## पद १३४

बोलु नको जाय जाय मैदा ऐसा काय विनोद ॥ रे ॥ ध्रु० ॥ अचपळ अगुणी नाम तुझें तें लटिकें कोण ह्मणे रे ॥ खटपट करिसी त्याला ठकाविसी करिसी त्यासि विरोध रे ॥ १ ॥ सासू अविद्या माझी मजवरी करील आपला नास ॥ अभिनव तुझ्या ऐशा गोष्टीनें जळती कामक्रोध रे ॥ २ ॥ परवनितांच्या हृदया झोंबसी अधरामृतरस घेसी ॥ मुरलीनादें मोहित करिसी न-कळे तुझा शोध रे ॥ ३ ॥ कुळवंताची कार मी भोळी नेणें कुडया कपटा ॥ सद्गुरुकृपें ॥.........

## कवन १३५

जा जा जा जा वो जा जा करितां कां गाजावाजा सांडुनी दिल्या तुम्हीं लाजा तारुण्यें माजा उदास गोळियांच्या भाजा गोकुळीं साजा ॥ कांहीं केल्या हितगुज नुमजा अंतरीं समजा टाकुनि गमजा ॥ १ ॥ हरिला आणुनि हरी म्हणता हा अनिवारीं ॥ तलग्या तरुण्या तुम्हीं नारी कलयुगींच्या कारी कैशा नादाल घराचारी प्रपंचभारी ॥ नेणा बाळक हें अवतारी सकळां तारी बहु उपकारी ॥ २ ॥ तुम्हीं बाळा आणि ग्वा भाळा नसत्या घालिता आळा ॥ गोष्टीस कांहीं नाहीं ताळा करितां चाळा ॥ देवें घातलें मायाजाळ नेणा जीवें भावें वोवाळा या मध्वमुनी दयाळा ॥ ३ ॥

## पद १३६

विमल कमलदलराजसनेत्रारे ॥ ॥ ध्रु० ॥ कर्णीं कुंडलांची दाटी । माथां मोरपिसां वेठी । शोभे चंदनाची उटी । शामळ गात्रारे ॥ १ ॥ मधुमुर झोडिसी व्रजवधू वोढिसी । खासी दधि फोडिसी । गोरस पात्रा रे ॥ २ ॥ चोरजार शिरोमणि । ऐशा तुजलागुनी । ध्यातो मध्वमुनी सज्जनमित्रारे ॥ ३ ॥

## कवन १३७ गौळण

जात होतें मथुरेच्या हाटा । तेथे आला यशोदेचा गाटा ॥ याचा यास नाहीं दिला वाटा । चोरीपोरीं लुटिला दहिमाठा ॥ १ ॥ कान्हो मोठा कपटी कानडा गे । गोकुळिचा गोवळ ठकडा गे ॥ घरीं नसतां लावितो झगडा गे । मध्यें होतो माझा रगडा गे ॥ २ ॥ अहंकार माझा घरधणी । पापरूपी सदा अवगुणी ॥ त्याची गोष्टी सांगो काय उणी । न मानी देवाधर्मा लागुनी ॥ ३ ॥ गांव जळे हनुमंत निराळा गे । आपण कौतुक पाहे वेगळा गे ॥ मध्वनाथ-स्वामी चांगला गे । कैसा मजभोंवता लागला गे ॥ ४ ॥

## कवन १३८

घरधनी गर्वनिधीताठा । येकायेकीं गेला धट्टाकट्टा ॥ करूनि संसाराच्या बारा वाटा । मग आला विश्रांतीच्या घाटा ॥ १ ॥ सर परता गोवळा अळगटा । धननीळा कान्हो हिरवटा ॥ आम्हीं गोपी आहों बळकटा । न गणूं चोरा काळ्या कुणबटा ॥ ज्याचा हात अखंड खरकटा । तया कामा ठोकिलें मर्कटा ॥ तुझ्या नामें तोडी मणगटा । क्रोध देश दिल्हा देसवटा ॥ ३ ॥ घरधनी कुळवंता कारी बरवंटा । त्यांच्या वोढानिया परवंटा ॥ मध्वनाथा स्वामी निगरंगटा काय झोंबलासी माझ्या कंठा ॥ ४ ॥

## कवन १३९

गोकुळांत कुडें सर्व चालें । अवघे बाजेगिरिचे ते चाळे ॥ कोण शहाणी नावरूपा भाळे । जिचे पूर्ण मनोरथ जाले ॥ १ ॥ कान्हो लागो नको माझे तोंडीं । मी तर नाहीं तुझी कानकोंडी ॥ असत्याची खाईल जे रोंडी । तिजवर पडो आकाशाची धोंडी ॥ २ ॥ तुझी प्रीतिपात्र चंद्रावळी । वृंदावनीं भोगी वनमाळी ॥ राधिकेचा ळळा आधीं पाळी । तिच्या घरा जाय संध्याकाळीं ॥ ३ ॥ खेळ खेळुनि न पडे जो डाईं । तोच उमजला आपल्या ठायीं ॥ मध्वनाथा नको करूं घाई । निरंजना वनीं चारी गाई ॥ ४ ॥

## कवन १४०

कृष्ण ह्मणे वडज्या वेड्या । पेंद्या सुदाम्या वाकड्या ॥ १ ॥ वृंदावन कुंजामाजीं । करूं दहिकाला आजि ॥ २ ॥ ऐसें वाटे माझ्या जीवा । तुम्हीं अवघे येथें जेवा ॥ ३ ॥ तुमच्या पाहूं द्या सिदोऱ्या । मजसी करूं नका चोऱ्या ॥ ४ ॥ शिळी खिचडी दहीं खाऊं । अवघे येकरस राहूं ॥ ५ ॥ अवघे येथील येथें सारूं । सिदोरीचें ओझें वारूं ॥ ६ ॥ तुम्हीं जिवलग सांगाती । जेऊं येकेचि पंगतीं ॥ ७ ॥ जाल्या तृप्तीचें तें सुख । मग अनुभव होईल येक ॥ ८ ॥ वारिल्या रानीं गाई चारा । गडी अवघे ते पाचारा ॥ ९ ॥ मध्वनाथाचिया बोला । वेडा वडजा मानवला ॥ १० ॥

## कवन १४१

वडजा कान्होबासी म्हणे । तुझ्या पावलों मी खुणे ॥ १ ॥ गडी बोलावी वाकडया । येरे राम्या कुलाकडया ॥ २ ॥ खरखरमुंडया बेटीचोदा । तुझा कुंभाराचा हुदा ॥ ३ ॥ बेटया बिसन्या यकबोटया । निलाजन्या लत्तकुटया ॥ ४ ॥ येरे महाद्या जोगडया । भांग्या नागव्या उघडया ॥ ५ ॥ नान्या बटकीच्या लेका । तुझा चुगलखोरांत लेखा ॥ ६ ॥ हनुमंत्या सेपटीच्या । बेटया उपजत लंगोटीच्या ॥ ७ ॥ येरे गरुडया निबरआंडया । तुझा भाऊ निपटगांडया ॥ ८ ॥ येरे बेटया अंत्या नाग्या । जन्मोजन्मींचा तूं लाग्या ॥ ९ ॥ बेटया महाद्याच्या गण्या । ढेरपोटया दांतउण्या ॥ १० ॥ साम्या कारटया सिंदळबोडया । बाराजिभ्या जगझोडया ॥ ११ ॥ बेटया सिंगाळीच्या नाद्या । तुला बोलावितो गोद्या ॥ १२ ॥ यारे यारे यारे । चेपुनी दहींकाला खारे ॥ १३ ॥ कान्हो देतो येकबेक । घेईना तो माझा लेक ॥ १४ ॥ मध्वनाथाचे सेवक । ब्रह्मादिकां करिती रंक ॥ १५ ॥

## पद १४२

येरे ईद्या बाईलभाडया । बेंबटमान्या भगदळपाडया ॥ १ ॥ पोटजळ्या मोकळतोंडया । किती चारशील मेंढया ॥ २ ॥ न सोडिसी जितमेल्या । यम्या तुझा झवे हाल्या ॥ ३ ॥ बेटया नीऱ्या हागिरगांडया । येरे वरुण्या पानबुडया ॥ ४ ॥ बेटया पादऱ्या पवन्या । तुला बोलावितो कान्हा ॥ ५ ॥ बेटया क्ष सहाडया । दुनेदाराच्या कुक...॥६॥ येश्या तुझा ढवळा बैल । मस ---तोहे पैल ॥ ७ ॥ कान्हाबाचे गडी... । त्यासी गोवळ कांपती चळी ॥८॥ ---कोणपाड । संवगडयांचा चालवी लाड ॥ ९ ॥ मध्वनाथाचिया सत्ता । कळिकाळा हाणती लत्ता ॥ १० ॥

## कवन १४३

रवळ्या तुझ्या पडल्या ठिणग्या । येरे सोम्या पांढरकणग्या ॥ १ ॥ त्रिभुवन मंगळीच्या । बेटया तिकोण्या टवळीच्या ॥ २ ॥ बेटया बुध्या हिरवटगग्या । सिंदळीच्या हेपुसलिंग्या ॥ ३ ॥ बेटया भटया गुरुगडया । उभा राहे बडबडया ॥ ४ ॥ चुकुर होऊं नको कान्या । दुसरा डोळा देईल कान्हा ॥५॥ राक्षसभुवनीच्या सन्या । घेरे उडी खुरासन्या ॥ ६ ॥ बेटया तुझी इजत राहो तुझें डोस्कें मारिलें हो ॥७॥ बेटा उरकेत मोठा । बोहेर थो...तरी खोटा॥८॥ देवाजीचा अनुग्रह । हात जोडी नवग्रह ॥ ९ ॥ मध्वनाथा गडी भोळा । त्यानें गोवळ केले गोळा ॥ १० ॥

## पद १४४

गोवळ म्हणती कान्होबासी–रे। वाकडयाच्या गोष्टी ऐकुनि भ्यालों रे ॥१॥ चहूंकडे आमच्या गाई फाकल्या रे। देखुनी वडजा दाखवितो वाकल्या रे॥२॥ अनिवारा आमच्या गाई वोढाळा। वराडीची सवे त्यासि गोपाळा ॥३॥ वाट सांडुनी धावती आडवाटे रे। वळत्या देतां पायीं मोडती काटे रे ॥४॥ नाहीं पायतन काठी घोंगडें रे। पावसाळ्याचें घडुत न धोंगडें रे ॥ ५ ॥ हिवाळा उन्हाळा कमुनी रानीं रे। कधीं न मिळे उत्तम अन्नपाणी रे ॥ ६ ॥ पुरे पुरे कान्हो तुझी गडी रे। कधीं न मिळे ताकाची ते कढी रे ॥ ७ ॥ तिखट कांदा भाकर खातों घाटा रे। बाहेर आम्ही मिरवितों ताठा रे ॥ ८ ॥ सजगुऱ्याचा भात खातों गोवरा रे। कांजी घालुनि रांधितो मिठोबरा रे ॥ ९ ॥ आंबट कण्या आंबिलीसी खातों रे। मिरसेंगाचें मीठ घालुनी लाटितों रे ॥१०॥ गाजराचें लोणचें तोंडीं लावितों रे। बाईलेस बोंडफळ दावितों रे ॥ ११ ॥ दिवाळीस खातों तेल खिचडी रे। दसऱ्याच्या दिवशीं पोळी दुचडी रे ॥१२॥ न मिळे दहीं दूध तूप लोणी रे। पोटागीचे घरीं नाहीं कोण्ही रे ॥ १३ ॥ ॥ १२ ॥ कान्होबासी म्हणती गडी गोपाळ रे। मध्वनाथा केंव्हां करिसी सुकाळ रे ॥ १४

## पद १४५

कृष्णा तुझ्या कपिला गाई चांगल्या रे। वोंगळ आमच्या कपाळासी लागल्या रे ॥ १ ॥ गोवळ म्हणती आमच्या गाई भाकडा रे। ऐकुनिया हासताहे वाकडया रे ॥ २ ॥ तुझे गडी दहीं दूध खातीं रे। आम्हीं तोंडीं घालून घेतों मातीं रे ॥ ३ ॥ नये दान करितां उत्तम पात्रीं रे। ऐशा वोंगळ गाई सर्व गात्रीं रे ॥ ४ ॥ येक हगरी येक मुतरी लातरी रे। चोरू या डुबर ते रात्रीं रे ॥ ५ ॥ कसे कान टवका...

## पद १४६

झेला झेला चेंडु झेला। झेलिना तो वाया गेला ॥ नरदेहीं घोडी केला। सारी खालें जीवें मेला ॥ १ ॥ येथें कामा न ये नीच। गडी पाहिजे तो उंच ॥ उंच झणेल जो उंच। त्यासी ठाव पिंपळाचेंच ॥ २ ॥ घोडीवरी होईल स्वार। त्याचा बहुत पडेल भार ॥ भाराखाले निघेल बूर। पोरें म्हणती घोडीकुर॥ ३॥ खेळ खेळूं नको आतां। चेंडूं येइल तुमच्या हाता ॥ कळीकाळासी हाणाल लाता। शरण जारे मध्वनाथा ॥ ४ ॥

## कवन १४७

मायानदीतीरीं प्रपंच वाळवंट । तेथें आरंभिला थाट हुतुतूचा ॥ १ ॥ चंदसूर्यादिक नांवें ठेवुनी घेती । यथाभागें होती खेळक रे ॥ २ ॥ स्वर्गफळरूप मांडोनिया फळी । अवघेही जवळी खेळताती ॥ ३ ॥ पापपुण्यरानें दोहींकडे वैरी । जाता नये दुरी भय त्याचें ॥ ४ ॥ जरी आपल्या बळें पलीकडे गेला । जिवंतचि मेला कोण सोडी ॥ ५ ॥ हुतुतु खेळता उदंडचि मेले ते नाहीं उठविले कोण्ही तरी ॥ ६ ॥ ऐसा गडी कैचा फळी फोडुनी जाय । धन्य त्याची माय प्रसवली ॥ ७ ॥ फळी फोडुनिया गेला येक शुक । वरकडही ठक करीताती ॥ ८ ॥ सावध होउनिया खेळ सुत तूं रे । येथें कांहीं नुरे बळ तुझें ॥ ९ ॥ मध्वनाथीं अवघा हुतुतू लटका । खेळाचा तटका तोडा कोण्ही ॥ १० ॥

## कवन १४८

कान्हो हुबळी रे कान्हो तूं बळी रे । तुझी मुरली ऐकून यमुना तुंबली रे ॥ ध्रु० ॥ भक्तिरसें वृत्ति जेव्हां तिंबली रे । तेव्हां तुझी मूर्ति हृदयीं बिंबली रे ॥ १ ॥ पिंड ब्रह्मांडाची उघडुनी संबळी रे । देव न पूजी त्याची जननी चुंबळी रे ॥ २ ॥ विषयतृष्णासर्पिण ज्याला झोंबली रे । गरुडध्वजा त्याची माय बोंबली रे ॥ ३ ॥ प्रपंचाची अवघी गोडी अंबली रे । मध्वनाथा नलगे जड कांबळी रे ॥ ४ ॥

## कवन १४९

त्यासी कारे विसरसी शेवटीं । मनुजा रे ॥ ध्रु० ॥ गोकुळांत प्रगटला । नंद गोपासाठीं ॥ १ ॥ कल्पद्रुमातळीं खेळे । कालिंदिचे कांठीं ॥ २ ॥ निरालंब तो हा उभा । टेकुनिया काठी ॥ ३ ॥ परब्रह्म व्यापक हा । धावे गाईपाठीं ॥ ४ ॥ गोपाळांच्या सोडितो हे । सिदोऱ्यांच्या गांठी ॥ ५ ॥ येकवट करुनिया । दहींकाला वाटी ॥ ६ ॥ मध्वनाथ नित्य तृप्त । उष्टे हात चाटी ॥ ७ ॥

## पद १५०

गगनीं बांधुनी घर बसली येक राजकन्या । चंद्रवंशींची म्हणविते हे राजमान्या ॥ व्यभिचार करिते जोगियासी फार मैत्री । सुमनसेजेवरि निजउनी भोगी दिवसरात्रीं ॥ १ ॥ अनाहत नौबत वाजविते घरीं घोष होतो । क्षण एक ऐकतां साधकाचा महादोष जातो ॥ जिच्या द्वारापुढें येक हत्तिण झुले ते सर्वकाळ । हत्तिणी लोटुनी येईल जो पुढें त्यास घालील माळ ॥ २ ॥ ठाईं ठाईं तिनें ठेविली रक्षण राजमार्गीं । त्रिकुटशिखरावरि खेळते अवला सिद्धवर्गीं ।

सद्गुरुकृपें मध्वनाथें वश केली बाळा । त्रिवेणीसंगमीं तिसी साधियेली लग्नवेळा ॥ ७ ॥

## पद १५१

मधल्या घरामध्यें निजली नागिणी कोण करी तिस जागे रे । घरीच्या धन्याला येऊं देइना पाहते त्याकडे रागें रे ॥ १ ॥ नागीण नोहे नागीण नोहे नाहीं विखाचे दांत रे । नवद्वाराचे मुंगीयांचें घर राहातें वारुळांत रे ॥ २ ॥ बाहेर येतां बहुत भीते अगणित वारा पीते रे । नागसराचेंन मोहित होते अनाहित नादें जीते रे ॥ ३ ॥ सुमनसुवास आवडतो तिस दुधाची आवडी मोठी रे । सद्गुरु मध्वनाथ गारोडी तिस बांधतो कमळादेठीं रे ॥ ४ ॥

## कवन १५२

केसी खेळविते चिद् शक्ति । मेळउनी अवघ्या व्यक्ति ॥ १ ॥ आपण बैसली दृढतर । त्रिगुण तिवईवर ॥ २ ॥ पोरें दहापांच मिळविते । येका मागें येक पळविते ॥ ३ ॥ डोळे झाकिते बहुतांचे । आपल्या हातें साचें ॥ ४ ॥ कैसी हिंडवते लेकरें । चौऱ्यायशीची घरें ॥ ५ ॥ जाली हीन सुदी सकळ । केली अवघी विकळ ॥ ६ ॥ इची इजपासी मिळाली । दिसती मात्र निराळीं ॥ ७ ॥ ऐसा गडी कैचा तिहीं लोकीं । इचेही डोळे झाकी ॥ ८ ॥ तिवईवरून चळवी खेळ मोडून पळवी ॥ ९ ॥ समूळ पिंपळ परी तोडी । कपाळ ईचें फोडी ॥ १० ॥ नाथ शिकवितो उपाय । चुकती सर्व अपाय ॥ ११ ॥ स्वरूपीं धारितां निजसोय । भेटेल मध्वनाथ ॥ १२ ॥

## पद १५३ पंडित

जाणुनी वक्ता वक्ताहो । जाला पंडित वक्ता हो ॥ अखंड निंदी भक्ता हो । नेण जीवन्मुक्ता हो ॥ १ ॥ ऐसा पंडित अभिमानी । आपला माहिमा बहु वानी ॥ संतजनाला अपमानी । त्याच लटकेंत वमानी ॥ २ ॥ अव्हेरूनी भगवंता । जी जी करिती धनवंता ॥ निंदीत फिरती बहु संता । पाडील त्यांच्या यम दंता ॥ ३ ॥ विसरुनी बंधु शुक्राचा । विचार रासभचक्राचा । न करी जय तो अक्रांचा । स्वभाव सज्जनवक्रांचा ॥ ४ ॥ समीप असतां अरविंदा । दर्दुर नेणें मकरंदा ॥ काय ह्मणू त्या विषयांधा । अखंड चिखलाचा धंदा ॥५॥ पर्वत वान्हि धूमेसी । अखंड खटपट नेमेसी ॥ उपाधिइंधन भावेंसी । अंतीं बंधन जीवेंसी ॥ ६ ॥ ऐसा पंडित बहु निका । पढवी चिंतामणिटीका ॥ मिळवी दानावरि शिविका । श्रीहरिभक्तीवीण फिका ॥ ७ ॥ आपली मिरवी चतुराई । कुटुंब पोसुनी उतराई ॥ मध्वनाथ वरदायी । जाणें पंडितजन घाई ॥ ८ ॥

## पद १५४

लई लई लाकोटा । सांड चाळा तो खोटा ॥ बळकट खोउन कासोटा । गे सोडूं नको आंगोठा ॥ १ ॥ नांव तुझें माठें गे । आतां जाशिल कोठें गे । मोडूं नको बोटें गे । खाल्ले फार पोटें गे ॥ २ ॥ चळें घेउनी काकोचे । मोतीं लेई नाकीचे ॥ आईजीच्या लेकीचे । घर घेई येकीचे ॥ ३ ॥ तुझो माझी गडी गे । खाऊं नको कोरडी गे ॥ खेरूं नको दरडी गे । बांधीन तुझो नरडी गे ॥ ४ ॥ समजुन आपल्या ठायीं गे । खेळ मजसी डाई गे ॥ तरीच तुजला बाई गे । भाळल माझा भाई गे ॥ ५ ॥ उभी माझे सवती गे । बघूं नको भंवती गे ॥ पडलीस माझे हातीं गे । रमवीन मध्वनाथीं गे ॥ ६ ॥

## पद १५५

घाला बाई पींवो । सांडुनी धांगडधिंगा वो ॥ सांडुनी कामसंगा वो । रामरंगीं रंगा वो ॥ १ ॥ अनुभव नाहीं निका हो । मान हलवूं नका हो ॥ रंग दिसतो फिका हो । पुढें आहे धका हो ॥ २ ॥ माज बरवा मोडी वो । राजाराम जोडी वो ॥ प्रपंच अवघा सोडी वो । याची काय गोडी वो ॥ ३ ॥ होई मुक्तकेसी वो । माझा वेष घेसी वो ॥ चिद्रत्नाला लेसी वो । श्वेतद्वीपा येसी वो ॥ ४ ॥ मध्वनाथीं खेळ वो । पिंगा अवघा वळि वो ॥ स्वरूपीं माझ्या मीळवो । होसी घननीळ वो ॥ ५ ॥

## पद १५६

समजुनी घाली फुगडी वो । कोठें न दिसे उघडी वो ॥ विषयसुखाला विघडी वो । द्वैतपसारा नुघडी वो ॥ १ ॥ विधिनीशेध माड्या झाकी वो । निर्भय पाऊल टाकी वो ॥ निजगुज आपलें राखी वो । होउनी येकायेकी वो ॥ २ ॥ तृष्णापल्लव खोवी वो । हा बहुता ठायीं गोवी वो ॥ मीपण बुंथी ठेवी वो । निजगुज आपुलें सेवी वो ॥३॥ गोष्टी ऐके निपुणाची । वेणी आवरी त्रिगुणाची ॥ भीड न धरी कवणाची । आण श्रीगुरुचरणाची ॥ ४ ॥ फुगडी घालुनी निरुती वो । जाउनी बैसे वरती वो ॥ बार घेई रति वो । नाहीं तरी होई परती वो ॥५॥ मध्वनाथीं चतुराई । मिरउनी होई उतराई ॥ तेही नुरवी मग बाई । तूंच होसी जळशाई ॥ ६ ॥

## पद १५७

कैकाय कैकाय बाई कोण कैचा जाण । सद्गुरुकृपा होईल तेव्हां सर्व सुख बाणे ॥ १ ॥ घेई खुळ खुळ बाई विनले राजसवाणें । देऊन सुपल्या कुरकुल्या मेळविते दाणे ॥ २ ॥ माझ्या रामाईचे डोळे हरणी देखुनी डोले ।

माझ्या रामाईचें पोट गगनाहुनी मोठें ॥ ३ ॥ माझ्या रामाईचे बोल समुद्राहूनी खोल । गोडबोली गुलगुली आवा आहेसी सगुण । वरमाय होसील वोहंमाय होसिल सांगते शकुन । फिरत फिरत याच गांवा आलें जें आज । भाग्याची तूं आहेस बाई ठेविलीस वोळखून ॥ ४ ॥ जें जें रचल तें तें खचल होईल चकचूर । पुढील होईक भाकून जातें अवघें होईल भुर ॥ वरली कडून आलें माझें घर आहे दूर । मध्वनाथस्वामी माझा धण्या भरपूर ॥ ५ ॥

## पद १५८

उफराटा पिंपळ त्यावरी येका कावळीनें केला खोपा रे । उफराटें बोलणें जाणे तो शाहाणा आहाणा नव्हे हा सोपा रे ॥ १ ॥ उफराटया दृष्टीनें पहातां कैसा उफराटा चालतो वौश रे । कावळीचें अंडें फोडितां त्यांतुनि निघतो राजहंस रे ॥ २ ॥ उपराटया हंसानें मानस भक्षुनि मुक्ताफळावरि लोळे । उफराटा मध्वनाथ निजेला गगनीं झाकुनि डोळे रे ॥ ३ ॥

## पद १५९

फटसौरी फजीतखोरी नको करूं चाळे । काजळकुंकु तेलफणी दांत करुनी काळे ॥ ध्रु० ॥ फळ नाहीं फूल नाहीं व्यर्थ जिणें बाळें । येणें वरपंगें कोण देखुनि तुला भाळे ॥ १ ॥ टाकमटीका करुनी किती घालसील डोळे । मगली ते फुगविसी उरावरील गोळे ॥ २ ॥ येणें रंगें नागविलें बहूत जन भोळे । वरल्या रानीं जासिल तेंव्हां खासिल वर जोर टोले ॥ ३ ॥ उपजूं ठाकू नको आपल्या ठाईं करूनि चाग भांग । जनापुढें पोटासाठीं नाचविसी अंग ॥ ४ ॥ सौरियाच्या संगें तुझा फिटला नाहीं पांग । विनोदाचा सेवट गोड होइल कैसा सांग ॥ ५ ॥ उपजू दे त्रास नको फिरो दारोदार । नसते चार सिकुन किती करिसी कारभार ॥ ६ ॥ भवसिंधु तरुनी कैसी जासी पैलपार । मध्वनाथ फजित करूनी सिकवी वारंवार ॥ ७ ॥

## पद १६०

चागभांग केला तो अवघा व्यर्थ गेला । ज्याचा हात धरला तो पहिला वगड मेला ॥१॥ आतां बसून काय दुजा कोण्ही पाहे । तरुणपणचें काजळकुंकू व्यर्थ जातें माये ॥ २ ॥ शाहाणीस जाउनी भेटे । निवडी खरेखोटें । अवघ्या परीस गाढवी तुझेंच आहे मोठें ॥ ३ ॥ आतां कोण तुला जगवितो तुझें कोड उगवीतो । जो तो मेला देखुनिया पुढें आपलें फुगवितो ॥ ४ ॥ येथें उदंड खेळे आले नाहीं कोण्ही ठेले । स्वजातीसि फिरोन पडुनी काळें करून गेले ॥ ५ ॥ चाल माझ्या गांवा नको घेऊं धावा । जेथिल तेथें नेऊन घालिन राखीन तुझ्या नांवा ॥ ६ ॥ मी निःसंग शौरी झालें निर्गुण रूप ।

आलें । लिंगदेह कापुनिया निजानंद व्यालें ॥ ७ ॥ ज्ञानांजन ल्यालें नाहीं कोण्हास भ्यालें । सद्गुरुसी शरण जाउनी शांतिरस प्यालें ॥ ८ ॥ सौरीसुर जाणा गेलें आपल्या राना । शुकादिक योगी जेथें जाउनि बसलें ध्याना ॥९॥ पाहिलेंपण गेलें द्वैतलुगडें नेलें। सद्गुरुकृपें मध्वनाथीं खालील वरतें केलें॥१०॥

## पद १६१

टिपरी गे सये टिपरी गे । वडील जाणुनी सांगतें जिचे तीपरि गे ॥ ध्रु० ॥ साधनदुर्ग मोडुनिया केले तासपाट । गौरी बोळउन येतां येतां चुकलीस आपल्या घरची वाट ॥ १ ॥ ऐक पोरी खिजूं नको शिकविते सुबुद्धी । रंगीत टिपरी देखुनी तुझी गेली पहिली शुद्धी ॥ २ ॥ ज्ञानगंगा सांडून गलीस माया नदीच्या कांठीं। टाकमटीका देखुनी तुझ्या। लागले साजण पाठीं ॥ ३ ॥ तिहीं तुज चालविलें देखून दुजा रंग। बोल आपल्यास लाउनि घेशिल सोडी त्याचा संग ॥ ४ ॥ इहलोकीं ऐसें कर्म करसील जें कीं । होईल तुझा बोभाट सावकाचे लेकी ॥ ५ ॥ आपल्या घराबाहेर बाई घालूं नको पाय । शांत-गौर बोळविल्या मग सौख्य काय ॥६॥ अनिवारा पोरीसवें घालुं नको बार । मध्वनाथें सोडिल्या मग कैची थार ॥ ७ ॥

## कवन १६२

सद्गुरुमायबहिणी माझे सासचे विहिणी गे। परीसे मंगळदायक अभिनव येक कहाणी गे ॥ कोठें नाहीं देखिली कहाणी तैसी रहणी गे। तिन्हीं त्रिभुवनीं नाहीं तुज येवढी शहाणी गे ॥ १ ॥ कायापुरीं देखिले सखे दोघे भाऊ गे । दंडीं त्यांचे ताइत सोनियाचे डाऊ गे ॥ दळितां कांडता त्यावर ओव्या गाऊं गे । टिपरी खेळत पंढरीस जाऊं गे ॥ २ ॥ वडील भाऊ म्हणवितो उदासीन जोगी गे । धाकटा देखिला कर्मफळ भोगी गे ॥ कर्मफळ भोगितां झाला क्षय रोगी गे ॥ आतां केश भाळतील राजकन्या चौघी ग ॥ ३ ॥ विद्या अविद्या म्हणविती दोघीजणी जावा गे। परस्परें अबोला चालविती दावा गे । धाकटीस नावडे वडील आपला भावा गे । जळो तिचा स्वभाव तुजही आहे ठावा गे॥४॥ जैसी रांड नाचवी तैसा मेला नाचे गे । वडिलांचें नांव तेंही कधीं न आणी वाचे गे॥ म्हणतो मी मी माझें माझें येणें घायेकांचें गे। अंगावरीं पडलें ओझें आतां कैसा वांचे गे ॥ ५ ॥ वडील भाऊ यांचें कधीं घेईना तें नांव गे । याचें त्याचें सरकतीचें आहे येक गांव गे ॥ येक्या गांवांमध्यें बाई येक घर ठाव गे । येक्या घरामध्यें याचा उणा पडला डाव गे ॥ ६ ॥ वडिलानें करावा याचा प्रतिपाळ गे । हें तो केवळ अज्ञानी तान्हें लहान बाळ गे ॥ शाहाण्यानें

घातले यावरी मायाजाळ गे । मायाजाळामध्यें दुःखी होतें सर्वकाळ गे ॥ ७ ॥ बाळपणीं मारितो याचीं मायबापें गे । तरुणपणीं याच्या हातें करवी महापापें गे ॥ आयुष्यास लाविलीं रात्रंदिवस मापें गे । अंतकाळीं गिळवितो प्रळयकाळ सापें गे ॥ ८ ॥ त्या वडिलाची विषमबुद्धि सांग ऐसी कैसी गे । येकालागीं देतों हे गाई घोडे ह्मैसी गे ॥ संतति संपत्ति सुंदर वनिता दासी गे । येक आपल्या पोटासाठीं त्यांसी तोंड वासी गे ॥ ९ ॥ येक शिव्यागाळी देती घेतो तळतळाट गे ॥ येक त्याच्या चरणावरी ठेविती ललाट गे । येका आपुलें स्वरूप दावितो विराट गे । येक नरकामध्यें दाटुनी पचवितो सैराट गे ॥ १० ॥ वडिलासि दटाउनी करवीं याचें राज्य गे । सद्‌गुरुमायबहिणी तुजला मागतें हें आजि गे ॥ विषम सृष्टि देखुनी आलें बहु वाजी गे । कृपादृष्टि पाहुनी गरिबां न वाजी गे ॥ ११ ॥ महाद्वारीं गरुडपारीं घालू ऐसा बार गे । पुंडलीक भाई माझा गोरवील फार गे ॥ माझ्या कंठीं घालील नवरत्नांचा हार गे । मध्वनाथा स्वामीस मागे समचरणीं थार गे ॥ १२ ॥

## कवन १६३ टिपरी.

गंगातीरीं बारी पोरी खेळताति नानापरी । गौराईची बरोबरी न करी कोण्ही ॥ १ ॥ गौराईचें वर्म कर्म ब्रह्मादिका न कळे । भले भले ठकले मुनीश्वर ॥ २ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर जडजन्म पावले । भक्षिताति कावळे बीज त्यांचें ॥ ३ ॥ कर्माचा भोग इंद्राचंद्रादिका न सुटे । तया अंगीं उमटे भगंदर ॥ ४ ॥ कर्माची गोष्टी तुम्हीं येक बायको । दोघा एक बायको आवडली ॥ ५ ॥ कुकर्म जाणुनि मनामध्यें रडली । अग्नीमाजी पडली जिवंताचि ॥ ६ ॥ तिच्या रूपालागीं जाले दोघे दुर्व्यसनीं । लोळताति मसणीं निरंतर ॥ ७ ॥ दोघांतून येकाच्या गळांच पडली । अंग संग जडली राहे सदा ॥ ८ ॥ सावत्र लेक तिला प्रातःकाळीं झोडिती । संध्याकाळीं जोडिती दोन्ही हात ॥ ९ ॥ तिचें नांव सांगा तिचें नांव सांगा । लाजतां कां गा वैष्णव हो ॥ १० ॥ वैष्णवा—

## पद १६४

खेळ खेळतो ऐंद्रजालिक जगचालक । बागबगीचे लावितो आंबे ते काय थांबे ॥ तैसे शेवटीं हें अवघें नासें क्षणभरीं भासे । काय गंधर्वनगरींची बरी वस्ती खरी ॥ तैसा प्रपंच हा मायिक जाणा मिथ्या म्हणा । मृगजळें जाईल तृष्णा हें तो मृषा । तेथें धीवर घालुनी फासे सांपडवी मासे । स्वप्नीं सांपडला बागुलाचा केवा जतन ठेवा । त्यासि पर्वकाळ पाहुनी बरा दान

पुण्य करा । रज्जुभुजंगाचा काढुनी मणी घारे कोण्ही ॥ अवघीं कल्पित कादंबरी वाजची परी । वाजता तोंडासी मांडीवरी आडवें धरी ॥ त्यास कासवीचें दूधतूप पाजी सुखरूप । शक्ति रजताचे लेववुनी नग खेळवी मग ॥ त्याचा आवसेच्या रात्रीं घरीं व्रतबंध करी । त्यास नोवरीची राजसवाणी सांगे कहाणी ॥ भीष्मतनया नोवरी बाळा माळेल तुला । गगनकुसुमाची गुंफुनि माळा घालील गळां ॥ तेथें सन्मुख पाहीन बरें अवघेंच खरें । सांगे मध्वनाथ याची कथा अवघें तथा ॥ १ ॥

## पद १६५ सासुरवास

संसार सासरा अविद्या हे सासु । ईचा आला त्रासु मजलागीं ॥ वासनानणंद तोडी माझे लोळे । कोणें ईचें लळे पुरवावे ॥ २ ॥ कांहीं केल्या ईचें नव्हे समाधान । विषयाचें ध्यान करीतसे ॥ ३ ॥ निर्दय निष्फळ अहंकार भर्ता । करूं नेदी वार्ता माहेरीची ॥ ४ ॥ सांडुनी मजला नव्हे पै वेगळा । यानें माझा गळा बांधियला ॥ ५ ॥ कामक्रोध देर मारीती हे लाता । याची मज व्यथा अहर्निश ॥ ६ ॥ अंतरींचें दुःख सांगूं कोणापाशीं । आहे परदेशी येकली मी ॥ ७ ॥ येई मज मूळ विवेकभाई या । गातसे वोवीया तुजलागीं ॥ ८ ॥ शांतिमाता माझी भेटविसी कधीं । बहिण सुबुद्धि अंतरले ॥ ९ ॥ स्वानंद हा पिता खंती याची वाटे । आठविता दाटे कंठ माझा ॥ १० ॥ क्षमा आणि दया सख्या दोघीजणी । माझ्या सांगातीणी परत्रिंच्या ॥ ११ ॥ स्वधर्म विश्वास हाचि निजसखा । पाहतां या सारिखा नसे कोणी ॥ १२ ॥ ऐसें माहेरीचें गोत आठवतें । हृदय फुटतें भेटीसाठीं ॥ १३ ॥ ऐकुनी करुणा धावला सद्गुरु । जो ह्मणवी कल्पतरु अनाथाचा ॥ १४ ॥ त्यानें मज केलें भक्तियोगारूढ । अनुग्रहें दृढ धरियलें ॥ १५ ॥ ज्ञानखड्गें करुनी वधिली अवघी नेले मज वेगीं माहेरासी ॥ १६ ॥ माझी मज येणें भेटावेली माय । उतराई काय होऊं यासी ॥ १७ ॥ श्रीगुरुसमर्थें दाविलें माहेर । स्वरूपाबाहेर जाऊं नेदी ॥ १८ ॥ स्वानुभवें दूर केला चिदाभास । कैसा सासुरवास मध्वनाथा ॥ १९ ॥

## कवन १६६

सद्गुरु परीट चोखट । तो मज भेटला अवचट ॥ १ ॥ माझा चिदाभास सेला । अविद्येनें मळीन केला ॥ २ ॥ रूप ज्याचें समपोत । नाहीं आणिकांचे हाते होत ॥ ३ ॥ सद्गुरु मोठा गे पारखी । सेला अमोल निरखी ॥ ४ ॥ धुणावळीचा नमस्कार । पाहून केला अंगिकार ॥ ५ ॥ अनुतापाच्या उदकीं । घडी भिजावली निकी ॥ ६ ॥ शुद्ध सत्वाचा साबण । श्रीगुरु लावितो आपण

॥ ७ ॥ होता अहंतेचा डाग । तोही केला शुद्ध भाग ॥ ८ ॥ शांतिशिळेवर धुतला । ज्ञानगंगेसी निर्मळ केला ॥९॥... दाकासी वाळविला । घडी करूनी ठविला ॥ १० ॥ मध्वनाथीं उकालिला । ज्याचा त्यास समर्पिला ॥ ११ ॥

## कवन १६७ रंगारी

सद्‌गुरु भेटला रंगारी । साधकाला अंगीकारी ॥ १ ॥ माझें सुमन तिवट । होतें साधनें धुवट ॥ २ ॥ तेच रंगविलें येणें । रामरंगीं राजसवाणें ॥ ३ ॥ रंग अविट पै ज्याचा । वर्णायास कैसी वाचा ॥ ४ ॥ ऐसें पाहाता कोठे नसें । उमटविलें स्वरूप ठसे ॥ ५ ॥ तोंचि बायलें आतां । मध्वनाथें माझ्या माथां ॥ ६ ॥ लक्ष तुरा झळकतो । सिद्धजन वळखतो ॥ ७ ॥ अनुभव आरसा पाहिला । नाथ तन्मय राहिला ॥ ८ ॥

## कवन १६८

आंधळा मी झालों देवा नाहीं स्वरूपीं दृष्टि । जिकडे ज्यानें चालविलें तिकडे जातो त्याचे पृष्टीं ॥ धाव रे दीनबंधु निरसी कल्पनासृष्टि ॥ ध्रु० ॥ वेंघता वेंघवेना जन्ममृत्यूचे कडे । ज्याचा टेका धरूं जातों त्यासि घेउनी पडे। गर्भवास दरीतूनि बाहेर निघतां रडे । शुद्धमार्ग सांपडेना जाऊं कोणीकडे॥१॥ विकल्पाच्या ठेचा खातों नेणें गिरिगडदरा । अकस्मात तिकडे जातों जिकडे चोराचा थारा ॥ तेच मज नागविती आपल्या साधिती वैरा । निर्वैर करुनी कोण्ही जाऊं देईना सैरा ॥ २ ॥ अविद्येच्या मध्यरात्रीं अहंश्वापद भय । तारुण्यब्रह्मारण्यीं करीती प्राणविलय ॥ मध्वनाथा धावरे देवराया स्वामी होई सदया । मध्वनाथा करिसी केंव्हां बोध अरुणोदय ॥ ३ ॥

## कवन १६९ वेड्याचें

गुरुरायें वेडा केला । प्रपंच अवघा विलया नेला ॥ १ ॥ काय सांगूं महिमा याची वळखी मोडिली मायेची ॥ २ ॥ बेडी तोडिली ममतेची बुद्धि जाली समत्वाची ॥ ३ ॥ आम्हीं जालों वेडेपिसें कांहीं बाहीच दृष्टीस दिसे ॥ ४ ॥ कर्मवासना फेडुनी । नाचो उघडे होवोनी ॥ ५ ॥ आम्ही नागवे भोपळे । खेळों त्रिभुवनीं मोकळे ॥ ६ ॥ सप्तभूमिकेसि धावा घेतों । सोऽहं ह्मणोनि हांका देतो ॥ ७ ॥ वेडे जाले सनकादिक । योगी संसारी अनेक॥८॥ मध्वनाथीं वेडेपण । जीवन्मुक्तदशा घेणें ॥ ९ ॥

## कवन १७० महात्म्याचें

एक माझ्या लेकी । ठकले येका येकीं ॥ वेष देखो वेखी । कोण त्याला लेखी ॥ १ ॥ नांव महानुभाव । सोंग अवघें वाव ॥ चातुर्वर्णीं भाव । जातीस कैचा

ठाव ॥ २ ॥ सोडुनी गरसोळी । फेडुनी शांतिचोळी ॥ धरील पात्र झोळी । तेच हांत चोळी ॥ ३ ॥ हातीं वरुनि काठी । नीति उफराटी ॥ मेल्या आपल्यासाठीं । लावी भिक्षेपाठीं ॥ ४ ॥ बोडकीचें पोट । वाढविलें मोठें ॥ हेंचि कर्म खोटें । मोडी त्यावरी बोटे ॥ ५ ॥ वरचेवर बोडी । डोहळ्याची गोडी ॥ ऐसी वोंगळ खोडी । शिळे टुकडे झोडी ॥ ६ ॥ आधीं डोकें मुंडा । काळें सांवळें गुंडा ॥ तीर्थीं गडबडगुंडा । रि...पुरीं धुंडा ॥ ७ ॥ कलिराज आला वर्णसंकर झाला ॥ महात्म्यासी व्याला । धर्म त्यासी भ्याला ॥ ८ ॥ ऐसें ज्याचें मत्त । ते सदा खाती लत्त ॥ मध्वनाथीं नित्य । न लाविती चित्त ॥९॥

## पद १७१ वर्णसंकराचीं पदें.

ब्राह्मणाची कन्या । लक्षामध्यें आहे ते धन्या ॥१॥ उपजुनी कलियुगीं गे । घरामध्यें राहिली जे उगी गे ॥२॥ नको बोलूं मर्सी गे । आहांत तुम्ही राजस. तामसी गे ॥ ३ ॥ मी तो जातिभ्रष्ट गे । आपल्या मुखें बोलती हें स्पष्ट गे ॥ ४ ॥ म्या वर्णसंकर गे । करितां झाला प्रसन्न शंकर गे ॥ ५ ॥ अगम्यगमनासी । केले म्या जेथें गम्यनिगमासी ॥ ६ ॥ रातले परपुरुषा । परि मी बाई नातळे कलिकलुशा ॥ ७ ॥ वाढविलें पोट गे । माझा म्यांचि केला घटस्फोट गे ॥ ८ ॥ न रिघे प्रायश्चित्त गे । मध्वनाथ तेथेंचि निश्चित्त गे ॥९॥

## पद १७२

अठरा पगड जाती । मजपुढें हात जोडुनी जाती ॥ १ ॥ हजार तोंडाळे । लज्जित झालें देखुनि चोंढाळें ॥२॥ षड्‌ दर्शनाचीं घरें । शोधिलीं तेथें देखिलें येक खरें ॥ ३ ॥ वाणी बकाल ते । मजपुढें अवघे ठकाल ते ॥ ४ ॥ आहे स्त्री माळ्याची । हांसते मज बहीण साल्याची ॥ ५ ॥ जालें मी तेलीण गे । धीवराची लक्षितें हें मीन गे ॥ ६ ॥ जो का सदाशिवीं गे । तयाची आहे नका देऊं सिवी गे ॥ ७ ॥ मी तों सुनारी गे । आवडे मज तो कामदारी गे ॥ ८ ॥ चिद्रत्न जो हरी गे । मध्वनाथ पर्णिला तो हरी गे ॥ ९ ॥

## पद १७३

विद्या गुरवाची । ऐकुनि जालें तेव्हांच मी त्याची ॥ १ ॥ सांडुनि अतारासी । हृदयीं आतां धरिलें सुतारासी ॥ २ ॥ रंग्या रंगाऱ्याला । भुललें त्याच्या देखुनि शृंगाराला ॥ ३ ॥ तृष्णा संसाराची । सोडुनि झालें कृष्णा कासाराची ॥ ४ ॥ मी मोठया कपाळाची । सद्रूशीं खेळे दासी गोपाळाची ॥ ५ ॥ निर्मळ वरठी गे । तयाचे दारीं मी घाली घरटी गे ॥ ६ ॥ संशय वारिकासी । भुलले बाई सांडुनि आणिकासी ॥७॥ आनंद महारासी । देखुनि

गेलें त्याचिया घरासी ॥ ८ ॥ सांडुनि सायासासी । भुलला माझा जीव कसायासी ॥ ९ ॥ जालें मी रामजनी । कलावंत केला मी येक धनी ॥ १० ॥ सत्ता अविद्याची । असतां दासी जालें गोविंदाची ॥ ११ ॥ मध्वनाथासी राजी जालें मी । आतां काय करील काजी ॥ १२ ॥

## पद १७४ अनुभवी.

काय सांगूं कपाळाची सखये काहाणी । येकायेकीं भुरळें पडलें ठकले शाहाणी ॥ १ ॥ चौघा जणीं मिळून माझा गळा कापिला । हाचि मज योग्य वर म्हणोनि स्थापिला ॥ २ ॥ सगुण सुंदर विद्यावंत देखुनि भाळलें । पडतां याच्या अक्षता मनांत वाळले ॥३॥ प्रतिबंधक अदृष्ट माझें मध्यें वोढवलें । त्यानें निज सुखापासुनि बाई सोडविलें ॥४॥ आलें यौवन शाहाणी जालें गेलें निजाया । कांहीं केल्या नावडे याला मी जाया ॥५॥ हात वोट लाविना रगडू देईना । तांब्याभर पाणी माझ्या हातें घेईना ॥६॥ चांगभांग बाहेर करी अंतरीं खिन्न । सद्‌गुरुमाय माझी तिनें वळखिलें चिन्ह ॥ ७ ॥ अनाथाची माय तिला आली दया गे । तिनें काय नेणो करणी केली तया गे ॥ ८ ॥ माझ्या कंठीं बांधिला येक ताईत । त्याच्या योगें अनुकूल जालें सर्वही साहित्य ॥९॥ पदरीं धरूनीं प्राणेश्वरें नेले येकांतीं । हृदयग्रंथि सोडुनी दिधली विश्रांती ॥ १० ॥ सुमनसेजेवरि घेऊन मजला निजला गे । बोधें गर्भ राहिला स्वामी खिजला गे ॥११॥ गळीत जाला देह माझे पुरले सोहळे । सद्‌गुरुची सेवा करणें हेच डोहाळे ॥ १२ ॥ पूर्ण दिवस मास भरले आलें माहेरीं । आतां माय पाय घालूं नेदी बाहेरी ॥ १३ ॥ पुत्रउत्सव पहावया आला स्वामी गे । प्रगल्भ पुत्र जाल्या पुनरपि जालें कामी गे ॥ १४ ॥ मध्वनाथस्वामीस घेऊनि गेलें येकांता । लिंगदेहभाग नाहीं माझिया कांता ॥१५॥ आतां बाई उगी रहा करा मुगांचे । त्यांचें माझें ऐक्य आहे बहुता जुगांचे ॥ १६ ॥

## पद १७५

काय सांगूं आतां माझें कपाळ उघडलें । पहिल्या शरीरसंबंधाचें नातें बिघडलें ॥१॥ ममता जाया मेली समता दुसरी म्यां केली । रमतां तिजशीं निशिदिनीं माझी भ्रमता ते गेली ॥२॥ तिनें माझी घरोघरीं केली दुर्दशा । चांडाळीण होती वोंगळ केवळ कर्कशा ॥३॥ क्षमा, दया, शांति, तितिक्षा समतेच्या बहिणी । चारी मुक्ती दासी जीच्या ते माझी गृहिणी ॥ ४ ॥ विवेकाची धन्य कन्या होती उपवर । जीवाजी मी बिजवर नवरा रिझलों तिजवर ॥ ५ ॥ मध्यावर्ती मनाजीनें केली घटवटना । निरंतर करीत होतों गीतेच्या पठणा

॥६॥ सावधान होईल त्याला येते प्रतिष्ठा । ॐ प्रतिष्ठा होतां स्वरूपीं धरिली म्यां निष्ठा ॥ ७ ॥ रुसणें फुगणें नाहीं जेथें तेथें रसरंग । संत कनकादीक त्याला मानिती निःसंग ॥ ८ ॥ उन्मनीच्या मंडपांत वेडा नाचला । नवरा अव्यय अद्वय हाची अर्थ साचला ॥ ९ ॥ उतरी लोण स्वर्गसुख सद्गुरुमाउली । म्हणवी वधुवरांची जे सीतळ सावली ॥ १० ॥ अनुभव अलंकार तीचे वर्णावें कोणें । तिच्या दर्शनमात्रें जीवन्मुक्तचि होणें ॥ ११ ॥ सगुण सुंदर चतुर शहाणी नवरी उदरंग । येकांतासी जाऊनि तिजसी केल्या म्यां संग ॥ १२ ॥ समतासंगें अनंगरंगें असंग मी जालों । सुमनसेजेवरी तीचें अधरामृत प्यालों ॥ १३ ॥ तिचें माझें हृदय येक द्वैत तें नाहीं । निरावर्णी सौख्य जालें कांहीं ना बाही ॥१४॥ साक्षात्कार पुत्र जाला साकर वाटिली । आनंदाची नदी प्रेमपुरें दाटली ॥ १५ ॥ मध्वनाथ बिजवर नवरा नांदे घरवारीं । दुस्तर मायानदी उतरुनी गेला परपारीं ॥ १६ ॥

## कवन १७६ बेडराचें.

सद्गुरु बेडर भेटे ज्या मानवा । तयाचा जाणावा भाग्योदय ॥ १ ॥ ब्रह्मारण्यामध्यें बेडर घेउनी गेला । ज्ञानखड्गें केला जीवघात ॥ २ ॥ माझ्या मस्तकींचें राजस तिवट । तें नेलें धुवट कधीं नोहे ॥ ३ ॥ द्वैतवासनेची होती जे वोरवटी । तें केली मोकळी धोकटीजी ॥ ४ ॥ क्रियमाण संचित होतें जें चंचींत । तें नेलें किंचित उरलें आतां ॥ ५ ॥ चित्ताची चौवडी होती जे धोंगडी । ते नेली घोंगडी खांद्यावरील ॥ ६ ॥ आयुष्याची होती हातीं काठी बरी । मोडुनी पाठीवरी तेही नेली ॥ ७ ॥ वर्णाश्रमाचें जें होतें कटिबंधन । त्यांतील नेलें धन पापपुण्य ॥ ८ ॥ निमाजामा कुडतीं नेलीं ते नदी पुढती । जयासाठीं रडती अज्ञानी ते ॥ ९ ॥ लौकिक लज्जेचें होतें जें अंबर । तें नेलें दिगंबर जालों आतां ॥ १० ॥ दोन्ही हस्तमात्रा नेल्या कर्णमात्रा । तेथें पानपात्रा ठाव कैचा ॥ ११ ॥ विषयवासनेचें आणिलें जयाचें । तें नेलें पायाचें पायतन ॥ १२ ॥ बेडरानें केले नागवा उघडा । जालों मी जोगडा अवधूत ॥१३॥ मध्वनाथ म्हणे लावियला धाक । मारूं नेदी हाक सोऽहं ऐसी ॥ १४ ॥

## कवन १७७ बागाईताचें लफगाणें

आइतें आहे पाटस्थळ । जागा वहीत केवळ । बागाईताचा अम्मल । कोण्ही करूं जागेना ॥ १ ॥ नलगे घालावें वीरजे । हेल बैल देउनि दुजें आपल्या हिकमतीनें वोजे । नाग हातीं धरावा ॥ २ ॥ बारव आहे वरल्या

सानीं । बाराही महिने वाहते पाणी । तिचें वळण वळा कोण्ही । आपल्याकडे भाईनो ॥ ३ ॥ नाग पिकल पिकल । माल अव्वल विकल । नाथ सांगतो अकल । कोण्ही मनीं समजेना ॥ ४ ॥ सरस आमची बागशाई । हमेश नगाऱ्याची घाई । तेथें चालू आपल्या गाई । त्रिकूट शिखरावरी ॥ ५ ॥ अवघ्यांत मोठा आमचा बाग । तेथें काळास कैचा लाग । तेथील अमृताचा भाग । जोगी एक सेवितो ॥ ६ ॥ तो विसरला पहिलें दुःख । मौन धरियेलें मुखें । कर्णकुमारीच्या सुखें । आसन घालुनि बैसला ॥ ७ ॥ नांव त्याचें निरंजन । बावा राखतो हें बन । त्याला करितों नमन । अरुणोदयीं उठोनि ॥ ८ ॥ रोज करितों चाकरी । आम्हीं त्याचे बनकरी । तो सांभाळितो बहुतापरी । आपल्या घरींच्या लेंकरा ॥ ९ ॥ तोचि आमचा मूळधणी । त्याचे दिवस कोण गणी । ज्यानें राखिलें बाळपणीं । आहे लई दीसांचा ॥ १० ॥ त्यानें उदंड सिद्ध केलें । गोरखनाथ ऐसे चेले । चाळउनी आपल्या घरा नेले । दत्तात्रयासारिखे ॥ ११ ॥ ऐसें आमुचें बागाईत । वरकड तुमचें जिराईत । दोहींचाही मध्वनाथ । अमल करूं जाणतो ॥ १२ ॥

## पद १७८ राग कल्याण

सावळा गे रमाकांत सनातन । परब्रह्म परात्पर । पद्मनाभ पुरातन ॥ ध्रु० ॥ कृष्ण विष्णु जनार्दन । करीं धरी गोवर्धन । कालियमर्दन निजानंदवर्धन ॥ १ ॥ त्रिविक्रम वामन । पतितपावन पंकजलोचन । संकट मोचन ॥ २ ॥ सनकसनंदन । व्यास करिती वंदन । नंदाचा जो नंदन । तोडी भवबंधन ॥ ३ ॥ करी दुष्ट दैत्यघात । त्याची काय सांगूं मात । जोडूं या दोन्हीं हात नाथ करी प्रणिपात ॥ ४ ॥

## पद १७९

कानडया कान्हो ठकडया वांशीवाल्या ॥ ध्रु ॥ येकीला रंजवणें । दुजीला गांजणें । यांही गोष्टी तुझ्या वाटया आल्या ॥ १ ॥ विरहें व्याकुळ झाल्या गौळणी वायां गेल्या । धन्य त्या अधरामृत प्याल्या ॥ २ ॥ गुरुसी जाउनि शरण । हृदयीं धरिलें चरण । नयनीं ज्ञानांजन ल्याल्या ॥ ३ ॥ तनधन विसरल्या । निजमनें अनुसरल्या । नाहीं या लौकिकासी भ्याल्या ॥ ४ ॥ मध्वनाथास्वामी । तुझिया दासी आम्हीं । जीवनन्मुक्ततेनें न्याला ॥ ५ ॥

## पद १८०

गोविंदा कृष्णा गोपवेषा ॥ ध्रु० ॥ याज्ञिक घालिती घृत अवदाना । तव अभिधाना देऊनीं प्रेषा ॥ १ ॥ यज्ञेश्वर तो प्रगट तूं होसी । आरूढ होउनियां मेषा ॥ २ ॥ कंस केशी अघबक धेनुक । उद्धरिले ते करितां द्वेषा

॥ ३ ॥ गोकुळपाळक गोवळबाळक । न कळे तुझा महिमा शेषा ॥ ४ ॥ मध्वमुनीश्वर पुराणपुरुषा । निर्गुणरूपा निर्विशेषा ॥ ५ ॥

## पद १८१

गोकुळपाळक चालक बालक नंदाचा ॥ ध्रु० ॥ श्यामळ कोमळ वोतीव पुतळा । केवळ सच्चिदानंदाचा ॥१॥ कुंजवनीं मृदुमंजुल पावां । वाजवी मोहन छंदाचा ॥२॥ मध्वमुनीश्वर साधक म्हणतो । छेदक जो भवबंधाचा ॥ ३ ॥

## पद १८२

गोपाळा वारी संसारमायाजाळा । गोविंदराया झडकरी निरसी या कळिकाळा ॥ ध्रु० ॥ कामलोभें भाळल्या तुज गोपिबाळा । त्या मुक्त केल्या नेल्या निजधामा वेल्हाळा ॥ १ ॥ वैरभावें स्वरूपीं मेळविलें त्या शिशुपाला । ध्रुवलेकराला अढळपदीं बैसविसी कृपाळा ॥ २ ॥ तां उद्धारिला पापी अजामीळ जातिनिराळा । देखुनि ज्याला यमदूतांचा संग पळाला ॥ ३ ॥ तूं मायबाप म्हणविशी या जगीं लेकुरवाळा । श्रीमध्वनाथा पाजी नामसुधासुरसाला ॥ ४ ॥

## पद १८३

आणा वो वृंदावना जाउनिया यादवराणा ॥ ध्रु० ॥ माझा तळमळी जीव त्यास कैसी न ये कींव । ज्याच्या पायां सदाशिव । भावें वंदितो हे जाणा ॥ १ ॥ दुःख आदळता आंगीं । क्षणक्षणा होतें जागीं । मध्वनाथस्वामी जगीं । वोवाळीन पंचप्राण ॥ २ ॥

## पद १८४

काय करूं सये आतां जीव वेडा जाला ॥ ध्रु० ॥ लौकिकाची लज्जा गेली । ऐसी करणी कृष्णें केली । अधरामृतरस प्याला जीव वेडा जाला ॥ १ ॥ शरीराचें भान नाहीं । ऐसी दशा जाली पाहीं । मदनमोहन दावा वंशीवाला ॥ २ ॥ मध्वमुनीश्वरहृदयविहारी । तोचि विरहबाधा वारी । तीळभरि नाहीं माझी दया त्याला ॥ ३ ॥

## पद १८५

मोहनरंगा गेला गेला होतासि रे कोठें । गोविंदा रात्रीं आनंद केला कोठें ॥ ध्रु० ॥ मुकुंदा तुझा मुखेंदु जाला म्लान । गोवळा अवघा पालटला रे वान ॥ केवढा तां माझा कैसा केला अपमान । केलें तां जिचें समाधान तेचि भाग्यवान ॥ कारितोसि सर्व कर्म खोटें ॥ १ ॥ धन्य ते गोपी चंद्रानना चंद्रावळी । जीचिये सेजेवरता रमला वनमाळी ॥ सद्भावें मध्वनाथा जीवें वोवाळी । आनंदें

मग्न निवाली जाली दिवाळी ।। तिचें तें चातुर्य मोठें ।। २ ।। मोहनरंगा गेला होतासि रे कोठें । सप्रेम भेटुनि कंठीं चुंबुनि घाली मिठी ।। आरक्त उमटलीं बोटें ।। ३ ।।

## पद १८६ राग—सोरट

मोहन हा मतवाला भोंदु कैचा कोठुनि आला वो ।। ध्रु० ।। कुंजवनीं मज मोहित करुनि अधरामृतरस प्याला वो ।। हृदयग्रंथिस भेटुनि भोगितो धीट मवास हा जाला वो ।। १ ।। मध्वमुनीश्वरवरद विनोदी नाहीं कोणा भ्याला वो ।। यमुनातटीं नटवंशी वटातळीं अघटित करितो ख्याला वो ।। २ ।।

## पद १८७

करुणानिधान गे आणी गे ।। ध्रु० ।। व्रजराज आज लाज । राखो भगवान गे ।। १ ।। स्मरणबाण जाण प्राण । घेतो अवदान गे ।। २ ।। उठी जाय माय काय । पाहसि निदान गे ।। ३ ।। मध्वनाथ घातपात वारील अदान गे ।।४।।

## पद १८८

तो मज दावा जिवलग मेघश्याम ।।ध्रु०।। हरिविण मजला क्षणहि न कंठे । वाटे सर्व विराम ।। आठवितें मनमोहनयाचें । रूप सुखाचें धाम ।। १ ।। मध्वमुनीश्वर निशिदिनीं ज्याचें । गातो केवळ नाम ।। तो जरि येउनि भेटल मजला । पुरविल सकळहि काम ।। २ ।।

## पद १८९

सये बाई आणी यादवराय । साजणी वंदीन तुझे पाय ।। ध्रु० ।। वसनविभूषणभार न सोसे । चंदन लाउनि काय ।। १ ।। हरिविरहानल जाळी मजला । स्मरशर मारी घाय ।। २ ।। मध्वमुनीश्वरवरद न ये तरि । त्याविण जीव हा जाय ।। ३ ।।

## पद १९०

हारे कान्हा तुजविण मजलागीं आजि गमेना ।। ध्रु० ।। मंद सुगंध समीर शरीरा । लागतांचि विरहाचा दाह शमेना ।। १ ।। जाई जुई चंपक सेवंती मालती । सुमनाचे सेजेवरी जीव रमेना ।। २ ।। मध्वनाथवरदा सखया ये । काय करूं तळमळितें करमेना ।। ३ ।।

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**१. भक्तिमार्गप्रदीपः**—( आवृत्ति तेरावी ) हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें असून घरोघर महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या नित्य पाठांतलें होऊन बसलें आहे. धर्मशिक्षणाची उत्तम कामगिरी हें करीत आहे. किं. ०८ व्ही. पीनें ०१२.

**२. संतचरित्रमालाः**—यांत कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ संतांचीं चरित्रें सप्रमाण दिलीं असून ग्रंथ फार लोकप्रिय झाला आहे. पृ० सं. २५६ किं. रु. १०८.

**३. श्रीएकनाथचरित्रः**—श्रीएकनाथमहाराजांचे चरित्राची ही तिसरी आवृत्ति वाढवून छापली आहे. समग्र चरित्र दिलें असून नाथांचे कांहीं उतारे नवीन घातले आहेत. किं. ०१२.

**४. कविरामायणः**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ०४.

**५. आनंदलहरीः**—( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेंपैकीं ४४ स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ व ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ०१२.

**६. नारदभक्तिसूत्रेंः**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यांवरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ०८. ( तूर्त शिल्लक नाहीं )

**७. नवविधाभक्तिः**—( आवृत्ति दुसरी ) यांत नवविधाभक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ०६.

**८. निरंजनमाधवांची कविताः**—भाग पहिला. किं. १ रु.

**९. श्रीज्ञानेश्वरचरित्रः**—( आवृत्ति दुसरी ) चरित्र, उतारे व विवरण यामुळें ग्रंथ संग्राह्य झाला आहे. किं. १०८.

**१०. भक्तिमणिमालाः**—श्रीमद्भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत. अत्यंत संग्राह्य. किं. १०८.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**११. सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**:—वारकरी मंडळाचे प्रसिद्ध के॰ विष्णुबुवा जोग यांनीं केलेल्या सविस्तर अर्थासह. किं. ०५.

**१२-१३. मुमुक्षूंतील निवडक निबंध** ( भाग १-२ ):-किं. प्रत्येकीं रु. १०८

**१४. मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. प्रथम काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन दिलें आहे. किं. रु. १०१२.

**१५. पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचाराची संगति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ०८.

**१६. श्रीतुकारामचरित्र**:—तुकोबारायांचें सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण. चरित ठिकठिकाणचे कागदपत्र व जुने गाथे पाहून लिहिलें आहे. विद्वानांस, भाविकांस व रसिकांस हें फार आवडलें आहे. श्रीविठ्ठलाचा पंढरपूरचा व देहूचे सहा असे सात फोटो, तुकोबांचीं भरपूर अवतरणें इ॰ सह. किं. रु. ३.

**१७. श्रीतुकारामचरितामृत**:—तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलेलें भाविकांस नित्यपाठास अत्यंत उपयोगी. किं. ०५.

**१८. निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**:—निबंधमालेचे मूळ अंक पाहून मालेवर टीकात्मक लेख-विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रासह. किं. ०१०.

**१९. मुक्तेश्वर** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—श्रीएकनाथमहाराजांचे नातु प्रासादिक सत्कवि मुक्तेश्वर हे सुप्रसिद्ध आहेत. यांच्या कवित्वाचे सर्व विशिष्ट गुण उदाहरणासह स्पष्ट करून दाखविले आहेत. मुक्तेश्वर व त्यांची कविता यांची पुरी ओळख होण्यास हा एकच ग्रंथ पुरेसा आहे. किं. रु. १.

**२०. मारुतिउपासना** ( चौथी आवृत्ति ): —किं. ०४.

**२१. सार्थ श्रीदासबोध**:—किं. रु. ४. व्ही. पी. नें ४०१०.

**२२. सार्थ मनोबोध**:—मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण. किं. ०१२.

**२३. समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे**:—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण व विविध प्रकरणें या चार भागांत समर्थांच्या कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४०० किं. रु. २.

**२४. मोरोपंत** ( चरित्र आणि काव्यविवेचन ):—किं. रु. २.

**२५. श्रीएकनाथी भागवत** ( निर्णयसागर प्रेसचें, आवृत्ति तिसरी ):—किं. रु. ६.

पत्ता:—व्यवस्थापक "मुमुक्षु" पुणें शहर.